मा. २८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९८०, १९८१

अंक — दिवाळी — १९८१

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय)

अभिव्यक्ति

१९८०

**नव-साहित्यानें नटलेलें नाविन्यपूर्ण नियतकालिक**

# अभिव्यक्ति

—: संपादक :—
**यशवंत पाध्ये**
**श्रीपति राव**

★

—: सहाय्यक :—
**रत्नकांत पावसकर**

★

—: सजावट :—
**सुधीर चिंदरकर**

★

—: कार्यालय :—
अहमद सेलर बिल्डींग नं. ८,
गोविंदजी केणी रोड,
नायगांव, दादर, मुंबई १४

★

: प्रकाशक व मुद्रक :—
**यशवन्त हरी पाध्ये**

★

—: प्रकाशन स्थळ :—
अहमद सेलर बिल्डींग नं. ८,
गोविंदजी केणी रोड,
नायगांव, दादर, मुंबई नं. १४

★

—: मुद्रण स्थळ :—
**हिंदमाता प्रिंटींग प्रेस,**
परेल, मुंबई १२

★

—: कव्हर छपाई :—
वाघ प्रिंटरी

## या एकाच अंकांत–

* **प्रवेश-द्वारीं—सपादक**
* वाया गेलल्या तारुण्याची उद्बोधक कथा—'**टरफल आणि गाभा**' (ना. ह. आपटे)
* **प्रा. ना. सी. फडके** अभिमानानं म्हणतात— '**हे माझं पुणं!**'
* **डॉ. रा. शं. वाळिंबे** यांचें नवे संशोधन— '**एकच प्याला**'**चा लेखनकाल**
* **मा. मनहर बरवे** यांचें सुश्राव्य— '**संगीत**'
* **श्री. भाऊ जमेनीस** नवा प्रकाश पाडीत आहत— '**आमचें राजकारण**'
* लोकांचें '**बर्थ**' तर **प्रा. पद्माकर डावरे** यांचे — '**गर्थ कंट्रोल**'
* **श्रीपाद काळे** यांची साधी सरळ — '**एका संसारी माणसाची गोष्ट**'
* **श्री. प्र. र. देशपांडे** यांची चिरतरुण — '**अबोली**'
* **श्री. बाबूराव अर्नाळकरांना** उलगडलेले — '**स्त्री हृदय**'
* **विजय तेंडुलकरांनी** घेतलली एक वेगळीच — '**मुलाखत**'
* **प्रा. गो. वि. करंदीकरांच्या** सौंदर्यदृष्टींतून—'**पुस्तकें (म्हणजे) एक शोभा**'
* **विंदा घागांनी** सांगितेलेल — '**असावरी**'चे असीम दुःख.
* स्त्री आणि पुरुष यांच्या कलहाचा — '**रत्नकांत पावसकर**' यांनीं प्रणयानें घडवून आणलेला '**समेट**'
* **सौ. कुमुदिनी रांगणेकरांची** '**प्रीतीची संध्याकाळ**' म्हणजे सोनेरी संध्याकाळ
* दुसऱ्या व्यक्तिमत्वाची **प्रा. शांता शळके** यांनी ऐकविलेली — '**हांक**'
* **श्री. वासुदेव पोवळे** यांनी उकललेलें — '**सरदारजीचें रहस्य**'
* **श्री. पु. रा. लेले** यांच्या स्मरणांतलें — '**गंधमादन्**'
* **वि. आ. बुवा** यांचेहि असेंच म्हणणें कीं —'**हा संप अटळ आहे**'
* **(र.) गो. (स)रदेसायांचें** रसिक समीक्षण — '**मुगले आझम**'
* **श्रीकान्त पुरोहित** यांच्या '**प्रीतीची (दुनिया) बडी है संगदील**'
* **डॉ. वि. वा. करंवेळकर** यांच लेखणीतून — '**भवभूती वाग्दर्शन**'

* **कुसुमाग्रज, मनमोहन, प्रा. सूर्यकान्त खांडेकर, योगेश्वर अभ्यंकर, संजीव, राजा मंगळवेढेकर, ललितागौरी, दत्ता हलसगीकर, प्रा. प्रभाकर बिडवे, केतन घाग, सुनन्दा बक्षे, कु. श्री. पेडणेकर, प्रा. दत्तात्रय जोग, कृष्णचंद्र भोईटे, शाहीर आत्माराम पाटील, सदाशिव करंदीकर, सरला खरे, रघुनाथ हडकर, सी. पु. वालावलकर, गंगाधर जोगळेकर, रश्मिनी नायक यांचा भावविलास.**

* **विविध हास्यकथा व किंचित् काव्यें—वि. आ. बुवा.**

# प्रवेश—द्वारीं—

**नमस्ते वाचक !**

आज आपलें स्वागत करतांना आमचें अंतःकरण आनंदोर्मींनी उचंबळून आले आहे.

सुरंगानी नटलेली ही **अभिव्यक्ति** ! साहित्य—कला आणि सौंदर्य यांचे हे प्रदर्शन आम्हीं तुम्हां रसिकांकरितांच उघडलें आहे. मुखपृष्ठाच्या गुलाबी फितीचं बंधन तोडून आपण हलक्या पावलानं या अंकाच्या दालनांत प्रवेश करावा. आपण पुढें चलावें. ही 'अभिव्यक्ति' न्याहाळावी. तिचा रसिकतेने उपभोग घ्यावा. आम्ही आपल्या सेवेला हजर आहोतच.

अभिव्यक्ति ! 'अभिव्यक्ति' म्हणजे काय ? अभिव्यक्ति म्हणजे प्रदर्शन ! अभिव्यक्ति म्हणजे भावदर्शन ! अभिव्यक्ति म्हणजे स्पष्टपणा ! अभिव्यक्ति म्हणजे स्वप्नाचं सत्:स्वरूप ! विश्वाची निर्मिती होण्यापूर्वीपासूनच ही अभिव्यक्ति अस्तित्वांत आहे. ही बहुरंगी स्वप्नोळूं दुनिया म्हणजे तरी काय आहे ? विधात्यानं आपल्या कलेचं व अकलेचं मांडलेलं प्रदर्शनच नाहीं काय ? निळें आकाश, अथांग समुद्र, सुगंधी फुलें, सुरंगी इंद्रधनु, मऊ मुलायम मोरपीस अशा असंख्य छोट्या-मोठ्या गोष्टींतून निसर्गाच्या किमयेचं प्रदर्शन व्यक्त होतं.

निसर्गाप्रमाणंच माणूसहि आपल्या कलांचं, गुणांचं, प्रतिभेचं प्रदर्शन मांडीत असतो. अशा प्रदर्शनांतून त्याला स्वतःला आत्मिक आनंद मिळतो व त्याच्या इतर बांधवांचेहि डोळे व मन तृप्तीनं न समाधानानं डोलते. स्वतः आनंदी होऊन इतरांनाहि आनंद देणारी माणसाची ही वृत्ती आज आम्हीं 'अभिव्यक्ति' दीपावलि अंकाद्वारें वाचकांसमोर अनावृत्त करीत आहोंत.

या इथें—'अभिव्यक्ति'मध्यें प्रतिभाशाली कलावंतांच्या लेखणीचा व कुंचल्याचा बुद्धीला थक्क करणारा व मनाला नितांत आल्हाद देणारा भावविलास प्रदर्शित झाला आहे. या प्रदर्शनांत रसिकांना उल्हास वाटेल, आनंद गवसेल, जीवनाचा अन् जगाचा थोडा—बहुत बोधहि होईल असा आमचा विश्वास आहे. या 'प्रदर्शनास फेरी मारणाऱ्या रसिकाच्या चार घटका निव्वळ करमणुकींत न जातां त्या सत्कारणींहि लागतील, असा आम्हाला दृढ भरवंसा वाटतो.'

माणसाच्या सुखाच्या, आनंदाच्या भावना जेव्हां हृदयांत न मावतां बाहेर ओसंडू लागतात. तेव्हां कुठल्या ना कुठल्या माध्यमांतून त्यांचा आविष्कार होतोच. तो माणूस हंसू लागतो, गांवू लागतो, स्वतःभोवती नाचूहि लागतो. क्वचित त्याच्या डोळ्यांतून अश्रूहि ओघळूं लागतात, जे आनंदाचे असतात. आमचीहि आज अशीच वेड्या-प्रमाणें अवस्था झाली आहे. आनंदानें बेभान होऊन आम्हीं, दाही दिशा जिंकणारा पराक्रम गाजविण्याची स्वप्नें रेखीत आहोत ! हा इतका अतुल आनंद कशाचा बरें ? अर्थात ते कां सांगायला हवं ? ज्याच्या केवळ नामोच्चारानेंच अंग रोमांचानें फुलून येते, छाती अभिमानानें फुगते, मान गर्वोन्नत होते, ज्याच्यासाठीं लाखो लोक प्रसंगीं आपली शीरकमलेंहि अर्पायला हंसत हंसत तयार होतात त्या श्री छत्रपति शिवाजी महाराज, रामदास, तुकाराम व ज्ञानेश्वरांच्या परमप्रिय देशाला—आमच्या महाराष्ट्राला आज भारताच्या नकाशांत मानाचे व वैभवाचे स्थान मिळाले, म्हणून आज आम्हीं अक्षरशः वेड झालो आहोंत. हा आमचा आनंद ज्यांनीं आम्हाला मिळवून दिला त्या ज्ञात व अज्ञात हुतात्म्यांचे पुण्यस्मरण आमच्या हृदयांत अखंडपणें तेवत राहील.

ज्यांच्या भावबळावर आम्ही 'अभिव्यक्ति' उभारली त्या श्रीमती सोनूताई कब्बूर, साहित्यिक मंडळी, जाहिरातदार, हितचिंतक व रसिक वाचक या सर्वांशीं आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहो.

महाराष्ट्राची ही पहिली वैभवशाली दीपावलि सर्वांस सुख-समृद्धीची, वैभवाची व प्रगतीची जावो हीच आमची इच्छा !

—अशा या 'प्रदर्शनाचा' आनंद आमच्या वाचकांनीं 'एकांतात' उपभोगावा, म्हणून त्यांची करंगळी सोडून आम्हीं त्यांना एकट्यांनाच या पुढच्या दालनांत सोडीत आहों.

बरंय तर ! आपण पुढं चलावें.

**जय महाराष्ट्र !**

**—संपादक**

**महाराष्ट्राची पहिली वैभवशाली दीपावलि सर्वांस सुखसमृद्धीची, वैभवाची व प्रगतीची जावो**

नवसाहित्यानें नटलेलें नाविन्यपूर्ण नियतकालिक

# अभिव्यक्ति

## दीपावलि १९६०



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार यशवन्तराव चव्हाण यांचा

## शुभ संदेश

सी. एम्. एस्. । एस्. पी. । ४ । १४६
सचिवालय, मुंबई ३२
३ जून १९६०
१३ ज्येष्ठ १८८२

स. न. वि. वि.

नव-साहित्यानें नटलेलें असें एक नवीन मासिक '**अभिव्यक्ति**' आपण प्रकाशित करीत आहांत ह्याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. स्वराज्य प्राप्तीनंतरचा एक मोठा आनंदाचा सोहळा, अशा थाटांत मराठी जनतेनें महाराष्ट्र राज्याचें स्वागत केलं आहे. मराठी मनाचा हा आनंद उत्कटपणें व्यक्त करणारें साहित्य आपल्या मासिकांत प्रकाशित झालें तर विराट जनतेच्या उस्फूर्त भावनांना शब्दरूपांत मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय साहित्यिकांना लाभेल. ह्या दिशेनें आपल्यासारख्या संपादकांनीं प्रयत्न केले व लेखकांना उत्तेजन दिलें तर महाराष्ट्रांत आपणाला जें पुनरुज्जीवन घडवून आणावयाचें ते घडवून आणणे सुकर होईल.

आपल्या मासिकाच्या प्रकाशनानिमित्त मी माझ्या शुभेच्छा व्यक्त करतों.

कळावें

आपला

(यशवंतराव चव्हाण)


संपादक
यशवन्त पाध्ये
श्रीपति राव

'अभिव्यक्ति' कार्यालय
अहमद सेलर बिल्डिंग नं. ८ नायगांव, दादर, मुंबई नं. १४

नव-साहित्यानें नटलेलें नाविन्यपूर्ण नियतकालिक

# अभिव्यक्ति


—: संपादक :—

यशवंत पाध्ये

श्रीपति राव

★

—: [illegible] :—

रत्नकांत पावसकर

★

—: सजावट :—

सुधीर चिंद्रकर

★

—: कार्यालय :—

अहमद सेलर बिल्डींग नं. ८,
गोविंदजी केणी रोड,
नायगांव, दादर, मुंबई १४

★

: प्रकाशक व मुद्रक :—

यशवन्त हरी पाध्ये

★

—: प्रकाशन स्थळ :—

अहमद सेलर बिल्डींग नं. ८,
गोविंदजी केणी रोड,
नायगांव, दादर, मुंबई नं. १४

★

—: मुद्रण स्थळ :—

हिंदमाता प्रिंटींग प्रेस,
परेल, मुंबई १२

★

—: कव्हर छपाई :—

वाघ प्रिंटरी


## या एकाच अंकांत—


* प्रवेश-द्वारीं—संपादक
* वाया गेलल्या तारुण्याची उद्बोधक कथा—"टरफल आणि गाभा" (ना. ह. आपटे)
* प्रा. ना. सी. फडके अभिमानानं म्हणतात— 'हे माझं पुणं !'
* डॉ. रा. शं. वाळिंबे यांचें नवे संशोधन— 'एकच प्याला'चा लेखनकाल
* मा. मनहर बरवे यांचें सुश्राव्य— 'संगीत'
* श्री. भाऊ जमेनीस नवा प्रकाश पाडीत आहत— 'आमचें राजकारण'
* लोकांचें 'बर्थ' तर प्रा. पद्माकर डावरे यांचे — 'गर्थ कंट्रोल'
* श्रीपाद काळे यांची साधी सरळ — 'एका संसारी माणसाची गोष्ट'
* श्री. प्र. र. देशपांडे यांची चिरतरुण — 'अबोली'
* श्री. बाबूराव अर्नाळकरांना उलगडलेले — 'स्त्री हृदय'
* विजय तेंडुलकरांनी घेतलली एक वेगळीच — 'मुलाखत'
* प्रा. गो. वि. करंदीकरांच्या सौंदर्यदृष्टींतून—'पुस्तकें (म्हणजे) एक शोभा'
* विंदा घागांनी सांगितलेले — 'असावरी'चे असीम दुःख.
* स्त्री आणि पुरुष यांच्या कलहाचा — 'रत्नकांत पावसकर' यांनीं प्रणयानें घडवून आणलेला 'समेट'
* सौ. कुमुदिनी रांगणेकरांची 'प्रीतीची संध्याकाळ' म्हणजे सोनेरी संध्याकाळ
* दुसऱ्या व्यक्तिमत्वाची प्रा. शांता शेळके यांनी ऐकविलेली — 'हांक'
* श्री. वासुदेव पोवळे यांनी उकललेलें — 'सरदारजीचें रहस्य'
* श्री. पु. रा. लेले यांच्या स्मरणांतलें — 'गंधमादन्'
* वि. आ. बुवा यांचेहि असेंच म्हणणें कीं —'हा संप अटळ आहे'
* (र.) गो. (स)रदेसायांचें रसिक समीक्षण — 'मुगले आझम'
* श्रीकान्त पुरोहित यांच्या 'प्रीतीची (दुनिया) बडी है संगदील'
* डॉ. वि. वा. करंवेळकर यांच लेखणीतून — 'भवभूती वाग्दर्शन'

* कुसुमाग्रज, मनमोहन, प्रा. सूर्यकान्त खांडेकर, योगेश्वर अभ्यंकर, संजीव, राजा मंगळवेढेकर, ललितागौरी, दत्ता हलसगीकर, प्रा. प्रभाकर बिडवे, केतन घाग, सुनन्दा वझे, कु. श्री. पेडणेकर, प्रा. दत्तात्रय जोग, कृष्णचंद्र भोईटे, शाहीर आत्माराम पाटील, सदाशिव करंदीकर, सरला खरे, रघुनाथ हडकर, सी. पु. वालावलकर, गंगाधर जोगळेकर, रश्मिनी नायक यांचा भावविलास.

* विविध हास्यकथा व किंचित् काव्यें—वि. आ. बुवा.

# प्रवेश—द्वारीं—

**नमस्ते वाचक !**

आज आपलें स्वागत करतांना आमचें अंतःकरण आनंदोर्मींनी उचंबळून आले आहे.

सुरंगानी नटलेली ही **अभिव्यक्ति** ! साहित्य–कला आणि सौंदर्य यांचे हे प्रदर्शन आम्हीं तुम्हां रसिकांकरितांच उघडलें आहे. मुखपृष्ठाच्या गुलाबी फितीचं बंधन तोडून आपण हलक्या पावलानं या अंकाच्या दालनांत प्रवेश करावा. आपण पुढें चलावें. ही 'अभिव्यक्ति' न्याहाळावी. तिचा रसिकतेने उपभोग घ्यावा. आम्ही आपल्या सेवेला हजर आहोतच.

अभिव्यक्ति ! 'अभिव्यक्ति' म्हणजे काय ? अभिव्यक्ति म्हणजे प्रदर्शन ! अभिव्यक्ति म्हणजे भावदर्शन ! अभिव्यक्ति म्हणजे स्पष्टपणा ! अभिव्यक्ति म्हणजे स्वप्नाचं सत्‌:स्वरूप ! विश्वाची निर्मिती होण्यापूर्वीपासूनच ही अभिव्यक्ति अस्तित्वांत आहे. ही बहुरंगी स्वप्नोळू दुनिया म्हणजे तरी काय आहे ? विधात्यानं आपल्या कलेचं व अकलेचं मांडलेलं प्रदर्शनच नाहीं काय ? निळें आकाश, अथांग समुद्र, सुगंधी फुलें, सुरंगी इंद्रधनु, मऊ मुलायम मोरपीस अशा असंख्य छोट्या-मोठ्या गोष्टींतून निसर्गाच्या किमयेचं प्रदर्शन व्यक्त होतं.

निसर्गाप्रमाणंच माणूसहि आपल्या कलांचं, गुणांचं, प्रतिभेचं प्रदर्शन मांडीत असतो. अशा प्रदर्शनांतून त्याला स्वतःला आत्मिक आनंद मिळतो व त्याच्या इतर बांधवांचेहि डोळे व मन तृप्तीनं न समाधानानं डोलते. स्वतः आनंदी होऊन इतरांनाहि आनंद देणारी माणसाची ही वृत्ती आज आम्हीं 'अभिव्यक्ति' दीपावलि अंकाद्वारें वाचकांसमोर अनावृत्त करीत आहोंत.

या इथें—'अभिव्यक्ति'मध्यें प्रतिभाशाली कलावंतांच्या लेखणीचा व कुंचल्याचा बुद्धीला थक्क करणारा व मनाला नितांत आल्हाद देणारा भावविलास प्रदर्शित झाला आहे. या प्रदर्शनांत रसिकांना उल्हास वाटेल, आनंद गवसेल, जीवनाचा अन् जगाचा थोडा–बहुत बोधहि होईल असा आमचा विश्वास आहे. या 'प्रदर्शनास फेरी मारणाऱ्या रसिकाच्या चार घटका निव्वळ करमणुकींत न जातां त्या सत्कारणींहि लागतील, असा आम्हाला दृढ भरवंसा वाटतो.'

माणसाच्या सुखाच्या, आनंदाच्या भावना जेव्हां हृदयांत न मावतां बाहेर ओसंडू लागतात. तेव्हां कुठल्या ना कुठल्या माध्यमांतून त्यांचा आविष्कार होतोच. तो माणूस हंसू लागतो, गांवू लागतो, स्वतःभोवती नाचूहि लागतो. क्वचित त्याच्या डोळ्यांतून अश्रूहि ओघळूं लागतात, जे आनंदाचे असतात. आमचीहि आज अशीच वेड्या-प्रमाणें अवस्था झाली आहे. आनंदानें बेभान होऊन आम्हीं, दाही दिशा जिंकणारा पराक्रम गाजविण्याची स्वप्नें रेखीत आहोत ! हा इतका अतुल आनंद कशाचा बरें ? अर्थात ते कां सांगायला हवं ? ज्याच्या केवळ नामोच्चारानेंच अंग रोमांचानें फुलून येते, छाती अभिमानानें फुगते, मान गर्वोन्नत होते, ज्याच्यासाठीं लाखो लोक प्रसंगीं आपली शीरकमलेंहि अर्पायला हंसत हंसत तयार होतात त्या श्री छत्रपति शिवाजी महाराज, रामदास, तुकाराम व ज्ञानेश्वरांच्या परमप्रिय देशाला—आमच्या महाराष्ट्राला आज भारताच्या नकाशांत मानाचे व वैभवाचे स्थान मिळाले, म्हणून आज आम्हीं अक्षरशः वेड झालो आहोंत. हा आमचा आनंद ज्यांनीं आम्हाला मिळवून दिला त्या ज्ञात व अज्ञात हुतात्म्यांचे पुण्यस्मरण आमच्या हृदयांत अखंडपणें तेवत राहील.

ज्यांच्या भावबळावर आम्ही 'अभिव्यक्ति' उभारली त्या श्रीमती सोनूताई कब्बूर, साहित्यिक मंडळी, जाहिरातदार, हितचिंतक व रसिक वाचक या सर्वांशीं आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहो.

महाराष्ट्राची ही पाहिली वैभवशाली दीपावलि सर्वांस सुख-समृद्धीची, वैभवाची व प्रगतीची जावो हीच आमची इच्छा !

—अशा या 'प्रदर्शनाचा' आनंद आमच्या वाचकांनीं 'एकांतात' उपभोगावा, म्हणून त्यांची करंगळी सोडून आम्हीं त्यांना एकट्यांनाच या पुढच्या दालनांत सोडीत आहों.

बरंय तर ! आपण पुढं चलावें.

**जय महाराष्ट्र !**

**—संपादक**

**महाराष्ट्राची पहिली वैभवशाली दीपावलि सर्वांस सुखसमृद्धीची, वैभवाची व प्रगतीची जावो**

# पुण्यस्मरण !

## पितामह कै. केशव विष्णु तथा तात्या पाध्ये



जन्म ता. २४ नोव्हेंबर १८८९
मृत्यू ता. ३० ऑक्टोबर १९५९

**पूज्य आजाबा,**

आज '**अभिव्यक्ति**' साकार झाली. माझ्या आयुष्यांतील या परमोच्च आनंदाच्या क्षणीं तुम्ही मात्र आमच्यांत नाहींत. सभोवताली आनंदाचा एवढा जल्लोष चालला असूनहि तुमच्या अनुपस्थितीमुळें मला सारं वातावरण कसं कुंद कुंद वाटत आहे.

तुमच्या छायाचित्रासमोर आज मी उभा आहे. तुमच्या या प्रतिमेकडे पहातां पहातां माझं बालपण माझ्या डोळ्यासमोर उभं रहात आहे. तुमच्या या नातवाला तुम्ही जिवापाड जपलंत. मी तुमच्या अंगाखांद्यावर खेळलो. तुमचा आधार घेऊन मी बालपणचा जीवनक्रम आक्रमिला.

तुम्ही माझ्यासमोर गोष्टींचा खजिना उघडा केलांत. तुम्ही मला फुलपाखरांशी खेळायला शिकवलंत, जीवन कसं जगायचं तें तुम्हीं शिकवलंत; आयुष्याची दिशा तुम्हीच दाखवलीत. मी आजारी असतांना माझ्या उशाशीं तुम्ही बसलांत. माझ्या उराशी विशाल ध्येय देवून तुम्हीच मला आयुष्याच्या वाटेवर आणून सोडलंत. आयुष्याची यापुढील वाटचाल मात्र मला आतां तुमच्या सोबतीशिवायच करावी लागणार आहे. आजोबा, तुम्ही मला असं अर्ध्या वाटेवरच एकट्याला कां सोडलंत ? अजून मला तुमची साथ हवी होती. पण तुम्ही आधींच मागे परतलांत. खरंच आजोबा, परतण्याची तुम्ही फार घाई केलींत.

— पण तरीहि मी या पुढची पावलं धीरानं न डगमगता टाकीत जाईन. निर्धारानं मी वाटचाल करीन. कारण मला तुमच्या शुभाशिर्वादाचा दिलासा आहे. जीवनाच्या प्रवासांत तुम्ही छायेप्रमाणें माझ्यामागें असाल, याचीं मला खात्री आहे.

आजोबा, तुम्ही नखाएवढ्या पराक्रमाबद्दलहि माझं नेहमीं कौतुक केलंत. आज हा 'अभिव्यक्ति' चा अंक पाहून तर तुम्हीं गद्गद्लेल्या अंतःकरणानं मला आपल्या छातीशीं धरल असतंत— पण तुम्ही वर्षभराचाहि दम धरला नाहीं. देवाघरचं आमंत्रण आल्यावर तुम्हीं त्वरीत पुढच्या प्रवासाला लागलांत. तुमचा हा वक्तशीरपणा तुम्ही जन्मापासून अंतापर्यंत कायम ठेवलांत. पण मला मात्र हा अखेरचा वक्तशीरपणा मुळींच आवडलेला नाहीं.

असो, समोरच्या या तुमच्या हंसऱ्या प्रतिमेला मी माझ्या हृदयांत कायमचें स्थान देवून यापुढील मार्ग आक्रमीन.

या प्रवासांतील हा पहिला टप्पा—हा '**अभिव्यक्ति**' चा अंक——

—केवळ तुमच्या स्मृतीला ! !........

**—यशवंत हरी पाध्ये**

# पूर्वींच्या गुन्हेगार जमातींचे पुनर्वसन

## महाराष्ट्रांतील सामाजिक व आर्थिक पहाणीचे निष्कर्ष.

विमोचित जाति या नांवानें आतां ओळखण्यांत येणाऱ्या पूर्वींच्या तथाकथित गुन्हेगार जमाती सुमारें १२ वर्षांपूर्वी त्याच्यावरील निर्बंध काढून टाकण्यांत आल्यापासून कोणत्या परिस्थितींत रहात आहेत याबाबत नुकत्याच केलेल्या पहाणीवरून असें दिसून आल आहे कीं या जमातींतील लोक आतां शांततेनें व प्रगतीची वाटचाल करीत आपलें जीवन व्यतित करीत आहेत. राज्य सरकारच्या अर्थशास्त्र व आंकडेवारी ब्यूरोकडून ही पहाणी करण्यांत आली.

### स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच गुन्हेगार जमातींच्या वसाहतीं सभोंवताल्च्या कुंपणांच्या कांटेरी तारा तोडण्यांत आल्या व तेव्हांच्या मुंबई राज्याच्या सुमारें २८ जमातींतील ३ लक्ष लोकांवर लादण्यांत आलेला गुन्हेगारीचा कलक पुसून टाकण्यांत आला. त्यांच्या वसाहतीं भोंवतालच्या कांटेरी तारा म्हणजे एक प्रकारें तुरुंगाचेंच प्रतीक होतें. जनतेनें निवडून दिलेल्या राज्य सरकारनें जेव्हां हें क्रांतिकारक पाऊल टाकले तेव्हां आतां गुन्ह्यांचे पेव फुटणार अशी भीति अनेक लोकांनी व्यक्त केली. तथापि, या सर्व शंका खोट्या ठरल्या. विशेषत: राज्यसरकारनें त्यांच्यासाठीं शिक्षण, धंदेशिक्षण, कामधंदा इत्यादींची तरतूद केल्यामुळें व त्यांच्या पुनर्वसनासाठीं अनेक प्रकारें सवलती देऊन त्यांना सहाय्य केल्यामुळें वरील शंका निराधार ठरल्या. या वसाहतींतील लोकांनीं या सवलतीचा फायदा घेतला आहे. एवढेंच नव्हे तर कायद्याचे पालन करणारे व उपयुक्त नागरिक म्हणून ते आतां स्थायिक झालेले आहेत.

### विमोचित जातींतील लोक

शरीराची ठेवण, स्वभाव विशेष, बाह्य स्वरूप, संवयीं व चालीरीति अित्यादि बाबतींत जमाती–जमातींतील लोकांत बराच भेद असल्याचें आढळून येतें. यापैकीं बऱ्याच लोकांची चोरी व घरफोडी हा धंदा होता. कारण हेंच आपल्या उपजिविकेचें साधन आहे व वंशपरंपरा आपण हाच धंदा करीत आलेलों आहोत अशी शिकवण त्यांना देण्यांत आली होती. अठरा विश्वे दारिद्र्य व समाजाकडून होणारी उपेक्षा यामुळें हे लोक अशा प्रकारचे गुन्हे करण्यास प्रवृत्त झाले व निरनिराळ्या जमातींतील लोक या गुन्ह्यांत सराअीत व पटाअीत बनले.

गुन्ह्यांमध्येंही त्यांनी वर्गवारी करून घेतलेली होती. उदाहरणार्थ कांहीं लोक फक्त रात्रींच्याच चोऱ्या करीत तर कांहीं जमातींतील लोक केवळ खिसे कापणें व भुरट्या चोऱ्या करणें एवढेंच गुन्हे करीत असत. विलक्षण विरोधाभासाचें एक नमुनेदार उदाहरण असें कीं महाराष्ट्रांतील रामोशी जमातींतील लोकांची खेड्याच्या रखवालीसाठीं निवड करण्यांत येत असे व अशीं कर्तव्यें त्यांनीं अत्यंत कर्तव्यनिष्ठेच्या भावनेनें व विश्वासपात्र वृत्तीनें पार पाडल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. घरफोडींतील विलक्षण धाडस व मनुष्यावर बेदरकारपणें व निर्घृणपणें कुऱ्हाड घालण्याची वृत्ति यांविषयीं कुविख्यात असलेल्या सातारा जिल्ह्यांतील अनेक रामोशांनीं स्वातंत्र्याच्या लढ्यांत परकीय सत्तेशीं झुंज दिली व त्यांत प्राणार्पण केलें हें खरोखर वदतोव्याघाताचेंच उदाहरण होय.

### महाराष्ट्रांतील गुन्हेगार वसाहतींची पहाणी

महाराष्ट्रांत पहाणी करण्यासाठीं सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व बार्शी, पुणें जिल्ह्यातील सावंतखेड, ठाणें जिल्ह्यातील अंबरनाथ व पूर्व खानदेश जिल्ह्यातील जळगांव येथील वसाहतींची निवड करण्यांत आली. या केंद्रांत सोलापूर येथील केंद्र सर्वांत मोठें असून तेथील लोकसंख्या ७००० आहे. त्यानंतर जळगांव येथें ७४८, बार्शीला ६२१ व इतर ठिकाणीं प्रत्येकीं ५५२ लोक रहातात. सोलापुर केंद्रांतील जमातीमध्ये भामटा रजपुत व तकारी भांमटा, कैकाडी, पारधी व इतर लोकांचा समावेश होतो. कैकाडी ही जात त्यांच्यामध्यें सर्वांत जास्त लोकसंख्येची आहे. इतर केंद्रांमध्येंहि ह्या जाती आढळतात.

### जमातींसाठीं संस्कार शाळा

सरकारनें या केंद्रासाठीं संस्कार औद्योगिक शाळा आणि प्रशिक्षणांच्या शाळा यांची तरतूद केलेली आहे. पाहणीवरून असें दिसून येतें कीं या जमातींतील लोक या शैक्षणिक व प्रशिक्षण विषयक सवलतीचा भरपूर लाभ घेत असून त्यांच्यातील विशेषेंकरून तरुण पिढीतील निरक्षरता झपाट्यानें नाहींशी होत आहे. राज्यांतील अेकूण निरक्षरतेचे प्रमाण विचारांत घेतल्यास या जमातींतील निरक्षर लोक फार जास्त आहेत असें म्हणतां येणार नाहीं. सोलापूर व जळगांव येथेंहि त्यांच्यासाठीं शैक्षणिक सवलतींची तरतूद करण्यांत आलेली आहे. आर्थिकदृष्ट्या तसेंच शैक्षणिकदृष्ट्या गुन्हेगार जमातींतील लोक सर्वसाधारणपणें अतिशय मागासलेले आहेत ही गोष्ट लक्षांत घेतां सरकारनें त्यांना उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सोयींचा ते भरपूर फायदा घेत असल्याचें आढळून येईल.

### कामधंदा

या जमातींतील लोकांच्या यशस्वी पुनर्वसनातील अत्यंत महत्वाची बाब म्हटली म्हणजे त्यांना कामधंदा मिळवून देणें हें होय. सोलापूर केंद्राच्या बाबतींत सांगावयाचें म्हणजे तेथील कापड गिरण्यांतून सुमारें १११९ लोकांना काम देण्यांत आलेले आहे. यांत १८१ स्त्रिया व २० मुलांचा समावेश होतो. बार्शी येथें ६९ अिसमांना काम देण्यांत आलेले आहे. खेरीज जमीनींची लागवड, शेतीवरील मजुरीचीं कामे अित्यादि ठिकाणीं त्यांच्यासाठीं काम उपलब्ध करून देण्याचें प्रयत्न करण्यांत येत आहे आणि अशा प्रकारच्या व्यवसायांत सोलापूर येथे २०३ लोकांना व बार्शी येथे १८७ लोकांना काम देण्यांत आले आहे.

जळगांव केंद्रामध्यें मधुमक्षिका संवर्धन, शिकार करणें इत्यादि सारख्या प्राथमिक उद्योगांत ९२ लोक गुंतलेले आहेत तर सोलापूर व बार्शी येथें अनुक्रमें ४० व ३९ इसम हे काम करीत असल्याचें आढळून येते. जळगांव येथे १३२ लोक खाटीकखाना, कापडाची व किराण्याची दुकानें इत्यादिमधून काम करतात. तर सोलापूरांत ४० लोक या कामावर आहेत. वाळू पुरविण्याच्या कंत्राटासारख्या कामामध्यें

सुमारें १२१ लोक प्रत्येकीं सोलापूर व जळगांव येथें गुंतलेले आहेत. तसेंच सोलापूर येथें १४२ लोक सुतारकाम, शिवणकाम व दगड फोडणें इत्यादि कामें करतात. सोलापूर येथील त्याच केंद्रांमध्यें १६१ विद्यार्थी मिळकत करीत होते आणि ७७२ विद्यार्थी मिळकत न करतां शिक्षण घेत होते. यामध्यें सहा वर्षे वयावरील मुलांचाहि समावेश आहे.

## वेतनाचे प्रमाण

या जमातींतील लोकांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हटले म्हणजे कामापासून मिळणारे वेतन हें होय. सोलापूर येथें दर इसमाचे वार्षिक वेतन रु. ५०५, बार्शी येथें रुपये १०२, जळगांव येथें रु. ११५० इतर ठिकाणीं तें रु. ३४५ आहे. मुंबई जवळील अंबरनाथ केंद्र धरून इतर कांहीं केंद्रांमध्यें त्यांना देण्यांत येणाऱ्या वेतनाचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण असें कीं तेथील वेतन श्रेणीतला महागाई भत्ताहि अधिक आहे.

## घर खर्चाचे प्रमाण

सोलापूर येथें दरडोई घर खर्चाचे वार्षिक प्रमाण रु. ३३०, बार्शी येथें रु २०२ व इतर ठिकाणीं रु. २३९ असें आहे. सरासरीने ५ इसमांच्या एका कुटुंबामध्यें दोन माणसें कमावती आहेत. याखेरीज वेतन व पगार मिळविण्या व्यतिरिक्त सोलापूर येथील लोकांचे ५ टक्के उत्पन्न व बार्शी येथील लोकांचे ३ टक्के उत्पन्न शेतीतील उत्पादनाच्या सहाय्यानें मिळतें. तथापि इतर केंद्रांमध्यें झोपड्यांचे भाडें, घरांचे भाडें, इत्यादि साधनांचा उपयोग करून हें लोक आपला उदरनिर्वाह करतात.

## कर्ज परिस्थिती

अर्थशास्त्र वा आंकडेवारीच्या ब्यूरोने केलेल्या पहाणीवरून असें आढळून आलें आहे कीं ग्रामीण लोकांमध्यें कुटुंबाला कर्ज असणें ही प्रायः सगळीकडे आढळून येणारी बाब आहे. म्हणून पूर्वीच्या गुन्हेगार जमातींतील लोक कर्जाखाली वाकले असल्यास त्यांत नवल वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. सोलापूर येथें दर विमोचित जातीतील कुटुंबाला रु. २४४, बार्शी येथें रु. १३६, जळगांव येथें रु. ६ व इतर केंद्रामध्यें रु. १३२ याप्रमाणें कर्जें आहेत. सोलापूरमध्यें कर्जापैकीं सुमारें अर्धे कर्ज मित्र व नातलग यांच्याकडून काढलेले आहे. त्यानंतर सहकारी संस्था, सावकार, बँका, विमा कंपन्या, इतर साधनें व सरकार यांचा क्रम लागतो. व्यापारी व कमिशन एजंट यांच्याकडून हे लोक फारच थोडें कर्ज घेतात तथापि, मात्र एकूण कर्जापैकीं सुमारें अर्धे कर्ज या लोकांनीं कमिशन एजंटाकडून घेतलेले आहे. इतर केंद्रांमध्यें कर्जापैकीं तीन चतुर्थांश रक्कम मित्र व नातलग यांजकडून घेण्यांत आलेली आहे. बार्शी केंद्रामध्यें व्यापारी व कमिशन अेजंट याखेरीज सावकार, मित्र व नातलग यांजकडून हें लोक कर्ज घेतात.

## कर्ज घेण्याचा उद्देश

कर्ज घेण्याच्या उद्देशाबाबत तपासणी केल्यानंतर असें आढळून आलेले आहे कीं सोलापूरमध्यें सुमारें अर्धें कर्ज घरगुती कामावर म्हणजे केवळ प्रपंच भागविण्यासाठीं खर्च करण्यांत येते. नंतर महत्त्वाची बाब म्हणजे लग्न समारंभ व धार्मिक गोष्टी. नंतर आजारीपणा व कर्जाची परत फेड अित्यादि होय. कर्जापैकीं कांहीं रक्कम उद्योगधंद्यात गुंतविण्यांत येतें. आणि यांतून बहुधा कच्चा माल विकत घेण्यांत येतो. कर्जाचा बराचसा हिस्सा हें लोक शेतीतहि गुंतवितात याखेरीज उत्तरक्रिया व शिक्षण यासारख्या बाबींसाठीं हें लोक कर्ज काढतात.

कित्येक विमोचित जातींच्या लोकांचे मूळ कोठें आहे याचा इतिहास धुंडाळित गेल्यास असे दिसून येतें कीं भोवतालच्या सामाजिक परिस्थितीमुळें हें गुन्हेगार वर्ग उदयास आले. मालमत्तेची चोरी, घरफोडी, इत्यादि गोष्टी म्हणजे पैशाच्या तीव्र आवश्यकतेतून निर्माण झालेल्या बाबी होत. ही गोष्ट अगदी उघड होय. अशा रीतीनें या जमातींतील छप्परबंद नांवाचे जे लोक आहेत त्यांच्या नांवावरून, मोगलांच्या काळीं ते लोक लष्करासाठीं छावण्या बांधण्याचे काम करीत होते हें अगदी स्पष्ट आहे. मोंगल राजवटीच्या अस्ताबरोबर त्यांनीं घोडी भाड्यानें देण्यास आणि त्या बरोबर तीं चोरण्यास सुरवात केली. तथापि, ब्रिटीश हे लोक चटकन् स्थायिक झाले. म्हैसूर राज्यांत लमाण लोक फार आढळतात व ते गाढवांवरून ओझी वाहण्याचे काम करतात. मोंगल राजवटींत हेंच लोक मोंगल लष्कराला धान्य, मीठ व इतर वस्तू यांचा पुरवठा करीत असत. न्याय्य मार्गांनें व साधनांनी आपला उदरनिर्वाह होत नाहीं असें आढळून येताच त्यांनीं दरोडे, गुरें पळविणे इत्यादि मार्गांचा अवलंब केला.

## बदलती परिस्थिती


निरनिराळया विमोचित जातींतील लोक बदलत्या परिस्थितीशीं समरस झाले असल्याचे दिसून येईल. आपली पूर्वीची भटकी वृत्ती आतां त्यांनीं टाकून दिलेली असून ते आतां स्थायिक झालेले आहेत व कामधंदा करीत असतात. ह्या पाहणीवरून एक गोष्ट निःसंदेहपणें सिद्ध झालेली आहे कीं स्थायिक होण्यासाठीं ह्या लोकांची धडपड चालू असून सरकारने दिलेल्या सोयींचा व संधीचा उपयोग करून ते आपली सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करीत आहत.

ह्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास केल्यानंतर अक गोष्ट स्पष्ट झालली आहे कीं कोणीहि माणूस जन्मतः गुन्हेगार नसतो अथवा गुन्ह्याची प्रवृत्ती त्याच्यात नसते तर परिस्थितीमुळें व्यक्तीचें अथवा जमातीचें स्वरूप बनत असते. 'गुन्हेगार जमाती' हा या लोकांवरील कलंक पुसून टाकल्यामुळे या लोकांना उजळ माथ्याने जीवन जगता येऊं लागले आहे. सरकारनें व समाजानें दिलेल्या प्रोत्साहनामुळें व साहाय्यानें या जमातींनी स्वतःच आपलें पुनर्वसन करून घेतलें आहे.

(भारताच्या प्रसिद्धी खात्यातर्फे)

★★★

" दृष्टी विना सृष्टी फुकट "
म्हणून नसलेली दृष्टी मिळविण्यासाठीं



सुंदर आणि कंपनी
★ चष्म्यांचे व्यापारी ★
: डोळे डॉक्टरकडून तपासले जातात. :

हेड ऑफिसः- २१२, गिरगांव रोड, केळेवाडी, मुंबई ४.


ब्रँचः- १६१, बुधवार पेठ, पुणें २.


# फार्गो

## डीझेल्स

## राष्ट्राच्या सेवेसाठीं

फार्गो डिझेल ट्रक निरनिराळ्या विकास योजनांच्या ठिकाणीं त्यांना नेमून दिलेल्या कामापेक्षां कितीतरी अधिक कामगिरी बजावीत आहेत, याचें कारण त्यांची मजबूत रचना आणि बनावट तसेंच दर फेरीमागें अधिक वजन वाहून नेण्याच्या शक्तीमुळें येणारा कमी खर्च हें होय. कितीही वजनी माल असो किंवा रस्ता खूप अवघड असल्यामुळें तो माल वाहून नेण्याचें काम कितीही कठिण असो, हे ट्रक सेवा, कामगिरी आणि काटकसर या बाबतींत पहिल्या दर्जाचे सिद्ध झाले आहेत


...राष्ट्रीय विकास योजनांच्या स्थळीं कामासाठीं


...शहरें आणि खेडीं यांची सेवा बजावीत असतां



...प्रवासी वाहतुकीचें कार्य करीत असतां

**फार्गो** डीझल ट्रक

आतां नवीन, अधिक शक्तिशाली आणि खर्च कमी येणाऱ्या एंजिनासह मिळतात

प्रगतिशील कारखानदार

**दी प्रीमीअर ऑटोमोबाइल्स लिमिटेड**
मुंबई



SISTA'S-PAL-306-MAR.

# Contact Your Nearest Dealers

" आर्य स्त्री पतीवर प्रेम करीत नाहीं, भक्ति करते.
ती त्यास देव मानते. पतिच्या प्रेमाचा एक क्षणाहि
तिला जन्मभर आनंदी ठेवूं शकतो "

'नीलकमल कलाकार' तर्फे

एक सामाजिक व विनोदी नाटक

संगीत

# क्षण एक पुरें प्रेमाचा

लेखक

श्रीपति राव

दिग्दर्शकः—जवाहरलाल शहा

संगीत दिग्दर्शक वसंतकुमार मोहिते
('भाऊबीज' फेम)

लवकरच रंगभूमीवर येत आहे

अधिक माहितीसाठीं—

नीलकमल कलाकार
१७४/४ गुजराथ सोसायटी, १ ला मजला
'समरत-भुवन'
शीव, मुंबई २२

# टरफल आणि गाभा

ना. ह. आपटे



प्रवासास निघालेल्या आपल्या आई वडिलांना उद्देशून रघुनाथराव म्हणाला, "तात्या–ताई, तुमची सर्व तयारी आतां नीट लागली आहेच. गाडी नवाला आहे. टांगा सांगून ठेवलाय्. तो वेळेवर येईल. तुम्हाला उगीच घाई करण्याचं कारण नाहीं. कांही महत्वाच्या कामाकरितां मला थोडा वेळ बाहेर जाऊन यायचं आहे. मी वेळेवर येतोच परत. (स्वतःच्या पत्नीकडे पाहात) नच आलों तर माझी वाट पाहूं नका." एवढें बोलून त्याने तात्या ताईंना नम्रतापूर्वक नमस्कार केला आणि नंतर सायकल बाहेर काढली

तात्यांनी ओटीवरील मोठें घड्याळ पाहात म्हटलें, "हें पहा, आठ आलेच वाजायला. आम्हां म्हाताऱ्या माणसांना स्टेशनवर आधी जाऊन बसणं बरं वाटतं –खरं म्हणजे टांगा अत्ता यायला हवा होता."

ताईंनी हंसत यजमानाकडे पाहिलें नी म्हटलें, "येईल हो–दहापंधरा मिनिटांत टांगा स्टेशन गांठतो. गाडी नाहीं चुकत आपली."

बायकोची दटावणी तात्यांनीं हंसत मान्य केली. पण त्यांची निघण्याची चुळबूळ चालू राहिली. तेव्हां त्यांच्या सेवेंत तत्पर असलेली जानकी त्यांना म्हणाली, "तात्या, तुम्ही स्वस्थ असा. मी आपल्या घरच्या भिमाबाईंना पाठवून टांगा लवकर बोलावून घेते."

नंतर ती सायकल बाहेर काढीत असलेल्या आपल्या पतीला म्हणाली, "तुम्ही जा आपल्या कामाला. मी मागचं सारं पाहाते. येतां आलं तर परत या लौकर. घाईचं कारण नाहीं."

रघुनाथरावाने पसंती दर्शवीत पुन्हां आई-वडिलांना "येतो, जपून जा." असा निरोप दिला तो निघून गेला.

यानतर दहा मिनिटांत टांगा येऊन सडके-वर उभा असल्याची वर्दी भिमाबाईनें येऊन दिली तात्यांना हायसें वाटलें.

"भिमाबाई," जानकी तिला म्हणाली, "तुम्ही घरांतलं बघतां जरा.—मी सासुबाई मामंजींना टांग्यांत बसवून देते नी येतेच—"

भिमाबाई अगदीं घरच्या माणसासारखी. तिनें धनिणीचें म्हणणें मान्य केलें. नंतर ताल्या ताईंना आदराने नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला व ती घरांत कामाला निघून गेली.

टांग्यांत सामान पोचविलें गेलें.

जानकीने मोठ्या आदराने व नम्रतेने सासू-सासऱ्यास नमस्कार केला. त्यावेळीं तात्यांनी तिला आशीर्वाद देत प्रेमळपणाने तिच्याकडे पाहिलें नी म्हटलें, "सुनबाई, तुझा संसार पाहून मनाला मोठा संतोष वाटला बरं. मोठा संतोष वाटला. आमचं आदरातिथ्यहि छान केलंस हो.–" अनुमतीकरितां त्यांनी पत्नीकडे पाहिलें.

ताईंनी जानकीच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें, "मोठी गुणाची आहे आपली जानकी!—रघू भाग्यवान्!—उशीरा लग्न. उशीरा संसाराला प्रारंभ. पण बायको फक्कड मिळवलीन्. देवाची कृपा

मोठ्या कौतुकाने त्यांनी सुनेकडे पाहिलें. त्या दोघांची ती वत्सलता जानकीच्या हृदयाला चाटून गेली. ती गहिवरत पुटपुटली, ' तुम्ही

सांभाळून घेतलंत. एवढाच त्याचा अर्थ."

तात्या पाऊल उचलीत म्हणाले, "बराय्, आम्ही येतो आतां. दोघं सांभाळून असा. आमचा तुम्हाला भरपूर आशीर्वाद आहे अं—(पत्नीस) हं चला."

ताई जानकीकडे सस्मित पाहात पतीला म्हणाल्या "तुम्ही व्हा पुढं. मी सुनबाईशीं थोडं हितगूज करून येतेच मागोमाग."

तात्यांनी मान डोलावली. ते चालूं लागले. बाग ओलांडून ते फाटकाबाहेर गेले. नंतर किंचित थांबून म्हणाले,

"हितगूज थोडक्यांत आटपा अं. गाडी गांठायचीय आपल्याला."

हंसतच ते पुढें झाले व टांग्यांत जाऊन बसले.

सासू सुनेने आपसांत पाहून मंद स्मित केलें. जानकी बागेंतील फुलझाडाकडे पाहात सासूला म्हणाली, "ते, गुलाबाचं फूल आणून तुमच्या डोक्यांत खोवूं? —थांबा आणतेच." चटकन ती बागेंत गेली. फुलं काढीत असतां एक नवलाचा विचार तिच्या डोक्यांत तरळून गेला, 'ताईंचं हितगूज कसलं असेल?"

दोन तीन गुलाबांचीं फुलें काढून ती सासूजवळ आली. "मला म्हातारीला कशाला पाहिजे ग हा सोस.—थांब मीच तुझ्या खोप्यांत तीं फुलं बसवितें—" असे ताई म्हणाल्या.

मग त्यांच्यात तडजोड झाली. दोघींनी एकमेकींच्या केसात फुलें सुबकपणें बसविलीं. दोघींनाहि आनंद वाटला. दोघीहि हातांत हात घालून चालूं लागल्या.

ताई तिला जवळ घेत म्हणाल्या, "जानकी, तूं इतकी चांगली व सालस मुलगी असशील असं वाटलं नव्हतं. खरंच. या आठ दिवसांत तूं आम्हाला चांगला लळा लावलास. देव तुला उदंड आयुष्य व सौभाग्य देऊं दे."

सासूच्या वियोगाची जाणीव जानकीला व्यथित करीत असतां त्यांत ताईंच्या बोलाची भर पडली. तिचा कंठ दाटून आला. त्या आवेगाला दाबून धरीत ती म्हणाली, "इतक्या लैकर तुम्ही परत निघाला; याचंच मला फार वाईट वाटतंय्. खरं म्हणजे तुम्ही नी मामंजींनी आमच्या इथंच कायमचं राहायला आलं पाहिजे.—तें राहिलं बाजूला. नी आठ दहा दिवस झाले नाहींत तो परत निघाला.—तुमची दोघांची आणखी सेवा घडावी असं मला किती मनापासून वाटतं, काय सांगूं?"

बोलतां बोलतां तिला मनस्वी गहिंवरून आले. तिला पुढें बोलवेना. डोळ्यांत ओथंबलेले अश्रू तिच्या गालावर ओघळले!

तिचा हा प्रेमा पाहून ताईहि गहिंवरल्या. त्यांनीं तिला डाव्या हातानें घट्ट जवळ घेत आपल्या पदरानें तिची आसवें पुसलीं. रुद्ध कंठांत म्हटलें, "खुळी! खुळी!! —मनाला कांहीं लावून घेऊं नकोस. आम्हीं परकीं थोडीच आहों? जिवाभावानं तुझी आहों बरं. पूस ते डोळे—"

## कडा ढगाची—

हरवुनि गेला सगळा सागर
निळया जांभळया पुसल्या रेषा
अस्तित्वास्तव उरली केवळ
तमांत गुदमरलेली भाषा
रंग घेउनि गेली संध्या
अस्तदिशेवर उलगडलेले
रंग तरूंचे रंग घरांचे
रंग किनाऱ्यावर पडलेले
चराचरांचीं विरलीं रूपें
देहावाचुनि छाया भ्रमती
ससे दिव्यांचे बावरलेले
कुशींत काळोखाच्या शिरती
अभावास या उरलें आहे
एकच आकाशीं आश्वासन
कडा ढगाची चांदवणारी
चंद्रकराचें अस्फुट दर्शन

—कुसुमाग्रज.

दोघीहि फाटकाबाहेर आल्या. नंतर ताई थांबल्या. दोन तीन क्षण त्यांनीं तिच्या मुखाकडे पाहिलें. नंतर त्या शांत स्वरांत म्हणाल्या, "जाण्याआधीं तुला एक महत्वाची गोष्ट सांगावीच असं मनानं घेतलं, म्हणून सांगते. रागावणार नाहींस ना? नको रागाऊं."

जानकीने नवल करीत व किंचित् अस्वस्थ होत त्यांच्या मुखाकडे पाहिलें. नंतर नम्रतेनें म्हटलें, "तुम्ही जें कांहीं सांगाल तें माझ्या हिताचंच असेल. माझ्या चुका तुम्ही समजून नाहीं सांगणार तर दुसरं कोण सांगील?"

ताईंना तिची नम्रता रुचली. तिच्या पाठीवर हात ठेवीत त्या म्हणाल्या, "खरंच तूं मोठी सुजाण मुलगी आहेस जानकी, रघूचा नी तुझा जोडा, तुम्हां दोघांत वयाचं अंतर असलं तरी चांगला शोभतो. आणि तुमचा संसारहि चांगला चाललेला दिसतो. पण यांत एक उणेपणा फार मोठा आहे. तुमच्या दोघांच्या लग्नाला तीन वर्सं होत आलीं. एखादं बाळहि तुमच्या घरांत दिसूं नये, बरं का हें? — पुन्हां सांगतें. रागावूं नकोस. पण या उणेपणाचा विचार केलाच पाहिजेस. आजकालच्या तुम्ही मुली. मुलांबाळांविषयीं तुम्हीं कांहीं ठराविक विचार केलेले असतात असं ऐकते. —मला त्याविषयीं उणंदुरं कांहीं बोलायचं नाहीं. पण जानकी, खरंच सांगते. तुझ्या मांडीवर तुझ्या सत्तेचं बाळ खेळायला हवं!"

जानकीला राग मुळीच आला नाहीं. पण लज्जेने ती गोरीमोरी झाली व खाली मान घालून चालत राहिली.

ताईंनी आपला प्रेमळ हात तिच्या पाठीवर तसाच फिरवीत पुढें म्हटलें, "तुला हिणवत नाहीं हो. पण मुळांत तुझ्या लग्नालाच किती उशीर झाला! त्यांत या तीन वर्सांची भर पडली! म्हणजे आलीस तिशीला! —विचार कर पोरी, नीट विचार कर नी आई होण्याचा ध्यास घे! — पाळणा दूर ठेवण्याचं वेड घेतलं असशील तर तें आधीं सोडून दे. संसारांत खरी रममाण हो. आई होण्यास आणखी विलंब करूं नकोस. —समजलं?"

सासूबाई असें कांहीं बोलणें काढतील याची अटकळ जानकीला सुतराम नव्हती. यामुळे ताईंचा तो फटकारा फुलमाळेच्यासारखा नाजूक असला तरी तिला तो जाणवला. आधीच ती गहिंवरलेली बावरलेली होती. त्यांत या नव्या विकल्पाची भर पडली! आपण कांहीं बोलावें कीं मुग्ध राहावें याचा तिला उलगडा पडेना.

ताईंना तिच्या या मुग्धतेचा अर्थ कळला नाहीं. तिला राग आला नसावा एवढें त्यांना स्पर्शानें जाणवले.

"हं आटपा—" तात्यांची हांक आली.

ताईंनी पाऊल उचललें. जानकीहि त्यांना बिलगूनच चालली. टांग्याजवळ गेल्यावर

जानकीला एकदम भान आलें. ताईंचे हात धरीत ती अस्पष्ट स्वरांत म्हणाली, " ताई, तुमचा आशीर्वाद असू दे माझ्या पाठीशीं— जास्त काय सांगू ? " पुन्हा तिला गहिवरून आलें !

दोघी टांग्याजवळ पोचल्या. जानकीच्या डोळ्यांतून अश्रू गळत असतांहि तिकडे लक्ष न देतां मोठ्या आदरानें तिनें सासूला आधार देत टांग्यांत चढविलें. ताई नीट बसल्या. टांगा चालू झाला. वळणावर तो दिसेनासा होईपर्यंत सासू सून एकमेकींना पालवीत राहिल्या.

कांहीं क्षण जानकी त्या दिशेला पाहात राहिली. नंतर पदराने नाक डोळे पुशीत ती घराकडे वळली. खाली पाहात अत्यंत जड पावलांनी ती घरांत आली.

घरांत येईपर्यंत तिच्या शरीरांत बरेंच त्राण होतें आणि मनहि ताळ्यावर होतें. पण फार चाललेले माणूस जसें विश्रांतिस्थान येतांच आपण धरणीवर केव्हां अंग टाकू या विचाराने अगदी घाईला येतें, त्याप्रमाणें तिची अवस्था झाली. तिचें अवसान एकदम ओसरलें आणि विचारशक्ति आरगळली !

एक मिनिटच ती बावरून इकडे तिकडे पाहात राहिली. नंतर तिने आर्त स्वरांत भीमाबाईला हांक मारिली.

" आलें—" अशी साद आली. मागाहून भिमाबाई आली.

जानकीच्या मुद्रेकडे पाहतांच ती सचिंत स्वरांत म्हणाली, " काहो बाई, तबीत बरी नाहीं ? —"

जानकीने सुस्कारा टाकीत म्हटलें, " माडीवर जाऊन पडते मी थोडावेळ —तोंपर्यंत तुम्ही बघा घरांतलं. मालक गेले आहेत बाहेर कामाला. येतांना ते मंडई करूनच येतील. तेव्हां तुम्हाला तें काम पहावं लागणार नाहीं.—ते येईपर्यंत मी येतेंच खाली "

एवढें तांत्रिक बोलून ती गतीने माडीवर निघून गेली. माडी जुन्या धाटणीची. मांडणी त्याला अनुसरून. गादी तक्क्यांची ऐसपैस बैठक. उजेडाची व्यवस्था चांगली. पुढे पत्र्याची गच्ची. फुलझाडांच्या चार पांच कुंड्या असलेली.

विमनस्कपणें जानकीने इकडे तिकडे पाहिलें. बैठकीवर अंधार येईल अशा बेताने तिने दोन खिडक्या लावून घेतल्या. आणि नंतर गळलेल्या रुग्णाप्रमाणें एक तक्क्या उशाला व दुसरा पोटाशीं धरून ती पडून राहिली.

काष्टवत् होऊन पडणें माणसाच्या हातांत असतें. पण सारखी धांवाधांव करणाऱ्या मनाला काय करायचें ?—जानकीला तो अनुभव आला. अगदी जाण्याचे वेळीं सासूने तिच्याशीं जें हितगूज केलें होतें तें सारें तिला आठवलें !

" आधी लग्नालाच उशीर झाला !—आतां तिशीला आलीस. तुझ्या मांडीवर बाळ हवं !—पाळणा लांबवू नकोस ! - आई होण्याचा ध्यास घे—" इत्यादि वाक्यें तिला आठवलीं !—छेः ! आठवलीं कसलीं ?—अंगावर सपासप छड्या बसाव्या, त्याप्रमाणें तिला झालें ! त्या अनुषंगाने गेल्या दहाबारा वर्षांचा काल तिच्या अंतःचक्षूपुढे आला. आडवा तिडवा फिरूं लागला. आणि मग त्यांतून बाहेर पडल्या भिन्न आकृतीच्या व प्रकृतीच्या आठवणी !

" मला काय हवं होतं ?—काय काय घडलं ?—काय हातांत आलं ?—माझं तिरपागडं जीवन आज सफल आहे की निष्फल ?—मी दुःखी आहे कीं सुखी ?—आत्ता मी काय करायला हवं ?—वयाची तिशी !—मी खरंच खलास झालेय का ?"

प्रश्नांची लांबलचक ओळ ! अन् शेवटीं खुंट होता.

" पुढं काय ? "

ती तटकन् उठून बसली ! व्याकुलता, भय, निराशा ! तिनें भोवताली पाहिलें. तीच ती माडी ! गृहिणी व पत्नी नात्याने ती त्या स्थानाची स्वामिनी होती ! तीन वर्षें तिथे वावरत होती !

" पण एवढ्या पसाऱ्यांत तूं आई नाहीस. तुझ्या मांडीवर बाळ नाहीं. हें फार मोठें वैगुण्य ! " कोणी तरी उद्गारलें !

दोन्ही हातांनी तिने कपाळ दाबून धरलें आणि डोळे मिटून घेतले ! स्वतःच्या हृदयाचे ठोके तिला ऐकू येत होते. तिचा जीव घुसमटत होता ! तिला शंका डसली; " प्राण गुदमरून आपण मरणार तर नाहीं ? "

आणि तितक्यांत तिच्या कानीं प्रश्न आला—" काय ग, प्रकृति बरी नाही ? "

जानकी विलक्षण दचकली. तिनें भांबावत डोळे उघडून स्वर आलेल्या दिशेकडे पाहिले. रघुनाथराव तिच्याकडे पाहात आपले कपडे उतरून खुंटीवर ठेवीत होता.

जानकी भानावर आली. त्याच्या हालचालींकडे पाहूं लागली. रघुनाथरावाने काचा सोडला व धोतराचा सोगा खांद्यावर टाकीत तो तिच्या समोर आला.

जानकीनें किंचित उत्तेजित होत म्हटलें, " मला तुमच्याशीं कांही तरी बोलायचंय-खूप बोलायचंय. कदाचित तें थोडं वेडवाकडंहि असेल, बोलूं स्पष्ट ? "

रघुनाथरावानें मंद हास्य करीत तिच्यासमोर बैठक मारली. त्या कृतींत आपलेपणा होता पण सलगी नव्हती. केवळ नजरेनेच त्यानें तिला बोलण्यास सुचविलें.

" बोला— " जानकीनें वरच्या श्वासांत प्रश्न केला, " पत्नी नात्यानं माझ्याविषयीं तुम्हाला काय वाटतं ? "

रघुनाथरावाने मंद हास्य चालू ठेवीत चार पांच क्षण एकटक तिच्याकडे पाहिलें नी म्हटलें, " सांगण्यासारखं विशेष कांही नाहीं. "

" म्हणजे ? - तुमच्या जीवनांत मी कोणी नव्हे तर ? "

" दुधांत विरघळून गेलेल्या साखरेला स्वतंत्र अस्तित्व असतं का कधीं ?—"

" मी जडबुद्धि आहे —" जानकी रुष्टता दर्शवीत म्हणाली, " तुमचं काव्यालंकारयुक्त असं उत्तर मला नकोय. सरळ व स्पष्ट सांगा. माझ्याविषयीं तुमचा खरा अभिप्राय काय आहे ?

**तक्रार**

**माझ्या नवऱ्याला**
**माझ्या वाढदिवसाची तिथि**
**माहीत नाहीं**
**पण**
**माझें ( वाढतें ) वय मात्र**
**नेहमीं माहीत असतें**
**( हाय ! )**

रघुनाथरावाचें मंद हास्य किंचित मावळलें. पण कसलीहि अप्रियता मुद्रेवर दिसूं न देतां तो शांतपणें म्हणाला, "जानकी, विचार करितां मला वाटतं, तुझ्या मनांत वरील प्रश्न सतत घोटाळत असावा. अन् कोणत्याहि प्रसंगांत वा प्रकारांत तुझ्या या घोटाळ्याला धक्का लागला कीं, तुझं मन विचलीत होत असावं. आज तात्या ताईचं परत जाणं ही विशेष गोष्ट घडलेली आहे. अन् मला वाटतं त्यामुळें तूं गोंधळून जाऊन तुझा ठराविक प्रश्न विचारते आहेस."

"अगदीं बरोबर—" जानकी लागलीच म्हणाली, "पण माझी समजूत पटेल असं उत्तर देण्याची तुम्ही सदा टाळाटाळ केलीत त्याची वाट काय ?"

"उत्तर सोपं आहे.—" रघुनाथराव म्हणाला "तुझा प्रश्न पोरकट आहे असं मला वाटलं.—किंवा केव्हां तरी तुझा तुला उलगडा पडेल असं मी मानलं—किंवा समज कीं, मी त्याचं उत्तर देण्यास असमर्थ होतों, आजहि आहे."

जानकीला पुढें काय बोलावें, हा विचार पडला असावा. तेव्हां रघुनाथराव म्हणाला, 'पण मला असं वाटतं-तुझ्या मनाची ही रुखरुख आपण आज जरा मनमोकळेपणानं वाटाघाट करून काढून टाकण्याचा प्रयत्न करूं या.—म्हणून मीच तुला विचारतों.-तुझ्या या प्रश्नाचा हेतु काय आहे ?"

जानकी बुचकळ्यांत पडली. ती म्हणाली, "मला नीट नाहीं सांगतां येणार-पण केव्हां केव्हां वाटतं, आपण पतिपत्नी असूनहि आपल्या दोघांत कुठंतरी एक पडदा आहे! आपलीं मन तितकीं एकरूप नाहींत–"

रघुनाथरावानें एकदम म्हटलें, "असं ?–मग मी दुजाभावानं वागत असल्याचं उदाहरण एखादं सांगतेस ?"

"म्हणजे-तुमच्या मतानं आपण एकरूप आहों, असं तुम्ही धरून चालतां असं समजूं का मी ?"

"निःसंशय !–" रघुनाथराव म्हणाला, "विवाह होतांच मी स्वतःला सांगून टाकलंय जानकी माझी अर्धांगी आहे. म्हणजे माझ्यांत ती पूर्ण मिसळून गेलीय. तिच्या संबंधाचा स्वतंत्र विचार करण्याचं कारण नाही."

"पण तितक्या प्रमाणांत मी तुमच्या एकरूप झालेय हें तुम्ही कसं गृहित धरतां ! मी तुमच्याशीं कांहीं प्रतारणा करीत असे अशी शंका तुम्हांला कधींच आली नाहीं का दुजाभाव मी राखीत असेन, असं तुम्ही समजत नाहीं ?" जानकीने सरळ त्याच्या पाहात धीटपणें विचारलें.

"तितक्या खोलांत जाण्याची मला इच्छा नाहीं म्हणून-" रघुनाथराव शांतपणें म्हणाला "अंधेरांत विना दिवा जाण्याचा प्रसंग आ तर भुतांची शंका घेत चालणं हिताचं होत नाहीं. होत नाहीं. भुताखेतांची शंका आ कीं, तीं आजूबाजूला दिसूं लागतातच ! त्या पेक्षां—"

"भय न वाटणं किंवा शंका न येणं माणसाला कसं शक्य आहे ?—"

रघुनाथरावाने मध्येंच म्हटलें, "हो, आठवण झाली. आपण विषयांतर न करि मुद्याचं बोलूं. तुझ्याकडे पत्नी नात्याने पाहतां मला तुझ्याविषयीं काय वाटतं; हें तुला जाण घ्यायचं आहे नाहीं का ?–परवा माझ्या वा नांत स्वामी रामतीर्थ यांच्याविषयीं आख्यायिका आढळली, ती तुला सांगतों. के तरी ती सांगितली असती. आतां प्र उद्भवला व मला ती आठवली म्हणून सांगतों"

जानकीने पदर सावरीत उत्सुकता दर्शविल तव्हां रघुनाथरावाने अर्धवट डोळे मि आठवण करीत म्हटलें, "सुमारे पन्नास व पूर्वीं पंजाबमध्यें स्वामी रामतीर्थ नांवांचे यो सत्पुरुष होऊन गेले. त्यांची हकीगत आ स्वामीजी पूर्वाश्रमांत सपत्नीक व गृहस्थाश्र होते. एकदा ते देवपूजा करीत बसले अस त्यांची पत्नी त्यांना पूजासाहित्य करू देत होती. त्यावेळीं तिने स्वामिजीं विनोदाने एक प्रश्न विचारिला. त्याचा रो असा होता कीं, तुमच्या या पारमार्थिक जीव क्रमांत माझं स्मरण तुम्हाला असतं का ? म्हण माझ्यावर तुमचं प्रेम आहे का ?'

"अय्या !' जानकी स्वस्थिति विसरू कौतुकानें म्हणाली, "स्वामिजींच्या पत्नीनं त्यां हें मोठंच कोडं घातलं म्हणायचं, नाहीं का बायकोवर प्रेम आहे म्हणावं तर लंपटता दिसयची. नाहीं म्हणावं तर मग विवाह करून संसारांत कां पडला ! असा टोमणा मिळायचा !"

रघुनाथराव हसला व म्हणाला, "खरं आहे तें. पण यावर स्वामिजींनी सहज पटण्यासारखं उत्तर चटकन् दिलं. ते म्हणाले, "जीवन जगतांना माणसाला आपल्याला लाभलेल्या देहाचं व दशें-द्रियांचं फारसं स्मरण नसतंच. पण एवढसं टोचलं खुपलं तर त्या भागाकडं वा संबंध शरीराकडं त्याचं लक्ष तात्काळ जातं ! तसं पति-पत्नींच्या संबंधांत आहे. विवाह होतांच तीं देहानं व मनानं एकजीव होतात. अशा स्थितींत त्या दोघांना परस्परांचं स्मरण असलं काय नसलं काय, सारखंच !" एवढें बोलून तो क्षणभर थांबला व पुढें म्हणाला, "जानकी, मी तुझ्याकडे या दृष्टीनं पाहतों. आपण विवाहबद्ध होऊन तीन वर्षं होत आली. यांत तुला काय अनुभव आला असेल तो पहा— "

त्याचें हें सरळ व निर्व्याज बोलणें ऐकतांच जानकीच्या आर्त हृदयाला चरका बसला! ती एकदम हताश व व्याकुल झाली! कांहीं क्षण पतीच्या मुखाकडे पाहात राहिली. नंतर कळवळून म्हणाली, "क्षमा करा मला. — पण मी तुमच्याशीं तितकी एकरूप आहे, असं मला मनमोकळेपणानं कांहीं सांगतां येत नाहीं. भारी भारी दुःख होतं मला या गोष्टीचं." तिचा कंठ दाटून आला. तिने गुडघ्यांत मान घालून त्या आवेगाला वाट दिली.

तिच्या या अवस्थेची रघुनाथरावाला करुणा आली. पण ती भडकपणें न दर्शवितां तो सहानुभूतीच्या सुरांत म्हणाला, "जानकी, विवाहपूर्व कालांतील कांहीं कटु आठवणी मनांत आणून तूं खंत पावतेस असं मला वाटतं. छे ! काढून टाक ते खेदकारक विचार अन् धीटपणें माझ्याकडे पहा. — वर पहा, जानकी, वर पहा."

जानकीने आपले अश्रु पुसत त्याच्याकडे पाहिलें. तव्हां तिला धीर देण्याचा भाव दर्शवीत रघुनाथराव म्हणाला, "पत्नी नात्यानं तूं माझ्याशीं एकरूप झालेली नाहींस असं तुझं म्हणणं. तुझ्या समजुतीकरितां तें मी मानून घेतों. पण तेवढ्यानं माझ्या गृहस्थाश्रमांत कांहीहि व्यत्यय आला नाहीं व येत नाहीं हें मी आनंदानं सांगतों."

“ कसं शक्य आहे हें ? ” तिनें दीनवाणीं विचारलें.

रघुनाथरावानें एकदम म्हटलें, “ माझ्या घरीं आल्यानंतर तूं गृहिणीधर्माचं पालन मोठ्या दक्षतेनं व मला आनंदप्रद असंच केलंस. माझ्या दृष्टीनं ही गोष्ट फार महत्वाची आहे.

जानकी खिन्न स्वरांत म्हणाली, “ हें बाहेरचं टरफल आहे हो, गाभा नव्हे ! स्पष्ट काय व कसं सांगूं तुम्हांला ?–माझ्या माहेरीं माझं नांव मोठं बद्द झालयं. माझे वडील माझा भारी तिटकारा करतात. मी संसार करण्यास नालायक आहे, असंच सारीं मानतात. तेव्हां त्या सर्वांचा नक्षा जिरविण्याकरितां मी उत्कृष्ट गृहिणीचा अभिनय करतें आहे ! तें वरचं टरफल आहे, सोंग आहे! आंत खरं कांहीं नाहीं, कांहीं नाहीं ! —काय सांगूं तुम्हांला !

“ उद्वेगू नकोस, जानकी, उद्वेगू नकोस. ” रघुनाथराव प्रेमार्द्र दृष्टीनें तिच्याकडे पाहात शांतपणें म्हणाला, “ तुझं खरं दुःख, खरा संताप याचं मूळ आतां माझ्या लक्षांत आलं. – पण यावर माझं तुला आग्रहाचं सांगणं आहे कीं त्या मागच्या आठवणी विसरुन जा. एकदम विसरून जा ! मनाशीं त्या उगाळीत बसून दुःखी-कष्टी होऊं नकोस ! त्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं नी आवश्यकताहि नाहीं. ”

“ तुमच्यासारख्या सरळ व प्रेमळ माणसाला संशयांत ठेऊन नी खरं कांहीं न सांगतां सोंग करीत राहूं म्हणतां ? –कसं शक्य आहे तें ? –वरच्या टरफलाला मी इतकं महत्व देऊं शकत नाहीं. माझा तो मनोधर्म नाहीं. ”

रघुनाथराव तिच्याकडे सरकला. तिचे लुले पडलेले हात सावरीत म्हणाला, “ पुन्हा सांगतो जानकी, साप साप म्हणून भुई धोपटूं नकोस. खुलेपणानं स्वतःकडे भलता कमीपणा घेऊं नकोस. तूं अंतर्बाह्य चांगली आहेस; हा माझा विश्वास आणखी वाढला आहे. गृहिणीधर्म पालनाचं सोंग करणं हें एखादे दिवस साधेल ! सतत तीन वर्षे नव्हे. अन् ज्याला तूं टरफल म्हणतेस तें इतकं सकस आहे कीं, त्याच्या आंतील भागा पूर्ण निकोप आहे, त्यांत शंका नाहीं. माझ्या शब्दाशब्दावर विश्वास ठेव. अन् संसारांत रमून जा. ”

एवढें बोलून त्यानें तिचें हात चुरले. त्यांतून निर्माण झालेला विद्युत्प्रवाह जानकीच्या सबंध शरीरभर पसरला. त्या भरांत तिनें त्याच्या बाहूचा आश्रय घेतला नी त्याच्या दृष्टींत दृष्टी घालीत म्हटलें, “ तुम्ही जो विश्वास दाखवितां आहां ना, त्यानं मला खरंच मोठा धीर वाटतो ! —तेव्हां वाटतं मनांत खळखळणारं शल्य तुम्हांला मनमोकळेपणानं सांगून टाकावं.

रघुनाथराव हसला व म्हणाला, “ कशाला श्रम घेतेस ? —मला तें सारं माहीत आहे– ”

जानकी विलक्षण चपापली ! चटकन् त्याच्यापासून दूर सरकत तिनें म्हटलें, “ तुम्हांला सारं माहीत आहे, याचा काय अर्थ ? –कुणी सांगितलं तुम्हांला ? –माझ्या वडिलांनी ? ”

रघुनाथराव तिच्या पाठीवर थाप देत म्हणाला, “ जानकी, तूं अगदी खुळी व सरळ मुलगी आहेस ! — सुहास कुलकर्ण्यांनंच आत्मप्रौढी मिरविण्याकरितां, माझ्याजवळ हितगूज केलं नी तुझीं प्रेमपत्रं मला निर्लज्जपणानं दाखविलीं ! ”

“ चांडाळ ! — ”

रघुनाथरावानें पुढें म्हटलें, “ पुढं कर्मधर्म संयोगानं तुझ्या वडिलांची व माझी गांठ पडली. त्या भेटींत कळलं कीं, त्या पत्रांचा बाऊ करून सुहास त्यांच्याकडून पैसे उपटीत आहे. आणि तुझ्याशीं विवाह करण्याची टाळाटाळ करतो आहे — ”

जानकीला डोक्यांत धोंडा पडल्याप्रमाणें झालें ! लज्जेनें ती चूर झाली ! शेजारच्या तक्क्यावर घालून घेत ती चित्कारली, “ देवा ! देवा !.! –– काय माझ्यावर प्रसंग आणलास हा ! — यांना मी कसं तोंड दाखवूं ? — कसं दाखवूं ? ” पुढें तिला जोराचा हुंदका आला. ती ढसढसूं लागली.

रघुनाथरावानें तात्काळ तिच्याजवळ सरकून तिला सावरलें. चुचकारत व प्रेमाचे उद्गार काढीत तिला बसतें केलें. नंतर तिची हनुवटी धरून तिचें मुख उचलीत म्हटलें, “ जानकी, आतां हा पोरकटपणा बंद कर पाहूं. — तुझ्या प्रेमप्रकरणाला मी पूर्ण गाडून टाकलं आहे. सुहास तुझ्या वाटेला या पुढं खास जाणार नाहीं. तुझ्या बालीश वागण्यानं तुझ्या वडिलांना बराचसा त्रास झाला ही गोष्ट खरी. आणि तुझ्यावर त्यांचा राग आहे, ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं. पण ही गोष्ट सतत टिकणारी थोडीच आहे. काल जुन्या गोष्टी पुसून टाकतो ! माणसानं हातांत असलेल्या गोष्टीचा विचार करावा — ”

“ वाया गेलेल्या तारुण्याचं मला भारी वाईट वाटतं— ” जानकी म्हणाली, “ सात आठ वर्षांपूर्वी तुमची माझी गांठ का पडली नाहीं ? ”

“ तुझ्याप्रमाणं माझ्याहि पंतगाचा दोर तुटला होता— ” रघुनाथराव म्हणाला, “ मी कुठं तरी-कसा तरी जगत होतो एकच गोष्ट. मी पुंड होतो पण अधम नव्हतो ! –माझी विद्या झाली नाहीं, पण चांगल्या संगतीचा मी वीट केला नाहीं ! — तात्पर्य काय, विधात्यानं निर्माण केलेले दोन सहप्रवासी पुन्हां एकमेकाला भेटले आहेत आणि त्यांनीं पुढचा जीवनप्रवास जोडीनं करण्याचं निश्चित केलं आहे ! — फार चांगली गोष्ट घडली आहे ही—हं, आतां खुदकन् हांस पाहूं एकदां– ”

× * ×

पुरोहित ब्रदर्स
दूध व मिठाईचे व्यापारी
न. चिं. केळकर रोड,
दादर, मुंबई २८
दूध, पेढे, बर्फी, श्रीखंड व इतर दुधाचे सर्व पदार्थ खात्रीलायक मिळण्याचें ठिकाण.
शाखा–पुरोहित ब्रदर्स
‘ उद्योग–भवन ’ शिवाजी पार्क पेट्रोल पंपाजवळ, लेडी जमशेटजी रोड,
दादर, मुंबई २८.

# हें माझं पुणं!

— प्रा. ना. सी. फडके

**पुणं म्हणजे कांहीं माझी जन्मभूमि नव्हे. परंतु माझं बहुतेक शालेय शिक्षण आणि संपूर्ण महाविद्यालयीन शिक्षण पुण्यास झालं. मध्यंतरी जवळ** जवळ तीस वर्षं मी पुण्यापासून दूर होतो. परंतु आतां मी परत पुण्यास आलो आहे आणि स्थायिक झालो आहे, साहजिकच या पुणं शहरांवर माझं फार प्रेम आहे.

गेल्या वीस वर्षांत पुणं शहराचा भौगोलिक विस्तार तर कल्पनेपलीकडे वाढला आहेच, परंतु शिवाय त्याचं अंतरंग आणि बहिरंग पार बदलून गेलेलं आहे. इतकं की सध्याच्या या पुणं शहरांत वावरतांना माझ्या मनांत तर नित्य येतं की ज्या पुण्यात माझं शिक्षण झालं आणि माझ्या नवतारुण्यातली पहिली कांहीं वर्षं गेली ते पुणं शहर आहे तरी कुठं ? काळाच्या उदरांत ते संपूर्णपणें गडप झाल्यासारखं मला वाटतं. एक निराळीच विस्तीर्ण अकाली नगरी निर्माण झाल्याचा भास होतो. नव्यानं अवतीर्ण झालेली ही नगरी मला आवडते हे निराळं. परंतु हेच ते पूर्वीचं पुणं अशी मला ओळख पटायला थोडा वेळ लागतो.

आज घटकेला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातलं पुण्याचं स्थान कोणतेहि असो, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणंच आहे. कदाचित् पुण्यावरील प्रेमामुळें मला असं वाटत असलहि. पण वाटतं येवढं खास, आणि बाहेरच्या इतर लोकांना काय वाटतं त्याची पर्वा मी कशाला करूं ?

पन्नास वर्षांपूर्वी तर परकीयांचं राज्य असूनसुद्धां महाराष्ट्राची सर्व प्रकारची वैचारिक राजधानी इथे पुण्यातच होती. 'पुणं बोले, आणि महाराष्ट्र हाले' — नव्हे, 'पुणं बोले, सबंध हिंदुस्थान हाले' अशी वस्तुस्थिती होती. लोकमान्य टिळक पुण्यात होते. आपल्या 'केसरी' पत्रांतून कोट्यावधि देशबांधवांशीं ते बोलत होते, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या मंत्राची शिकवण देत होते, स्वातंत्र्याच्या साऱ्या चळवळींची सूत्रं इथं पुण्यांत हालत होती. केवळ राजकीय चळवळींचीच नव्हे तर सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक, अशा सर्वच घडामोडींचं उगमस्थान आणि स्फूर्तिस्थान पुणं होतं. नमुनेदार विद्यालयं आणि महाविद्यालयं कुटे होती ? तर पुण्यात. स्त्रियांचा उद्धार करण्याचं कंकण बांधून संस्था काढणारी माणसं कुठं होती ? तर पुण्यात. सामाजिक आणि धार्मिक चळवळींचं आणि वादविवादांचं केंद्रस्थान कुठे होतं ? तर पुण्यात. गोखल्यांचा भारत सेवकसमाज कुठं होता ? तर पुण्यात. जुन्या संस्कृत वाङ्मयाचं संशोधन करणारी एकमेव संस्था पुण्यात होती. कादंबरीकारांचे आणि नाटककारांचे अग्रणी पुण्यात होते. एका नाटक कंपनीनं बांधलेलं महाराष्ट्रातलं एकमेव नाटकगृह पुण्यात होतं. संगीताचे खरे दर्दी पुण्यात आहेत अशी कलावंतांची समजूत होती. मुत्सद्यांचं, नेत्यांचं, विद्वानांचं, पंडिताचं, रसिकांचं आगर पुणं होतं.

त्या काळातलं पुणं शहर लांबी रुंदीच्या दृष्टीनं केवढसं होतं. पूर्व दिशेला रास्त्यांचा वाडा, पश्चिमेला आतां ज्या पुलाला संभाजी पूल म्हणतात, तो त्यावेळचा 'लकडी पूल', दक्षिणेला आता अनाथ विद्यार्थीगृह ज्या भागांत आहे त्या भागांतलं नरसोबाचं देऊळ, आणि उत्तेरला ओंकारेश्वर आणि उत्तरेश्वर ही देवालयं-अशा चतुःसीमात त्या काळातलं पुणं सामावलेलं होतं. तीन मैलांची लांबी आणि दीड मैलाची रुंदी- बस्स ! येवढाच पुण्याचा विस्तार होता. या पुणं शहरांत परोपरीच्या चळवळी सतत चाललेल्या असत, परंतु एकंदरीत शहर लहानसंच होतं, शांत होतं. परक्यांचं राज्य असूनहि माणसं अधिक सुखी होती.

पुण्याचं हे जुनं स्वरूप आज घटकेला एखाद्या दंतकथेसारखं खचित वाटेल. आतां पुण्याचं क्षेत्रफळ दामपटीनं वाढलं आहे. ज्या भागांत पूर्वीच्या काळात इतकं दाट जंगल होतं कीं सूर्यास्तानंतर तिकडे फिरकण्याचीदेखील सोय नव्हती ते भाग आता दाट वस्तीचे बनले आहेत आणि तिथें मध्यरात्रीपर्यंत माणसांची रहदारी असते. लोकवस्ती संख्येनं तर भलतीकडे फुगली आहेच, परतु शिवाय ती बहुरंगी झाली आहे. पन्नास वर्षांच्या पूर्वीच्या पुण्यात ज्याची मायबोली मराठी नव्हती असा माणूस क्वचितच भेटत असे. आजच्या पुण्यात पंजाबी, सिंधी, उर्दू, कानडी, तामील, मद्रासी, बंगाली अशा अनेक भाषा

त्या त्या विभागांत कमीजास्त प्रमाणांत ऐकूं येतात. भारतांतील बहुतेक सर्व प्रांतांच्या वेश-भूषेच्या तऱ्हा दृष्टीस पडतात. महाराष्ट्रीय तरुण मुलींदेखील पंजाबी पोशाख करून हिंडूं लागल्या आहेत. पूर्वीच्या पुण्यात फार थोडी विश्रांति-गृहें होती, आणि जी होती तिथें फक्त अस्सल पुणेरी खाद्यपदार्थ मिळत असत. आतां जिकडे तिकडे इराणी हॉटेलं झाली आहेत, आणि तिथें मिळणाऱ्या मांसाहारी पदार्थांचा समाचार महाराष्ट्रीय पुरुषच नव्हे, तर स्त्रीयांदेखील घेत आहेत. उडुपी हॉटेलवाल्यांनी पुण्यावर चांगलच आक्रमण केलेलं आहे, आणि इडली डोसाचा प्रकार सर्रास झाला आहे. ज्या पुण्यात पूर्वी टांगा हे एकच वाहनाचं साधन होतं — पुणेरी टांगेवाला म्हणजे साहित्याचा विषय होण्याजोगी एक अजब वल्ली होती — त्या पुण्यात आता रिक्षा, मोटार गाड्या, बसेस धावूं लागल्या आहेत, आणि सायकलींची संख्या तर लाखांनी मोजावी लागत आहे. आणि इतकं झालं तरी पुणं आणखी आणखी वाढतच आहे किती वाढणार आहे कुणास ठाऊक ?

मात्र अशा प्रकारें पुण्याचं बाह्य दर्शन ओळखूं न येण्याइतकं बदललं असलं तरी या शहराचं पूर्वीचं सांस्कृतिक महत्त्व अद्यापिहि कायम आहे, वाढत आहे. 'शिक्षणाचं आदर्श केंद्र' हे वर्णन अजूनहि या शहराला लागू पडण्यासारखं आहे, विद्यालयांची आणि महाविद्यालयांची संख्या मोठी तर आहेच, परंतु शिवाय पुणें विद्यापीठ आतां स्थापन झालेलं आहे. इंग्रजांच्या राजवटींत मुंबई प्रांताचा गव्हर्नर जिथें रहात असे ती विस्तीर्ण नयनरम्य सृष्टिशोभेची जागा विद्यापीठाला मिळालेली आहे. आणि या जागेत वावरतांना पुरातन कालातील एखाद्या ऋषीच्या आश्रमांत प्रवेश केल्यासारखं माणसाला वाटतं. शकुंतला, प्रियंवदा, अनुसुया इथें भेटण्याचा संभव असतो. मात्र त्या तापसी कन्या नसतात. ज्यां डेक्कन कॉलेजात टिळक, आगरकर शिकले, त्या डेक्कन कॉलेजचं आता विसर्जन झालेलं आहे, परंतु त्या जागीं दुसरी एक महत्वाची संस्था कार्य करीत आहे. भांडारकर रीसर्च इन्स्टिट्यूशन, गोखले इकॉनॉमिक इन्स्टिट्यूशनं, या जुन्या संस्थांतून संशोधनाचं कार्य चालू आहेच. हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संस्था जोरांत चाललेल्या असून त्यांच्या वेगवेगळ्या परीक्षांना हजारों विद्यार्थी बसत आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेची कचेरी पुण्यातच आहे. तिच्याहि परीक्षांचा फायदा हजारों विद्यार्थी घेत आहेत. पूर्वीच्या पुण्यात नगरकरांची तालीम, लोखंड्यांची तालीम, चिंचेची तालीम अशा तालमीतूनच फक्त व्यायामाचं शिक्षण मिळत असे. शाळेंत ड्रिलचा तास असे पण तो फक्त चुकविण्यासाठीं असे. खेळांची सोय शाळातून असे, परंतु तीदेखील मर्यादितच. आतां शाळातून आणि कॉलेजांतून सर्व प्रकारच्या क्रीडा प्रकारांची संघटित सोय झालेली आहे, आणि शिवाय केवळ व्यायामाचं शिक्षण देणाऱ्या महाराष्ट्रीय व्यायाम मंडळासारख्या संस्थाहि उत्तम प्रकारें चालल्या आहेत. क्लब ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यासारख्या संस्थांचा व्याप वाढत आहे. सारांश, विद्येचं आणि पांडित्याचं माहेरघर ही पुण्याची कीर्ति नुसती कायमच नाहीं तर वाढत आहे. सर्व प्रकारचं लष्करी शिक्षण, शिक्षण देणारी डिफेन्स ॲकॅडमी पुण्याजवळच्या खडकवासल्यास असल्यामुळें पुण्याच्या शैक्षणिक महत्त्वांत आणखीनच भर पडली आहे. पुण्याच्या रस्त्यानं चालणाऱ्या माणसाला भेटणाऱ्या प्रत्येक दहा माणसांत एक विद्यार्थी आणि अर्धी विद्यार्थिनी असते असे गणित आकडेशास्त्रज्ञानं मांडलेलं आहे.

पन्नास वर्षांपूर्वीच्या पुण्यात 'केसरी' आणि 'ज्ञानप्रकाश' अशी दोनच वृत्तपत्रं होती. 'केसरी' साप्ताहिक होता. 'ज्ञानप्रकाश' दैनिक होता. आतां सकाळची संध्याकाळची अशी कितीतरी वृत्तपत्रं पुण्यात निघतात.

## प्रेमाचें मार्ग

**प्रभाकर आणि प्रभावती एका कुंजांत प्रेम करीत बसली होतीं. प्रभावतीवरील आपलें प्रेम कसें व्यक्त करावें, कोणत्या शद्बांत व्यक्त करावें हें कांहीं प्रभाकरला सुचेना. तेव्हां प्रभाकर प्रभावतीला म्हणाला, " प्रभा, माझं तुझ्यावर इतकं प्रेम आहे, पण ते शद्बांनीं व्यक्त करतां येत नाहीं. "**

**" अिश्श, त्यांत काय मोठसं ?" प्रभावती म्हणाली, " दुसरे मार्ग थोडे कां आहेत म्हणायला ! "**

त्यांच्या भरीला साप्ताहिकं आहेत, मासिकं आहेत. परगांवची मासिकं कितीतरी पुण्यास येऊन आपले संसार थाटीत आहेत लोकशिक्षणाचं आणि मतप्रचाराचं काम करण्यासाठीं व्याख्यानं नित्य झडत आहेतच. पूर्वी चार–पांचशें हजार श्रोतें हजर असले कीं ती मोठी सभा ठरत असे. आतां मोठी सभा म्हटली कीं पंचवीस–तीस हजारांचा जमाव लोटतो. पंडित नेहरू बोलणार असले कीं लोकांची गर्दी लाखांनं मोजावी लागते.

" भारत सरकारकडून रजिस्टर्ड केलेले " आणि वैद्य नसून जाहिरातीत खोटेच वैद्य लिहणाऱ्यापासून सावधान.

# पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

**नकली वैद्यांपासून सावध रहावें.**

**वैद्य बी. आर. बोरकर,** आयुर्वेद भुवन (११४)

**मु. पो. मंगरूळपीर, जिल्हा अकोला ( विदर्भ )**

# वकिली ?

जिमखान्यावर जावयाचे म्हणजे या पुलावरून जावे लागते
पूल ओलांडतांना तुला 'संपवले' ते स्मशान दिसते
पायाखालच्या पूल कमानीतून 'पाण्या' चे बाळ जन्मत असते
सूर्याच्या मावळत्या किरणाच्या पंख्यावर आसूंचा 'वाळा' पडतो.

लहान जागीं फाटलेला पतंग........तलवार गमावलेली मॅन
हेअर कटिंग सलूनमधल्या फरशीवर त्या केसच केस
असे कांहींतरी माझे होते ........ ज्ञानाचीच 'भीती' होते
पुर्नजन्म, आत्म्या या देऊन लेखणीमुळेंच हे लिहिले

'आहे' शब्द खोडून 'नाहीं' लिहावयाची जरूर आहे
सैपाकासाठीं लाकडे आणणेहि मला सोसवत नाहीं
तुझ्या सरणावर माझी चुंबने ........ आलिंगनेहि जळाली ?
खरेंच सुखस्पर्शापुरता मी कायमचा विटाळशी बसलो आहे

यशस्वी वकिलाच्या वृद्धापकाळांतील अर्धांग वायूसारखा
–नव्हे मी अर्धांगवायूची दरखास्त घेणारा यशस्वी वकील

–लोककवि 'मनमोहन'

## अवघे सत्तावीस वयमान

" दातीं
तृण धरूनहि "
मी
तुझ्यामागें
आलो असतो
जर—
प्रिये....
तोंडाचं
हे असं
बोळकं झालं नसतं तर !

—सदाशिव करंदीकर

नव्यानं निर्माण झालेलं पुणें शहर, अशा प्रकारें बहुरंगी आणि बहुढंगी झालेलं आहे. या नगरीची हवा सर्व ऋतूंत मोठी सुखाची आणि प्रसन्न असते. 'स्वताई' हा शब्दच आतां आपल्या कोशातून नाहींसा होत आहे. पूर्वी मध्यम वर्गीय कुटुंबाची भाजी दोन आण्यांत खरेदी करतां येत होती. आतां दिवसापुरती भाजी घ्यावयाची तर आठ–बारा आणे फेकावे लागतात, परंतु परोपरीच्या भाज्या आणि फळं इथे बारा मास मुबलक मिळतात. फुले मंडईत सकाळच्या प्रहरी घटकाभर हिंडा, तिथले त्याच्या भाज्यांचे व फळांचे ढीगच्या ढीग पाहून तुमचे डोळे खचित निवतील. लग्न थाटानं करावयाचं असेल तर पुण्यास करावं, असे बाहेरगांवचे लोक अजून म्हणतात

आजच्या पुण्यात वावरतांना पूर्वीच्या पुण्यातल्या कांहीं कांहीं गोष्टी न दिसल्यामुळें मला कधीं कधीं खेद वाटतो. रसाचं गुऱ्हाळ म्हणजे पूर्वीची एक विलोभनीय संस्था होती. बैलांनी ओढल्या जाणाऱ्या घाण्याचा तो आवाज, दुकानाच्या दर्शनी भागांत मांडलेली स्वच्छ सुंदर पितळेची भांडी अशा गोष्टींमुळें त्या जागेला मोठी शोभा येत असे. आणि त्यावेळीं एक रुपयाला सोळा शेर रस मिळत असे हे सांगितलं तर आज कुणाला खरहि वाटणार नाहीं. पूर्वीच्या पुण्यात फरासखान्यासमोरचा जो बुधवार पेठेचा भाग होता, तिथें फुलवाल्यांची दुकानं म्हणजे एक विलक्षण शोभा होती. ती गुऱ्हाळं आतां गेली, फुलवाल्यांची ती दुकानं आतां पूर्वीसारखी वाटत नाहींत. जुन्या पुण्याच्या सौंदर्याच्या अशा किती तरी खुणा काळानं पुसून टाकल्या आहेत. मुख्य म्हणजे शांत सुखी जीवनक्रम आतां दुर्मिळ झाला आहे. आतां या पुण्यात जिकडे तिकडे गर्दी, धावपळ, घाई दृष्टीस पडते. अपघात वाढले आहेत. चोऱ्यामाऱ्या वाढल्या आहेत. आयुष्य गुंतागुंतीचं झालं आहे. परन्तु याचच नांव कदाचित् 'आधुनिकता' असेल. आणि म्हणूनच त्याचा खेद मला वाटत नाहीं. हें पुणं आजदेखील मला अत्यंत प्रिय आहे. मी पुष्कळ प्रवास केला आहे. शहरं पाहिली आहेत, तीर्थक्षेत्रं पाहिली आहेत. काश्मिर, केरळसारख्या भागांतली निसर्ग शोभेची रम्य स्थळं पाहिली आहेत. परन्तु ती पाहूनहि माझी अशीच भावना आहे कीं पुण्यासारखं दुसरं शहर नाहीं ! 'नाहीं सर शहर पुण्याची' अशा शब्दांत लावणीकारांनी त्यावेळच्या पुण्याची जी प्रशंसा केली ती आजहि यथार्थच वाटते.

* दीपावलि आणि नूतन वर्ष सुखाचे जावो *
विजय हेअर कटींग सलून
भिवंडीवाला बिल्डिंग, हिंदमाता सिनेमाजवळ, डॉ आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
चालक— गणपत आबाजी माने

६७
२०/१०/६०

# 'एकच प्याल्या'चा लेखनकाल

लेखक :- डॉ. रा. शं. वाळिंबे, एम्. ए., पीएच्. डी.

'श्रीदीपलक्ष्मी' मासिकाच्या माच १९६० च्या अंकांत श्री. वि. स. सुखटणकर यांचा 'माझ्या डायरींतील गडकरी' या मथळ्याचा लेख प्रसिद्ध झाला होता. 'टीकाकारांनो! आतां गडकरी वाङ्मय पुन्हां अभ्यासा!' असा ठसठशीत इषारा श्री. सुखटणकरांनीं लेखाच्या सुरवातीलाच दिलेला आहे. या लेखांत 'एकच ला' या नाटकाच्या लेखनकालासंबंधीं सुखटणकरांनीं विवेचन कल आहे. (पृ. ५२) ते म्हणतात—"गडकरी गोव्यांत असतांना तेथें निर्माण झालली त्यांची आणखी एक महत्त्वाची लेखनकृति म्हणजे त्यांचें 'एकच प्याला' हें नाटक. या नाटकाचे लागोपाठ पहिले तीन अंक त्यांनीं त्यांचे गोव्यांत वास्तव्य असतांना पणजी येथें लिहिलें... या नाटकाचे तीन अंक, म्हणजे या नाटकाचा निम्म्याहून अधिक भाग त्यांनीं ज्यावेळीं लिहिला त्यावेळीं ही नाट्यकृति बव्हंशीं पूर्ण स्वरूपांत त्यांच्या डोक्यांत गोव्याच्या त्यांच्या मुक्कामांतच तयार झाली होती, असें निश्चितपणें म्हणतां येतें." आज इतकीं वर्षें लोकांना अज्ञात राहिलेली ही महत्त्वाची घटना' ज्या पुराव्याच्या आधारानें श्री. सुखटणकरांनीं उजेडांत आणली तो पुरावा म्हणजे एका वहीच्या पहिल्याच पानावर खुद्द गडकऱ्यांनी करून ठेवलेली नोंद. ही नोंद पुढीलप्रमाणें आहे

श्रीश वंदे।
एकच प्याला.
एक सामाजिक नाटक.
ले. राम गणेश गडकरी.
प्रारंभ १८३६ वैशाख शुद्ध तृतीया (अक्षयतृतीया)
ता. २८ एप्रिल १९१४
पणजी, गोवा.


सदर पुरावा दाखल कल्यानंतर श्री. सुखटणकर पुढें म्हणतात—"या वहींतील हें सर्व लेखन इतकें एकटाकी आह कीं, त्यावरून मालवणहून पुण्याला जाण्याकरतां गडकरी पुनः गोव्याला गेले तेव्हां त्यांनीं मध्यें खंड पडूं न देतां हे तिन्ही अक लिहून काढले, ही गोष्ट स्पष्ट होते."

'एकच प्याल्या'चे पहिल तीन अंक गडकऱ्यांनी गोव्याच्या मुक्कामांत १९१४ च्या एप्रिल-मे मध्येच एकटाकीं लिहून पुरे केले आणि १९१६-१७ सालीं या नाटकाला त्यांनी 'अखेरचें स्वरूप' दिल असा सुखटणकरांचा आशय आहे. यानंतर ते पुढे म्हणतात—"'एकच प्याला' नाटकाचा लेखनकाल १९१६-१७ साल, अस गृहीत धरून त्या आधारें गडकऱ्यांच्या नाटकांच्या क्रमवारीचा टीकाकारांनीं बनवलेला ठोकताळा व त्याला धरून गडकऱ्यांच्या लेखनकलेच्या विकासाचें व त्याच्या भावजीवनासंबंधींचे त्यांनीं बसविलेले आडाखे, हीं आतां या नवीन उपलब्ध झालेल्या माहितीमुळें डळमळित झालीं आहेत व त्यांचा त्यानीं फेरविचार करणें भाग आहे."

श्री. सुखटणकरांच्या विवेचनाचा आतां तपशीलवार विचार करतों.

गोव्याच्या मुक्कामांत गडकरी श्री. वरेरकरांच्या निमंत्रणावरून मालवण येथे गेले. मालवण येथे मुक्काम असतांना गडकऱ्यांनी 'एकच प्याला' या नाटकाचें कथानक सांगण्यास आरंभ केला, इतकेंच नव्हे तर 'सिंधु' व 'गीता' हीं पात्रांचीं नांवें देखील त्यांच्या मनांत तयार झालीं होतीं असें वरेरकर म्हणतात.[१] वरेरकरांच्या या साक्षीवरून 'एकच प्याला' हें नाटकाचें नांव, आणि त्याच्या कथानकाचा स्थूल आराखडा या गोष्टी गोव्यांतील मुक्कामांतच गडकऱ्यांच्या मनांत तयार झाल्या असाव्यात असें दिसतें.

पण एकच प्याल्याचें प्रत्यक्ष लेखन गडकऱ्यांनी गोव्याच्या मुक्कामांत सुरू केलें असें वरेरकर म्हणत नाहींत. किंबहुना मालवणला येण्यापूर्वींच किर्लोस्कर संगीत मंडळींच्या बिऱ्हाडीं गडकरी 'पुण्यप्रभाव' नाटक लिहीत होते असें वरेरकर स्पष्टपणे म्हणतात.[२] मालवणला गडकरी गेले तोपर्यंत "नाटक पुरं झालं नव्हतं. इतकंच नव्हे, तर



त्यांतला फारच थोडा भाग लिहून झाला होता आणि त्यांच्या अंगावर एकशेंदहा रुपये होते ते एकशेंदहा रुपये परत द्या, किंवा नाटक तरी पुरं करून द्या, नाहींतर तुम्हांला जाऊं देणार नाहीं असं शंकररावांनीं खडसून सांगितलं" असें वरेरकर म्हणतात. याचा अर्थ असा कीं 'पुण्यप्रभाव' नाटक लिहून देण्याचें कबूल करून तें पुरें करण्यासाठींच गडकरी किर्लोस्कर मंडळीच्या बिऱ्हाडा राहिले होते, खर्चासाठीं कांहीं अगाऊ रकम (वरेरकरांच्या म्हणण्याप्रमाणें ११० रु.) त्यांना कंपनीकडून मिळालेली होती; आणि नाटक पुरें करून दिल्याखेरीज शंकरराव मुजुम-

१. 'गडकरी यांच्या आठवणी' (संपादक गो. गो. अधिकारी, १९२८) पृ. १२२.

२. 'माझा नाटकी संसार', खंड दुसरा, पृ. १५४.

दार त्यांना मालवणास वरेरकरांकडे जाण्यास परवानगी देईनात. वरेरकरांनी सदर रक्कम एका मित्राकडून गडकऱ्यांना मिळवून दिली. गडकऱ्यांनी ती रक्कम शंकररावांना दिली आणि 'पुन्हां मागें वळूनसुद्धां न पहातां ते तडक रामा नाईक यांजकडे आले आणि तिथून मालवणला आले' अशी वरेरकरांनी हकिकत दिली आहे.[3] चारच दिवस गडकरी मालवणीं वरेरकरांच्या घरीं राहिले असें वरेरकर म्हणतात.

आता किर्लोस्कर मंडळीच्या गोव्यांतील मुक्कामाविषयीं थोडा तपशील अस्सल कागदपत्रांच्या आधारानें देतों. १९१४ जानेवारी अखेर मंडळीचा मुक्काम अथणी येथे होता. १० फेब्रुवारी १९१४ रोजीं सायंकाळीं मंडळी म्हापसे येथें आली. म्हापसे येथें पहिला खेळ 'मूकनायक' १४ फेब्रुवारी (शनिवार) रोजीं झाला. १७ मार्च रोजीं 'विद्याहरणा'चा प्रयोग करून मंडळीने म्हापसे येथील मुक्काम संपविला. १८ मार्च रोजी मंडळी पणजी येथे गेली. पणजी येथे पहिला खेळ 'मूकनायक' २१ मार्च रोजीं झाला. पणजीच्या मुक्कामांतील शेवटचा खेळ 'विद्याहरण' १६ मे रोजीं झाला, आणि ता. १८ मे रोजीं मंडळीने पणजी सोडली, व १९ मे रोजीं सकाळीं मडगांव येथें मंडळी आली. २२ जून रोजीं मंडळीनें मडगांव सोडलें व २३ जून रोजीं सकाळीं सात वाजतां बेळगांव येथे मंडळी आली. तात्पर्य १० फेब्रुवारी १९१४ पासून २२ जून १९१४ पर्यंत ४ महिने १२ दिवस किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम गोव्यांत होता.

कै. चिंतोपंत दिवकर (गुरव) यांनी स्वहस्तें लिहिलेल्या रोजनिशींत शुक्रवार, ता. १ मे रोजीं पुढील नोंद आढळते. "पणजी. रा. गडकरी यांनीं कंपनीचे खर्च केलेले पैसे परत दिले." वरेरकरांनीं ११० रु. ची जी रक्कम गडकऱ्यांना आपल्या मित्राकडून मिळवून दिली व जी गडकऱ्यांनी शंकरराव मुजुमदारांच्या अंगावर फेकून दिली व ते तडक मालवणास गेले असा वर उल्लेख आलला आहे, तीच ही रक्कम होय. चिंतुबुवा दिवेकरांनी यामुळेच आपल्या रोजनिशींत सदर घटनेचा आवर्जून उल्लेख केला आहे हें अगदी उघड आहे. तात्पर्य, १ मे किंवा २ मे १९१४ रोजीं गडकरी मालवणास गेले असावेत आणि ६ मेपर्यंत ते तेथे राहिले असावेत असें वरेरकरांनी दिलेल्या माहितीवरून दिसतें. वरेरकरांनी कुठेहि नक्की तारखा दिलेल्या नसल्यामुळे इतर पुराव्याच्या आधारानें मी या तारखा ठरविल्या आहेत. मालवणचा मुक्काम आटोपल्यावर गडकरी पुन्हा पणजी मुक्कामीं किर्लोस्कर मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले असले पाहिजेत असें स्पष्ट दिसतें. 'चारच दिवस त्यांचा (म्हणजे गडकऱ्यांचा) मालवणांत माझ्या घरीं मुक्काम झाला. ते दिवस मोठे मजेंत आणि काव्यशास्त्रविनोदांत गेले. शंकरराव मुजुमदारांच्या वर्तनानं त्यांना जो जबर धक्का बसला होता तो ध्यानीं घेऊन आम्ही सर्वच त्यांना आनंदांत ठेवण्याचे आपापल्या परीनें प्रयत्न करीत होतों. त्याला यश येऊन ते मोठ्या उल्हासानं पुण्याला निघून गेले.' असें वरेरकरांनी विवेचन केलें आहे.[4] यावरून मालवण सोडल्यावर गडकरी परस्पर पुण्यास गेले असें वाटण्याची शक्यता आहे. पण गडकरी पुण्यास परत गेले ते ता. २० मे रोजीं मडगांव येथून. चिंतोपंत दिवेकर यांच्या रोजनिशींत २० मे १९१४ रोजीं पुढील महत्त्वाची नोंद आढळते– "मु मडगांव. रा. गडकरी आज पुण्याकडे गल." किर्लोस्कर मंडळीने १८ मे रोजीं पणजी सोडली, आणि १९ मे रोजीं मंडळी मडगांवीं आली हा उल्लेख वर येऊन गेलेला आहेच. म्हणजे मालवणहून निघाल्यावर (६ किंवा ७ मे) गडकरी पणजी येथे मंडळीच्या बिऱ्हाडीं आले, मंडळीबरोबरच ते १९ मे रोजीं मडगांवीं आले, आणि लगेच दुसऱ्या दिवशीं (२० मे) त्यांनी मडगांवाहून पुण्याकडे प्रयाण केलें हें कागदोपत्री पुराव्यावरून सिद्ध होत आहे. तात्पर्य, मालवण सोडल्यानंतर गडकऱ्यांचा गोव्यामध्ये मुक्काम फारतर दहाबारा दिवसच होता. यांत कांहीं शंका उरत नाही.

श्री. सुखटणकरांनी ज्या वहीचा उल्लेख केला आहे तिच्या पहिल्या पानावर २८ एप्रिल १९१४ रोजीं 'एकच प्याला' या नाटकाच्या आरंभाची नोंद गडकऱ्यांनीं स्वहस्तें पेन्सिलीने केलेली आहे हें सत्य आहे. पण १ मेच्या सुमारास गडकरी मालवणला गेले हें वर दाखविलेंच आहे म्हणजे एकच प्याल्यासंबंधींची वरील नोंद वहीमध्ये केल्यानंतर ३–४ दिवसांतच ही घटना घडली. 'पुण्यप्रभाव' लिहिण्याचें कबूल करून खर्चासाठी आगाऊ पैसे घेतले, आणि ठरल्याप्रमाणें सदर नाटक पुरें न केल्यामुळेंच शंकरराव मुजुमदार व गडकरी यांचा मोठा खटका उडाला होता हें लक्षांत घेतलें असतां 'पुण्यप्रभाव' पुरें न करतां २८ एप्रिल पासून १९ मेपर्यंत (२० मे रोजीं गडकरी पुण्यास गेले.) सुमारें बावीस दिवसांत गडकऱ्यांनी एकच प्याल्याचे पहिलें तीन अंक एकटाकी पुरे कले या सुखटणकरांच्या विधानांतील भ्रामकपणा ताबडतोब कळून येईल. शिवाय ६ मेपर्यंत गडकरी मालवणांतच होते. म्हणजे मालवण सोडल्यावर फक्त तेरा दिवसच गडकरी गोव्यांत होते, हें लक्षांत घेतलें असतां (आणि मुजुमदारांशीं झालेल्या भांडणामुळे त्यांची मनःस्थिति बिघडली असली पाहिजे हें लक्षांत घेतलें असतां,) 'पुण्यप्रभाव' पुरें करण्याची फार निकड असतांहि तें अजिबात बाजूला ठेवून गडकऱ्यांनी 'एकच प्याला' हातांत घेऊन त्याचे तीन अंक एकटाकी पुरें केलें हें सर्वथा असंभाव्य आहे.

गोव्यांतील मुक्कामांत गडकऱ्यांनी 'एकच प्याला' नाटकाचें कांहीं अंक प्रत्यक्ष लिहिल असें वरेरकर चुकून देखील म्हणत नाहींत.

गडकरी पुण्यांत परत आल्यानंतर (म्हणजे २० मे १९१४ नंतर) चिंतामणराव कोल्हटकर त्यांच्या भेटीस गेले. कोल्हटकरांचे शब्दच येथें उतरून घेतों. "मी ताबडतोब भेटीस गेलों

३. किता, पृ. १५५.

४. 'माझा नाटकी संसार', खंड दुसरा, पृ. १५६–७.

मंगल गृहोपयोगी सोप जेली व (टिनोपॉल मिश्रित) साबू चुरा


१४ पौंडी जेलीचे डबे
(फक्त मुंबईंत) घरपोंच केले जातील.

ट्रेड मंगल मार्क

मे. व्ही. गाडगीळ आणि कंपनी
रानडे रोड, दादर, मुंबई २८

मीं 'भारत मंडळी' सोडल्याचें त्यांच्या कानीं घातलें...... त्यांनीं गोमंतकाचें रसभरित वर्णन केलें. लिहून झालेला 'पुण्यप्रभाव' चा भा वाचून दाखविला. तो ऐकल्यानंतर मी चकितच झालों."[५] गडकऱ्यांचा व चिंतामणराव कोल्हटकरांचा दृढ संबंध लक्षांत घेतला असता 'पुण्यप्रभावा'चें वाचन त्यांच्यासमोर गडकऱ्यांनी करावें, आणि 'एकच प्याल्या'चे सबंध तीन अंक लिहून होऊन देखील त्यासंबंधीं एक अक्षरहि त्यांना सांगू नये, हा प्रकार अगदी अतर्क्य आहे. गडकऱ्यांनी खरोखरच गोव्याच्या मुक्कामांत ( सुखटणकर म्हणतात त्याप्रमाणें ) 'एकच प्याल्या'चे पहिले तीन अंक ओळीने ( व ते देखील शाईने ! ) लिहून काढले असते तर एवढी महत्वाची गोष्ट कोल्हटकरांना त्यांनी सांगितली नसती हें कधींच पटण्यासारखें नाही.

मराठी रंगभूमीचे व नाट्यवाङ्मयाचे अतिशय मार्मिक व व्यासंगी अभ्यासक श्री. पु. रा. लेले यांचा १९१४ सालच्या जूनमध्ये गडकऱ्यांशीं निकटचा संबंध होता. गोव्याहून गडकरी पुण्यास परत आल्यानंतर 'एकच प्याल्या'च्या पहिल्या तीन अंकाच्या लेखनाविषयीं ते लेले यांच्याजवळ खास कांही तरी बोलले असते. या बाबतींत खुद्द श्री. लेले यांचें मला जें पत्र आलें त्यांतील जरूरीपुरता भाग उद्धृत करतों. "गोव्याहून गडकरी परत आले आणि १९१४ च्या मे महिन्यांत त्यांचा मुक्काम पुण्यांतच होता. मी त्यावेळीं भावे स्कूलमध्यें मास्तर होतों, आणि भारत नाटक मंडळीचा मुक्काम समोर किर्लोस्कर थिएटरांत होता. त्या कंपनीच्या बिऱ्हाडीं माझी व गडकऱ्यांची सहजासहजी गांठ पडत असें. एक दिवस आप्पा टिपणीस, गडकरी आणि मी असे बोलत बसलों



होतों. त्यावेळीं विषय आप्पांनीं सुरू केला. 'दारूच्या दुष्परिणामावर एक सोशल नाटक मस्त लिहिणार आहेत. मूकनायक रोमँटिक आणि विद्याहरण पौराणिक. मास्तर प्रत्यक्ष घडलेलें उदाहरण घेऊन नाटक लिहिणार आहेत.' ( मास्तर म्हणजे गडकरी. ) आणखी बोलतां बोलतां मास्तर म्हणाले : 'तुम्हांला कल्पना यायची नाहीं हो सी. के पीं. चीं किती कुटुंबे या दारूच्या व्यसनापायीं बरबाद झालीं आहेत.' हें वाक्य मला उद्देशून होतें... ...या संभाषणांत नाटक लिहावयास 'घेणार' अशी भविष्यकालची गोष्ट चालली होती. लिहिलें आहे, एक अंक म्हणा, दोन प्रवेश म्हणा लिहिले आहेत. असें गडकरी केव्हांहि म्हणाले नाहींत शिवाय गडकरी पहिला अंक पहिला प्रवेश अशी सुरुवात करीत नसत. त्यांच्या 'सेंट्रल आयडिया'चें दिग्दर्शन करणारा प्रवेश ते प्रथम लिहीत आणि मग बाकीचें नाटक लिहीत. अशी त्यांची पद्धत असे. त्या सीझनमध्यें मी पुण्यांत जूनच्या दहा तारखेपर्यंत होतो आणि भारत मंडळीच्या बिऱ्हाडीं नेहमीं जात असे आणि गडकरीहि येत असत. चहा एका बैठकींत आम्ही घेत असूं आणि एखाद्या प्रसंगीं गप्पा चालतां चालतां जेवणाची वेळ झाल्यास आमची जेवणाचीहि पंगत होत असे." श्री. लेले यांच्या पत्रावरून स्पष्ट होणारा मुद्दा असा की, २८ एप्रिलपासून १९ मेपर्यंत गोव्यामध्ये गडकऱ्यांनी 'एकच प्याल्या'चे पहिले तीन अंक जर एकटाकी लिहून ठेवले असते तर 'या महत्त्वाच्या गोष्टीसंबंधीं आप्पा टिपणीस अथवा लेले यांच्याजवळ यासंबंधीं कांहींतरी बोलल्यावाचून ते कधीहि राहिले नसते हें आवर्जून सांगण्याची जरूर नाही.

आता श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांची अतिशय महत्त्वाची साक्ष पाहावयाची आहे. 'एकच प्याला' या नाटकाच्या शेवटच्या प्रवे-

## महाराष्ट्र-वंदना

देशभक्ता, पुण्यवन्ता, पावना, संजीवना
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा !
आज आरक्ता उषा ही तव यशाने लाजली
लक्ष योग्यांच्या ऋतूंची सांगता साकारली
सुकृतें आलीं फळाला, मूर्त होई प्रार्थना
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा ! ॥१॥
अमृताला जिंकणारी श्रीमऱ्हाटी वैखरी
क्लेशमुक्ता आज माता राजसत्ता स्वीकरी
शोभतां ती आत्मतेजें धन्यता सिंहासना
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा ! ॥२॥
नाडणाऱ्या दांभिकांशीं संतवाणी झुंजली
मावळ्यांनी भक्तिभाव शौर्यगाथा पूजिली
जन्मलें स्वातंत्र्य येथें पीडितांच्या रक्षणा
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा ! ॥३॥
संपु दे आतां विराणी, दैन्य सारें जाऊं दे
स्वेदगंगा मोक्षदा येथें खळाळत वाहुं दे
हासुं दे सौख्यांत आतां दुःखितांची वेदना
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा ! ॥४॥
ऐक रे, आव्हान कोणी देतसे तुज बाहुनी
साद दे त्याला कृतीने, ध्येयसूक्तें गाऊनी
भारताच्या अस्मितेला तूंच देई प्रेरणा
जय महाराष्ट्रा समर्था, हिंदभूमी-भूषणा ! ॥५॥

—गंगाधर जोगळेकर

५. 'बहुरूपी', पृ. २६८-९.

शाच्या लेखनासंबंधीं ही साक्ष आहे. " १५ नोव्हेंबर १९१७ ला लक्ष्मी-पूजनाचा दिवस असावा. रात्रीं साडेनऊच्या सुमारास ' एकच प्याला ' नाटकाचें शेवटचें वाक्य लिहून त्या प्रवेशाखालीं स्वहस्तें सही तारीख घालून त्यांनीं शिक्कामोर्तब केला. या शेवटच्या प्रवेशाचा लेखक मी होतों. गेले पंधरा दिवस नाटक पूर्ण करण्याचा चंग बांधून ते बसले होते."[६] हेंच विधान कोल्हटकरांनी पुन्हा एकदा केलें आहे. " मुदत भरल्यावर उमरावतीहून मंडळी सोडून मी पुण्यास मास्तरांच्याचकडे आलों. त्या वेळीं नाटक ( म्ह. ' एकच प्याला ' हें नाटक ) लिहून पुरें करण्याविषयीं मीं तगादा लाविला. आतां नाटक लिहून पूर्ण झाल्याशिवाय बाहेर पडावयाचें नाहीं असा निश्चय त्यांनींहि जाहीर केला. लगेच लेखनाला सुरुवात झाली. गांठीभेटी बंद झाल्या. जवळजवळ पंधरा दिवस अशा अवस्थेत गेल. १५ नोव्हेंबर १९१७ ला ' एकच प्याल्या ' चें शेवटचें वाक्य त्यांनीं आपल्या हातीं तारीखवार लिहून सही केली. या वेळीं लेखकाचें काम मी केल्यामुळें त्यावेळीं होणाऱ्या हालचाली मला पाहतां आल्या."[७] ' एकच प्याला ' नाटक ५ नोव्हेंबर १९१७ रोजीं लिहून पूर्ण झालें असाच श्री. कोल्हटकर यांच्या विवेचनाचा अर्थ आहे.

आता ज्या १५ नोव्हेंबर १९१७ या तारखेचा कोल्हटकरांनी उल्लेख केला आहे, त्या तारखेस गडकऱ्यांनी कोणता प्रवेश कोल्हटकरांना ' डिक्टेट ' केला व तो कोल्हटकरांनी लिहून घेतला हें पाहावयाचें आहे. ' शेवटचा प्रवेश ', ' शेवटचें वाक्य ', ' गडकऱ्यांची सही व शिक्कामोर्तब ' इत्यादि गोष्टींचा कोल्हटकरांनी स्पष्ट उल्लेख केला आहे – नाटक ' पूर्ण ' झाल्याचाहि उल्लेख केला आहे.[८] म्हणून कोल्हटकरांच्या साक्षींतील प्रत्येक विधानाची सूक्ष्म छाननी करणें जरूर आहे. कोल्हटकरांची स्मरणशक्ती कितीहि तल्लख असली तरी तिने त्या वेळीं त्यांना दगा दिला आहे हें पुराव्यानिशीं सिद्ध करतों. पहिली गोष्ट म्हणजे १९१७ सालीं १५ नोव्हेंबर रोजीं लक्ष्मीपूजन नसून बलिप्रतिपदा ( कार्तिक शु. १ ) होती. पण गडकऱ्यांनी याच्या आदल्याच दिवशीं ( म्हणजे १४ नोव्हेंबर रोजीं– लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं ) दोन प्रवेश तोंडी सांगितले व ते कोल्हटकरांनी स्वतः लिहून घेतले हें सत्य आहे. तिसऱ्या अंकातील तिसरा व चवथा हे ते दोन प्रवेश होत. कोल्हटकरांचें म्हणणें असें की लक्ष्मीपूजनाच्या रात्रीं गडकऱ्यांनी ' एकच प्याल्यां-' तील ' शेवटचें वाक्य ' सांगितलें, कोल्हटकरांनी तें लिहून घेतलें, आणि ( नेहमीच्या पद्धतीप्रमाणें गडकऱ्यांनी त्यावर शिक्कामोर्तब केलें. कोल्हटकरांची स्मरणशक्ति येथें नक्की चकली आहे. तिसऱ्या अंकाचा शेवटच्या म्हणजे चवथ्या प्रवेशाची शेवटचीं काहीं वाक्यें गडकऱ्यांनी डिसेंबर महिन्याच्या १३ तारखेस पुणें मुक्कामीं रात्रीं १० वाजतां स्वतःच्या हाताने लिहिलीं आणि त्याच्याखालीं स्वतःची सही केली. खुद्द गडकऱ्यांनी अंक ३ व ४ च्या शेवटीं स्वहस्तें काय मजकूर लिहिला तो येथें जसाच्या तसा उद्धृत करतो।

सुधा– कितीही कां असेना ! पण सिंधूच्या देखत घेणार ! बस झाला तेवढा एकच प्याला ! [ पेला पिऊं लागतो. ]

[ पडदा पडतो. ]

अंक तिसरा समाप्त.

१३।१२।१३

रात्री १० वाजतां ( सही ) रा. ग. गडकरी

पुणें शहर.

आज रोजीं ' एकच प्याला ' हें नाटक लिहून संपूर्ण झालें.

" ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।

ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ "

इति श्रीमद् भगवद्गीतासू पनिषत्सु श्रीभगवान् ।

नाटक संपूर्ण झाल्यानंतर गडकरी स्वतःची सही करून ' ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः ' इ. श्लोक लिहीत असत. हाच त्यांचा शिक्कामोर्तब होय. नाटक पूर्ण झाल्याची ही बिनतोड निशाणी असते हें लक्षांत ठेवावयास हवें. अंक ३ प्र. ४ चा बराचसा भाग ( ' सुधा–सिंधू, अर्जुन–खोटी शपथ वाहिलीस तूं ! ' या वाक्यापर्यंत ) नाना कारखानीस (?) यांनी लिहून घेतला, आणि शेवटच्या दहा ओळी ( ' सकल जगाचा । सं. सुतीचा । ' इ. पद तेवढें वगळून ) स्वतः गडकऱ्यांनी लिहिल्या आहेत. म्हणजे शेवटच्या प्रवेशाच्या शेवटच्या ओळी आपण स्वतः लिहून घेतल्या व त्याखालीं गडकऱ्यांनी शिक्कामोर्तब केलें हें कोल्हटकरांचें विधान उघडउघड स्मृतिदोषामुळेंच निर्माण झालें आहे. किंवा नाटकाची शेवटची ओळ लिहिण्याचा मान आपणांस मिळाला असा दिमाख मिरविण्याचा सुप्त हेतु देखील असण्याचा संभव आहे.

कोल्हटकरांनी ' एकच प्याल्यां'तील एकूण पांच प्रवेश पेन्सिलीने लिहून घेतले. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणें–

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अंक | ४ | प्र. | ४. | ता. | ६ | नोव्हेंबर १९१७ |
| अंक | १ | प्र. | २. | ता. | ११ | नोव्हेंबर १९१७ |
| अंक | २ | प्र. | ३. | ता. | १३ | नोव्हेंबर १९१७ |
| अंक | ३ | प्र. | २. | ता. | १४ | नोव्हेंबर १९१७ |
| अंक | | प्र. | ३. | ता. | १४ | नोव्हेंबर १९१७ |

अंक ३ प्र. २ हा १४ तारखेला दुपारीं साडेचार वाजतां पुरा झाला. आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं साडेसात वाजतां अंक ३ प्र. ३ पुरा झाला.

६ ' बहुरूपी ', पृ ३०९.
७. ' बहुरूपी ', पृ ३१०
८ ' बहुरूपी ' पृ ३११.

फोन : ६०२७८

मुंबईतील अप्रतिम लॉजिंग ॲन्ड बोर्डींग

श्रीकृष्ण बोर्डींग हाऊस

हिंदु कॉलनी, पहिली गल्ली

दादर, मुंबई १४

अंक ५, प्र. १ हा 'भालचंद्र' (म्हणजे 'भालचंद्र' या टोपण नांवाने कविता लिहिणारे कवी श्री. टिपणीस) यांनी १ मे १९१७ रोजीं लिहून घेतला, आणि १३-१२-१७ रोजीं कारखानीसांनीं अंक ३ प्र. ४ लिहून घतला. गडकऱ्यांनीं ते प्रवेश 'डिक्टेट' केले त्यांचा हा असा तपशील आहे.

तिसऱ्या अंकाचा चवथा प्रवेश लिहून गडकऱ्यांनी 'एकच प्याला' हें नाटक संपूर्ण केलें, व तें ता. १३ डिसेंबर १९१७ रोजीं रात्रीं १० वाजतां, हें वरील विवेचनावरून सिद्ध झालें आहे. आतां इतर अंकांतील वेगवेगळे प्रवेश गडकऱ्यांनी कोणत्या क्रमानें व कोणत्या दिवशीं (आणि कोणत्या वेळीं) लिहिले तें अस्सल कागदपत्रांच्या आधाराने तपशीलवार देतों.

'एकच प्याल्या' चा **पांचवा अंक गडकऱ्यांनीं प्रथम लिहिला, आणि तिसरा अंक सर्वांत शेवटीं लिहिला.**

अंक ५ प्र. १. ता. १ मे १७. संध्याकाळीं ५. पुणें
अंक ५ प्र. २. ता. ७ मे १७.
अंक ५ प्र. ३. ता १० मे १७. सकाळीं ११।. पुणें
(अंक ५ प्र. ४. चें संपूर्ण हस्तलिखित मला मिळालें नाहीं. तथापि तें १० मे १४ मे या पांच दिवसांत केव्हां तरी तो लिहिलेला आहे)

---

अंक ४ प्र. १. ता १५ मे १७. संध्याकाळीं ५।. पुणें
अंक ४ प्र. २. ता. १६ मे १७. दुपारीं ११. पुणें
अंक ४ प्र. ३. ता. १२ जुलै १७ संध्याकाळीं. ९. पुणें
अंक ४ प्र. ४. ता. ६ नोव्हेंबर १७. रात्रीं ८।. पुणें.
अंक ४ प्र. ५. ता. ६ नोव्हेंबर १७. रात्रीं ११।. पुणें.

---

अंक १ प्र. १. ता. ८ नोव्हेंबर १७. रात्रीं १०. पुणें.
अंक १ प्र. २. ता. ११ नोव्हेंबर १७. दिवसा १२. पुणें.
अंक १ प्र. ३. ता. ११ नोव्हेंबर १७. दुपारीं १. पुणें.
अंक १ प्र. ४. ता. १२ नोव्हेंबर १७. दुपारीं १।. पुणें.
अंक १ प्र. ५. ता. १२ नोव्हेंबर १७. दुपारीं ३।. पुणें.

---

अंक २ प्र. १. ता. १२ नोव्हेंबर १७. रात्रीं ३।. पुणें.
अंक २ प्र. २. ता. १२ नोव्हेंबर १७. रात्रीं ५।. पुणें.
अंक २ प्र. ३. ता. १३ नोव्हेंबर १७. दुपारीं १२-४०.

---

अंक ३ प्र. १. ता. १४ नोव्हेंबर १७. दुपारीं ४. पुणें.
अंक ३ प्र. २. ता. १४ नोव्हेंबर १७ दुपारीं ४।. पुणें.
अंक ३ प्र. ३. ता. १४ नोव्हेंबर १७. संध्या. ७।. पुणें.
अंक ३ प्र. ४. ता. १३ डिसेंबर १७. रात्रीं १०. पुणें.

### वरील तक्त्याचा निष्कर्ष

पांचव्या अंकाचा पहिला प्रवेश गडकऱ्यांनी १ मे १९१७ रोजीं लिहिला. आणि तिसऱ्या अंकाचा चवथा प्रवेश १३ डिसेंबर १९१७ रोजीं लिहून गडकऱ्यांनी 'एकच प्याला' नाटक संपूर्ण केलें. म्हणजे एकूण सात महिने तेरा दिवस या नाटकाच्या लेखनासाठी लागले.

पांचवा अंक लिहिण्यास दहा दिवस लागले. चवथ्या अंकाचे पहिले दोन प्रवेश दोन दिवसांत पुरे झाले. नंतर जवळजवळ दोन महिने खंड पडला, आणि १२-७ रोजीं तिसरा प्रवेश लिहिला गेला. पुन्हां जवळजवळ चार महिन्यांचा खंड पडला. ६-११ रोजीं अंक ४ प्र. ४ आणि ५ असे दोन प्रवेश तयार झाले. सबंध पहिला अंक ८-११ ते १२-११ या पांचच दिवसांत गडकऱ्यांनी लिहिला. दुसरा अंक फक्त दोनच दिवसांत पुरा झाला. तिसऱ्या अंकाचे पहिले तीन प्रवेश एकाच दिवशीं (१४-११-१७) एकाच बैठकींत लिहिले गेले. यानंतर मात्र एक महिन्याचा पुन्हा मोठा खंड पडला. आणि १३-१२-१७ रोजीं अंक ३ प्र. ४ पूर्ण झाला. ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर या फक्त नऊ दिवसांमध्ये गडकऱ्यांनी सतत लेखन केलें आणि एकूण तेरा प्रवेश पुरे केले. (नाटकांत एकूण प्रवेश २१ आहेत. पृष्ठांच्या दृष्टीनें पाहिलें तर एकूण छापील १२८ पृष्ठांपैकीं ८१ पृष्ठें- म्ह. ६२ टक्के – गडकऱ्यांनी ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर या नऊ दिवसांत लिहिलीं.)

गडकऱ्यांनीं 'एकच प्याल्या' चें लेखन अंक ५-४-१-२-३ या

## मीलन-

घोंघावता वारा उफाळता सागर
सळसळत्या लाटांची पखरण किनाऱ्यावर
अशा वेळीं
अशा वेळीं दूर कोठें तरी...
नारळीच्या आगरांत पोफळींच्या बनांत
आंब्याच्या राईत घुमते आहे शीळ
जगाच्या व्यापाराला पडली आहे खीळ
पण प्रीतीला कसला काळ कसली वेळ
दोन जीवांचा आनंद हाच तीचा काळ
दोन जीवांचे मीलन हीच तीची वेळ
घुमल्या शीळेच्या लयींत मिळाली सादास साद
सळसळत्या लाटांच्या तालांत मिळाले हातांत हात
मीलन घडलें दो जीवांचे मिळाले श्वासांत श्वास

—कु. सरला खरे

: दीपावलि शुभचिंतन :
मनपसंत आणि खात्रीलायक कापडासाठीं
राजापूरांतील विश्वसनीय ठिकाण
★ जनता वस्त्र भांडार ★
बाजारपेठ, राजापूर, जि. रत्नागिरी


क्रमानें केलें. तिसऱ्या अंकाच्या शेवटीं १३-१२-१७ ही तारीख घालून व सही करून "आज रोजीं 'एकच प्याला' हें नाटक लिहून संपूर्ण झालें" असा शेरा गडकऱ्यांनी स्वतःच्या हाताने लिहिला आहे.

'एकच प्याल्या' चें हें सारें हस्तलिखित **पेन्सिलीनें** लिहिलेलें आहे. [ शाईने लिहिलेलें नाही. ] कागद फूलस्कॅप आकाराचा सर्वत्र असून प्रवेश संपल्याबरोबर लगेच गडकऱ्यांनी मोडीमध्ये - दर ठिकाणीं सही केली आहे व तारीखहि टाकलेली आहे. इतकेंच नाहीं तर प्रवेश ज्या कागदावर संपलेला असेल त्याच्या मागच्या बाजूला पुन्हा त्यांनी अंक व प्रवेश यांचा उल्लेख करून तारीख घातली आहे; आणि पुन्हा सही देखील केलेली आहे.

गडकऱ्यांची मूळ हस्तलिखितें अगदी नियमाने पेन्सिलीनेच लिहिलेलीं आहेत, आणि या मूळ हस्तलिखितांत प्रत्येक प्रवेशाच्या शेवटीं तारीख घालून सही करावयास ते सहसा विसरत नसत.

हें लक्षांत घेतलें असतां, सुखटणकरांना सापडलेल्या वहींत शाईनें एकटाकी लिहिलेला तीन अंकांचा जो मजकूर आहे तो मजकूर म्हणजे पेन्सिलीने लिहिलेल्या मूळ हस्तलिखितावरून केलेली नक्कल होय यांत तिळमात्र शंका उरत नाही. सदर वहींत एकूण ७७ पृष्ठें असून सर्व मजकूर शाईने लिहिलेला आहे. अंक ३ प्र. २ मधील रामलालच्या शेवटच्या भाषणांतील सुमारें तिसरा हिस्सा ("...दुसऱ्याच्या प्रयत्नाबद्दल अनादर त्यामुळें ही मुळाबरहुकूम शाईने केलेली नक्कल आहे हें निःसंदिग्धपणें सिद्ध करतां येतें.

सुखटणकरांची फसगत होण्याचें कारण असें की या वहीच्या पहिल्याच पानावर गडकऱ्यांनी पेन्सिलीने "एकच प्याला—एक सामाजिक नाटक—ले. राम गणेश गडकरी—प्रारंभ १८३६ वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया)—ता २८ एप्रिल १९१४—मु. पणजी—गोवा" असा मजकूर स्वहस्तें लिहिला आहे. या सर्व प्रकाराचा उलगडा सहज करतां येईल. पणजीच्या मुक्कामांत 'एकच प्याला' लिहिण्यास सुरुवात करावी असा विचार अकस्मात् गडकऱ्यांच्या मनांत बळावला व तात्कालिक ऊर्मीमध्यें त्यांनी हाताशीं असलली एक वही उचलली व उत्साहाने पहिल्या पानावर वरील मजकूर लिहिला. पण यानंतर तीन चार दिवसांतच गडकरी मालवणला गेलें. ६ मेपर्यंत ते मालवणीं राहिलें. पुन्हा पणजीस परत आले. आणि नंतर अवघ्या तेराच दिवसांनी मडगांवहून ते २० मे रोजीं पुण्याकडे गेलें. 'पुण्यप्रभावा'चें लेखन ठरल्याप्रमाणें पुरें झालें नाही म्हणूनच गडकऱ्यांना मुजुमदारांनी ॲडव्हान्स दिलेली रक्कम परत करण्याचा सारखा तगादा लावला होता. ही रक्कम गडकऱ्यांनी १ मे १९१४ रोजीं परत दिली अशी चिंतोपंत दिवेकरांच्या रोजनिशींत स्वच्छ नोंद आहे. पैशाच्या या कटकटीमुळें गडकऱ्यांना फारच मनस्ताप झाला असला पाहिजे हें उघड आहे आणि वरेरकरहि असेंच लिहितात.[९]



दाखविणें, देशहिताच्या बुद्धींतच स्पर्धा वाढवून एकमेकांना..." या वाक्यापाशीं या वहींतील मजकूर संपला आहे.) इतकाच भाग सदर वहींत आला आहे. अंक ३ प्र. ४, व पुढील सर्व प्रवेश दुसऱ्या एखाद्या वहींत असले पाहिजेत. शिवाय सुखटणकरांनी उल्लेखिलेल्या वहींत पहिलीं फक्त साडेतीन पानें मजकूर खुद्द गडकऱ्यांच्या हातचा आहे. बाकीचा सर्व मजकूर दुसऱ्या कोणीतरी लिहिलेला आहे. सबंध वहींत कोठेंहि प्रवेशाच्या शेवटीं गडकऱ्यांची सही नाहीं, कोठेंहि तारीख नाहीं.

असला तीव्र मनस्ताप झाला असतां अगोदर हातीं घेतलेलें 'पुण्यप्रभाव' नाटक पुरें करण्याचें सोडून 'एकच प्याला' हें नवीनच नाटक लिहिण्याचा विचार गडकऱ्यांच्या मनांत आलाच कसा हें एक कोडेंच आहे. पण जातिवंत कवीचा लहरीपणा!—एवढेंच म्हणून समाधान करून घेतलें पाहिजें. वहीच्या पहिल्या पानावर 'प्रारंभ'

(९) 'माझा नाटकी संसार', खंड दुसरा, पृ. १५३–१५६ पाहावीं.

## "आठवणीं"

तुझे लाघवी बोलणें,
तुझें आर्जवी वागणें,
माझें मन मोहवाया-
पुरे सजणा एवढें ॥ १ ॥

तुझें भव्यसे कपोल,
आणि बोलके नयन,
गौर अंगकांतींतून-
दिसे मदन खुलून ॥ २ ॥

हास्य चंद्रम्याचे तुझे,
जणू ओघळावे सर,
प्रेम अडकून पडे-
अवखळ खळींवर ॥ ३ ॥

बोलतोसी मधू वाणी-
जणू स्रवते कौमूदी,
वाटे असेच रहावें-
तुझें जवळीं, जवळीं ॥ ४ ॥

भाव मुग्ध मनांतले-
ओठीं राहती दडोनी-
औपचारीक भेटींच्या
रेंगाळती आठवणीं ॥ ५ ॥

—दि. वि. नातू

असें लिहून ठेवून गडकऱ्यांनीं सदर वही बाजूला ठेऊन दिली आणि साडेतीन वर्षांनंतर 'एकच प्याल्या'चें हें हस्तलिखित पूर्ण झाल्यावर पेन्सिलीने लिहिलेल्या-मूळ हस्तलिखिताची शाईने नक्कल त्याच वहींत उतरविण्यांत आली—हाच या वहींतील प्रास्ताविकाचा अन्वयार्थ आहे.

"'एकच प्याला' नाटकाचा लेखनकाल १९१६-१७ साल असें गृहीत धरून त्या आधारें गडकऱ्यांच्या नाटकांच्या क्रमवारीचा टीकाकारांनीं बनवलेला ठोकताळा व त्याला धरून गडकऱ्यांच्या लेखनकलेच्या विकासाचे व त्यांच्या भावजीवनासंबंधींचे त्यांनीं बसाविलेले आडाखे, हीं आतां या नवीन उपलब्ध झालेल्या माहितीमुळें डळमळींत झालीं आहेत व त्यांचा फेरविचार करणें भाग आहे-" असा टीकाकारांना सुखटणकरांनी बहुत कृपाळू होऊन जो इषारा दिलेला आहे त्या इषाऱ्याचाच फेरविचार त्यांना आता करावा लागेल !

'एकच प्याल्या'च्या लेखनकालाची चर्चा करण्याच्या निमित्ताने 'गर्वनिर्वाण', 'प्रेमसंन्यास' आणि 'पुण्यप्रभाव' या नाटकांच्या लेखनकालाची चर्चा अस्सल पुराव्याच्या आधाराने याच लेखांत करावयाचा प्रथम विचार होता. पण सदर लेख फार लांबल्यामुळे ही चर्चा पुन्हां केव्हांतरी करण्याचें आश्वासन देण्याशिवाय आणखी कांही तूर्त तरी मी करूं शकत नाही.

★ ★


वामन हरी पेठे
मुख्य दुकान
पेठे बिल्डिंग
गिरगांव रोड, ठाकुरद्वार नाका,
मुंबई ४
★ ★ ★
× दादर शाखा ×
६९, पोर्तुगीज चर्च स्ट्रीट
दादर, मुंबई २८
● ● ● ●
हिरे ● मोती ● चांदी
खात्रीच्या सोन्याचे व चांदीचे सर्व प्रकारच्या
वस्तूंचा भरपूर माल तयार असतो.
बाहेरगांवी व्ही. पी. ने पाठविला जातो.

★ School and College Books in English, Kannada, Hindi and other Languages.
★ Mill Cloth for your Shirting and Coating of Buckingham and Carnatic Mills.
★ Renowned Tailoring Department.
★ Best Photographers.
All these can be had at one place
A 1 TRADERS
Near Ruia College
Matunga, Bombay 19.

रजिस्टर्ड REGISTERED TRADE MARK ट्रेडमार्क
सर्व सुगंधी कारखानदारांना लागणारा कच्चा माल, एसेन्शियल ऑईल्स, ॲरोमॅटिक केमिकल्स, रेझिनॉइड्स्, इ. हिंदुस्थानांत प्रथमच तयार करणारे कारखानदार
एस. एच. केळकर आणि कं. प्रायव्हेट लि.
आमचे प्रख्यात व उच्च प्रतीचे 'नाग छाप' सुगंधी अर्क सौंदर्यप्रसाधनांत सर्वत्र वापरले जातात.
पत्ता —३६, मंगलदास रोड, मुंबई नं. २

संगीत ही दैवी कला आहे. संगीत मोक्ष देणारी कला आहे. संगीत म्हणजे मानवांचे पंख. हे पंख लावून मनुष्य मोक्षाचे द्वार गांठतो. संगीतांत हे कोठून आलें सामर्थ्य ? पाखरांचा कलरव ऐका, नदीची गुणगुण ऐका, पानांचा मर्मरध्वनि ऐका. मनावर एक प्रकारचा प्रसन्न परिणाम होत असतो. संगीत म्हणजे संगम व सहकार्य. संगीत म्हणजे विरोधाचा अस्त. आपल्या जीवनाचा संगीताशी संबंध आहे, कोणत्याही कलेने मनुष्य मुग्ध कां होतो ? कला म्हणजे सत्य, शिव व सुंदर यांचे सम्मेलन. संगीत कलेंत आपल्या जीवनाचा आदर्श मिळतो.

# स्थिराचराला लुब्ध करणारी कला

—मा. मनहर बरवे

# सं
# संगीत
# त

विश्वकर्मा हा एक सर्वश्रेष्ठ कलावंत होता. यानें आपल्या कुंचल्यांतून या रंगीबेरंगी जगाचें अप्रतिम चित्र रेखाटलें. त्यांत मानव–प्राणी निर्माण केला. मानवाच्या या चित्रांत त्यानें प्राण फुंकला व ते सजीव केले.

मानव आणि विश्व या दोन विश्वकर्माच्या श्रेष्ठ कलाकृति पण मानवप्राण्याला मिळालेल्या बुद्धिच्या देणगीच्या जोरावर मानवानें या जगांत आपणाला हव्या त्या सोयी निर्माण केल्या. हवी असलेलीं सुखें हस्तगत केलीं. जीवन सुसह्य व्हावें म्हणून अनेक कला त्यानें शोधून काढल्या.

मानवी मनाला रिझविणाऱ्या अनेक कला आहेत. चित्रकला आहे, शिल्पकला आहे, नृत्य-कला आहे. पण या कला विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट व्यक्तिंनाच सुखवितात. पण गानकलेचें तसें नाहीं. ती साक्षर निरक्षरांना, लहानथोरांना पशुपक्षांना सजीव–निर्जीव सृष्टीला –सर्वांना तोषविते.

संगीत कला फार प्राचीन कालापासून अधिकाधिक प्रकट होत आली आहे. देव-देवतांनीं या कलेची आराधना केली. उलट देव तर या कलेंत पार डुंबुन गेले होते. स्वर्गाच्या साम्राज्यांत संगीत, नृत्य व सूरापान या खेरीज देवांना दुसरा उद्योग ठाऊक नव्हता. अशा या कलेचें वेड सर्व थरांतील माणसांना सारखेंच होते. पराक्रमी पुरुष विसाव्याला आले म्हणजे त्यांचें संगीत कलाच त्यांचें मनोरंजन करी. संत तुकाराम-मीराबाईसारख्या संतांनीं आपल्या आध्यात्मिक भावना बहुजन समाजापुढें मांडल्या त्यादेखील या आमच्या संगीत कलेच्या माध्यमानेंच.

आधीं संगीत जन्माला आलें अन् मग या संगीताचें शास्त्र झालें. जसजशी संगीतकलेला शास्त्राची बैठक लाभूं लागली, तसतशी ती कला अधिकाधिक सुबक, नीटस, प्रगतिशील होत गेली. अनेक ऋषिमहर्षिंनी या कलेच्या अभ्यासांत आपलीं उभी आयुष्यें वेचलीं, खडतर कष्ट उपसले, हयातभर साधना केली अन् ही फक्त अधिकाधिक बाळसेदार व चिरंतन होत जावी म्हणून शिष्यपरंपरा तयार केली.

गान–कला कुणालाहि लुब्ध करते श्रीकृष्णाच्या मुरलींतून निघणारे सुस्वर, गायी–बैलांना, तरुलतांना, साऱ्या गोकुळाला वेड लावीत. तानसेनाच्या संगीतांत विझलेले दिवे पुनः पेटाविण्याचें व चेतविण्याचें सामर्थ्य होते. या कलेच्या अंगीं अनेक चमत्कार भरलेले आहेत. तज्ज्ञांनीं विशिष्ट कालमानांत गावयाच्या सुरावलींत विशिष्ट राग भरलेले आहेत. ही संगति साधून गुंफले जाणारे गीत मेघांनाहि बरसात करायला लावते, झाडांनाहि डोलायला लावते, अग्निलाहि चेतविते. गारूड्याची पुंगीने सुरावर साधलीं कीं, नागहि डोलतो. संगीतानें पाणी आपली पातळी विसरते.

अलिकडच्या काळांत मुसलमानी गायकांनी ही कला विशेष जपली. संगीताची अहोरात्र अखंड सेवा करून त्यांच्यापैकीं कांहींनीं संगीता-बरोबरच स्वतःलाहि अजरामर करून ठेवलें आहे.

संगीत केवळ कंठांतूनच उतरत नसतें. कांहीं वाद्यांतूनहि तें निर्माण केलें जातें. आपल्या भारतांत बांसरी, मृदंग, सनई, तुतारी अशी कांहीं वाद्यें फारच पूर्वीं शोधलीं गेलीं. पाश्चात्य देशांतहि विविध वाद्यें मानवी गोड गळ्याला साथ करीत असतात.

पाश्चात्य संगीतापेक्षां भारतीय संगीत अधिक शास्त्रशुद्ध व टिकावू आहे.

संगीत कलेनें आज सारें जग व्यापून टाकलें आहे. आपणाभोवतालींच संगीताच्या विविध धारा सतत स्त्रवत असतात. शाळा-कॉलेजांतून म्हटलीं जाणारीं प्रार्थना गीतें, रेडिओवरून स्त्रवणाऱ्या कर्णमधुर स्वरलहरी, हॉटेलांत, दुकानांत, घरीं-दारीं–सर्वत्र सर्वचजण या कलेचा आस्वाद घेत असतात.

मानवानें आपल्या सुखासाठीं शोधून काढलेल्या व विशेष आपुलकीनें जोपासलेल्या या श्रेष्ठ कलेला तिचा एक भक्त या नात्यानें माझें अनंत प्रणाम !

★

—लोकांच्या प्रश्नांचा जीवनांत सर्वस्पर्शी बनेल अशा फळीची नितांत आवश्यकता आहे. आजची ही गरज भागवील अशी लोकशाही समाजवादी फळी निर्माण करणें हें आजचें राजकारण बनलें पाहिजे. सुखाचे दिवस नकोत. दिवसांत थोडे सुख मिळालें पाहिजे. जरूर पडल्यास प्र. स. पक्ष विसर्जन करून लोकशाही समाजवाद जीवनांत प्रत्यक्ष येण्यासाठीं सारसर्वस्व अर्पून आमच्या पक्षानें निरंजन बनावें अशी माझी इच्छा आहे.

# आमचें-राजकारण. ★ —भाऊ जमेनीस.

आमचें राजकारण, आमच्या संघटणा, आमचे पक्ष व आमचा आजचा हिंदुस्थान याविषयीं जेव्हां माझ्यासारखा सामान्य माणूस विचार करतो, तेव्हां विचार आणि चिंतन शक्ती क्षीण करून सुद्धां आजच्या आमच्या मुख्य प्रश्नाचें उत्तर सांपडणें कठीण होऊं लागलें आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून उणी पुरीं १३।१४ वर्षें होत आलीं. १४ वर्षांचा रामाचा वनवास संपून राम परत अयोध्यानगरींत परतल्याचें रामायणांत समजतें. परंतु १३।१४ वर्षांच्या आमच्या प्रवासीय कालखंडानंतर आम्हीं कोठें परतलों, कोठें थांबलों व कोठें गेलों इतकेंच काय पण आमचें काय चांगलें आहे— याचा मागमूस आजच्या सामान्य माणसाला हातीं लागत नाहीं. राजकीय किंवा सामाजिक तसेंच खाजगी जीवनांत माणूस पुढें जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु तसें त्याला न जमलें तर मागें होता तेथें तरी तो येतो. आज आमची अवस्था प्रवासांत असून मुक्कामाची नाहीं किंवा पुढें जाऊन मागें परतण्याची सुद्धां नाहीं. यामुळें आम्हीं गतीला प्रगती समजलों काय ? किंवा प्रगतीचें प्रयत्न फोल ठरलें काय ? याचा विचार एक हिंदुस्थानीं ( राजकीय परी भाषेंत हिंदी ) म्हणून निःपक्ष किंवा निरपेक्ष असा न्यायनिष्ठूरपणें झाला पाहिजे.

आजच्या राजकीय पक्षांचें मूळ भांडवल जनता आहे. त्यामुळें सर्व पक्षांमध्यें जनतेला ग्रहीत धरलें आहे. वास्तविक हें उलटें शाकुंतल आहे. पक्षांनीं जनता मानण्यापेक्षां जनतेनें पक्ष ठरविले हा एक मानवी उर्जितावस्थेचा पहिला मार्ग आहे. आजची जनता सर्व पक्षांमध्यें विखरून गेलेली आहे हिंदुस्थानामधल्या हरएक पक्षाचें ध्येय समाजवाद हें आहे. कॉंग्रेसचा समाजवाद, समाजवाद्यांचा समाजवाद, प्रजासमाजवाद्यांचा समाजवाद, कम्युनिस्टांचा समाजवाद व परवांच कळलें कीं हिंदु महासभेचा सुद्धां हिंदुसमाजवाद म्हणून समाजवाद आहे. आतां खरा समाजवाद काय हाच प्रश्न येऊन पडला आहे. सर्व पक्षांचें धोरण जर या देशांत समाजवाद आणण्याचें आहे, तर मग आतां हें हरएक पक्ष प्रत्येक पक्षाहून भिन्न भिन्न कां राहतात ? आमच्या मतें समाजवाद या लोकप्रिय शब्दप्रयोगाखालीं प्रत्येक पक्षाला आपल्या हातीं सत्ता पाहिजे मिळून सत्तास्पर्धा हा प्रत्येक पक्षाचा खरा मनसुबा. परंतु जनतेत आवड निर्माण झालेल्या "**समाजवाद**" या घोष वाक्याच्या अनुरोधानें पदरांत सत्तेचें फळ घेणें हा या पक्षांचा खरा समाजवाद आहे असें दिसून येतें.

कामगार संघटणा, समाजवादी व्यवस्थेसाठीं. कामगाराला आर्थिक लभ्यांश करून देण्याच्या आमिषानें आपल्या पक्ष झेंड्याखालीं कामगाराला आणणें हा या कामगार संघटणेचा समाजवाद आहे.

शेतकरी संघटना, समाजवादी व्यवस्थेसाठीं. शेतकऱ्याला आर्थिक तसाच जमिनविषयक लभ्यांश करून देण्याच्या आमिषानें आपल्या पक्ष झेंड्याखालीं शेतकऱ्याला आणणें हा या शेतकरी संघटनेचा समाजवाद आहे.

कारकून, शिक्षक, व निरनिराळ्या पेशाचें लोक एका आपल्या पक्ष निशाणाखालीं आणण्यासाठीं हा या पक्षांच्या किरकोळ लोकांचा किरकोळ समाजवाद आहे.

या देशाच्या राजकीय आणि सामाजिक नियोजनासाठीं, समानतेसाठीं— मग ती आर्थिक, राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक असो या सर्वांसाठीं समाजवाद आहे. कारण समाजवाद हें एक मानवीमूल्य आहे. मग तें कामगार शेतकऱ्याला निराळ्या पक्षांना निराळें व इतरांना निराळें असें निराळेंपण ज्यांत नसतें तोच मुळीं समाजवाद. मग हीं समाजवादाची दुकानें कां ? सत्तास्पर्धा हा बहुतांशीं सर्व पक्षांचा मूळ हेतु आहे. आणि सत्तास्पर्धा राजकारणांत आजचे भारतीयपक्ष गुंग झालेले आहेत. आणि जोंपर्यंत या पक्षांना सत्तेचे आसन मिळणार नाहीं तोपर्यंत आजचा जो सामान्य माणुस आणि ज्यानें या देशासाठीं सामान्य राहाणेंच उचीत आहे त्या सामान्य माणसाचा पत्ता या पक्षांत सांपडणें दुरापास्त आहे. शासनव्यवस्था सुनियंत्रिताला चालण्या साठींच फक्त सत्ता आहे. सत्ता सारसर्वस्व नव्हे. इतकेंच काय पण या १३।१४ वर्षांच्या

पान ३२ वर

## स्फुरत नसे

स्फुरत नसे अंतरांत आज दिव्य कांहीं
एकाकीपण उदास व्यापुन मनिं राही
अडखळते पाउलांत वाट ही कधींची
श्रमलेल्या जीवा नच स्वस्थता घडीची
अश्रूही लोचनिंचे सुकुन चाललेलें
आणि प्रतीक्षेत खुळ्या क्षितिज हरवलेलें
करित उभा हालचाल वृक्ष तरि पर्णांची
या झुळुकींतून उठे कधीं वादळ वीचि ?

—प्रा. सूर्यकांत खाण्डेकर

संगीत ही दैवी कला आहे. संगीत मोक्ष देणारी कला आहे. संगीत म्हणजे मानवांचे पंख. हे पंख लावून मनुष्य मोक्षाचे द्वार गांठतो. संगीतांत हे कोठून आलें सामर्थ्य ? पाखरांचा कलरव ऐका, नदीची गुणगुण ऐका, पानांचा मर्मरध्वनि ऐका. मनावर एक प्रकारचा प्रसन्न परिणाम होत असतो. संगीत म्हणजे संगम व सहकार्य. संगीत म्हणजे विरोधाचा अस्त. आपल्या जीवनाचा संगीताशी संबंध आहे. कोणत्याही कलेने मनुष्य मुग्ध कां होतो ? कला म्हणजे सत्य, शिव व सुंदर यांचे सम्मेलन. संगीत कलेंत आपल्या जीवनाचा आदर्श मिळतो.

# स्थिराचराला लुब्ध करणारी कला

—मा. मनहर बरवे

सं
सं गी त
त

विश्वकर्मा हा एक सर्वश्रेष्ठ कलावंत होता. यानें आपल्या कुंचल्यांतून या रंगीबेरंगी जगाचें अप्रतिम चित्र रेखाटलें. त्यांत मानव–प्राणी निर्माण केला. मानवाच्या या चित्रांत त्यानें प्राण फुंकला व ते सजीव केले.

मानव आणि विश्व या दोन विश्वकर्मांच्या श्रेष्ठ कलाकृति पण मानवप्राण्याला मिळालेल्या बुद्धिच्या देणगीच्या जोरावर मानवानें या जगांत आपणाला हव्या त्या सोयी निर्माण केल्या. हवी असलेलीं सुखें हस्तगत केलीं. जीवन सुसह्य व्हावें म्हणुन अनेक कला त्यानें शोधून काढल्या.

मानवी मनाला रिझविणाऱ्या अनेक कला आहेत. चित्रकला आहे, शिल्पकला आहे, नृत्यकला आहे. पण या कला विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट व्यक्तिंनाच सुखवितात. पण गानकलेचें तसें नाहीं. ती साक्षर निरक्षरांना, लहानथोरांना पशुपक्षांना सजीव–निर्जीव सृष्टीला –सर्वांना तोषविते.

संगीत कला फार प्राचीन कालापासून अधिकाधिक प्रकट होत आली आहे. देव-देवतांनीं या कलेची आराधना केली. उलट देव तर या कलेंत पार डुंबुन गेले होते. स्वर्गाच्या साम्राज्यांत संगीत, नृत्य व सूरापान या खेरीज देवांना दुसरा उद्योग ठाऊक नव्हता. अशा या कलेचें वेड सर्व थरांतील माणसांना सारखेंच होते. पराक्रमी पुरुष विसाव्याला आले म्हणजे ही संगीत कलाच त्यांचें मनोरंजन करी. संत तुकाराम-मीराबाईसारख्या संतांनीं आपल्या आध्यात्मिक भावना बहुजन समाजापुढें मांडल्या त्यादेखील या आमच्या संगीत कलेच्या माध्यमानेंच.

आधीं संगीत जन्माला आलें अन् मग या संगीताचें शास्त्र झालें. जसजशी संगीतकलेला शास्त्राची बैठक लाभूं लागली, तसतशी ती कला अधिकाधिक सुबक, नीटस, प्रगतिशील होत गेली. अनेक ऋषिमहर्षिंनी या कलेच्या अभ्यासांत आपलीं उभी आयुष्यें वेचलीं, खडतर कष्ट उपसले, हयातभर साधना केली अन् ही फक्त अधिकाधिक बाळसेदार व चिरंतन होत जावी म्हणून शिष्यपरंपरा तयार केली.

गान–कला कुणालाहि लुब्ध करते— श्रीकृष्णाच्या मुरलींतून निघणारे सुस्वर, गायी—वैलांना, तरुलतांना, साऱ्या गोकुळाला वेड लावीत. तानसेनाच्या संगीतांत विझलेले दिवे पुनः पेटविण्याचें व चेतविण्याचें सामर्थ्य होते या कलेच्या अंगीं अनेक चमत्कार भरलेले आहेत. तज्ज्ञांनीं विशिष्ठ कालमानांत गावयाच्या सुरावलींत विशिष्ठ राग भरलेले आहेत. हे संगति साधून गुंफले जाणारे गीत मेघांना बरसात करायला लावते, झाडांनाहि डोलायला लावते, अग्निलाहि चेतविते. गारुड्याची पुंगीने सुरावर साधलीं कीं, नागहि डोलतो. संगीतानें पाणी आपली पातळी विसरते.

अलिकडच्या काळांत मुसलमानी गायकांनी ही कला विशेष जपली. संगीताची अहोरात्र अखंड सेवा करून त्यांच्यापैकीं कांहींनीं संगीता-बरोबरच स्वतःलाहि अजरामर करून ठेवलें आहे.

संगीत केवळ कंठांतूनच उतरत नसतें. कांहीं वाद्यांतूनहि तें निर्माण केलें जातें. आपल्या भारतांत बांसरी, मृदंग, सनई, तुतारी अशी कांहीं वाद्यें फारच पूर्वीं शोधलीं गेलीं. पाश्चात्य देशांतहि विविध वाद्यें मानवी गोड गळ्याला साथ करीत असतात.

पाश्चात्य संगीतापेक्षां भारतीय संगीत अधिक शास्त्रशुद्ध व टिकावूं आहे.

संगीत कलेनें आज सारें जग व्यापून टाकलें आहे. आपणाभोवतालींच संगीताच्या विविध धारा सतत स्रवत असतात. शाळा-कॉलेजांतून म्हटलीं जाणारीं प्रार्थना गीतें, रेडिओवरून स्रवणाऱ्या कर्णमधुर स्वरलहरी, हॉटेलांत, दुकानांत, घरीं-दारीं–सर्वत्र सर्वचजण या कलेचा आस्वाद घेत असतात.

मानवानें आपल्या सुखासाठीं शोधून काढलेल्या व विशेष आपुलकीनें जोपासलेल्या या श्रेष्ठ कलेला तिचा एक भक्त या नात्यानें माझे अनंत प्रणाम !

★

—लोकांच्या प्रश्नांचा जीवनांत सर्वस्पर्शी बनेल अशा फळीची नितांत आवश्यकता आहे. आजची ही गरज भागवील अशी लोकशाही समाजवादी फळी निर्माण करणें हें आजचें राजकारण बनलें पाहिजे. सुखाचे दिवस नकोत. दिवसांत थोडे सुख मिळालें पाहिजे. जरूर पडल्यास प्र. स. पक्ष विसर्जन करून लोकशाही समाजवाद जीवनांत प्रत्यक्ष येण्यासाठीं सारसर्वस्व अर्पून आमच्या पक्षानें निरंजन बनावें अशी माझी इच्छा आहे.

# आमचें-राजकारण.

★

—भाऊ जमेनीस.

आमचें राजकारण, आमच्या संघटणा, आमचे पक्ष व आमचा आजचा हिंदुस्थान याविषयीं जेव्हां माझ्यासारखा सामान्य माणूस विचार करतो, तेव्हां विचार आणि चिंतन शक्ती क्षीण करून सुद्धां आजच्या आमच्या मुख्य प्रश्नाचें उत्तर सांपडणें कठीण होऊं लागलें आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून उणी पुरीं १३।१४ वर्षें होत आलीं. १४ वर्षांचा रामाचा वनवास संपून राम परत अयोध्यानगरींत परतल्याचें रामायणांत समजतें. परंतु १३।१४ वर्षांच्या आमच्या प्रवासीय कालखंडानंतर आम्हीं कोठें परतलों, कोठें थांबलों व कोठें गेलों इतकेंच काय पण आमचें काय चांगलें आहे– याचा मागमूस आजच्या सामान्य माणसाला हातीं लागत नाहीं. राजकीय किंवा सामाजिक तसेंच खाजगी जीवनांत माणूस पुढें जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु तसें त्याला न जमलें तर मागें होता तेथें तरी तो येतो. आज आमची अवस्था प्रवासांत असून मुक्कामाची नाहीं किंवा पुढें जाऊन मागें परतण्याची सुद्धां नाहीं. यामुळें आम्हीं गतीला प्रगती समजलों काय ? किंवा प्रगतीचें प्रयत्न फोल ठरलें काय ? याचा विचार एक हिंदुस्थानीं (राजकीय परीं भाषेंत हिंदी) म्हणून निःपक्ष किंवा निरपेक्ष असा न्यायनिष्ठूरपणें झाला पाहिजे.

आजच्या राजकीय पक्षांचें मूळ भांडवल जनता आहे. त्यामुळें सर्व पक्षांमध्यें जनतेला ग्रहीत धरलें आहे. वास्तविक हें उलटें शाकुंतल आहे. पक्षांनीं जनता मानण्यापेक्षां जनतेनें पक्ष ठरविले हा एक मानवी उर्जितावस्थेचा पहिला मार्ग आहे. आजची जनता सर्व पक्षांमध्यें विखरून गेलेली आहे. हिंदुस्थानामधल्या हरएक पक्षाचें ध्येय समाजवाद हें आहे. कॉंग्रेसचा समाजवाद, समाजवाद्यांचा समाजवाद, प्रजासमाजवाद्यांचा समाजवाद, कम्युनिस्टांचा समाजवाद व परवांच कळलें कीं हिंदु महा सभेचा सुद्धां हिंदुसमाजवाद म्हणून समाजवाद आहे. आतां खरा समाजवाद काय हाच प्रश्न येऊन पडला आहे. सर्व पक्षांचें धोरण जर या देशांत समाजवाद आणण्याचें आहे, तर मग आतां हें हरएक पक्ष प्रत्येक पक्षाहून भिन्न भिन्न कां राहतात ? आमच्या मतें समाजवाद या लोकप्रिय शब्द-प्रयोगाखालीं प्रत्येक पक्षाला आपल्या हातीं सत्ता पाहिजे मिळून सत्तास्पर्धा हा प्रत्येक पक्षाचा खरा मनसुबा. परंतु जनतेत आवड निर्माण झालेल्या "**समाजवाद**" या घोष वाक्याच्या अनुरोधानें पदरांत सत्तेचें फळ घेणें हा या पक्षांचा खरा समाजवाद आहे असें दिसून येतें.

कामगार संघटणा, समाजवादी व्यवस्थेसाठीं. कामगाराला आर्थिक लभ्यांश करून देण्याच्या आमिषानें आपल्या पक्ष झेंड्याखालीं कामगाराला आणणें हा या कामगार संघटणेंचा समाजवाद आहे.

शेतकरी संघटना, समाजवादी व्यवस्थेसाठीं. शेतकऱ्याला आर्थिक तसाच जमिनविषयक लभ्यांश करून देण्याच्या आमिषानें आपल्या पक्ष झेंड्याखालीं शेतकऱ्याला आणणें हा या शेतकरी संघटनेचा समाजवाद आहे.

कारकून, शिक्षक, व निरनिराळ्या पेशाचें लोक एका आपल्या पक्ष निशाणाखालीं आणण्यासाठीं हा या पक्षांच्या किरकोळ लोकांचा किरकोळ समाजवाद आहे.

या देशाच्या राजकीय आणि सामाजिक नियोजनासाठीं, समानतेसाठीं– मग ती आर्थिक, राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक असो या सर्वांसाठीं समाजवाद आहे. कारण समाजवाद हें एक मानवीमूल्य आहे. मग तें कामगार शेतकऱ्याला निराळ्या पक्षांना निराळें व इतरांना निराळें असें निराळेंपण ज्यांत नसतें तोच मुळीं समाजवाद. मग हीं समाजवादाची दुकानें कां ? सत्तास्पर्धा हा बहुतांशीं सर्व पक्षांचा मूळ हेतु आहे. आणि सत्तास्पर्धा राजकारणांत आजचे भारतीयपक्ष गुंग झालेले आहेत. आणि जोंपर्यंत या पक्षांना सत्तेचें आसन मिळणार नाहीं तोपर्यंत आजचा जो सामान्य माणूस आणि ज्यानें या देशासाठीं सामान्य राहाणेंच उचीत आहे त्या सामान्य माणसाचा पत्ता या पक्षांत सांपडणें दुरापास्त आहे. शासनव्यवस्था सुनियंत्रिताला चालण्यासाठींच फक्त सत्ता आहे. सत्ता सारसर्वस्व नव्हे. इतकेंच काय पण या १३।१४ वर्षांच्या

पान ३२ वर

## स्फुरत नसे

स्फुरत नसे अंतरांत आज दिव्य कांहीं
एकाकीपण उदास व्यापुन मनिं राही
अडखळते पाउलांत वाट ही कधींची
श्रमलेल्या जीवा नच स्वस्थता घडीची
अश्रूही लोचनिचे सुकुन चाललेले
आणि प्रतीक्षेत खुळ्या क्षितिज हरवलेलें
करित उभा हालचाल वृक्ष तरि पर्णांची
या झुळुकींतून उठे कधीं वादळ वीचि ?

—प्रा. सूर्यकांत खाण्डेकर

समस्या— समस्या— समस्या !

भारतापुढें वाढत्या लोकसंख्येची समस्या आहे म्हणून भारताने ' बर्थ कंट्रोल ' चा आदेश स्विकारला आहे.

—आणि आमच्या कुटुंबापुढील एक कटकटीची समस्या सोडविण्याकरीतां आम्हीं ' गर्थ कंट्रोल ' चा आदेश अंगिकारला — काय म्हणतां ? ' गर्थ कंट्रोल ' ही भानगड अपरिचित आहे तुम्हाला ? भले शाब्बास ! अहो, केवढी गमतीदार आहे ती हकीकत.

ऐकायची तुम्हाला ती हकीकत ? बसा तर मग माझ्याभोवती कोंडाळे करून. मी ती सारी कथाच सांगतो तुम्हाला.

त्याचं असं झालं—

# —गर्थ कंट्रोल—

**पद्माकर डावरे**

—आणि अखेर एकदांचं माझं लग्न झालं. मुली पहायला सुरुवात केल्यापासून तो प्रत्यक्षांत जिच्या गळ्यांत माळ घातली, त्या कु. मोहिनी मादागास्करपर्यंत अस्मादिकांनीं एकंदर अडुसष्ठ मुली पाहिल्या ( खरं म्हणजे साडे सदुसष्ठ म्हणावं लागेल-कारण सदुभाऊ गंडेरीकरांची मुलगी मला आमच्या मामांनीं मुंबईला लोकलमध्यें दाखवली. खूप गर्दी असल्यामुळें मला तिचा फक्त अर्धा भागच पहायला मिळाला. पण मी जें कांहीं अर्धवट पाहिलं तेवढ्यांतच तिच्या पुर्‍या (!) रूपाची कल्पना आली. तेव्हां हें अर्धवट प्रकरण जमेस धरता एकंदर साडेसदुसष्ट हीच संख्या अधिक बरोबर ! )

इतक्या मुली पहाण्याची आवश्यकता मला कां वाटावी याचं त्यावेळीं अनेकांना नवल वाटलं. अनेक लोकांना माझ्या चिकित्सकपणाचा फार राग आला ( " रक्खाय मेलं ! आतां कां एखादी रंभाउर्वशीं हवीय, कां हॉलीवूडची एखादी नटी हवीय कुणास ठाऊक ! असला चोखंदळपणा नव्हता पाहिला हो कुठें ! "— आमच्या शेजारच्या मथुराकाकी )

—पण आतां खरं सांगायचं म्हणजे मी पाहिलेल्या बहुतेक मुली तशा कांहीं फारशा वाईट नव्हत्या. त्यांच्यांत दोष काढायला फारशीं जागा नव्हती. दोष होता तो आमच्यांतच !

आमची शरीरयष्टी हीं लहानपणापासून ' यष्टी ' च्या स्वरुपांतच राहिली होती. पुढें त्यांत वयमानपरत्वें उंचीची भर पडत गेली, पण जाडीच कांहीं जमेना ( " कार्टं-शिचं आंग सदा भरवतंय-पण अंगानं कांहीं भरत नाहीं " -हे आमच्या पितृदेवाचे आमच्याबद्दलचे प्रेमळ उद्गार ! ) माझे मामा तर एकदां वैतागानें मला म्हणाले " मन्या, लेका धुणं वाळत घालायची कांठीसुद्धां तुझ्या शेजारी लठ्ठ वाटते रे ! एखाद्या खिडकीचा गज तुटला तर तुला तिथं उभं करायला कांहींही हरकत नाहीं. "

तेव्हा अशा ऐकंदर आमच्या प्रकृतीस साजेशीं मुलगी निवडणं हें कांहीं सोपं काम नव्हतं. कोणतीहि मुलगी माझ्या मानानं लठ्ठच वाटायची ( किंवा खरं म्हणजे मी तिच्या मानानं अगदीं किरकोळ वाटायचा ! ) त्यामुळें नाईलाजानें मुलींना नकार देऊन त्यांनाच आपण ' नापसंत ' केलं असं सांगण्याचा शहाजोगपणा करण्याखेरीज मला दुसरा ' तरुणोपाय ' नव्हता.

आतां हा असा प्रकार किती दिवस चालायचा या काळजीनं मी दिवसेंदिवस अधिकाधिक रोडावत चाललों. या जन्मीं आपल्या कुंडलीत लग्नाचा योग नाहीं कीं काय या विचारानं मला रात्रंदिवस झोप येईना ( पूर्वी दिवसासुद्धा यायची ! ) माझं जेवण कमी होत चाललं. पूर्वी दोन्ही वेळ मिळून चतकोर पोळी व पुढचा मागचा आब्याएवढा भात असं भरपूर जेवण जेवणारा मी. पण आतां मात्र दोन्ही वेळ मिळून लिंबाएवढा भातहि माझ्या घशाखालीं उतरेना. माझी ही चिंतनीय व दयनीय अवस्था पाहून माझे मामा कळवळले आणि मला साजेशी मुलगी पाहून आणण्यासाठीं त्यांनीं कंबर कसली !

लग्नाची गांठ तिकडे ' वर ' ब्रम्हदेव बांधून ठेवत असतो असं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं. नाहीतर मी भिवंडीचा आणि कु. मोहिनी मादागास्कर ही भोपाळची अशी ही जोडी जमावीच कशी ? कु. मादागास्कर ( आतांची सौ. मोंबासे ) हीं मात्र माझ्या दृष्टीनें हजारांत उठून दिसावी अशीच जोडीदारीण मिळाली. " अगदी लक्ष्मीनारायणाचा जोडा दिसतो हो ! फक्त लक्ष्मी अन् नारायण हे दोघेहि अगदीं सात आठ महिन्याचे उपाशी असावेत तसें दिसतायेत " — या मथुराकाकींच्या उद्गारांतला खंवचटपणा वजा केला तर शरीर-प्रकृतीच्या दृष्टीनें मोहिनी मला खरोखरच अगदी साजेशी होती.

मथुराकाकींच्या प्रमाणें आणखीहि कांहीं लोकांनीं आम्हा दोघांच्या ' किडकिडीत ' पणाविषयीं तसलेच कांहीं उपरोधाचे उद्गार काढल्याचं माझ्या कानावर आलं--पण मला त्याची पर्वा नव्हती. माझ्या आयुष्यांतली एक मोठी समस्या सुटली, या एकाच विचारांतून निर्माण झालेला आनंद सबंध लग्न मंडपांतहि मावत नव्हता. मी कृतकृत्य झालों होतो.

आमचे लग्नानंतरचे सुरुवातीचे दिवस मोठे मजेंत गेले ( कुणाचे वाईट जातात ? )--पण पुढें वर्षभराच्या आंतच आमच्या जोडप्याला कुणा दुष्टाची नजर लागली कुणास ठाऊक ? आजवर ज्या गोष्टीचा मी गाढ अभिमान बाळगित आलों आणि जिच्याबद्दल कमालीचा आनंद मानला

६९
२०।७।६०

अशा आमच्या शरीरप्रकृतीच्या साधर्म्यात हलकें हलकें बरीच तफावत पडूं लागली. सौ. मोहिनीबाईच्या शरीराचा घेर हळूहळ शुक्लेंदुवत् वाढूं लागला. सुरुवातीला तिला "लग्न मानवलंय" म्हणून हें असं होत असेल, अशा विचारानं मी या आकारवाढीकडे दुर्लक्ष केलं—पण त्यानंतर मला अशी काळजी वाटूं लागली कीं आतां हें लग्न मानवणं, थांबायचं तरी केव्हां ?

पूर्वी चवळीच्या शेंगेसारखी असलेली मोहिनीची तनुलता हळूहळू भेंडीचा आकार धारण करूं लागली आणि ती वाढहि तिथेंच थांबण्याचंहि कांहीं लक्षण दिसेना. हळूहळू भेंडीचा दोडका झाला ! आतां मात्र माझ्या तोंडचं पाणी पळालं. मी तिला हात जोडून विनवलं "बाई, आतां एकवेळचं जेवण आणि वातुळ पदार्थांचं खाणं अजिबात सोडून दे, नाहींतर उद्यां तूं आणखी वाढलीस म्हणजे तें फारच बेढब दिसेल बरें. अन् मग तुझ्या शेजारी मी म्हणजे भोपळ्या शेजारी शवग्याची शेंग ठेवल्यासारखं वाटेल ते."

पण ( हायरे कॅर्मा ! ) अखेर झालंहि तसंच. माझी बत्तिशी लवकरच अक्षरशः खरी ठरली ! माझा मित्र बॉबी बाटलीवाला एकदां घरीं चहाला आला होता. त्यानं मोहिनीला पाहिली अन् दुसऱ्या दिवशीं ऑफिसांत मला तो म्हणाला "अरे मोंबासे-साला तुज्या बायडीला 'गर्थ कंट्रोल' ( परीघ नियमन ) करायला सांगते. अरे, तिचा वाढ हे असाच चालू राहिला तर आप‑‑ ए फ्यू डेज तुमचा पेअर मंजी साला-एलिफ‑‑ अन् जिराफचा पेअर दिसायला लागेल."

मी बॉबीचे उद्गार जसेच्या तसे मोहिनीच्या कानावर घातले. मोहिनी मनांतून अस्वस्थ झालेली होतीच या उद्गारामुळे ती अधिकच चिडली आणि म्हणाली "हे पहा—तुमचा तो बाटलीवाला कीं बूचवाला कोण आहे ना – त्याला म्हणावं 'आमच्या' मधें नाक खुपसायचं त्याला कांहीं कारण नाहीं. स्वतःच्या बायडीच्या 'गर्थ' ची काळजी घे म्हणावं ! ती कांहीं कमी जाड नाहीं."

"अग पण त्यांची गोष्ट वेगळी आहे त्याची बायको लठ्ठ आहे ही गोष्ट खरी – पण तोहि कांहीं कमी नाहीं. चांगलाच टग्या आहे कीं लेकाचा !"



"होय मा ! अन् मलाहि तेंच सांगायचंय् की माझा आकार कमी करण्याबद्दल तुम्ही सारखी माझ्यामागें भुणभुण लावलीत. मी म्हणते त्याऐवजी तुम्हीच त्या बाटलीवाल्या सारखं जरा लठ्ठ होऊन माझ्या बरोबरीला कां नाहीं येत ?"

मी एकदम थक्कच झालों. आपली बाजू अशा रितीनें आपल्यावरच उलटेल असं मला कदापिहि वाटलं नव्हतं मोहिनीन एका वाक्यांतच 'धोबीपछाड' मारून चीत केलं होतं. वास्तविक तिच्या म्हणण्यांत कांहीं फारशी चूक नव्हती. पण तें जमावं कसं हा मोठा यक्ष प्रश्न होता खरं म्हणजे लग्न पुरुषांनाहि मानवतं असं मी ऐकलं होतं एवढंच नव्हे तर लग्नानंतर सात आठ महिन्यांतच पोट सुटून 'पौष्टिक' दिसूं लागलेले अनेक मित्र मी पाहिलेले होते. पण आमच्या पोटाच्या नशिबी ही 'पगार वाढ' नव्हती ! लग्नानंतरहि आमच्या पोटाचा परीघ मेरिलिन मन्रोच्या कंबरेइतकाच सातत्यानें बारिक राहिला.

पुढें पुढें मोहिनीबाईची आमच्या रोडपणाविषयींची तक्रार वाढूं लागली. आपणहि एककाळीं असेच किडकिडीत होतो या गोष्टीचें त्या आर्यस्त्रीला इतक्या सहजासहजीं कसें विस्मरण झालें होतें—हे मला कळेना. इतके दिवस माझी भुणभुण तिच्यामागें होती-त्यामुळें ती त्रस्त झाली होती-आतां तिच्या कटकटीनें मी कंटाळून गेलो.

—पण एक दिवस मात्र या प्रकाराचा कळसच झाला. मी आणि मोहिनी भाजी बाजारांत गेलो होतो. मोहिनीच्या वर्धिष्णु आकाराबद्दल काळजी करीत मी तिच्या मागोमाग पण दोन पावलें सुरक्षित अंतर ठेवून हातांत भाजीच्या पिशव्या घेऊन निमुटपणे चाललो होतो. बाजाराच्या ऐन तोंडाशीं आमची एका वयस्कर बाईशीं गांठ पडली. मोहिनीला पहातांच आनंदानें त्या बाई किंचाळल्या "अय्या मोहने, किती दिवसानंतर भेटते आहेस ग ? –अन् काय ग–बरीच सुटली आहेस कीं ! मी तर आधीं ओळखलंसुद्धां नाहीं तुला. -छानू–लग्न बाकी झक्कास मानवल आहे हं तुला ! -अन् हा ग कोण ? '

माझ्याकडे पाहून त्या म्हणाल्या ' तुझा धाकटा भाऊ वाटतं ? '

"नाहीं बाई." मोहिनी झटकन म्हणाली, "हे माझे मिस्टर आहेत. आणि या माझ्या बाई–वेणूताई झिंजोटे, मॅट्रिकला या आम्हाला क्लासटीचर होत्या !"

हें बोलत असतांनाच मोहिनीनं माझ्याकडे अशा कांहीं संतापानं पाहिलं कीं क्षणभर मला माझ्या झिंज्यां ओढल्यासारखं वाटलं ! या अनपेक्षित आघातानं सबंध भाजी मार्केट माझ्या डोक्याभोवती गरगरा फिरूं लागलं. 'धाकटा भाऊ ! धाकटा भाऊ ! " हें झिंजोटे बाईचे शब्द माझ्या काळजावर थडाथड थपडा मारू लागले. शारीरिकदृष्ट्या मी मोहिनीच्या मानानं एवढा अधः-पतित असेन, याची त्या क्षणापर्यंत मला कल्पना नव्हती. मला मेल्याहून मेल्यासारखं झालं.

मोहिनी अन् झिंजोटे बाई यांच्या गप्पा रंगांत आल्या असं पाहून मी हळूच सटकलों. माझ्या डोक्यातलं गरगरणं कांहीं केल्या थांबेना. नेहमीच्या बटाटेवाल्यापुढें पिशवी टाकीत मीं म्हणालो " दीडशेर–धाकटे भाऊ ! "

" ऑं ? " त्यानं जबडा फाडून विचारलं.

" अरे दीडशेर धा–सॉरी. चांगले मोठ्यापैकीं बटाटे दे. "

बटाटेवाल्यानं माझ्याकडे संशयानं पहात पिशवीत बटाटे भरले. मनाच्या त्या अस्वस्थ अवस्थेतच मी सर्व भाजी खरेदी केली. आणि पुन्हां परत आलों. तरीहि त्यां " क्लास टीचरीणबाई " अन् त्यांच्या " स्टुडंटिणबाई " यांचा सुखसंवाद संपलेला नव्हता. मी पांचसहा वेळा खांकरलो, सात आठ वेळां जांभया दिल्या –दहा पंधरावेळां आळस दिला आणि शेवटीं न राहवून शुक् शुक् केलं. यावेळेपर्यंत हातांतल्या पिशव्यांच्या वजनामुळं माझे हात खांद्यापासून वेगळे होतील कीं काय अशीं भीति वाटूं लागली होती ! –अखेर परमात्म्याला माझी दया आली असावी. चौदाव्या वेळेला " बरंय बाई " माझ्याकडे नक्की या हं " असं म्हणून मोहिनीनं खरोखरच बाईचा निरोप घेतला.

जातांना तरी झिंजोटे बाईनीं निमुटपणें जावं-पण छे –जातांजातां त्या ओरडून म्हणाल्या " तुझ्या नवऱ्याच्या प्रकृतीकडे पहा बाई जरा आत्ताच असं काड्यामोड्या शरीर –मग पुढें कसं व्हायचं ? "

मी घाबरून आजुबाजूला पाहिलं. भोवताली असलेल्या कमीतकमी १५।२० माणसांनीं तर एकदम माझ्यावर दृष्टि रोखली. भर चौकांत आपलं " द्रौपदीकरण " झाल्यासारखं मला वाटलं.

मोहिनीनं अगदीं खाऊ कीं गिळूं अशा नजरेनं माझ्याकडे पाहिलं आणि खस्सकन् माझ्या हातांतून दोन पिशव्या ओढून घेतल्या. तीं तरातरा चालायला लागली. तिच्या मागोमाग एखाद्या अदृश्य दाव्यानं खेचल्यासारखा होऊन मी निमुटपणें खालीं मान घालून घरीं गेलो.

घरी जातांच हातांतल्या पिशव्या मोहिनीनं दाणकन् खालीं आदळल्या आणि झांकण काढलेल्या सोड्याच्या बाटलीसारखी फसफसूं लागली — " गेले सहा महिने सारखं कानी कपाळीं ओरडते आहे — पण कांहीं 'ढिम्' तरी होतंय् कां ? आमच्या बडबडीला कांहीं किंमत असेल तर ना ! हज्जार वेळां सांगितलं " थोडे लठ्ठ व्हा ! थोडे लठ्ठ व्हा — "

"अग पण असं नुसतं म्हणून काय उपयोग मी काकुळतीला येऊन विचारलं " लठ्ठ होणं एवढं सोपं आहे कां ? "

" नसायला काय झालं ? मी नाही कां झाले ? "

" अग पण तुझी गोष्ट वेगळी आहे. तुला लग्न मानवलंय्. "

" अन् तुम्हाला काय बाधलंय् ? "

" नाहीं–तसं नाहीं–पण अग–तुझा लठ्ठपणा खरा नाहीं आहे ! तो वात आहे. "

" असेल ! मग मी म्हणते तुम्हीं तरी थोडे वातुळ कां नाहीं होत ? "बाळसं" नाहीं तर निदान "फोफसं" तरी अंगावर येऊं द्या ! "

" हे पहा मोहिनी – येऊं द्या म्हणून येण्यासारखी गोष्ट आहे कां ही ? अग, माझी आंगकाठीच लहानपणापासुन अशी. "

" आंग " " काठी " आहे खरी ! त्या काठीचं मुसळ बडगा होण्याची शक्यता दिसत नाहीं मला ! तें कांहीं नाहीं. आजच्या आज पत्र पाठवून भोपाळहून दादाला बोलावून घेते-तो चांगला तालीमबाज आहे. तुमची प्रकृती सुधारायचं काम त्याच्यावरच सोपवते. "

" अग पण—"

" 'अग' नाहीं अन् 'पण' नाहीं– फार झालं आतांपर्यंत. आज झिंजोटे बाईनीं तुम्हांला माझा 'धाकटा भाऊ' म्हटलं– उद्यां एखादीनं भाचा नाहींतर पुतण्या म्हणू नये म्हणजे मिळवली. छेः तें कांहीं नाहीं. आज लिहितेच मी दादाला पत्र ".

–आणि खरोखरच तिनं भावाला पत्र लिहिलं. भोपाळला घरीं माशा मारण्याचं काम करून कंटाळलेला तिचा तो प्रेमळ आणि आज्ञाधारक भाऊ तें पत्र हातीं पडतांच मिळेल त्या गाडीनं निघून आमच्याकडे येऊन धडकला.

भावाला पाहतांच बहिणीला अगदीं गहिवरून आलं. त्यानें अंगावरचे कपडे उतरायच्या आंतच ती आपल्या दुर्दैवाचा पाढा भावाजवळ वाचून मोकळी झाली.

त्या महापुरुषानं माझ्याकडे एकदां दयापूर्ण दृष्टीनं पाहिलं आणि सहानुभूतीनं ओथंबलेल्या आवाजांत तो म्हणाला,

" मन्याबापू, खरंच, काय हो ही तुमची प्रकृती ? "

मी मनांतून भयंकर संतापलों–पण पाहुणा आल्याबरोबर त्याला टाकून बोलणं बरं नव्हे


**मनहर संगीत विद्यालय**

गायन वादनाचें शास्त्रोक्त शिक्षण दिलें जाते.

| पत्ता :— | | पुणें शाखा :— |
|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | ★ | शनिवार व रविवार |
| एम्प्रेस महाल | ★ | ६६३ सदाशिव पेठ, |
| खोदादाद सर्कल | ★ | चिमण्या गणपतीजवळ |
| दादर, मुंबई १४ | | पुणें २. |

म्हणून बळंच तोंडावर हंसू आणीत मी म्हणालों " छान्! पंपूअण्णा, आतां तुम्हीच काय ते बोलायचे राहिला होतात! घ्या बोलून. "

" अहो तसं नाहीं मन्याबापू-पण खरं सांगायचं तर तुम्हीं म्हणजे राष्ट्राचे आधारस्तंभ! "

" मी?-अन मग तुम्हीं कोण? "

" मी? मी–म्हणजे तसा मीहि आहे! "

" आहांत ना-मला वाटलं कीं—"

" नाहीं, पण मी कसा सणसणीत आहे! "

" अहो नसायला काय झालं पंपूअण्णा—तुमच्या मागें कांहीं काळजी आहे कां? "

" मन्याबापू—तुमच्या मागें तरी कसली काळजी आहे हो आणि असेल तर सोडून द्या. उद्यांपासून मी जरा तुमची काळजी घेतो. बब्रे, (मोहिनीचं माहेरचं नांव) आज रात्री मूठभर बदाम बी भिजत टाक बरं. आतां मन्याबापूंचा अगदीं एकदम कायापालट करून टाकतो कीं नाहीं बघ! "

—आणि दुसऱ्या दिवशीं पहाटें पांचाच्या डोक्याला त्या नरपुंगवानं आमच्या खोलीच्या दारावर धक्के द्यायला सुरुवात केली. धडपडत जाऊन मी दरवाजा उघडला आणि डोळे चोळीतच त्याला म्हणालो. " पंपूअण्णा, निदाम आणखी अर्धा तास तरी झोपूं द्या मला! "

" छे, छे अर्धा तास? अहो अर्धा मिनिट सुद्धां झोपू द्यायचा नाहीं. चला-चला आधीं व्हा खोलीच्या बाहेर! बब्रे, आम्ही जरा दौड करून येतो हं-तोवर तूं दूध आटवून तयार ठेव! "

' बब्री ' नं तें ऐकलं कीं नाहीं कुणास ठाऊक. ती शांतपणें दुसऱ्या कुशीवर वळून झोपी गेली. तिच्या भाग्याचा मला अतिशय हेवा वाटला

दोन चुळा टाकून आम्हीं बाहेर पडलों. गांवाबाहेर आल्यानंतर पंपूअण्णा म्हणाला ' हं चला मग म्हणं. आतां मैलभर पळून यायचं. तोंडानं श्वास घ्यायचा नाहीं हं.

' घेतला तर काय होईल? '

' अहो तोंडानं श्वास घेतला तर फुफ्फुसाला अपायकारक होईल तें. म्हणजे त्याचं कार्य आहे कीं नाकावाटें जेव्हां हवा जाते तेव्हां ती थोडी कोमट होऊन जाते-पण ज्यावेळीं आपण ती तोंडानें घेतो—'

' पण ' हवा खाणं ' त्यालाच म्हणतात ना? '

# नजरेची जादु अशी

[ भावगीत ]

चतुरपणा कळला मज, सारें तूं ओळखशी
नजरेची जादु अशी, सखे तुला सांगु कशी ॥ ध्रु०

नजरेचा मूकभाव
रंगवितो प्रीति–डाव
हरलें मी मज कळले, झुकली ग नजर अशी । १ ।

नजर गडे झुकतांना
चोरूनि मी बघतांना
सांपडलें मी त्यांना, घडली ग मौज अशी । २ ।

नजरेवरि मी रूसलें
नजरेनें मन फसलें
मोल असें नजरेचें, शब्दाविन ओळखशी । ३ ।

—योगेश्वर अभ्यंकर

" आपण हवा खायला नाहीं आलों मन्याबापू. व्यायामासाठीं आलोय्. "

" नाहीं पण पंपूआण्णा– आज आपण असं करूं या. तुम्हीं आज फक्त व्यायामाची 'थिअरी' मला समजावून सांगा. उद्यापासून आपण ' प्रॅक्टिकल ' ला सुरुवात करूं. काय? "

माझी मखलाशी पंपूअण्णाच्या लक्षांत आली–पण थोडा धोरणीपणा त्याच्याजवळहि असल्यामुळें त्यानं तें मान्य केलं. त्यानंतर चांगलें फटफटीत उजाडेपर्यंत त्यानं मला मळणें, सिंगल बार, डबलबार, रोमनरिंग्ज, जोर, बैठका, जोडी– इत्यादि व्यायाम प्रकारांची ' थिअरी ' समजावून सांगितली. ' **बैठका** ' बद्दल सांगतांना तर त्याला अगदी राहवेना. मध्येंच तो ऐन रस्त्यांतच बैठका मारून दाखवूं लागला. त्याचवेळीं रस्त्यावरून एक बैलगाडी चालली होती. गाडीवाल्यानं तो प्रकार पाहून गाडी थांबवली अन् तिथूनच मला उद्देशून तो म्हणाला " मास्तर, निस्त्या तशा साद्या बैठका नसत–अशी कान पकडून शान बैठका हानायला लावा. लई माजलीयात् ही साळंतली पोरं! "

व्यायामाच्या (आणि घुमण्याच्या) ऐन रंगांत असल्यामुळें पंपूअण्णाच्या कानावर तें बोलणं गेलं नाहीं. नाहींतर तिथेंच ' कुस्ती ' – या व्यायाम प्रकाराचं प्रात्यक्षिकहि मला ताबडतोब पहायला मिळालं असंतं. असो.

अशा रीतीनें एकंदरीत व्यायामाचे सारे प्रकार पाहून घामाघूम झालेला मी – आपल्या दंडातल्या बेटकुळ्या (कीं उंदीर) चांचपीत चांचपीत घरीं आलों. या वेळपर्यंत मोहिनीबाईनीं मोठ्या तत्परतेनें शिरा करून ठेवलेला होता. घरांत शिरतां शिरतांच मी म्हटलं ' वा! वास काय अगदीं झकास सुटलाय् '

' पण मन्याबापू ' अण्णा लगेच 'वार्निंग' च्या स्वरांत म्हणाला ' – तुम्ही शिरा खाऊं नका हं आज. बिना व्यायामाचा पचायचा नाहीं तो. बब्रे – हे आज खाणार नाहींत – एकच बशी आण. '

मनांतल्या मनांत, चडफडत मी पंपूअण्णांचा तो ' शिरा फस्तीकरण विधी' मुकाट्यानं पाहून घेतला. त्यावर दोन ग्लास आटवलेलें दूध जेव्हां त्या राक्षसानं घशाखाली उतरवलं त्यावेळीं तर त्याचा मला कमालीचा संताप आला. (पण करतो काय? – मेहुणा म्हणजे अर्धी बायको!)

दुसऱ्या दिवशीं पुन्हां तोंच प्रकार ! अण्णानं पहाटे मला उठवलं – आम्ही गांवाबाहेर गेलों आणि पळायला सुरवात केली. दहा पावलं जातों न जातों तोंच मला धांप लागली. मी थांबलेला पाहतांच अण्णानं माझ्या बखोटीला धरून मला फरफटत न्यायला सुरुवात केली — पण आणखी जेमतेम वीस पंचवीस पावलं पळालों नसेन तोंच मी अक्षरशः खालीं बसकण मारली. माझ्या छातीचा भाता जोरजोरानें सुरू झाला. अण्णा मला म्हणाला ' तुम्हीं थांबा जरा इथेंच. मी दौड करून आलोंच. ' दोनतीन मैलांची फेरी करून अण्णा परत आला तरी माझ्या नाकातोंडातून बाहेर पडत असलेले सुस्कारे आणि फुस्कारे संपलेले नव्हते. अण्णाची थोडी निराशा झाली. तो म्हणाला ' बरं पळणं राहूं द्या निदान दहा जोर तर माराल ? '

रस्त्यांवरून आम्हीं मैदानांत आलों. अण्णानं जोर मारण्याचा पवित्रा घेतला. मीहि त्यांच्याप्रमाणें दोन हात आणि दोन पायावर शरीर झोकून जोर मारण्यासाठीं सिद्ध झालों. अण्णानं मला इशारा केला.

' हं ! सुरू ! जय बलभीम ! ' मी जोर मारला अन् त्याबरोबर नाक, छाती, पोट, गुडघे हे अवयव जे जमीनीला भिडले ते पुन्हां वर येण्यास तयारच होईनात. मी नेटानं प्रयत्न केला–पण त्यामुळें प्रथम पालथा आणि त्यानंतर ( हताशपणानं ) उलथा झालों. नकारार्थी हात हालवून मी अण्णाला म्हटलं 'छे, छे, ह्या जन्मी जमायचं नाहीं हें आपल्याला ! '

अण्णानं मला उठवलं. पुन्हां पवित्रा घ्यायला लावला आणि पुन्हां जोर काढायला सांगितलं. मी पुन्हां एकदां धरणी–मातेला दंडवत घातला. यावेळेला थोडी माती खाल्ली. आणि धापा टाकीत उभा राहिलो. वैतागानं मी म्हटलें ' छे छे, अण्णा ' तुम्हीं नाद सोडून द्या माझा. हें कधींच साधायचं नाहीं आपल्याला ! ' अण्णानीं खरोखरच माझा नाद सोडून दिला; आणि स्वतः जोर काढायला सुरुवात केली. पुरे शंभर जोर काढल्यानंतर त्यानं दोनशें बैठकाहि काढल्या. त्याचा सर्व व्यायाम संपेपर्यंत मी ' बलज्ज ' बसून होतो. त्यानंतर व्यायाम संपल्यावर लालच्या मानेनं पळण्यांना पाय लचकल्यामुळें रखडत मी घरीं आलों.

घरीं येतांच अण्णानं मोहिनीसमोर माझ्य चांगलीच खरडपट्टी सुरू केली ' काय हें मन्याबा –अहो हे काय शरीर का सोंग ? अहो तुम्ह फर्लांगभर सुद्धां पळवेना अन् दहा जोर सु काढवेनात ? बबे, कसं व्हायचं ग यांचं ? बरं, त्या कोहाळाच्या वड्या तर आण आधीं, अ दूध आटवलंयस ना–तें घेऊन ये. मन्या तुम्हाला आजहि कांहीं मिळायचं नाहीं हां ! हें म्हणजे तें खाऊन पचायला तर हवं ना. '

मला बोलायला तोंड राहिलं होतं कुठें ?

त्यानंतर हाच कार्यक्रम रोज सुरू झाल आम्ही पहाटे बाहेर पडावं. गांवाबाहेर जा पळून येतांना गांवच्या तालमींत थांबावं. व्यायामाचा निष्फळ प्रयत्न करावा. अण्ण दणकून व्यायाम करावा आणि घरीं आल्यानं बदामाच्या वड्या, कोहाळे पाक, गाजराचा हल सुका मेवा, आटवलेलं दूध किंवा असेंच कां पौष्टिक पदार्थ हादडावेत. आणि पोटाव हात फिरवीत दुपारीं झक्कपैकीं ताणून द्यावी

हें सारं पाहून माझी अवस्था मात्र दिवसें दिव केविलवाणी होऊं लागली. पंपूअण्णा खर्चिक आणि राक्षसी आहार माझ्या खिशा झेपेनासा झाला. त्याच्या चेहऱ्यावर जसज तकतकी येऊं लागली, तसतसा माझा चेह काळवंडून जाऊं लागला. खर्चाच्या काळज माझी झोंप पार उडाली–जेवण घशाखा उतरेना. दोन महिन्यापूर्वीं शिवलेला बुशश मला ' ढगळ ' होऊं लागला.

अखेर हा सारा प्रकार असह्य होऊन एक दिवस मोहिनीला म्हणालो '' मोहिनी, तुइ भावानं खूप प्रयत्न केला–पण माझ्यांत का इतकीहि सुधारणा होण्याचं लक्षण दिसत नाह तेव्हां जाऊं दे ना आतां त्या बिचाऱ्याला भोप ळला परत. ''

मोहिनी मोठ्या ठसक्यांतच म्हणाली '' हे तो बसलाय जायला ! तुमची प्रकृती त्याच्य सारखी ठणठणीत झाल्याशिवाय येथून हलाय देखील नाहीं असा निश्चय केलाय त्यानं. ''

माझं धाबं दणाणलं ! हा का भयानक पेंच होता ? माझी प्रकृती अण्णासार होणं कालत्रयींहि शक्य नव्हतं आ तो गेल्याखेरीज त्याच्या पौष्टिक आहार खर्च कमी होणं हेंहि अशक्य होतं. त्या तशा रीतीनं चरतांना पाहून उलट माझ्य

प्रकृतीवर अधिकाधिक अनिष्ट परिणाम होत चालला होता. काय करावं हें कांहीं मला सुचेना. अखेर माझा परम मित्र बॉबी बाटलीवाला याला मी शरण गेलो आणि हृदयाचं दुःख त्याच्यासमोर उघडं केलं. बॉबीला माझी दया आली. तो म्हणाला '' अरे साला मोंबासे – तूं कायबी डरूं '' नको. तुला एक क्लासिक आयडिया सांगून ऱ्हातो. अरे माजी बायडी आजकाल वजन अने 'गर्थ' कमी करण्यासाठीं कोनच्यातोभी मेडिसिनच्या गोळ्या खात असती. माज्या अंदाजापरमानं तिला तो मेडिसिन चांगलाच लागू पडला हाये. मागच्या फॉर्टनाईटमंदी ती पुष्कळच रोड दिसायला लागली हाय. तवा तूं असा कर कीं तुझ्या बायडीला पण तोच मेडिसिन दे. करून तर बग यार तूं – तिच्यावर डेफिनेटली इफेक्ट झाल्याबिगर ऱ्हाणार नाय. ''

बॉबीची ही कल्पना मला फारच पसंत पडली कारण सध्यांच्या परिस्थितींत हा एकच उपाय परिणामकारक ठरण्यासारखा होता. बॉबीनं सांगितलेल्या औषधाच्या गोळ्या मी दुसऱ्या दिवशींच घेऊन आलों आणि मोठ्या शिताफीनें रोज सकाळीं मोहिनीच्या चहाच्या कपांत दोन दोन गोळ्या टाकायला सुरुवात केली आश्चर्याची गोष्ट म्हणजे खरोखरच सात आठ दिवसांतच मोहिनीच्या शरीरावर त्या औषधाचा परिणाम अगदीं स्पष्टपणें दिसूं लागला. त्याचवेळीं माझ्या डोक्यांत एक सूडाचा विचार आला. पंपुअण्णाच्या अंगातली रानरेड्याची मस्ती आतां जिरवलीच पाहिजे, असं मी ठरवलं आणि तीन तीन चारचार गोळ्याची भुकटी करून ती त्यांच्या बदामाच्या शिऱ्यांत किंवा आटवलेल्या दुधांत मिसळुन देऊं लागलों. काय असेल तें असो—पण पंपूअण्णावर तर त्या गोळ्याचा परिणाम अधिक झपाट्यानें होऊं लागला. हळूहळू अण्णाची 'कळा' उताराला लागली.

मी बॉबीवर आणि पर्यायानं स्वतःवर बेहद्द खूष झालों होतो. आपल्या प्रयोगाला येत असलेलं भरघोस यश पाहून माझ्या अंगांत विलक्षण उत्साह संचारु लागला. मोहिनी आणि पंपूअण्णा यांची सरकत चाललेली शरीरं पाहून मला खरोखरच अस्मान ठेंगणं झाल्यासारखं वाटूं लागलं. अंगांत असा कांही आवेश उफाळून आला कीं त्या आवेशाच्या भरांत मी एक दिवस

पहाटें उठून एका दमांत तब्बल अर्ध्या मैलाची दौड करून आलों. घरीं आलों, लंगोट कसला आणि ' जय बलभीम ' म्हणून तडाख्यानं तीन जोर आणि सहा बैठका हाणल्या. व्यायामाचें हे तिन्हीहि प्रकार अपेक्षेबाहेर यशस्वी झालेले पाहून माझ्या उत्साहाला सीमा राहिली नाहीं. दुसऱ्या दिवसापासून मी हलके हलकें व्यायाम वाढवायला सुरुवात केली.

पंपूअण्णाची मात्र या वेळेपावेतो अगदीं उलट स्थितीं झालीं होतीं. गळून गेल्यासारखा होऊन त्यांन फिरायला जाणं किंवा व्यायाम करणं अजिबात सोडून दिलं होतं. त्याच्यासाठीं ( खरं म्हणजे माझ्यासाठीं ) बनविले गेलेले पौष्टिक पदार्थ पचविण्याची ताकद त्याच्या अंगात अजिबात राहिली नव्हती.—अर्थातच त्या साऱ्या पदार्थावर मीच तुटून पडलो. माझ्यावर त्याचा अिष्ट तोच परिणाम झाला. पूर्वी एकादे-वेळीं चतकोर अर्धी पोळी जास्त खाल्ली गेली कीं दिवसभर पोटाच्या गुरगुराटानं हैराण होणारा मी, आतां एका बैठकींत वशीभर बदामाचा शिरा, दोन चार कोहाळ्याच्या वड्या, आणि आटवलेलं ग्लासभर दूध मी सहज पोटांत रिचवूं लागलो आणि तें पचवूंहि लागलो.

हें सारं काय चाललंय अन् प्रकृतीच्या बाबतीतली ही उलटापालट कशी होते आहे, हें मोहिनी आणि पंपूआण्णा या दोघांच्याहि लक्षांत येईना.

अण्णाला असें वाटलं कीं आपल्या गोटीबाज घाटदार शरीराला कुणाची तरी दृष्ट लागलेली आहे. त्यामुळें त्यानं काळे दोरे मनगटांत आणि गळयांत बांधायला सुरुवात केली. पण त्याचा कांहींच परिणाम होईना (कसा होणार ?) मोहिनीसुद्धां एक दिवस काळजीच्या स्वरांत मला म्हणाली " दादाला काय झालंय् कांहीं कळत नाहीं. मला वाटतं एकदां त्याची अन् माझी- दोघांचीहि प्रकृति डॉक्टरांना दाखवावी म्हणते. "

खोट्या सहानुभूतीच्या आवाजांत मी म्हटलं " अग, डॉक्टरला दाखवून काय उपयोग ? मला वाटतं त्याला इथली हवा मानवत नसावी. इथें आला त्यावेळीं कसं हनुमंतासारखं शरीर होतं त्याचं. पण आतां मात्र सुदामदेव व्हायच्या पंथाला लागलाय तो. मला वाटतं मोहिनी, आपण असं करावं, अण्णाला जाऊं द्यावं परत भोपाळला. उगाच त्याचे इथें हे असे हाल होण्यापेक्षां तो घरी सुखरूप पोहोचलेलाच बरा नाहीं कां ? "

मोहिनीला माझा विचार पटला. तिनं तो आपल्या भावाच्या बथ्थड टाळक्यांत व्यवस्थित रीतीनं उतरवला. एक दोन दिवसांत त्याच्या सामानाची बांधाबांध केली. आणि त्याची भोपाळला रवानगी केली.

पंपूअण्णा गेल्यामुळें तर मी अधिकच खूष झालों आणि ती खुशी मला अधिक मानवली.

इकडे मोहिनीचं शरीर मात्र झपाट्यानं रोडावत चाललं. तिचे पूर्वीचे ब्लाऊझ समोर धरल्यानंतर एकेकाळीं तिचेच असतील यावर माझाच काय-पण तिचाहि विश्वास बसेना. तिनं डॉक्टरकडे जाण्याची गोष्ट काढतांच मी तिला खोडून काढूं लागलो. एक दिवस ती फारच हट्ट धरून बसली त्यावेळीं मी तिला सांगितलं " मोहिनी, खरं सांगू कां ? तूं सडपातळ असलीस म्हणजेच चांगली दिसतेस. अग मी शंभरजणीतून जी निवड केली ती तुझ्या या गुणामुळेंच नाहीं कां ? "

" अहो, ते खरं " ती म्हणाली " पण त्यावेळी तुम्ही रोड होता म्हणून आपण एक-मेकांस शोभून तरी दिसत होतो. आतां झालंय उलटच ! मी बारीक होत चाललेय आणि तुम्ही मात्र चांगलेच गरगरीत होत चाललांत हें कांहीं बरं नाहीं."

" म्हणजे आतां आहे कीं नाहीं तुझी कमाल ? अग, मी लठ्ठ व्हावं म्हणून केवढा जिवाचा आटापिटा केलास तूं. तुझ्या त्या भीमरुपी भावाला भोपाळहून इथें आणून माझ्या मानगुटीला बसवलंस—अन् अखेर बिचाऱ्याला सुदामदेव करून परत पाठवलास. – आतां भोग आपल्या कर्माची फळ ! "

मोहिनी निरुत्तर झाली. माझ्या जाड होण्या-बद्दल दुःख वाटून घ्यावं हेंच तिला कळेनासं झालं असावं.

अखेर पहातां पहातां ती अगदीं लग्नांतल्या इतकीच बारीक झाली. अगदीं चवळीची शेंग. मी मात्र या वेळेपर्यंत तिच्या विरुद्धचं टोक गांठलं होतं. एक दिवस पंपूअण्णाचा आमचेकडे चुकून राहिलेला शर्ट मी अगांत घालून पाहिला. तो मला अंगांत अगदीं कसा झकास बसला. ( कांखेंत किंचित दाटल्यासारखा वाटला खरा).

एक दिवस आम्हीं उभयता बाजारांत निघालों होतो. मंडईच्या दाराशींच आम्हांला मॅट्रिकच्या वर्गांत गणित शिकवणारे कुरकुटे मास्तर भेटले. त्यांनीं मला ओळखलंच नाहीं, पण मीच त्यांना नमस्कार करून म्हटलं " मास्तर ओळखलंत कां मला ? - मी मन्या मोंबासे, मॅट्रिकला तुमच्या वर्गांत होतो—"

" अरे कोण—मोंबाश्या ! तूं ?—" मास्तर आश्चर्यानं जवळजवळ ओरडलेच. 'तुला भोपळ्या रोगबिग झालाय कीं काय ? अरे पूर्वी तूं नुसता सरळ रेषेसारखा होतास. आतां तुझं अगदीं लंबवर्तुळ झालंय ! अन् ही रे कोण ? ' चष्म्याच्या वरून मोहिनीकडे पहात ते म्हणाले-' तुझी धाकटी बहीण वाटतं–? ' ☆

भारत सरकारकडून " रजिस्टर्ड "

★ पांढरे डाग ★

सन १९३६ पासून प्रसिद्ध असलेलें व हजारोंनी अनुभवलेलें पांढऱ्या कोडाचें अनुभवसिद्ध औषध.

किं. ५ रुपये. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

दमा, श्वास — गुणकारी औषध किं. ५ रुपये

मुळव्याध — पोटांत व वरून लावण्याचे किं. ५ रुपये

पत्ता—वैद्य के. आर. बोरकर ( अभि. )

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला ( महाराष्ट्र )

( पान २९ वरून )

अनुभवानें निव्वळ सत्ता कांहीं करूं शकत नाहीं हा आमच्या नजरेसमोरचा साक्षात्कार आहे. समाज बनविल्याखेरीज, समाजवादी शील बनविल्याखेरीज समाजवाद येणार नाहीं. मात्र समाजवाद, समाजवाद म्हणून एकाद्या पक्षाच्या हातीं सत्ता येईल. हातांत सत्ता येणें हा समाजवाद नव्हे. तो समाजवाद या मानवी जीवन-आशेचा प्रभाव आहे. म्हणून आम्हाला नुसता प्रभाव वाढवावयाचा नाहीं. आम्हाला जनतेच्या कल्याणासाठीं समाजवादी प्रभात आणावयाची आहे. या करितां ज्या पक्षांना समाजवादाची म्हणजेच लोकशाही समाजवादाची खरी आंच असेल त्या पक्षांनीं लोकशाहीनिष्ठ समाजवादी एक बलाढ्य संघटणा काढावी व समाजवाद आणणाऱ्या किरकोळ पक्षांनीं त्यांत विलीन व्हावें. खऱ्या अर्थानें हें जर घडणार असेल, नव्हे आम्हाला घडवावयाचें असेल तर मग मीं माझ्या प्रिय प्रजासमाजवादी पक्षाला अशी सूचना करीन कीं:—

लोकशाही समाजवाद या देशांत आणण्यासाठीं या पक्षानें जीवाचें रान करावें. आजतागायत त्यांनीं केलेले प्रयत्न या महाभारतांत लुप्त होणार असतील तर होऊं द्या. इतिहाससुद्धां केव्हां केव्हां कृतघ्न बनतो. पण इतिहास–पक्ष वा कुळी जाणत नाहीं, तर तो पराक्रम जाणतो. म्हणून जर अशी लोकशाही समाजवादी एक बलीष्ठ फळी निर्माण होण्याची शक्यता असेल आणि जर पक्ष विसर्जनासाठीं कोणाची आमच्या पक्षाला **प्रजा समाजवादी पक्ष** या नांवामुळें आडकाठी येणार असेल तर आमच्या पक्षानें नांव विसर्जन करून सुद्धां अशी फळी बनवावी. आमच्या पक्ष–प्रेतावर जर भारताचें रमणीय समाजवादी चित्र उभें राहाणार असले तर पक्ष अस्तित्वाचें म्हणजेच पक्ष जीवनाचें सारसर्वस्व या लोकशाही समाजवादासाठीं अर्पून आपण निरंजन बनावें ही माझी इच्छा आहे. समर्पण आमच्या पक्षाला नवखें नाहीं. इतिहासांत आमचें एक अक्षर जमा राहिलें नाहीं तरी चालेल. आम्ही इतिहासजमा होणार नाहीं. या प्रयोगानें इतिहासच आमच्यांत जमा होईल अशी माझी श्रद्धा आहे. आजचें युग हें विज्ञान युग आहे. राजकीय–युग हळुहळु संपुष्टांत येत आहे. विज्ञान-युगांत राजकारण हा एक या विज्ञान–युगाचा सामान्य अवयव म्हणून राहाणार आहे. म्हणून विज्ञान–युगाच्या हांकेला ओ देऊन आपण बदलती पावलें टाकली पाहिजेत. घेण्यापेक्षां देण्यानें जीवन उदात्त आणि भव्य बनेल. आमचें जीवन पक्षासाठीं नाहीं. आमच्या जीवनांत पक्ष आला तो लोकशाही समाजवाद आणण्यासाठीं. ज्या त्वरीत तो येईल त्या उपायासाठीं आमची सिद्धता सारसर्वस्व होमिण्यासाठीं झाली पाहिजे. हिंदुस्थानामधली आम जनता आतां ताटकळत कुणाची वाट पहाणार नाहीं, अराष्ट्रीय साम्यवादाची चाहूल जनतेच्या जीवनाशीं हितगुज करण्यास तत्पर झाली आहे. यावेळीं पक्षापक्षां देश मोठा, देशापेक्षां सत्य मोठे, या न्यायानें आम्हीं पक्षासह **जीवनापेक्षां मृत्यूतील जीवनाकडेंच धांव घेणें** उचीत ठरेल. आम्हीं संयुक्त महाराष्ट्रासाठीं समितीरूपी आघाडी बनविली. आज आघाडीचे परिणाम आम्ही भोगीत आहोंत. संयुक्त महाराष्ट्र बऱ्याच प्रमाणांत आला पण आम्हीच संयुक्त राहिलों नाहीं

कामगारांसाठीं एकजूट उभारली तर पुढाऱ्यांतच फाटाफूट झाली. आघाड्यांत आम्ही आमचे जीवन हरलों. आतां तशा आघाडीची बातच नको. संयुक्त भारताकडे दुर्लक्ष होता नये. आजचा सामान्य माणूस पक्षाच्या रंगीत खेळांना विटून गेला आहे. साऱ्या पक्षांनीं सामान्य माणसाला सुखाच्या जीवनाची थाप दिली, आम्हाला सुखाचे दिवस नकोत. दिवसांत थोडें सुख पाहिजे. या जीवनासाठीं एक लोकशाही समाजवादी फळी उभारून आमच्या जीवन-समस्या सोडविण्याचे प्रयत्न करूं या. जनतेच्या या भांबावलेल्या मनस्थितींत तिला दिलासा देण्यासाठीं व सामान्य जनांना त्यांच्या जीवनांत लोकशाही समाजवादाची प्रत्यक्ष फळें पदरांत पाडून देण्यासाठीं साऱ्या लोकशाहीनिष्ठ पक्षांनीं विचार करून एक लोकशाही समाजवादी फळी निर्माण करावी व जनतेच्या दैनंदिन प्रश्नांना प्रत्यक्ष स्पर्श करावा. लोकांच्या प्रश्नांना जीवनांत सर्वस्पर्शी बनेल अशा फळीची नितांत आवश्यकता आहे. आजची ही गरज भागवील अशी लोकशाही समाजवादी फळी निर्माण करणें हें आजचें राजकारण बनलें पाहिजे. सोशालीझम आम्हांला पाहिजे. पार्टीइझम नको. माझ्या प्रजासमाजवादी मित्रांना मीं या लोकशाही समाजवादी फळीसाठीं पक्ष विसर्जनाची जरूरी पडली तर ती करूनही भारताच्या या समाजवादी अमर भूपाळीसाठीं मंगल आवाहन करतों. क्षमस्व—

# सुरक्षित ठिकाण

अेका कोर्टांत अेका आरोपीवर खटला चालला होता. अेकंदर खटला पाहून हा आरोपी गुन्हेगार नसावा असें न्यायाधीशास वाटलें. म्हणून त्यांनीं आरोपीला म्हटलें, " समज, संशयाचा फायदा घेऊन मीं तुला सोडून दिलें तर ? "

तेव्हां आरोपी गयावया करून म्हणाला, " नका नका महाराज, तसं करूं नका मेहेरबानी करून. "

आश्चर्यचकित होऊन न्यायाधीश म्हणाले, " अरेच्या ! तुझा उलटाच कारभार दिसतोय. "

तेव्हां आरोपीनें खुलासा केला, " महाराज, तुम्हीं मला सोडून दिलं तर माझ्या पाळतीवर आठ दादा आहेत. त्यांच्यापैकीं कोणी तरी नक्की मला मारील. सुरक्षिततेच्या दृष्टीनें तुरुंग बरा म्हणून मीं मुद्दाम अेक जुजबी चोरी करून आणि पोलिसांच्या ताब्यांत जाऊन तुमच्यापुढें शिक्षेची भीक मागायला आलों आहे. "

## तीन असत्यें

जगांत
तीन असत्यें आहत.
लबाडी,
राजकारण आणि
स्टॅटिस्टिक्स !

**आत्माराम गद्रे समोरच्या बायकोकडे पहात होता. आक्रस्ताळी पोर तिच्या स्तनाची चामडी चोखीत होती. आणि या कशाची दाद न घेतां त्याची बायको बाहेरच्या ओशट हवेकडे एकटक पहात होती........**

# एका संसारी माणसाची गोष्ट

—श्रीपाद काळे



**आंतडी दळवटून खोकला काढणारा—छातीचा सापळा झालेला—अंगावरचे मांस कोरून काढल्यामुळं बेताची उंचीसुद्धां बेढब वाटणाऱ्या—गोऱ्या मनगटावरच्या** केसांतून आतल्या हिरव्या शिरा तट्ट दिसणाऱ्या आत्माराम गद्र्यानं पुढ्यांत असलेल्या स्वतःच्या बायकोकडे पाहिलं...आत्माराम गद्र्यानं पहिल्या वहिल्यानें आपल्या बायकोकडे पाहिलें, असें मुळींच नव्हे, आज चवदा वर्षे तिच्याशीं तो संसार करीत होता. चवदा वर्षांत सहा मुलं त्याला झाली होती. त्यांतली चार मेली होती, आणि दोन जगली होती. चवदा वर्षांत चार पांच महिने माहेरी किंवा दुसरीकडे गेली असेल, तेवढें दिवस वजा केलं, तर बाकीचे दिवस आत्माराम गद्रे रोज तिला पहात होता. सुरुवातीच्या दिवसांत तिच्याकडे पाहिल्यावर तो बेहोष होऊन जात होता. रात्र–दिवस त्याला कळत नव्हता. वाढत्या वयात झालेल्या लग्नाचा भरपूर वचपा तो काढत होता. तिचे कांहीं ऐकायला तो मुळींच तयार नव्हता.

त्याच्यानंतर पांच वर्षांपूर्वी तिच्या बाळंतपणांत सहाव्या किंवा सातव्या दिवशीं मूल मेलं त्या दिवशी त्यानं बायकोकडे असंच पाहिलं होतं. रडून रडून ती निश्चेष्ट पडली होती तेव्हां. अंगावरच्या पातळ लुगड्यातून तिची नुसती छाती जगण्यासारखी हलत होती. त्या दिवशीं लग्नानतरच्या दिवसांतला गोडसपणा तिच्यांत राहिला नाहीं, हें त्या दिवशीं त्याच्या लक्षांत आलं होतं. अंधाऱ्या खोलीत एकटक तो तिच्याकडे पहात होता. तिने डोळे मिटलेले होते आणि पाण्याचा एकसर गालावर झिरपत होता. त्याला वाटलं, तिच्या तोंडावरून हात फिरवावा...पुढे आलेला हात त्याने मागे घेतला: आणि तिच्याकडे पहाणारी आपली दृष्टी त्यानें काढून घेतली आस्वदासारखी आपली दोन्हीं मनगटे त्यानें पाठीमागें घेतली; आणि हलक्या पावलानें गोणपटाच्या पडद्याचा आडोसा केलेल्या भागांतून तो बाहेर आला. बाहेर आल्यावर त्याचा सुस्कारा त्याला ऐकूं आला. चिरचिरीत पाऊस पडून सगळे कसे चिंब झालेले असावें, आणि दुसऱ्या दिवशीं पुरती मळभ असावी–वाऱ्यानें कुठें पान हलूं नये–अशा ओशट हवेसारखे त्याला वाटत होते. दोन्हीं पंजात डोके धरून तो पायठणीवर बसला होता. मोकाड पसरून रडावं असे त्याला वाटत होते. निदान कुठेतरी लांब निघून जावे–पांच पंचवीस वर्षे बायकोचे तोंड पाहूं नये... किंवा . किंवा देशमुख मास्तर सांगतो तसा ऑपरेशनचा इलाज करून घ्यावा .अशा अनेक विचारांनी त्याच्या डोक्यांत नुसती गर्दी करून सोडली होती. प्रत्येक विचार मेंदूची शिरन् शिर ताणीत होता.

—असे चार पांच दिवस गेले होते. बायको

हिंडायफिरायला लागली, कीं यातला एकतरी विचार अमलांत आणायचा ठाम विचार तो करीत होता. असें कांहीं केल्याशिवाय आतां गत्यंतर नव्हते. पातळ वस्त्राखालची श्वासाची धबधब पाहून तो भ्यायला होता. ही धबधब बंद होईल कीं काय ही धास्ती त्याला वाटत होती. तसें झाले, तर मग फार कठीण होतें. त्या दिवसांत स्वप्नेंसुद्धां कशी चमत्कारीक पडत होती. एका स्वप्नात दुसऱ्या लग्नाचें पुण्याहवाचन ठेवायला तो पाटावर बसला होता...आणि मुलगी दुसरी कुठली ठरली, हे त्याला कळलेच नव्हते. अंतर्पाट दूर झाला होता—आणि समोर तर कुणीच नव्हते...दुसऱ्या स्वप्नात त्याच्या बायकोने जीव दिला होता आणि पंचनामा तो कटाच लिहित होता.

.. दिवस असेच गेले. आणि त्याची बायको हिंडायफिरायला लागली होती. रडत नव्हती, तशीं हंसतसुद्धां नव्हती. आत्माराम गद्र्या-सारखीच संसारातल्या विवंचना करीत होती... आत्माराम गद्रे आपल्या स्वभावावर जात होता. खणखणीत आवाजाने बायकोला बोलत होता. आंघोळीचे पाणी जरा कोमट असले तरी ओरडत होता शिव्या मोजीत होता. रागावून वाढलेल्या पानावर जेवायला बसत नव्हता. मनधरणी करून घेत होता. नुकताच त्याला जन्माचा खोकला जडला होता. खोकला लागला होता. तसें विडीचें व्यसन त्याचें वाढत होतें. तासा-तासाला घोटघोट तरी चहा हवासा वाटत होता. आणि दिवसा-दिवसाला घर स्वच्छ होत जात होते. हे सारें एकच पावलाने होत होते, आणि त्यांतच बायकोची दोन बाळंतपणें झाली होती. एक मुलगी जगली होती आणि एक मूल उप-जतांच मेलं होते. ती पोरगी कशाला जगली आहे, हे आत्माराम गद्र्याला कळत नव्हते. दिवसा-दिवसाला तिच्या अंगावरचें मास कोणीतरी ओरपित होते. खर्जांची चकदणे बरी होत नव्हती. भूक लागली म्हणजे ती तोंडावर हात घेई. मनासारखे झाले नाहीं, म्हणजे समोर असेल, त्याच्यावर कपाळ आपटून घेई. बेदम मार देण्यासाठीं आत्माराम गद्र्याचें हात शिवशिवत पण दुसऱ्या धपक्याला तें पोर आवढा गिळणार नाहीं, या भितीनें निमूटपणें तो बायकोला शिव्या देई.

आत्माराम गद्र्याला धड उद्योग असा कांहींच नव्हता. कधीं स्वस्त धान्याच्या दुकानांत महिन्यांतून चार दिवस पावत्या करी. तसे कांहीं येत नसूनसुद्धां भिक्षुकी करी. लग्नें चालवी. घरभरणीं करी आणि क्रियाकर्मोतर सुद्धां करी. यापेक्षां अधिक उद्योग त्याला करतां येण्यासारखा नव्हता. पूर्वी आणखी कांहीं करण्याची गरज वाटली नव्हती. दहा मण भात खंडाचें येई. वरकस पैसे येत. घर होते. दहा बारा कलमाचे शेदोनशें रुपये येत. बापाने घर ओस पडेल, म्हणून त्याला कुठें बाहेर पाठवला नव्हता. पांच यत्तेपर्यंतच्या शाळेंत त्याचें शिक्षण पुरे झाले, आणि तो घरींच बसला होता. मिळेल ते खावें नि घर राखावें, एवढी महत्वा-कांक्षा बापाने धरली होती, आणि आत्माराम गद्र्याने ती पुरी केली होती. पण बाप मेल्यानंतर आत्माराम गद्र्याला परिस्थितीचे सूख पुरते मिळूं लागले होते. खंड वेळेंवर येत नव्हता. पुढें कुळांनीं कांहींच देण्याचे टाळलें. दरीतली कलमें वाढत गेली. त्यांची निगा राखली जात नव्हती. मग ती लहरी माणसासारखी जांभई दिल्यासारखी मोहरत.

—आणि उगवणारा दिवस काळजीचा नवा नवा विषय होऊन बसला होता. पाऊस सुरू झाला होता, सुरुवातीलाच नको इतका पडला होता. आणि गेले दोन दिवस नुसती मळमळ धरून राहिली होती. ढगावर ढगांचे नुसते थर रचून राहिले होते. दिवस कुठवर आला आहे हें कळत नव्हतें. सगळीकडे ओलें चित्र झालें होतें. कुजका पातेरा अंगणात कोपऱ्या कोपऱ्यातून सांचला होता. पागोळ्याचें पाणी खोलगट जागेत साचलें होते आणि वर मेलेल्या पिंगाण्याचा थर साचला होता. कुठें वाऱ्याने एक पान हलत नव्हतें.

...आत्माराम गद्रे समोर बसलेल्या बायको-कडे पहात होता. आक्रस्ताळी पोर तिच्या स्तनाची चामडी चोखीत होती, आणि या कशाची दाद न घेतां त्याची बायको बाहेरच्या ओशट हवेकडे एकटक लाऊन पहात होती. आत्माराम गद्र्याला वाटले, अरे, ही ओळखीची बाई नाहीं. लग्नानंतरची थोड्या आडव्या अंगाची, काळीसावळी, पुष्कळ केसाचा मोठा आंबाडा मानेवर आलेली, भरलेल्या छातीची ही आपली बायको खचीत नव्हें. हिरवे लुगडे नेसल्यानंतर दिवसरात्रसुद्धां लक्षांत येत नसे... एका कावेंत ही सामावत नसे.

...आतांची पुढ्यांत बसलेली बाई, हें नुसते भूत होते. टाळूवरचे केस पुष्कळ विरळ झाले होते...मान उंच झाली आहे. जाड कापडाचा पोलका हिनें घातला, तर ही बाई आहे कीं नाहीं हेंहि धड कळलें नसते. पोलक्याच्या हातांतून हिचे दंड सहज ओवल्यासारखे वाटत होतें. मनगटें चिमटीत सामावत होती. तोंडावर तेलकटपणा होता. ही बाई कधींतरी अंग तरी धुतें कीं नाहीं, अशी शंका वाटत होती. खवले पडल्यासारखे तोंड दिसत होते. मानेखालची हाडें वर आली होती; आणि डोळे शोधूनसुद्धां सापडतील कीं नाहीं असे वाटत होते. मंगळ-सूत्राचे मणीसुद्धां हिला जड झाले असावेत.

—खोकल्याची उबळ कधीं आली, ते आत्माराम गद्र्याला कळलें नाहीं. खोकला आंत-ड्यांतून ढवळून निघाला. खोकतांना दोन्हीं हातानें पोट दाबावे लागले...खोकल्याची उबळ थांबली, आणि आत्माराम गद्र्यानें आपल्या बायकोकडे पाहिलं, बाहेरच्या हवेतरून तिची दृष्टी अजूनही परतली नव्हती. मांडीवरची मुलगी डोळे मिटून आडवी झाली होती, आणि पदर सावरायचे

महाराष्ट्राच्या वैभवशाली दीपावलींत गृहिणींच्या आनंदात भर घालण्यासाठीं—
—:( खात्रीलायक सोन्या-चांदीच्या दागिन्यांसाठीं ):—
★ भास्कर लक्ष्मण नार्वेकर ★
१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.
नवीन फॅशनप्रमाणें सोन्या-चांदीचे, कल्चर मोत्याचे दागिने तयार मिळतील अगर ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री साईबाबांची सोनें-चांदीची लॅकेटस् व फोटो मिळतील.

तसेच राहून गेले होते...आत्माराम गद्रे शरमिंदा झाला. स्वतःची त्याला खंत वाटली. मनातल्या मनांत स्वतःचे पाप धडाधड ओकू लागला. लूत भरलेल्या कुत्र्यांपेक्षाहि आपले जगणें कमी प्रतीचे त्याला वाटूं लागले ...त्याला वाटलें, झटकन् उठावे आणि बायकोचे पाय धरावे...रडून आपला जडपणा मोकळा करावा, तिच्या देहाची विटंबना करून मी टाकली आहे. स्वतःचे अस्तित्व त्याला नकोसे वाटलें. लग्नाच्या वेळची विकलावस्था त्याला आठवली. पहिल्यानें पुष्कळ मुली सांगून येत होत्या पण चोखंदळपणामुळें सगळ्या फिसकटत होत्या. मग मग मुली सांगून येण्याचें बंद झालें. वय वाढत गेलें. रात्ररात्र तळमळून काढल्या. भलभलते विचार मनांत येत होते. अशाच वेळीं एका परस्त्रीचा आपण हात धरला...पण तिनें बोंब मारली. कुठें बाहेर तोंड काढता येईना...जगणें कठीण झाले...त्या यातना आठवल्या म्हणजे अंगावर शहारे येतात, वासना तापत होत्या. आणि लोकांचा चेष्टेचा विषय होत होता.

एके दिवशीं या मुलीशी आपले लग्न झाले. वेळेला अन्न नसलेल्या अशाच एका कुटुंबवत्सल माणसाची ही मुलगी. पहिल्या मुली असाच तो खपवित गेला. आणि ही मुलगी आपल्या स्वाधीन करून तो मोकळा झाला.

आत्माराम गद्र्याला वाटलें, आपण हिच्याशीं वागलो, त्याला बलात्काराशिवाय दुसरे नांव नाहीं. आपल्या स्वभावामुळं ही आपला देह स्वाधीन करीत गेली. पहिली हुरहुर तिची लवकर संपली. तिचें मन कधींच तिनें कळूं दिलें नाहीं...आपलें दुःख, हाल, अपत्यांचें मरण...देहाची विटंबना तिच्या देहात कुठेतरी खोल रुजलें असेल...रुतलें असेल...कुठेतरी न बरी होणारी जखम झाली असेल; आणि आंतून पू वहात असेल. या यातनांत चूर असल्याशिवाय कधी हंसून रडून बोलली नाहीं, असें होणार नाहीं. उगाच ती अशीं ओशट इकडेतिकडे एकटक पहात रहाणार नाहीं.

–दोन दिवसापूर्वी वहिणीकडून जुनेर मागून आणून ती नेसली आहे...आत्माराम गद्रे नुसता पहात होता; आणि मधून मधून आपले केसाळ मनगट गोंजारीत होता...त्यानें मग नक्की ठरवले, असें वागून आतां भागायचे नाहीं. कांहीं करून चार पैसे हातांत आले, कीं पुणं मुंबई गाठायची, ऑपरेशन करून घ्यायचें... लग्न होऊन अवघी चवदाच वर्षे झाली. संसाराचा असा क्षय होऊन भागणार नाहीं.

—पुन्हा त्याला मागची स्वप्नें आठवली. मग त्याला खरेच वाटले, वर्ष दोन वर्षें ही बायको जगणार नाही...जगण्यासारखे आता हिच्यांत उरले आहे काय ? हाडेके धरून उगाच राहिलेली निःसत्व चामडी. जिवाचे पाखरू उडाले, कीं चिमूटभर अवस्था तिची उरणार नाहीं... आणि मग आपले कसे व्हायचे ? सबंध जन्म काय असाच काढायचा आहे ?–छे छे: कल्पनाच इतकी भयंकर होती. जिवाचा थरकांप उडवणारी होती...आत्माराम गद्रे चपापला. त्याला हिव भरल्यासारखे झाले, आणि पुन्हा जोराची एक उबळ आली...

"चार पैशाची साखर आणली आहे. काढा करून देत्ये—" त्याची बायको म्हणाली.

"नको—"

"कां ?—"

"तुलाच कांहींतरी औषध घ्यायला हवे आहे–प्रकृती किती खंगली आहे" ती 'हं' म्हणाली. ते 'हं' म्हणणेंसुद्धां तिला कमालीचे जड वाटत होते. मग तिने स्वतःला सावरले, आणि मुलीला उचलून तिनें आंत नेऊन ठेवले. आंत जातांना तिनें दोनदां थांबल्यासारखे केलें. आत्माराम गद्र्याला वाटले...एवढें चालायचे त्राणसुद्धां हिच्यांत उरलेले नाहीं.

डोळ्याभोंवती पिंगा घालणाऱ्या माशीं हातानें त्यानें दूर केल्या...बाहेरच्या हवेत कांहींहि फरक झाला नव्हता. घर सुस्कारे टाकीत पडल्याचा त्याला भास झाला. आपले जगणे आत्माराम गद्र्याला उगाच वाटले. साठलेल्या पाण्याबाहेर वळवळणारा किडा आणि आपण यांत काहींहि फरक नव्हता. ही चार माणसें जगवणें मुष्कीलीचे होऊन बसले होते.

आत्माराम गद्र्यानें डोळे मिटले, आणि तिथेंच तो आडवा झाला. दिवस सरकत असलेला समजत नव्हतें.

आत्माराम गद्रे जागा झाला. तेव्हां खरोखरच काळोख पडला होता. पोरीची झोप होऊन ती रडायलासुद्धां लागली होती. आत्माराम गद्रे उठला. चूळ भरण्यासाठीं त्यानें तांब्या घेतला, पण तांब्यात पाणी नव्हतें. तांब्या दणकन् आपटून तो बायकोवर ओरडला. एक शिवी देऊन त्यानें पाय आपटले. जेऊन तो अंथरुणावर पडला. पोर रडतच होती. थोरला मुलगा किरकिरत होता. आत्माराम गद्रे पडल्यापडल्या चरफडूं लागला. आपण काय बोलतो, यांचे भान त्याला उरले नाहीं. खोकला येत होता. शब्दाचा हेल सुटत होता...त्याच्या यातना बघून बायको उठली.

...मिट्ट काळोखांत बायकोची अवस्था आत्माराम गद्र्याच्या लक्षांतच आली नाहीं !

## पाठमोरी

अपसुक कांहीं मला वाटले
पदर सरकतां खांद्यावरचा
वखवखलेली नजर शांतली
वेध घेत की मानेवरचा....!

भलते सलते मनांत येतां
घाट वेगळा निःशब्दांचा
—पाठमोरी तूं सहजच वळतां
उडे पारवा फांदीवरचा....!

—कृष्णचंद्र भोईटे.

# अबोली

प्र. र. देशपांडे.

**फुलं झाडावर असली कीं, मन मोहित होतं. तीच फुलं जमिनीवर पडली की, त्यांच्याबद्दल मनांत दया उत्पन्न होते. अबोलींचं मात्र तसं नाहीं. केव्हांही पहा, नेहमी सतेज, प्रफुल्लीत आणि उज्वलता उधळीतच ती उभी असते. सर्वांना सदोदित हंसतमुख ठेवण्यांतच ती आपल्या जीवनाची धन्यता मानेत, अविरत जावन--सुगंध उधळणं हेंच तिच्यां जीवनाचे कार्य........**

फुलं कुणाला आवडत नाहींत? सर्वांनाच आवडतात. पण व्यक्ति तितक्या प्रकृती. प्रत्येकाची आवड निराळी असते एवढंच. फार कशाला. फुलं आवडणं, हे मानवी मनाचं वैशिष्ट्यच आहे त्यांत स्त्रीमन हें फुलांच फारच आवडतं. त्यांना अमुकच एक फुल आवडतं असं नाहीं कोणतंही सुबक आणि आकर्षक फुल असल कीं त्याचं मन त्या फुलाकडं ओढ घेतं. फुलांची ही आवड ही स्त्रीयांच्या मनांत नैसर्गिकच असतं. 'फुलांची निवड' हे काय स्त्रीमनाचं वैशिष्ट्य म्हणतां येणार नाहीं. ती खोड फक्त पुरुषांनाच असतें अमुकच एक फुल माझं खास आवडत आहे असं स्त्रीमनाला —क्वचित् अपवादात्मक—असंच वाटतं. स्त्रीयांच्या मनांत जर सवच फुलांची आवड नसेल तर स्त्रीत्वाच्या सर्वच भावना तिच्यात् प्रकर्षाबद्दल प्रकट झाल्या नाहींत, असं समजावयाला कांहींच हरकत नाहीं. कोमल, भावस्पर्शी मन, निदानं फुलांच्या बाबतींत तरी आवड–निवड ठवणार नाहीं ही खास आवड–निवडं हे पुरुषांचं काम आहे. नव्हे त त्यांचं वैशिष्ट्यच आहे. जगातलं चांगलं–वाईट याची निवड मुख्यतः पुरुषांनाचं करावी लागते, मग फुलांच्या बाबतीत तरी ते कसें अपवाद ठरतील? स्त्रीमनाला सर्वच चांगल दिसतं, जे वाइट दिसतं ते संस्कारानीं —दिसतं तो कांहीं स्त्रीमनाचा स्थायीभाव नव्हे. म्हणूनच मी म्हणतो कीं सर्वांनाच फुलाचं आकर्षण असतं—आवड असेलच असं नाहीं.

प्राजक्ताची इवली इवली पांढरी तांबडी फुलं कुणाचं मन आकर्षण करून घेणार नाहींत? पहाटेच्या साखरझोपेतून मी जागा होतो तो माझ्या उशाजवळच्या खिडकीतून येणाऱ्या प्राजक्ताच्या मंद सुवासानं. मी उठतो आणि प्राजक्ताच्या झाडाखालीं कांहीं क्षण बसतो. नवतरुणीच्या कानांत शोभणाऱ्या टपोऱ्या मोत्यांच्या कुड्यासारखी ती फुलं पाहिली कीं मन कसं वेडावून जातं. अशाच मनस्थितींत पहाटवाऱ्याच्या मंद झुळकींत, दवानं ओल्या-चिंब झालेल्या प्राजक्ताच्या फुलांचा अंगावर वर्षाव होतो, आणि शरीर एका नव्या अनुभूतीनं शहारून जातं. मोगरीची टपोरी पांढरी शुभ्र फुलं. जमिनीवर विसावली कीं सृष्टीमातेनं. अरुणाच्या स्वागतासाटीं काढल्या जाणाऱ्या रांगोळीच्या ठिपक्यासारखी दिसतात. त्यांचा पायांना होणारा स्पर्श तरीकिती सुखद वाटतो. तशीच...एखाद्या आंग्लयुवतीप्रमाणं पिवळसर फ्राक घालून, पानाआडून डोकावणारी, निरागस कण्हेरी, कुंपणावर चढून, तान्ह्या मुलाच्या मुठीसारखी दिसणारी गोकर्णीची फुल पाहिल्यावर वात्सल्यरसाची परवाण करणाऱ्या निसर्गमातेचं किती कौतुक वाटतं. एखाद्या खाली मान घालून असलेल्या ध्यानस्थ तपस्व्याप्रमाणं दिसणारं जास्वंदीचं फुल, लहान मुलाच्या निरागस हास्याप्रमाणं दिसणारी गुलाबाची गेंदेदार फुलं, राजाच्या दिमाखांत डोलणारी कर्दळीची जोमदार फुलं आणि राजाच्या सरदाराप्रमाणं ऐटींत सगळीकडं दृष्य टाकणारं घोतऱ्याचं फुल, पवित्र भावनांची मनांत गर्दी करून सोडणारी तगरीची फुलं, एक ना दोन. अशी फुलं पाहिल्यानंतर माणसाचं मन कां वेडं होणार नाहीं?

मला मात्र या फुलांची तितकीशी आवड नाहीं या फुलांचं मला आकर्षण वाटतं. क्षणभर माझं मन मोहित होतं पण मन रिझत नाहीं. या फुलांच्या सुवासानं मन धुंद होतं, पण क्षणकाळच, या फुलांच्या रंगानं मन आनंदित होतं पण क्षणभरच, जरा विचित्रच आहे नाहीं कां? याचा अर्थ असा नव्हे कीं माझ्या आवडीची फुलंच निसर्गात नाहींत. आहेत, अगदीं माझ्या खास आवडीची आहेत. एखाद्या बागेंत एखाद्या नवयुवती तपस्वीनीप्रमाणं दिसणारी चिरतरुणी- अशी ती अबोली, ती मला फार आवडते, त्या एकाकी फुलाकडं पाहिलं कीं मला देवघरांतल्या नंदा-दीपाच्या ज्योतीची आठवण येते. अगदीं प्रसन्न आणि शांत...त्याच्या त्या इवल्या पाकळयांचा स्पर्श, अगदीं लोण्यासारखा मऊ आणि भावस्पर्शी, त्यांचा तो रंग, धगधगत्या ज्वालेची आठवण करून देतो. अशा फुलांचा गुच्छ पाहिला कीं नुकत्याच धगधगलेल्या यज्ञकुंडाची आठवण होते. इतर फुलं झाडांवर असली कीं, मन मोहित होतं. तीच फुलं जमिनीवर पडली कीं, त्यांच्याबद्दल मनांत दया उत्पन्न होते—अबोलीचं मात्र तसं नाहीं. केव्हांहि पहा, नेहमी सतेज, प्रफुल्लीत आणि उज्वलता उधळीतच ती उभी असते. या फुलांना गंध नाहीं, पण सर्वांना, सदोदित, हंसतमुख ठेवण्यांतच ती आपल्या जीवनाची धन्यता मानेत. अविरत जीवन-सुगंध उधळणं हेच तिच्या जीवनाचं कार्य— अशी ही ध्येयवादी अबोली हीच माझं मन रिझवते, हंसवते.

लहानपणी देवाच्या पूजेची फुलं काढण्याचं काम आई मलाच सांगत असे. मी खुडलेल्या फुलांत 'अबोली' च जास्त असे. आईला मात्र एकाच प्रकारची फुलं काढलेली आवडत नसत. एखादे दिवशीं मीं फक्त अबोलीच काढून आणित असे. मग आई मला म्हणे- अरे, तांबडं फुल गणपतीला आवडतं. पांढर फुल विष्णुला आवडतं. अबोलीची फुलं फक्त सौंदर्यच वाढवतात. म्हणून तांबडी व पांढरी फुलं काढावीत! पण मला ते आवडत नसे. परमेश्वराजवळ एवढा भेदभाव असेल तर मानवानं आपल्यात भेद ठेवले म्हणून कुठं बिघडलं. मी आईला म्हणत असे " पण आई, मला अबोलीचीच फुलं देवाला वाहिलेली

## कायदा गाढव आहे !

हृदयाची चोरी
तूं एकट्यानीं
केलीस
पण
प्रतिभा,
' चतुर्भूज ' मात्र
आपल्याला
दोघांना व्हावं लागलं !

—सदाशिव करंदीकर

## श्रावणांतली सकाळ

श्रावणांतली सकाळ भिजून येते चिंब
परसदारीचा असतो निथळत उभा निंब

मातीचें ओलेपण आतां असतें सजलेलें
गर्भांतून हिरवें तण पुरतें असतें रुजलेलें

वाऱ्यालाही असतो वेध वादळाचा
पाझरानें होतो भेद कातळाचा

ओली ओली हवा आणि सारेच असतें ओलसर
ओल्या इच्छेभोंवतीच पडतात गळेसर

श्रावणांतली सकाळ भिजून येते चिंब
तिच्याही मनांत असतें उन्हाचेंच बिंब

—राजा मंगळवेढेकर

आवडतांत. आईच्या चेहऱ्यावरचे नाराजीचे भाव पाहिले कीं अबोलीबद्दल मला अधिकच आकर्षण वाटे.

एवढ्यासाठींच मला अबोली आवडते असं नाहीं. अबोलीची फुलं पाहिली कीं माझी स्मृति चाळवते अन् माझ्या स्मृतिच्या खोल खोल दरींत माझं मन वेड्यासारखं भटकतं, आणि माझ्या मनापुढं तो प्रसंग अगदीं जसाच्या तसा ऊभा राहतो...

४२ चे दिवस होते. राष्ट्राच्या मुक्तीचा संग्राम सर्वजण प्राणपणानं लढवत होते. लहान थोर, तरुण-तरुणी, स्त्री-पुरुष, या सर्वांनीं या प्रचंड लढ्यांत भाग घेतला होता. मी त्यावेळीं लहान होतो. मला समजत होतं पण उमजत नव्हतं. माझ्या गावांनं या लढ्यांत मोठीच कामगिरी केली होती. प्रचंड निदर्शनें, पत्री-सरकार, संप—हरताळ या मार्गांनी प्रचलित सरकार अगदीं नाममत्र झालं होतं. अशा या परिस्थितींत तो दिवस उजाडला गावांत सकाळींच बातमी पसरली. आज गावांत प्रचंड निदर्शनं होणार... मी घाबरलो-बावरलो. माझ्या घरासमोरच मोर्चा थांबणार होता. पोलिसांची गस्त जोरांत सुरू झाली. क्षणकालांत माझ्या घरासमोर युद्धक्षेत्रा-सारखी परिस्थिति निर्माण झाली. पोलिसांची धावपळ, गडबड, आरडाओरडा...इतक्यांत म. गांधीकी जयची ललकारी ऐकूं आली. आणि जवळजवळ ४-५ हजारांचा जमाव क्षणार्धांत त्या ठिकाणीं जमा झाला. मी घराच्या खिडकीतून तो महान संग्राम पहात होतो. राष्ट्रपुरुषांच्या घोषणेनं सारं वातावरण दुमदूमन गेलं होतं. इतक्यांत...सूं: सूं करीत बंदुकीतून गोळ्या सुटूं लागल्या. कांहीं क्षणांतच दोन चार माणसं गारद झाली. जमाव पांगू लागला. बेशिस्त जमाव सैरावैरा धांवू लागला, आणि उन्मत्त साम्राज्य-शाहीकडून गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला... इतक्यांत आई ...ऽऽ अशी आर्त किंकाळीं माझ्या कानांत शिरली. मी मनांत चरकलो...कदाचित् ...माझा अंदाज खरा ठरला. जमावाच्या सर्वांत पुढं असलेल्या एका मातेच्या कडेवरील ती सहा-सात वर्षांची मुलगी रक्तानं न्हावून निघाली होती. तिच्या मर्मस्थानी ती गोळी बसली होती. पाणी...पाणी ती ओरडत होती. क्षणभर मी बावरलो. पण कांहीं क्षणच...इतक्यांत माझ्या पायांत बळ आलं. मी त्वरेनं खाली आलो, पाण्यानं भरलेलें फुलपात्र हातांत घेतलं आणि घराच्या बाहेर पडलो, पण...त्या ठिकाणीं ती लहान बालिका दिसली नाहीं. तिची दीन मुद्रा मला दृष्टीस पडली नाहीं. सामसूम, शांत... अगदीं शांत झालं होतं सगळीकडं.. नाहीं म्हणायला दुरुन येणारा अस्पष्ट असा कोलाहल मात्र ऐकूं येत होता...मी त्या बालिकेचं रक्त सांडलं तिथं आलो...जड अंतःकरणानं-सारी माती रक्तानं न्हावून निघाली होती...आणि त्यांतच तिच्या केसांतील ती अबोलीची वेणी हंसतमुखानं माझ्याकडं पहात होती. मी ती वेणी अधिरतेनं, विषण्णतेनं उचलली...जड अंतःकरणानं मी घरी आलो.

त्यानंतर ती अबोलीची वेणी माझ्या संग्रहांत कितीतरी दिवस होती. काल बदलला. परिस्थिती बदलली...ती अबोलीची वेणीहि अशा काळाच्या उदरांत नाहींशी झाली...गंध नसलेली ती अबोली, जीवनांत सुगंध कसा निर्माण करता येतो, याची शिकवण देऊन ती काल-पटलावर अदृश्य झाली. तिचा तो रंग जगांत जीवन कसं जगतां येतं हे सांगत होता. आजहि ज्या ज्या वेळीं मी अबोलीची फुलं पाहतो त्या त्या वेळीं...या प्रसंगाची मला आठवण येते आणि मन एका नवीनच पवित्र भावनांनीं भरून येतं, एक नवी अनुभती येते आणि एक नवंच चैतन्य माझ्या जीवनांत येतं. एक नवीनच उर्मि जीवनांत प्रकर्षानं प्रकट होते. आणि मी माझं जीवन समृद्ध करतो...

आणि म्हणून अबोली ही माझ्या आवडीची खास आवडीची आहे.

## संपूर्ण रहस्यकथा

# स्त्रीहृदय

बाबुराव अर्नाळकर



**डिटेक्टीव्ह फाल्गुनरावांची वागणूक सहानुभूतिपूर्व असल्यामुळें त्यांच्या अशीलांचा त्यांच्यावर विश्वास बसत असे. कुणीहि माणूस आपले गाऱ्हाणें घेऊन त्यांच्या** ऑफिसांत आला कीं, तो अगदीं गोंधळून जात असे आणि काय बोलावें हें त्याला सूचत नसे. पण फाल्गुनराव त्याचा विश्वास संपादन करून खुबीनें त्यांना हवी असलेली माहिती मिळवीत असत.

या विशिष्ट सकाळीं रंगनाथ वर्तक नांवाचें एक नवे गिऱ्हाईक त्यांना भेटावयास आले होते. वर्तक उंच, शरिरानें धिप्पाड, निळसर डोळ्यांचे आणि काळ्यासांवळ्या वर्णाचे गृहस्थ होते. ते फाल्गुनरावांच्या समोर बसून बराच वेळ कांहीं न बोलतां आपल्या टोंकदार मिशा नखांनीं कुरतडत होते.

'मी तुमची जाहिरात वाचली.' शेवटी वर्तक भानावर येऊन म्हणाले, 'आणि वाटले कीं, तुमची भेट घ्यावी.'

'बरोबर आहे.' फाल्गुनराव म्हणाले, 'मनाविरुद्ध गोष्टीं घडूं लागल्या कीं, माणूस धोका पत्करण्यास तयार होतो.'

'बरोबर आहे.' वर्तक उत्साहाने म्हणाले, 'बऱ्याच गोष्टीं माझ्या इच्छेविरुद्ध घडत आहेत आणि त्याबाबत काय करावें हें समजत नाहीं.'

'तर मग तुम्ही योग्य ठिकाणीं आलांत' फाल्गुनराव म्हणाले, 'कारण, कोणत्याहि परिस्थितींत काय करावें हें मला बरोबर समजते. सर्व मानवी दुःखावर मी योग्य उपचार करूं शकतो.'

'ही विश्वास न ठेवण्यासारखी गोष्ट आहे.' वर्तक म्हणाले

'नाहीं, त्यांत कठीण असें कांहींच नाहीं. मानवी दुःखाची मूळ कारणें फार थोडी असतात. आजार, निरुद्योग, कांहीं स्त्रीयां आपल्या नवऱ्यामुळें संकटांत सांपडतात, कांहीं नवरेहि असें असतात कीं, ज्यांना आपल्या स्त्रीयांमुळें त्रास होतो.'

'अगदीं बरोबर ओळखलेत!' वर्तक खूष होऊन म्हणालें, 'अगदीं तेच!'

'मला तुम्हीं त्याबद्दल माहिती द्या.' फाल्गुनराव म्हणाले.

'सांगण्यासारखे विशेष नाहीं. दुसऱ्या माणसाबरोबर लग्न करतां यावें म्हणून माझी बायको घटस्फोट घेण्यास तयार झाली आहे.' वर्तक म्हणाले.

'अलिकडे या असल्या गोष्टीं आपल्याहि देशांत घडूं लागल्या आहेत.' फाल्गुनराव म्हणाले, 'तुम्हांला बायकोने तसें करावें असें वाटत नाहीं?'

'माझे तिच्यावर प्रेम आहे— अतिशय प्रेम आहे. मी तिची पूजा बांधतो. ज्या भूमीवर तिची पावलें उमटतात ती माझ्या दृष्टीनें पवित्र असते. मी तिच्याकरितां माझ्या शरिराचे राईएवढाले तुकडे करण्यास तयार आहे. आतां तुम्हींच सांगा, अशा परिस्थितींत मी काय करावें? तिच्या मनांत तर दुसरा माणूस भरला आहे.'

'आणि त्याकरितां ती घटस्फोट घेण्यास तयार झाली आहे?'

'होय, पण तीला कोर्टांत उभे रहावें लागल्यानें अतिशय मानसिक त्रास होईल. तो त्रास होऊं नये अशी माझी इच्छा आहे' वर्तक म्हणाले.

फाल्गुनरावानी आपली पगडी हाताने वर सरकविली आणि चष्म्यावरून आपल्या गिऱ्हाईकाकडे पहात ते म्हणाले, 'तुम्हीं माझ्याकडे कशासाठीं आलां आहांत?'

वर्तक निलाजरेपणें हसले, 'मला तेहि समजत नाहीं.' ते म्हणाले, 'हें पहा, मी कांहीं हुशार नाहीं आणि मला कांहीं कल्पना सुचत नाहीं, तेव्हां तुम्हीं कांहीं मार्ग सुचवूं शकाल असें मला वाटले, मला तिने सहा महिन्यांची मुदत दिली आहे. सहा महिन्यांनंतरहि जर तिचे आजचे मत कायम राहिले तर मी तिच्या मार्गांत कांहीं अडथळा आणूं नये असें आमचें ठरले आहे. म्हणून मी तुमच्याकडे आलो. सध्यां मी कांहीं केलें तरी ती चिडते अशी परिस्थिती आहे.'

'मी साधाभोळा माणूस आहे. मी टेनिसचा खळ खेळूं शकतो पण मला संगीताची, चित्रकलेची, नाटक–सिनेमाची आवड नाहीं. माझी बायको हुशार आहे. तिला चित्रपट, नाटकें, जलसें फार आवडतात. स्वाभाविकपणेंच मी तिच्याबरोबर असलो तर ती कंटाळते आणि हा जो लांब केसांचा पाजी माणूस आहे त्याला तें सर्व समजते. तो या विषयावर तिच्याशीं तासा न तास बोलूं शकतो. तिच्यासारख्या हुशार आणि सुंदर स्त्रीला माझ्यासारख्या अरसिक गाढवाचा कंटाळा यावा हें माझ्या मतेंहि स्वाभाविक आहे.

' तुमच्या लग्नाला किती वर्षें झाली ? ... नऊं वर्षें ! आणि सुरुवातीपासूनच तुमची अशी वागणूक आहे ? ' फाल्गुनरावांनीं विचारलें, " वर्तकसाहेब, ही फार मोठी चूक आहे. नवऱ्यानें इतकी लीनता स्वीकारणें कुणाहि स्त्रीला आवडणार नाहीं. त्यामुळें तीं तुमच्याबद्दल भलतेच अंदाज करूं लागते. "

' तुम्हांला व्यायाम खेळायला हरकत नाहीं. टेनिस खेळायलाहि हरकत नाहीं, तुम्हीं तिच्याबरोबर संगीत आणि कला याबद्दल तुम्हांला जें सुचेल तें बोलायला हवे होते. तिला तुमच्याप्रमाणें चांगलें टेनीस खेळतां येत नाहीं याबद्दल तुम्हीं सहानुभूति व्यक्त करायला हवी होती. अलिकडच्या कुणाहि स्त्रीला आपला नवरा वावळट असणें आवडणार नाहीं. तिनें घटस्फोट घेण्याचें ठरविलें यांत कांहीं नवल नाहीं. '

' तें सर्व खरे ' पण मी आतां काय करावें असें तुम्हांला वाटतें ? '

' तो प्रश्न महत्त्वाचा तर खराच, नऊं वर्षांपूर्वी तुम्ही जें करावयास हवे होतें तें आतां करण्यात कांहींच अर्थ नाहीं. तेव्हां कांहींतरी नवीन केले पाहिजे. तुम्हीं कधीं इतर स्त्रीयांबरोबर भानगडीं केल्या होत्या काय ? '

' अर्थातच नाहीं, ' वर्तकांनी ठासून सांगितलें.

' भानगड म्हणजे, एखादें क्षुल्लक प्रेमप्रकरण तरी ? '

' मी स्त्रीयांकडे कधीं लक्षच दिलें नाहीं. '

' ती तुमचीं चूकच झाली, तुम्हीं आतां ती सुरुवात करायला हवीच. ' फाल्गुनराव म्हणालें.

वर्तक घाबरून म्हणाले, ' पण मला तें कसें

# महाराष्ट्र पंचारती !

आनंदघन जय त्रिभुवन भूषण वंदन आनंदवन भुवनाला ।
पंचप्राण पंचारती भारतीं ओवाळूं या प्रिय महाराष्ट्राला ॥ धृ ॥

दुर्गम सातपुडा सह्यगिरी दुर्गधारी स्वातंत्र्य मुरारी ।
पूर्णा पैना गोदा कृष्णा संतजननी इंद्रायणी मधुरी ।
श्यामल धरणी, सुम पुष्करिणी सुफल सुवर्णी बरखत न्यारी ।
नील गगनामृत इंद्रचापधर ! चंद्रसाच्या दर्यालहरी ।
पंचभुतांचा सुंदर संगम भूवर नीरुपम निसर्ग फुलला ।
पंचप्राण पंचारती भारतीं ओवाळूं या प्रिय महाराष्ट्राला ॥१॥

श्रमधर्मगुणी, कर्मवीरखनी, प्रेमवर्धिनी परम संस्कृती ।
सुशील कामिनी, व्रत सौदामिनी, राज्यधुरामणी, नरगुण कीर्ती ।
मल्लजंग, भक्तिअभंग, वीरश्रीरंग, जन शाहीरी स्फूर्ती ।
घडवीत नव इतिहास यशाचा ! वंश लढविले धारातीर्थी ।
धन्य ! जन्म दे जननी मराठी शिवछत्रपती युग पुरुषाला ।
पंचप्राण पंचारती भारतीं ओवाळूं या प्रिय महाराष्ट्राला ॥२॥

महादेव महाराष्ट्र तात ! श्री मराठी मुम्बाआई ।
भाळीं चंद्र दंडकारण्य ! गंगोत्रि दमण गंगाई ।
नाग फणी ! व्याघ्रांबर विदर्भ मराठवाडा राई ।
वेणुग्राम कारवार शुभपद ! सांब नाचतो विजयी ।
विक्रमी भोळा, मराठ मोळा, सह्य कपाळा तिसरा डोळा ।
पंचप्राण पंचारती भारतीं ओवाळूं या प्रिय महाराष्ट्राला ॥३॥

वंद्य पंचखंडांत हिंदु भू जनतंत्राचा थारा ।
सोळा श्रृंगारांत हिंदकटि महाराष्ट्रे असिधारा ।
ममता, समता, उद्यम सविता, विज्ञानाचा होरा ।
पृथ्वीचा हा प्यारा ! सजवीत विश्वाच्या संसारा ।
यावत्चंद्र दिवाकरौ हा आत्म प्रभागुण उधळो भूतला ।
पंचप्राण पंचारती भारतीं ओवाळूं या प्रिय महाराष्ट्राला ॥४॥

—शाहीर आत्माराम पाटील

शक्य आहे? फाल्गुनराव, मला तें जमायचें नाहीं.'

'जमेल, तुम्हांला मुळींच त्रास होणार नाहीं अशा प्रकारें आम्हींच ती व्यवस्था करूं' फाल्गुनराव म्हणाले, 'त्यासाठीं माझ्याच एका मदतनिसाचा उपयोग करण्यांत येईल. तुम्हीं काय करावें तें तीच तुम्हांला सांगेल. घाबरूं नका, एक अवश्यक गोष्ट म्हणून आपणांला तें नाटक करावयाचे आहे.'

वर्तकांचें समाधान झालेले दिसले. 'नाटक असेल तर ठीक', ते म्हणाले, 'पण तसें केल्यानें आमची मीना सहा महिने न थांबता लागलींच घटस्फोट घेईल असें तुम्हांला नाहीं वाटत?'

'तुम्हांला मानवी स्वभावाची ओळख नाहीं.' फाल्गुनराव म्हणाले, 'त्यांतून स्त्रीचें मन तुम्हीं मुळींच ओळखत नाहीं. सध्यां स्त्रीच्या दृष्टीकोनांतून तुम्हांला जुन्या अडगळी इतकीहि किंमत नाहीं. कुणालाहि तुमची गरज नाहीं आणि जो कुणालाहि हवासा वाटत नाहीं अशा नवऱ्याचा स्त्रीला उपयोग काय? पण समजा, तिच्याप्रमाणें तुम्हींहि स्वतंत्र बनण्याच्या प्रयत्नांत आहांत असें जर तुमच्या बायकोला समजले तर?'

'तर ती अतिशय खूष होईल.' वर्तक म्हणाले.

'मला तसें वाटत नाहीं, उलट एका अतिशय आकर्षक तरुणीचें मन तुम्हीं खेचून घेतलें आहे असें जर तिला दिसून आले तर तुमचा भलताच भाव वाढेल. तुम्हांलाच आपल्या बायकोचा कंटाळा आला होता आणि दुसऱ्या सुंदर तरुणीबरोबर लग्न करण्याची तुमची इच्छा होती असे तुमचे सर्व ओळखीचे लोक म्हणतील हें तुमच्या बायकोच्या लक्षांत येईल आणि ते तिला खचित आवडणार नाहीं.'

'असें तुम्हांला वाटते?'

'माझी पूर्ण खात्री आहे.' फाल्गुनराव म्हणाले, 'तुम्हांला कुणी 'गरीब बिचारा रंगू' म्हणणार नाहीं, 'लबाड रंग्या' म्हणतील. आणि तसें झाले कीं, ती तिच्या त्या लांब केसांच्या मित्राला सोडून पुन्हां तुम्हांला हस्तगत करण्याचा प्रयत्न करील. तुम्हीं तिला दाद देणार नाहीं— पण त्या सूचना आम्हीं तुम्हांला नंतर देऊं.'

'ही तुमची योजना यशस्वी होईल असें तुम्हांला वाटते?' वर्तकांनी अविश्वासानें विचारले.

'माझी तशी खात्री आहे.' ते म्हणाले, 'फक्त एकच गोष्ट आहे, तुमच्या बायकोचे त्या लांब केसाच्या माणसावर जर खरोखरच प्रेम जडले असले तर मात्र तुम्हीं कांहीं केलेत तरी त्याचा तिच्या मनावर परिणाम होणार नाहीं. पण मला तसें वाटत नाहीं, तुम्हीं गेलीं नऊ वर्षे तिच्या सभोंवति जें भकास आणि नीरस वातावरण निर्माण केलेत त्यामुळेंच तिनें हें बंड पुकारलें आणि जर तुम्हीं माझ्या सूचनांप्रमाणें वागाल तर तुम्हांला सत्याण्णव टक्के निश्चित यश मिळेल.'

'ठीक आहे, मी तुमच्या सूचना अंमलात आणिन, या कामासाठीं तुम्हीं पैसे किती घेणार?'

'माझी फी दोन हजार रुपये आहे.' फाल्गुनराव म्हणाले, 'आणि माझ्या नियमाप्रमाणें तुम्हांला ते पैसे आगाऊ द्यावे लागतील.'

रंगनाथ वर्तकांनी आपलें चेक–बुक बाहेर काढलें.

★●●●★

हँगिंग गार्डनवरील एका बाकावर मीना वर्तक आपली मैत्रीण उषा हिच्याबरोबर बोलत होती. मीनाचा पेहराव आकर्षक होता आणि वेषभूषा शास्त्रांत ती पारंगत असल्यामुळें वयाची पस्तीशीं उलटली असतांनाहि ती पंचवीशीच्या आंतली तरुणी दिसत होती.

"...म्हणून म्हणते माणसानें जगावें आणि इतरांनाहि जगूं द्यावें.' मीना आपलें बोलणें पूर्ण करतांना म्हणाली.

'तूं खरोखरच फार हुशार आहेस.' तिची मैत्रीण उषा म्हणाली, 'पण तुझ्या यजमानांची ही मैत्रीण कोण?'

'मला तें विचारूं नकोस.' मीना म्हणाली, 'आमच्या बिचाऱ्या रंगूला ती कुठेंतरी सांपडली. खरे पाहिलें तर तें कधींच कुठल्याहि स्त्रीकडे पहात नाहींत. आपणांला एक मैत्रीण भेटली असें ते म्हणाले, तेव्हां मला हंसून कोसळले माझ्या माहितीप्रमाणें ते तिला घेऊन या बागेत येणार आहेत.'

'पण आमच्या रंगोबाला ती भेटली कुठें?' उषानें विचारलें.

## पुराण

सौ पुढें
वाचली पोथी!
तांब्याकडली
आमटीच
बरी होती!!

—सदाशिव करंदीकर

*Best Wishes For A Happy Diwali*
*and a Prosperous New Year to All*

★ ★ ★

SHREE GANESH TEXTILES
Mfg. of Handloom Sarees
205, Ganesh Peth,
POONA 2.

'मला तें माहीत नाहीं, ते त्यासंबंधीं अगदीं संदिग्धच बोलतात.' मीना म्हणाली.

'कदाचित् त्यांची आणि तिची फार जुनी ओळख असेल?' उषा म्हणाली.

'मला तसें वाटत नाहीं, अर्थांतच मला त्याबद्दल आनंदच होता, कारण माझा मार्ग मोकळा होतो.' मीना म्हणाली, 'खरें म्हणशील तर तें स्वभावानें अगदीं गरीब आहेत आणि मला त्यांची दया येते. मी तसें वसंतरावानाहि सांगितलें,' पण वसंतराव म्हणालें कीं, 'रंगरावांना चार दिवसांनंतर घटस्फोटाची आठवणहि रहाणार नाहीं आणि माझ्या नऊ वर्षांच्या अनुभवावरून मला वसंतरावांचें म्हणणें पटलें.

'पण इतके झालें तरी माझ्या मनाची सारखी ओढाताणच चालू होती आणि दोन दिवसांपूर्वी आमचे रंगोबाहि इतके खिन्न दिसत होते कीं शेजाऱ्यांनाहि त्यांची दया यावी पण आतां त्यांना ही मैत्रीण मिळाली आहे. त्यांना आनंदात पहावे म्हणून मी येथें आले आहे आणि तुलाहि येथें आणले आहे. मला तिचा मुळींच मत्सर वाटणार नाहीं. पण ती पहा. ती जोडी आलीच.'

'मीना, ती अतिशय सुंदर आहे! रागावूं नकोस, पण खरेच सांगायचे तर ती तुझ्याहिपेक्षां कितीतरी सुंदर आहे.' उषा म्हणाली, 'आणि तिच्या चर्येवरून ती सुस्वभावी दिसते.'

'ती सुंदर आहे हें मला मान्य आहे. पण तिचा स्वभाव चांगला असेल असें मला वाटत नाहीं.'

'तिचा पेहराव भारीच मौल्यवान आहे.' उषा म्हणाली,

'होय, तसा कांहीं वाईट नाहीं. मीना म्हणाली.

या दोघी मैत्रिणी एका आडोशाला बांकावर बसल्या होत्या. रंगनाथ वर्तक आणि मोहना एकमेकांच्या हातांत हात घालून आनंदानें हंसत व बोलत येत होती त्यांनीं समोरच्या एका बांकावर बैठक मारली. रंगनाथ वर्तक बावरलेल्या नजरेनें आजुबाजूला पहात होते. जवळपास कुठेतरी आपली बायको असणार याची त्यांना जाणीव होती. पण मोहनानें इतर कुणाला समजणार नाहीं अशा प्रकारें त्यांना चिमटा घेतला आणि ती म्हणाली, 'माझ्याकडे पाहून हंसा आणि माझ्या गळ्यांत हात घाला.'

## स्त्रियांचें शब्दार्थ

स्त्री जेव्हां
'आम्हीं नाहीं जा'
म्हणते तेव्हां
त्याचा अर्थ
'होय' असा असतो
आणि
'बघूं' म्हणते
तेव्हां त्याचा अर्थ
चक्क
'नाहीं' असा असतो

त्यांनी तसें केले आणि मोहना त्यांना जास्तच बिलगली.

'अगं मीना, ती त्यांची नुसती मैत्रीण नाहीं, हा कांहीं वेगळाच प्रकार दिसतो. तिचे रंगनाथांवर प्रेम जडलेले दिसतें.'

'भलतेंच!' मीना म्हणाली,

'पण तीं त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीनें पहात आहे ते पहा' उषा म्हणाली, 'कशी अगदीं मांजरीसारखी त्यांना बिलगून बसली आहे.'

मीना कांहीं क्षण अगदीं स्तब्ध बसली होती. नंतर ती म्हणाली, 'त्यांत मला चिंता करण्यासारखें काय आहे?'

मीना उठली आणि सरळ चालत रंगनाथाकडे गेली. तिला पहाताच ते उभे राहिले, मोहनाहि त्यांना चिकटूनच उभी राहिली.

'तुमचा वेळ मजेत चालला आहे ना?' तिनें आपल्या नवऱ्याला विचारलें.

'होय, हवा फार चांगली पडली आहे.' रंगनाथ वर्तक अडखळत म्हणाले, 'ही बागहि सुंदर आहे—'

'आणि तुमची मैत्रीणहि सुंदर आहे.' मीना म्हणाली, 'तुम्हांला आनंदात पाहून मलाहि आनंद होतो. पण तुम्हीं तुमच्या मैत्रीणीला आपले घर कां दाखवीत नाहीं?'

'होय रंगनाथ, मला तुमचें घर पहायचें आहे.' मोहना लाडीकपणें म्हणाली, 'मला तुम्हीं आतांच तेथ घेऊन चला.'

आपल्या नवऱ्याच्या त्या प्रेमप्रकरणामुळें आपणांला मुळींच वाईट वाटत नाहीं हें आपल्या मैत्रिणीच्या मनावर ठसविण्यासाठीं मीनाहि त्यांच्याच मोटारीनें घरी गेली.

वर्तकांना अभिनय करणें मुळींच जमत नव्हतें. त्यांच्या एका बाजूला मोहना आणि दुसऱ्या बाजूला मीना बसल्यामुळें त्यांची तारांबळ उडाली होती. मग त्यामुळेंच अगदीं सहज अभिनय निर्माण होत होता आणि मीनाचें हृदय हेलकावे खात होतें.

वर्तकांना आपल्या बायकोकडे पहाण्याची हिंमत होत नव्हती. तिच्या तोंडून अगदीं साधा शब्द निघाला तरी ते दचकत असत. त्यांना स्वतःचीच लाज वाटत होती पण तें नाटक मुळींच आवडत नव्हते. पण त्यामुळें तेथें बरेंच पाणी मुरले आहे अशी मीनाची समजूत होत होती.

घरीं पोहोंचल्यानंतर मीनानें वर्तकांना एका बाजूला गांठलें आणि अचानक विचारले, 'तुमची आणि तिची केव्हांपासून ओळख झाली?'

'कु...कु ..कुणाची?'

'तुमच्या त्या प्याऱ्या मोहनाची.'

'तशी फारशी ओळख नाहीं, म्हणजे अगदीं अलीकडची-आमची फार जुनी ओळख आहे.'

'अस्सें! पण तुम्हीं तिचें कधीं नांव नव्हतें घेतलें?' 'नव्हते घेतलें? मी—मी तें विसरलो असेन.'

'अगदीं विसरण्यासारखीच गोष्ट होती!' ती खवचट स्वरांत म्हणाली, पण त्यावेळीं तेथें मोहना आल्यामुळें तिला आपल्या नवऱ्यापासून दूर व्हावें लागलें होतें.

चहापानानंतर मोहनानें अतिशय आग्रह धरल्यामुळें वर्तकांनी तिला आपला बाग दाखविला ते बागेंत मोहनाबरोबर फिरत असतांना बंगल्याच्या पहिल्या मजल्यावरील एका खिडकीतून दोन डोळे आपणांवर रोखले आहेत याची त्यांना जाणीव होत होती.

बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर वर्तक आपल्या मैत्रिणीला म्हणाले, "हें बघ, मला वाटतें आपण आतां आपले नाटक येथेंच थांबवावें, माझी बायको माझ्याकडे अगदीं तिरस्कारानें पहात होती.'

'तुम्हीं मुळींच चिंता करूं नका, सर्व कांहीं

# राजमार्ग

रतिसौख्यांतहि प्रीत हुडकणें राजमार्ग हा साधासा
डावलणें त्या आडमार्ग तो कुणा न कधींही पहायचा
दो हृदयांचें मीलन सुंदर संभोगाविण होईना
आणि कुठें अपवाद आढळे आम्हां पामरां समजेना
राधेची मधुराभक्ती कशि कृष्णाठायीं जडलेली
पतीस विसरूनि भजे हरीला रीत आम्हां ही उमजेना
पुराणांतलीं वांगीं तीं तर तिथेंच शोभुनि दिसायचीं
इथें कुणा ती येतां प्रचीति – शोभा त्यांची व्हायाची
दो देहांच्या मीलनांतही जें गवसेना सामान्यां
तें तुम्हां सहजीं सांपडतां – खरें कुणींही मानीना
खरें कुणीही मानीना हो—म्हणुनि नका ना सांगू कुणा
जगावेगळें तुम्हीं मिळविलें—कुतुकें कोणी पाहीना
कुतुकें कोणीं पाहीना हो — नका नका तुम्हीं झुरूं मनीं
आज उद्यां ना कधींतरि परि हेम खरें झळकेल जनीं
हेम खरें झळकेल जनीं हो — धीर धरा तोंवर तुम्हीं
व्याकुळ होवुनि फुका जिवाची — नका नका करूं काहिली
अद्‌भुत अघटित पाहियलें जें –– आतुर तुम्हीं वर्णाया
दुर्लभ श्रोता –– सुज्ञ समंजस — म्हणुनि मिटुनि घ्या अधरांना
दो हृदयांचें मीलन सुंदर संभोगाविण घडलेलें
तुम्हां समजलें — तुम्हां उमजलें — महति काय हो क्षुद्रांना ?
रतिसौख्यांचा राजमार्ग हा धोपट बरवा सकलांना
सरपटल्याविण उंच भरारी स्वप्नांतहि कुणि पाहीना
स्वप्नांतहि कुणि पाहिना जें तुम्हीं पकडतां मुठीमध्यें
आ वासुनि पाहती बापुडे — भुईवरी सरपटणारे
दिव्य अलौकिक साक्षात्कारा — नका गोंवुं शब्दांमध्यें
देवमूर्ति देव्हारिंच ठेवा — वृथा नास्तिकां — कां कोडें ?
राजमार्ग तो — दैवी पथ हा कुणा न कधींही कळायचा
निराकार निष्काम प्रेम हें — ठेवा जणुं दस लाखांचा !

— सौ. ललिता-गौरी देशपांडे एम्. ए.

ठीक होईल. ' मोहना म्हणाली.

' तुला तसें वाटतें ? हें बघ मला माझ्या बायकोला जास्त डिवचायचें नाहीं. चहापानाच्या वेळीं ती आढून कसा गोळीबार करीत होती हें तुला आठवतें ना ? '

' चांगलें आठवतें ' मोहना म्हणाली, ' तुम्हीं तुमचे काम अगदीं बेमालूमपणें करीत आहां. '

' तुला तसें खरोखरच वाटते ? ' वर्तकांनी खूष होऊन विचारलें.

' होय, ' मोहना अगदीं हलक्या आवाजात म्हणाली, ' हें पहा, तुमची बायको घराच्या गच्चीवर चढून आपण काय करीत आहोंत हें पहात आहे. तेव्हां तुम्हीं आतां माझें चुंबन घ्या. '

' काय म्हणतेस ? ' वर्तक दचकून म्हणाले, ' चुंबन घेऊं ? पण तसें करण्याची काय आवश्यकता आहे ? हें आपले देशी नाटक आहे, थोडाच परदेशी चित्रपट आहे ? '

' आधीं चुंबन घ्या. ' मोहना बंगल्याकडे पाठ करून रागानें म्हणाली.

आणि वर्तकांनी नाईलाजानें तिचें चुंबन घेतलें. ते घाबरलें होते, पण मोहनानें त्यांना घट्ट पकडलें होते, जणूं काय ती त्यांना आयुष्यभर तशी पकडून ठेवणार होती !

' अरे देवा ! ' तिच्या पकडीतून सुटल्यानंतर घामाघूम झालेले वर्तक म्हणाले.

' तुम्हांला माझा राग आला काय ? ' मोहनानें विचारलें.

' नाहीं, तसा राग आला नाहीं, आयुष्यांत कुणाहि स्त्रीनें माझें असें चुंबन घेतलें नव्हतें. आणि बायको तर माझ्यापासून नेहमीं दोन हात दूर रहात होती. '

' चला आतां ' मोहना म्हणाली, ' आपला बागेतला सीन मोठा परिणामकारक ठरला आहे.'

ते बंगल्यात परत गेले, पण मीना त्यांच्या स्वागताला हजर नव्हती. ती आपल्या खोलीत विश्रांति घेत आहे असें त्यांना नोकरानें कळविलें.

आणखी कांहीं वेळान जेव्हां वर्तक मोहनाजवळ आले तेव्हां त्यांची मुद्रा अतिशय कष्टी दिसत होती.'

' तिची प्रकृती एकदम बिघडली आहे. ' ते म्हणाले, ' वायू झाल्याप्रमाणें ती बरळत आहे. '

' छान ! ' मोहना आनंदानें म्हणाली

'तूं किती निर्दय आहेस!' वर्तक म्हणाले, 'मी तुझें चुंबन घेतलें तें तिनें पाहिलें!'

'तिनें पहावें म्हणून तर आपण तसें केलें.' मोहना म्हणाली.

'अग, तें खरें, पण तें नाटक होतें हें मी तिला कसें सांगणार? काय बोलावें हेंच मला समजेना, मी म्हणालो कीं— कीं— तें— तसें घडलें खरें.'

'शाबास! गणपतराव बोडसांनासुद्धां तसें जमलें नसतें.'

'ती म्हणाली, कीं, तूं माझ्याबरोबर लग्न करण्यासाठीं कारस्थान रचलें आहेस आणि तूं चांगली बाई नाहींस, तेव्हां मात्र मी चिडलो. तूं नाटकांतील तुझें काम करीत असतांना तिनें तुला कां म्हणून दोष द्यावा? मी तिला साफ सांगितलें कीं, ती जें तुझ्याबद्दल म्हणाली तें अगदीं खोटें आहे आणि मला तुझ्याबद्दल अतिशय आदर वाटतो, पण त्यामुळें ती अधिकच चिडली.' वर्तक म्हणाले.

'तुम्हीं तर बहारच केलीत!' ती म्हणाली.

'पण नंतर तिनें मला येथून निघून जाण्यास सांगितलें. पुन्हां माझ्याबरोबर बोलण्याची तिची इच्छा नाहीं. मी जर येथून निघून गेलो नाहीं तर ती घर सोडून जाणार आहे. तेव्हां आतां करायचें कसें? फाल्गुनराव जवळ असते तर त्यांनीं कांहींतरी मार्ग सुचविला असता.'

मोहना हंसली, 'मी तुम्हांला मार्ग दाखवितें.' ती म्हणाली, 'तिला सांगा कीं, मी आज रात्री येथेंच रहाणार आहे आणि उद्या सकाळीं आपण दोघेहि हें घर सोडून बाहेरगांवीं जाणार आहोंत.'

'पण तिला सोडून मला बाहेरगांवी जायचें नाहीं.'

'तें ठीक आहे. तुम्हांला जावें लागणारहि नाहीं.' ती म्हणाली, 'तुम्हीं माझ्याबरोबर बाहेरगांवी जाण्याची कल्पना तुमच्या बायकोला मुळींच आवडणार नाहीं.'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेव्हां वर्तक मोहनाला भेटले तेव्हां त्यांनीं नवीनच बातमी आणली होती.

'ती म्हणते कीं, आपण रात्रभर विचार केला आहे. हें माझें घर असल्यामुळें मी येथून बाहेरगांवी जावें असें सांगण्याचा तिला अधिकार नाहीं आणि सहा महिने थांबण्याचें वचन दिल्यामुळें तिला येथून जाता येणार नाहीं, पण जर मी माझी मैत्रीण येथें आणतो तर तिला तिच्या मित्राला बोलाविण्याचा अधिकार आहे आणि त्याप्रमाणें ती त्या वसंतरावाला येथें बोलाविणार आहे.' वर्तक म्हणाले.

'घटस्फोट घेतल्यानंतर ज्याच्याबरोबर ती लग्न करणार आहे तो माणूस?' मोहनानें विचारलें.

'होय तोच, आणि त्यानें जर माझ्या दारांत पाऊल ठेवलें तर मी त्याचे सर्व दांत पाडणार आहे!' हाताच्या मूठी आंवळून वर्तक रागानें म्हणाले, 'मी तिला तसें सांगितलेंहि आहे.'

'नाहीं, त्या वसंतरावाला येथें येऊं द्या.' मोहना म्हणाली, 'तुम्हीं चिंता करूं नका, मी तें पाहून घेईन, तिला आतां भेटा आणि सांगा कीं, आपण विचार करून ठरविलें आहे कीं, तिनें वसंतरावाला घरांत आणलें तर आपली हरकत नाहीं पण आपण तो येथें असेपर्यंत आपल्या मैत्रिणीलाहि येथें ठेवणार आहोंत.'

'तुझी ही सूचना मला आवडत नाहीं.' तोंड वेडेवाकडे करीत वर्तक म्हणाले, 'त्यामुळें आपलें सारेंच काम बिघडेल.'

'तुम्हीं असा धीर सोडूं नका.' ती म्हणाली, 'माझी ही योजना फार चांगली आहे. पंधरा दिवसांच्या आंत तुमचें काम शंभर टक्के यशस्वी होईल.'

'पंधरा दिवसांत? तुला तसें वाटतें!' वर्तकांनी विचारलें.

'मला नुसतें वाटत नाहीं, माझी पूर्ण खात्री आहे.' मोहना म्हणाली.

× × ×

एका आठवड्यानंतर मोहना फाल्गुनरावांना भेटावयास गेली आणि म्हणाली, 'मला यापूर्वी इतकी कठीण भूमीका कधींच करावी लागली नव्हती. तो माणूस आपल्या बायकोसाठीं अगदीं पागल बनला आहे.'

फाल्गुनराव हंसून म्हणाले, 'खरें कीं काय? त्यामुळें एका परीनें आपलें काम अधिकच सोपें बनतें. मोहना, त्या माणसावर तुझा विशेष प्रभाव पडणार नाहीं, अशी माझी खात्री असल्यामुळेंच मी त्याला तुझ्यावर सोंपविलें होतें.'

ती हंसली आणि म्हणाली, 'त्याला मी त्याच्या इच्छेविरुद्ध माझें चुंबन घ्यावयास भाग पाडलें तेव्हां तुम्हीं त्याचा चेहरा पहावयास हवा होता.'

'तुला एक नवीनच अनुभव मिळाला.' फाल्गुनराव हंसून म्हणाले, 'पण आपलें काम यशस्वी झाले काय?'

'होय, माझी तशी पूर्ण खात्री आहे.' ती म्हणाली, 'गेल्या रात्री मोठीच गडबड झाली. मी तुम्हांला पूर्वी सांगितलें होते त्याप्रमाणें माझ्या एका दृष्टीक्षेपाबरोबरच तो वसंतराव माझ्यावर फिदा झाला, माझा पेहराव पाहून मी


अल्पावधींत आघाडीवर
शृंगारप्रधान मासिक
**पैंजण**

नामवंत मराठी साहित्यिकांचे शृंगारप्रधान कथा साहित्य—
ना. सी. फडके ★ सौ. कमला फडके ★ विजय तेंडुलकर
शांता शेळके ★ वि. वि. बोकील ★ मंगेश पदकी
इत्यादी इत्यादी
सुबंध छपाई ✱ मनोवेधक संपादन
निराळे — सुंदर — हवेसे
आणि ते फक्त ५० नया पैशांत
वैभवशाली दिवाळी अंक लवकरच येत आहे.
**आजच वर्गणीदार व्हा**
व्यवस्थापक 'पैंजण' ४६१।१ सदाशिव, टिळक रोड, पुणें २

खूप श्रीमंत आहे अशी त्याची कल्पना झाली. मीना अतिशय संतापली, कारण ते दोघेंहि माझ्याकडेच सारखे लक्ष पुरवीत होते.'

'आणि मी माझी निवड कोणती तें अगदीं स्पष्ट केलें होतें. मी वसंतरावाची त्याच्या तोंडावर खूप चेष्टा केली, त्याचे कपडे आणि त्याचे तें लांब केस माझ्या चेष्टेचें मुख्य विषय होते, तो जरा फेंगडा आहे हेंहि मी त्यांना स्पष्ट दाखविलें.'

'छान! तुझें हे टेक्निक अपूर्व होतें' फाल्गुनराव खूष होऊन म्हणाले.

'आणि गेल्या रात्री भडका उडाला.' ती हंसून म्हणाली, 'मीनानें माझ्यावर आग पाखडली, मी तिचा सुखाचा संसार उध्वस्त करीत आहे असा तिनें माझ्यावर आरोप केला. त्यावेळीं वर्तक पुढें झाले आणि त्यांनीं वसंतरावाबद्दल जाब विचारला, तेव्हां ती चिडली आणि तो नादान माणूस तिच्याजवळ येण्यास वर्तकांचे वर्तनच कारणीभूत झाले असा तिनें त्यांच्यावर उलट आरोप केला. आपणांला आपला नवराच पाहिजे आणि त्यासाठीं आपण वाटेल तो त्याग करण्यास तयार आहोंत असें ती मला म्हणाली.

'मी तिला सांगितलें कीं तें उशिरा सुचलेलें शहाणपण आहे आणि वर्तकांनी मला चांगलीच साथ दिली. ते म्हणाले कीं आपण आतां माघार घेण्यास तयार नाहीं आणि माझ्याबरोबरच लग्न करणार! तिनें तिचा वसंत शक्य तितक्या लवकर पदरांत पाडून घ्यावा. घटस्फोटाची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. सहा महिने थांबणे मूर्खपणाचें आहे.'

'ते पुढें म्हणाले कीं, आपण तिला घटस्फोट मिळावा यासाठीं सर्व मेहनत घेऊं. माझ्याशिवाय त्यांना जगताच येणार नाहीं असेंहि ते म्हणाले. मीनाबाईनी दोन्हीं हात छातीवर ठेवले व आपल्या हृदयांत कळा येत आहेत असें सांगितलें पण वर्तक विरघळले नाहींत. ते सकाळींच बंगल्यांतून बाहेर पडले आणि माझी खात्री आहे कीं मीनानें त्यांना या वेळेपावेतों गांठलें असणार.

'तर मग आपल्या या केसचा निकाल यशस्वी लागणार' फाल्गुनराव समाधानानें म्हणाले, 'आतां...'

दार जोरानें उघडलें गेलें आणि वर्तक धांपा टाकीत आंत आले. 'ती येथें आहे काय!' त्यांनी पुढें सरकत विचारलें. 'ती गेली कुठें?' नंतर त्यांची नजर मोहनाकडे वळली 'लाडके!' ते ओरडूनच म्हणाले व त्यांनीं तिचे दोन्हीं हात घट्ट पकडले 'लाडके, प्रिये, गेल्या रात्री मी प्रत्येक शब्द मनःपूर्वक बोलत होतो हें तूं ओळखले होतेस ना? मी इतके दिवस आंधळ्यासारखा कां वागत होतो तेंच मला समजत नाहीं. पण माझें तुझ्यावर खरोखरच प्रेम जडलें आहे हें मला गेल्या तीन दिवसांत समजलें.

'काय म्हणालात?' मोहनानें दचकून विचारलें.

'होय लाडके, माझें तुझ्यावर प्रेम आहे. साऱ्या जगांत मला आवडणारी दुसरी स्त्री नाहीं. मीनानें घटस्फोट मिळविला कीं तूं माझ्याबरोबर विवाह करशील ना? लाडके मोहना, होय असें उत्तर दे. माझें तुझ्यावर फार म्हणजे फारच प्रेम आहे.'

त्यांनीं तिला आपल्या बाहुपाशांत घट्ट पकडलं आणि मोहनाला त्यांना बाजूला ढकलण्याची संधी मिळण्यापूर्वीच जिचे कपडे अस्ताव्यस्त झाले आहेत, केस पिंजारले आहेत अशी घायाळ चेहऱ्याची स्त्री आंत आली.

'मला वाटलेंच होते!' ती स्त्री म्हणाली 'म्हणून तर मी तुमचा पाठलाग केला! तुम्ही तिच्याकडे धांव घेणार हें मला माहित होतें!'

'पण मीना, मी तुला खरेंच सांगतो...' भांबावलेल्या वर्तकांना पुढें काय बोलावें तें समजेना.

मीनानें त्यांच्या बोलण्यांकडे लक्ष दिले नाहीं. तिनें त्यांचा हात धरून त्यांना जोरानें खेचलें. 'तुम्ही माझा हृदयभंग करूं नका! तुम्ही माझे आहांत! तुम्हांला माझ्याकडे परत आले पाहिजे! मी या आतांच्या प्रकाराबद्दल इतर कुणालाहि सांगणार नाहीं. नाटक-सिनेमा पहाणार नाहीं. फक्त टेनीस खेळेन. नऊ वर्षें आपण कसातरी संसार केला पण यापुढें मी तुमचा एक शब्दहि मोडणार नाहीं......

'पण मीना, असें वेड्यासारखें काय बोलतेस?' तिच्याकडे व मोहनाकडे आळीपाळीनें पहात वर्तक म्हणाले, 'तुला त्या गाढव वसंताबरोबर लग्न करायचे आहे ना? तूं तसेंच कां करीत नाहींस?'

'मी हिंदु स्त्री आहे! मला घटस्फोट घ्यायचा नाहीं! मी त्या पाजी वसंताचा अतिशय तिरस्कार करतें' मीना म्हणाली व ती मोहनाकडे वळली 'तूं दुष्ट आहेस! माझा सुखाचा संसार उध्वस्त करीत आहेस! तूं माझा नवरा चोरण्यांचा प्रयत्न करीत आहेस—'

'मला हा तुझा नवरा मुळींच नको. तो तुझा तुलाच लखलाभ होवो.' मोहना म्हणाली.

'मोहना, तूं असें म्हणतेस!' खेदानें वर्तक म्हणाले.

'कृपा करून तुम्हीं दोघें येथून जा!' मोहना म्हणाली.

'पण हे बघ, गेल्या रात्रींचें तें नाटक नव्हतें. मी अगदीं मनःपूर्वकच बोलत होतो...'

'तुम्ही येथून चालते होता कीं नाहीं?' मोहना ओरडून म्हणाली.

वर्तक नाखुषीनें दाराकडे वळले, 'मी पुन्हां तुला भेटेन.' ते म्हणाले.

'तुझ्यासारख्या बाईला जाहीर चौकात फटके लगावले पाहिजेत. दुसऱ्याच्या नवऱ्याला स्वतःच्या नादीं लावतेस?' मीना रागानें म्हणाली, 'तुझी भेट होईपर्यंत हे किती चांगले होते! आतांच ते बदलले...'

'तूं तुझ्या नवऱ्याला फडताळांत बंद करून ठेवीत जा,' मोहना रागानें म्हणाली.

मीनानें वर्तकांना फरफरां ओढीत बाहेर नेले व दार जोरानें बंद केलें.


मोहना आणि फाल्गुनराव एकमेकांकडे पहातच राहिलें.

'माझा नाईलाज आहे,' मोहना हताश स्वरांत म्हणाली 'ते फार चांगले आहेत पण मला त्यांच्याबरोबर लग्न करायचें नाहीं. मला जर तशी कल्पना असती तर मी सुरुवातीपासूनच...'

'माझा मानवी स्वभावाबद्दलचा अंदाज चुकला हेंच खरें! फाल्गुनराव खेदानें म्हणाले, 'माझ्या दृष्टीनें हें प्रकरण अयशस्वीच झालें आहे!'

●

६१
१८।१०।५९



# मुलाखत

विजय तेंडुलकर

**निमा :** तर बरं का ग, विमे, तो मात्र म्हणतो कसा, 'मग-मग-'

**विमा :** ( किंचित वाट पाहून ) पुढें ग ?

**निमा :** पुढें काय ? इतकंच. ' मग-मग- '

**विमा :** ( हंसून ) बावळटच्च होता.

**निमा :** फारच. त्याची गाडी " मग " " मग " करून पुढं सरकेल असं दिसेना. तेव्हां मग मीच विचारलं, " काय हो, काय म्हणायचंय तरी काय तुम्हांला ? " तशी करतो, " मी– मी– "

**विमा :** ( जास्तच हंसून ) अग तोतरा तर नव्हता ना तो ?

**निमा :** मला तसंच वाटलं. पण अखेर एकदांच त्याच्या तोंडून एक सबंध वाक्य न अडखळतां बाहेर पडलं, बाई.

**विमा :** कुठलं तें ?

**निमा :** कुठलं ? " माझं तुमच्यावर प्रेम आहे. "

**विमा :** ......मग तूं काय उत्तर दिलंस ?

**निमा :** मी ना ? मी विचारलं ( लाडिक आवाजांत ) " खरंच ? तुमचं माझ्यावर प्रेम आहे. " तशी तो म्हणाला, " हो, फार प्रेम आहे." मी विचारलं, " फार म्हणजे किती हो ? " तर म्हणतो, " तें सांगता नाहीं यायचं. पण फारच आहे. " मी विचारलं, " एवढं ? " तर बावळटासारखा पहात राहिला. मी विचारलें, " मग एवढं ? " तशीं म्हणाला, " चेष्टा करूं नका उदात्त गोष्टींची चेष्टा करणं वाईट. "

**विमा :** सुभाषितं पाठ करून आला होता म्हणायचा.

**निमा :** तर ! त्याशिवाय प्रेम कसं बरं व्यक्त होणार ? निदान अर्धा डझन सुभाषितं, डझन सव्वा डझन उपमा, दोन चार डझन अलंकार— पण भाषेतलेच अं— आणि कांहीं कोट्या, इतकं पाठांतर प्रेमाच्या अभिव्यक्तीसाठीं हल्लीं हवंच !

**विमा :** ...मग अखेर काय झालं ग ?

**निमा :** अखेर ना ? मी म्हटलं, " उदात्त गोष्टींची चेष्टा तुम्हीच चालवली आहे. तुमच्यासारख्यानं प्रेमाच्या गोष्टी कराव्यात ? आणि प्रेम काय असं रस्त्यांत व्यक्त होत असतं ? एखाद्या मुलीचा असा कोडगा आणि निर्लज्ज पाठलाग करीत रहाणं हें काय उदात्त प्रेमाचं लक्षण आहे ? तिच्याकडे पाहून वेळींअवेळीं पडक्या चेहऱ्यानं उगांचच दांत काढणं ही काय प्रेमाच्या उदात्ततेची ग्वाही ? कंपू करून उभं राहून तिच्याबद्दल काय वाटेल तें बडबडणं हें काय प्रेम ? आणि कुठल्या आधारावर तुम्ही माझ्यावर प्रेम करता ? मी होय म्हणावं असं आहे काय तुमच्यांत ? दोन शब्द नीट उच्चारण्याचा धीटपणा तुमच्यांत नाहीं—

( दारावरच्या घंटेचा आवाज. )

**विमा :** कुणी आलं वाटतं.

**निमा :** पाहील रामा कोण आलंय तें. ( विषयाचं सूत्र कायम ठेवीत ) तर मी असं म्हणतांच त्यानं मोठा घुटका गिळला. आणि मार खाल्लेल्या मांजरासारखा मुकाट्यानं पाठ वळवून निघून गेला.

**विमा :** ...मला तर कुणी " प्रेम " म्हटलं कीं हल्लीं चीड येते.

**निमा :** चीड ? मला तर शिसारी येते.

**विमा :** मी मुळीं प्रेम करायचंच नाहीं असं ठरवलं आहे.

**निमा :** मीसुद्धां.

**विमा :** प्रेम म्हणजे शुद्ध बावळटपणा.

**निमा :** आणि आचरटपणा.

**विमा :** ( खाजगी आवाजांत )...कांहीं कांहीं वेळां बदमाषपणासुद्धां.

**निमा :** एकेकदां मला वाटतं, प्रेमाची भाषा करणाऱ्या जगांतल्या सगळ्या पुरुषांना एकदां–

**रामा :** ( मध्येंच ) बाय्–

**निमा :** ( दचकून ) अं ?

**रामा :** हे आल्यात–

**निमा :** कोण ? कोण–

[ कांहीं वेळ स्तब्धता. निमाचा एक दीर्घ श्वास. ]

**तुम्ही !**

( पुन्हा कांहीं वेळ स्तब्धता. )

**आलेली व्यक्ती :** म—मी—

**निमा :** पुन्हा कां आलांत ?

**व्यक्ती :** म—मी—

**निमा :** ( जोरानं ) ममी काय ममी ?

**व्यक्ती :** मी—

**निमा :** ( बोलूं न देतां ) पुन्हां काय काम आहे तुमचं ?

**व्यक्ती :** का—काम...काम...म्हणजे—

**निमा :** ( जोरानं ) पुन्हा प्रेमाची भीक मागायचीय ?

**विमा :** ( त्याच जोरानं ) झोळी कुठंय हो तुमची ?

**निमा :** निदान कमंडलू तरी आणाल ?

**विमा :** ...टोपलीसुद्धां चालली असती !

**निमा ?** हवं तर आंतून एक फ़टकं टिनपाट आणून देते !

[ व्यक्ती स्तब्ध ]

[ वाट पाहून अखेर ] अहो—

**व्यक्ती :** ( अशक्त सुरांत ) अं ?

**निमा :** बोला कीं.

**व्यक्ती :** काय बोलूं ?

**निमा :** कां ?

**व्यक्ती :** ऐकण्यासारखंच आतां फार आहे.

**निमा :** म्हणजे काय ?

**व्यक्ती :** ...दैव हें केव्हां केव्हां दारू प्यायलेल्या डोंबाऱ्या-सारखं वाटतं.

**निमा :** म्हणजे ?

**व्यक्ती :** ...मी तात्पुरता गप्प बसतों.

**निमा :** पण पुन्हां काय काम आहे तुमचं ?

**विमा :** ( पाठोपाठ ) इथं कशासाठीं आलांत ?

**निमा :** आणि काय म्हणून आलांत ?

**विमा :** पण मी म्हणते, आंत कुणी सोडलं यांना.

**निमा :** रामानं. ( हांका मारते ) रामा—रामा—

**रामा :** ( येत ) जी.

**निमा :** यांना आंत काय म्हणून सोडलंस ?

**रामा :** तुमच्याकडंच आले व्हते नव्हं ते–

**निमा :** ( जोरानं ) म्हणून काय झालं ?

... ... ... ... ...

**विमा :** —कसलं महत्त्वाचं काम आहे ?

**निमा :** ( भेदक तीक्ष्णपणें ) आणखी कसलं ? प्रेमाचं ! होय ना हो ?

**व्यक्ती :** ( घाईनं आणि आवेशानं )—प्रेमाचंच.

(स्तब्धता)

**निमा :** ( कठोर सूर ) काल रस्त्यांत उत्तर दिलं तेवढं पूरे नाहीं वाटतं झालं ?

**विमा :** ( नाटकी सुरांत ) प्रेयसीचे अपशब्दहि पुष्पांसमान असतात.

**निमा :** ( [illegible] ाबरोबर लंय हो, कांहीं लाज, शरम, या गोष्टी आहेत कीं नाहींत तु [illegible] करीत नुन्हां झिटकारून घेणारं हें तुमचं प्रेम आहे तरी कसलं ? [illegible] मी

**विमा :** ( तत्परत [illegible] ोडगं !

**निमा :** ( वाढत्या जोरानं ) एकदां स्पष्टपणें सांगूनहि कळत नाहीं तुम्हांला ?

**विमा :** ( हलक्या आवाजांत ) चांगले संभावित तर दिसतात !

**निमा :** पण वृत्ती पहा ना.

**विमा :** अग म्हणून तर इतके संभावित दिसतात !

**निमा :** अहो, हें पहा, कान फोडून ऐका. मला तुमच्याविषयीं काडीइतकंहि प्रेम वाटत नाहीं. वाटत असलीच तर आतां चीड तेवढी वाटूं लागली आहे.

... ... ... ... ...

**व्यक्ती :** घर ज्यांचं आहे त्या कांहींच बोलत नाहींत म्हणून मला बोलावं लागलं.

**निमा :** पण तिला तुम्ही कोण बोलणार ? मैत्रिण आहे ती माझी.

... ... ... ... ...

**व्यक्ती :** ...समंजसपणापेक्षां तोंड बळकट असलं म्हणजे असंच व्हायचं. माहित आहे मला.

( किंचित् स्तब्धता )

**निमा :** ( पुन्हां आवाज चढवून ) पण तुम्ही इथं माझ्या घरीं काय म्हणून आलांत ?

**व्यक्ती :** ...तुमचं घर म्हणजे काय मक्का आहे कीं गुरुद्वार आहे ?

**निमा :** ( जोर कायम ठेवून ) तसं नव्हे, पण काय म्हणून आलांत !

**व्यक्ती :** ( ततक्याच जोरानं ) प्रतिनिधी म्हणून.

**निमा :** अं ?

**व्यक्ती :** प्र-ति-नि-धी- म्हणून.

**निमा :** कसले प्रतिनिधी ?

... ... ... ... ...

**व्यक्ती :** हो.

**निमा :** कुठल्या वर्तमानपत्राचा ?

**व्यक्ती :** ...मी ' उलथापालथ ' दैनिकाचा प्रतिनिधि आहे.

( किंचित स्तब्धता )

**निमा :** ( छद्मी आवाजांत ) ही तुमची नवी बतावणी दिसते !

... ... ... ... ...

**व्यक्ती :** वर्तमानपत्राच्या प्रतिनिधित्वाचं अधिकारपत्र ही कांहीं तरुण पोरींच्या हृदयाइतकी सवंग चीज नसते ?

**निमा :** असं का ? तरुण पोरींचं हृदय ही सवंग चीज असते.

**व्यक्ती :** हो.

**निमा :** ती अगदीं सहज चोरतां येते ?

**व्यक्ती :** नक्कीं.

**निमा :** मग माझं हृदय कसं नाहीं चोरलं तुम्ही ?

**व्यक्ती :** तुमचं–तुमचं हृदय–जमलं नाहीं मला.

**निमा :** कां ? तें सवंग नव्हतं वाटतं ?

( पान ५७ वर पहा )

# पुस्तकें — एक शोभा

**प्रा. गो. वि. करंदीकर**

बेकनला हवे तर तत्वज्ञ म्हणा; **पण त्याला कोणी द्रष्टा म्हणेल तर तें मी मान्य करणार नाहीं. " अभ्यासाविषयीं " या आपल्या निबंधात त्यानें पुस्तकाविषयीं खूप** प्रपंच केला आहे; पण पुढें विसाव्या शतकांत पुस्तकांच्या होणाऱ्या एका अभिनव उपयोगाची पुसट कल्पनासुद्धां त्याला येऊं शकली नाहीं. पुस्तकांचें वर्गीकरण करताना तो लिहितो, " कांहीं पुस्तकांची नुसती चव बघायची असते, कांहीं संबंध गिळायची असतात, आणि कांहीं थोडीच चावून चावून पचवायची असतात. " पण या तीन प्रकाराशिवाय पुस्तकांचा एक चौथा प्रकारहि असतो. कांहीं पुस्तकें नुसती पहायची असतात. सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या माणसांच्या घराचें सौंदर्य वाढवणें हाहि पुस्तकांचा एक महत्वाचा उपयोग आहे. पण बेकन पडला सोळाव्या शतकांतला एक जुना तत्वज्ञ. पुस्तकांना विसाव्या शतकांत मिळालेले हे नवे स्थान त्याला त्यावेळीं दिसूं शकले नाहीं, पुस्तकें हा कधीं काळीं एक गृहशोभेचा भाग होईल ही गोष्ट त्याला स्वप्नांतहि दिसली नसती. त्यासाठीं लागणाऱ्या तरल कल्पनाशक्तीचा त्याच्याजवळ अभाव होता. शेक्सपिअरची नाटकें बेकननें लिहिलेली नाहींत हे सिद्ध करण्यासाठीं वस्तुतः एवढा पुरावाहि पुरेसा आहे !

इतर सर्व प्रेमाप्रमाणेंच पुस्तकावरील आपल्या प्रेमातहि सुरुवातीची अशी एक भाबडी अवस्था असते. त्या अवस्थेंत घडणारें पुस्तकांचे दर्शन अगदीं वेगळें असते. मी सुद्धां त्या अवस्थेतून एकदा गेलेला आहे. त्यावेळीं एखाद्या माणसाच्या घरीं त्याचें स्वतःचें असें पुस्तकालय पाहिलें कीं त्या माणसाविषयीं एका अनोख्या आदराच्या भावनेनें मी भारावून जात असे. कोणाच्याहि घरीं गेलें कीं प्रथम माझें लक्ष त्याच्या पुस्तकाकडे जाई. बुभुक्षितासारखे माझे डोळें त्याच्या पुस्तकावरून भिरभिरू लागत. शें-पाचशें पुस्तकें खरेदी करणें कोणालाहि कसें शक्य होतें याचें त्यावेळीं मला मोठें आश्चर्य वाटे. ही इतकीं पुस्तकें खरेदी करण्यासाठीं त्याला किती वेळां अर्धपोटी राहावें लागलें असेल याचें एक दर्दभरें दृष्य माझ्या डोळ्यापुढें तरळूं लागे. मग पुस्तकांचा संग्रह करणारा तो माणूस एकदम असामान्यांच्या पंक्तीत जाऊन बसे. सार्वजनिक वाचनालयातून पुस्तकें नेऊन वाचण्यापेक्षां अशा माणसाच्या खाजगी पुस्तकालयातून पुस्तकें नेऊन वाचण्यांत मला एक वेगळीच धन्यता वाटे. चिपळूणकरांची निबंधमाला ही मी अशाच अवस्थेत वाचली होती. दुखवलेल्या राष्ट्रीय अहंभावाच्या त्या उन्मत्त बेहोषीत मी अक्षरशः बुडालों होतो. पण माझ्या मनात ती निबंधमाला नुसती चिपळूणकरांचीच म्हणून ठसलेली नव्हती; ज्यांच्या खाजगी पुस्तकालयांतून ती मी वाचण्यासाठीं आणली होती त्यांचें नांवहि त्या निबंधमालेशीं अनिवार्यपणें बांधलें गेलें होतें. लेखक आणि संग्राहक या दोघांच्याहि छाया एकमेकांत मिसळल्या होत्या.

पण पुस्तकांच्या संग्राहकाविषयीच्या या भाबड्या भावनेला पुढें अचानक तडा गेला. मला कळून चुकलें कीं पुस्तकांचा संग्रह करणारा मनुष्य हा पुस्तकांचा वाचक असलोच असें समजण्याचें कारण नाहीं. वस्तुतः आपण विकत घेतलेली बरीचशी पुस्तकें आपण कधींच वाचत नाहीं असें हें गृहस्थ मला सुरुवातीलाच म्हणाले होते. हा निव्वळ त्यांचा विनय आहे याबद्दल मला बिलकूल शंका नव्हती. पण या विनयाला सत्याचा भरपूर आधार आहे ही गोष्ट मला पुढें मान्य करावी लागली. त्यावेळीं तात्यासाहेब केळकरांचें 'तोतयाचें बंड' नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. 'एक अप्रतिम नाटक' म्हणून त्यांनीं तें मला अगत्यानें वाचायला दिले. 'सकाळीं आणलें, आणि दुपारपर्यंत वाचून काढलें' अशी त्याची भलावणहि केली. मी सुद्धां मोठ्या भक्तिभावानें नाटक वाचायला घेतलें; आणि एकदम माझ्या या भाबड्या भक्तीला एक मोठा तडा गेला. पुस्तकांतली बरीच पानें कापलेलीं नव्हती ! आणि तशा अवस्थेत त्यानें ते पुस्तक कसें वाचलें असेल याची कल्पना करणें कठीण होतें ! या प्रसंगानंतरहि मी त्या गृहस्थानें आणलेली पुष्कळ पुस्तकें वाचलीं पण त्या पुस्तकांची पहिली चव आतां बदलली होती.

पण तेव्हांपासून एक धडा मात्र घेतला ! कोणालाहि पुस्तक देण्यापूर्वी प्रथम त्या पुस्तकांतली सर्व पानें कापलेली आहेत याची मी खात्री करून घेतों ! नाहींतर जें आपण वाचलें म्हणून सांगावें त्याच पुस्तकांत नेमकीं अशी न कापलेली पानें उमगायची. 'प्रिंटर्स डेव्हिल' इतकाच हा 'बाइंडर्स डेव्हिल' सुद्धां भयंकर आहे. कोणाच्या विद्वत्तेचा फुगा कसा फोडील कांहीं नेम नाहीं. जागरूक विद्वानानें पुस्तकें विकत घेतानांच त्यांतली सर्व पानें फाडलेली आहेत कीं नाहीं याची पूर्ण खात्री करून घ्यावी हें बरें.

हे सर्व घोटाळें पुस्तकें ही मुख्यतः वाचण्यासाठीं असतात ह्या जुन्या बुरसट कल्पनेतून निर्माण होतात. पुस्तकें ही एक प्रकारची गृहशोभा आहे हा नवा अद्यावत् सिद्धांत मान्य करणारा मनुष्य या विपरीत घातचक्रातून एकदम बाहेर पडतो सांस्कृतिक समारंभांत नटूनथटून आघाडीवर मिरविणाऱ्या सभ्य स्त्रीपुरुषांच्या जीवनामध्यें पुस्तकांच्या अंतरंगापेक्षां पुस्तकांच्या बहिरंगाला विशेष महत्व असतें. आपल्या दिवाणखान्यामध्यें अमेरिकन नटींचे फोटो, एखादी विलायती वेल, हरणाची शिंगें आणि त्याचप्रमाणें पाच–पन्नास अद्यावत् भासणारी पुस्तकें त्यांना हवीं असतात. एका दृष्टीनें ही सर्व मंडळी पुस्तकावर विशुद्ध प्रेम करीत असतात. अर्थाच्या उठाठेवीतून मुक्त झाल्यावरच कवीला भाषेच्या सुप्त अनाकलनीय शक्तीचा

शोध लागतो असें विशुद्ध कवितेचे कांहीं पुरस्कर्ते आग्रहानें प्रतिपादित असतात. या तत्वज्ञानाचा आधार घेऊन पुस्तकाच्या विषयावर प्राधान्य देणारे लोक हें कांहींसे रानटी अवस्थेत आहेत असेंच म्हणावें लागेल. जो खऱ्या अर्थानें पुस्तकावर प्रेम करतो त्याला पुस्तकाच्या आंत काय आहे हा प्रश्न गौण वाटला पाहिजे. पुस्तकाचा स्पर्श आणि रुप यांतूनच आजकालच्या संवेदनाक्षम माणसांना इतका उमाप आनंद मिळूं शकतो कीं त्यापलीकडे जाण्याची त्याला सहसा जरूर भासत नाहीं. ज्याला पुस्तकाचा स्पर्श भोगता येत नाहीं किंवा रंग पाहतां येत नाहीं तोच मनुष्य पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करतो.

या बदलत्या दृष्टिकोनाची चाहूल आपल्या इकडील प्रकाशकांना लागलेली असावी यांत संशय नाहीं. त्यामुळेंच ते पुस्तकाच्या अंतरंगापेक्षां बहिरंगाकड अधिक लक्ष देतांना दिसतात. मात्र या दृष्टीनें आपल्या संपूर्ण व्यवसायाची पुनर्घटना करण्याचे धैर्य अजून कोणत्याहि प्रकाशकानें दाखवलेलें दिसत नाहीं. पुस्तक ही एक गृहशोभा आहे हा सिद्धांत प्रामाणिकपणें स्वीकारल्यानंतर सर्व पुस्तक व्यवसाय एका निराळ्या पातळीवरून पाहाणें आवश्यक आहे. पुस्तक वाचण्यासाठीं असतें या गृहीतावर पूर्वीच्या व्यावसायिक परंपरा आधारलेल्या आहेत तर पुस्तक ही शोभा आहे हा आपल्या अभिरुचीचा पाया आहे. या दोन गोष्टीतील अंतविरोधाचा परिणाम प्रत्येक प्रकाशकाला भोगायला लागतो. खरें म्हणजे पुस्तकावरील चित्र आधीं नक्की करून मग त्याच्याशीं मिळतेंजुळतें असें कांहींतरी लिहिण्याविषयीं लेखकांना किंवा कवींना विनंती करणें हा वाजवी मार्ग, पण अगोदर कसलातरी मजकूर घेऊन मग त्यांतल्या उणिवा चित्रानें भरून काढीत राहण्याची परंपरा अजूनहि टिकून आहे.

पुस्तकांची विक्री होत नाहीं म्हणून ओरड करण्याऱ्या प्रकाशकांनी पुस्तकांच्या आकाराचा गृहशोभेच्या दृष्टीनें विचार करणें अगत्याचें झालें आहे. आपली बहुतेक पुस्तकें आयताच्या आकाराची असतात. आकारातील ही जुनाट परंपरा अजूनहि कां टिकून राहावी याचें मला आश्चर्य वाटतें. आयतासारखा चौकोनी आकार हा नीरस व जडवादी अशा उपयुक्ततावादाचाच विजय आहे. निर्भेळ सौंदर्यवादाच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहणाऱ्या माणसाला पुस्तकांच्या संभाव्य आकारांचे एक निराळेंच कल्पनाचित्र आपल्या डोळ्यांपुढें आणतां येईल. मग त्या कल्पनाचित्रांत त्रिकोणी, पंचकोनी, षट्कोनी, वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार अशी निरनिराळ्या आकाराची पुस्तकें त्याला दिसूं लागतील. एखादा हौशी प्रकाशक यापुढें जाऊन निरनिराळ्या पक्ष्यांचे व पशूंचे आकार असलेली पुस्तकेंहि काढूं शकेल. मग प्रकाशकांत 'ॲब्स्ट्रक्ट' व 'वास्तवदर्शी' असे दोन वर्ग निर्माण झाल्याचें दृश्यहि आपल्याला दिसूं शकेल. हे अद्‌भुतरम्य युग सुरू करणारा प्रकाशकहि प्रतिभावान असावा लागेल. तो येईल तेव्हां येवो. पण तोपर्यंत गृहशोभेच्या दृष्टीनें एखादें साधें त्रिकोणी पुस्तक काढण्याचें धैर्यसुद्धां आपल्या प्रकाशकाकडे असूं नये ही आपल्या अभिरुचीची केवढी शोकान्तिका ?

पुस्तकाचा अनुरुप कपडे शिवण्याची सामान्य कल्पना तरी किती प्रकाशकांना सुचली आहे ? आपल्या कवितेच्या पुस्तकाला चोळीच्या खणाचें बायंडिंग करणारा एखादा हौशी कवि किंवा आपल्या इवल्या इवल्या बाळसेदार गोंडे बांधणारा एखादा कथालेखक हे फक्त अपवाद म्हणूनच डोळ्यापुढें येतात. पुस्तकांच्या रंगरूपाप्रमाणेंच पुस्तकांच्या गंधालाहि गृहशोभेच्या दृष्टीनें फार महत्व आहे. ग्रंथमालाच्या परीक्षेत या गोष्टीला कितपत महत्व दिलें जातें तें मला माहीत नाहीं. पण डोळे बांधलेल्या अवस्थेत नाकापुढें आणलेल्या पुस्तकाच्या वासावरून तें जुनें आहे कीं नवें आहे आणि जुने असल्यास अंदाजे कोणत्या शतकातील या प्रश्नाचें बरोबर उत्तर देता आल्याशिवाय मी कोणाहि माणसाची ग्रंथपाल म्हणून नेमणूक करणार नाहीं ! गृहिणीचें लक्ष पुस्तकांकडे वेधण्याच्या दृष्टीनें पुस्तकांना सेंट किंवा अत्तरें लावण्याची कल्पना अजून कोणाहि प्रकाशकाला कशी सुचली नाहीं याचे आश्चर्य वाटतें. आमचे प्रकाशक जुन्या परंपरातून अजूनहि बाहेर पडूं शकलेले नाहींत याचा हा आणखी एक पुरावा आहे. पुस्तकांना सुगंधित करण्याचें हें नवें तंत्र वापरल्यास पुस्तकें खपत नाहींत अशी तक्रार करण्याचें कारण उरणार नाहीं. मग महिला मंडळातली एक बाई दुसऱ्या बाईला म्हणेल "अय्या, तुला 'बकुळीचे' बालकवी मिळाले वाटतं, माझ्याजवळ 'जॅस्मिनचे' आहेत. पण मी आतां सगळा सेटच करणार आहे." मग ज्ञानेश्वरीला कोणते अत्तर लावणें इष्ट यावर वृत्तपत्रांत वादविवाद सुरू होईल. वाङ्मयाचा टीकाकार हा प्राणी तसाच शाबूत राहिल. 'वामन पंडीत एक की दोन' हा वाद मागें पडला तरी दुसरे वाद पुढें येतील.

विशेष म्हणजे प्रत्येक संसारदक्ष गृहिणी घरातल्या खाजगी वाचनालयाकडे विशेष लक्ष पुरवील. आणि माझेहि फारा दिवसाचें एक स्वप्न साकार होऊं लागेल महाराष्ट्रातील प्रत्येक सुसंस्कृत माणसाच्या घरी एक त्याचें असें खाजगी ग्रथालय असेल.

✱

KEMICOLOR INDUSTRIES

195, Hornby Road, Fort, Bombay 1

*Manufacturers of*—TEXTILE CHEMICALS AND AUXILIARIES

*Dealers in*—DYES, PIGMENT DYES, BINDERS, EMULSIFIERS, SYNTHETIC RESINS Etc.

# अ सा व री

" पण मग लग्न कां केलं नाहीं त्यानं तुझ्याशीं— " मी हतबुद्ध होत विचारलं.

" कारण....कारण मी वाईट चालीची आहे असं लोक म्हणतात म्हणून. त्याची आई म्हणते तसं.... टेरी म्हणतो तसं...."

" टेरीचा काय संबंध यांत ? "

" टेरी त्याचा मानलेला भाऊ. तोच पहातो त्याचं सारं कांहीं."

आणि मग पुन्हां एकदां तिला सारं असह्य झालं. वादळांत उन्मळून पडलेल्या झाडासारखी ती माझ्या खांद्यावर विसावली. एखाद्या लहान पोरासारखी हमसून हमसून रडूं लागली.... मग त्याच थरथरत्या शब्दांत म्हणाली—

" केवळ अश्विनच्या इच्छेसाठीं " ..................



विंदा घाग

तुमच्याकडे कुणि पाहुणी आली आहे असं टेरी सांगून गेला. जातांना त्यानें उगाचच डोळे मिचकावले. तो गेला आणि त्याच्या पाठोपाठ ती दारांत येऊन उभी राहिली. नायलॉनचं झिरझिरीत पातळ नजरेत भरलं. आणि हातांतली छत्री...बिनमुठीची, शिवाय जुनी......तीहि नजरेंतून सुटली नाहीं.

' ओळखलंत मला ? '

तिच्याप्रमाणें तिचा आवाजहि नाजुक होता. शिवाय त्याला एक वेगळी गळ होती. कुणीहि कुणाला घालावी अशी गळ. तिचे विशाल डोळे अधिक बोलके झाले...जणूं पुन्हां पुन्हां ते विचारीत होते, ' ओळखलत मला ? ओळखलंत मला ? ...' जणूं कांहीं मी तिला ओळखलंच होतं.

कांहींसं गांगरून मी म्हटलं—

' माफ करा मला ! पण नाहीं आठवत मला तुमची माझी कधीं ओळख झाली असल्याची– '

ती हंसली. जणूं तिला म्हणायचं होतं कीं या विसरण्यांत देखील मी तिला ओळखलं होतं.

ती आंत आली. येतांना तिनं दार ओढून घेतलं. माझ्यासमोर असलेल्या खुर्चीवर येऊन ती बसली. मग म्हणाली—

' मी असं कधीं म्हटलं होतं कीं माझी तुमची यापूर्वी कधीं कुणी ओळख करून दिली होती म्हणून ? '

मी कांहीं बोलणार इतक्यांत तीच पुन्हां

बोलूं लागली, ' तुम्ही पारसनिसांकडे येतांना कधीं कधीं ? — '

' हो ! कां ? '

' त्यांच्या बायकोची मी धाकटी बहीण... असावरी ! '

इतका वेळ उगाचच कसलं तरी दडपण असल्याचं वाटत होतं. तें आतां वाटेनासं झालं...उगाचच हंसलो ओठ दुमटले. मग विचारलं: ' जिजी म्हणतात कां घरीं तुम्हांला– '

' एक सांगूं तुम्हांला ? ' तिनं एकाएकीं प्रश्न विचारला. आणि माझ्या उत्तराची वाट न पहातां ती आपणच पुढं बोलूं लागली–

' आपण असं एकमेकांना अहो जाहो म्हणणं मला आवडत नाहीं. मी तुला नन्दाच म्हणीन आणि तूं मला जिजी म्हण...अहो पारसनीस, अहो असावरीबाई, असं कुणी म्हटलं कीं मला अगदीं परक्या परक्यासारखं वाटतं...'

मग एकाएकी खोल आवाजांत ती म्हणाली–

' म्हण ना मला जिजी...म्हण ना ! '

' अच्छा ! ऑल-राइट...जिजी... ! आतां-पासून मी तुला जिजी म्हणेन, झालं ! '

ती खुदकन हंसली.

मी उगाचच इकडे तिकडे पाहिलं. मग टेबलाचा खण उघडून एक बदामी कागद बाहेर काढला आणि तिच्यापुढें धरीत म्हटलं—

' माझ्या कविता वाचल्या आहेस तूं कधीं ! '

' हो ! नेहमी वाचतें— '

' समजतात तुला—'

' जाणवतात ही ! समजण्याचा भाग त्यांत फार कमी असतो— '

' ठीक ! मग ही वाच—'

ती वाचूं लागली—

' रात घुम्या शब्दांची लय एखाद दुसरी
निष्पर्ण तरु घन छाया—
तीहि असावरी. .असावरी. '

मग एकाएकीं ती वाचायची थांबली. खोल कुठंवरी असलेल्या माझ्या मनाचा तळ गांठीत म्हणाली—

' अशी आहे का रे मी नन्दा ! '

आणि ती दूर पहात राहिली--जणूं तिला म्हणायचं होतं, ' कां असं विचारतेस ? '

'नाहींस कां तूं तशी–रात घुम्या शब्दांची...'

मग एकाएकीं चाळवल्यासारखी होत ती म्हणाली, ' तुझं ऑफिस केव्हां सुटेल ? '

' जेव्हां तूं म्हणशील तेव्हां !—कां ? '

' मला आज तुझ्याबरोबर तुझ्या घरीं यायचं आहे, '

' आजच ? ... '

' हो, आजच, कां ? नको येऊं ? '

' नाहीं, नाहीं, तसं नाहीं. आज घरीं कुणीच नाहीं दुसरं म्हणून म्हटलं. '

' मग फार बरं ! मला तुझ्याशीं खूप बोलतां येईल मोकळेपणानं. '

' माझी हरकत नाहीं—'

' मग येतोस आतां. निघूं या आपण—'

मी न बोलतां उठलों आणि बाहेर पडलों. मोकळ्यावर आल्यावर जरा बरं वाटलं. कांहींशा नव्या उत्साहानं मी तिला म्हणालों—

' हें बघ जिजी, आतां बस नाहीं-साडेपांच-पर्यंत. आपल्याला निदान युनिव्हर्सिटी गेटापर्यंत चालत जावं लागेल. तिथंही औंधची बस मिळणं कठीणच पण एखादी रिक्शा मिळण्याची शक्यता आहे...'

' आणि समजा आपण घरापर्यंत चालत गेलों तर—'

' तर रात्र होईल. '

' मला चालेल.'

' आयुष्यांत असला पराक्रम मी कधीं केला नाहीं. Do you insist ? '

" Yes I do ! " ती असं म्हणाली आणि चालूंदेखील लागली. माझा इलाज नव्हता. ओढण्यासारखा मीहि चालूं लागलो.

सिटी गेटापासून कांहीं अंतरावर असतांनाच औंधची बस धूळ उडवीत निघून गेली. आम्हीं चालत होतो. ती बोलत होती. अव्याहतपणें बोलत होती. तुडुंब भरलेल्या नदीच्या धरणाला एखादं भोंक पडावं तशी. मग पाषाणाचा नाला आला. आज त्याला पाणी होतं. बहुधा धरण सोडलं असावं. लालभडक पाण्यावर वाळलेलं गवत तरंगत होतं. तें सारं पहात ती उभी राहिली. मग एकाएकीं माझ्याकडे वळून म्हणाली, ' हा नाला कुठपर्यंत जातो ? '

' एरंडवण्यांतून पुढं कुठं तरी—'

' मग आपण याच्या कांठाकाठानं जाऊं या कां ? '

' मला उत्तराची परवानगी नसावी हें चांगलं. '

ती दुखावली गेली. डोळ्यांत तें दुःख चांदण्या रात्रीच्या सावलीसारखं पसरून गेलं.

ती बोलायची बंद झाली आणि आपलं कुठं तरी चुकलं या जाणिवेनं मी दूर कांहींतरी शोधूं लागलों. मग एकाएकीं निग्रही स्वरांत ती म्हणाली—

' चल आपण परत जाऊं या. एखादी रिक्शा मिळाली तर तूं ती घे. मी बसनं जाईन. "

डोळ्यांत बाहुली दिसावी तसे तिचे ते शब्द माझ्यासमोर उभे राहिले. कांहींशा केविलवाण्या सुरांत मी म्हटलं—

' रागावलीस जिजी ? ...ए ! मी तुझी नुसती गंमत केली ग. '

तशी एकाएकीं तिनं माझा हात घट्ट धरला व म्हणाली,

' खरं खोटं जाणण्याचं तारतम्य हल्लीं साफ नाहींसं झालं आहे माझं. वाटतं साऱ्यांनाच मी दुखावतें आहे. तुला, नीलाला, अश्विनला...'

' अश्विन कोण ग ? ...'

' तुझ्याच ऑफिसांत आहे तो. मेकॅनिक आहे साधा ...'.

' तुझी त्याची काय ओळख ? '

' फार जुनी आहे. कदाचित गेल्या जन्माचीहि असेल. "

आम्ही पुन्हां चालूं लागलो.

घरीं पोहोंचलों तेव्हां अंधार पडला होता. पाय दुखायला लागले होते. घराचा पहिला जिना चढल्यावर मी दाराकडे वळलो तशी ती म्हणाली

" इथंच बसूं या ना आपण "

आम्ही पायठण्यांवर बसलो.

ती बोलूं लागली,

" तुझं लग्न ठरलंय कारे ? ... कुणीं तरी सांगितलं मला तसं. " उत्तराला वेळ लागला. तेव्हां तीच म्हणाली,

" मला खूप बरं वाटलं तें कळलं तेव्हां. छान असेल नाहीं तुझी बायको ! आणि उंचीला केवढी आहे रे ? अनंता म्हणत होता कीं बाहुली-सारखी आहे म्हणून... हो का रे ? "

तिचे डोळे स्वप्नाळू झाले.

" गोरि गोरि असेल नाहीं. लाल चुटुक ओठ असतील... काळे भोर डोळे. खरंच नन्दा, बायको चांगली असली कीं मुलं देखील चांगली होतात. गोरि गोरि... गुबऱ्या गालाची लाल चुटुक जिवणीची...

आणि मग एकाएकीं तिनं जवळच्या खांबा-

वर आपला गाल टेकला. हाताच्या पंजानें तोंड झांकून घेतलं आणि मुसमुसून रडूं लागली. काय चाललं आहे हें माझं मलाच कळत नव्हतं. तिचा आवेग जरा कमी झाल्यावर तिच्या पाठीवर हात टाकून मी म्हटलं—

" काय झालं गं असं एकाएकी रडायला ! '

तिनं स्वतःला किंचित् सांवरलं. मग हुंदके आवरीत ती बोलूं लागली ,

" मलाहि असं छान बाळ झालं असतं

" हें काय वेड्यासारखे बोलणं तुझं ... ! तुलाहि होईल कीं तसं तुझं लग्न झाल्यावर... ! अवकाश आहे अजून त्याला. "

" नाहीं रे बाबा ! सारं कांहीं संपलं आहे आतां—" ती कळवळून बोलूं लागली, " अश्विन फार सुरेख आहे दिसायला. पण मनाचा फार क्रूर आणि दुष्ट आहे रे तो ! त्यानंच सारं कांहीं केलं आणि त्यानंच निस्तरलं. मी खूप भांडलें त्याच्याशीं. पण त्यानं ऐकलं नाहीं. मारलं देखील मला. म्हणाला कीं तुझं ठीक आहे. तुला ना लाज ना चाड. बिन आई-बापाची पोर तूं. पण मला माझी अब्रू आहे ..."

' पण मग लग्न कां केलं नाहीं त्यानं तुझ्याशीं—' मी हतबुद्ध होत विचारलं.

' कारण ..कारण मी वाईट चालीची आहे असं लोक म्हणतात म्हणून. त्याची आई म्हणते तसं...टेरी म्हणतो तसं...... "

' टेरीचा काय संबंध यांत ! '

' टेरी त्याचा मानलेला भाऊ ! तोच पहातो त्याचं सारं कांहीं. '

आणि मग पुन्हां एकदा तिला सारं असह्य झालं. वादळांत उन्मळून पडलेल्या झाडासारखी ती माझ्या खांद्यावर विसावली. एखाद्या लहान पोरासारखी हमसून हमसून रडूं लागली...मग त्याच थरथरत्या शब्दांत म्हणाली--

'केवळ अश्विनच्या इच्छेसाठीं, टेरीलासुद्धां–'

ती अबोल झाली.

' सांगना ! थांबलीस कां ? ... '

एका विचित्र कल्पनेनं माझं सर्वांग शहारून गेलं.

आणि तरीहि ती बोलली नाहीं. तशीच अस्वस्थपणें माझ्या गळ्याभोंवती हात टाकून निपचित पडून राहिली.

अंधार दाटला होता. समोरच्या विजेच्या दिव्याचा एखादाच तिरपा किरण तिच्या गालावर कवडसे पाडींत होता. खूप वेळानें ती आपण होऊन दूर झाली. म्हणाली,

' चल आपण आंत जाऊं ' आणि ती पुढं झाली.

मी दार उघडलं. दिव्याचं बटण दाबलं. फिकट हिरव्या प्रकाशानें दिवाणखाना भरून गेला. ती दारांतच उभी राहिली. नितळ नजरेनं सारं न्याहाळूं लागली. खिडक्यांचे पडदे...... कोचवरच्या उशा...भिंतीवरचं ' बुश ' चं कॅलेंडर...आणि मग तिची नजर टेबलावरच्या फोटोवर खिळली...संथपणें ती टेबलाजवळ गेली. तिनं तो फोटो उचलून हातांत घेतला. कितीतरी वेळ ती त्याच्याकडे एकटक पहात राहिली. मग म्हणाली—

' छान आहेत मालकीणबाई. '

आणि मग कसल्यातरी भयंकर त्वेषानं तिनं तो फोटो टेबलावर आदळला. काय प्रकार घडला हें माझ्या ध्यानांत यायच्या आंतच तिनं दार ओलांडलं होतं. धाड धाड आवाज करीत ती जिना उतरून गेली होती—

ती पार अदृश्य होईपर्यंत तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहात राहिलो. आणि मग संथपणें टेबलाशीं जाऊन फुटलेल्या कांचेचे तुकडे गोळा करूं लागलो. बिनकाचेच्या फ्रेममधला सुमाचा चेहरा अजूनहि हंसराच होता. गुलबक्षीच्या फुलासारखा.

★*★

## नकळत होते तुझी आठवण !

नकळत होते तुझी आठवण

जेव्हां बघतो निळ्या नभांतून
शतधारांनीं पाऊस बरसत
कुंद गारवा हवेंत येता
नकळत होते तुझी आठवण !

सांजफुलांची कान्ति मोहक
चन्द्र नभींचा मधाळ हांसत
बघतो जेव्हां, आणि अचानक
नकळत होते तुझी आठवण !

लाल फुलांनीं नटवून काया
गुलमोहर अंगणीं फुलत या
सांवलीत त्या बसतो जेव्हां
नकळत होते तुझी आठवण !

बघतो जेव्हां देव्हाऱ्यांत
मंद ज्योत काळोखा उजळित
उदास कातर होते मन अन्
नकळत होते तुझी आठवण !

—सुनन्दा बझे

**आदम आणि इव्ह...!**
**तुम्हीं ओळखतां कां त्यांना?**

**आदम हा मानव जातींतील सर्वांत पहिला—म्हणजे मूळ पुरुष आणि इव्ह ही सर्वांत पहिली स्त्री. विधात्यानं हें युगुल घडवलं अन् यांच्या संयोगातून हळुंहळुं मानवजात निर्माण होत व वाढत गेली.**

त्या आदम आणि इव्हची ही गोष्ट..

पण आपण त्या आदमला ' मनू'च म्हणूं या. व इव्हला म्हणूं या ' ' आदिमाया. '

मनू आणि आदिमाया—दोघंहि गप्पा मारतां मारतां एकदम अटीतटीवर आल्या.

' स्त्रीमुळेंच जगाचा सर्व विध्वंस होत चालला आहे...! '

' अन् पुरुषानं जणूं कांहीं म्हटल्या कांहीं केलंच नाहीं, नाहीं का ? '

' तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण जगांतील साऱ्या विनाशाला स्त्री कारणीभूत आहे, इतके मात्र मला नक्कीच ठाऊक आहे. '

' मनू, काय हें तुम्हीं बोलतां आहांत ? ' आदिमायेनं अस्वस्थ होऊन व्याकूळपणें विचारलं, अन् बोलतां बोलतां ती बसल्या जागेवर उठून उभी राहिली.

' खरं आहे तेंच मी बोलतो आहे. '

' असं निर्लज्जासारखं कांहींतरी बरळूं नका. '

' विधात्यानं स्त्री निर्माण करून एक फार मोठी घोडचूक केली आहे.'

' मनू, तुम्हीं हें शब्द कुणाला बोलतां आहांत, याचं तुम्हांला भान आहे ना ? '

' हो, चांगलाच शुद्धीवर आहे मी ! जिनें मला स्वर्गातल्या मृदुमुलायम गालिच्यावरून खालीं जमिनीवरच्या या खाचखळग्यांत ढकलून दिलें आहे— तिच्याच बद्दलचं माझं हें मत मी बोलून दाखवित आहे. '

' आतां आलं लक्षांत—! पण हें तुम्हीं सिद्ध करून दाखवाल का ? कराल का कांहीं पुरावा सादर ? '

' हो ! पुराव्यानिशी सिद्ध करायला मी तयार आहे ! ' मनू हंसून म्हणाला, ' स्वर्गात रहाणारा हा मनू आतां या मर्त्य लोकांत रानोमाळ हिंडत आहे, ही एक साधीच गोष्ट केवढा मोठा पुरावा होऊन बसली आहे—! '

' पण एक गोष्ट मात्र विसरूं नका तुम्हीं. ती म्हणजे जीवनाचा खरा आस्वाद तर तुम्हीं या धरतीवर राहूं लागल्यानंतरच तुम्हांला चाखतां आला. वाऱ्याच्या झुळकीबरोबर सळसळून डोलणारी हीं लोभसवाणी शेतं—हीं छान घनदाट अरण्यें-आपलीं हीं गोड, गोजिरवाणी असंख्य मुलं ...... हें सगळं सौंदर्य, हें सगळं वैभव त्या स्वर्गात कुठें होतं ? या सुखाचा शतांश तरी आपणाला तिथं लाभला होता कां ? '

' पूर्वीचं आपलं तें निवासस्थान या पृथ्वीपेक्षां लाखों पटींनी सुंदर होतं माया ! तूं जें कांहीं म्हणतेस तें मी नाहीं मान्य करणार !—अन् काय ग, बोलतां बोलतां मात्र तूं या कुठल्या विषयावर आणून सोडलस ! ' मनू एक थंड निःश्वास सोडून पुढें म्हणाला—' हे स्त्रिये, तुझं कामच मुळीं पुरुषाला आडमार्गाला नेण्याचें आहे, हेंच खरें... ! '

' बोलण्यांत तसें मात्र तुम्हीं महावस्ताद आहांतच म्हणा. बोलतां बोलतां मला संभ्रमांत टाकणाऱ्या गोष्टीं तुम्हीं बोलून जातां व माझी नाहक बदनामी करतां आहांत. कुठल्या मूळ विषयावरून मी तुम्हांला भलत्या विषयावर घसरवलं तें तरी सांगा ? उगाच आपलं कांहींतरी... ! '

' तुझा हा राग पण असा विचित्र आहे बघ कीं त्याचा मारा चुकवतां चुकवतां आतां मी पूर्वी आपण कोणत्या विषयावर व काय बोलत होतो तेंच विसरलो ! पाहिलंस ना ? स्त्री ही पुरुषाला कसकशी व कुठपर्यंत भरकटत नेतें. ' मनूनं तक्रारखोर नजरेनं आदिमायाकडे पहात म्हटलं.

' तुम्हीं तसें नाहीं मानणार ! चला उठा, उभे रहा अन् माझ्याबरोबर निघा. '

**हळुंहळुं ती त्याच्या कुशींत शिरली. मनूनं हलकेच तिच्या पाठीवरून हात फिरविला. तिचं हृदय चांचपलं. तिच्या तोंडावर भुरूभुरू उडणारे केंस त्यानं आपल्या वत्सल हातानं मागे सारले. तिच्या सोनेरी केंसांतून त्याचीं बोटं फिरूं लागलीं. तिचा श्वास त्याच्या श्वासांत मिसळला. त्याच्या डोळ्यांवर गुंगी चढूं लागली. ती त्याला एका वेगळ्याच धुंद जगांत घेऊन जाऊं लागली !**

' मला आतां कुठं घेऊन जायचा विचार आहे तुझा ? '

' तुमच्या या जगांत तुम्हांला थोडा फेरफटका मारायला घेऊन जाते अन् दाखवून देते कीं या जगांत कोण शिरजोर झालंय तें—पुरुष कीं स्त्री... ? '

' म्हणजे मला आतां जगांतहिं भटकावं लागणार म्हणतेस तर—— ? छान ! असंच ना ? '

' हो ! माझ्या बचावासाठीं, माझ्या म्हणण्याच्या सत्याचा पडताळा आणून देण्यासाठीं एवढं करणं मला भागच आहे. अन् तुम्हांलाहि थोडं कळून चुकेल कीं पुरुषाची जात किती स्वार्थी व धूर्त असते...... '

मनूनं मायेकडे पाहिलं व तो धिम्या आवाजांत म्हणाला—' हे स्त्रिये, तुझंच दुसरं नांव जिद्द होय ! स्त्री म्हटली म्हणजे तिथं हट्ट हा आलाच ! असो, तुझी इच्छा ! पण माझी एक शर्त आहे हं ? '

' कोणती शर्त ? '

' आपण सबंध जगांत फिरूं व पाहूं कीं अधिक प्रमाणांत कोण गुन्हे करतो ? पुरुष कीं स्त्री ? या जगावर पापाची जी दाट सांवली पडली आहे, तिच्यांत स्त्रीचा वांटा अधिक आहे कीं पुरुषाचा ? अन् मग आपणाला हेंहि नक्की करायला हवें कीं, आपल्या दोघांत जो जिंकेल त्याला बक्षिस काय द्यायचं ? '

' याचा अर्थ ? '

' अग, असं समज कीं,—समजा, स्त्रीनं अधिक गुन्हे केलेले आहेत व जीं पापं घडलीं आहेत तीं स्त्रीमुळें घडली—'

त्यावर मनूचं बोलणं पुरंहि होऊं न देतां आदिमाया मध्येंच त्याच्यावर गरजली—' म्हणजे ? घसरलांत ना पुन्हां स्त्री-जातीवर ? साधी कल्पना करायलाहि तुम्हांला स्त्रीचाच दृष्टांत आढळतो. अशी कां नाहीं तुम्हीं कल्पना करीत कीं, हीं सारीं पापं पुरुषांमुळें घडलीं, पुरुषच अधिक प्रमाणांत गुन्हेगार आहे—? '

त्यावर मनूला आपलें हंसू आवरेना. हंसता-हंसताच तो म्हणाला—' स्त्रिये, तुझंच दुसरं नांव संशय ! स्त्री म्हणजे संशयाच्या पिशाच्यानंच धारण केलेला देह जणूं ! बरं जाऊं दे ते. हें बघ, आपल्या फेरफटक्यांत समजा आपणाला असं आढळून आलं कीं, जगांतील जास्त गुन्हे

नौपाडा शा...
अ. क्र.
विभाग ६९
दिनांक १०।१०।...
नों. दि.

# स मे ट

विश्वकर्म्या, आपलें सारें कौशल्य पणाला लावून तूं मानवाची मूर्ति घडविलीस.

प्रथम पुरुष घडविलास अन् मग त्याच्या सोबतीला स्त्रीला पाठविलंस.

तूं निर्माण केलेला ही स्त्री अजन्न निघाली. मधुर अमृत स्त्रवणाऱ्या चंद्रासारखा तूं तिचा ऊर केलास. पण भुंग्याप्रमाणें काळसर असलेला नित्य कामुकतेनं लवणारा तिचा डोळा तूं कशाला रे घडाविलास? तिच्या या डोळ्यानं पुरुषाला घायाळ केलं नि मग साऱ्या जगांत उत्पात घडून आला.

—त्यांतूनच मग स्त्री श्रेष्ठ कीं पुरुष श्रेष्ठ हा वाद निर्माण झाला. त्या वादाची ही गाभुळलेल्या चिंचेप्रमाणें आंबट-गोड व किंचित् तिखटहि असलेली कहाणी........

## लेखक :– रत्नकांत पावसकर

पुरुषाच्या हातून घडलेले आहेत. असें झालें तर त्याप्रमाणें आपली शर्त तूं जिंकणार. तेव्हां तुझा जय झाला तर तूं काय इनाम घेणार आहेस?'

'तें आपण मागाहून पाहूं. तुम्हीं अगोदर निघा तर खरें. चला, तुमच्या पुत्रांचे चाळे बघा अन् लाजेनं मान खालीं घाला.'

तिचं बोलणं मध्येंच अडवीत मनू म्हणाला, 'शक्यच नाहीं मुळीं! तूंच पहा तुझ्या मुली या जगांत कसा धिंगाणा घालताहेत तें. त्या बयांचे तें चाळे पाहिल्यावर तुलाच तोंड लपवावं लागणार आहे व माझं म्हणणं खरं असल्याचं कबूल करावं लागणार आहे.'

त्याचे ते आत्मविश्वासाचे बोल ऐकून आदिमाया त्याच्याकडे डोळे फाडफाडून पहातच राहिली.

× × ×

मनू आणि महामायेला ज्या जमिनीवर फेंकून दे..ांत आले होते, तेथून तीं दोघं उठली. थोडं अंतर चालून जातांना त्यांना एका जागीं रक्ताचे डाग दिसले. तें इतके कांहीं पार सुकून गेले होते कीं जणूं गेली कैक वर्षें ते त्या जागीं असावेत.

मायेचे डोळे चमकले.

'मनूसाहेब, नीट पाहून ठेवा ही गोष्ट! पहिलं प्रकरण इथंच सुरूं होतं.' मायेनं खोचक शब्दांत म्हटलं.

'पहिलं प्रकरण? याचा अर्थ काय? ही जमीन तरी आपली स्वतःची आहे ना? इथं दुसऱ्या कुणाला यायची परवानगीच नाहीं मुळीं!'

'वा! विसरलांत वाटतं! जरा आठवण करा. थोडं डोकं खाजवा म्हणजे तुम्हांला चांगलंच आठवेल कीं दोन आडदांड पुरुष आपापसांत क्रूरपणें लढले होते. अन् अशा रीतीनें या जगांत त्या पहिल्या लढाईनं 'युद्ध' जन्माला आलं होतं. तर मग आतां सांगा पाहूं—या जगांत लढाईला प्रथम सुरुवात कोणी केली? सांगा नं! घ्या स्त्रीवर आळ अन् म्हणा स्त्रीनं जगांत लढाईला सुरुवात केली.'

क्षणभर मनू स्तब्धच राहिला. व मग तिला म्हणाला–'माया, मी एक गोष्ट विचारूं का तुला?'

'हो! विचारा कीं!'

'त्या दोघां आडदांड पुरुषांमध्यें झालेली लढाई कशासाठीं झाली होती? काय हवं होतं त्यांना?'

'आश्चर्य आहे! त्यांच्या भांडणाचं साधं कारणहि तुम्हांला ठाऊक नाहीं?'

त्यावर मनू शांतपणें म्हणाला–'अग, मला सारं कांहीं ठाऊक आहे! मला असं म्हणायचंय कीं, ती लढाई स्त्रीमुळें झाली होती. तुम्हां महाराजांच्या कुणा राजकन्येसाठीं. तेव्हां लक्षांत आलं का? त्या दोघांत स्त्रीची बाब आड आली नसती तर ते कशाला मरायला लढायला गेले असते? आपापसांत लढायला त्यांना कांहीं कुठला पिसाळलेला कुत्रा नव्हता चावला...'

'शेवटीं बाजू माझ्यावरच उलटलींत ना? आहांतच तुम्हीं तसें चतुर! असं कां नाहीं तुम्हीं म्हणत कीं, स्त्रीसाठीं भांडणाऱ्या त्या दोघांच्या टाळक्यांत अक्कलच नव्हती म्हणून? अक्कलहुशारी असती तर थोड्या समजुतदारपणानें तो प्रसंग नसतां का टळला? म्हणून तर मी म्हणते कीं...'

'म्हणूनच मी म्हणतो कीं, माया मनूच्या विचाराबरहुकुमच विचार करते. तिच्यापाशीं तिची स्वतःची विचारसरणी नाहीं, स्वतःची अक्कल नाहीं.'

मायानं रागारागानं पात्र आपटले व ती पुटपुटली— 'अस्सं काय?... चला, पुढें चला. तुम्हांला दाखविते...'

'कशाला? मीच तुला आतां फरफटत घेऊन जाईन व स्त्री चुका करते कीं पुरुष करतो तें दाखवीन.' असं म्हणून मनूनं मायेचा हात

धरला व तो तिला जवळजवळ ओढीतच नेऊं लागला.

× × × ×

उंच उंच पर्वत, खोल खोल दऱ्या, घनदाट अरण्यें, विशाल मैदानें आणि क्षेत्रा-क्षेत्रांची कुंपणें ओलांडून मनू आणि माया जेव्हां जगाच्या सरहद्दींत आलीं, तेव्हां त्यांचे डोळें आश्चर्यानें विस्फारलें. कारण दाट धुरानें कोंदलेल्या अशा जागेंत तीं आतां येऊन पोहोंचलीं होतीं. सर्वत्र धूरच धूर पसरला होता व आसपास कित्येक घरेंदारें आगीच्या भक्ष्यस्थानीं पडत असलेलीं दिसत होती. आगीच्या ज्वाला आकाशाला भिडल्या होत्या. लोक धांवत होते, पळत होते, ओरडत होते. सर्वत्र एकच कल्लोळ माजला होता.

मनू अन् माया– त्या दोघांनीं एकमेकांच्या तोंडाकडे पाहिलं. अकस्मात धुराचा एक मोठा लोट तिथें आला अन् मायेच्या डोळ्यांत धूर गेला. धुरानें भरलेले आपले डोळे चोळीत चोळीत ती मनूला म्हणाली— 'हें सगळं कसलं तुफान माजलं आहे ? माझा तर श्वास अडखळूं लागला आहे.'

'ह्या नव्या जगानं तुझ्या स्वागतासाठीं आपलीं घरं जाळून त्यांचे दीप पेटविले आहेत.'

'काय बोलता आहांत तुम्हीं हें ? जरा वेळ काळ तरी पहात चला. जगांतील लोकांना आपण थोडेच दिसतो आहोंत ? म्हणून तर...'

'म्हणून तर मी म्हणतो कीं, मायेला कांहीं डोकं नाहीं. कांहीं कळत नाहीं तिला !'

इतक्यांत एक मुलगी झेलपटत समोरून येत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. मुलगी कमालीची सुंदर होती. तिचे केंस सोनेरी होते, डोळें निळे होते, गालांत गुलाबाची फुलं होतीं. पण नाक थोडेसे बसके होते. तरीसुद्धां ती अत्यंत लावण्यवती दिसत होती.

ती आली अन् धाडकन् मनूच्या चरणांजवळ कोसळली. मनू व मायानं एकमेकांकडे पाहिलं अन् कांही संकेत केला. त्याबरोबर मनू व माया तीं दोघंहि मानवी देहांत अवतरली.

मनू एकदम धांवला व पुढें होऊन त्यानं त्या मुलीला सांवरलं. तिला त्यानं वर उठवलं. ती मुलगी अर्धवट शुद्धीवर राहिली होती.

'मुली, काय होतंय तुला ?' मनूनं विचारलं. ती मुलगी हलक्या आवाजांत म्हणाली– 'तुम्हांला...माहित नाहीं ?...शत्रू...चाल करून...आला आहे...लढाई चालू आहे...'

ती पुढें सांगूं लागली–'त्या लोकांनीं आमचीं घरं जाळून टाकलीं आहेत. माझ्या आई-वडिलांना त्यांनी ठार मारलं...आतां ते माझ्यामागे लागले आहेत... ते माझी अब्रू लुटूं पहाताहेत... मला वांचवा...हो मला वांचवा...'

ती रडूं लागली. स्फुंदस्फुंदून रडूं लागली व सांगूं लागली–' मी माझ्या अंगणांत गुलाबाचं एक रोपटं लावलं होतं. आज त्या रोपट्यावर पहिलंच फूल उमललं होतं. मी माझ्या प्रियकराला वचन दिलं होतं कीं, ज्या दिवशीं माझ्या अंगणांत गुलाबाचं पहिलं फूल फुलेल त्या

## जीवन माझें....

रंगभूमीचा खलनायक मी
जीवन मजला कळलें आहे
सुखदुःखाचें गोड कडू फळ
मीच उगाळुनी प्यालों आहे ॥१॥

खिशांत माझ्या पैसा नाहीं
बुटांस पॉलिस माझ्या चकचक
मला नको पण हवा दिसाया
त्यांत जगाचा मुखडा झकपक ॥२॥

परिस्थितीनें विणलें जाळें
आणि मुखवटा जरी बदलला
मी करितो कपड्यांना इस्त्री
तिथें जगाचा खिळला डोळा ॥३॥

अपुऱ्या आशा आकांक्षांची
मनांत जळते चिता सदाची
दिवस आजचा जातो वाया
मन रेखाटे चित्रं उद्यांचीं ॥४॥

मन माझें तळ संथ जलाचा
वरानी झकपक निळा गालिचा
खडा टाकितां दिसे परंतु
रंग मुखावर खरा, मनाचा ॥५॥

चर्नीरोड ते मरीन-लाइन
जीवन माझें स्मशान-भिंत
पल्याड कांहीं घडतें आहे
मुखावरी ना खेद न खंत ॥६॥

—सी. पु. चालावलकर

दिवशीं आपण विवाहबद्ध व्हायचं. त्याप्रमाणें आज माझं लग्न होणार होतं. पण-पण कांहीं रानटी माणसें आमच्या प्रेमांच्या आड आली. माझी अभिलाषा धरून त्यांनी माझा पाठलाग चालविला आहे. ते चोर डाकू आहेत, सैतान आहेत. जगांत सारेच सैतान आहेत! आमच्या शेतीवाडीची राखरांगोळी झाली आहे. घर उध्वस्त झालं आहे! ... मी आतां कुठं जाऊं? माझं आतां कुणी नाहीं! तुम्हींच सांगा-माझ्यासारख्या एका अनाथ मुलीवर बलात्कार करणं हें या पुरुष-जातीला शोभतं का? किती खुनशी, नीच लोक आहेत हे! मला शक्य झालं असतं तर या सर्वांना मी फाडून खाल्लं असतं-'

मनूची मान खालीं झुकली. मायाच्या डोळ्यांत एक वेगळीच लकाकी चमकली. तिच्या डोळ्यांत विजयाची ऐट तळपूं लागली. तिला वाटलं कीं, हा स्त्री-जातीचा विजय झाला आहे. पुरुषाच्या अधमपणानं स्त्रीचा चांगुलपणा दिसून आला आहे. त्यापुढें तिचा मान वाढला आहे.

ती मुलगी आपली हकिगत पुढें सांगूं लागली 'माझं जीवन बरबाद झालं आहे-'

मुलगी रडतच होती. धूर आसपास पसरतच होता. घरं जळतच होती. माणसांची कानठळ्या बसविणारी असली बोंबाबोंब मनूनं व मायानं यापूर्वी कधींच ऐकलि नव्हती. इतक्या प्रचंड कोलाहलाचें दृश्य त्यांनी यापूर्वी कधीच पाहिलं नव्हतं.

'प्राण गेला तरी बेहत्तर, पण मी त्या जंगली नराधमांच्या स्वाधीन मुळींच होणार नाहीं, गांवाच्या वेशीबाहेरून वाहणाऱ्या नदींत मी जीव देईन, मरेन, पण या राक्षसांच्या हातीं कधींच सांपडणार नाहीं' आणि इतकं बोलून ती मुलगी एकाद्या वेड्याप्रमाणें सुसाट धांवत सुटली. न अडखळतां, न पडतां ती विजेच्या वेगानें निघून गेली, समोरच्या धुरांत अदृश्य झाली. अन् मनू व माया आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पहातच राहिलीं. तिला अडवायचं त्यांना भानहि राहिलं नाहीं.

मायानं मनूला विचारलं—'पाहिलंत ना? ह्या मुलीवरसुद्धां पुरुषच अत्याचार करीत आहे, मग आता काय म्हणणं आहे तुमचं?'

मनूचे डोळे तापले गेले होते. त्याला क्रोध चढला होता. तो फक्त इतकंच म्हणाला—'इथं काय पहायचं आहे? चल, पुढच्या घडामोडी तुला दाखवूं? येतेस? मायेच्याहि कन्यांचे अपराध या जगांत कमी नाहींत. चल, तुला दाखवितो.' अन् ती दोघंहि पुढची वाट चालूं लागली.

× × ×

एका ठिकाणीं एका वृद्ध माणसाच्या पाठीवर मोठमोठे दगड ठेवण्यांत आले होते. व शिपायांप्रमाणें दिसणारीं माणसं त्याच्याभोवतीं उभी होतीं.

तो वृद्ध इसम दरिद्री होता. शेतसारा वसुलीला आलेल्या सरकारी माणसांकडे त्यानें सारा भरला नव्हता. म्हणून त्याच्यावर तीं माणसं जुलुम-जबरदस्ती करीत होतीं. त्यांनी त्याचा नाना तऱ्हेनें छळ आरंभला होता.

एक शिपाई त्याच्यावर खेंकसला- 'बदमाष' सारा मात्र भरत नाहीं, न् नुसता हुजूर, हुजूर करतो आहे. गयावया करूं लागलास म्हणून का तुझा कर माफ होणार आहे?'

जवळच जहागिरदार उभा होता. तो त्या म्हाताऱ्याच्या दिशेनं पुढें आला अन् त्याला म्हणाला, "एका अटीवर तुझा कर माफ करायला मी तयार आहे."

त्या जहागिरदाराच्या डोळ्यांतून त्याची वासना गळत असलेली दिसत होती. त्या म्हाताऱ्या खेडवळ माणसानें जहागिरदाराच्या तोंडाकडे दयेच्या आशेनं पाहिलं. तेव्हां तो जहागिरदार पुढें म्हणाला— "माझी अट तशी कांहीं भयंकर किंवा कठीण नाहीं. बस्स्, फक्त एका रात्रीपुरतीची गोष्ट आहे..."

तें ऐकून माया भयंकर दचकली. कावरीबावरी झाली. ती मनूकडे पाहूं लागली.

"साहेब, मला जें काय छळायचं असेल ते छळा. मला शासन करा. पण माझी मुलगी... हुजुर, कृपा करून माझ्या मुलीला मात्र..." त्या म्हाताऱ्याचा श्वास घशांतच अडकला. त्याला पुढें बोलतांच येईना.

म्हाताऱ्याला जहागिरदाराची अट अमान्य असलेली पाहून त्या शिपायांनीं त्याला खूप बदडून काढलं. मरेस्तोवर मारलं. त्याचं हाडन् हाड खिळखिळं करून टाकलं. कम्बख्त, जहागिरदारसाहेबांना धुडकावून लावतो म्हणजे काय?

## यमू गोरेचें चित्र

**अविनाश हा चांगल्यापैकीं चित्रकार होता. त्याची सात वर्षांची छोटी बहीण उषा एकदां त्याला म्हणाली, 'दादा, आपल्या शेजारीं गोऱ्यांची यमू आहे ना, ती मला म्हणाली कीं, तुझ्या दादाला माझं चित्र काढायला सांग."**

**तेव्हां अविनाश म्हणाला, "तिला जाऊन सांग, सध्यां माझ्याजवळ काळा रंग फारच थोडा आहे. बाजारांतून भरपूर काळा रंग आणल्यावर तुझं चित्र काढीन म्हणावं."**

तो म्हातारा त्या निर्घृण मारानें काळानिळा होऊन बेशुद्ध पडला. मग जहागिरदारानें आपलीं माणसं त्या म्हाताऱ्याच्या घरीं पाठविलीं व त्याच्या मुलीला पकडून आणायला फर्मावलं. व आपल्या तैनातितल्या एका माणसाला सुचवलं- "तिला राजवाड्यांतील माझ्या खोलींत नेऊन सोडा. गुपचूपपणें करा सारं. कुणाला कांहीं कळूं देऊं नका."

मायानं मनूचा हात धरून खेचला व ती त्याला घेऊन तिथून पळत सुटली. जातां जातां ती म्हणाली- "पाहिलांत ना हा तमाशा? पुरुष-जात किती सुतासारखी सरळ नि सज्जन आहे नाहीं का?"

त्यांचा फेरफटका चालूच होता.

सगळीकडे नुसते निःश्वास नि हुंदकेच ऐकूं येत होते. त्यावरून सहज ताडतां येत होतं कीं, याहि भागांत कुठेंतरी मानवी-वस्ती असायला हवी.

'आई, मला भूक लागली-!' भुकेनं कासावीस झालेल्या एका बालकाची हांक ऐकूं आली. त्याबरोबर मायानं वळून पाहिलं-रस्त्याच्या कडेला एक गरीब स्त्री बसली होती. तिच्याजवळ तिचं एक मूल रडत होतं आणि दुसरी दोन मुलं खालीं जमिनीवर झोपलीं होतीं. तीं सारींजणं भुकेनं व्याकुळलेली होतीं.

'भूक लागली आहे तर मलाच गिळून खा.' आई शेवटीं वैतागानं त्यांच्यावर खेंकसली. आणि त्याला तिनं झिडकारून टाकलं.

पण तिच्या या झिडकारण्याचा त्या मुलावर

कांहींच परिणाम झाला नाहीं. त्यानं आपली मागणी चालूच ठेवली–' आई, मला भूक लागली आहे. मला खायला दे. आई, मला भूक लागली आहे. . . '

आतां मात्र त्याच्या आईनं आपला पवित्रा बदलला. समजावणीच्या स्वरांत ती त्याला म्हणाली–' तूं शहाणा आहेस ना रे ! मग थांब पाहूं थोडा वेळ. तुझे बाबा बाहेर गेले आहेत. तुला ते आतां खाऊं घेऊन येतील . . . '

त्या रडणाऱ्या मुलाला आपल्या आईचं म्हणणं खरंच वाटलं. पण त्याच्या शेजारीं लोळणारा, त्याच्याहून थोडा मोठा व समंजस असणारा मुलगा मध्येंच म्हणाला–' आई, तूं खोटारडी आहेस. बाबा तर कधींच मेले. ते आतां कुठून खाऊं घेऊन येणार ?'

आपल्या मुलाचे तें उद्‌गार ऐकून ती गरीब स्त्री एकदम चपापली. तिनं त्या रस्त्यानजिक डौलानें उभ्या असलेल्या एका भव्य इमारतीकडे पाहिलं. त्या इमारतीच्या खिडक्यांवर रेशमी पडदे झुळझुळत होते. जवळच्या बागेंत मधुर सुगंध उधळणारी सुरेख फुलझाडें होती. ती गरीब स्त्री आपल्या मुलांना उद्देशून म्हणाली— ' तुम्हीं इथंच बसा, बरं का ! मी आतांच तुमच्यासाठीं भाकरी मागून आणते. '

मग ती बसल्या जागेवरून उठली व त्या इमारतीजवळ गेली. मालकासारखा दिसणारा एक माणूस तिथें बसला होता. ती दरिद्री स्त्री त्याला म्हणाली ' शेठ ! माझी मुलं उपाशी आहेत. भुकेनं तडफडताहेत. त्यांना खायला कांहींतरी द्या. मला भीक घाला शेठ ! '

त्या अभागिनीच्या डोळ्यांतून सरसर अश्रू ओघळूं लागले. अधिक शब्द तिच्या तोंडातून फुटेनाच. तिला पुढें कांहीं बोलतांच येईना.

त्या शेठजींनी तिरप्या नजरेनं तिच्याकडे पाहिलं व ओठांवर एक मंद स्मित पसरीत तिला म्हणाले— ' तूं गेले दोन महिने या रस्त्यावर अशी पडून आहेस. येणाऱ्याजाणाऱ्यापुढें हात पसरून भीक मागतेस. पण माझं सांगणं कांहीं तूं ऐकत नाहींस. बघ, ऐक माझं. तुझ्यावरहि कधीं भुकेचा प्रसंग येणार नाहीं अन् तुझी मुलंहि उपासानं कधीं तडफडणार नाहींत. तुम्हां सर्वांच्या भाकरीचा प्रश्न सुटेल ! '

त्या भिकारणीनं त्या शेठजींच्या डोळ्यांत क्षणभर पाहिलं, अन् ती त्यांना म्हणाली— ' शेठजी, समजा तुमची मुलं जर आज अशी उपाशी राहिलीं असतीं तर...'

' चल चल, चालती हो ! आली आहे मोठी मुलंवाली ! निघ येथून... '

तेवढ्यांत समोरून तिच्या मुलांची हांक तिच्या कानीं आली–' आई, भूक लागली आहे... ' अन् ती हांक ऐकतांच क्षणांत तिचा निर्धार कोसळला. तिच्या हृदयांतील मातृवात्सल्यानें उचल खाल्ली. भाकरीनें नीतिवर जय मिळविला. अन् त्या भिकारणीनं आतांपर्यंत उराशीं जपलेला आपल्या शीलाचा सोन्याचा तुकडा दूर भिरकावला.

ती त्या शेठजींबरोबर आंतल्या बाजूला गेली अन् शरीराच्या सौद्यानें तिनं भाकरीचा प्रश्न सोडवला.

शेठजींबरोबर निघून जात असलेल्या भिकार–णीकडे मनूनं पाहिलं अन् त्यानं आपली मान फिरवली. तो मायाला म्हणाला—' चल, निघू या...आटोपला सारा कारभार. ' त्याच्या शब्दांत स्त्रीच्या पराभवाची व पुरुषाच्या विजयाची भावना होती. मायाच्या तें लक्षांत आलं.

माया त्याला म्हणाली—' नाहीं मनू ! अशा गुन्ह्याला मी गुन्हा म्हणणार नाहीं ! अगतिक-पणांत असाह्य अवस्थेंत परिस्थितीत बळी पडलेल्या व्यक्तीला मी गुन्हेगार म्हणूं शकणार नाहीं. तिला मी तिचा गुन्हा माफच करीन. '

' हें बघ माया, तुझं हें तत्त्वज्ञान बाजूला ठेव. आपल्या पराभवाचं समर्थन करायचं तुला कांहीं आवश्यकता नाहीं. '

' नाहीं हो, हें समर्थन नाहीं. तुम्ही एक वेळ आई बना म्हणजे मग तुम्हाला कळेल मातृहृदय काय चीज आहे तें ! एखाद्या मातेपुढें तिच्या मुलांच्या प्राणांचा प्रश्न जेव्हां उभा रहातो, तेव्हां ती एकदांच नव्हे तर हजार वेळांहि आपल्या चारित्र्याची आहुति द्यायला तयार होते. कारण स्त्रीचं चारित्र्य हें अमोल आहे. पण मूल हें तर तिचं सर्वस्वच आहे. तेव्हां अशा परिस्थितींत पतित झालेल्या स्त्रीचा तो गुन्हा नव्हे, ती मातेच्या ममतेची हांक असते मनू ! '

" हें बघ माये, कुठल्याहि गोष्टीचं समर्थन करायच्या बाबतींत कांहीं तूं मला हार जायची नाहींस. पण आतां तूं स्वतः हरली आहेस, हें मात्र तुला कबूल करावंच लागेल. "

मनूनं मायाचा हात धरला व तिला पुढें चलायला सुचवलं.

× × × ×

मनू मायेला जरा एका बाजूनं घेऊन जाऊं इच्छित होता. पण माया मध्येंच अडखळली. तिच्या कानांवर स्त्रियांच्या आरोळ्या व पुरुषांच्या हास्याचा खडखडाट आला. तिनं मनूच्या हातां-तून आपला हात सोडवून घेतला.

" हें कुणाचं ओरडणं ऐकूं येत आहे ? कोण ओरडत आहे ? कां ओरडत आहे ? "

" अग, तुझ्या मुलीं त्या खिदळताहेत. त्यांच्याच हास्याचा हा खळखळाट तुला ऐकूं येतो आहे. " मनू म्हणाला.

" कमाल आहे तुमची ! हा आवाज तुम्हांला कुणाचं तरी हास्य वाटतो काय ? शी, शी, काय ही तुमची निर्दय थट्टा ! "

पुढें होऊन मनूनं जरा वाकून पाहिलं. पण तत्क्षणीच तो एकदम मागे हटला.

तो स्त्रियांचा बाजार भरला होता. विवस्त्र स्त्रियांचा सौदा तेथें केला जात होता. पुरुषांची बेसुमार गर्दी तेथें उसळली होती. एखादी चीजवस्तू, मालमत्ता तपासून घ्यावी, चांगली निरखावी, पारखावी त्याप्रमाणें तथा बाजारांत पुरुष स्त्रियांना बारकाईनें न्याहाळीत होते, त्यांची कसून तपासणी करीत होते.

मायानंहि तें दृश्य पाहिलं अन् तिचा सारा जोम, सारा जोर क्षणांत थंडगार पडला. तिला तें बघवेना, ऐकवेना. तिनं आपल्या दोन्हीं कानांत

पान ६१ वर


## अंदाजपत्रक

अंदाजपत्रक म्हणजे
दुसरें तिसरें कांहीं नसून–
खर्च केल्यावर जी
चिंता करायची असते
तीच चिंता
खर्च करण्यापूर्वी
करण्याची पद्धत !

( पान ४६ वरून )

**व्यक्ती :** ........मी अननुभवी चोर होतों.

**निमा :** असं !

**व्यक्ती :** ( विषय बदलीत )...मी इथं आलोंय तो 'उलथापालथ' दैनिकाचा प्रतिनिधि म्हणून.

**निमा :** काय हवंय तुम्हांला ?

... ... ... ... ...

**व्यक्ती :** ...मला नाहीं तें शक्य वाटत.

( विमा गप्प )

**निमा :** अहो, प्रतिनिधि, तुम्हांला हवंय काय तें सांगा लौकर.

**व्यक्ती :** मुलाखत.

**निमा :** माझी ?

**व्यक्ती :** हो. तुमचीच.

**निमा :** ( कुत्सित सूर ) म्हणजे वेगळी, कीं कालच्यासारखीच ?

**व्यक्ती :** ( संथपणें ) आमच्या वर्तमानपत्राचं तुमच्यावर प्रेम बसलंय असं वाटतं कीं काय तुम्हांला ?

**निमा :** नाहीं; पण तुमचं—

**व्यक्ती :** यावेळीं वर्तमानपत्राचा प्रतिनिधी आहे मी.

**निमा :** अस्सं. ( थांबून ) काय हवंय तुमच्या वर्तमानपत्राला ?

**व्यक्ती :** ...सांगितलं ना, मुलाखत हवी आहे.

**निमा :** ( या रोखठोक उत्तरानं बिचकून ) माझी ?

... ... ... ... ...

**निमा :** ( चिडखोर सुरांत ) आणि तुम्हांला तरी मी कुठं काय म्हटलं ?

[ स्फोटक स्तब्धता. ]

**निमा :** [ निर्णायक सुरांत ] मी मुलाखत मुळींच देणार नाहीं.

**व्यक्ती :** देणार नाहीं ?

**निमा :** हो.

**व्यक्ती :** .. ती काय म्हणून ?

**निमा :** ( तितक्याच ठांशीवपणें ) **तुम्ही** मागताहांत म्हणून. तुमच्यासारख्या माणसाला मुलाखत द्यायची माझी इच्छा नाहीं. ( पुन्हां हलक्या, धारदार सुरांत ) काल झालीच कीं आपली मुलाखत !

**व्यक्ती :** ( दुखावून ) पुन्हां पुन्हां तुम्हीं त्याच एका गोष्टीचा उल्लेख करतां आहांत.

**निमा :** ( दुखावण्याच्याच उद्देशानं ) कां ? लागतो तो ?

**व्यक्ती :** ...मी तें सगळं विसरण्याचा प्रयत्न करतों आहे.

**निमा :** मग इथं कशाला आलांत !

... ... ... ... ...

**व्यक्ती :** ...माझ्या प्रेमाची तुम्हीं याच मोलानं किंमत केलीत.

**निमा :** मग काय किंमत होती त्याची ?

**व्यक्ती :** ...तो विषय निघाला कीं जीभ जड होते.

**निमा :** (अर्थपूर्ण सुरांत) कालपासून ?

**व्यक्ती :** ...जीभ—जीभच लुळी पडते. (उसासा.)

**निमा :** तर मग अद्याप प्रेम आहे तर तुमचं माझ्यावर !

**व्यक्ती :** (विरक्तपणें) ...मला तुमची मुलाखत सध्यां हवी आहे.

**निमा :** ( रोख कायम ठेवीत ) काय हो, पण मुलाखतीसाठीं नेमके माझ्याकडेसे आलांत तुम्हीं ?

**व्यक्ती :** (सरळपणें)...त्या यादींत तुमचं नांव होतं.

**निमा :** (आश्चर्यानं) माझं नांव ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** तें कसं ?

**व्यक्ती :** मला वाटतं, तें संपादकांनाच विचारायला हवं.

**निमा :** तुम्हीं विचारलं नाहींत ?

**व्यक्ती :** ...निदान आमच्या नोकरींत.

**निमा :** अस्सं.

... ... ... ... ...

**विमा :** बसतेय गप्प !

**निमा :** विमे, जरा गप्प बैस ना तूं ! जस्ट फॉर माय सेक, अं ? दोनच मिनिटं —मी सांगते म्हणून !

**विमा :** ......त्यांना म्हणावं तुम्ही पण माझ्या वाटेला जाऊं नका.

**व्यक्ती :** ( खंवचटपणें ) तितका आंधळा नाहीं मी.

**विमा :** ( ओरडून ) बरं—बरं. समजलं !

**निमा :** ( तिला समजावीत ) गप्प हो ग. लक्ष नको देऊंस तूं. शहाणी माझी बाय ती.

(विमा हुप्प करून बसते.)

हं, आतां बोला.

**व्यक्ती :** तुमचं जरा वय सांगा.

**निमा :** अं. वय ?

**व्यक्ती :** ( निर्विकारपणें ) हो. तुमचं वय.

**निमा :** तें काय म्हणून ?

**व्यक्ती :** इथं जरूर आहे म्हणून.

**निमा :** पण माझ्या वयाशीं—

**व्यक्ती :** विषयाचा संबंध आहे...तुमच्या वयाला महत्व आहेच.

**निमा :** (आक्षेप घेत) पण हें शिष्टाचाराला सोडून होतं आहे.

**व्यक्ती :** ...तो निव्वळ एक खाजगी प्रश्न आहे.

**निमा :** ( खोंचकपणें ) कधीं कधीं त्याला सार्वजनिक स्वरूप येतं, इतकंच.

**व्यक्ती :** (दुखावून) पुन्हां कालचा उल्लेख केलांत !

**निमा :** (संभावितपणें) मी फक्त एक विधान केलं.

**व्यक्ती :** आधीं वय सांगा तुमचं.

**निमा :** पंचवीस.

**व्यक्ती :** ...आतां पहिला प्रश्न.

**निमा :** ( मध्येंच ) तुमचं वय किती ?

**व्यक्ती :** ( या उलट प्रश्नानं गोंधळून ) अं ?

**निमा :** तुमचं वय किती ?

**व्यक्ती :** हा कुठला प्रश्न ?

**निमा :** दुसरा प्रश्न.

**व्यक्ती :** या मुलाखतींत हा उद्‌भवत नाहीं.

**निमा :** चालेल. पण उत्तर द्यायला काय हरकत आहे ?

**व्यक्ती :** पण—

**निमा :** बाई असून मी माझं वय सांगितलं आणि आतां तुम्ही मात्र—

**व्यक्ती :** सव्वीस माझं वय.

**निमा :** अस्सं. ( लागलीच ) शिक्षण ?

**व्यक्ती :** ( अस्वस्थ होत )...पुढच्या प्रश्नोत्तरांच्या दृष्टीनें हें आपण लक्षांत ठेवायला हवं.

**निमा :** ठीक. पण शिक्षण सांगाना.

**व्यक्ती :** ( जास्तच अस्वस्थ होत )—पुन्हां तुम्हीच प्रश्न विचारता आहांत !

**निमा :** ( शांतपणें ) मुळींच नाहीं. " शिक्षण सांगा " हा प्रश्न कसा होतो ?

**व्यक्ती :** मग काय होतं ?

**निमा :** विनंती होते.

**व्यक्ती :** बी. ए....आतां तुम्ही त्याच प्रश्नाचं उत्तर द्या. प्रश्नाचं नव्हे, विनंतीचं.

**निमा :** बी. ए.

**व्यक्ती :** ...कमाल आहे !

**निमा :** कसली ?

**व्यक्ती :** ......तुम्ही कधीं—

**निमा :** ( पुन्हां चिमटा काढण्याची लहर येऊन मध्यच ) काल मात्र तुम्ही पहिल्याच प्रश्नाला किती अडखळलांत !

**व्यक्ती :** ...माझ्या मनाला पुन्हां पुन्हां घरं पाडतां आहांत तुम्हीं.

**निमा :** बरं, राहूं द्या तें. तुमचा प्रश्न विचारा.

**व्यक्ती :** ( घसा खाकरून ) तुम्ही कधीं प्रेम केलंय कां ?

**निमा :** अं ? मी ?

**व्यक्ती :** हो, तुम्ही. तुम्ही कधीं प्रेम केलंय का ?

**निमा :** असले नाजुक प्रश्न जाहीर मुलाखतींत काय म्हणून ?

**व्यक्ती :** तें संपादकांना माहित.

**निमा :** ( गरम होत ) मी याला उत्तर देणार नाहीं.

**व्यक्ती :** ...तसं आम्ही प्रसिद्ध करूं.

**निमा :** पण—पण—मग—

**व्यक्ती :** ...कीं हमखास कांहींतरी काळेंबेरं असलं पाहिजे असं लोक समजतात.

**निमा :** (गोंधळून) पण उत्तर-या प्रश्नाला उत्तर—

**व्यक्ती :** इथं कांहीं तरी लिहायलाच हवं.

**निमा :** ( कुंठित होत ) पण काय लिहायचं ?

**व्यक्ती :** ...असं लिहूं कीं प्रेम केलं.

**निमा :** केलं ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** कुठं केलं ?

**व्यक्ती :** ...किंबहुना बऱ्याच वेळां तें खोटं असतं.

**निमा :** ( बजावीत ) मी—मी मुळींच प्रेम केलेलं नाहीं.

**व्यक्ती :** फुकट खोटेपणा पदरांत येतो.

**निमा :** ( तापत ) खोटेपणा ? कसला खोटेपणा ?

**व्यक्ती :** ...कीं लोकांना ती नेमकी खरी वाटते.

**निमा :** ( खवळत ) मूर्ख आहेत लोक !

**व्यक्ती :** ...हूं. मग ? काय लिहूं ? प्रेम केलं ?

**निमा :** ( कोंडी झाल्याप्रमाणें ) मी—मला—मी मुलाखतच देत नाहीं.

**व्यक्ती :** ...या प्रश्नावर बाईनीं तडकाफडकीं मुलाखत बंद केली म्हणून.

**निमा :** ( घाईघाईनं ) नाहीं, नाहीं—

**व्यक्ती :** ( संथ, निर्विकार सुरांत ) त्याशिवाय मुळीं गत्यंतरच नाहीं.

**निमा :** ( वैतागून ) मग – मग लिहा काय हवं तें.

**व्यक्ती :** ( खात्री करून घेण्यासाठीं ) हवं तें ?

**निमा :** म्हणजे प्रेम केलंय—म्हणून.

**व्यक्ती :** थँक यू. लिहितों.

**विमा :** ( मौन सुटून ) म्हणजे निमे–

**निमा :** ऐक ग.

**विमा :** ( न रहावून ) म्हणजे तूं–

**निमा :** ( ओरडून ) जरा गप्प बैस म्हणते ना !

**विमा :** ( चडफडत ) ......किती सहन करणार ?

**निमा :** ( समजूत घालीत ) पण– विमे, तुला कसं एवढं समजत नाहीं कीं–

... ... ... ... ...

[ विमा जाते. ]

**व्यक्ती :** एकदम ताजंतवानं वाटलं.

**निमा :** ( तीक्ष्णपणें ) तें कां ?

**व्यक्ती :** ...बोला. किती वेळां ?

**निमा :** काय किती वेळां ?

**व्यक्ती :** प्रेम. प्रेम किती वेळां ?

**निमा :** प्रेम ?

**व्यक्ती :** ...किती वेळां केलंय् ?

**निमा :** ( गरम आणि थक्क होत ) म्हणजे काय, आरंभलंय काय तुम्ही ?

**व्यक्ती :** कुठं काय.

**निमा :** ( रागानं ) मग हा पाचकळ प्रश्न कशासाठीं विचारता आहांत ?

**व्यक्ती :** प्रश्नावलींत तो नमूद आहे म्हणून.

**निमा :** असला प्रश्न ?

**व्यक्ती :** ...हाच !

**निमा :** तुमचे संपादक फार शहाणे असले पाहिजेत !

**व्यक्ती :** असं त्यांनासुद्धां वाटतं.

**निमा :** ( रागारागानं ) शहाणे म्हणजे—

**व्यक्ती :** ( अडवीत ) मुलाखत प्रेमविवाहाबद्दल आहे.

**निमा :** पण हा काय प्रश्न ?

**व्यक्ती :** ...... ( वाचत ) तुम्ही प्रेम किती वेळां केलंय ?

**निमा :** ( विटून ) हजार वेळां.

**व्यक्ती :** लिहितों तसं.

**निमा :** ( चडफडत ) पण संपादकांना काय करायचंय् त्याच्याशीं ?

**व्यक्ती :** ... त्यांतल्याच कांहीं निवडक प्रकरणांची माहिती पुढें विचारली आहे त्यांनीं.

**निमा :** ( धुमसत ) माहिती ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** ( अनावर होऊन ) हलकट !

**व्यक्ती :** अं ?

**निमा :** असले कसले हे प्रश्न ?

**व्यक्ती :** ...मुलाखती सनसनाटी झाल्या पाहिजेत असं त्यांना वाटतं.

**निमा :** म्हणून काय दुसऱ्याच्या खाजगी प्रकरणांत तोंड घालायचं ?

**व्यक्ती :** ( थंडपणें ) यालाच कांहीं लोक वृत्तपत्र-व्यवसाय असं म्हणतात.

**निमा :** ( तावातावानं ) तुमच्या संपादकांना माझा निरोप सांगा.

**व्यक्ती :** ...पण खरंच, उत्तर तर दिलंत तुम्ही !

**निमा :** (आश्चर्यानें) दिलं ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** (जास्तच आश्चर्यानं) कुठं ?

**व्यक्ती :** (हातांतले कागद पहात) इथं लिहिलंय तर खरं मी.

**निमा :** (सभय) काय ?

**व्यक्ती :** (वाचत) हजार वेळां.

**निमा :** (गडबडीनं) खोडून टाका तें-आधीं खोडून टाका ! काय आरंभलंय काय तुम्हीं ?

**व्यक्ती :** मुलाखत. (थांबून) हं. खोडलं. आतां उत्तर द्या.

**निमा :** ( ठाम सुरांत ) मी उत्तर देणार नाहीं.

**व्यक्ती :** (शांतपणें) तसं लिहितों.

**निमा :** (घाईनं) नको—

**व्यक्ती :** मग ?

**निमा :** (पेंचांतून सुटण्याचा प्रयत्न करीत) लिहा-घ्या लिहून.

**व्यक्ती :** हं, काय ?

**निमा :** लिहा कीं-कीं-( कांहींच सुचत नाहीं अखेर ) तुम्हींच सांगा ना काय तें-वृत्तपत्र-प्रतिनिधी म्हणून नव्हे—

**व्यक्ती :** मग कोण म्हणून ?

**निमा :** एक-एक सभ्य गृहस्थ म्हणून.

**व्यक्ती :** ...मला वाटतं ' एकदांच ' असं लिहावं.

**निमा :** पण मी कुठं कुणावर प्रेम केलंय ?

**व्यक्ती :** —छापून आलं याचा अर्थ केलं असा होत नाहीं.

**निमा :** (नाइलाजानं) बरं. लिहा.

**व्यक्ती :** —(लिहून) हं. कुणावर ?

**निमा :** (प्रश्न न कळून) अं !

**व्यक्ती :** ...प्रेम कुणावर केलं ?

**निमा :** कुणावर ?

**व्यक्ती :** ...आतां तो ' कुणावर ? ' असा बदलून घेतला आहे.

**निमा :** ( धुमसत ) कुणावरसुद्धां नाहीं.

**व्यक्ती :** ...एकदां प्रेम केल्याचं तुम्ही कबूल केलं आहांत.

**निमा :** मी कबूल केलेलं नाहीं.

**व्यक्ती :** इथं लिहिलं आहे.

**निमा :** ( रागारागानं ) तें तुम्ही लिहिलंत.

**व्यक्ती :** ...पण तुम्हीच ' लिहा ' असं सांगितलंत.

**निमा :** मग—मग—( चडफडत ) खरोखर, तुमचासुद्धां राग येतो मला !

**व्यक्ती :** ...उत्तर देणं न देणं तुमच्या हातीं आहे.

**निमा :** पण उत्तर दिलं नाहीं कीं तुम्ही तसं लिहूं म्हणतां !

**व्यक्ती :** अर्थात्.

**निमा :** हं ! ( असह्य होऊन ) जगांतली सगळीं वर्तमानपत्रं अरबी समुद्रांत बुडवायला हवींत !

**व्यक्ती :** ...आमच्या पोटाचा जरा विचार करा.

**निमा :** ( आवेशानं ) पण हा काय पोट भरण्याचा मार्ग ?

**व्यक्ती :** जसे इतर मार्ग तसा हा मार्ग.

**निमा :** हें पहा, तुमच्या पोटाचा तुम्ही खुशाल विचार करा आणि काय हवं तें करा. ( नव्या निर्धारानं ) मी मुलाखत देणार नाहीं.

**व्यक्ती :** ( अत्यंत निष्पाप सुरांत ) हवं तें करूं ?

**निमा :** ( जोरानं ) हो- ( गडबडून ) नको-हवं-हवं तें म्हणजे -( फेऱ्या मारते. )

**व्यक्ती :** ...मी सुचवूं का उत्तर ?

**मिना :** ( दुसरा इलाज न उरून ) हं.

**व्यक्ती :** प्रश्न असा आहे ' कुणावर प्रेम केलं आहांत. '

**निमा :** बरं. मग ?

**व्यक्ती :** उत्तर असं ' एका पुरुषावर. '

**निमा :** [ जोरानं ] पण [ वरमून ] बरं, चालेल. लिहा एकदां तसं.

**व्यक्ती :** [ लिहून ] कोण तो पुरुष ?

**निमा :** [ संतापून ] तें तुम्हांला काय करायचंय ?

**व्यक्ती :** ...मुलाखतींतला आहे.

**निमा :** ही मुलाखत कीं थट्टा ?

**व्यक्ती :** ( थंडपणें ) अद्याप तरी मुलाखतच.

**निमा :** ( थक्क होऊन ) हें सगळं तुम्ही छापणार ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** आणि काय मिळवणार ?

**व्यक्ती :** सेल्.

**निमा :** कसला सेल !

**व्यक्ती :** वर्तमानपत्राचा.

**निमा** ( स्त्रीसुलभ संतापानं ) जळला तुमचा तो सेल ! त्यासाठीं समाजांतल्या सभ्य स्त्रीपुरुषांची अशी बदनामी करणार तुम्हीं !

**व्यक्ती :** प्रेम करणं ही काय बदनामीकारक गोष्ट आहे !

**निमा :** ( संतापानंच ) मला नाहीं माहित !

**व्यक्ती :** ...पण हा नंबर चारचा प्रश्न . . .

**निमा :** ( किंकर्तव्यमूढपणें ) मूर्खपणाचा आहे.

**व्यक्ती :** ...आतां कसं वाटतं ?

**निमा :** ( तुरट आवाजांत ) फार बरं वाटतं.

**व्यक्ती :** मग करा वर्णन.

**निमा :** मी वर्णन करूं ?

**व्यक्ती :** हो.

**निमा :** (जास्त तुरटपणें) कुठल्या पुरुषाचं ?

**व्यक्ती :** तुम्हीं प्रेम केलंत त्या.

**निमा :** (खोंचून) मी प्रेम केलं नाहीं त्या

**व्यक्ती :** —" प्रेम केलं त्या " असंच लिहायला हवं.

**निमा :** (हिंस्रपणें) लिहा तर मग. त्या पुरुषाला दोन पाय, दोनच हात, एक डोकं आणि दोन लांब लांब कान होते म्हणून—

**व्यक्ती :** असा कोण तो पुरुष ?

**निमा :** (सांठलेली चीड बाहेर टाकीत) तुमचा संपादक !

(किंचित स्तब्धता)

**व्यक्ती** : ...मग त्यापेक्षां मी—

**निमा** : ( ओरडते ) गप्प रहा. [ धुमसत ] मला जास्त चिडवूं नका. (कटु सुरांत) कालचं उट्टं काढताहांत तुम्ही.

**व्यक्ती** : —तें विसरण्याचा प्रयत्न करतों आहे मी.

**निमा** : मग हा असा त्रास द्यायला कां आलांत ?

**व्यक्ती** : —उत्तर सांगतां ना ?

**निमा** : (त्राग्यानें) कसलं उत्तर !

**व्यक्ती** : वर्णन करा.

**निमा** : [कळवळून] कसलं वर्णन करूं ! मी कुठल्याच पुरुषावर कधीं प्रेम केलं नाहीं तर कसलं वर्णन करूं ?

**व्यक्ती** : —हा अर्थात् खाजगी प्रश्न.

**निमा** : म्हणजे तुमचा ?

**व्यक्ती** : —याचं उत्तर छापलं जाणार नाहीं.

**निमा** : ( किंचित विमनस्कपणें ) मीं प्रेम करावं असं कुणी मला भेटलंच नाहीं.

**व्यक्ती** : अद्याप ?

**निमा** : हो अद्याप.–कां ?

**व्यक्ती** : ... [ घुटका गिळीत ] तुम्हांला खूप भेटले असतील. खाजगी प्रश्न.

**निमा** : हो. कितीतरी. चिक्कार. [ थांबून ] उत्तर छापलं जाता कामा नये.

**व्यक्ती** : [ मोठा सुस्कारा ] हंऽऽऽऽ...

**निमा** : [ गांभीर्यातही किंचित् गंमतीनं ] काय झालं हो ?

**व्यक्ती** : ... [ भकासपणें ] मौज वाटली.

**निमा** : तुमच्या चेहेऱ्यावरून तर तसं दिसत नाहीं. [ बारकाईनं ] मौजच वाटली कीं आणखी कांहीं ?

**व्यक्ती** : ... माणसाला स्वतःशीं प्रामाणिक रहावतच नाहीं.

**निमा** : असं !

**व्यक्ती** : हो.

**निमा** : [ पुटपुटते ] असं होतं खरं.

**व्यक्ती** : काय म्हणालात !

**निमा** : मी विचारलं, ' असं ? '

**व्यक्ती** : ... ( धीर देत ) घाबरूं नका.

**निमा** : ( गांभीर्य धारण करीत ) तो अवर्णनीय होता.

**व्यक्ती** : ( चमकून ) अं !

**निमा** : ( नवलाचा सूर ) काय झालं !

**व्यक्ती** : कोण अवर्णनीय होता ?

**निमा** : पुरुष.

**व्यक्ती** : कुठला पुरुष.

**निमा** : ( सहजपणें ) मी ज्याच्यावर प्रेम केलं तो.

**व्यक्ती** : म्हणजे—तुम्ही— तुम्ही—

**निमा** : ( सहजपणेंच ) हो.

**व्यक्ती** : ( तांतडीनं ) छट्–

**निमा** : छट् म्हणजे ?

**व्यक्ती** : ...तुम्हीं कुणावरच प्रेम केलं नाहींत—

**निमा** : तें तुम्हांला माहित कीं मला ?

**व्यक्ती** : पण आतां तुम्हींच म्हणालात तसं !

**निमा** . खोटं आहे तें.

**व्यक्ती** : ( यांत्रिकपणें ) खोटं आहे ?

**निमा** : हो. खरं म्हणजे एका पुरुषावर प्रेम होतं माझं. अद्याप आहे. पुढंही राहिल ?

( स्तब्धता. )

**व्यक्ती** : ( दुबळ्या सुरांत ) अद्याप आहे ?

**निमा** : हो.

**व्यक्ती** : आणि पुढंही राहील ?

**निमा** : हो. [ जोरानं ] लिहून घ्या ना. बघता काय माझ्या चेहऱ्याकडे ?

**व्यक्ती** : अं ? हो, हो...

**निमा** : पुन्हां तुम्ही माझ्या चेहऱ्याकडेच पहात आहांत !

**व्यक्ती** : ...[ गुरगुरत ] कोण तो हरामखोर ?

**निमा** : [ आश्चर्य दर्शवीत ] अं ? काय म्हणालात !

**व्यक्ती** : ...पण त्या भाग्यवान पाजी माणसाचं नांव सांगा मला.

**निमा** : कां !

**व्यक्ती** : ...मला त्याला—

**निमा** : काय करायचंय त्याच्याशीं तुम्हांला ?

**व्यक्ती** : मारामारी.

**निमा** : मारामारी ?

**व्यक्ती** : ...त्याला जिंकूं देणं शुद्ध नामर्दपणाचं ठरेल !

**निमा** : इतकं प्रेम आहे तुमचं माझ्यावर ?

**व्यक्ती** : ...माझं—मी—मी—( अडतो. )

**निमा** : ( मोठ्यांदा हंसते. नंतर ) सांगू त्या पुरुषाचं नांव ?

**व्यक्ती** : हो.

**निमा** : तुम्हीच !

( स्तब्धता )

**व्यक्ती** : ( उसळून ) मी ?

**निमा** : तुम्हीच.

**व्यक्ती** : खोटं—

**निमा** : खरंच !

**व्यक्ती** : भलतंच—

**निमा** : अगदीं खरं !

( स्तब्धता )

**निमा** : काय झालं हो ? गप्प कां बसला तुम्ही ?

**व्यक्ती** : ...आवाज उमटेनासा झालाय्—

**निमा** : ( चेष्टेचा स्पष्ट सूर ) अरेरे !

**व्यक्ती** : खरंच !

**निमा** : राहूं दे. पण, या मुलाखतीचं पुढें काय करायचं आतां ?

**व्यक्ती** : ...जाऊं दे नोकरी ! आतां ती गेली तरी बेहत्तर !

**निमा** : ( नाजुक सुरांत ) आणि मग आपण संसार कसा करणार ?

**व्यक्ती** : मग आतां ?

**निमा** : मुलाखत चालूं. घ्या लिहून. माझ्या प्रियकराचं वर्णन. ' उंच बांधा, श्यामल वर्ण, तरतरीत नाक, रुंद कपाळ, हळवे डोळे—

**व्यक्ती** : ( हलक्याच सुरांत ) निमा—

**निमा** : ( कर्तव्यकठोर आवाज ) अंहं—मुलाखत !

**व्यक्ती** : ........[ पुन्हां हळव्या सुरांत ] निमा—

**निमा** : [ तोच हळवा सूर ] काय प्रतिनिधि ' उलथापालथ ' दैनिक.

●●

पान ५६ वरून

बोटं खुपसली. चांदीची कांही किरकोळ नाणीं घेऊन त्या बाजारांत स्त्रीची अस्मिता, तिच्या भावना, तिचं पावित्र्य विकलं जात होतं. कवडीमोलानं विकलं जात होतं, पेटलेल्या वासनांच्या हातांत तिचा देह दिला जात होता.

मायाला ते बघणं अगदीं अशक्यच झालं व ती मनूचा हात धरून पुढें चालायला लागली. जोरानं, वेगानं पुढं चालायला लागली.

चालून चालून तीं दोघं पार थकून गेली होती. माया मनूला म्हणाली–'मनूदेवा, पावला-पावलावर तुम्हांला तुमच्या मुलांचे, दिवट्यांचे पराक्रम दिसले. काय वाटतं आहे तुम्हांला तुमच्या या पुत्रांबद्दल–?'

त्यावर मनू उत्तरला–'माया, वेडी आहेस तूं! अग, टाळी का कधीं एका हातानं वाजते? एकाहून एक वरचढ असलेलीं अनेक दृश्यें आत्तापर्यंत आपण पाहिलीं. या सर्व प्रकरणांत पुरुष जितक्या प्रमाणांत गुन्हेगार ठरतो, तितक्याच प्रमाणांत स्त्रीसुद्धां गुन्हेगार आहे. तुझ्या डोक्यांत ही गोष्ट कशी काय शिरत नाहीं. कुणास ठाऊक!'

पण माया मनूचा तो मुद्दा गळीं उतरवायला तयारच नव्हती! ती म्हणाली—'मनूराया, मी नव्हते तेव्हां तुमचं अडलंच होतं कीं नाहीं? माझ्याशिवाय तुम्हांला सारं जग शून्यवत् वाटत होतं. म्हणून मी तुमच्या एका बरगडींतून जन्म घेतला. मी सदैव तुमच्याच कुशींत रहावी म्हणून तुम्हीं काय काय दिव्यें आचरलींत? केवढा मोठा पराक्रम गाजविलांत. मी सर्वांची आवडती होते, सर्वांची लाडकी होतें, सर्वांना मी हवीहवीशी वाटत होतें. माझा मोह एवढा दांडगा होता कीं, सर्व पुरुष माझी प्राप्ति व्हावी म्हणून धडपडत होते.

मनूराया! आपली अस्वस्थता, आपली बेचैनी घालविण्यासाठीं तुम्हीं विधात्याची प्रार्थना केलीत, मनधरणीहि केलीत अन् मातृ—स्त्री-जातीला–या जगांत निर्माण केलींत. तुम्हीं माझ्यावर प्रेम केलंत. तुम्हीं कवि बनलांत; माझ्यावर नवी नवी गाणीं रचलींत. तुम्हीं चित्रकार बनलांत अन् आपल्या कुंचल्यातून माझ्या असंख्य प्रतिमा रेखाटल्यानं एखादं जीवाभावाचं स्वप्न जसं उराशी जपावं, डोळ्यांत साठवून ठेवावं, त्याप्रमाणें तुम्हीं मला आपल्या नयनांत बंदिस्त करून ठेवलंत. स्वतःच्या अंतःकरणाची धडधड बनवून तुम्हीं मला तुमच्या हृदयांत उच्चासनावर बसविलंत... अन् आज–अन् आज तुम्हीं मला नग्न करून उघड्या बाजारांत विकत आहांत. बोला, स्त्री–जातीवर होणारा हा तुमचा जुलुम नाहीं? हा विध्वंस, हा अधमपणा पुरुषांच्याच हातून घडला ना? पुरुषच ना स्त्रीला आज असा रौरवांत लोटून देत आहे?' माया तळमळून बोलत होती. तिचा घसा कोरडा पडला. तिला धांप लागली.

–अन् मनू विरघळला. त्याच्यांतला मानव कळवळला. त्यानं मायाला जवळ ओढलं. आपल्या छातीशीं धरलं. अगदीं घट्ट घट्ट आवळून धरलं. तिच्या कपाळावर नाचणाऱ्या बटा मागें सारीत तो तिला समेटाच्या भाषेंत बोलूं लागला. आपलं हृदय तिच्यासमोर उघडं करीत तो म्हणाला–'माया! प्रियतम माये... माझ्या लाडक्या माये! तुला कसं सांगूं? कसं समजाऊं तुला? पुरुषानंच स्त्रीला बरबाद केलं असं तूं म्हणतेस! अग, तसंच कांहीं नाहीं. चूक दोन्हीं बाजूंची आहे. पुरुष अन् स्त्री–दोघंहि दोषी आहेत. तीं दोघंहि मिळून गुन्हा करतात. दोघंहि एकमेकांना छळतात अन् तितकंच उत्कट प्रेमहि एकमेकांवर करतात. स्त्री किंवा पुरुषाची एकांतिक बाजू घेऊन मनांत गैरसमज ठेवायची आपणाला कांहींच गरज नाहीं. मानव मूळांत सत्प्रवृत्तच आहे. फक्त परिस्थितीच्या थपडेनं कधीं कधीं तो मागें–पुढें झेलपटतो, इतकंच! चल, आपण आतां सत्प्रवृत्त माणसाचा शोध करूं. खुळे! आतां डोळ्यांत अश्रूं का? पूस, पूस ते डोळे.'

मग तीं दोघं पुनः पुढें निघालीं.

एक तरुण मुलगी वाटेंत भीक मागत हिंडत होती. लोकांची टोळकीच्या टोळकीं येत होतीं अन् तिच्या जवळून निघून जात होतीं. कुणी तिची कळ काढली, तिला छेडलं कीं, ती त्याच्यापासून दूर होई; बावरलेल्या हरिणीप्रमाणें कावरीबावरी बनून पळे. दूर जाई.

ती भुकेनं व्याकुळ झाली होती. तिच्या पोटांत भुकेचा आगडोंब उसळला होता.

भुकेचा हा वणवा, तिनं मनांत आणलं असतं तर अगदीं सहजगत्या शमवून टाकला असतां. आपल्या शरीराला गहाण ठेवायला ती तयार झाली असती तर तिला आपल्या शरीराचं

---

## नेमबाजी

बंडोपंत खंडोपंतांकडे तावातावानें आले आणि म्हणाले–"खंडोपंत, तुमच्या बाळ्याला कांहींतरी सांगा. आमच्या अंतूला त्यानें दगड मारला."

"काय म्हणतां? आमच्या बंड्यानं मारला? परंतु लागला का तो बाळ्याला?" खंडोपंतांनीं विचारलें.

तेव्हां बंडोपंत म्हणाले –"थोडक्यांत चुकला. नाहींतर लागणारच होता."

"मग आमच्या बाळ्यानें नक्की दगड मारला नाहीं." खंडोपंत म्हणाले, "कारण आमच्या बाळ्याचा नेम कधींच चुकत नाहीं."

---

कॅमेरे, व फोटोग्राफिचे साहित्य.
फ्लॅश फोटो, औट डोअर ग्रुप्स
व कौटुंबिक फोटोकरीतां भेटा–
**दत्त आणि कंपनी**
रानडे रोड, दादर, मुंबई २८

पालनपोषण हवं तसं करतां आलं असतं. पण तिलाच त्या मार्गानं जायचं नव्हतं.

थोड्या वेळानें तिथून एक तरुण जाऊं लागला. त्याची दृष्टि तिच्यावर गेली अन् दृष्टि-बरोबरच तोहि जागच्या जागीं खिळला.

तो तरुणहि गरीबच होता. तोहि तसाच तिच्यासारखा भिकारी होता.

"कुठं रहातेस तूं ?" त्यानं तिला विचारलं.

"मी ? मी तर रस्त्यावरच रहाते. अशीच कुठं कुठं भटकत असते. कुणी नाहीं माझं अन् घरहि नाहीं मला ! ..."

"मीहि असाच तुझ्यासारखा एकटा आहे. चल, येतेस तूं माझ्याबरोबर ? आपण दोघं एकमेकांच्या आसऱ्यानं, एकमेकांना दिलासा देत यापुढच्चं जीवन जगूं या..."

—मनूनं अन् मायेनं ती जोडगोळी पाहिली.

मनू मायेला म्हणाला— "बघ माया ! अशी माणसंसुद्धां आहेत या जगांत ! या तरुणानं जर मनांत आणलंच असतं तर त्यालाहि त्या भिकारणीवर हल्ला करतां आला असता, तिची विटंबना करतां आली असती ! पण त्याला तें नको होतं ! कारण त्याच्याजवळ दया होती, प्रेम होतं, सचोटीहि होती. तो माणूस 'माणूस'च होता. सत्प्रवृत्त माणूस ! केवढं विशाल त्याचं हृदय..."

—आणि मनू हलकेच मायेपाशीं सरकला. तीहि त्याला अधिकच बिलगली. आतां जणूं काय त्या दोघांत समेट झाला होता. तह घडला होता व वाद मिटला होता !

## 'अत्तर'

पापणिला त्या केस नाहींत
त्यातर बारिक सुया आहेत
बघतां बघतां होणाऱ्या या
जखमा मला माहित आहेत
माझा गळफास वेणीत आहे
मानेवरती फूल खोवून
जातां जातां प्राण जाईल
त्यांतील मस्त अत्तर पिवून ।

—कवि संजीव.

मनूच्या स्नेहल डोळ्यांत आपले मद्यानं कांठो-कांठ भरलेले निळे डोळे बुडवित माया म्हणाली— 'मनू ! सख्या, आजवर मी तुम्हांला ओळखलंच नव्हतं राजा ! खरंच, तुम्हीं किती गोड आहांत !'

'मलाहि तुझा स्नेह आजवर कधीं कळला नव्हता माया ! आतां मला तुझ्या मायाळू अंतःकरणाचं, तुझ्या मंगल अंतरंगाचें दर्शन घडलं. माया, लाडके, तूं मला प्यार आहेस. अन् माझा प्राणहि तूंच आहेस गं ... !'

आतां त्या दोघांनाहि कळून चुकलं कीं, स्त्री श्रेष्ठ कीं पुरुष या वादांत हार–जित व्हायचा कांहीं प्रश्नच नव्हता. कारण भांडणाचं मूळच मुळीं आतां उखडलं गेलं होतं.

मनूनं खालच्या मुलायम हिरवळीवर आपलं अंग झोकून दिलं. धरतीच्या शय्येवर त्यानं आपली पाठ टेकली. दोन्हीं हातांची बोटं एक-मेकांत गुंतवून त्यानं हाताची झक्कपैकीं उशी केली. व तो पडल्या पडल्या आकाशांत ट्रक लावून पाहूं लागला.

माया त्याच्या शेजारीच उभी होती. भिर-भिरत्या नजरेनं आसमंत न्याहाळीत होती. इतक्यांत एक शुभ्र पारवा पंख फडफडवीत आला अन् तिच्या खांद्याची डहाळी करून बसला. मायानं गपकन त्याला पकडलं. त्याचा इवलासा, गोंडस, नाजुक देह ती गोंजारूं लागली. मग तिनं तो आपल्या दोन्हीं हातांत धरला व त्याच्या अंगावरून आपला गाल फिरवूं लागली. त्याच्या स्पर्शानें एक अबोध, अनोखी अनुभूति तिच्या सर्वांगातून सळसळली. मग मोठ्या लडिवाळपणें त्या पारव्याला तिनं आपल्या दोन्हीं हातांनीं उंच भिरकावलें. तिच्या हातून सुटका होतांच त्या शांतिदूतानं धडपडत एकच उसळी घेतली अन् तो आपल्या पंखांची वल्हीं मारून हवा कापीत कापीत उंच आकाशाचा वेध घेत निघून गेला.

त्या पारव्याची आकाशभरारी पाहून माया खळखळून हंसली. अकारणच हंसली. तिच्या मनांत मस्ती भरली होती. आपल्या शराबी डोळ्यांचा मोर्चा पुनः तिनं मनूकडे वळविला. तोहि तिचे ते सारे नखरे मघांपासून न्याहाळितच होता.

माया मनूजवळ गेली. त्याच्या शेजारीं बसली. व आलेला आळस तिनं आपलें दोन्हीं हात वर तणावून झटकला. अन् ती मनूला लगटूनच त्याच्या शेजारीं जमिनीवर पहुडली.

भारावलेल्या मनःस्थितींत असतांनाच हळूं-हळूं ती त्याच्या कुशींत शिरली. मनूनं हलकेच तिच्या पाठीवरून हात फिरविला. तिचं हृदय चांचपलं. तिच्या तोंडावर भुरुभुरु उडणारे केंस त्यानं आपल्या वत्सल हातानं मागे सारले. तिच्या सोनेरी केंसांतून त्याची बोटं फिरूं लागलीं. तिचा श्वास त्याच्या श्वासांत मिसळला. त्याच्या डोळ्यांवर गुंगी चढूं लागली. ती त्याला एका वेगळ्याच धुंद जगांत घेऊन जाऊं लागली.

—अन् स्त्री-पुरुषांतील श्रेष्ठकनिष्ठपणाच्या वादाचा समेट घडवून आणावा, म्हणून त्यानं तिला आवेगानं आपल्या छातीशी कवटाळलं तो तिच्याशीं एकरूप झाला !!...

(* कल्पना परकीय)

Fresh, Tasty and Delicious Dishes
Together With Courtesy and
Cleanliness Makes

UDIPI LUNCH
HOME
Vincent Road, Dadar

EVERYONE'S FAVOURITE
EATING PLACE

Under the Management of—

R. N. NAYAK

पण इंदूताईना मध्येंच थांबवीत शुभा लाघवी स्वरांत म्हणाली, " हें हो काय मावशी, मला असं परक्यासारखं शुभाताई काय म्हणतां ? "

" अगदीं बरोबर ! " प्रसाद बोलला, " मलाहि अरे प्रसाद म्हणा हं, मावशी. नाहीं तर प्रसादकुमार म्हणाल. " आणि तो निर्मलेकडे पहात मिस्किलपणें हंसला.

ही हंसण्याची, बोलण्याची पद्धतहि थेट श्रीकांताची !

" तर, तर ! " रुसक्या स्वरांत निमी बोलली, " आपल्यापेक्षां वयानं थोर असलेल्या माणसाला अहो, जाहोच म्हणायचं असतं ! "

" मग मीं म्हणते तसं दादा कां ग म्हणत नाहींस माझ्या ह्या वडील भावाला ? " शुभेनें चेष्टा केली.

" चल ! चावट कुठली ! " तिरक्या नजरेनें प्रसादकडे बघत निमा पुटपुटली.

प्रसादची मिस्किल, हंसरी चर्या व निमीची हंसरी, लाजरी चर्या डोळे भरून पहात होत्या इंदूताई. असं आहे तर एकूण !

# प्रीतीची संध्याकाळ

—: लेखिका :—

सौ. कुमुदिनी रांगणेकर



**आगगाडी पुण्याच्या जवळ येऊं लागली तसतशी इंदुताईंच्या हृदयाची उलाघाल होऊं लागली.**

**पुऱ्या दोन तपांनीं—चोवीस वर्षांनीं —इंदुताई आज फिरून पुण्याला येत** होत्या. परत पुण्यांत कधीं पाय ठेवायचा नाहीं. अशी मनोमन प्रतिज्ञा करून त्या चोवीस वर्षांपूर्वी कोल्हापूराला निघून गेल्या होत्या.

सत्रा वर्षांची अल्लड, तरुण, स्वप्नाळू इंदू होती तेव्हां! ती आणि तिची विधवा आई ज्या वाड्यांत रहात असत त्याच्या मालकाच्या थोरल्या मुलानें—श्रीकांत केळकरानें—तिला एक दिवस लग्नाची मागणी घातली! —अहा! तो प्रणयरम्य दिवस इंदूताईंना अजून नीट स्मरत होता. पण —पण काय? —श्रीमंत मालकसाहेब आपल्या निर्धन भाडेकरूची मुलगी बरी सून करून घेतील! बिचारी इंदू आणि हो, बिचारा श्रीकांत! इंदूप्रमाणें तोहि त्यावेळीं विलक्षण व्याकुळ झाला होता. परंतु काय उपयोग त्याचा? विशी, एकविशींतला तरुण विद्यार्थी तो! स्वतःच्या पायांवर तो उभा कुठें होता! मग तो वडिलांची अवज्ञा कशी करणार?

इंदू-श्रीकांताच्या प्रीतीची कळी न उमलतांच कोमेजली! आपल्या आईचें मन वळवून इंदू कोल्हापूरला आजोळीं निघून गेली. मामांच्या उत्तेजनानें ती बी. ए. बी. टी. झाली व तिनें शिक्षकिणीचा पेशा पत्करला. आपल्या आईला तिनें शक्य तेवढें सुखांत ठेवलें होतें. तिनें स्वतः पुणें सोडतांनाच सुखाकडे पाठ फिरवली होती. त्यांतच आठ वर्षांखालीं तिची आई वारली. इंदू एकटी पडली! नाहीं म्हणायला तिची एक मामेबहीण मुद्दाम सवड काढून सासरहून इदूकडे माहेरपणाला येई.

आणि सहा वर्षांपूर्वी ही मामेबहीण आणि तिचा नवरा विमानाच्या अपघातांत मरण पावलीं. त्यावेळीं सहजच तिनें आपल्या एकुलत्या एक मुलीला—दहा वर्षांच्या निर्मलेला—सुट्टींत इंदूताईकडे धाडली होती. अन् तेव्हांपासून निर्मलेच्या काकांच्या संमतीनें इंदूताईंनीं निर्मलेचा पत्कर मोठ्या आवडीनें घेतला होता.

ओसाड वाळवंटांत तेवढीच ओली हिरवळ! —आणि आज त्याच हिरवळीचा लाडका हट्ट पुरविण्यासाठीं इंदूताई पुण्याला येत होत्या.

त्याचं असं झालं, निमूच्या वडिलांची फिरतीची नौकरी असल्यामुळें तिला पुण्यांत हुजूरपागेच्या बोर्डिंगांत ठेवलें होतें. तिला आपल्याजवळ ठेवण्याची इंदूताईंची इच्छा होती. पण निमूला बोर्डिंगांतील जीवनाची संवय झाली होती. आणि ती आपल्याकडे राहिल्यानें अति लाडापायीं बिघडेल असें भय वाटलें बापड्या इंदूताईंना! मिळून निमी बोर्डिंगांतच राहून शिकूं लागली.

दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टींत ती कोल्हापूराला येई.

यंदा मात्र तिनें ह्या बेताला खो घातला. यंदा ती मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार होती—बसली होती. कालच तिचा शेवटला पेपर संपला. खरं म्हणजे आज तीच कोल्हापूरला यायची. पण गेल्या आठवड्यांत तिनें इंदुताईंना पत्र घातलें आणि त्यांनाच आठ दिवसांसाठीं पुण्याला बोलावलें.

'मावशी ग,—' तिनें पत्रांत लिहिलें होतें. 'माझी आवडती मैत्रीण शुभा, हिनें फार आग्रहानें मला आपल्या घरीं रहायला बोलावलें आहे आठवडाभर. आणि मावशी, तिनें तुलाहि बोलावलें आहे इथें.

मावशी, येशील ना तूं? येच हं. शप्पथ आहे तुला माझी! आपण इथं खूप, खूप मौज करूं. तूं कित्ती वर्षांत पुण्याला आलींच नाहींस ना? आतां किनई, पुणें खूप सुधारलें आहे म्हणे! तुला गंमत वाटेल! म्हणून म्हणते, मावशी, तूं येच ग-मीं तुझी वाट पहाते आहे. तुझें होकारार्थी पत्र आलें कीं मीं दुप्पट हुरूपानें अभ्यास करूं लागेन.'

लाडक्या भाचीचें लाडकें पत्र! मग इंदुताईंना त्यांतला लाडिक आग्रह कसा मोडवेल?—

पण पुण्याला यायचें म्हणतांच लाडक्या निमूबरोबर त्यांच्या डोळ्यांना श्रीकांताची अंधुक प्रतिमाहि दिसूं लागली.

आतांसुद्धां त्यांच्या डोळ्यांत भूतकाळांतल्या घटना धुमाकूळ घालीत होत्या. पण आगगाडी पुण्याच्या स्टेशनावर उभी रहातांच व निमीचा हंसरा चेहरा नजरेला पडतांच इंदूताई पटकन् वर्तमानकाळांत स्थिरावल्या.

'निमू, बरी आहेस ना?' फलाटावर उतरून तिच्या जवळ जात त्या म्हणाल्या, 'अभ्यासाच्या ओढीनें बारीक झालीस हं पोरी! पेपर्स कसे गेलेत!'

'छान गेलेत!' त्यांचा हात घट्ट धरीत निर्मला चिवचिवली, 'अन् मावशीं, ही माझी मैत्रीण शुभा केळकर.'

'नमस्ते!' शुभा हंसून बोलली. 'अन् मावशी, निमूचें अनुकरण करीत तिनें गंमतीनें म्हटलें, हा माझा दादा—प्रसाद केळकर.'

'नमस्ते!' प्रसाद हंसून उद्गारला.

पण इंदुताईंना. त्या भावंडांचें अभिवादन स्वीकारण्याचें भानच नव्हतें. शुभानें आपल्या दादाला पुढें बोलावतांच त्या स्तिमित होऊन त्याच्याकडे बघतच राहिल्या.

हा प्रसाद केळकर! —हंऽ! —चोवीस वर्षांपूर्वींच्या श्रीकांत केळकरांची प्रतिमाच हुबेहूब! तसाच उंच, सुदृढ बांधा- तसेंच तरतरीत नाकडोळे-हंसरा मुखाविर्भाव—हा-हा—श्रीकांताचा मुलगा तर नव्हे? —

मोठ्या प्रयत्नानें इंदुताईंनीं आपलें भरकटणारे विचार आंवरले. हंसल्यासारखें करीत त्या बोलल्या, 'केळकर? —अं—म्हणजे शनिवारांत रहाता काय तुम्हीं?'

'उंहुं!' शुभा उत्तरली, 'डेक्कन जिमखान्यावर बाबांनीं बंगला बांधलाय् तिथं. पण शनिवारांत आमचा जुना वाडा आहे खरा. अं—तुम्हांला कसा हो तो ठाऊक आहे, मावशी?'

'त्याच वाड्यांत आम्हीं भाडेकरू होतों.' इंदूताईंनीं सांगितलें.

'खरं? मग तुम्हीं आमच्या बाबांना ओळखत असाल तर?' प्रसादनें प्रश्न केला.

'पूर्वी होती थोडी ओळख,' निष्काळजीपणाचा आंव आणीत इंदूताई म्हणाल्या.

'वा:!' निमी म्हणाली, 'हें छानच झालं! म्हणजे तुलाहि परकं नाहीं वाटयचं त्या घरांत—'

साधे, सरळ शब्द! पण ते इंदूताईंच्या काळजाला बोंचत गेले. परकं! —हं ऽ! —दैवाचे फांसे मनपसंत पडले असते तर त्या घराची मालकीण झाल्या असत्या त्या!—शी:!—असला खुळा विचार कशाला हवाय आतां! श्रीकांत परपुरुष आहे. ह्या गोड भावंडांचा पिता आहे. आ—आपल्या पत्नीचा पति आहे! कशी असेल श्रीकांताची पत्नी! ह्या शुभेसारखी नाजुक, गोरीपान! छे:! पुनः तसलेच खुळे विचार!

'अं—निमू, इथंच किती वेळ घुटमळायचं ग! ह्या शुभाताईची आ—'

पान ७३ वर

# हांक

## शांता ज. शेळके

दोन स्त्रीपुरुषांना परस्परांविषयीं कसें आकर्षण वाटूं लागतें, त्यांच्याठायीं प्रीतीचा उद्‌भव कसा होतो या संबंधींच्या अनेक मीमांसा वेगवेगळ्या श्रेष्ठ कलावंतांनीं केलेल्या मी वाचल्या आहेत ' व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः ! म्हणणाऱ्या भवभूतीपासून तों माझें प्रेम मला पुढें उमगलें आधीं तुला वाहिलें ' म्हणणाऱ्या माधव ज्यूलियनांपर्यंत अनेक कवींनीं या दिव्य पण दाहक अनुभूतीचें मोठें रम्य चित्रण केलें आहे. पण कुठल्या तरी एका इंग्रजी कथेत प्रेमिकांना परस्परांविषयीं वाटणाऱ्या आकर्षणाचा जो अन्वय लेखकानें लावला होता तितकी या भावनेची हृदयंगम मीमांसा अन्य कुठेंहि वाचल्याचें मला आठवत नाहीं. त्या लेखकानें असें लिहिलें होतें, ' 'सारीं मानवीं हृदयें हीं स्वर्गामध्यें एकत्र ठेवलेलीं होतीं.'पुढें परमेश्वरानें प्रत्येक हृदय हातांत घेऊन त्याचे दोन सारखें तुकडे केले आणि मग तीं सारीं अर्धुकें त्यानें पृथ्वीवर सर्वत्र स्वैर फेंकून दिलीं. पृथ्वीवरच्या असंख्य मानवांच्या देहांत तीं अर्धुकं शिरलीं. पण प्रत्येकाच्या वांट्याला अर्धें अर्धेंच हृदय आलें. तेव्हांपासून प्रत्येक अर्धें हृदय हें आपला दुसरा अर्धा भाग शोधीत आहे. जेव्हां एकाच हृदयाचीं दोन अर्धुकें परस्परांच्या संन्निध येतात. तेव्हां तीं अर्धुकें देहांत वाळगणाऱ्या दोन व्यक्तींना एकमेकांविषयीं गूढ अनाकलनीय आकर्षण वाटूं लागतें. कांहीं भाग्यवान् अर्धुकांचें मीलनहि होतें. कांहीं मात्र जन्मभर आपला दुसरा भाग शोधित राहतात आणि अखेरपर्यंत तो भाग न सांपडल्यामुळें तडफडत शेवटीं दुःखानें विकळ होऊन तीं नाश पावतात. कधींकधीं दोन अर्धुकें आपण एकाच हृदयाचे दोन भाग आहोंत असें समजून एकत्र येतात. पण तीं असतात वेगवेगळ्या हृदयापासून निघालेलीं. त्यामुळें या दोन अर्धुकांचें एकमेकांशीं नातें जुळत नाहीं. कांहीं काळ तें जुळल्यासारखें वाटलें तरी कालान्तरानें दोन्हीं अर्धुकांना आपली चूक कळून येते. आणि मग तीं खिन्नपणें एकमेकांपासून दूर होतात. पुन्हां आपापल्या अर्ध्या भागांचा शोध करूं लागतात.

दोन व्यक्तींना एकमेकांबद्दल आकर्षण कां वाटतें याची ही मीमांसा जेवढी हृद्य तेवढीच मार्मिकहि आहे यांत शंका नाहीं. मला तर वाटतें, केवळ प्रेमाच्याच बाबतींत नव्हे तर दोन माणसांमध्यें सामान्यतः वसणाऱ्या ओढीबाबत सुद्धां अशीच कांहीं मीमांसा बसवितां आली तर बरें होईल. एरव्हीं, अमूक एक माणूस प्रथमदर्शनींच आपल्याला कां आवडूं लागतें आणि दुसरें एकादें माणूस पहिल्या भेटींतच आपल्याला नकोसें कां होतें. यांचें तरी कारण आपल्याय कुठें ठाऊक असतें !

प्रमाची ओढ किंवा माणसांतील सर्वसामान्य स्नेहभावाची ओढ ही गोष्ट अशी आहे कीं तिची कारणमीमांसा जरी आपल्याला करतां आली नाहीं तरी तिचा अर्थ आपण समजून घेऊं शकतों. पण जेव्हां हाडामांसाच्या जिवंत व्यक्तीऐवजीं एकाद्या अमूर्त ध्येयाची, स्वप्नाची, कल्पनेची ओढ माणसाच्या जीवाला लागते त्यावेळीं त्या ओढीचा अर्थ मात्र भोंवतालच्या माणसांना समजूं शकत नाहीं. भोंवतालच्या लोकांचीच गोष्ट कशाला, कित्येकदां अशा ओढीनें भारल्या जाणाऱ्या माणसाला खुद्द स्वतःलादेखील तिची कारणमीमांसा करतां येत नाहीं. पण मला वाटतें, परमेश्वरानें माणसाच्या हृदयाचे जसे दोन तुकडे केलेले आहेत तस त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे देखील त्यानें दोन तुकडे केलेले आहेत. यांतला एक तुकडा आपल्याला मिळालेला असतो. हा तुकडा धूर्त व्यवहारी, सर्वसामान्य लोकरीतींच्या चौकटींत चपखलपणें बसणारा, पोटासाठीं हुषारीनें कामधंदा करणारा आणि चार लोकांप्रमाणें संसार करून पत्नीचें नि मुलाबाळांचें संगोपन करणारा असा असतो.पण आपल्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा तुकडा मात्र या पहिल्या तुकड्यापेक्षां सर्वस्वी भिन्न असतो. तो रूढ रीतीरिवाजांविरुद्ध आणि समाजरचनेविरुद्ध बंड करणारा, स्वप्नें पाहणारा, अमूर्त ध्येयकल्पनांनीं वेडावून जाणारा, उदात्ततेनें अन्तराळांत भराऱ्या मारणारा, काव्यानें व निसर्ग सौंदर्यानें विकल होणारा असा असतो. आपल्या हृदयाचें दुसरें अर्धुक दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्तीच्या देहांत असतें. पण आपल्या व्यक्तिमत्त्वाचा हा दुसरा अर्धा तुकडा मात्र वायुरूप भुताप्रमाणें आपल्या अवतींभंवतींच वावरत असतो. अधून मधून तो आपल्याला खुणावीत असतो. हांका मारीत असतो. जगांतलीं शेंकडा नव्वद किंबहुना नव्याण्णव माणसें व्यक्तिमत्त्वाच्या अर्ध्या तुकड्यावरच सन्तुष्ट असतात. त्या दुसऱ्या अव्यवहारी स्वप्नाळू, ध्येयवादी तुकड्याचें अस्तित्व त्यांना कधीं उमगतहि नाहीं. क्वचित् त्याची जाणीव त्यांना होते. फार संवेदनाशील असतील त्यांना त्याची खूण कळते. हांक ऐकूं येते. पण या हांकेस 'ओ' देण्याचें सामर्थ्य मात्र हजारांमध्यें एकाद्याजवळच असतें. बहुतेक माणसें व्यक्तिमत्वाच्या या दुसऱ्या तुकड्याची जाणीव होतांच त्याला पकडतात, हृदयाच्या तळाशीं, व्यावहारिक धूर्तपणाच्या थडग्याखालीं त्याला खोल खोल पुरून टाकतात. त्याचा आवाज कायमचा बंद करतात.आणि त्याच्या दफनभूमीवर आपल्या कर्तृत्वाचा भरभक्कम मनोरा उभारतात. त्या मनोऱ्यावर यशाचा तेजस्वी कळस चढवितात. वैभवाच्या आणि विलासाच्या नयनमनोहर रंगांनीं तो मनोरा रंगवितात आणि शेवटीं स्वतःचें कल्याण करून घेतात. पण या हजार शहाण्यांमध्यें एकादा वेडा निघतो कीं त्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या तुकड्याची


सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.,
गिरगांव, मुंबई-४.
स्थापना: १९१८ ] [ टेलि. २७०१४

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०.०० लाख |
| वसूल भांडवल | रु. | ८.६१ लाख |
| रिझर्व्ह | रु. | ९.७४ लाख |
| ठेवी | रु. | २३९.३३ लाख |
| खेळते भांडवल | रु. | २६६.११ लाख |
| तरते भांडवल | रु. | १८१.२२ लाख |



-: शाखा :-
फोर्ट, दादर, माहीम, वरळी,
वडाळा, पुणें, बेळगांव.
-: महिला शाखा :-
सारस्वत बँक गृह, गिरगांव,
मुंबई-४.
राष्ट्रोन्नतिसाठीं बचत करा
ALCO

हांक अत्यंत स्पष्टपणें ऐकूं येते. जगाच्या कोलाहलांतून व्यावहारिक कीर्तीच्या व प्रतिष्ठेच्या दुंदुभिरवांतूनहि ती हांक नेमकी त्याच्या कानांत शिरते. हळूंहळूं त्या हांकेचें आक्रंदनांत रूपांतर होतें. त्या आक्रंदनाचा सूर इतका वाढतो कीं त्यांत बाकीचे सारे आवाज बुडून जातात. आणि माणूस बेभान होऊन उठतो. संसारांतून उठतो. समाजांतून उठतो. मायेच्या माणसांतून उठतो. व त्या हांकेच्या पाठोपाठ भारल्यासारखा जाऊं लागतो. ' अॅरेबियन नाइटस ' मध्यें सिंदबादच्या सफरींत एका मृत्युपर्वताचें वर्णन आलें आहे. ज्या माणसाचें मरण ओढवलें असेल त्याला या मृत्युपर्वतांतून एक हांक येई. आणि मग आप्तेष्टांशीं बोलत-हंसत-खिदळत असलेला माणूस एकदम उठून त्या हांकेच्या अनुषंगानें मृत्युपर्वताकडे चालूं लागे. मोवतालच्या माणसांची विनवणी, त्यांचें आक्रंदन, त्यांच्या आर्त शंका कांहींहि त्याला दिसत नसे कीं ऐकूं येत नसे. त्याला ऐकूं येई फक्त ती मृत्युपर्वताची हांक आणि त्याला दिसे फक्त त्या पर्वतांतील गुहेचें कराल मुख ! मी हें वर्णन लहानपणीं वाचलें तेव्हां मला फार भय वाटलें होतें. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या तुकड्याच्या हांकेस ' ओ ' देऊन मुकाट्यानें संसारांतून उठून जाणारीं माणसें जेव्हां मी पाहतें तेव्हांहि असेंच एका अनामिक भयानें माझें मन व्यापून जातें.

आपणांसारखीं सर्वसामान्य माणसें व्यक्तिमत्त्वाच्या एका तुकड्यावरच संतुष्ट असतात. नव्हे त्याच तुकड्याची सतत जपणूक करीत राहतात. व्यक्तिमत्त्वाच्या त्या दुसऱ्या उनाड, अव्यवहारी आणि अनावर तुकड्याचें आपल्याला भय वाटतें आणि त्याच्या हांकेकडे आपण सतत दुर्लक्ष करतों. हें दुर्लक्ष करण्याची आपल्याला इतकी संवय झालेली असतें कीं त्याचें अस्तित्वहि जणूं आपण नाकारीत असतो. आणि म्हणूनच एखादा वेडा जेव्हां या हांकेपाठोपाठ जातो तेव्हां त्याच्या त्या कृतीचा आपल्याला अर्थच समजत नाहीं. पण जीवनाच्या भिन्नभिन्न क्षेत्रांत असले वेडे अधूनमधून सर्वत्र आपल्याला दिसतात. सॉमरसेट मॉम या प्रसिद्ध कादंबरीकारानें ' मून अॅण्ड सिक्स पेन्स ' या आपल्या कादंबरींत अशाच एका वेड्या कलावन्ताचें चित्र रेखाटलें आहे. वयाचीं चाळीस वर्षे चार शहाण्या व समंजस माणसांसारखा हुपारीनें कामधंदा व संसार करणाऱ्या या कलावंताला आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या तुकड्याची हांक त्या प्रौढ वयांत ऐकूं येते. ती हांक कानीं पडतांच उद्योगधंदा, बायकोमुलें, मित्रमैत्रिणी— सारें जेथल्या तेथें टाकून हा माणूस एके दिवशीं आपल्या घराबाहेर पडतो, आणि चित्रकलेची उपासना सुरूं करतो. त्याचें नंतरचें आयुष्य हालअपेष्टेंत जातें. प्रतिभासंपन्न कलावन्ताच्या नशिबीं येणारें सारें दुःख तो भोगतो. आणि शेवटीं अज्ञात अवस्थेंत, दारिद्र्यांत आणि उपेक्षेंत त्याला मरण येतें. पण मरतांना तो अत्यंत सुखी, समाधानी असतो. कारण आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या तुकड्याचें अस्तित्व त्यानें ओळखलेलें असतें. त्यामुळें त्याच्यापुरतें त्याचें व्यक्तिमत्त्व आतां सलग, संपूर्ण झालेलें असतें. तुमच्या आमच्याप्रमाणें अर्धे जीवन तो जगलेला नसतो. तर संपूर्ण जीवन जगल्याचें श्रेय त्यानें संपादिलेलें असतें. मॉमनें रंगविलेला हा कलावन्त काल्पनिक नाही. तो या जगांत खरोखरच होऊन गेला. त्याचें नांव गोगँ.

गोगँसारखे वेडे लोक आपल्याला सर्वत्र आढळून येतात. आपल्याकडे तुकारामांनीं दुसरें काय केलें ? गोगँचें अर्धे व्यक्तिमत्त्व कलेच्या जाणीवेनें भारावलेलें होतें. तुकारामांचें अर्ध व्यक्तिमत्त्व परमार्थाच्या जाणीवेनें विद्ध झालें होतें. त्या व्यक्तिमत्त्वानें फोडलेली हांक तुकारामांनीं ऐकली आणि ' संसाराला आगी लावोनिया हातें । वळोनी मागौतें पाहों नये ' अशा जिवाच्या आकान्तानें ते त्या हांकेपाठोपाठ धांवत सुटले. उपेक्षा झाली. उपहास झाला. लोकनिंदेला तोंड द्यावें लागलें. पण तुकारामांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. कारण आपल्या व्यक्तिमत्वाचें हरवलेलें अर्धुक त्यांना पुन्हां सांपडलें होतें. त्यामुळें ते तृप्त होते. सुखी होते.

कोठे तुकारामासारखा श्रेष्ठ सन्त अन् साधक आणि कोठें चित्रपटांत काम करणारी

## नशेत होते जेव्हां....

धुंद आगळया यौवनातल्या
नशेत होते जेव्हां मी रे
नाहीं कळली नाहीं जुळली
त्या वेळेला प्रीत तुझी रे
नशेत होते जेव्हां मी रे
जगास साऱ्या हंसले होते
धुंद आगळया यौवनातले
अगणित तारे मोजित होते !
त्या ताऱ्यांचे तप्त निखारे
आज जाळिती क्षणाक्षणाला
नशा संपता आज परी रे
प्रीत तुझी रे उमजावी कां !

—अशोक देशपांडे

स्वच्छता हीच घराची शोभा !
स्वच्छता म्हणजेच समाधान ! !
तुमच्या घरांत रोज अत्यंत निकडीनें
लागणारा हा साबू नेहमीं संग्रहीं ठेवा.
मॉडर्न क्रीम सोप : कपडे न फाटतां काटकसरीनें अतिशय स्वच्छ कसे निघतात याचें प्रात्यक्षिकच गेलीं कांहीं वर्षे या ' क्रीम सोप ' नें दिलें आहे. तो पाण्यांत ताबडतोब विरघळतो, कपड्यांना अथवा हातांना अपायकारक नसतो. वापरण्यास फारच सुलभ असून थोडा पुरतो.
: विशेष चौकशीसाठीं खालील पत्त्यावर लिहा अथवा भेटा :
मॉडर्न केमिकल वर्क्स
२२ ' जानकी निवास ', प्लाझा सिनेमासमोर, न. चिं. केळकर रस्ता,
दादर, मुंबई नं. २८.
टेलीफोन : ६०४५४ ) ( तारेचा पत्ता : ' Lycine ', DADAR, Bombay.

अभिनेत्री ! पण आपल्या व्यक्तिमत्वाच्या दुसऱ्या अर्धुकाची जाणीव सन्ताला व्हावी आणि अभिनेत्रीला होऊं नये असें थोडेंच आहे ? परवांच एका पाश्चात्य अभिनेत्रीची कथा माझ्या वाचनांत आली. यश, किर्ती, मानसन्मान आणि विलास यांच्या ऐन शिखरावर असतांना या अभिनेत्रीनें चित्रपटसृष्टीचा त्याग केला आणि आपल्या आईसह समुद्रकांठीं दूर दूर एकान्त-वासांत ती आतां जाऊन राहिली आहे. प्रसिद्धीच्या झगझगाटापासून तिनें स्वतःला कटाक्षानें अलिप्त ठेवलें आहे. समुद्रकांठीं तिचा सुंदर बंगला आहे. भोंवतीं नयनरम्य विस्तीर्ण बगीचा आहे. बगिच्या पलिकडे वाळवंटाचा स्वच्छ रुंद पट्टा आहे आणि त्यापलिकडे घनगंभीर गर्जना करणारा विशाल सागर आहे. ही अभिनेत्री रुपानें अत्यंत देखणी आहे. बुद्धिमान् आहे. चतुर आहे. तिच्या ठायीं असलेलें स्त्रीत्वाचें आकर्षण अद्यापहि कमी झालले नाहीं. पण जीवनांतील सर्व सुखांकडे तिनें निग्रहानें पाठ फिरवली आहे आणि हा खुषीचा एकांतवास पत्करला आहे. संध्याकाळच्या वेळीं ही अभिनेत्री आपल्या बगिच्या कुंपणाशीं येऊन उभी राहते. आणि समोरच्या समुद्राकडे निश्चल टक लावून बघते. समुद्रावरील वाऱ्याच्या थंडगार झुळकांनीं तिचे केस भुरुभुरु उडत असतात. आणि डोळे तृप्तीनें भरून चमकत राहतात अशा वेळीं तिच्या मनांत काय विचार चाललेले असतील हें कोणी कसं सांगावें ? पण ती अभिनेत्री शान्त दिसते. समाधानी दिसते. आपल्या व्यक्तिमत्वाचें हरवलेलें अर्धुक तिला पुन्हां सांपडलें आहे यांत काय संशय ?

अशीं वेडीं माणसें पुन्हां पुन्हां आपल्यास पहावयास मिळतात. कोणाला कलेच्या क्षेत्रांत तर कोणाला अध्यात्माच्या क्षेत्रांत, कोणाला समाजकार्याच्या क्षेत्रांत तर कोणाला संशोधनाच्या क्षेत्रांत आपल्या हरपलेल्या अर्ध्या व्यक्तिमत्त्वाचा भास होतो. तेथून तें त्यांना खिजवीत रहातें. खुणावीत राहतें. बोलवीत राहतें आणि ... त्या हांकेपाठोपाठ जातात. ही हांक कानीं पडलीं कीं माणसाची मूल्यश्रेणीच मुळीं संपूर्णपणें बदलते. वैभव, संपत्ति, प्रतिष्ठा, व्यावहारिक स्थैर्य, सुरक्षितता—कशाचेंही त्यांना मोलच वाटेनासें होतें. मग सर्वसामान्य जगाच्या दृष्टीनें अत्यंत मूर्खपणाच्या समजल्या

## जास्वंदीच्या काळोखांतिल....

जास्वंदीच्या काळोखांतिल पराग खाउन  
खराब झालिस. खुबी करुनिया  
उभी राहिलीस ओंठ चावुनी,  
बोट मोडित तीं टिकल्यांची.

शापायाला आलो तेव्हां  
ओल राहिली मनांत होती :  
तळहातांना तुझ्या चिकटुनी लांच्छन झालों:  
तुझ्या नसांचा फांस टाकुनी  
जास्वंदीला कापुन गेलों......

—कृष्णराव पेडणेकर

६१
१०/१०/६०

तील अशा गोष्टी तो निःशंकपणें करूं लागतो. कलाज सोडून मीरा जशी भगवंताच्या भजनीं गली तसा हा वेडा माणूस आपल्या व्यक्तित्वाच्या त्या दुसरा अर्धुकाच्या भजनीं लागतो. ग कोणी पारमार्थिक श्रेयामागें धांवत सुटतात. णी संशोधनाच्या क्लिष्ट व चिंवट जाळ्यांत तःला गुरफटून घे तात. कोणी सुंदर पण निष्ठुर लेवर आसक्त होऊन तिचा एकतरी स्नेहमय टाक्ष आपल्याला लाभावा म्हणून उभ्या ायुष्याची फरफट करून घेतात. तर कोणी मवर्षावांत जिवन्त गाडले जातात. नाहीं तर मुद्राच्या तळाशीं जाऊन बसतात. यांतल्या ांहींजणांची नांव समाजाला कळतात. व्याव-ारिक जग आपल्या व्यवहारांतून क्षणभर कां ोईना, बाजूला सरून त्यांच्याकडे सकौतुक आदरानें पाहते त्यांचा गौरव करून त्यांवर ुष्पवृष्टि करतें. पण कित्येकजण असेहि असतात कीं त्यांचे क्लेश, त्यांच्या यातना जगाला कळतहि नाहींत, व्यावहारिक यश तर त्यांनीं सप दिलेलें नसतेंच. आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचें दुसरें अर्धुकहि अखेरपर्यंत त्यांच्या हातीं येत नाहीं. मग मृगजलामागें धांवून उरीं फुटणाऱ्या हरिणासारखीच त्यांची ..... ग महत्त्व यशाला किंवा अपयशाला नसतें. हांक कानावर आली याला महत्त्व असतें. आपलें हें अर्धे व्यक्तिमत्त्व आपल्याला बोलावूं लागलें म्हणजे अरबी भाषेंतल्या त्या मरणोन्मुख माणसाप्रमाणें आपली बभान अवस्था होते. मग एखादा सिद्धार्थ सुसज्ज शय्या, विलासयुक्त मंदिर, प्रेमळ पत्नी व

सर्व प्रकारची विम्याची व नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटची कामें केली जातात.

अधिक माहितीसाठीं

**रा. ना. ठाकूरदेसाई**

७२९ अहमद सेलर बिल्डींग

नायगांव, दादर, मुंबई १४.

गोजिरवाणें बालक जेथल्या तेथें टाकून जातो, कोणी वैभवावर लाथ मारतो. कोणी संसाराचा उभारलेला डोलारा स्वतःच कोलमडून पाडतो. तर कोणी जिवीच्या जिवलगांचा क्षणार्धात त्याग करतो—

अशी ही मृत्युपर्वताची हांक आहे. अजून ती आपल्या कानीं आलेली नाहीं ही गोष्ट खरी, पण आज ना उद्यां ती येणारच नाहीं म्हणून कोणी सांगावें !

**चला मंडळी! आतां जरा गुन्हेगारांच्या जगांत फेरफटका मारून येऊ या.**

**सुष्टांचा नि दुष्टांचा हा समाज. या समाजांत नाकासमोरच्या वाटेनें चालणारे सज्जन लोक आहेत नि तसेंच त्यांना छळणारे दुर्जनहि सभ्यपणाचे मुखवटे लावून वावरतात. स्वार्थामागे भिरभिरणारे हे काळपुरुष आपल्याभोवतीं रक्ताचा पाऊस पाडतात, प्रेतांचा खच पाडतात. हाणामारी, खून, दरोडे, रक्ताचें थारोळें या गोष्टीं त्यांच्या परिचयांतल्या असतात.**

**स दारजीहि असाच एक गूढ माणूस होता. सभ्यपणाचा मुखवटा वापरणारा. त्याचा तो मुखवटा किती कौशल्यानें फाडला गेला.**

इन्स्पेक्टर मोहन धुरंधर सिगोरटचा आस्वाद घेत हळूंहळूं चालत होते. डॉ. त्रिलोकीनाथांना भेटून ते आतां घराकडेच वळत होते. मुद्दाम फोन करून डॉक्टरसाहेबांनीं त्यांना बोलावलं होतं. तक्रार नेहमींचीच होती. पण डॉक्टर त्रिलोकीनाथ ही एक बडी असामी होती म्हणूनच इ. धुरधरांना जातीनिशीं लक्ष घालणें भाग पडलें होते.

कचेरींत कामाचा तुटवडा नव्हता. अनेक तक्रारी येत होत्या. घरफोडी, उचलेगिरी, मारामाऱ्या, भांडणं, मोटारींची चोरी, बेपत्ता झालेली माणसें, एक ना अनेक तऱ्हा. साऱ्या तक्रारी त्यांना ऐकाव्या लागत. त्यांची नोंद केली जाई, योग्य ते हुकूम सोडून तपासणीला चालना दिली जाई.

इ धुरंधर सकाळपासून याच रामरगाड्यांत गुंतले होते पण आतां ते या साऱ्या गोष्टी विसरले होते. डोक्यांत एकच विचार घोळत होता. दुपारीं त्याच्या वरिष्ठाबरोबर झालेल्या चर्चेची त्याना सारखीं आठवण होत होती. 'सरदार'जींचं रहस्य उलगडून काढण्याची खास कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती.

बुद्धिचापल्य नि बेडरपणा हे धुरंधरांचे खास गुण होते. याच जोरावर आज ते इतक्या वर चढले होते. वरून अगदीं शांत नि मलूल दिसणाऱ्या इ. धुरंधराचें नांव एकलं कीं गुन्हेगारांना कांपरं भरत असे.

पण साऱ्या पोलिस खात्याला पुरून उरला होता एक 'सरदार'. सरदार ही व्यक्ति कोण आहे याची कुणालाही कल्पना नव्हती. पोलिसांना फक्त 'सरदार' हें नांव कळलं होतं. पण या नांवानें कारभार करणारा कोण आहे याची त्यांना कल्पना नव्हती.

'सरदार' या नांवाखालीं वावरणारी व्यक्ति प्रत्यक्ष गुन्हा करण्याच्या मोहिमेंत कधींच भाग घेत नसे. गुन्हे करणारी माणसें वेगळींच असत. त्यांची गणना सरदाराच्या टोळींत होत नसे. कारण सरदाराची स्वतःची अशी टोळी नव्हतीच. चोरी करून वा दरवडे घालून मिळविलेले सोन्या चांदीचे दागिने व हिरेमोती सरदार विकत घेत असे. सरदाराची एक विशिष्ट पद्धत होती. कोणत्या तरी एखाद्या निर्मनुष्य गल्लीच्या तोंडाशीं, रात्रीच्या अंधारांत एखादी गाडी उभी रहात असे. हातमोजे चढविलेला एक हात बाहेर येत असे. हातांत ठेवले पुडकें घेऊन त्याबदली नोटांचें बंडल देण्यांत येत असें; नि मोटार निघून जात असे. सारा मामला अगदीं निःशब्द नि झटपट, व्यवहार इमानावर चाले. पैसे कधीं कमी नसत. मालांतही अफरातफर केली जात नसे. एकदा एकानें खऱ्या हिऱ्याऐवजीं खोटें हिरें गळयात बांधण्याचा प्रयत्न केला. पण तो पैसे घेऊन घरीं जाण्यापूर्वींच तीन माणसं त्याची वाट पहात असलेली त्याला आढळली होती. सरदाराचं आणखी एक वैशिष्ट्य होतं. प्रत्येक वेळेला तो निराळी गाडी वापरीत असे. गाडीच्या मालकाच्या आपली गाडी अशा कामासाठी वापरलीं गेलीं होती याचा पत्ता लागत नसे.

हें हिरे-मोतीं वा दागिने मुंबईच्या बाजारांत कधींच आलें नव्हते. सरदारानें तें मुंबईत विकण्याचा कधींच प्रयत्न केला नव्हता. मग जातात कुठें नि कसें?

गेलीं पांच वर्षे पोलिस या प्रश्नाचें उत्तर शोधत होते.

सरदाराचा हा धंदा केव्हां सुरूं झाला होता, याचा पोलिसांनासुद्धां अंदाज नव्हता. पांच वर्षांपूर्वीं एक खटल्याच्या वेळीं प्रथम पोलिसांना हें नांव समजले. घोलवड संस्थानच्या राजकुमारीचें जडजवाहीर, मुंबईतील त्यांच्या निवासस्थानांतून चोरण्यांत आले होते. या चोरीचा सूत्रधार, त्याच्या टोळीसह पोलिसांनीं मोठ्या शिताफीनें पकडला होता. पण चोरलेल्या जडजवाहीरापैकीं पोलिसांच्या हातीं कांहींच लागलें नव्हते हें सारं जवाहीर सरदारानें विकत घेतले येवढी गोष्ट त्या सूत्रधारानें कबूल केली. पण हा सरदार कोण हें त्याला माहित नव्हते. त्यानें त्याला पाहिलासुद्धां नव्हता. यानंतर अनेक वेळां 'सरदार' हें नांव पोलिसांना ऐकूं आलं होतं. पण नांवाव्यतिरिक्त इतर माहिती त्यांना मिळूं शकत नव्हती.

गेल्याच महिन्यांत मगनलाल शेटच्या पेढीवर दिवसाढवळ्या डाका घालून पांच लाखांचें जडजवाहीर पळविण्यांत आलं होतं. एक आठवड्याच्या आंतच पोलिसांनीं गुन्हेगारांना गिरफदार केलें होते. पण त्याच्याजवळ कांहींच माल सांपडला नाहीं. सरदारानें तो विकत घेतला होता. पण सरदाराबद्दल ते जास्त माहिती देऊं शकत नव्हते. पांच वर्षांपूर्वीं पोलिस जिथें होते, तिथेंच आजहि ते होते.

आणि ही जटिल समस्या सोडविण्याची खास कामगिरी इ. धुरंधर यांच्यावर सोपाविली होती.

इन्स्पेक्टर धुरंधर याचाच विचार करीत होते. हें प्रश्नचिन्ह सोडवायचं कसं?

खळ्ऽऽकन् तावदान फुटल्याचा आवाज त्यांना ऐकूं आला. कांचाचें कांहीं तुकडेहि त्यांच्या अंगावर पडले. त्यांनीं चमकून वर पाहिले, नि त्याचवेळीं एक बशी भिरभिरत त्यांच्या दिशेनें आली. वेळींच ते बाजूला सरले म्हणून कपाळमोक्ष टळला. वरच्या बाजूनें आरडाओरडा ऐकूं येत होता. गर्दी जमूं लागली होती.

पहिल्या मजल्यावरील एका खोलींत एक मनुष्य खालीं पडला. चार पांच जण त्याला बुकलीत होते.

"साल्याला पोलिसाच्या स्वाधीन करा." कोणीतरी ओरडले नि त्याचवेळीं इ. धुरंधर दारांत उभे होते.

# सरदारजीचें 'रहस्य' कथा!

लेखक
## वासुदेव पोवळे

" बाजूला व्हा " ते गरजले.

तो आवाज ऐकतांच सारेच चपापले. ते एकदम दूर झाल. खालीं पडलेला मनुष्य हळूंहळूं उठत होता.

धुरंधर नीं खोलींत प्रवेश केला. ती एक छोटीशीं खाणावळ होती. पाट–ताटें मांडलेली होतीं. पण मध्येंच झालेल्या दंगलीमुळें सारींच अस्ताव्यस्त झाली होती पुढें होऊन त्यानीं त्या माणसाचा दंड पकडला नि म्हणाले " चल."

तो निमूट त्यांच्यामागून जात होता. नाक्यावरच त्यांना दोन पोलिस भेटले. त्या माणसाला, त्यांच्या स्वाधीन करून, धुरंधर घरीं निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्यानीं त्या माणसाला आपल्यासमोर उभें केलें. त्या खाणावळीचा मालक गणपत शिवरामहि तिथें हजर होता.

' तुम्हीं याला ओळखतां कां ? ' इ. धुरंधरानीं त्याला विचारलें.

' होय साहेब ' खाणावळवाला म्हणाला.

' किती वर्षें ओळखतां ? '

' जवळजवळ पांच वर्षें साहेब. माझ्याच खाणावळींत ते गेले पांच वर्षें जेवत आहेत. त्याचे पैसे नियमित येतात. गेल्या पांच वर्षांत कालच्यासारखा प्रसंग कधींच घडला नव्हता. शंकरराव अगदीं शांत असत. ते कुणाशीं बोलत नसत. माझ्याशींदेखील कारणपरत्वें बोलत. निमूटपणें जेवत नि निघून जात. पण काल काय झालं याची मला कल्पनाच नाहीं. ह्यानीं एकदम वाढप्यावर हात टाकला. '

' असं–ठीक आहे. काय नांव तुझं ? ' धुरंधरानीं त्या माणसाला विचारलें.

' शंकर कदम. '

' कुठें आहेस नोकरीला ? '

' कुर्ला गॅरेजमध्यें. '

' कुठेसा आहे हा गॅरेज ? '

' शीव स्टेशनच्या समोर. '

' कालच्या प्रकाराबद्दल तुला काय म्हणायचं आहे ? '

' कांहीं नाहीं साहेब. चूक माझीच होती. माझा तोल गेला साहेब. '

' कां ? नशापाणी केलं होतंस कां ? '

' नाहीं साहेब. मी दारूच्या थेंबाला सुद्धां हात लावत नाहीं. '

' मग तोल जायला काय झालं ? '

' साहेब, ती एक मोठी कहाणी आहे. गेलीं दहा वर्षें मी या गॅरेजमध्यें काम करीत आहे. मेकॅनिक म्हणून मी तिथें लागलो. पण प्रसंगीं पेट्रोलच्या पंपावरहि काम करावं लागतं मला. माझी कामाबद्दल तक्रार नाहीं. पगाराबद्दलहि नाहीं. माझी तक्रार वेगळीच आहे साहेब. दोन वर्षांपूर्वी आमच्या मालकानें माझ्याकडे तीन हजारांची मागणी केली व त्यापोटीं मला दोन आण्याची पाती देण्याचें मान्य केलें. शिवाय शेंकडा चार टक्क्यानीं व्याज देण्याचेंहि कबूल केलें. मी तसा स्वभावानें खर्चिक नाहीं, त्यामुळें मी पगारांतले पैसे वांचवूं शकलो. मी शिलकेंत टाकलेले पैसे त्यांना दिले. कारण ही भागीदारी आपल्याला फायदशीर होईल याची मला खात्री होती. गॅरेज अगदीं मोक्याच्या जागीं आहे. त्यामुळें गिऱ्हाईकांची कधींच वाण पडत नाहीं. पण कालच माझ्या मालकांनीं सांगितलें कीं गॅरेजची जागा नगरपालिका रस्ता वाढवावयाचा असल्यामुळें आपल्या ताब्यांत घेणार आहे.

" पण नगरपालिका त्याबद्दल नुकसान भरपाई देईल. " धुरंधर म्हणाले. '

" होय, तेहि तसंच म्हणाले. पण गॅरेजला बँकेचे कर्ज आहे. तेव्हां नुकसानीची रक्कम परस्पर बँकेकडे जाईल. पेट्रोल-पंप कंपनी आपल्या ताब्यांत घेईल साहेब. दहा वर्षें कष्ट करून, जीव मारून मी जें सांठविलें होते तें एका क्षणांत नष्ट हेत होतें. म्हणूनच माझा तोल गेला साहेब. साहेब, मला क्षमा करा. " तो अगदीं कळवळून म्हणाला.

" अरे मग तूं एखाद्या वकिलाला कां नाहीं भेटलास ?"

" माझ्या कोणीच ओळखीचा नाहीं साहेब. "

" तुझ्या ह्या मालकाचे नांव काय ? " धुरंधरानीं विचारलें."

" त्याचं नांव आलबर्ट डिसूझा. गोवेंकर आहेत ते. "

" ठीक आहे. पांच वाजतां तूं इथें ये. तुझ्या त्या डिसूझानें तुला पावती वगैरे लिहून दिली असेल ना ? तीं घेऊन ये. आपण एखाद्या वकिलाला गांठू " धुरंधर उठत म्हणाले.

या माणसाबद्दल आपण इतकी आस्था कां दाखवितों, या प्रश्नाचें उत्तर धुरंधर देऊं शकत नव्हते. एक गोष्ट मात्र खरी कीं या माणसाला मदत करावी असं त्यांना वाटूं लागलं होतं. तो त्यांच्या मनानें दिलेला कौल असेल. नि तसं म्हटलं तर त्यांत फारसं नुकसानहि नव्हतं. एखादा तास फुकट गेला असता येवढंच नुकसान.

शंकर कदमनें सांगितलेली हकीगत गुप्ते वकिलांनीं लक्षपूर्वक ऐकली.

'त्यानें कांहीं लिहून दिलं आहे कां?' त्यांनीं विचारलें.

'होय साहेब.' शंकर खिशांतून एक कागद काढीत म्हणाला. वकिलसाहेबांनीं तो नीट वाचला.

'अरे, हें अगोदर कां दाखविलें नाहींस? बरं कां धुरंधर, हा आहे कर्जरोखा. या कर्ज-रोख्यानुसार याला दर महिन्याला शेंकडा ४ टक्क्यानें व्याज मिळावयास हवं आहे आणि दोन वर्षांनीं पैसे परत करण्याची हमीहि दिलेली आहे. तुला त्यांनीं कधीं व्याज दिलं होतं कां?' वकिलानीं विचारलें.

'नाहीं साहेब.' शंकर म्हणाला.

'यांत कांहीं बनवाबनवी आहे कां?' इ. धुरंधरानीं विचारलें.

'बनवाबनवी आहे असं कांहीं म्हणतां येणार नाहीं. कर्जरोखा कायदेशीर आहे. पण याच्या अज्ञानाचा त्याला फायदा घेतां आला असता.'

'पण हे पैसे वसुल कसे करायचे? मी विचारलं तर मला ते सबबी सांगतात, जागा नगर-पालिकेनें घेतली आहे. बरं मी नोकर मनुष्य, मला कमी जास्त बोलतांहि येत नाहीं.' शंकर कदम म्हणाला.

'याला उपाय काय?' डोकं खाजवित गुप्ते वकिल विचार करूं लागले. हं आहे एक उपाय. तुझ्यातर्फे तूं दुसरं कोणालाहि पाठवूं शकतोस. त्याला अखत्यारपण द्यायचं म्हणजे झालं.'

'ही कल्पना चांगली आहे. मला वाटतं बाजीरावाची आपण नेमणूक करूं या. आठ दहा दिवसांतच त्याला जागा रिकामी करावी लागणार आहे. त्यापूर्वीच शंकरचे पैसे वसूल होणें जरुरीचं आहे. बाजीराव हाच योग्य इसम आहे.' धुरंधर म्हणाले.

'तुला कां मान्य शंकर?' वकिलानीं विचारले.

'मी तुमच्या बाहेर नाहीं साहेब.' शंकर म्हणाला.

'ठीक आहे तर. या फॉर्मवर सही कर' गुप्ते त्याच्यासमोर एक फॉर्म ठेवित म्हणाले.

धारावी रोड व पूना रोड यांच्या कोपऱ्यावर 'कुर्ला गॅरेजची' छोटीशीं इमारत होती. गॅरेजला कांचेची तावदानें होती. त्यामुळें आंत चाललेल्या घडामोडी बाहेरून स्पष्ट दिसत. गॅरेजमध्यें अनेक उपकरणीं इतःस्ततः पडलेली होतीं. स्पॅनर्स, मोटारचे टायर्स, ट्यूब्स, पंप, तेलाचें डबे, इत्यादि वस्तूंची गल्लत झाली होती. भिंतीलगत कांहीं लोखंडी कपाटेंहि होतीं. गॅरेजच्या बाहेर पेट्रोल पंप होता

जवळच्या इमारतींतल्या एका क्षुधाशांति-सदनांत बसून इ. धुरंधर ह्या गॅरेजचं बारकाईनें निरीक्षण करीत होते. गॅरेजची जागा अगदीं मोक्याची होती. मुंबईला येणाऱ्या व मुंबईतून बाहेर जाणाऱ्या गाड्या तिथें अल्पकाळ थांबत. यामध्यें मालवाहू मोटारींचा भरणा जास्त होता.

आपण या गॅरेजचं इतकं बारकाईनें कां निरीक्षण करीत आहोंत, याची सुसंगत कारणं इन्स्पेक्टर धुरंधरांना देतां आली नसती. बाजीराव गेल्यावर डिसूझा कसा वागेल हेंच पाहण्यासाठीं ते मुद्दाम आले होते. खरं म्हणजे हें करण्याचीहि जरूरी नव्हती. त्यांच्या दृष्टीनें शंकर कदमची केस निकालांत निघाली होती. पण सज्जन नि सरळ मार्गानें जाणाऱ्या माण-सांना कसं नाडवलं जातं याचा अनुभव त्यांना पूर्वीं आलेला होता. म्हणूनच अशा माणसांना शक्य तितकी मदत ते नेहमींच करीत गॅरेजला त्यांनीं भेट दिली याच हेतूनें. पण गॅरेजचें ठिकाण पाहिल्यावर आपण येथें आलों तें फार बरं झालं असं त्यांना वाटूं लागलं

नऊच्या ठोक्याला डिसूझा गॅरेजमध्यें शिरला उंच्यापुऱ्या उंचीचा नि धडधाकट शरीरयष्टीचा एक दणकट मनुष्य होता तो. चेहरा राकट वाटत होता. केंस पिकलेलें होते. डिसूझा साठीच्या आसपास होता. पण वयाच्या मानानें त्याचें शरीर बळकट होतें. अंग-मेहनतीच्या कामामुळें आपली प्रकृति तो इतकी ठणठणीत ठेवूं शकला होता. एक कुशल मेकॅनिक अशी त्याची प्रसिद्धि होती. सर्वसाधारणपणें या धंद्यांतली माणसं ज्या व्यसनामध्यें गुरफटली जातात, त्या व्यसना-

## सला

सुरेशनें गांवाला जायचे ठरविलें. त्याप्रमाणें ऑफिसांतून रजाहि काढली. तिकीट काढून आणलें. सगळें कांहीं झालें. आणि नेमका गांवाला जायच्या दिवशीं आजारी पडला. तेव्हां त्याला पोंचवायला म्हणून त्याच्या घरीं आलेल्या रमेशला तो म्हणाला–" नेहमीं हें असं होतं. गांवाला जायच्या दिवशींच मी नेमका आजारी पडतो."

तेव्हां रमेश म्हणाला–" तुला जर हें आतां कळून चुकलं आहे तर तूं यापुढें नेहमीं आदले दिवशींच गांवाला जात जा, म्हणजे झालं!"



नूतन वर्षाभिनंदन

सोनें चांदी व मोत्यांच्या तयार दागिन्यांचे सुप्रसिद्ध व्यापारी

जी. बी. पेडणेकर आणि कंपनी

पर्ल ... रोड

परळ, मुंबई नं. १२


QTS
दीपावळी
शुभ-संदेश
मालाच्या विश्वसनीय, कार्यक्षम आणि जलद
वाहतुकीचें आश्वासन हाच सर्वोत्कृष्ट संदेश आम्हीं आपणांस
दीपावलीच्या शुभ प्रसंगीं देत आहोंत.
INDIAN RAILWAYS
मध्य आणि पश्चिम रेल्वे
MARATHI

पासून तो दूर होता. तोंडातला लठ्ठ चिरूट हेंच त्याचें एकमेव व्यसन होतं.

गॅरेजच्या दरवाज्यांत असलेला बाजीगत्र त्याला पाहतांच उठून उभा राहिला. बाजीरावानें आपलें अखत्यारपत्र त्याला दाखविलें.

डिसूझानें एकवार बाजीरावाकडे पाहिलें. पेहेलवानी पेशाचा तो तरुण त्याच्या मानानें भारी होता. डिसूझानें इतर कामगारांना काढून टाकलें होते. आतां होते फक्त दोघेजणच. एक शंकर कदम नि दुसरा रात्रपाळीला असलेला विठू. विठू आतां घरीं गेला होता.

ऑफीसचा दरवाजा उघडीत डिसूझा म्हणाला, " शंकरचे पैसे मी एक दोन आठवड्यांनीं देईन. "

" तोंपर्यंत मी इथेंच राहीन. " बाजीरावानें उत्तर दिलें

" तसं राहण्याची गरज नाहीं. मी पैसे देईन. "

" केव्हां ? "

' दोन आठवड्यानीं. '

' या आठवड्याच्या शेवटीं तुम्हीं ही जागा नगरपालिकेच्या ताब्यांत देणार आहांत '

' होय. '

' मग तुम्हीं पैसे कसे देणार ? '

' मी काय पळून जाणार आहे थोडाच ? '

' गेलेत तर काय करायचं ? नि जागा ताब्यांत दिल्यावर कुर्ला गॅरेजचें अस्तित्वहि संपुष्टांत येईल तुम्हीं असलेत, तरी कंपनी कुठें राहणार आहे ? ' बाजीरावानें विचारलें.

' मी म्हणजे कंपनी. तुम्हीं काळजी करूं नका. ' डिसूझानें आश्वासन दिलें.

पण बाजीराव सबंध दिवस तिथेंच बसून होता. रात्रीहि त्यानें आपली पथारी तिथेंच पसरली.

दुसऱ्या दिवशीं याच कार्यक्रमाची पुनरावृत्ती झाली. गॅरेजमधील एक साधा स्पॅनरहि गॅरेज बाहेर जाऊं देण्यास बाजीराव तयार नव्हता.

डिसूझा चुळबुळत होता. त्यानें तिसऱ्या दिवशीं सकाळीं व्याजासह सारे पैसे शंकर कदमच्या हातावर ठेवले बाजीरावाला गॅरेज सोडणें भाग पडलें. डिसूझानें सुटकेचा एक श्वास टाकला. बाजीरावाच्या मागोमाग तोही गॅरेज सोडून बाहेर पडला

शंकर कदमनें फोन करून इन्स्पेक्टर धुरंधरनां पैसे सव्याज मिळाल्याचें कळविलें. फोनचा रिसिव्हर खालीं ठेवून धुरंधरांनीं एक सिगारेट पेटवली. एक प्रकरण समाधानकारक रितीनें हातावेगळें झालं होतं. कुर्ला गॅरेज... कुर्ला गॅरेजची ती विशिष्ट जागा त्यांना आठवली. हमरस्त्यावर असूनहि, तें ठिकाण तसं एकाकी होतं. जवळच धारावीची सुप्रसिद्ध वस्ती होती. मालानें भरलेल्या नि भारतांत दूर दूर ठिकाणीं जाणाऱ्या मोटार-लॉऱ्या नेहमींच तिथें थांबत. ज्या वस्तू पोस्टानें, रेल्वेनें वा एखाद्या इसमाबरोबर पाठविणें धोक्याचें होतें अशा वस्तू, पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेंकून सहज बाहेर काढतां येण्याची सोय-धुरंधरानीं सिगारेट अॅश ट्रेमध्यें फेंकून दिली. त्याचवेळीं फोनची घंटी खणखणली.

" हॅलो, इ. धुरंधर " धुरंधर रिसिव्हर उचलून बोलूं लागले.

" साहेब, अर्ध्या तासापूर्वी ठाण्याजवळ आग्रा रोडवर एक अपघात झाला. कोल्हापूरकडे जाणारी एक मोटार लॉरी, रस्त्यावरून येणाऱ्या एका गाईला चुकवित असतां, एका झाडावर आदळली नि उलटली. मोटार ड्रायव्हर जागच्या जागीं ठार झाला. पण क्लिनर मात्र बचावला आहे. गाडींतून बाहेर पडलेला माल गोळा करीत असतांना कापडांत व्यवस्थित बांधलेलें एक छोटेंसें पार्सल आम्हांला सांपडलं. तें दागिन्याचें पार्सल आहे. "

" हें पहा पवार, मी ताबडतोब निघतोंच. पण हा अपघात तुमच्या हद्दींतला आहे. "

" होय. पण हे दागिनें तुम्हांला महत्वाचे वाटतील असं साहेबानीं सांगितलं. म्हणून मुद्दाम फोन केला. "

## ' समजूतदार ' नवरा

**प्रमिलाबाई गेले चार महिनें अंथरुणाला खिळून होत्या. श्यामराव बिचारे औषध, टॉनिक शुश्रुषा यांवर पाण्यासारखा पैसा खर्च करीत होते. हा अफाट खर्च प्रमिलाबाईंच्याहि लक्षांत आला. त्या एके दिवशीं श्यामरावांना म्हणाल्या, " नाथ, माझ्या आजारपणामुळं तुम्हांला खूप खर्च झाला. '**

**तेव्हां श्यामराव समजुतीच्या स्वरांत म्हणाले– " खर्चाची काळजी करूं नको ग. तूं बरी असतीस तरीहि इतका खर्च झालाच असता."**

" ठीक आहे. आलोच मी " धुरंधरानीं फोन खालीं ठेवला नि आपल्या सहकाऱ्याला हांक मारली.

" बरं कां रामराव " धुरंधर म्हणाले,- " मी आतां ठाण्याला जाऊन येतों. माझ्या गैरहजेरींत एक काम करा. कुर्ला गॅरेजवर सारखी नजर ठेवा. गॅरेजमध्यें जाणाऱ्या, येणाऱ्या गाड्यांचे नंबर टिपून घेण्याची व्यवस्था करा. नि डिसूझावर बारीक लक्ष ठेवा. "

धुरंधरानीं आपल्या जीपमध्यें उडी मारली. गाडी भरधांव सुटली.

धुरंधरानीं दागिन्याचे पार्सल हातांत घेतलें. कोल्हापूरच्या फ्रान्सिस डिमेलो नांवाच्या

( पान १०० पहा )

**PRABHA AGENCIES**

MFGRS. OF OFFICE PINS & CLIPS

STATIONERS & PRINTERS

Agents for

**PAISA FUND GLASS WORKS**

FACTORY :
19 D, Dhakuprabhujee
Wadi, Ghodapdeo,
BOMBAY.

OFFICE :
113, Sir Vithaldas Chambers,
16, Apollo Street,
BOMBAY 1.

TELE. 251136

पान ६४ वरून

पण इंदूताईंना मध्येंच थांबवीत शुभा लाघवी स्वरांत म्हणाली,

' हें हो काय मावशी, मला असं परक्या-सारखं शुभाताई काय म्हणतां ? '

' अगदीं बरोबर ! ' प्रसाद बोलला, ' मलाहि अरे प्रसाद म्हणा हं, मावशी. नाहीं तर प्रसादकुमार म्हणाले. ' आणि तो निर्मलेकडे पहात मिस्किलपणें हंसला.

ही हंसण्याची, बोलण्याची पद्धतहि थेट श्रीकांताची !—

' तर, तर ! ' रुसक्या स्वरांत निमी बोलली, ' आपल्यापेक्षां वयानं थोर असलेल्या माणसाला अहो, जाहोच म्हणायचं असतं ! '

' मग मीं म्हणेतं तसं दादा कां ग म्हणत नाहींस माझ्या ह्या वडील भावाला ? ' शुभेनें चेष्टा केली.

' चल ! चावट कुठली ! ' तिरक्या नजरेनें प्रसादकडे बघत निमा पुटपुटली.

प्रसादची मिस्किल, हंसरी चर्या व निमीची हंसरी, लाजरी चर्या डोळे भरून पहात होत्या इंदूताई. असं आहे तर एकूण ? पण—इतिहासाची पुनरावृत्ति तर नाहीं ना होणार ?— ह्या लग्नाला श्रीकांत अडथळा नाहीं आणणार, पोळलेला जीव आहे त्याचा ! पण त्याची पत्नी—तिला रुचेल ही सोयरीक ?—

काय हें वेड्यासारखं ? पोरांच्या परस्पर चेष्टा, मस्करीवरुन आपण सोयरिकीपर्यंत पोंचलों !

मोटर भुर्रकन् ' छायाप्रकाश ' बंगल्याशीं जाऊन पोंचली. बंगल्याचें नांव इंदूताईंना फार आवडलें. कुणी योजलं असेल हें ! श्रीकांतानं ?— त्यांनीं पटकन् आपल्या मनाला चापलें.

शुभा जरा दूर आहे असे दिसतांच इंदूताई हळूंच निमीला म्हणाल्या, ' शुभाची आई कशी बाहेर आली नाहीं ग ? '

' आई नाहीं तिला, मावशी ! फक्त वडील आहेत ! शुभा वर्षाची असतांना वारली तिची आई. ' निमी हळूंच उत्तरली.

अरेरे ! ह्या सुंदर बंगल्याला मालकीण नाहीं ? ह्या पोरींना आई नाहीं ! पण वडील तरी आहेत. आपल्या निमीला कोण आहे !—तिला—तिला— मनासारखा नवरा मिळायलाच हवा !

हं ऽ ! —इंदूताईंना स्वतःचीच मौज वाटली. एखाद्या जुन्या बाईप्रमाणें लग्न जमविण्याचा हा नाद कसा जडला आज आपल्याला ?

—आणि मग त्या भावंडांनीं श्रीकांताशीं त्यांची ओळख करून देतांच श्रीकांताचा उडालेला गोंधळ पाहून त्यांना आणखीच मौज वाटली.

' तूं—तुम्हीं—निर्मलेच्या मावशी ? ' श्रीकांतानें नवलानें प्रश्न केला.

' हो. ' इंदूताई उत्तरल्या.

' इंदू—अं—माझी ओळख आहे ना तु—तु— तुम्हांला ? ' श्रीकांत चांचरत म्हणाला.

' बाबा, ' शुभानें हंसून म्हटलें, ' तुम्हीं मावशींना पूर्वीं अग ना म्हणत होता ? मग आतां ' अहो 'चा औपचारिकपणा कशाला ? '

' वयपरत्वें असा फरक होतो ग पोरी ! बाळ-पणींची ती अनिर्बंध, निर्व्याज वृत्ति पुढं कशी टिकणार ? ' श्रीकांत बोलला.

पण नंतर ' अहो ' चा औपचारिकपणा कायम राहूनहि श्रीकांत व इंदूताई मनमोकळ्या गप्पा मारूं लागलीं.

आठवडा कसा भुर्रकन् संपला ! बंड गार्डन, एम्प्रेस गार्डन, पर्वती, चतुःश्रृंगी वगैरे परिचित स्थळें पाहून झालीं. सिनेमा, नाटकांची वर्णी लागली. मावशी, भाची कोल्हापूराला जाण्याचा दिवस उद्यांवर येऊन ठेपला.

आणि श्रीकांतानें आज बनेश्वरला वन-भोजनाला जाण्याचा कार्यक्रम योजला.

बनेश्वर ! — चोवीस वर्षांपूर्वीं श्रीकांत व इंदू इथेंच वनभोजनाला आलीं होतीं. बरोबर चार, सहा मित्रमैत्रिणी होत्या. पण श्रीकांताच्या वडिलांना तें रुचलें नव्हतें. आणि संध्याकाळीं हीं दोघें आनंदांत घरीं परततांच त्यांनीं दोघां-नाहि फैलावर घेतलें होतें. आणि— आणि— सारें संपलें होतें !—

अन् श्रीकांतानें आज तिथेंच जाण्याचा घाट घातला होता. कां बरं ! — जुन्या दुःखद स्मृती इंदूताईंना टोचूं लागल्या. नेमकं हेंच स्थान कशाला निवडलें श्रीकांतानें ? —

बनेश्वरला पोंचल्यावर इंदूताईंना ह्या प्रश्नाचें उत्तर मिळालें. निमी, शुभा आणि प्रसाद तिथल्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्यांत रमलीं होतीं. इंदूताई व श्रीकांत झाडाखालीं बसलीं होतीं.

" इंदू, " गेला आठवडाभर कटाक्षानें टाळलेल्या एकवचनाचा अवलंब करीत श्रीकांत म्हणाला, " चोवीस वर्षांपूर्वीं आपण इथं आलों होतों. मधला ताटातुटीचा काळ पुसून टाकून आपण परत तिथून जोडून घेऊं नाहीं का शकणार ? बोल ना इंदू. "

" हं ! केवढा अवघड प्रश्न विचारलात हा श्रीकांत ? अवघड आणि अनावश्यक ! " इंदूताई बोलल्या.

" अनावश्यक ? — म्हणजे ? "

" श्रीकांत, आतां तरुण आहोंत का आपण ? माझीहि चाळिशी उलटलीयू ! आपल्या जीवनाची संध्याकाळ चालू आहे आतां जीवनाची आणि प्रीतीचीहि संध्याकाळ ! "

" प्रीतीची संध्याकाळ " ? श्रीकांतानें मघां-प्रमाणेंच त्यांच्या शब्दांचा पुनरुच्चार करीत म्हटलें.

" होय, आणि अशा संध्याकाळीं प्रीतीमध्य सकाळचा उन्मादहि नसतो अन् दोन प्रहरींचा आवेगहि नसतो ! जाणूनबुजून प्रीतींची संध्याकाळ ! तिच्यांत सारं कसं शांत, निवांत असतं ! श्रीकांत, खरं सांगा. तुम्हांला पूर्वी माझ्याबद्दल जी अवखळ प्रीत वाटत होती ती आतां वाटते काय ? "

" अं — नाहीं. पण — "

" तेंच म्हणतेयू मी " मृदु स्मित करीत इंदूताई बोलल्या, " आतां आपल्याला एक-मेकांबद्दल निव्वळ स्निग्ध आपुलकी वाटते, स्नेहभाव वाटतो ! आपल्या गोड अपत्यांभोंवतीं घुटमळणारं तुमचं मन आतां तृप्त, शांत आहे ! माझ्या निमूभोंवतीं घिरट्या घालणारं माझं मनहि तसंच शांत, तृप्त आहे ! मग उगीच गाढ झोंपी गेलेलीं गतकाळाच्या स्मृतीची भुतं कां जागवायचीं ? — थांबा — माझं बोलणं पुरतं ऐकून घ्या. माझ्या बाबतींत झालेला अन्याय दूर करण्याची ओढ वाटतेयू तुम्हांला. होय ना ? "

" होय ग ! आमच्या नानांपुढं त्यावेळीं माझा निरुपाय झाला ! "

" तें ठाऊक आहे मला ! पण त्या अन्यायाचं परिमार्जन करण्याचा हा मार्ग नव्हें ! आपला भारत देश आहे हा ! इंग्लंड, अमेरिका नव्हें ! सून, जांवई आणण्याच्या वयांत तुम्हीं स्वतः लग्न करून घेणं शोभणार नाहीं. तुमच्या मुलांनासुद्धां तें कसं तरीच वाटेल ! अन् मग त्यामुळं तुमच्या नि माझ्या मनाला चोरटेपणा वाटेल ! त्यांत काय बरं अर्थ ? "

" इंदू, किती योग्य विवेचन केलंस तूं ! तुझा शब्दन् शब्द पटतोय मला ! जुन्या आठ-वणीं आल्यावेळीं एकेकदां मनाला रुखरुख लागते ग. ती कशी दूर व्हायची ? "

" सांगते मीं त्यावर उपाय —" मंद स्मित करीत इंदूताईंनीं म्हटलें, " जुन्या जखमे-वर नवी मलमपट्टी करणं अव्यवहार्यच ठरणार ! तेव्हां मी म्हणते, आपण नवे ऋणानुबंध जोडूं या आतां. प्रसाद थेट तुमची प्रतिमा आहे ! आणि निमी माझी भाची असली तरी गेलीं सहा वर्षे पोटच्या पोरीप्रमाणें वाढवलंयू मीं तिला. तुम्हीं तिला सून करून घ्या. शुभाच्या मध्यस्थीनें निमी व प्रसाद ह्या उभयतांमध्यें प्रीतीचं रोपटं रुजूं लागलंयू हें हेरलंयू मीं. त्यांच्या लग्नाला तुम्हीं मान्यता द्या म्हणजे मला सगळं भरून पावेल ! "

" मोठ्या आनंदानं मीं तुझ्या निमीला सून

करून घेईन ग ! पण तूं जन्मभर एकटीच राहणार ? ''

" तें को ? भाचीबरोबर झक्क भाचेजांवई मिळणार मला ! तीं दोघं सणावारी माझ्याकडं येतील, निमी माहेरपणाला येईल. बस्स ! उरल्या वेळांत माझी शाळेंतली नोकरी आहे, बागबगीचा आहे. शेजारपाजारचीं मुलंबाळं आहेत ! आपलं मन तेवढं व्यापक, विशाल केलं कीं सगळं आपलंच वाटतं ! मग एकटेपणा कुठला उरणार ? '

' इंदू–अंहं–इंदूताई, आज तुम्हीं मला गुरुस्थानीं झालांत ! आपल्या मुलांच्या सुखांत आपलं सुख पहाण्याचा मोठा उपयुक्त मंत्र आज तुम्हीं मला दिलात ! –प्रीतीची संध्याकाळ ! खरंय ! पूर्वीचा तो उन्माद आतां पार ओसरलाय् ! धमन्यांतून वाहाणारं गरम रक्त जणूं साफ थंडावलय् ! तुमच्याबद्दल मला पूर्वीसारखींच आपुलकी वाटतेय् पण त्यांत कांहीं–तरी वेगळेपणा आहे खास ! आतां माझं मन तुमच्या 'मैत्रीवर संतुष्ट रहायला तयार आहे ! दुसरं, तिसरं नातं न जोडतांहि आपल्या स्नेहामध्यें समाधान मानूं शकेन मीं ! '

' तें कां ' इंदूताई खुदकन् हंसून म्हणाल्या ' दिलेला शब्द एवढ्यांतच विसरलांत ? आपण आतां व्याहीविहिणी होणार आहोंत म्हटलं ! सोयऱ्याचं नातं जोडायचंय् आपण ! मात्र व्याहीबुवा, फार जबर हुंडा नका हो मागूं. दोनशें रुपये कमावणारी मास्तरीण आहे मीं.– '

' अहो विहीणबाई, ' –मिस्किलपणा उसळून आला श्रीकांताचा–तो हंसत बोलला, ' भिऊं नका. तुमची भाची म्हणजे बिनमोल हुंडा आहे. सबब मला हुंडा एक पैहि नको ! '

आणि तीं दोघे खो, खो हंसत सुटलीं. जणूं दोघेंहि फिरून अनिर्बंध, निर्व्याज बाल्यांत शिरलीं होतीं !

---

Statement about ownership and other particulars about newspaper **'ABHIVYAKTI'** as required under Rule 8 of the Registration of Newspapers (Central) Rules, 1956.

## FORM No. IV (RULE No. 8)

| | | |
|---|---|---|
| 1 | Place of Publication ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 2 | Periodicity of its Publication ... ... ... | Yearly-Published in Diwali |
| 3 | Printer's Name ... ... ... | **Yashwant Hari Padhye** |
| | Nationality ... ... ... | Indian |
| | Address ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 4 | Publisher's Name ... ... ... | **Yashwant Hari Padhye** |
| | Nationality ... ... ... | Indian |
| | Address ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No.8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 5 | Editor's Name ... ... ... | **Yashwant Hari Padhye** |
| | Nationality ... ... ... | Indian |
| | Address ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 6 | Names and addresses of Individuals who own the newspaper and partners or share-holders holding more than one per cent. of the total capital. ... ... ... | **Yashwant Hari Padhye**<br>Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |

I, **Yashwant Hari Padhye**, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date—10th October 1960.

**Y. H. Padhye.**
Signature of Publisher.

६१ २०।१०।६०

# गंधमादन

**लेखक :- पु. रा. लेले**

मराठी रंगभूमीच्या इतिहासलेखनाच्या बाबतींत वऱ्हाडांतील दोघे प्राध्यापक बनहट्टी व गोमकाळे यांनीं जितकें सहानुभूति-शून्यतेचें आणि अहंमन्यतेचें प्रदर्शन केलें आहे तितकें दुसऱ्या कोणत्याहि क्षेत्रांत कोणत्याहि जोडीनें केलें असेल असें मला वाटत नाहीं. यांना न्यायाधिशाच्या जागेवर कोणी बसवलें कोण जाणे ! आणि दोघेहि विद्वतेचें अवडंबर इतकें बेमालूमपणें करतात कीं पूर्वींची माहिति असणारी माणसें आतां नाहींशी झालीं आहेत याचा त्यांना भरपूर फायदा मिळतो. बरेचसे अभिप्रायलेखक त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव करतात याला कारण न्यायाधिशीचा आव हें होय.

नाटकाच्या धंद्याच्या बाबतींत आणि नाटकाचा धंदा करणारांच्या बाबतींत यांचें किती गाढ अज्ञान आहे याची जाणीव असावयास आतां माणसेंच नाहींत. हा धंदा करणारांनीं जसा कांहीं गुन्हाच केला आहे अशी या जोडीची दृष्टी आहे ! या दोघांना तोडीस तोड व्यक्ति शोधावयास मला इंग्लंडच्या दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दींतील जस्टिस जेफ्रे-पर्यंत जावें लागलें.

इतर सर्व क्षेत्रांत सेल्समनशिपचें कौतुक केलें जातें, पण नाटकाच्या धंद्यांत मात्र हीच सेल्समन-शिप दाखविली असतां त्याला ' बाजारू ' हें शिवीवजा विशेषण लावावयाचें हा या दोघांचा विक्रम आहे.

निःपक्षपातीपणाचा आव आणणारी वाक्यें मधूनमधून पेरण्यांत यांचा हातखंडा आहे. आकस कोणाच्या मनांत होता याची पुरावा न जमा करतां खात्री देतांना यांना कांहींच वाटत नाहीं.

खाडिलकरांनीं नाटकाच्या क्षेत्रांत अभूतपूर्व यश मिळवलें. आणि त्यांची नाटकें महाराष्ट्र मंडळीनें जशीं हवीं तशीं करून दाखवलीं. जणूं काय हा महाराष्ट्र मंडळीचा गुन्हाच झाला ! महाराष्ट्र मंडळींनें कांहीं झालेंतरी आम्हीं अखंडपणें याच व्यक्ति एकत्र राहूं असें घोषित केलें नव्हते.

अपेशाला डरत नाहीं, पण आमचें ध्येय आम्हीं खालीं उतरवणार नाहीं एवढेंच त्यांचें ब्रीदवाक्य होतें. ती मंडळी स्थापन करणारी मंडळी म्हणजे कांहीं हिंदु नवराबायको नव्हते. कांहीं कारणानें जर आद्य संस्थापकांचे वैयक्तिक मतभेद झाले तर त्यांनीं विभक्त होण्यांत काय चुकलें ? कीं त्यांनीं अशा ध्येयानें कंपनी काढली हीच त्यांचीं चूक झाली ? त्यांनीं अनेक वर्षें केलेली उत्तम कामगिरी पाहून तिचें कायम कौतुक करावयाचें कीं नंतर त्या मंडळींचें जमलें नाहीं एवढीच एक घटना लक्षांत घ्यावयाची ? असलें दुष्ट प्रतिपादन करणें म्हणजें मोराचा अहंपणा आणि कावळ्याची दोषैकदृष्टि यांचा संगम या प्राध्यापकद्वयाच्या मनोरचनेंत आहे असें सिद्ध करणें आहे.

महाराष्ट्र मंडळीच्या आद्य संस्थापकांपैकीं कै. गोविंदराव टिपणीस आणि मामा सुळे कंपनीं लवकर सोडून गेले म्हणून तें दोषाला धनी नाहींत, आणि सुरुवातीपासून सर्व प्रकारची खस्त खाणाऱ्या एक मालकानें आठ वर्षें राहून कंपनी राजीनामा देऊन सुतळीचा तोडा सुद्धां न मागतां आणि कंपनी चांगली चालूं द्या अशी इच्छा प्रदर्शित करून सोडली तर तो मात्र गुन्हेगार होतो अशी या द्वयाची विचारसरणी आहे !

उपरिनिर्दिष्ट दोघांपैकीं कै. गोविंद गोपाळ टिपणीस हे ज्ञान-प्रकाशकाचें संपादक होते. यांनाच पुढें रँग्लर परांजप्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठीचे पहिले लेक्चरर नेमले. नाटका-वरील निस्सीम निष्ठेपायीं त्यांनीं ज्ञान प्रकाशचें संपादकपद सोडलें. आत्महत्येपेक्षां कठीण असा हा स्वार्थत्याग आहे. कांचनगडच्या मोहनेत ते सुरुवाती पासून पिलाजीरावाची भूमिका करीत. शिवाय फाल्गुनराव, त्राटिका नाटकांत प्रतापराव, दुर्गा नाटकांत काळ्या, तारा नाटकांत खंडोजी या भूमिका त्यांनीं केल्या. अशा या निष्ठावंत माणसाला कंपनींत प्रवेश केल्याबरोबर भागवतांनीं शह द्यावयास सुरुवात केली. ते पिलाजीरावाच्या भूमिकेसाठीं अडून बसले आणि कंपनी सोडून जाण्याची जवळ जवळ धमकी द्यावयास भागवतांनीं सुरुवात केली. गुणग्राहक होते म्हणूनच दीड-दोन वर्षांच्या आंत गोविंदरावांनी कंपनींतून अंग काढून घेतलें. यांत अधिक दोषास्पद कोण हें ठरवणें कठीण नाहीं. पण या दोन वऱ्हाडी प्राध्यापकांना भागवताचें सर्व कांहीं चांगलें दिसतें आणि इतरांनीं आत्महत्या केल्या नाहींत म्हणून त्यांची निष्ठाच दिसत नाहीं. आणि हें सगळ कां ? तर महाराष्ट्र मंडळी उच्च ध्येयानें प्रेरित झाली होती म्हणून ! चांगलें काम कांहीं दिवस केलें आणि मग सोडलें तर पूर्वींचें चांगलें काम सुद्धां या जोडगोळीला पाप दिसतें ! काय शिक्षणाचें पावित्र्य !!

' मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय ' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे तें बनहट्टी या एकाच प्राध्यापकाच्या नांवानें प्रसिद्ध झालें आहे. पण त्यांतील कित्येक वाक्यें अशीं आहेत कीं परमेश्वरानें आपणाला इतरांना दोषी ठरवण्याकरतां जन्माला घातलें आहे अशा वृत्तीच्या माणसाकडून ती लिहिलीं जाऊं शकतील. ' च ' या शुद्ध शब्दयोगी अव्ययाचा भरमसाट उपयोग अशा वृत्तीचाच मनुष्य करूं शकतो. त्याचें नांव बनहट्टी महाशयानीं अर्पणपत्रिकेंत दिलें आहे. तें नांव ' गोमकाळे. '

यांचा पक्षपात दोनहि प्रकारचा आहे. इचलकरंजीकर कंपनीची अवास्तव तरफदारी करून हा दाखवला आहे आणि कै. आप्पा टिपणिसांसारख्याची बदनामी करूनहि दाखविला आहे. बदनामी वा स्तुति करतांना यांची भिस्त सर्वसाधारण लोकांच्या अज्ञानावर किंवा औदासीन्यावर वा दोहोंवर आहे. एक दाखला देतां.

उपरिनिर्दिष्ट पुस्तकाच्या प. १४७ वर त्यांनीं

'आपल्या अभिनयनैपुण्यानें खाडिलकरांचीं गद्य नाटकें महाराष्ट्रभर गाजविलीं' त्यांच्या यादींत 'वामनराव पोतनीस' यांचें नांव घातलेलें आहे.

ज्या पहिल्या पांच गद्य नाटकांनीं खाडिलकरांची थोरवी जनतेच्या निदर्शनास आणली तीं नाटकें अनुक्रमें १) कांचनगडची मोहना २) सवाई माधवराव यांचा मृत्यु ३) कीचक वध ४) बायकांचें बंड ५) भाऊबंदकी. या पांचापैकीं पहिलीं चार नाटकें रंगभूमीवर आलीं त्यावेळीं पोतनीस नाटककंपनींत दाखलसुद्धां झालेला नव्हता. आणि पांचव्या म्हणजे भाऊबंदकी नाटकांत भांडखोर भटणींपैकीं एकीची भूमिका त्याच्याकडे होती. नंतर खाडिलकरांचीं जीं दोन गद्य नाटकें रंगभूमीवर आलीं त्यांपैकीं 'सत्त्व-परीक्षा' नाटकांत पोतनीसाचें काम नव्हतें. 'सवती-मत्सर' मध्यें पोतनीसाला मंथरेचे काम मिळालें. खाडिलकरांच्या यशोमंदिरांत पोतनीसाचें स्थान कोणतें हें बनहट्टींना माहीत तरी आहे का ?

आप्पा टिपणीसांवरचा बनहट्टींचा हल्ला तर दुष्टपणाचा नमुना आहे. या टिपणीसांची नाट्य-सेवा बनहट्टींच्या खिजगणतींतच नाहीं. कशाला असणार ? यांना आपली न्याया-धिशी गाजवावयाची आहे ना ?

नाटक कंपन्यांच्या फुटीरपणाचा गाजावाजा हे दोघेजण अशा थाटांत करीत आहेत कीं जणूं इतर धंद्यांत फुटीरपणा नाहींच ! नाटकाचा व्यवसाय करणारांवर स्वार्थ आणि अहंकार यांचा आरोप करणारे हे दोघे इतर धंद्यातील याच गुणांचा परामर्श घेऊं शकत नाहींत. समाज जसजसा ज्यास्त सुशिक्षित होत गेला, नाटकाच्या करमणुकीकडे जसजसा ज्यास्त लोकसमुदाय आकर्षिला जाऊं लागला, बाजारपेठा वाढूं लागल्या, कच्चीं वा पक्कीं थिएटरें वाढूं लागलीं, त्या प्रमाणांत कंपन्यांची वाढ होणें ही साधी व सरळ उत्क्रांति होती. या उत्क्रांतीचें विकृत चित्र फक्त काळ्याकुट्ट हृदया-च्या माणसांना दिसूं शकेल.

एका कापडाच्या दुकानांचीं दोन दुकानें, एका शाळेच्या दोन शाळा, एका सॉलिसिटरच्या फर्मच्या दोन फर्म्स, पुस्तकाच्या एका दुकानाचीं दोन दुकानें, पुस्तकप्रकाशनाच्या एका कंपनीच्या किंवा भागीदारीच्या दोन कंपन्या किंवा भागीदाऱ्या होतात. त्यांत या जोडीला वावगें दिसत नाहीं–

## यक्षिणीची कांडी

**एक अतिशय गरीब अगदीं थोड्या दिवसांत श्रीमंत झाला त्याच्या मित्रानें याचें रहस्य विचारलें असतां तो म्हणाला-- "माझ्या गुरूंनी मला एक वस्तू प्रसाद म्हणून दिली आहे. तिचा हा प्रभाव आहे."**

**"कोणती वस्तू दिली ?" मित्रानें उत्कंठतेनें विचारलें.**

**तेव्हां डोक्याला हात लावीत तो श्रीमंत मनुष्य म्हणाला— "ही डोक्यावरची पांढरी टोपी. तिचाच हा प्रभाव आहे !"**

मात्र एका ध्येयवादी कंपनींतून एका मालकानें राजीनामा दिला तर लगेच नाट्यकलेला बिलकूल न बुजणारी जखम होते !

नाटक कंपन्यांत माणसें शिरलीं म्हणजे त्यांच्यावर व्यक्तिजीवन निरामय करण्याची जबाबदारी पडते हें कोणी सांगितलें ? नाट्य-व्यावसायिकांवर अशी जबाबदारी टाकलेली सुशिक्षित समाज ऐकतो याचा अर्थ इतकाच कीं आपल्या समाजांत स्वार्थत्यागाचे आणि पुण्याचें धडे दिलेले आवडतात-मात्र त्याप्रमाणें वागण्याची आपणावर जबाबदारी पडतां कामा नये !

बनहट्टींनीं 'तुझें आहे तुजपाशीं' हें नाटक पाहिलें आहे कीं नाहीं कोण जाणें ! नाटक कंपनींतील माणसें म्हणजे सरळच चालणारे हत्ती किंवा वांकडेच चालणारे उंट आहेत कीं काय ? आणि त्यांच्यातील प्रमुख नट म्हणजे त्यांच नाटकांतला आचार्य असें बनहट्टी मानतात कीं काय ?

'फाटाफूट' प्रकरणीं कै. चिं. ग. कोल्हटक-रांनीं आपल्या 'बहुरूपी' पुस्तकांत जें लिहून ठेवलें आहे तें या ठिकाणीं मी उद्धृत करतों.

"ज्या व्यवसायांत मी चाळीस वर्षे घालविलीं, त्या व्यवसायांतील अशा महत्त्वाच्या घटनेसंबंधीं मी आपले विचार प्रकट न करणें गैर होईल. या घटना घडून गेल्यानंतर थंड डोक्यानें कार्य करण्याचे विचार करतांना हें सुचलें असलें तरी ती क्रिया घडत असता अभावितपणें योग्य तेंच घडलें असें मला म्हणावयाचें आहे. किर्लोस्कर मंडळींतून फुटून गंधर्व व बलवंत मंडळी, महाराष्ट्र मंडळींतून फुटून निघालेली 'श्री भारत' व त्यांतून फुटून निघालेली 'गणेश नाटक मंडळी,' 'स्वदेश हितचिंतक' मधून फुटून निघालेली 'ललितकला-दर्श नाटक मंडळी' (ही घटना महाराष्ट्र मंडळीच्या फाटाफूटीपूर्वीचीं आहे.) नाट्यकला प्रवर्तक मधून नाट्यकला प्रसारक व सवाई गंधर्वाची कंपनी, राजापूरकर मधून निघालेली दक्षिणी सुबोध नाटक मंडळी, सामाजिक नाटक मंडळींतून चित्ताकर्षक, व चित्ताकर्षक मधून उत्पन्न झालेली लोकमान्य नाटक मंडळी, अशी अनेक नांवें सांगतां येतील. मूळ प्रमुख सहा नाटक मंडळ्यां-तून फुटून निघालेल्या निरनिराळ्या नऊ नाटक मंडळ्यांचीं नांवें वर दिलीं आहेत. मूळ, सहाहि नाटक मंडळ्या चालू असतांच त्यांतून फुटून निघालेल्या नऊ नाटक मंडळ्यांचे संसार थाटले गेले होते. या प्रत्येक कंपनींत कमी अधिक गुणांचीं पांच सात तरी माणसें असत. मूळ चालू असलेल्या सहा नाटक मंडळ्यांत त्यांचीं माणसें धरून त्यांशिवाय या नवीन उदयाला आलेल्या पन्नास कलावंतांची सोय होऊं शकली असती का ? अशा प्रकारच्या मर्यादित व्यवस्थेनें होतकरू माणसाची कुचंबणा झाली नसती का ? त्या सहाच मंडळ्या अस्तित्वांत असत्या तर कितीशा नाटककारांची सोय तेथें लागूं शकली असती ? या फाटाफुटीमुळें -या घटनेमुळेंच नव्या नव्या नाटककारांना वाव मिळाला व नाट्यवाङ्मय समृद्ध झालें ! ही इष्टापत्ति ओढवली नसती तर कित्येक नाटक-कारांचा व नटांचा गर्भांतल्या गर्भांतच अंत होऊन जगाला त्यांचा मागमूसहि लागला नसता."

हा उतारा लांबलचक आहे. पण हें सोनाराचें कान टोचणें आहे आणि म्हणून एवढा उतारा मुद्दाम दिला आहे.

आतां आप्पा टिपणीसांबद्दल 'बहुरूपी'मध्यें काय लिहिलें आहे तें पहा; म्हणजे बनहट्टींनीं केलेला आरोप किती निराधार आहे हें समजेल चिं. ग. को. लिहितात :

'महाराष्ट्र नाटक मंडळींत असतां स्वतांच्या नव्या नाटक मंडळीची मुहूर्तमेढ रोवण्याचा आप्पांचा मानस होता असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्र मंडळी त्यांनीं सोडण्याचें ठरविल्यावर त्यांच्याबद्दलची निष्ठा किंवा सहानुभूति व्यक्त करणारी **बरीच मंडळी त्यांची सहकारी होती.** त्यांनींहि महाराष्ट्र मंडळी सोडून आपल्या बरोबर यावें अशी पण **आप्पाची अपेक्षा नव्हती, प्रयत्नहि नव्हता...** त्यांनीं प्रथम पुण्यास जाऊन स्थायिक होण्याचें ठरविलें होतें.'

"अण्णा कारखानिसांचें नेतृत्व मान्य नसणारा एक गट होता. दहा बारा मंडळींनीं एकदम महाराष्ट्र मंडळीला रामराम ठोकण्याचें ठरविलें."

**"आप्पांना आपल्या नव्या पत्नीसह छोटासा संसार मांडण्याची कल्पना सोडून, नाटक कंपनीचा मोठा संसार मांडावयाची तयारी करावी लागली. नव्या मंडळीची प्राणप्रतिष्ठा करावयाचा बेत आप्पांना महाराष्ट्र मंडळी सोडून आलेल्या सहकाऱ्यांमुळें निश्चित करावा लागला."**

बनहट्टींनीं पुढील वाक्यांत आपला आरोप केला आहेः

"कंपनी सुरु होऊन आठ वर्षे झालीं नाहींत तोच कंपनींत कलह सुरू होऊन यशवंतराव टिपणीसांच्या नेतृत्वाखालीं एक मोठा जथा फुटून बाहेर पडला (१९१२) आणि त्यानें 'भारत' नाटक मंडळी काढली."

आप्पांपुरता हा आरोप किती खोटा व निराधार आहे हे 'बहुरुपी' मधील उताऱ्यांवरून वाचकांच्या सहज लक्षांत येण्याजोगें आहे. आप्पांवर दुसरा एक बनहट्टींच्या काकवृत्तीवर प्रकाश टाकणारा आरोप पुढील शब्दांत केलेला आहेः

"नाटककार बनलेल्या नटाची आपली नाटकें कंपनीनें बसवायला घ्यावीत ही इच्छा पुरी न झाल्यामुळें त्यानें कंपनी सोडली अशा हकीकती घडल्या आहेत."

आप्पांच्या पुरता हा आरोप साफ खोटा आहे हें मी सिद्ध करून द्यावयास तयार आहे. हें माझें **आव्हान** बनहट्टींना आहे. पुण्यांतल्या यशस्वी दुकानदारांपैकीं तीन दुकानदार यशवंत कवींनीं निवडावें आणि त्यांना पंच नेमावें. बनहट्टींनीं त्यांचेंपुढें यावें आणि जबानी द्यावी. त्यांची उलट तपासणी मी करीन. नंतर मी जबानी देईन आणि माझी उलट तपासणी त्यांनीं आणि गोमकाळ्यांनीं करावी. एका बैठकींत निकाल!

आतां मी कोण आहे म्हणून बनहट्टींनीं माझें आव्हान स्वीकारावें असें वाचक विचारतील. त्यांच्या माहिती करतीं प्रा. बनहट्टींचीं दोन पत्रेंच मी उद्धृत करतों.

**पहिलें पत्र**

काँग्रेसनगर, नागपूर

२८/३१-जुलै १९४३

श्री. पु. रा. लेले,

स. न. वि. वि. आपलें नांव समितीनें रंगभूमीच्या इतिहासाच्या ४ थ्या (१९०१ ते १९१९) विभागासाठीं नियोजित केलें आहे. तरी आपण हें लेखनाचें काम पत्करीत असल्याबद्दल त्वरित लिहून कळविण्याची कृपा करावी. ठरावानुसार आपला लेख १० सप्टेंबर १९४३ पर्यंत मजकडे यावयास पाहिजे. नोव्हेंबरमध्यें ग्रंथ प्रकाशित होणार तेव्हां लेखकांस अधिक अवकाश देतां येण्याजोगा नाहीं हें आपल्या लक्षांत येईलच. ठरावानुसार आपणांकडून १० दिवसांच्या आंत उत्तर येणें अवश्य आहे. हें आपल्या नजरेस आणूं इच्छितों.

आपला

**श्री. ना. बनहट्टी**

अध्यक्ष, वाङ्मयकार्य समिति.

**दुसरें पत्र**

ता. ५ ऑगष्ट १९४३

श्री. पु. रा. लेले,

स. न. वि. वि. आपले ता. ३ चें पत्र आतांच पोंचलें. वस्तुतः रंगभूमीच्या इतिहासग्रंथाची योजना व आराखडा मेच्या प्रारंभींच ठरून आपलें नांवहि लेखक म्हणून नियुक्त झालें होतें. प्रस्तुतचा विषय आपला किती आवडता आहे व त्यासंबंधींचें आपलें अवलोकन किती मार्मिक आहे हें आमच्या वाङ्मय-कार्य-समितीचे सर्व सभासद उत्तम रीतीनें जाणतात. आपलें सहकार्य न लाभणें ही मोठीच आपत्ति मला व इतरांस वाटेल. आपला होकार उलट टपालीं येईल असा विश्वास बाळगतों. कळावें हे विनंति.

आपला

**श्री. ना. बनहट्टी**

माझ्या अधिकाराबद्दल बाहेरचा पुरावा देण्याचें मला कारणच नाहीं.

आप्पांनीं महाराष्ट्र नाटक मंडळी सोडली त्यावेळचा कांहीं इतिहास 'तपस्वी गडकरी' या लेखांत आलेला आहे. हा माझा लेख सन १९४४ सालच्या फेब्रुआरी महिन्यांत 'समीक्षक' मासिकाच्या खास गडकरी अंकांत प्रसिद्ध झाला होता आणि संपादक म्हणजे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या खास विनंतीवरून मी तो लिहिला होता. आज त्या प्रकाशनाला १६ वर्षे झालीं आहेत.

यशवंतराव उर्फ आप्पा टिपणीस हे महाराष्ट्र मंडळीच्या बीजारोपणापासून प्रमुख होते. किंबहुना ते नसते तर महाराष्ट्र मंडळीचें बीजारोपण सुद्धां झालें नसतें. गर्भावस्था संपण्याच्या सुमारास अण्णा कारखानीस या कंपनींत आले. त्यांची फारशी उत्सुकता नव्हती पण त्यांचें महाडमधील स्थान असें होतें कीं त्यांचें कंपनींत येणें अवश्य होतें. अनेक मंडळींच्या आग्रहावरून – त्यांतल्या त्यांत प्रा. भानूंच्या आग्रहावरून – अण्णा कंपनीत आले. आप्पांचें स्थान अवलपासूनचे होतें.

दरम्यानची हकीकत मी देत नाहीं. पण माझा महाराष्ट्र मंडळींत प्रवेश झाला त्यानंतरच्या हकीकती मी देत आहे ऐकीव माहिती देत नाहीं.

१९११ च्या शेवटच्या तीन महिन्यांत आप्पांचा महाराष्ट्र मंडळी सोडण्याचा निश्चय झाला होता हें सर्वांना कळून चुकलें होतें. **आप्पा दुसरी कंपनी काढण्याच्या विचारांत नव्हते** हेंहि सर्वांना माहीत होतें.

१९१२ सालीं 'प्रेमसंन्यास' नाटक रंगभूमीवर आलें. तेथपर्यंत खाडिलकरांच्या शब्दाला मान देऊन आप्पा महाराष्ट्र मंडळींत राहिले होते. मुंबईचा मुक्काम उरकून दोन प्रयोग पुण्यांत करून मंडळी आग्नेय महाराष्ट्रांत गेली. मंडळीचा मुक्काम सोलापूरास गेल्यावर मी तिकडे गेलों. माझा मुक्काम सर्व नटमंडळींच्या बरोबर होता. नवी कंपनी काढण्याचें कारस्थान शिजत असतें तर माझ्या नजरेंतून वा श्रवणांतून तें सुटूं शकलेंच नसतें. उन्हाळा इतका कडक होता कीं सबंध दिवसभर आम्हीं **सगळे** घरांत-

त्याघरांतच वावरत होतों. सोलापूरच्या मुक्कामांत मंडळींतून **राजीनामा देऊन** आप्पा बाहेर पडणार हें जाहीर झालेलें होतें आणि खाडिलकरांनीं ही घटना अपरिहार्य म्हणून मान्य केली होती.

मी मुंबईत एका शाळेंत मास्तर होतों. ती शाळा उन्हाळ्याच्या सुटीनंतर ता. ३ जून रोजीं उघडावयाची होती. ता. २ जूनच्या सायंकाळीं मद्रासमेलनें मी सोलापूर सोडलें. मला पोंचवावयास आप्पा, कोल्हटकर आणि भाई देशमुख हे आले होते. गाडी सुटायच्या पूर्वी आप्पा म्हणाले, "पंधरा दिवसांच्या आंतच आपली भेट गुर्जरांच्या खोलींत होईल." दुसरे दोघे कांहींहि बोलले नाहींत. भाई देशमुख म्हणजे प्रेमसंन्यासांतील पहिली मथुरा. हे लवकरच दिवंगत झाले.

गुर्जर म्हणजे ज्योतिषी गुर्जर [ वि. सी. गुर्जर नव्हे ]. हे सर्व नाटक मंडळ्यांचे ज्योतिषी होते. यांची खोली म्हणजे नाटक कंपन्यांचें क्लिअरींग हाऊस होतें. यांचे बिऱ्हाडचा पत्ता 'मुंबई, मुगभाट, जीवनजी महाराजाची चाळ दुसरा मजला' असा होता.

आप्पांनीं मंडळी सोडली त्यावेळीं त्यांनीं जें पत्र लिहिलें त्यांत त्यांनीं आपला सर्व हक्क सोडून दिला, हिशोब किंवा हिस्सा मागितला नाहीं, कंपनी नीटपणें भविष्यकाली चालो अशी सदिच्छा व्यक्त केली. ते अक्षरशः एकटे आपली स्वतांची चीजवस्तु घेऊन कंपनींतून निघाले आणि पुण्यांत दाखल झाले. त्यांची पत्नी बायकांच्या टेनिंग कॉलेजांत शिकत होती. हें ट्रेनिंग कॉलेज त्याकालीं हुजूरपागेंत होतें.

पुण्यांत आल्यानंतर चार पांच दिवसांच्या आंत त्यांचें एक पत्र गुर्जरांकडे आलें. माझी गुर्जरांकडे रोज खेप असे. त्यांतील मजकूर अगदींच मामुली होता. मुंबईस लवकरच येतो एवढें त्यांत महत्वाचें वाक्य होतें

सोलापूराहून खाडिलकर परत पुण्यास आल्याचें कळल्यावर आप्पा त्यांना मुंजाबाच्या बोळांत भेटावयास गेले. आप्पांच्या मनांत तेढ असती तर ते खाडिलकरांना भेटावयास गेले असते का ?

नंतर आप्पांनीं पुण्यांत शिंप्याचें दुकान काढावयाचें ठरवलें. आप्पा शिंपीकाम फार चांगलें जाणत होते. लष्करांत मेन स्ट्रीटवर एक जागा त्यांनीं जवळ जवळ ठरवली. इतक्यांत त्र्यंबकराव प्रधान आणि पोतनीस यांनीं महाराष्ट्र मंडळी सोडण्याची नोटीस दिली अशी बातमी त्यांचे कानावर आली. त्या बातमीच्या मागोमाग भाई देशमुख स्वतः पुण्यांत आला. तो निरोपच घेऊन आला कीं महाराष्ट्र मंडळीतून बरेच नट बाहेर पडणार आणि पुण्यांत येणार.

ही घटना झाल्यावर आप्पा मुंबईत गुर्जरांच्या खोलीवर आले. आतां काय करावें, हा प्रश्न त्यांनीं 'ज्योतिषी' या नात्यानें गुर्जरांना विचारला. गुर्जरांनीं आप्पांची कुंडली पाहिली आणि सांगितलें कीं 'तुम्ही कंपनी काढणार आणि ती लवकरच काढणार.' गुर्जरांच्या संग्रहीं शंभरावर नटांच्या कुंडल्या होत्या. त्यांनीं लगेच पहिल्या खेळासाठीं मुहूर्त सुद्धां काढून दिला. आप्पा म्हणाले 'नाना, कंपनी कशी काढणार, आणि तीहि इतक्या लवकर ? माझ्या गांठीला पन्नास रुपये नाहींत'. गुर्जर म्हणाले 'मी भविष्य केलें आहे म्हणजे केलें आहे. होणार तें होणार. कामाला लागा म्हणजे झालें.'

या वेळच्या परिस्थितीचें वर्णन 'बहुरुपी' मध्यें पृ. ९९ वर आलें आहे. कोल्हटकर लिहितातः

'प्राण-प्रतिष्ठापनेसाठी ज्या प्राणाची आवश्यकता प्रथम असावी लागते तो प्राण--तो निधि कोठें होता ? अर्थाविना प्राणांचीं पेरणी-जिवाची प्रेरणा कशी होणार ?'

गुर्जरांचें त्यावेळीं फार मोठें माहात्म्य होतें. गुर्जरांनीं दिलेल्या मुहूर्तावर नव्या मंडळीच्या नव्या नाटकाचा पहिला प्रयोग होणार अशी सर्वांची श्रद्धा होती.

विश्राम बसणार नाहीं इतक्या थोड्या भांडवलावर पुण्यांत जमवाजमव झाली आणि ता. ८ सप्टेंबर १९१२ रोजीं 'मत्स्यगंधा' नाटकाचा पहिला प्रयोग झाला. कोंडोपंत छत्र्यांचे हस्ते उद्घाटन झालें आणि मंडळीच्या वतीनें निमंत्रितांचे व आश्रयदात्यांचे आभार मी मानले.

आप्पांच्या नाटक मंडळीचें लोकप्रिय नांव 'भारत नाटक मंडळी' हें असलें तरी कायदेशीर नांव 'श्री भारत नाटक मंडळी' असें होतें. ही 'श्री' गुर्जर ज्योतिष्यांच्या आग्रहास्तव जोडलेली होती. जातां जातां एक गोष्ट नमूद करतों. **माधवराव टिपणीस महाराष्ट्र मंडळींतच होते. भारत मंडळी टिपणीसबंधूंनीं काढली नव्हती.**

भारत मंडळीनें नरसोपंत केळकरांना नाटककार बनविलें. नंतर सौ. गिरजाबाई केळकर, संतुराम सोनाळकर आणि अच्युतराव कोल्हटकर यांनाहि भारत नाटक मंडळीनें म्हणजेच आप्पा टिपणीसांनीं नाटककार बनवलें.

आप्पा टिपणीसांची लायकी समजून न घेतां मराठी रंगभूमीचा इतिहास लिहावयाचा आव आणणाराला काय म्हणावें हेंच ठरवणें कठीण आहे.

'बहुरुपी'च्या पृ. १०१ वर पुढील वाक्य आहे:

"**माझ्या माहितीप्रमाणें रंगभूमीच्या सर्वांगीण तंत्राची आणि मंत्राचीं जाणकारी असणारी माणसें या व्यवसायात आप्पांच्या खेरीज फारच थोडीं असतील.**"

त्याच्याच पृ. ९९ वर पुढील वाक्यें आहेत.

'नव्या नाटक मंडळीसाठीं उभाराव्या लागणाऱ्या सर्व सामुग्रीची सिद्धता होतांना मला प्रत्यक्ष पहातां आली, हा या घटनेचा आणि माझ्या आयुष्यांतील महत्त्वाचा भाग होय. नाटकासाठीं करावे लागणार पडदे, बुइंगा, झालरी, फ्लॅटस, त्यांच्या लांबी रुंदी उंचीच्या

**नाईलाजानें साक्षीदार**

**कोर्टांत मारामारीचा एक खटला चालला होता. साक्षीदार पिंजऱ्यांत उभा होता.**

**न्यायाधीशानें साक्षीदाराला निरनिराळे प्रश्न विचारले. आणि त्यांतच एक महत्त्वाचा प्रश्न विचारला—**

**"दोन्हीं आरोपी एकमेकांवर खुर्च्या फेकीत होते त्यावेळीं तूं काय करीत होतास ?"**

**तेव्हां साक्षीदार म्हणाला—**

**"तिथं तिसरी खुर्ची नसल्यामुळें नाईलाजानें नुसता बघत उभा होतो !"**

मापांच्या कल्पना (देखाव्यांचें सामान थोडक्यांत उठावदार करणें, आकर्षक करणें, हा आप्पांचा हातखंडा होता). तसेंच कपडे वगैरे अगदीं सुतळीच्या तोड्यापासून सर्व सामान कां व कसें करावयाचें, याचें पद्धतशीर प्रात्यक्षिकांसह मला शिक्षण मिळालें... याप्रमाणें नाटक लिहिणें, तें बसवणें, तसेंच सीन, सामान कपडेपट, रंगपट इत्यादि सजावट करणें इत्यादि गोष्टी मी चिकित्सक निष्ठावान् जिज्ञासू विद्यार्थ्याप्रमाणें पहात होतों, समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतों. आप्पाहि सर्व शंकांचें निराकरण करून बारीक सारीक गोष्टी आस्थेवाईकपणें समजावून सांगत होते."

पृ. १०२ "आप्पा स्वतः पेंटिंग करीत नसत, पण दृश्य कसें दिसलें पाहिजे हें ते पेंटरला त्याच्या भाषेंत समजावून देत. **दृश्यांच्या बाबतींत मराठी रंगभूमीवर प्रथम आप्पांनीं सुधारणा घडवून आणली – वास्तवता आणली असें म्हणावें लागेल.** पर्वती, शनवारवाडा, त्यांतील गणेशमहाल, ओंकारेश्वर, अशीं आप्पांच्या कलापूर्णतेचीं साक्ष देणारीं किती तरी दृश्यें महाराष्ट्र मंडळीच्या नाटकांतून प्रेक्षकांनीं पाहिलीं असतील. प्रेमध्वज नाटकासाठीं शामियाना (तंबू) प्रथम आप्पांनीं रंगभूमीवर आणला. किर्लोस्करांच्या मानापमानमधील तंबूची उभारणी आप्पांनींच करून दिली.

'जी गोष्ट दृश्याची तीच गोष्ट पोशाखाचीहि' मात्र आप्पा पूर्वी स्वतः शिंपी काम करीत असत. मराठेशाहीच्या सुरवारी, अंगरखे हे आप्पाः स्वत धंदवाईक शिंप्यालाहि कापून देत. ब्राह्मणी, रजपूती, मराठेशाही, पेशवेशाही असे अंगरख्याचे फरक प्रथम आप्पानीं भाऊबंदकीसाठीं तयार केले. त्याचप्रमाणें मराठेशाहीचे व पेशवाईतील अलंकार ऐतिहासिक वर्णनाप्रमाणें त्यानींच प्रथम तयार करून घेतले. नाना फडणीसाचें पागोटें व शिवाजीचा जिरेटोप हीं आप्पांच्या शोधकबुद्धीनें रंगभूमीला दिलेलीं शिरोभूषणें आहेत.'

पृ. १०३ – "१९०८-९ पर्यंत सर्व महाराष्ट्रिय मंडळ्या तोंडाला लावण्यासाठीं सफेदा, हिंगूळ, पिवडी वगैरे साधेच रंग पाण्यांत कालवून वापरीत. अभ्यासू भागवतांच्या वाचनांत अशा कामीं ग्रीज पेंटस पाश्चात्य लोक उपयोगांत आणतात असें आलें. त्यांनीं आप्पांना तें दाखवलें. प्रथम इंग्लिश कंपनींतून हे रंग विकत आणून कल्पक आप्पानीं आपल्या इकडे तसेच व्हॅसलीनमधील रंग तयार करण्यास सुरुवात केली."

या उताऱ्यांवरून आप्पा म्हणजे यशवंतराव टिपणिसांची लायकी काय होती हें समजून येईल. आप्पांनीं आर्यावर्त नाटक मंडळींच्या रंगभूमीवर 'चंद्रग्रहण' नाटक आणलें त्यावेळची सर्व हकीकत जर बनहट्टींनीं मिळवण्याचा प्रयत्न केला असता तर आप्पा म्हणजे 'विश्वकर्मा' होते हें त्यांना समजलें असतें. 'आर्यावर्त' मंडळीचें आप्पा मालक नव्हते शून्यांतून आप्पांनीं ब्रह्मांड निर्माण केलें होतें. पण हें मी लिहितो आहे तें स्नेहार्द्र बुद्धीच्या माणसाच्या उपयोगाचें आहे.

'चंद्रग्रहण' नाटक पुढें 'नेकजात मराठा' या नांवानें प्रसिद्ध झालें. आज बाजारांत आहे ती 'नेकजात मराठा' या नांवाची सातवी आवृत्ति आहे. एकंदर नऊ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत, हल्लींच्या बहुतेक ऐतिहासिक नाटकें लिहिणारांना 'चंद्रग्रहण' हें स्फूर्तिस्थान होऊन बसलें आहे. लॉर्ड सिडनहॅमनें जो शिवाजी मराठी रंगभूमीवरून हुसकून काढला त्याला आप्पांनीं प्रथम रंगभूमीवर पुनः स्थापन केला.

महाराष्ट्र नाटक मंडळी आप्पांना मोडावयाची असती तर ते कायदेशीर मार्गानें मोडूं शकले असते. आणि 'महाराष्ट्र नाट्य मंडळी' या नांवाचा सुद्धां तें लिलांव करूं शकतें. ज्या मंडळीच्या बीजारोपणापासून आपलें तनमनधन आप्पांनीं वेचलें तिच्याशीं स्पर्धा करण्याकरतां दुसरी कंपनी आप्पांनीं काढली असा आरोप करणारानें अपत्यप्रेमाच्या भावनेचा कायम निरोप घेतला असला पाहिजे.

आप्पा मालक होते, प्रा. भानूंचा त्यांना पाठिंबा होता. मालकांपैकीं फक्त आप्पांशीं गडकऱ्यांचा स्नेह होता. आणि खाडिलकर तर कोणाहि नवोदित लेखकाला आपल्या हाताचा आश्रय द्यावयास तयार होते. आप्पांचें दुसरें नाटक महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगभूमीवर येण्याच्या मार्गांत कोणतेंहि विघ्न आलें नसतें. आप्पाचें 'आशा निराशा' नाटक गंधर्व नाटक मंडळीच्या रंगभूमीवर आणावयास ज्या खाडिलकरांनीं यशस्वी मदत केली, ते काय महाराष्ट्र मंडळीच्या एका मालकाचें नाटक त्या मंडळीच्या रंगभूमीवर येत असतांना उदासीन राहिले असते? इतक्या बेछूटपणें एकादा घाणेरडा आरोप करावयास 'प्राध्यापक' ही उपाधि लावणारे कसे धजतात हेंच मला उमजत नाहीं.

> **क्षण हांसावें**
>
> **असेंच जीवन समर असावें**
> **असें जळावें कणा क्षणानें**
> **शत आर्तींच्या शोकशतानें**
> **असेंच अंतर करपुनि जावें**
> **परंतु केव्हां तूंहि दिसावें**
> **क्षण हांसावें अन् लोपावें**
> **तुझ्या स्मिताच्या अमृतसेकें**
> **क्षणैक इंधन चंदन व्हावें**
>
> **—प्रा. दत्तात्रय जोग**

चि. ग. कोल्हटकरांनीं आप्पांच्या अंतःकरणाबद्दल पृ. १०३ वर लिहिलें आहे तें वाचा :

"आप्पा सरळ मनाचे, उमद्या स्वभावाचे गृहस्थ होते. ते सर्वच मंडळींत मिळून मिसळून वागत. अरेरावी किंवा हुकूमशाही ही त्यांच्या स्वभावांतच नव्हती. एरव्हीं ते खेळीमेळीनें वागत एवढेंच नव्हे, स्टेजवर काम करतांना सुद्धां आप्पांना हा मोह आवरत नसे. मूळचे आप्पा ज्ञातिनिष्ठ नव्हते. संस्थेच्या चालकाला जी व्यावहारिक कुशलता, जें चातुर्य असावें लागतें, त्याचा आप्पांचे ठिकाणीं अभाव होता. त्यांच्या सरळ स्वभावामुळें जगानेंहि तसेंच असावें असें त्यांना वाटे."

मराठी रंगभूमीच्या इतिहाससंबंधीं सर्व सामुग्री अशा माणसांच्या हातांत गेलीं आहे! नरसोपंतांचा आत्मा आतां हळहळत असेल खास!!

मला प्रा. बनहट्टींना एक विनंति करावयाची आहे. यापुढें जेव्हां त्यांचें रंगभूमीसंबंधीं कांहींहि प्रकाशांत यावयाचें असेल त्यावेळीं आद्याक्षरांना फांटा देऊन लेखकाचें नांव 'गोमहट्टी' असें प्रसिद्ध करावें.

बनहट्टी व गोमकाळे या दोघांना मिळून एक विनंति करावयाची आहे. ती अशी कीं त्यांनीं पुराणांतील गंधमादन ऋषीचें आख्यान लक्षपूर्वक व तपशीलवार वाचावें.

*+*

कुटुंब आणि जग ही सामान्य माणसाची दोन विश्वें आहेतच. या बाहेरच्या जगांतील छोट्या मोठ्या घटनांचे पडसाद कुटुंबांत उमटत असतात.

—परवांचा केंद्रीय नोकरांचा सार्वत्रिक संप तुम्हांला आठवत असेल. त्याचे इतिवृत्त वांचून आमचे स्नेही रामभाऊ यांचे 'कुटुंब' बिथरले. त्यांनाहि आपल्या खालावलेल्या जीवनमानाची आठवण झाली व त्यांनी सहपरिवार रामभाऊंविरुद्ध संप पुकारला !

त्या संपाची खट्टी–मिठ्ठी कथा वि. आ. बुवांच्या मिठास लेखणींतून उतरली. आमच्या वाचकांना आम्ही मुद्दाम ती पेश करीत आहोंत. कारण दिवाळीच्या फराळानें 'पोटदुखी' सुरू झाल्यावरचा हा एकच रामबाण उपाय आहे ! ..........

★ वि. आ. बुवा ★

जुलै महिन्यांत केंद्रीय नोकरांचा देशव्यापी संप झाल्यापासून संप अगदीं चुलीपर्यंतहि येऊन पोहोंचला. अशाच एका घरांतील संपाच्या वृत्तपत्रीय ( थाटाच्या ) बातम्या मी सादर करीत आहे.

### सौ. सीताकाकू संपावर जाणार

मुंबई दि. सध्यांचे रहाणीमान लक्षांत घेतां रामभाऊंनीं संसारांत जी काटकसर चालविली आहे तिच्या निषेधार्थ आणि स्वतःच्या मागण्या पदरांत पाडून घेण्यासाठीं सीताकाकूंनीं संपावर जायचें ठरविलें आहे. घरांत काल गुप्त मतदान घेतलें असतां सर्व मुलांनीं संपास अनुकूल मत दिलें. सौ. सीताकाकूंनीं रामभाऊंना चौदा दिवसांची नोटीसहि दिली आहे. संपकाळांत त्या मुलांबाळांसहित माहेरीं रहाणार आहेत असें कळतें.

पी. टी. आय. चा वार्ताहर म्हणतो, 'सौ. सीताकाकू माहेरीं गेल्यास माहेरच्या माणसांना बराच आर्थिक भूर्दंड बसेल त्यासाठीं काय करावें या विवंचनेंत सीताकाकूंचे वृद्ध वडील आणि भाऊ मग्न आहेत. त्याप्रमाणेंच सौ. सीताकाकू जर खरोखरच संपावर जाऊन माहेरीं गेल्या तर काय करावें याचा रामभाऊंहि कसून विचार करीत आहेत.

卐

### दोन मुलें संपास प्रतिकूल

मुंबई दि. ... ... सौ. सीताकाकूंनीं संपाचें मतदान घेतलें असतां सर्व मुलांनीं संपास अनुकूल मत दिलें असें काल प्रसिद्ध झालें होतें. परंतु थोरला मुलगा आणि थोरली मुलगी इंटक-वृत्तीची असल्यामुळें त्यांनीं संपास विरोध केला असें अधिकृतरीत्या कळतें. सौ. सीताबाई आणि मुलें हीं सर्व रामभाऊंचीच असल्यामुळें रामभाऊंना त्यांची काळजी आहे परंतु नेहमींच्या 'द्वैवार्षिक' योजनेच्या काळांत आणखी रहाणीमान वाढविणें रामभाऊंना शक्य नाहीं असें मत या दोघांनीं व्यक्त केलें.

卐

### संपाचे दुष्परिणाम
#### रामभाऊंचें पत्रक

मुंबई दि. ... ... 'सौ. सीताकाकूंनीं अवेळीं आणि अस्थानीं पुकारलेला संप संपूर्णपणें आत्मघातकी तर आहेच परंतु संसाराची विल्हेवाट लावणाराहि आहे ' असें ठाम मत व्यक्त करणारें पत्रक रामभाऊंनीं काढलें आहे. रामभाऊ आपल्या पत्रकांत पुढें म्हणतात,

' ह्या संपामुळें घरांतील स्वास्थ्य बिघडेल. शिवाय पोराबाळांची आबाळ होईल ती निराळीच. संपाचे प्रमुख परिणाम पुढील होण्याची दाट शक्यता–नव्हे खात्री–आहे.

१) स्वयंपाकाची आबाळ होईल.

२) खाण्यापिण्याचे सर्वांचें हाल होतील.

३) पोरांच्या शाळेचा आणि अभ्यासाचा बोऱ्या वाजेल.


४) खाणावळीचा आणि बाहेरच्या खाण्याचा खर्च वाढेल.

५) 'द्वैवार्षिक' योजनेला खीळ बसेल.

६) शेजारी लोक गृहछिद्रावर टपून बसलेलेच आहेत. हल्लीं त्यांनीं चाळींतल्या गॅलरीचा सीमा लढा-चालू ठेवला आहे आणि हळूहळू कोळशाचें पोतें, कचऱ्याची बादली वगैरे पदार्थ आपल्या हद्दींत घुसवून पद्धतशीरपणें गॅलरीवर अतिक्रमण सुरू केलें आहे हें सौ. सीताकाकूंना माहीत आहेच. अशा 'परराष्ट्रीय' आक्रमणाच्या वेळीं सौ. सीताबाईनीं अंतर्गत बेदिली माजवून संप पुकारल्यास आस्ते आस्ते सबंध गॅलरीचा ताबा जाईल आणि कदाचित् बैठकीच्या खोलींतहि शेजारीं आपल्या पथाऱ्या आणून पसरतील. सौभाग्यवतीं संपावर गेल्यावर तर ही शक्यता अधिकच आहे.

७) मुलांच्या शिक्षणाला लागणारा पैसा, मुलींच्या लग्नाला आणि हुंड्याला लागणारा पैसा, संसाराला लागणारा पैसा, संकल्पित आठ 'द्वैवार्षिक योजनां' पैकीं अजून पार पाडायच्या दोन योजना आणि त्या योजनांवर होणारा खर्च इत्यादि प्रचंड खर्चाचें आंकडे पाहिल्यावर सध्यांचे रहाणीचें मान सुधारण्यासाठीं आणि वाटेल त्या भरमसाट मागण्या पदरांत पाडून घेण्यासाठीं पुकारलेला संप बेकायदेशीर आणि बेफायदेशीर ठरेल याची नीट जाणीव सौ. सीताबाईनीं ठेवावी.

८) ऑफिसमधील साहेब, निरनिराळे




# हा संप अटळ आहे

दुकानदार, घरमालक वगैरे अनेक 'परराष्ट्रीय' समस्यांना मलाच तोंड द्यावें लागते. अशा वेळीं अंतर्गत बंडाळींची भर पडूं नये असें माझें ठाम मत आहे.

९) कोणत्याहि परिस्थितींत मिळेल त्या प्रकारचे सहाय्य घेऊन संपाचा बीमोड केला जाईल.

१०) पति आणि पत्नी म्हणजे संसाराच्या गाड्याचीं दोन चाकें, एका चाकानें निखळून बाजूला जायचें ठरविलें तर त्या वेगळ्या चाकालाहि अस्तित्व नाहीं आणि उरलेला गाडाहि चालणार नाहीं. यांत उभयतांचें नुकसान आहे. म्हणून सौ. सीताबाईंनीं ताबडतोब संप मागें घ्यावा आणि चुलीवर डाळीचें आधण ठेवावें असें आमचे त्यांना कळकळीचें सांगणें आहे. या उप्पर सौ. सीताबाईंचा संपाचा आग्रह आणि निग्रह ठामच असेल तर आम्ही हरप्रयत्नानें संप मोडून टाकूं. वेळ आलीच तर स्वयंपाकीणबाई, गडी, मोलकरीण वगैरे लष्कराचें सहाय्य घेऊन संपकाळांतहि संसार व्यवस्थितपणें चालविण्याची कोशीस केली जाईल. जास्तींत जास्त खंबीर धोरण स्वीकारून संप हाणून पाडण्यांत येईल या मुद्याकडे सौ. सीताबाईंचें लक्ष आम्ही वेधूं इच्छितों.

卐

## सौ. सीताकाकूंच्या मागण्या

मुंबई दि....रामभाऊंनीं काढलेल्या पत्रकाचा जळजळीत शब्दांत निषेध व्यक्त करून सौ. सीताकाकूंनीं संपावर जाण्याचेंच निश्चित ठरविलें आहे. या पत्रकाचा सौ. सीताकाकूंच्या निर्णयावर कांहींहि परिणाम झाला नाहीं असें अधिकृत वर्तुळांतून कळतें. उलट त्यांनीं खालील मागण्यांचाच जोरदार पुरस्कार केला आहे.

१) वर्षांतून दहा पातळें घेतलीच पाहिजेत.

२) वर्षाकाठीं किमान दोन दागिने केलेच पाहिजेत.

३) घरांत गोदरेजचें कपाट, रेडिओ आणि विजेचा पंखा ताबडतोब घेतला पाहिजे.

४) प्रत्येक शनिवारीं दुपारीं माहेरीं जायला आणि रविवारीं संबंध दिवस माहेरीं रहायला परवानगी मिळालीच पाहिजे.

५) आठवड्यांतून एकदां तरी सिनेमा पहायला मिळालाच पाहिजे.

६) माहेरच्या माणसांना वाटेल तितके दिवस राहूं दिलें पाहिजे.

७) वर्षांतून किमान दोन महिने माहेरपणाची रजा दिलीच पाहिजे

८) संकल्पित आठ 'द्वैवार्षिक योजना' यापुढें ताबडतोब थांबविण्यांत याव्यात. आजपर्यंतच्या सहा योजनांपैकीं भविष्यकाळाला (म्हणजे म्हातारपणीं) उपयोगी पडतील अशा दोनच योजना यशस्वी झाल्या आहेत हें उघड सत्य आहे. (म्हणजे फक्त दोनच मुलगे झाले आहेत.) बाकीच्या चार योजना भावी आर्थिकदृष्ट्या संपूर्णपणें अयशस्वी झाल्या आहेत. (म्हणजे चार रूप नसलेल्या मुली जन्माला आल्या आहेत) या योजनांना सुरुवातीपासून फार खर्च झाला आहे. बाळंतपणाचें हॉस्पिटल, पोसण्याचा खर्च आणि लग्नाचा हुंडा यांवर किती खर्च होईल याचा अंदाज न करतां या योजना आणखी पुढें चालू ठेवणें आर्थिकदृष्ट्या तोट्याचें आहे याची जाणीव मात्र 'अिकडे' नाहीं. आणि आम्ही दागिनें मागितलें कीं आर्थिक परिस्थिती आणि 'परराष्ट्रीय' संकटाचें तेंच तें तुणतुणें वाजविण्यांत येतें. म्हणून 'अिकड'ची आर्थिक परिस्थिति सुधारून आमच्या मागण्या पुऱ्या करायला अेकच उपाय आहे. तो म्हणजे द्वैवार्षिक योजना ताबडतोब थांबविणें हा होय.

९) टोळभैरव मित्र जमवून नेहमीं चहा, पोहे, शिरा करण्याचें जें जादा काम मला करायला लावतां त्याबद्दल ओव्हर-टाअीम तरी द्यावा किंवा आठवड्यांतून अेक दिवस कॉंपेंसेटरी सुट्टी तरी द्यावी.

१०) माझ्या संकल्पित संपामुळें संसाराची जी तथाकथित किंवा खरोखरची घडी विस्कटेल त्याची संपूर्ण जबाबदारी शेवटीं 'अिकड'च्याच डोक्यावर राहील. म्हणून त्यांनीं वरील सर्व मागण्या ताबडतोब पूर्ण कराव्यात आणि घरांतील सुख आणि शांति टिकवून धरण्यास हातभार लावावा.

卐

## स्वयंपाकघरांत जाहीर सभा

मुंबई दि....संकल्पित संपाची रूपरेषा देण्यासाठीं सौ सीताकाकूंनीं स्वयंपाकघरांत जाहीर सभा घेतली होती. या सभेस संपात सामील झालेला एक मुलगा, तीन मुली, माहेरचीं माणसें इत्यादी मंडळी बहुसंख्येनें उपस्थित होती. सीताकाकूंनीं संपाची घोषणा केली आणि सर्वांनीं एकमुखानें संपास पाठिंबा दिला. सीताकाकूंच्या भाषणाच्या वेळीं संपविरोधी थोरल्या मुलानें सभेंत झुरळ फेकून सभा उधळण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें सीताबाईंची कांहीं मिनिटें तारांबळ उडाली. परंतु सर्वांच्या धांवाधांवींत तें झुरळ कोणाच्या तरी पायाखालीं

चिरडून खलास झाल्याचें दिसून आल्यावर सभा पुन्हां व्यवस्थितपणें पार पडली. याच वेळीं बैठकीच्या खोलींत, रामभाऊ संपाला कडकोट तयारीनिशीं कसें तोंड द्यावें याची आंखणी करीत होते.

卐

## रामभाऊंच्या साडूंची मध्यस्थी

मुंबई दि०... संपाच्या बाबतींत दोन्ही पक्षांनीं अटीतटीचें धोरण स्वीकारलें असून कोणीच पडतें घ्यायला तयार नाहीं हें पाहून रामभाऊंचे थोरले साडू श्री. जगन्नाथराव खानविलकर आणि रामभाऊंचे भाचे जांवई श्री. पिरोज गंधे ह्यांनीं बरीच मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु आजपर्यंत तरी सर्व वाटाघाटी आणि मध्यस्थी निष्फळ ठरल्या आहेत. त्यामुळें संप हा अटळ आहे असें स्पष्टपणें दिसत आहे. रामभाऊंनीं दहाच्या दहा मागण्या धुडकावून लावण्याचें कडक धोरण स्वीकारलें असून सौ. सीताकाकूंहि साडेनऊ मागण्यासुद्धां स्वीकारायला तयार नाहींत. त्यांना दहाच्या दहा मागण्याच पाहिजेत. यामुळें वातावरण फारच तंग झालें आहे. ”

पी. टी. आय्. चा वार्ताहर म्हणतो, “ शेवटचा निकराचा प्रयत्न म्हणून रामभाऊंच्या सासूबाई स्वतः रामभाऊंना भेटून गेल्या. परंतु सासूबाईंनाहि हात हालवीतच परत जावें लागलें. त्यामुळें तर तडजोडीची आशा पुरतीच नष्ट झाली आहे असें स्पष्टपणें दिसतें. रामभाऊंचे सासरे या साऱ्या प्रकरणांत फारच तटस्थ राहिले असल्यामुळें संपाचा भडका उडणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. ”

卐

## आगामी संप

### ( अग्रलेख )

रामभाऊंच्या पत्नी सौ. सीताकाकू या लौकरच संपावर जाणार आहेत हें आतां निश्चित झाल्यासारखेंच आहे. सीताकाकूंचा हा निर्णय आततायीपणाचा आहे हें कोणालाहि पटण्यासारखें आहे. पतिबरोबर वनवासाचेहि हाल सोसण्यासाठीं स्वखुषीनें राज्योपभोगाचा त्याग करून जाणाऱ्या सीतेचेंच नांव धारण करणाऱ्या सीताकाकूंनीं पतिविरुद्धच संप जाहीर करून सीतेच्या नांवाला आणि अखिल आर्यललनांना बट्टा लावला आहे हें निःसंशय ! ‘ अविदित गतयामा रात्रिरेवं व्यरंसीत् ’ अशा रामाशी गप्पा मारणारी ती थोर सीता कोठें आणि ही सीता कोठें ? ‘ पति हाचि देवललनांना ’ हें पदहि सीताकाकू विसरल्या असें दिसतें. ‘ कार्येषु मंत्री शयनेषु रंभा, भोज्येषु माता... ’ अित्यादि विविध भूमिकांतून वावरणारी पत्नी ही मल्टिपर्पज वस्तु आहे हेंहि सीताकाकू साफ विसरून गेल्या आहेत.


सीताकाकू संपावर गेल्यावर, पोराबाळांचे हाल होतील, दळण कोण आणील, लाँड्रीवाल्याकडे कोण जाअील, बोहारणीशीं घासाघीस कोण करील, नळावर शाब्दिक चकमकी कोण करील, शेजारणीकडे पापड लाटायला कोण जाअील, शेजारणीच्या तरण्या पोरीचें चाळे तिखटमीठ लावून कोण सांगेल ? अेक कीं दोन ? असंख्य गोष्टींत खंड पडणार. ‘ यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ’ असें मनु म्हणतो. परंतु सीताकाकू पूजाच काय पण रामभाऊंकडून ‘ पाद्यपूजा ’ हि करवून घेण्यासाठीं रहायला तयार नाहींत, तिथें देवताच काय पण रामभाऊंसुद्धां रमूं शकणार नाहींत.

वास्तविक पहातां महाराष्ट्राची प्रतिष्ठापना झाल्यावर सबंध राज्यांतील हजारों कुटुंबें सुखासमाधानानें नांदत आहेत. ह्याचें सारें श्रेय यशवंतराव चव्हाण यांना आहे हें कोणीहि नाकारूं शकणार नाहीं. अशा परिस्थितींत फक्त सीताकाकूंनीं संप करून भारतीय स्त्रीच्या आदर्शाचा भंग करावा हें विपरीतच नव्हे काय ? शेवटीं,

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति

हा मनूचा दण्डक सांगून सीताकाकूंना संप मागें घेण्याची सूचना करतो. तसें झाल्यास यशवंतरावांच्या सुरळीत चाललेल्या राज्यास संपाचें गालबोट लागणार नाहीं. सीताकाकूंनीं सर्व बाबींचा नीट विचार करून संप मागें घ्यावा यांतच त्यांचें हित आहे.

卐

आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूंनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून ‘ ब्राम्ही ’ या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरूं केले व भारतांत प्रथमच “ ओरिजिनल ब्राम्ही तेल ” तयार करून तें लोकप्रिय केलें.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्वाचें पान

१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

शाखा — ठाकुरद्वार, काळबादेवी, परळ, दादर.

मुंबईचे प्रमुख वितरक — मे. प्रामाणिक स्टोअर्स
मोगल बिल्डींग
डिलाईल रोड, मुंबई ११

## संपाचा दिवस ठरला

मुंबई• ...' अखेर सीताकाकूंनीं संपाचा दिवस ठरविला. दि. ३१ जुलै रोजीं रात्रींचा स्वयंपाक करून त्या सर्वांना जेवायला वाढतील, स्वतः जेवतील, उष्टींखरकटीं आवरतील. फरशीवरून बोळा फिरवतील. दूधाचं विरजण लावतील. झांकपाक करतील. अंथरुणें घालतील. स्वतःची बॅग भरतील आणि बरोबर मध्यरात्रीं बाराचे ठोके पडले कीं त्या बॅग घेऊन घराबाहेर पडतील. बरोबर संपांत सामील झालेलीं मुलेंहि अर्थात्‌च असतील. या संपामुळें रामभाऊंच्या घरांतील परिस्थिति फारच पेंचांत येईल असें हितचिंतकांच्या वर्तुळांतून बोललें जातें.

卐

## रामभाऊंचा वटहुकूम

मुंबई दि....सौ. सीताकाकू संपावर निश्चितपणें जाणार हे ठरल्यावर त्यांना संपापासून परावृत्त करण्याचा अंतिम उपाय म्हणून रामभाऊंनीं वटहुकूम काढला आहे. वटहुकूमांतील महत्त्वाचा भाग खालीलप्रमाणें आहे.

आमची धर्मपत्नी म्हणून लग्न झाल्यापासून आमची सेवा करण्यास बद्धपरिकर झालेल्या आमच्या सौभाग्यवती सीताबाई ह्यांनीं आपल्या कांहीं अपत्यांसहित संपावर जायचें निश्चित केलें आहे. या संपास प्रतिबंधक म्हणून हा वटहुकूम काढावा लागत आहे.

' अर्धांगी या नात्यानें संसाराचा निम्मा भार उचलणें हें सीताबाईचें आद्य आणि महत्वाचें कर्तव्य होय. या कर्तव्यांत, संसार चालविणें, स्वयंपाक करणें, मुलांची देखभाल करणें, धार्मिक कार्याचें वेळीं सहधर्मिणी म्हणून वावरणें, द्वैवार्षिक योजनांना मूर्त स्वरूप देणें आणि पतीच्या सुखदुःखामध्यें नेहमीं सहभागी होणें या प्रमुख गोष्टींचा समावेश होतो.

वरील महत्त्वाच्या कार्यांपैकीं 'चूल' आणि 'मूल' ह्या दोन गोष्टी तर 'एसेन्शियल सर्व्हिसे'स आहेत असें आमचें ठाम मत आहे. एसेन्शियल सर्व्हिसेसला अडथळा आणण्याचा कोणताहि प्रयत्न लहान अथवा मोठा, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष-करणें हा घरांतील भयंकर स्वरूपाचा राष्ट्रीय गुन्ह्याच्या स्वरूपाचा गुन्हा समजला जाईल. ह्या गुन्ह्याबद्दल घटस्फोटाची किंवा कायमचें माहेरीं रहाण्याची शिक्षा फर्माविण्यांत येईल. संपकाळांत 'चूल' वाटेल त्या व्यक्तीचें सहाय्य घेऊन पेटाविली जाईल. राहिलेली एसेन्शियल सर्व्हिस मात्र, आम्ही नीतिमत्तेचें पुरस्कर्ते असल्यामुळें नाइलाजानें स्थगित करूं परंतु अधिकृत अन्य स्त्रीची नेमणूक (म्हणजे लग्न) झाल्यावर आम्ही तोहि कार्यक्रम अंमलांत आणूं.

संपामुळें संसाराचा शकट मोडल्याची सर्व जबाबदारी अर्थात्‌च सौ. सीताबाईंवर राहील. या गुन्ह्याबद्दल त्यांचें सर्व दागिनें, पातळें, माहेराहून आणलेल्या विविध वस्तू जप्त करण्यांत येतील आणि वरती दोन हजार रुपये दंडहि होईल (हा दंड त्यांनीं आपल्या वडिलांकडून वाटल्यास भरावा.)

संपात सामील होणाऱ्या मुलांनाहि या वटहुकूमान्वयें सक्त ताकीद देण्यांत येतें कीं, यापुढें हीं कारटीं घरांत पाऊल टाकतील तर प्रत्येकाचें तंगडे मोडून तैमूरलंगाची पलटण तयार करण्यांत येईल. शाळेची फी, पातळें, स्नो, पावडरी, रिबिन्स वगैरेवर खर्च करण्यासाठीं ह्यापुढें छदामहि मिळणार नाहीं. फक्त दोन वेळां गिळायला मिळेल. बाकी खर्च ज्याचा त्यानें भागवावा लागेल.

मुलींना पुढील जबर ताकीद देण्यांत येत आहे. रूपाच्या बाबतींत सर्वच मुलींनीं आपल्या मातुःश्रीचा आदर्श ठेवला असल्यामुळें आपलीं लग्नें कशीं जमतील ह्याचा त्यांनीं त्रिवार विचार करावा. एकेकीला लग्नाच्या बाजारांत खपवायला किती हुंडा लागेल याचा अंदाज मनाशीं बांधावा. संपांत भाग घेणाऱ्या मुली पुन्हां घरीं रहायला आल्या तरी, त्यांच्या हुंड्यांचा भार आम्ही मुळींच सोसणार नाहीं फक्त नारळ हातांत घेऊन कन्यादानासाठीं सिद्ध राहूं. हुंड्याचे पैसे कसे जमवायचे हें जिच्या तिनें ठरवावें.

जे मुलगे संपांत भाग घेतील त्यांच्या शिक्षणाची आर्थिक मदत यापुढें ताबडतोब बंद करण्यांत येईल. वाटल्यास त्यांनीं नादारी मिळवून शिक्षण पुरें करावें किंवा हॉटेलांत कपबशा विसळण्याची नोकरी धरावी.

मुलींच्या लग्नासाठीं बँकेंत ठेवलेले पैसे आम्हीं ताबडतोब काढून घेऊन संपकाळांतील होणाऱ्या अपरिहार्य गोष्टींवर खर्च करूं.

हा वटहुकूम आम्हीं हयात असेपर्यंत अंमलांत राहील. संपवाल्यांना आश्रय देणें, आर्थिक मदत देणें अथवा सहानुभूति दाखविणें हेंहि गंभीर प्रकारचे गुन्हे समजले जातील. या कलमाकडे सीताबाईच्या माहेरच्या मंडळींचें लक्ष वेधूं इच्छितों.

वरील वटहुकूमाची बूज राखण्यासाठीं ३१ जुलैच्या आंत (मध्यरात्रीपूर्वी) संप मागें घेण्यांत आला तरच हा वटहुकूम मागें घेतला जाईल. नाहींतर तो ३१ जुलै–१ ऑगस्टच्या मध्यरात्रीं बारा वाजून शून्य मिनिटांनीं आपोआपच अंमलांत येईल.

**रामभाऊ**
—सीतापति

## तरीहि संप अटळच

### वटहुकूम मोडून सीताकाकू संपावर जाणार

### मुलांमुलींचा बेताहि कायमच

मुंबई०... "हा वटहुकूम म्हणजे परंपरागत चालत आलेल्या नवरेशाहीचा इरसाल

**दिवाडकर लॉजिंग अँन्ड बोर्डींग हाऊस**
**माथेरान**
(१ ऑक्टोबरपासून १५ जूनपर्यंत)
* शाकाहारी व मांसाहारी भोजन.
* सुव्यवस्था आणि माफक दर.
* रेल्वे स्टेशनसमोर.
अधिक माहितींसाठीं लिहा—
**प्रो. वायू. एस्. दिवाडकर अँन्ड सन्स.**
(केटरर्स अँन्ड कॉन्ट्रॅक्टर्स)
कर्जत, नेरळ आणि माथेरान (मध्य रेल्वे)

अर्क आहे. असले छपन्न वटहुकूम निघाले तरी आम्ही संपापासून मुळींच परावृत्त होणार नाहीं" असें सौ. सीताकाकू आपल्या खास पत्रकांत म्हणतात. त्या पुढें म्हणतात, "नव-ऱ्यांना बायको म्हणजे पायताण वाटतें. आमच्या मागण्या म्हणजे कःपदार्थ वाटतात. बायका-मुलांवर हुकमत गाजवावी अशी 'ह्यां' ची इच्छा आहे. तोंडानें बायकोला अर्धांगी, सहधर्मिणी, धर्मपत्नी म्हणायचे, मुलांना 'गोजिरीं' 'फुलें', 'वंशाचे दिवे' म्हणायचे आणि प्रत्यक्ष कृति मात्र हुकूमशाहीची करायची. सर्वांना समान हक्क असल्याची सोशलिस्टिक पॅटर्नची भाषा बोलायची आणि कृति मात्र डिक्टेटरशिपची करायची. वटहुकूम काढतांना आम्हांलाहि घरांत कांहीं हक्क आहे, निदान आम्हीहि माणसें आहोंत, आम्हांलाहि हौस आहे, आवड आहे, निवड आहे या गोष्टींचा 'इकडून' विचार झाला असता तर वटहुकुमाचा वरवंटा फिरवायला ते धजले नसते. 'हेड ऑफ फॅमिली' या नात्यानें त्यांनीं वटहुकूम खुशाल काढावा. पण यापुढें फॅमिली संपावर जाणारच असल्यामुळें त्यांचें 'हेडत्व' आपोआपच संपुष्टांत येणार आहे ह्या गोष्टीकडे मी 'इकड' चें लक्ष वेधूं इच्छीतें.

卐

## मध्यरात्रीपासून संप सुरू झाला

### चार मुलें संपांत सामील.

मुंबई दि.…काल मध्यरात्रीं बरोबर बारा वाजतां सौ. सीताकाकू आणि त्यांचा एक मुलगा आणि तीन मुली संपावर म्हणून निघाल्या ते थेट माहेरीं येवून राहिल्या.

सकाळीं खुद्द रामभाऊंना आपल्या हातांनीं चहा करून प्यावा लागला. संपावर न गेलेल्या मुलग्याला आणि मुलीला सर्व घरकामें नीट जमेनात. म्हणून रामभाऊंनी तात्बडतोब एक स्वयंपाकीणबाई आणि एक पोऱ्या यांची टॅंपररी नेमणूक करून संसारयंत्रणा सुरळीत चालू ठेवण्याचें कार्य केलें. चूल बंद पडेल अशी जी संपवाल्यांची खात्री होती, ती बारगळली. 'चूल' हा आपल्या प्रेस्टिजचा प्रश्न ठरवून रामभाऊंनी ती बंद न पडण्याची कोशीस केली. चहा, पोहे, जेवण, अंघोळीचें पाणी वगैरे सर्व प्रकारच्या कामासाठीं चूल पेटविली जात होती. फक्त तीं अनियमितपणें पेटत होती.

卐

## स्वयंसेवक पुढें आले

मुंबई दि. … रामभाऊंच्या कुटुंबांतलीं मंडळीं संपावर जाऊन दोन दिवस झाले तरीहि परिस्थिति जैसे थे होती. हळूंहळूं स्वयंसेवक रामभाऊंच्या संसाराला मदत करायला पुढें येऊं लागले आहेत.

रामभाऊंचीं पत्रें पोस्टांत टाकून आणि येतांना आणखी कार्ड पाकिटें आणण्यासाठीं रिटायर्ड (?) पिटिशन-रायटर (पोस्टल व्हरांडा) 'बाताराम मालवणकर यांनीं' स्वयंसेवकाचें काम केलें; तर सादूपुऱ्यांत रहाणाऱ्या हरिहर घासगीळ यांनीं पडेल तें काम करण्याचें आश्वासन दिलें. गणेशोत्सवांतल्या नाटकांत आणि मेळ्यांत लहानपणीं काम करणाऱ्या (त्या वेळच्या नृत्यलांडोर कान्ताबाला) सौ. आठवले, आपले पति श्यामराव आठवले यांच्या सौजन्यानें आणि रामभाऊंना मदत करणें हें आपलें 'कन्सर्न' आहे या सद्भावनेनें डाळ, तांदूळ, गहूं, खडे, गारगोट्या, टरफलें, अळ्या, जाळ्या यांचें सॉर्टिंग करण्यासाठीं रामभाऊंच्या घरीं मुद्दाम दोन तास येऊन बसल्या होत्या.

卐

## निश्चय ढळूं लागला

### धाकट्या मुलीची चुळबूळ

मुंबई दि. …रामभाऊंच्या घरांतील सर्व कामें सुरळीत चालू असल्याचें ऐकून संपावरील धाकट्या मुलीचा निश्चय ढासळला असून ती आईची नजर चुकवून रामभाऊंकडे आली आहे थोरल्या म्हणजे वरच्या नंबरच्या मुलीचीहि चुळबूळ चालू आहे असें समजतें. बाकीच्या मुलांनाही आपल्या भवितव्याची काळजी लागली आहे अशी खास गुप्त बातमी आहे. बहुधा एक दोन दिवसांत संप मागें घेतला जाईल असा अधिकृत वर्तुळाचा अंदाज आहे.

पी. टी. आय्. चा वार्ताहर म्हणतो 'खुद्द रामभाऊंचे सासरे रामभाऊंना गळ घालणार आहेत असें समजतें.'

**★ नियम ★**

स्पर्श शब्दाला असावा
शब्द डोळ्यांना असावा
मुकेपणीं गावे गीत…
अर्थ जाणीवेला व्हावा

ओढ रक्ताला असावी
ऊब मायेला असावी
मौन द्यावें पांघरूनी
प्रीत निःशब्द फुलावी…

-केतन धाग

卐 दीपावलि शुभचिंतन 卐
**भाग्यश्री पर्ल हाऊस**
चांदी, सोने, मोती यांच्या
दागिन्यांची पेढी
११३३ अहमद सेलर बिल्डिंग,
हिंदमाता सिनेमाच्या मार्गे,
दादर, मुंबई १४.

For Better Tone
Contact —
**ELECTRO VOICE RADIOS**
DEALERS IN RADIOS AND HI-FI AMPLIFIERS.
37, Loonet Bldg., Vincent Road,
DADAR, BOMBAY - 14.

## विनशर्त संप मागें घेण्यात आला.
## सीताकाकू सवत्स घरीं आल्या

मुंबई: दि — रामभाऊंच्या सासऱ्यांनीं आपल्या दिवट्या मुलीच्या वतीनें माफी मागितल्यावर आणि आपल्या कन्येला मुलांबाळांसहित स्वगृहीं जाण्याबद्दल मन वळविल्यावर सौ. सीताकाकूंनीं संप विनशर्त मागें घेतल्याचें जाहीर करून आणि नाक मुठींत धरून गृहप्रवेश केला. अशा प्रकारें एका गंभीर परिणाम होणाऱ्या संपाचा शेवट झाला.

### रामभाऊ सूडबुद्धीनें वागविणार नाहींत

मुंबई दि.— " संपावर गेलेलीं माणसें माझींच असल्यामुळें त्यांना सूडबूद्धीनें वागविणार नाहीं " असें आश्वासन देणारें पत्रक रामभाऊंनीं काढलें असून तें पुढें म्हणतात, ' परंतु संपाची शिक्षा ही झालीच पाहिजे म्हणून पुढील गोष्टी करण्यांत येतील. '

यापुढें सीताबाईंना कधींहि माहेरीं किंवा संपावर जातां येणार नाहीं. या गोष्टीवर कायमची बंदी घालण्यांत आली आहे.

संपांत सामील झालेल्या सर्व मुलांना फक्त एस. एस. सी. पर्यंतच शिक्षण देण्यांत येईल. पुढचें त्यांचें त्यांनीं पाहून घ्यावें. मुलींनीं स्वत:चा नवरा स्वतःच शोधून काढला तर हुंडा म्हणून जास्तींत जास्त प्रत्येकीं पांचशे रुपये देण्यांत येतील. नच जमल्यास त्यांनीं स्वत: नोकरी करून स्वतःचा खर्च चालवावा. सूडबुद्धीनें वागवायचें नाहीं या धोरणास अनुसरून त्यांना या घरांत रहायला परवानगी मिळेल.

लग्न, शिक्षण वगैरे प्रत्येक खर्चाच्या बाबीच्या वेळीं संपांत भाग घेतलेल्यांची योग्य ती गुप्त नोंद ठेवून खर्च करायचा कीं नाहीं हें ठरविलें जाईल. संपांत भाग न घेतलेल्या मुलांच्या सद्वर्तनाचीहि योग्य ती गुप्त नोंद ठेवून त्यांच्यावर भरपूर खर्च करण्यांत येईल. सूडबुद्धीनें वागवायचें नाहीं या उदार धोरणास अनुसरून संपवाल्यांना किमान दोन वेळां जेवायला घालण्यांत येईल.

यापुढें घरांत असले संप होऊं नये म्हणून कडक उपाययोजना आखण्यांत येईल. इतकेंच काय परंतु ज्यांच्या सहकार्यामुळें किंवा प्रोत्साहनामुळें हा संप झाला त्या माहेरच्या सर्व माणसांवर यापुढें या घरांत यायची कायमची बंदी घालण्यांत येईल.

घरांतील संपावर गेलेल्या मंडळीस सूडबुद्धीनें वागवायचें नाहीं या माणुसकीच्या धोरणास अनुसरून स्त्रियांना वर्षाकांठीं चार चार पातळें घेऊन देण्यांत येतील आणि मुलांना दोन दोन पँट्स आणि दोन दोन शर्टस करण्यांत येतील.

यापुढें सिनेमा, नाटक, हळदीकुंकू, डोहाळजेवणें, गप्पासप्पा वगैरे सर्व गोष्टींवर बंदी घालण्यांत आली आहे. शनिवारच्या अर्धा दिवसाच्या उपवासाऐवजीं सबंध दिवस उपवास करावा लागेल. संपवाल्यांस सूडबुद्धीनें न वागवण्याच्या दयाळू धोरणास अनुसरून महिन्यांतील अेका शनिवारीं सबंध दिवस वाटेल ते फराळाचे पदार्थ खायला परवानगी देण्यांत येअील.

सीताबाअींच्या दहा मागण्यांपैकीं बहुतेक सर्व वारेमाप आहेत. त्या पूर्ण करणें अर्थातच शक्य नाहीं. तथापि सूडबुद्धीनें वागवायचें नाहीं या तत्त्वास अनुसरून खुद्द आमची वन-मॅन-कमिटी नेमण्यांत येअील. ही कमिटी फार तर एखाद्या दुसऱ्या मागणीचा नुसती विचार करील. मागणी कृतींत आणली जाअीलच याची खात्री देतां येत नाहीं. संपवाल्यांच्या भावी सद्वर्तनावर ते अवलंबून राहील.

### रामभाऊंचा कडक निषेध

मुंबअी दि....आपली दादागिरी सर्वत्र चालवून रामभाऊंनीं सीताकाकू प्रभृति संपवाल्याची सर्व बाजूंनीं जी गळचेपी आणि कोंडी केली त्याचा जाहीर निषेध काल रोजीं सीताकाकूंच्या माहेरीं करण्यांत आला. त्याचप्रमाणें एखाद्या ट्रेड युनियनवरच मुळांत बंदी असावी त्याप्रमाणें माहेरच्या माणसांवर येण्याजाण्याची बंदी घातली ही तर पुरेपूर हुकूमशाही आहे असा ठराव या सभेंत करण्यांत आला. अशा दडपशाहीनें माहेरची मंडळी, सीताबाई आणि तिचीं मुलें मुलींच घाबरणार नाहींत हेंहि या सभेंत बजावून सांगण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर सीताबाईंना त्रास तरी देऊन बघा म्हणजे पुढील विराट् संपहि अटळ आहे असें जाहीर आव्हान रामभाऊंना देण्यांत आलें. संसारांतल्या माणसांना असंतुष्ट ठेवून कोणताहि हेड ऑफ फॅमिली यशस्वीरीत्या संसार करूं शकणार नाहीं याची समजहि या सभेच्या द्वारा रामभाऊंना देण्यांत आली. यापुढें रामभाऊंनीं जर सलोख्यानें वागण्याचें ठरविलें नाहीं तर मात्र पुढील संप अटळ आहे असें छातीठोकपणें सांगण्यांत आलें आहे.

### रामभाऊ नरमले

मुंबई दि० ... माहेरच्या जाहीर सभेंतील आव्हानानें रामभाऊ नरमले आणि बहुतेक मागण्या पूर्ण केल्या. एक संप नेटानें हाणून नेला पण पुढील खेपेची त्यांना शाश्वती वाटेना म्हणून सन्मान्य माघार घेऊन तडजोड झाली. आतां रामभाऊ सहकुटुंब सहपरिवार आनंदानें कालक्रमणा करीत आहेत.

आम्ही कोंकण लाईनवर सर्व ठिकाणीं रोखीनें व काटकसरीनें योग्य कमिशनवर व्यापार चालू केला आहे तरी आजच ऑर्डर पाठवून खात्री करा—

**शिवराम भगवंत**

स्टँण्डर्ड बिल्डिंग नं. १, डॉ. डिसोझा स्ट्रीट, मुंबई क्र. २

भारताचा पहिलाच ऐतिहासिक प्रचंड चित्रपट

# मु ग ले आ झ म

दिव्य प्रीतींतून अप्रतिम कलाकृतींचा जन्म होत असतो. शहाजहानच्या प्रेमांतून ताजमहाल अवतरला.

मोंगलांची कारकीर्द म्हणजे एक समृद्धिचा, वैभवाचा काळ. वैभवशाली मोंगल आमदानींत एक अकबर बादशहा होऊन गेला. तो आपणा सर्वांच्या परिचयाचा आहे. त्याच्या न्यायीपणाबद्दल तो विशेष प्रसिद्ध आहे. या अकबरानें न्यायाखातर आपल्या एकुलत्या एक मुलाच्या-सलीमच्या-प्रेयसीला भिंतीत चिणून सलीमच्या प्रेमाची कबर बांधली. इतिहासाचें तें एक रोमांचक, चित्त-थरारक पान आहे.

सुवर्णाक्षरांनीं लिहिला गेलेला तो इतिहास रजतपटावर आणण्याचें श्री. के. आसीफ यांनीं ठरविलें. आणि ते त्या दिशेनें प्रयत्नाला लागले. त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. अपार श्रमांतून दीर्घ मुदतीनंतर ' मुगले आझम ' चित्रपट तयार झाला. या भव्य दिव्य बोलपटाच्या दर्शनासाठीं समस्त भारताचें डोळे अत्यंत उत्कंठतेनें रजतपटावर खिळले होते.

या अभूतपूर्व बोलपटाची ही कथा वाचतांना वाचकांच्या डोळ्यां-समोरून ' मुगले आझम ' चित्रपट आणि या चित्रपटाची कुळकथा चलचित्रा-प्रमाणें सरकूं लागेल........



स्टर्लिंग इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या ' मुगले आझम ' या बोलपटाच्या प्रकाशनाच्या वेळीं त्या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक श्री. करीमुद्दिन असिफ यांनीं सिनेरसिकांना उद्देशून केलेल्या जाहीर निवेदनांत त्यांनीं म्हटले आहे–

" मुगले आझमच्या आणि माझ्या भाग्याचा मंगल दिवस आज उगवला. गेलीं कित्येक वर्षं भारतीय सिनेरसिकांनी ज्या चित्रपटाची असीम वाट पाहिली तो ' मुगले आझम ' आज आपल्या दृष्टींचं पारणें फेडण्यासाठीं प्रदर्शित होत आहे, याबद्दल मला आनंद वाटत आहे.

गेलीं आठ वर्षं चित्रपटसृष्टींत उठलेल्या शंकाकुशंकांचा निःपात करून मुगले आझम चित्रपटाची ज्योति चित्रमंदिरांत तेजोवलांकित होत आहे. भारतीय चित्रपट सृष्टीच्या इतिहा-सांत ज्यांचा " ऐतिहासिक " उल्लेख होईल आणि भारताच्या सर्व धंद्यांतील आणि कानाको-पऱ्यांतील जनता जो चित्रपट सारख्याच रसिकतेनें पाहूं शकेल असे चित्ररत्न तयार करावें अशी माझ्या मनाशीं जुळणी करीत मी भारतीय इतिहासाची पानें चाळूं लागलों आणि शहेनशहा अकबराच्या गौरवशाली कारकीर्दीवर माझी दृष्टी खिळली. या कारकार्दीचें एकेक पान उलटत असतांना अकबर-पुत्र सलीम आणि सौंदर्यसम्राज्ञी अनारकली यांच्या प्रणय-कथेनें माझें मन आकर्षित झालें. ही कथा वाचत असतांनाच ती चित्रपटद्वारें रसिकांना निवेदन करावी असें मनाशीं ठरवलें.

मी चित्रपटाची जुळवाजुळव केली. कर्तव्य-दक्ष आणि राजनिष्ठ अकबर बादशहाच्या भूमिकेसाठीं चंद्रमोहनची नियुक्ती केली. आणि अनारकलीच्या रूपानें नर्गिसला पडद्यावर आणण्याचें ठरविलें. हें स्वप्न साकार करण्यासाठीं १९४३ सालींच मी सज्ज झालों होतों पण हें ऐतिहासिक महाकाव्य चित्ररूप होण्यास दुर्दैव आडवे आले आणि अभिनेता चंद्रमोहन अचा-

६१
१०।१०।६०

र. गो. सरदेसाई

नक कालवश झाला. मुगले आझमची तयार झालेली चार रील्स अशा विचित्र दैवी रीतीनें 'पडद्याआड' पडली. चित्रपट मागें पडला पण आम्हांला आमचा दुर्दम्य आशावाद साथ करीत होताच.

आम्हीं सर्वांनी पुन्हा चित्रपट सुरूं करण्याचा इरादा केला आणि सर्व लेखक कलावंत यासह मी पुन्हां कामास सुरुवात केली. यावेळीं मी हा चित्रपट हिंदी, इंग्रजी आणि तामिळ या तीन भाषांत तयार करीत होतों, यामुळेंच हा चित्रपट लवकर तयार होऊं शकला नाहीं.

लेणीं पहाणे सोपें असते पण ती तयार करण्याचें मागें केवढी तपश्चर्या असतें हें कलावंतच जाणूं शकेल. आम्हांला अकबर बादशहाची कारकीर्द चित्ररूप करावयाची होती. बादशहाचा महाल, दरबार, शीशमहल आणि त्यावेळची ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार करावयाची होती. चित्रपटांत कोठेहि न्यून राहूं नये म्हणून आम्हीं हजारों कागदपत्र, दाखले, पुरावे चाळले, तात्कालीन वस्तूं पाहिल्या आणि ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या.

चित्रपटासाठीं अकबर बादशहाचा 'शीशमहल' आम्हीं सतत दोन वर्षे तयार करीत होतो आणि प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वेळीं तो रुपेरी महल पाहून एका पाश्चात्य तंत्रज्ञानें हा रुपेरी महाल चित्रित करतां येणार नाहीं असें सांगितलें. मला व माझे छायालेखक श्री. रामेश्वर दयाळ माथूर यांना खात्री होती कीं आम्हीं हा महल चित्रित करूं शकूं.

जी अडचण या महलची तीच शहेनशाह अकबर आणि शहाजादा सलीम यांच्यामधील युद्धाची. या युद्धाच्या चित्रीकरणासाठीं शेकडों हत्ती, उंट आदि जनावरें व पायदळ यांची गरज होती. जयपूरचा तो भयंकर उन्हाळा आणि तापलेली धूळ! पण तशा रखरखीत उन्हांतहि भारत सरकारचे पायदळ काम करीत होते.

झरझर काल जात होता. चित्रीकरण चालूं होतें. केलेले कष्ट आणि जाणारे दिवस यांच्या पाठोपाठ येणाऱ्या भाग्य दिनाची आम्हीं वाट पहात होतों. शरीरांतला सारा आशावाद डोळ्यांत आणून वाट पहात होतों. आणि अखेर आजच्या ऐतिहासिक काळांत ज्या मुगले आझमनें आपली कारकीर्द अजरामर करून ठेवली त्याच्या कर्तृत्ववान कारकीर्दीतील कांहीं सोनेरी पानें आम्हीं रुपेरी पडद्यावर आणूं शकलों. केवळ भारतीय चित्रपटसृष्टींतच नव्हे तर जागतिक चित्रपट सृष्टींत क्रांतिकारक ठरणारा मुगले-आझम आज प्रकाशित होत आहे."



अत्यंत सरळ भाषेंत निर्माता के. असीफ यांनीं 'मुगले आझम' चित्रपटाच्या निर्मितीचा सांगून टाकलेला हा इतिहास अतिशय बोलका आहे. असीफ यांच्या आत्मविश्वासाचा, निष्ठेचा आणि परिश्रमशीलतेचा जसा यावरून पुरावा मिळतो तद्वत त्यांनीं तयार केलेल्या या चित्रपटाचा हेतुहि उघड होतो. तसेंच चित्रपटाच्या पूर्ततेला जवळ जवळ आठ दहा वर्षें आणि सव्वाकोटी रुपये एवढा प्रचंड वेळ व खर्च कां लागला त्याचाहि उलगडा होतों. आजकाल जे बऱ्यापैकी म्हणून सामाजिक बोलपट निघतात त्यांच्या निर्मितीचा खर्च आठ दहा लाख रुपये सहज असतो आणि त्याच्या तयारीलाहि दोन अडीच वर्षें इतका वेळ लागतोंच. ही सध्यांची सर्वसाधारण परिस्थिति लक्षांत घेतली आणि के. असीफ यांच्या 'मुगले आझम'चे असामान्य स्वरूप ध्यानीं आणले म्हणजे या चित्रपटाच्या पूर्ततेला आठ दहा वर्षांचा काळ आणि कोटी सव्वा कोटी रुपये खर्च लागला हे स्वाभाविक वाटते. त्यांतच अकबराच्या भूमिकेसाठीं मुळांत योजिलेल्या चंद्रमोहनच्या अचानक मृत्यूनें (ता. २ एप्रिल १९४९) चित्रपटाचा चार रीळें तयार झालेला भाग फेकून देण्याची आपत्ती ओढवली. त्यामुळेंहि चित्रपटाच्या पूर्ततेचा खर्च व काळ फुगण्याला मदतच झाली. शिवाय चित्रपट मूळांत, इंग्रजी, हिंदी व तामिळ या तीन भाषांत चित्रित करण्यांत आल्यामुळें तीन वेगवेगळ्या चित्रपटांच्या पूर्ततेला लागणारा वेळ व पैसा या एकाच चित्रपटासाठीं लागला ह्यांत नवल नाहीं. इतका दीर्घकाळ आणि एवढा अलोट पैसा खर्च करण्याइतकी आपल्या कलाकृतीच्या निर्मितीवरील निर्माता के. असीफ यांची श्रद्धा आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांची एकतानता कायम टिकली, याचेंच नवल वाटतें

(पान ८९ वर पहा)

Telegram — MACHAVA
आमचे ग्राहकांस व हितचिंतकास यंदाची दिवाळी
व नूतन वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.
★ कोंकण ट्रेडिंग कंपनी ★
कमिशन एजंट
७ ए, सैयद मुकरी स्ट्रीट, कथाबाजार, मुंबई नं. ९

# KABBUR

for

For Cotton, Silk, Art Silk, Wool, Jute, Paper, Leather, Soap, Wax, Coir, Varnishes, Oil Plastics, Typewriter Ribbons, Carbon Papers, and Boot Polishes.

# DYES

INTERMEDIATES
CHEMICALS
AND
PIGMENTS

SIZING AND
FINISHING
PRODUCTS

★

## S. K. KABBUR PRIVATE LTD.

3, BASTION ROAD, BOMBAY 1.

Telegram : ' DIAZO ' BOMBAY. Telephone No.: 261627

*Correspondents in England,*

## KABBUR & CO., LTD.

RADHA HOUSE
HIGHER ARDWICK, MANCHESTER 12.

Telegram : " RADHA MANCHESTER "

( पान ८७ वरून )

खरोखरी. केवळ कलानिष्ठ तपश्चर्येचाच हा भाग आहे यांत शंका नाहीं. एवढी प्रदीर्घ कलानिष्ठा आणि असे जबर सांघिक सहकार्य चित्रपटसृष्टीच्या इतिहासांत खरोखरच दुर्मिळ आहे.

आनंदाची गोष्ट ही कीं, या तपश्चर्येचे जें चित्ररूप फळ अखेर तयार झालें तें या असामान्य तपश्चर्येला साजेसेच अद्वितीय आहे. ' मुगले आझम ' बोलपट पाहिल्यावर जो स्तिमित होणार नाहीं तो एक ' मुक्त ' तरी असला पाहिजे किंवा महामूर्ख तरी असला पाहिजे मी गेली तीस-बत्तीस वर्षे सतत चित्रपट पहात आलों आहे. पण सर्वार्थांनीं ज्याला ' प्रचंडपट ' असें सार्थपणें म्हणता येईल असा भारतांत तयार झालेला मुगले आझम हा पहिलाच बोलपट होय, असें मी बिनदिक्कत म्हणूं शकेन. इतक्या प्रदीर्घ कलानिष्ठेने तयार केलेला मुगले आझम हा बोलपट तसाच असामान्य कलापूर्ण झाला आहे ही प्रत्येक सिनेरसिकाला आनंदाची आणि अभिमानाचीहि गोष्ट वाटेल. कोणत्याहि उत्कृष्ट विदेशीं चित्रपटाच्या तोडीस तोड ठरेल अशा महान योग्यतेचा हा बोलपट झालेला असल्यानें भारतीय चित्रसृष्टीच्या इतिहासांतहि हा बोलपट ' चित्रपट आझम ' म्हणूनच ओळखला जाईल यांत मला शंका नाहीं.

तसें पाहिलें तर या बोलपटाचे जें कथानक आहे त्या कथावस्तूंवर या पूर्वींहि एकदोन बोलपट निघालेले आहेत आणि मोगल घराण्यांतील तर बहुतेक बादशहांच्याहि जीवनांवर यापूर्वी चित्रपट तयार झालेले आहेत. भारतांत मोगल बादशहांच्या जीवन कारकीर्दीवर बोलपट निघूं लागल्याला आतां तीस वर्षे झाली बोलपटाच्या जन्मकाळींच इम्पीरियल फिल्म कंपनीनें जहांगिरची प्रिय पत्नी नूरजहान हिच्या जीवनावर बोलपट काढला होता ( १९३१ ) त्याच सालीं हिमांशु रॉय यांनीहि ' नूरजहान ' याच विषयांवर एक इंग्रजी बोलपट आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठीं तयार केला होता. त्यानंतर तीन वर्षांनी १९३४ साली युनायटेड आर्टिस्ट चित्र संस्थेनें ' अदले जहांगिर ' हा जहांगीरच्या न्यायदानावरील चित्रपट तयार केला याच कथा वास्तूंवर १९३९ सालीं मिनर्व्हा मूव्हीटोनसाठीं श्री. सोहराब मोदी यांनी आपला सुविख्यात बोलपट ' पुकार ' तयार केला आणि तसल्याच कथानकावर जी. पी. सिप्पी यांनी १९५५ मध्यें ' अदले जहांगीर ' याच नांवाचा आणखी एक बोलपट सादर केला.

जहांगीरचें नूरजहानवरील प्रेम आणि त्याचा न्याय या विषयावरच्या बोलपटाबरोबरच जहांगीरच्या ' अनारकली ' बाबतच्या प्रेमप्रकरणाचा चित्रनिर्मात्यांना विसर पडणें शक्यच नव्हते. ' नूरजहान ' या चित्रपटानंतर चार वर्षांनी १९३५ मध्यें इम्पीरियल फिल्म कंपनीनेंच ' अनारकली ' हा बोलपट तयार केला आणि या बोलपटाचेच दिग्दर्शक श्री. नंदलाल जसवंतलाल यांनींच १९५३ सालीं अनारकलीच्या प्रख्यात प्रेमप्रकरणाला पुन्हां एकदां चित्ररूप देऊन फिल्मिस्थानसाठीं ' अनारकली ' हा बोलपट तयार केला तो इतका लोकप्रिय झाला कीं, नोव्हेल्टी या एकाच थिएटरांत तो सलग चापन्न आठवडे चालला होता. ' मुगले आझम ' च्या प्रकाशनाच्या सुमारास ह्या बोलपटाचे पुनर्प्रकाशन कांहीं चित्रपटगृहांतून करण्यांत आले व तेंहि फायदेशीर झालें. एवढीं या चित्रपटाची विशेषतः त्यांतील गाण्यांची रसिकांच्या मनावर आजहि मोहिनी आहे.

बोलपटांच्या प्रारंभ काळांत नूरजहान आणि अनारकली यांच्या प्रेमकथा पडद्यावर आल्या असल्या तरी त्या चित्रपटांना मोंगल बादशाही वैभव दिमाखानें पडद्यावर आणण्याचा हेतु चिकटलेला नव्हता. नाट्यपूर्ण प्रेमकथा चित्रपटाला सोयीची असल्यानें या कथांनी चित्रपटाचा आकार तेव्हां घेतला होता इतकेंच. त्यामुळें या सुरुवातीच्या बोलपटांनंतर मोंगलाच्या इतिहासाला हात घालण्याचें धाडस बरीच वर्षे कुणा निर्मात्यानें केलें नाहीं. मध्यंतरी दुसरे महायुद्ध उद्‍भवलें आणि भारतीय राजकारणीचे स्वरूपहि सर्वस्वीं पालटून गेलें. कॉंग्रेस आणि मुसलीम लीग यांच्या राजकारणाचे परिणाम तेव्हांच्या सर्वच लौकिक जीवनावर झाले; त्यांतून चित्रपटसृष्टी अलिप्त राहूं शकली नाहीं. त्यामुळें मोंगल बादशहांचे चरित्र चित्रित करण्याची नवी लाट भारतीय चित्रसृष्टींत उसळली. १९४३ सालीं कमल रॉय पिक्चर्सने ' शाहेनशाह अकबर ' हा बोलपट तयार केला. ( आजचे प्रख्यात गीत संवाद लेखक राजेंद्रकृष्ण हे याच चित्रपटांच्याद्वारां प्रथम चित्रसृष्टींत आले ). रणजीतनं १९४४ मध्यें ' शाहेनशहा बाबर ' सादर केला. पुढल्याच वर्षीं मेहबूब यांनीं ' हुमायून ' पडद्यावर आणला. रणजितने ' मुमताज महल ' चित्रपट तयार केला. कारदारनी १९४६ मध्यें ' शाहजहान ' काढला. १९५४ मध्ये अमर कीर्ती चित्र या संस्थेनें ' मलका ए आलम ' पडद्यावर आणली. एक औरंगजेब वगळता बाकी साऱ्या मोंगल बादशहांनी या कालांत आपापलें जीवनचित्र रूपेरी पडद्यावर प्रेक्षकांना दाखविलें.


हजारो रुपये खर्च करून निराश झालेल्या

# क्षयरोग्यांनो

आमचे औषधालयांत क्षयरोग, बाळंतरोग व स्त्रियांचे गर्भाशयासंबंधीं कोणतेहि विकार ह्या कष्टसाध्य रोगांवर पिढीजात अनुभविक व अचुक गुण देणारीं आयुर्वेदिक औषधें मिळतात. अनेक प्रकारचे उपचार करून व हजारो रुपये खर्च करून गुण न आल्यामुळें निराश झालेल्या रोग्यांना अनुभव घ्यावा. अधिक माहिती करितां तुमचे रोग्याचें नांव, वय, पत्ता व आजाराची संपूर्ण माहिती पंधरा नवे पैशाचें तिकिटासह पाठवावी म्हणजे उत्तरानें कळवूं.

श्री गणेश औषधालय, पोस्ट बॉक्स ५०७ पुणें २.

याखेरीज 'बिरबल की बेटी', 'चितोड विजय' 'तानसेन, मेरा सलाम' (हा जहांगीर कालीन ऐतिहासिक चित्रपट होता) 'रानी रूपमती,' मिर्झा गालिब, वीर दुर्गादास या ऐतिहासिक बोलपटांत कोणत्या ना कोणत्या मोगल बादशहाचा संबंध येतच होता. पण ते ते चित्रपट प्रत्यक्षतः कोणत्याहि मोंगल बादशहाच्या जीवनाशी निगडीत नसल्यामुळे मी त्यांचा वरील यादींत उल्लेख केलेला नाहीं. फिल्मिस्थानचा 'अनारकली' हा बोलपट यशस्वी झाल्यावर याच संस्थेनें 'बाबर' हा बोलपट जाहीर केला होता. 'आनंद मठ' या चित्रपटाचे दिग्दर्शक हेमेन गुप्ता हे या चित्राचें दिग्दर्शन करणार होते पण या चित्राचें पुढें काय झालें तें एक तोलाराम जालून जाणें.

बाबरने १५२६ मध्यें दिल्लीला मोंगल सत्ता स्थापन केली. त्याच्यानंतर हुमायून (१५३० ते १५५६), अकबर (१५५६–१६०५), जहांगीर (१६०५ ते १६२७), शहाजहान (१६२७ – १६५८) आणि औरंगजेब (१६५८–१७०७) यांनीं दिल्लीत बादशाही वैभव भोगलें. त्यांपैकीं बहुतेकांच्या कारकीर्दी बोलपटांच्या रूपानें आतापर्यंत रुपेरी पडद्यावर आलेल्या आहेत. या सर्वांत जहांगीर हा जास्तच नशीबवान वाटतो. त्यानें बऱ्याच हिंदी बोलपटांना 'कथावस्तू' पुरविल्या. अनारकली, नूरजहान, पुकार, किंवा 'मुगले आझम' या बोलपटांना कथानकाचा पुरवठा जहांगीरनेच केलेला आहे. नुरुद्दीन महंमद सलीम यानें गादीवर येतांच 'जहांगिर' असा किताब धारण केला व त्याच नांवानें तो जास्त ओळखला जातो. जहांगिर म्हणजे 'धर्मोद्धारक व जगज्जेता!' पण हा किताब जहांगिराला मुळींच शोभत नाहीं. कारण त्यानें आपल्या कारकीर्दीत मुसलमानी धर्माच्या उद्धाराचें कार्य फारसे केलें नाहीं. जगज्जेतृत्व तर राहोच पण त्याच्या कारकीर्दीतच कंदाहार हा प्रांत मोंगली रिसायतींतून शत्रूच्या ताब्यात गेला. जहांगिर हा विलासी व लंपट होता. राजपुत्र सलीम असतांना तो अनारकलींच्या प्रेमांत पडला होता आणि बादशहा झाल्यावर त्यानें नूरजहानच्या प्रेमाची गुलामगिरी आपखुशीनें पतकरली. जयपूरचा राजा भगवानदास यानें आपली मुलगी मानबाई सलीमला लग्नांत दिली होती.

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याचा हेतु हा कीं, 'मुगले आझम' या चित्रपटाचें अद्वितीयत्व कळण्यास या तपशिलाची माहिती असणें ठीक होईल.



अकबर किंवा अनारकली हे विषय चित्रपटाच्या दृष्टीनें नवे नव्हेत. या विषयावर पूर्वी चित्रनिर्मिती झालेली आहे. मोंगल सुलतानांच्या चरित्रकथाहि रूपेरी पडद्यानें पूर्वी प्रेक्षकांना दाखवलेल्या आहेत. पण 'मुगले आझम' पाहून अकबराचा थोरपणा जसा मनावर खोल ठसा उमटवितो तद्वत दिल्लीचे मोंगली वैभव डोळे दिपवून टाकते. १९४३ सालीं कमल रॉय पिक्चर्सनें तयार केलेला 'शाहेनशाह अकबर' हा बोलपट तेव्हां युद्धजन्य सुबत्ता व पैशाचा सुकाळ असूनहि, जेमतेम चार आठवडेच चालू शकला व त्यानंतर त्याची आठवणहि कधीं कुणाला झाली नाहीं. पण के. असीफ यांच्या 'मुगले आझम' बोलपटाच्या प्रत्यक्ष प्रकाशनापूर्वींच त्याच्या आठ आठ आठवड्यांच्या तिकिट विक्रीचा विक्रम एका नव्हे तर अनेक गांवीं आणि अनेक थिएटरांत घडून आला. हा बोलपट एकाच दिवशीं ऐशीं गांवीं मिळून दीडशे चित्रपटगृहांत एकदम प्रकाशित करण्यात आला आणि प्रत्येक गांवी प्रत्येक चित्रपटगृहांत प्रेक्षकांचीं एवढी झुम्मड उडाली कीं, तसा प्रकार यापूर्वी कधीहि झाला नव्हता.

'मुगले आझम' चित्रपटाच्या प्रत्यक्ष निर्मितीबाबत जशा अनेक तऱ्हेच्या विस्मयचकित दंतकथा ऐकू येतात तद्वत त्या चित्राच्या प्रकाशनाबाबतहि हरेक तऱ्हेच्या तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी कानावर येतात. साऱ्या हिंदुस्थानभर अशी प्रचंड उत्सुकता एकाच चित्रपटाने एकाच वेळीं निर्माण केल्याचें दुसरे एकहि उदाहरण नाहीं. एक दशकाचा कालखंड आणि सव्वा कोटी रुपयांचा, खर्च या दोनच बाबी एवढ्या विस्मयजनक आहेत कीं, त्या दोन्हींपायी देखील 'मुगले आझम' विषयीं औत्सुक्य शिगेला पोचलें होते, त्यांतच या चित्रपटांतील नामवंत कलावंत "निपुण असे प्रचंड सेटस" उत्कृष्ट छायालेखन व इतर चित्रतंत्र, नौशाद यांचे संगीत, रंगीत नृत्यें, वगैरे बाबींची भर पडून 'मुगले आझम' ने सिनेरसिकांच्या उत्कंठतेनें हिमालयीन उंची गांठली यांत आश्चर्य नाहीं.

आश्चर्य हें आहे कीं, 'मुगले आझम' या बोलपटानेंहि कलात्मक बाबतींतहि अशीच उंची गांठली आहे. आठदहा वर्षांच्या कालखंडात ज्या चित्रपटाची निर्मिती झाली त्यांत वास्तविक पाहतां संगतीचें (Continuity), छाया चित्रणाचे, आविष्काराचें आणि संकलनाचे दोष राहाणें साहजिक असतें पण 'मुगले आझम' मध्यें असले कसलेहि दोष राहूं देण्यांत आलेले नाहींत ही चित्रतंत्रज्ञांची किमया अजब आहे. कथानकांचा काल, प्रसंगाचा ताल आणि भूमिकाचा बोल या सर्वांची एकवाक्यता या चित्रपटांत सर्वत्र जाणवते. पार्श्वभूमी


## मे. भिकमदास गुलाबचंद बांठिया

★ (सोन्या चांदीचे व्यापारी) ★

**महात्मा गांधी रोड, पनवेल (कुलाबा)**

ऑर्डरप्रमाणें मनपसंत दागिनें तयार केलें जातात.

विश्वास हीच खात्री.

प्रो. रतनचंद भि. बांठिया.

परिस्थितीं आणि पोषाख यांच्यांत कोठेंहि विसंगती आल्याचे आढळून येत नाहीं. आवरण, आशय आणि आविष्कार यांत कुठेंही विभिन्नता आढळत नाहीं. चित्रपटाच्या लहान मोठ्या प्रसंगांत अगर पात्रांतच केवळ नव्हें तर बारीक सारीक वास्तु नि वस्तु यांजमध्यें सुद्धा विसंगती दिसून येत नाहीं या एकाच गोष्टीवरून या चित्रपटाचें कलात्मक कार्य किती काळजीपूर्वक आणि कळकळीनें करण्यांत आलेलें आहे याची कल्पना येते. साध्या सामाजीक चित्रपटांत देखील विसंगतीचे अनेक ढोबळ प्रकार सहजी दिसून येतात. तेथें सतत दहा वर्षें काम चालू असलेल्या या प्रचंड ऐतिहासिक बोलपटांत विसंगतींचें प्रकार दिसूं नयेत हा प्रकार खरोखरच अक्षरशः अचंबा वाटण्यासारखा आहे. निर्मित्यानें दरेक बारीकसारीक तपशीलांचा देखील किती सूक्ष्मपणें विचार करून पटकथा तयार केली आणि चित्रतंत्रज्ञांनी तिचे किती निष्ठेनें परिपालन केलें याचा हा एक उत्कृष्ट पाठच आहे म्हणावे लागेल. सांघिक सहकार्याचा असा नमुना भारतीय चित्रसृष्टीत यापूर्वी कधींच दिसलेला नाहीं.

मुगले आझम हा चित्रपट अकबराचा सर्वांगिण मोठेपणा दाखवण्यासाठीं काढण्यांत आलेला आहे. "अकबराविषयीं पृथ्वीवरील थोर राज्यकर्त्यांत त्याची गणना केली पाहिजे" असें रियासतकार सरदेसाई यांच्यासारख्या इतिहासकारानें म्हटलेले आहे. अशा या थोर राज्यकर्त्याच्या जीवनांत उठलेल्या एका अत्यंत नाजुक अशा कौटुंबिक कलहप्रसंगीं तो कसा वागला, या नाट्यपूर्ण कथेचें चित्रण 'मुगले आझम' मध्यें अभिप्रेत आहे अनेक लोक समजतात तशी हीं अनारकली व सलीम याची प्रेमकहाणी नाहीं. ही अकबराची 'न्याय कहाणी' आहे. न्यायाचा ताजवा सदैव समतोल ठेवण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या अकबराच्या त्या न्यायाच्या ताजव्याला जबरदस्त धक्का मिळतो आणि तोहि त्याच्या पोटच्या एकुलत्या एका मुलाकडूनच हीच या चित्रपटांतील खरी नाट्यकथा आहे

आणि हा मुलगा तरी कसा? पोटीं संतान नसल्यामुळे अकबरासारख्या बादशहानें वाळवंटांतून अनवाणी पायानें, हात जोडून, चालत जाऊन सलीम खिस्तीच्या दर्ग्यासमोर नवस मागून घेतला त्यामुळें अकबराला मुलगा झाला तोच हा सलीम. सलीम जन्माला आल्याची बातमी सांगणाऱ्या दासीला अकबर हातांतील बहुमोल आंगठी देतो व सांगतो कीं, ज्या वेळीं तुला तशी गरज पडेल त्या वेळीं तूं ही आंगठी मला दाखवून वाटेल तें मागून घे. मी तुझी इच्छा पुरी करीन. हे वचन त्यानें न्यायाच्या तराजूसमोर दिलेले असते. ह्याच तराजूला पहिला तडाखा सलीम दहा अकरा वर्षांचा झाल्यावर तो देतो. सलीम दारूच्या नशेंत हा ताजवा हातवाऱ्यांनीं हिंदकाळतो. आणि अकबर डोळ्यांनीं तें पाहूनहि कांहीं करूं शकत नाहीं. मुकाट्यानें तें दुःख, तो अपमान अकबर गिळून टाकतो. या छोट्या प्रसंगाची सूचकता प्रेक्षणीय आहे. मद्याच्या धुंदीने अकबराचा न्यायाचा तराजू तुच्छ लेखणारा सलीम पुढें वयांत आल्यावर मदिराक्षीच्या प्रेमाच्या धुंदीने अकबराच्या न्यायाच्या तराजूला चांगलाच गोत्यांत आणतो. सलीम आणि अनारकली यांच्या प्रेमप्रकरणांत अनारकलीची कसलीहि चूक नाहीं ही गोष्ट अकबराला मनांत माहीत असते. ती दासीची मुलगी असल्यामुळेंच भारताच्या भावी बादशहाशीं तिचें लग्न होणे इष्ट नसते. पण सलीमच्या प्रेमधुंदीमुळें अकबराच्या न्यायाचा तराजू दोलायमान गतींत सांपडतो. तो अनारकलीला अन्यायानें शिक्षा देतो. पण जेव्हां अनारकलीची आई अकबराने दिलेली आंगठी दाखवून त्याला त्याच्या वचनाची आठवण देते तेव्हा अकबर हीं आंगठी दासीच्या हातून प्रथम उडवून लावतो. पण जेव्हां ती आंगठी न्यायाच्या तराजूत अचूक जाऊन पडते तेव्हां पुन्हां अकबराची न्यायबुद्धी जागी होते. म्हणून अनारकलीला भिंतींत चिणून मारल्याचा तो जाहीर देखावा करतो—सलीम आणि लोक यांच्या समजूतीसाटीं—तरीहि तो अनारकलीला गुप्तपणे वांचवतो व तिच्या आईच्या स्वाधीन करून त्यांना दिल्ली सोडून जाण्यास सांगतो

अनारकलीचा हा शेवट योग्य आहे कीं अयोग्य हा प्रश्न आहे. अनारकलीची कथा ही ऐतिहासिक हकीकत नसून ती एक प्रणयरम्य दंतकथा आहे. तिला इतिहासाचा आधार नाममात्रच आहे. त्यामुळें मुगले आझममधील अनारकलीचा शेवट इतिहासाला धरून आहे की नाहीं या वादाला माझ्या दृष्टीनें काडीचेहि महत्व नाहीं. कारण मुळांतच अनारकलीची कथा ऐतिहासिक सत्य नव्हे. म्हणून 'मुगले आझम' मधील शेवट हा कलेच्याच दृष्टीनें तपासला पाहिजे. त्यांतहि आणखी एक गोष्ट ध्यानीं घेतली पाहिजे कीं हा चित्रपट अकबराचा आहे, अनारकलीचा नव्हे. अकबराने दिल्लीच्या बादशाही तक्तावर बसून

## फेरफाराचें फळ

**भूगोलाचे शिक्षक वर्गांत भूगोल शिकवित होते. पृथ्वीचा आकार वगैरेबद्दल माहिती सांगत होते. मध्येंच त्यांनीं गंपूला प्रश्न विचारला, "कायरे, पृथ्वी गोल असायच्याऐवजीं चौकोनी असती तर काय झालं असतं?"**

**"झालं असतं म्हणून काय विचारता सर? मी परीक्षेत असंच लिहिलं होतं आणि भूगोलांत चक्क नापास झालों. पृथ्वी चौकोनी असती तर यापेक्षां आणखी काय व्हायला पाहिजे?"**

नूतन वर्षाभिनंदन
मामा काणे यांचें
स्वच्छ उपाहार गृह
(स्थापना १९१०)
दादर, मुंबई नंबर २८.

त्या तक्ताची शान राखण्यासाठीं अनारकलीला शिक्षा दिली. अनारकलीपायीं त्याचा मुलगा सलीम याने बंड केले होते त्याचा हा परिणाम होता. पण बंड केलें सलीमने आणि शिक्षा अनारकलीला हा अन्याय होता. तक्तनशील अकबराला राजवटीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें हा अन्याय करणे भाग होते. पण व्यक्ती या नात्यानें अकबराला न्यायाची जी टोचणी होती तिचे समाधान करण्यासाठीं आणि दासीला न्यायाच्या तराजूसमोर त्यानें दिलेल्या वचनपूर्तीसाठीं, अकबराने अनारकलीला गुप्तपणें वांचवून आपल्या मनाचे आणि दासीचें सांत्वन केलें आहे. आपल्या हातून होऊं पहाणारा एक अन्याय त्यानें आपल्याच हातून दूर ठेवला आहे. अकबराच्या दृष्टीनें हा शेवट अपरिहार्य होता. अनारकली मेल्याचें दाखवले असते तर अकबराच्या मोठेपणाला तो मोठाच कलंक राहिला असता यांत शंका नाहीं.

अकबराचें व्यक्तिमत्व प्रकट करण्याच्या हेतूनेंच हा बोलपट काढलेला असल्यानें त्यांतील सारे प्रसंग त्याच एका दृष्टीकोनांतून पाहिले पाहिजेत. अकबर राज्यकर्ता आणि कुटुंबनेता या दोन्हीं नात्यांनी कसा होता याचे हें चित्रण आहे. सलीम व अनारकली यांचें प्रेमप्रकरण ही घटना अशी होती कीं, तिचा संबंध अकबराच्या कौटुंबिक जीवनाबरोबरच त्याच्या राजनीतीशींहि पोंचत होता. अकबर ज्या ज्या वेळीं तक्तनशीन आहे त्या त्या वेळीं तो राज्यकर्ता या नात्यानें कठोर न्यायनिष्ठुरतेनें वागतो. पण ज्यावेळीं तो अंतर्गृहांत असतो तेव्हां त्याच्या मनाचा कोमलपणा प्रगट होतो. सलीमबरोबर युद्धासाठीं जावयास निघतांना, रीतिरिवाजा-प्रमाणें, जोधाबाईनें तलवार स्वतः अकबराच्या हातीं देण्याचे नाकारतांच कर्तव्यकठोर अकबर तिच्याच हातून तलवार घेण्याचा निश्चय करून त्या खटक्यांत तिच्या कपाळीचे कुंकू देखील पुसण्यास अवमान करीत नाहीं. पण तोच अकबर प्रत्यक्ष रणक्षेत्रावर स्वतः एकटा सलीमच्या भेटीस येऊन त्याची समजूत घाल-ण्याचा प्रयत्न करतो. अशी अकबराच्या मनाची अनेक आंदोलनें या चित्रपटांत पहावयास मिळतात.

अकबराच्या काळांत मोंगली सत्तेचा उत्कर्ष-बिंदु झाला होता. त्या वैभवाला साजेशा प्रचंडपणानेंच हा बोलपट सजलेला आहे. अकबराचा दरबार, त्याचे महाल, त्याचे निवासस्थान, त्याची युद्धनीती, कौटुंबिक वागणूक, परिजनाशीं होणारी वागणूक, तत्कालीन पोशाख व रीतिरीवाज, तेव्हांचे शिल्प, सारे सारे कांहीं या चित्रपटांत बारकाव्यासह पण पूर्णपणें ऐतिहासिक स्वरूपांत दाखवण्यांत आलेलें आहे हा चित्रपट पहात असतांना आपण सोळाव्या शतकांतच वावरत आहोंत असाच भास प्रेक्षकांना सतत होत रहातो. चित्रपटाचा मोठा गुण हा कीं, अकबरकालीन जीवनाचे यथातथ्य स्वरूप हुबेहुब पडद्यावर प्रगट झालेले असल्यामुळें हा चित्रपट पाहून झाल्यावर त्याच्या दर्शनाचा कलात्मक आनंद दीर्घकाळ मनांत रेंगाळत राहातो. या चित्रपटांतील मोंगली शिल्प मनः-श्चक्षूसमोर नंतर कित्येक दिवस जसेच्या तसे तरळत राहाते. या चित्रपटांतील शिल्प आणि त्यांतील पात्रें व प्रसंग प्रेक्षकाच्या मनाची जबर पकड घेतात यांतच त्याच्या सर्वांगीण यशाची ग्वाही आहे.

मुगले आझम चित्रपटाच्या प्रचंडपणाला दिग्दर्शक के. असिफ यांनी कल्पकतेची आणि काव्यमयतेची आपल्या दिग्दर्शन चातुर्यानें जोड देऊन या प्रचंडपणाला विलक्षण हृदयंगमता आणलेले आहे. अनारकली आणि सलीम याज-मधील कमल–पुष्पांच्या जलमार्गानें झालेला पत्रव्यवहार, या दोघांच्यामधील मेणबत्तीच्या प्रकाशांत झालेल्या पहिल्या भेटीचा प्रसंग, (मेणबत्ती म्हणजे शमा. उर्दू साहित्यांतील शमा परवाना या प्रेमाबाबतच्या सुविख्यात काव्यमय संकेताची येथें अतिशय हळुवारपणे सूचना दिलेली आहे); तानसेनच्या संगीताच्या पार्श्व-भूमीवर, केवळ एका पांढऱ्या, नाजुक पंखाच्या सहाय्यानें, अनारकली आणि सलीम याजमधील प्रेमाच्या विकासाची दिलेली कल्पना, अनार-कलीच्या वधाच्या प्रसंगीं काळ्या पोषाखांतील यमदूतांची केलेली योजना, अशा अनेक बाब-तींत दिग्दर्शकाने दाखवलेल्या काव्यमयतेचा आणि कल्पकतेचा प्रत्यय येतो. मुगले आझम चित्रपटाचे प्रचंड, मोंगली शिल्प आणि या चित्रपटांतील कथानकाच्या विकासाच्या कामी दिग्दर्शकाने दाखवलेले हे काव्यमय, नाजुक कल्प-कतेचे शिल्प यांत कोणत्या शिल्पाला जास्त शाबासकी द्यावी याचा रसिकाला क्षणभर संभ्रम पडल्यावांचून राहात नाही.

दिग्दर्शक के. असिफ यांना त्यांच्या कलावं-तानीं आणि चित्रतज्ञांनी सर्वतोपरी सहाय्य केलेलें आहे. या चित्रपटाचे संवाद आणि संगीत यांनी मुगले आझमचे आकर्षण वाढविण्याचेच

## टेबल लॅम्प जळतो आहे

टेबल लॅम्प जळतो आहे
हातीं आहे फाऊन्टन पेन
करते आहे वेड्यावाणी
आराधना प्रतिभेची मन...

टेबल लॅम्प जळतो आहे
त्याच्यासोबत जळतें आहे
मेलेलें मन विषण्ण अंतःकरण
मात्र पाऊस पाडते आहे

तुझी आठवण तुझी आठवण
सारखा पाऊस पाडते आहे
हातीं आहे फाऊन्टन पेन
टेबल लॅम्प जळतो आहे ..

टेबल लॅम्प जळतो आहे
त्यालाच फक्त ठाऊक आहे
माझी व्यथा, कारण विचारा
नेहमीं माझ्या सोबत आहे

-रघुनाथ हडकर

For Fine Furniture
**Unity Construction**
(BUILDERS AND CONTRACTORS)
Agakhan Bldg., 2nd Floor,
Dalal Street, Fort, BOMBAY 1

कार्य केलेलें आहे. अमान ( अमानुल्लाह खान ) एहसान रिझवी, कमाल अमरोही, वजाहत मिर्झा या चित्रसृष्टींतील चार अग्रगण्य उर्दू संवाद लेखकांची बुद्धी व लेखणीं सतत झिजण्यामुळेंच या बोलपटाच्या संवादांना खटकेदारपणा बरोबरच काव्यमयता, रचनासौंदर्य आणि अर्थगांभिर्य यांचा मुबलक लाभ झाला आहे. केवळ या संवाद सौंदर्यासाठीं देखील उर्दू भाषा जाणणारे हा चित्रपट पुन्हां पुन्हां पाहिल्यावांचून राहाणार नाहींत. या चित्रपटाची गाणी शकल बदायुनी यांनीं रचली आहेत, ती चांगली आहेत पण संवादांतील उर्दू भाषाविलासाशी गाण्याची परिचित हिंदी भाषा कांहींशी विसंवादी वाटल्यावांचून रहात नाहीं. नौशाद यांनीं चाली चांगल्या दिल्या आहेत आणि उस्ताद बडे गुलामअल्ली खांसाहेब, लता मंगेशकर, शमशाद बेगम, महंमद रफी यांच्या गळ्यांतून हे संगीत ऐकूं आल्यानें ते श्रवणीय झालेलें आहे. जब प्यार किया तो डरना क्या, शुभदिन आयो राज दुलारी, प्रेमजोगन बनके, तेरी महफिल में किस्मत आजमा कर हमभी देखेंगे, इन्सान किसी दुनियामें एकबार मुहुब्बत करता है, हीं गाणीं सुरेख आहेत. पार्श्वसंगीत जास्तच प्रभावी आहे. नौशाद यांनीं या चित्रपटाच्या संगीतानें आपल्या टोपींत एक नवा शोभिवंत तुरा खोवला आहे खास,

अभिनयदृष्ट्या चित्रपट प्रेक्षणीय आहे. पृथ्वीराज, दिलीपकुमार, मधुबाला, अजित, कुमार, शैला दलाया, मुराद, दुर्गा खोटे आणि निगार सुलताना, या सर्वांनीं आपापल्या अभिनयानें चित्रपटाची उंची खूपच वाढवली आहे. अर्थातच याचें श्रेय जितके या कलावंतांना आहे तितकेंच ते दिग्दर्शक के. आसिफ यांनाहि दिले पाहिजे. या कलावंतांबरोबर चित्रपटाचें छायालेखक श्री. रामेश्वर माथूर यांना 'मुगले आझम' च्या चांगुलपणाचें फार मोठे श्रेय दिले पाहिजे. आजवर भारतांत कोठल्याहि छायालेखकानें केलेली नसेल इतकीं उत्कृष्ट, अर्थपूर्ण आणि प्रभावी फोटोग्राफी त्यांनीं केली आहे. रंगीत फोटोग्राफीहि त्यांनीं सुंदर केलेली असून रंगीत नृत्यांच्या वेळीं नृत्याची प्रतिबिंबे, शीशमहालांतील कांचेच्या भिंतीवर उमटतात ते देखावे तर अप्रतीमच आहे. माथूर हे होलिवुडच्या एम्. जी. एम्. आणि वटेन्टीएथ सेंचरी फॉक्स या चित्रपट संस्थांत छायालेखन शिकून आलेले आहेत. त्यांचे त्यांनीं मुगले आझममध्यें चीज करून दाखवले यांत शंका नाहीं. कलादिग्दर्शक एम्. के. सय्यद, संकलनकार धर्मवीर, ध्वनिलेखक अक्रम शेख, नृत्य दिग्दर्शक लांछु महाराज, रंगभूषा पी. जी. जोशी, या चित्रंतंत्रज्ञांनाहि चित्रपटाची शोभा वाढण्यास अव्वल प्रतीचें सहाय्य केलेलें आहे.

सर्वांच्या सांघिक सहकार्याचा एवढा प्रचंड यत्न यापूर्वीं भारतांत कधींच झालेला नाहीं. मुगले आझमचें वैशिष्ट्य हेंच कीं, या चित्रपटाच्या रसांनसांत प्रचंडपणा ओतलेला आहे. 'माझें स्वप्न साकार झाले ' असे धन्यतेचे उद्गार निर्माता-दिग्दर्शक के. असिफ यांनीं काढले ते चित्रपट पाहिल्यावर यथार्थ वाटतात. प्रेक्षकांना हा चित्रपट एखाद्या अद्भूत स्वप्नासारखा. आकर्षक आणि अविस्मरणीय वाटतो.

★ ☆ ★

## जगविण्याचें कारण

रामभाऊ गेलीं दोन वर्षे आजारीच होते. विविध रोगांनीं ते अगदीं टेकीला आले होते. त्यांतच औषधे, टॉनिकें, इंजेक्शन्स, पथ्यपाणी यांचा प्रचंड खर्च. एके दिवशीं आगतिक होऊन त्यांनीं डॉक्टरला विचारलें-" डॉक्टर, मी या आजारांतून वाचेन का हो ? मला तरी कांहीं आशा वाटत नाहीं. "

डॉक्टर त्यांना धीर देत म्हणाले- " नक्की वांचाल. मी तुम्हांला मरूं देणार नाहीं. "


आनंदित चेहऱ्यानें रामभाऊंनीं विचारलें- " खरंच डॉक्टर, मी मरणार नाहीं ! "

" हो, अगदीं खरं. " डॉक्टर म्हणाले- " कारण तुमच्याकडून अजून माझं खूप बिल वसूल व्हायचंय. "


★

A PLATO 66 PEN IS THE PEN FOR ALL

*because of its strong, smooth, sturdy nib; its easy flow of ink; reliable workmanship and attractive appearance.*



*Plato Pens are available in a price range of Rs 4 to 27.50*

PLATO REGD.

plato 66

A MHATRE PRODUCT

Sole Distributors:
THE BEST FOUNTAIN PEN DEPOT
P.B. No. 2421. Bombay-2

shilpi M.P. 634

★

# दुनिया बडी है संगदिल—

श्रीकान्त पुरोहित
बी. ए

**तारुण्याच्या परिसरात स्वप्नांचें निळें जलाशय जागोजागीं विखुरलेलें असतात. रंगीबेरंगी गोड, सुखी कल्पनाचीं पांखरें पंखात वारा भरून मनावर घिरट्या घालीत असताना त्यांच्या अबोल, धुंद सांवल्या जलाशयावर उतरल्या म्हणजे एकाएकी जीवन सुंदर दिसूं लागतें. नकळत सभोंवार पसरलेल्या जगावर अनिर्बन्ध प्रेम करावेंसें वाटतें. मेघा यांच अवस्थेतून जात होती. नव्या अनुभूतिचा अनुभव देणारा हा स्वप्नील भास तिच्या पूर्वजीवनातलें उदासवाणें चित्रण पुसून त्याजागी भावी जीवनाचें नयनमनोहर चित्र कोरूं लागे. क्षणभर ती बावरी व्हायची. कधींच पूर्वीं न फिरकलेलें सुख अवचित दारासमोर येऊन उभें राहिल्यावर त्याचें स्वागत तरी कसें करायचें? शिवाय या अनोळखी पांथस्थाला जीवनाचें कवाड उघडून, विश्वासानें आंत घ्यायचें कां? न जाणो सुखाऐवजी हा सारा सुखाचा भासच असेल? ही केवळ सुखाचीं सांवलीच असेल. सुखाचें सोंग घेऊन दुःखच पुन्हां दारी आलें असेल. ‘संगदिलो कीं दुनियेत’ मेघाला आलेला संशय कसा खरा ठरला, त्याचीं ही हृदयस्पर्शी काव्यमय कथा!**

वीज आभाळावर चहुदिशांना स्पर्श करीत पसरत विस्तारली तेव्हां माझ्या मनांत दाट अंधेरा पसरला. क्षणापूर्वीं मी खिडकीच्या चौकटीतून दिसणाऱ्या जगाकडे त्रयस्थपणें पहात होतें. परकेपणाची एक पोरटी भावना अलिकडे माझ्यामध्यें वाढीस लागली आहे. खूप वेळां मी उपरी आहेसें वाटूं लागतें. इथला जीवनाचा सूर अद्यापहि मला बरोबर पकडता आला नाहीं. इथें, या जगांत, इतकें दिवस राहुनहि मला दुनियेचा ताल पकडणें अद्याप जमलें नाहीं, मी इथें रमलें नाहीं, फक्त उरलें आहे! मला सारेंच दूरचें वाटतें. ओळख असूनहि अनोळखी वाटतें. दुनियेचें गडद-गहिरें रंग कधींच माझ्या डोळ्यांत ठसलें नाहींत. माझ्या नजरेसमोरच्या दुनियेचें रंग क्षणाक्षणाला बदलत होतें. दुनियेचा खरा-रंग कोणता हे आजहि मला सांगतां येणार नाहीं. हें रंगकोडें मला कधीं उकलेल कुणास ठाऊक. कदाचित् उकलणारहि नाहीं. पण असें फार वाटतें. हे रंगकोडें ज्याला उकलले आहे असा जादुगार भेटावा......

मघांपासून कोसळणारा पाऊसहि मला दूरस्थ भासत होता. आज सकाळपासुन पावसानें मनावर घेतलें होतें. त्याला मुळीं खळच नव्हता. त्याला नुसता चळ भरला होता. तुफान वाऱ्याला संगतिला घेऊन त्यानें जों खेळ मांडला होता तो लवकर संपण्याचें कसलेंच चिन्ह दिसत नव्हतें.

दुपारपर्यंत कामामुळें उंसत मिळाली नाहीं. कामाच्या रगाड्यापुढें निसर्गाचे खेळ पाह्याला कुठली फुरसत सांपडायला. आज रविवार म्हणुन हा घरचा सहवास अन् बंदिवास लाभत होता. नाहींतर शाळा रोज असतेच. संध्याकाळ झालीं तेव्हां खिडकीचा सरक-पडदा दूर सारला तो कंटाळवाण्या, अडून बसलेल्या वेळेला घराबाहेर दवडण्यासाठींच! लग्नावस्थेपूर्वी कातरसांजेला कंटाळवाण्या मन स्थितिचें वरदान असतें. माझी तर बात निराळी. नैराश्याच्या सीमारेषा. या विविक्षीत कालाला व सांप्रतच्या जीवनाला स्पर्श करूं लागलेल्या होत्या. आतां वाटतें संध्याकाळीं घरच्या जुजबी कामाला जुंपून घेतलें असतें तर अधिक बरें झाले असतें. चुकीची चुकचुक मनाला चांगलीच झोंबणारी असतें यांचे प्रत्यंतर आतां मला चांगलेच घडत होतें. खिडकीचा सरकपडदा दूर सारताना मी अहेतूक होतें. माझा उद्देश फक्त प्रकाश आंत यावा या कल्पनेच्या पोटी जन्माला आला होता जन्मभर काळोखांत वावरलें, नांदले. प्रकाशाचा उरि निजध्यास जपत. खिडकींतून दिसणाऱ्या सजिव जगाच्या हालचालीविषयीं मी बरीच उदासीन अन् कांहींशी बेफिकिरहि होतें. त्या जगाशी माझा तसा कसलाच संबंध नव्हता. मी तशी मनाशीं खूणगाठच मारली होती. मी तिथें वावरत असूनहि तिथली नव्हतें. अगदीं कमलवर्ण अन् जळाच्या नात्यासारखी! मी जगाचें कसलेंच देणें लागत नव्हते. ही माझी कल्पना. प्रामाणिक, सत्याधिष्टीतहि! उलट जगानें मला खूपच द्यायचें होतें. दिलें मात्र कांहींच नव्हतें. मग मला कुठून वाटावा आपलेपणा जगाविषयीं. स्वतःच्या जीवनाविषयीची ओढ अन् प्रिति मी अशीच दूर भिरकावून दिली होती. भक्ति करायच्या वयांत मी भक्ति केली. प्रीत करायच्या वेळीं मी निष्ठेनें प्रीति केली. जीवनाची भावपूजा बांधतांना मी लवलेशहि स्वार्थ पाहिला नाहीं. तिथेंच माझी अन् दुनियेची फारकत झाली. व्यक्तित्व, स्वार्थ विसरून जगणाऱ्या, त्यागानें दुसऱ्याचीं भाववृत्ती फुलवायला निघालेल्या माणसाला दुनिया वाळीत टाकतें यांचे प्रत्यंतर मला लवकरच आलें.

कामातून बाहेर पडल्यावर, खिडकीजवळ खुर्ची ओढताना मी मनाशीं ठरवलं होतें, आज शरद्बाबूची कादंबरी पुरी करायची. मला या बंगाली थोर साहित्यिकाच्या कादंबऱ्या तासन् तास वाचीत बसायचें जबरदस्त वेड होतें. त्यांनी रंगवलेली जीवंत चित्रें न्याहाळतांना मी कैक वेळां गहिवरून आलें होतें. त्यांच्या पात्रांची उदात्त त्यागवृत्ति, आपल्या प्रेयसीसाठीं सर्वस्वानें जीवन उधळून द्यायची बेफिकिर वृत्ती, मी निहायत खूष होते ती इथेंच! वास्तवात माझ्याभोंवती माझ्या वृत्ति प्रतिबिंबित न करणारी माणसें मला त्यांच्या कादंबरीत भेटत होती. मला त्यांच्याबद्दल अनिवार ओढ लागत होती.

मी नकळत त्या काल्पनिक पात्रांवर जीव जडवूं लागलें होतें. त्यांच्या माझ्यातला सारखेपणाचा दुवा शोधूं लागलें होतें. अखेर जीवनाचें धागे गुंतलेले असतात ते अशाच पवित्र अन् उदात्त भाववृत्तींशीं. जीवनांत माणसांनीं माणसावरचा मागोवा घ्यायचा असतो. माणसानीं माणसाच्या अनमोल भाववृत्ती जपायच्या असतात. अखेर माणसानीं माणसांवर प्रीत केली तर ती प्रीति पुढें अधिक बहरते, फुलून उठते. पण बाजारू जगांत लोक बहुशः मार्ग चुकतात. प्रीतिची एकच बाजू त्यांना दिसत असते. भोग अन् स्वार्थ यांनी सजलेली प्रीतिच त्यांना अभिप्रेत असते. मला भेटलेलें वडिल असें होतें, आई तोच नमूना होता. अर्धा नवरा अन् अर्धा प्रियकर त्यांच्य त एक कदम आगे होता. प्रत्यक्ष माझ्या पित्यानें माणुसकीला अव्हेरून स्वार्थाला जवळ केलें होतें. खोट्या कर्तृत्वाला, वैभवाला त्यांनी साथीला घेतलें होते.

स्वतःचें जीवन दुसऱ्याच्या जीवनाशी एकरूप करणें त्यांना कधीं जमलेंच नाहीं जमण्यपेक्षां ते त्यांना आवडणारें नव्हते. शिवाय त्यांची स्वतःची रूपें तरी किती विविध होती. आई तर बोलूनचालून त्यांचेच अर्धांग. ती तसें वागली ती स्वार्थानें असें फारतर म्हणतां आलें असतें पण सुधीरनेंहि तसेंच वागावे ? त्याच्या सुखासाठीं मी सर्वस्वानें झगडल्यावरहि ! त्यांच्यासाठीं मीं सुख झुगारलें, नीति धुडकावली. याचीहि त्यानें दखल घेऊं नये ? मी त्याला प्रेम दिले. अन् त्यानें मला दुःख. माझा अन्त पाहल्यावरहि त्यांच्यातील रामपुरुष जागा होऊं नये यांचे मला वैषम्य वाटलें.

तसें माझें भोंवतालचे जग धीटुकलें, टीचभर ! माझ्यासभोंवती माणसेहि दीर्घकाल वावरणारी ती हीच काय ती तीन. याखेरीज मी समाजात वावरलें, उठलें, बसलें. पण कांहींशा अलिप्त वृत्तीनें माझ्या मनावर संकोचाचें भले मोठें ओझें होते. दुनियेविषयीं माझ्या मनांत अनादर होताच पण त्याहीपेक्षां भीति अधिक मोठी होती. माझ्या अंवतीभवती वावरलेल्या माणसानीं दाखविलेल्या वागणूकिच्या विचित्र स्वरूपानें मी इतकी हबकलें होतें कीं अशा वावरणाऱ्या इतरत्र जगांतील माणसांबद्दल मला पूर्वग्रह दुषितामुळें कधीं प्रेम वाटलेंच नाहीं सहानुभूतिपोटी तरीहि मी जगाचे भले करीत राहिलें. दुनियेची उफराटी वागणूक स्विकारीत, उपकार पदरांत घेत.

आज अगदीं लहानपणीची गोष्ट आठवतें आहे. मांजघरांत मांजर व्यायली होती. तिचीं पांचसहा पिल्लें एका टोपलीत ठेवली होती. टोपलीतून चिमणें आवाज येऊं लागलें तेव्हां मी त्या आवाजांचा मागोवा घेऊं लागलें. पांचसहा वर्षांचे वय. त्या टोपलीत ती मांजराची पिल्लें मला सांपडल्यावर मी आनंदानें हरखून गेलें. माझं त्या गोजीरवाण्या पिल्लावर मन गेलें. मी त्यांना बशी घेऊन दूध देऊं लागलें. हळूंहळूं पिल्लें खेळूं लागली. संध्याकाळची पोरें त्या मांजराना खेळविण्यासाठीं अंगणांत नेत. माझं पिल्लावर बारीक लक्ष असें.

एक दिवस पोरांना ऊत आला त्यांनीं त्या पिल्लांचें हाल सुरू केलें. कुणी त्यांचें पाय ओढूं लागला. कुणि कान, कांहींनी तें किति उंचावरून उडी मारूं शकतें हें पाहण्यासाठीं पिल्लें उंचावरून खालीं टाकण्यास सुरवात केली. एकानें पिल्लें चेंडूसारखी वर उडवायचीं कल्पना काढली. प्रयोगाला सुरवात झाली. पिल्लांचें हाल मला पहावेनात. मी पुढें झालें. मुलांना पिल्लांचें हाल न करण्याविषयीं विनवूं लागलें. पण एकालाहि दया आली नाहीं. एका उन्मादात तें पिल्लें खालीवर उडवित राहिले. उलट त्या सर्व पोरांनीं मला घरी पळवून लावलें. मला खड्यसारखी दूर पाहून सर्वांनीं मिळून माझ्याशीं भांडण केलें. त्यावेळेंस घडलेले दुनियेचें अल्पस्वल्प दर्शन समजण्याइतकी उमज मजपाशीं नव्हती. कां कुणास ठाऊक इतकें वर्षे तो प्रसंग मी न विसरतां मनांत जपून ठेवला आहे. त्याचा अर्थ आतां लागतो आहे.

तेव्हां अन् पुढेंहि त्या पिल्लांचें हाल करणाऱ्या दुष्ट अन् वात्रट पोरांशीं माझें पटलें नाहीं. थोड्याफार प्रमाणांत हीच गोष्ट इतर प्रत्येकांच्या बाबतींत घडली. पूर्वीं अन् आतां.

त्यानंतर मी वाढलें. शाळेंत जाऊं लागलें. घरांत मी एकुलतें एक मूल. माझ्या पाठीवर कुणि झालें नाहीं. तरीहि माझें कौतुक झालें नाहीं. माझ्या लहानपणीं घरी थोडिशी गरिबी होती. पण गरीबीतला आनंद नव्हता. गरिबी असतांना तो नव्हताच अन् सरल्यावरहि आला नाहीं कळायला लागल्यावर मला खूप वाटायचें. एखाद्या सुखी महात्म्याला विचारावें, ‘ आनंद कसा असतो रे ? ’ मला आनंद ओझरता दिसला. निर्भिड अंधकारात वीज क्षणमात्र तळपून कोसळून जावी तसा. पण कुणि सुखी महात्मा भेटला नाहीं. शाळेंत जायला लागल्यावर वडिल अभ्यासाचा धोशा सतत माझ्यामागें लावित. मी हुशार व्हायचें होतें. शिष्यवृत्ति मिळवित फुकट शिकायचें होतें. बुद्धी अन् हुषारची कलदार नाणी मोजून मी शिक्षण विकत घेतलें. मला वडलांचा धाक, राग कळत नसे. समजत काय ते आईचें अश्रू ! ते माझ्या अगदीं काळजाला जाऊन भिडत. वाटे या खाऱ्या पाण्यात

## दोन कविता

उन्हास मिळतां स्पर्श केसरी
मौनाचें मग बंधन तुटतें
संथ निळ्या या पाण्यावरती
हलकें हलकें गाणें फुटतें

आकाशाच्या दीर्घ व्यथेला
मिळतो आणिक एक दिलासा
पर्णांच्या पाचोळ्यांतूनहि–
हलका उठतो एक उसासा

मौन झुगारून पिसाट सुटते
लहर वायुची पिऊन चंदन
मिठी व्यथेची उन्हास पडतां
गीताचें मग होतें बंधन !

● ●

धुकें मनांतिल–
विरल्यानंतर
पुन्हां सुखाचा भास कशाला
पंख रुपेरी–

गळल्यानंतर
उडण्याचा हा ध्यास कशाला
हवे नकोचा
सरता सीमा
मीच बनावें दुःख विदारक
अन् श्रांताच्या
उंबरठ्यावर
मीच बनावें सुख संजीवक !

● ●

–प्रा. प्रभाकर बिडवे

जीवनसर्वस्व आहे. जीवन अमुलाग्र बदलून टाकणारी क्रान्तिशाली दिव्यशक्ति आहे. मी तें अश्रू निष्ठेनें भाळी लावलें म्हणूनच आयुष्यात दुःख कां होईना माझ्याशीं सुखानें नांदले.

वय डोकें वर काढीत असतांना मी शिक्षण संपवले. तारुण्याच्या परिसरात स्वप्नांचे निळे जलाशय जागोजागी पसरलेले असतात. गोड, सुखी कल्पनांची पाखरें पंखात वारा भरून त्यांवर घिरट्या घालूं लागली म्हणजे त्यांच्या अबोल धुंद सांवल्या त्या जलाशयावर पडतात. मग एक नवी दृष्टि येते. सारें जग सुंदर दिसूं लागतें. नकळत जीवनावर खुपसें प्रेम करावेसें वाटूं लागतें.

ज्या वयांत मुलींनां थट्टेनें चिडविण्यांत, त्यांच्या लग्नासंबंधीचे विचार बोलून दाखविण्यात येतात त्या वयात आबांनीं मला नोकरी करण्यास सूचविलें. घरची स्थिति म्हणावी तितकी वाईट नव्हती. तरी माझ्या लग्नापुरतें पैसें मी जमवावें असा उदात्त दृष्टीकोन त्यांचा होता. गृहप्रवेश करून एखाद्याचा संसार सजविण्याऐवजीं मी शाळेंत शिरून नोकरीचा आधार घेतला.

पैसें जमत होते अन् वय वाढत होतें. मूळच्या नाजूक रूपाला आतां निबरपणा जाणवूं लागला होता. ओठांच्या कोपऱ्यातून स्मित रुसून निघून गेले होतें. डोळ्यातल्या आनंदाच्या छटा कारुण्याचें गहिरें रंग लेवूं लागल्या होत्या. पुढें पळणाऱ्या वगाला, जीवनाला क्षणभर थांबवावेसे वाटत होतें. प्रेमापोटी आई कधीं कधीं लग्नाचा विषय काढी. आबा त्याला फाटें फोडित. तिला थोडासा धीर धरण्याविषयीं सूचवित. मग प्रकाशाला डावलून अंधार आजूबाजूला वस्ती करायला येई. वाटे आतां तो डोळ्यांपुढून कधीं हालणारच नाहीं. प्रकाशाची गांठभेट केव्हां होणार कुणास ठाऊक ?

माझ्या मनांत धीर गोळा होऊं लागला तो अण्णासाहेबांचें पत्र आल्यावर! अण्णासाहेब माझ्या आईचें दूरदूरचें मामेभाऊ. त्यांच्या मुलाला मुंबईच्या कॉलेज-वसतीगृहांत जागा मिळाली नव्हती. त्यांनी एक वर्ष सुधीर तुमच्याकडे राहुं दे कां म्हणून विचारलें होतें. आबांना ही संधि कामधेनू वाटली.

मी मुलींच्या शाळेंत शिकलें. नोकरी धरली तीहि मुलींच्या शाळेंत. त्यामुळें मुलांचा सहवास ही माझ्या दृष्टीनें वास्तवातली गोष्ट नव्हती. ती मी एक स्वप्नातली अन् काल्पनिक कथा-कादंबरींतील घटना समजत होतें. स्वप्नसुद्धां आयुष्यांत केव्हां केव्हां जगावें लागतें असें मी कुठेंतरी वाचलें होतें. मी माझ्या जीवनात लवकरच उमलणाऱ्या स्वप्नाची वाट पाहण्यात रंगून गेले उषेनें जसें अनिरुद्धाचें चित्र कल्पनेनें काढलें तसें सुधीरचें चित्र मी हजारदां-तरी कल्पनेनें रेखाटलें असेल. प्रत्येक खेपेस ते अपुरें भासायचें.

सुधीर जूनच्या अखेरच्या आठवड्यांत आमच्या घरीं येऊन थडकला. माझ्या कल्पनेंत अन् सत्यांत बरेंच अंतर पडलें. पण हे सत्य कटू नव्हतें. फार गोड होते ! म्हटले तर कृष्ण सांवळा म्हटलें तर निमगोरा असा हा सुधीर बोलायचा फार गोड. शब्दानें माणसांना भूल पाडायचें मोठें मधुर अस्त्र त्याच्याजवळ होतें. सुधीर मला आवडला. पण अधिक आवडला तो आईबाबांचा दृष्टिकोन !

तो घरी येतांच आईनें मला एका बाजूला नेलें. समजावणीच्या स्वरांत दटावलें, ‘ हें बघ वेंधळें, थोरामोठ्या घरचा आहे हा पोरगा. त्याच्याशी खेळीमेळीनें बोल, गोडीगुलाबीनें वाग. तुला एकलकोंड्या अन् तुसड्या वातावरणाची संवय झाली आहे ती सोडून दे. नाहींतर नवख्याला बुडाल्यासारखें होईल !’

हें आश्चर्य होतें पण महद्‌आश्चर्य होतें तें आबांचें वागणें. सकाळ झाली कीं आबा आम्हा दोघांना बाहेरच्या खोलीत एकटेच सोडून खुशाल बाहेर पडत. संध्याकाळीं मी शाळेंतून परत आल्यावर माझ्याकडे कौतुकानें पहात म्हणत, ‘ अग कंटाळला असेल सुधीर आतां अभ्यास करून. जा आतां बाहेरून एखादी चक्कर टाकून या. तेवढेच हलकें वाटेल. हुषारी येईल ! ’ मी बळेबळेंच पण मनांतून अनिवार ओढीनें उठे. नंतर आम्ही जोडीनें फिरायला बाहेर पडायचो आबांच्या समजूतदारपणाचें तोंड भरून कौतुक करीत.

आबा–आई मला अधिक जवळची वाटूं लागली. सुधीरला तें माझ्या अंवतीभंवती रंगवत होतें. मलाहि त्यांच्याभोंवती वावरूं देत होतें भाग्याच्या रेषा कुठेंतरी हातांवर फुटूं लागल्या होत्या.

आई-आबा संधि देत होतें. अन् सुखाच्या प्रदेशांत नव्या पांखरासारखी भराऱ्या घेत निघालें होतें.


## सर्व दिवाळी अंक

निरनिराळे १२५ (सव्वाशें) प्रकारचे **एकाच ठिकाणीं** पहावयास, चाळावयास व वाचावयास मुंबईतील **एकमेव ठिकाण** म्हणजेच शांत, हवेशीर व भरपूर उजेडानें युक्त व शिवाय इलेक्ट्रिक पंखे, ट्यूब्स, व आराम खुर्च्यांनी सुसज्ज असा मुंबईतील **एकमेव गोखरकर रीडिंग हॉल,** ऑपेरा हाऊस जवळील २ देवळाच्या चंद्रेश्वर हॉल, ~ रा माळा.

वेळ दररोज सकाळीं ७ ते रात्री ९।।



क्र. क्र. ६७
विभाग
दिनांक, १०/१०/६९
नों. वि. ..................

आठवड्यांत इतर दिवशीं आनंद भेटायचा, पण ओझरता. त्यांची समोरासमोर गांठ पडायची ती शनवार-रविवारी ! विशेषतः रविवारी आम्ही दूरवर फिरायला जायचो. सुटीचा वार असल्यानें घरी परतायची घाई नसायची. सात दिवस ठराविक जीवनक्रमांत कालक्रमणा केल्यानें जगापासून कांहीं काळ दूर व्हायची इच्छा तीव्रतर असायची. अन् नुकताच आम्हांला दुसऱ्या एका स्वप्निल दुनियेचा शोध लागला होता. तिथली वाटचाल, किंचित हुरहुर लावणारी होती. तिथला एकांत सोनेरी होता. आल्हाददायक होता. तिथला शब्द-बोलका होता अन् स्पर्श आशयधन.

वस्तीपासून दूरवर सागरकिनारी वाळूंत बसल्यावर, कधींकधीं अव्याहत बोलणारा सुधीर एकाएकी अबोल व्हायचा. मला त्यांचे उस्फूर्त, पण गोड बोलणें फार आवडत होतें. केवळ मी त्यांच्या शब्दांचा अधिक ध्यास घेतला होता. राधेला जी सुरांची ओढ तीच मला शब्दाची ! सूरांचा मागोवा घेऊन राधा जिथें पोहचली होती तिथेंच मी शब्द घेऊन निघालें होतें. सुधीर असा अवचित अबोल झाला म्हणजे मला त्यांच्या मौनाचें भय वाटायचें. नानाविध शंका मनाचा ठाव घ्यायच्या उगीच वाटायचें आपलें कांहीं चूकलें तर नाहीं ना ? सुधीर आज कां रागावला असावा ? कधींकधीं ही स्थिती दोलायमान व्हायची. तो बोलला. कांहीं काळ गप्प राहून मनाला सूक्ष्म आनंद व्हायचा. एक अगम्य सुख प्रतीत व्हायचें. किंचित न्याहाळून त्याच्याकड बघतांना त्यांच्या डोळ्यांत पडलेलें स्वतःचें प्रतिबिंब दीर्घकाल न्याहाळावेंसें वाटायचें. बोलण्यापेक्षां न बोलताच भावनेच्या उत्युच्च क्षणी कधीं कधीं फार मोठा आशय व्यक्त करतां येतो. मौनच अधिक सुंदर अर्थ सांगते. एखादे वेळेस मी त्याला डिवचून विचारायची.

'विचार करायचें हें वय आहे वाटतें ?'

'अविचाराला सुद्धां वैचारिक बैठक लागतें !'

'इथें विचारवंताची बैठक भरलेली नाहीं म्हटलें. हा आहे सागरतीर. अन् मी ही मेघा.'

'तुझाच विचार करतो आहे !'

'मला न कळवता या सुंदर वेळीं इथें सागरतीरावर.'

'विचार नेहमींच सुंदर वातावरणात जन्माला येतात. अन् प्रत्येक गोष्ट तुला कळवायलाच हवी कां ?'

'कां नको ?'

'तें तुला कळायचें नाहीं. या वयात कांहीं गोष्टी चोरून ठेवण्यांत फार मोठें सुख असतें. अगदीं आपल्या जवळच्या माणसापासूनसुद्धां अन् त्या गोष्टीसुद्धां जवळच्या माणसाच्या !'

'होय !'

'मग मी कसली जवळची. सध्या माझ्यासंबंधीच्या गोष्टीहि मला सांगता येत नाहींत !'

'तुला अगदींच कांहीं कळत नाहीं !'

'मी अगदींच वेडी आहे कां रे !'

'होय अगदीं वेडी. खरीखुरी.'

'पण कुणि केली मला वेडी !'

'ज्यानें वेड लावलें त्यानें !'

'मोठा हुशार दिसतो आहे !'

'छे ! तोहि तुझ्याचसारखा आहे, वेडा !'

क्वचित असला नव्या अनूभुतिचा अनुभव देणारा सुखसंवाद गतजीवनातलें उदास चित्रण हळूंहळूं पुसून त्याजागीं भावी जीवनाचें नयनमनोहर चित्र कोरूं लागे. क्षणभर मी बावरी व्हायचें. कधींच न फिरकलेलें सुख अवचित दारासमोर येऊन उभें राहिल्यावर स्वागत तरी कसें करायचें त्याचे ? शिवाय या अनोळखी पांथस्थाला जीवनाचें दार उघडून एकदम विश्वासानें आंत घ्यायचें कां ? न जाणो

## एक पूजारी

कशास पूजिसि त्या मूर्तिला !
काय आहे त्यांत ?
तुझी प्रेमदेवता...... ?
केव्हांच भग्न झाली आहे ती
आणि आतां उरले आहेत तिचे अवशेष
स्फुंदत स्पंदत
दुःखाने कण्हत, ढाळीत अश्रू ॥१॥
कशास हवी ती तेल-वात
प्रीतिचा दिप केव्हांच मावळला
कशाला तो प्रकाश...... !
प्राणहिन प्रकाश
निःस्तेज प्रकाश...... ॥२॥
कशास हवेत चंदनाचे खडे
त्यांचा वास दरवळेल आणि नष्ट होईल
क्षणभंगूर सुवास
पण......
तुझ्या निष्फळ प्रेमाची कहाणी ऐकावयाची असेल
विसरण्यासाठीं नव्हे तर—
ऐकण्यासाठीं

तर त्या बकुळीच्या फुलांना विचार
त्यांचे दाटलेले श्वास
देतिल तुला
तुझ्या गतप्रेमाचा आस्वाद
तो जिवंत क्षण
अजून त्यांतील स्वप्न बोलकें आहे
हंसरें आहे पण विरलें आहे
साकार असून भग्न आहे.

—रश्मीनी नायक

सुखाऐवजीं हा सारा सुखाचा भासच असला तर ? ही केवळ सुखाची सांवलीहि असेल ! सुखाचें सोंग घेऊन दुःखच पुन्हां दारीं आलें असलें तर ? पण सुधीरची वागणूक पाहिली म्हणजे शंका दूर उडून जायच्या. सुख अन् सुधीर या दोन्ही गोष्टी एका प्रतिमेंत साकार होत होत्या. एखादे वेळेस सुधीर रंगात असला म्हणजें माझा हात हातांत घेऊन मला म्हणायचा. एक प्रसंग...

' मेघा ! '

' काय रेऽ ! '

' अलिकडे मला दुनिया बदललेली दिसतें आहे.

' मलासुद्धां. '

' ही दुनिया इतकीं सुंदर असेल असें मला कधींच वाटलें नव्हतें. हल्लीं जिथें पहावें तिथें मला सादर्य अभिव्यतित झालेलें दिसतें आहे.

या आभाळाचें रंग अधिक गडद अन् सुखासिन झाले आहेत चांदणें हल्ली माझ्याशीं हांसतें. सुगंध माझ्याशीं बोलतो. या वाऱ्याला, त्या चादण्याला, त्या वा याला, त्या सुवासाला साऱ्यानाच हल्ली चेहरें फुटलत ते सारे आनंदानें मला सांगत आहेत. अरे ही दुनिया आनंदानें आकंठ भरली आहे. ये, इथें आमच्यात गाणी म्हणायला ! नाचायला ! हें सुख आतां आपण दाही दिशांतून उधळायचें आहे. गुलालासारखें ! जितक सुख अधिक उधळलं जाईल तितका अधिक सुखाचा वर्षाव होईल आपल्यावर. हा सुखाचा श्रावण आहे. आपण इथें ओलेचिंब होऊं, भिजूं. सुंदर सुंदर गाणीं म्हणूं.

इतकें सुंदर विचार ऐकताना माझ्या भावनाचा तोल सावकाश ढळायचा. त्याच्या दिशेनें सरकत मीहि म्हणायचें.

' सुधीर मलाहि हे जग अवचित सुंदर दिसूं लागलें आहे. मात्र हा साक्षात्कार नवीन आहे. प्रथम होतो आहे. वाटतें या जगावर खूप प्रेम करावें. जीवनाचें वेडें गाणें पुन्हां पुन्हां गात रात्रीची गाणी तारा गातात ना तसे. वसंताच्या सुरुवातीला मधमाशा मध गोळा करतांना गीत गुणगुणतात ना तसें. '

' आपल्या जीवनाची कविता घडते आहे मेघा ! '

' अन् प्रीतिची नौबतहि झडतें आहे सुधीर ! '

' होय ! आतां लवकर, एक दिवस चौघडा झडेल ! '

मंजुळ सनईची साथ घेत !

एका हाताला दुसरा हात आधार होईल !

' इतकें दिवस मनांत रेंगाळणारें स्वप्न साकार होईल. '

' शहनाई फार गोड असतें. ऐकल्येस कधीं. सकाळच्या कोंवळ्या पांखराच्या किलबिलीसारखी !

' सुगंध कां शोधीत फिरतात ? असल्या सुंदर गोष्टी मुद्दाम ऐकाव्या लागत नाहींत. त्या आपोआप कानांवर येतात ! '

' सात पावलांतलें सात सूर आतांच अलगूज वाजवित आहेत माझ्या कानांत. तूला ऐकूं येतात कां गडे हे गोड सूर. '

राधा ऐकत होती तें सूर असेंच होतें कारे ?

' कुणाला माहित ? काळ बदलला तरी बदलल्या नाहींत तीन गोष्टीं ' कुठल्या ? '

' प्रीति, त्याग अन् भक्ति. '

' त्या साऱ्या कल्पना मला मिळवायच्यात. '

' त्यासाठीं माहेराचें अर्ध्य द्यावें लागतें ! '

संसाराचें तिर्थ मिळवायचें म्हणजें त्याग नको कां करायला ?

त्याग करायचा म्हणजे मन मोठें करावें लागतें अन् काळिज लहान !

' पण त्यागाच्या लक्ष पायऱ्याच्या घाटांवरच संसाराचें मंदिर उभवायचें असते. '

' मेघ पाहिलेस किति दाटून आलेत. पखवाज कसा सुंदर घुमतोय. '

' आपल्या नवीन नात्याचें स्वागत करतो आहे निसर्ग. '

' माणसें जवळ येण्यांत इतका कां सुंदर अर्थ असतो ? '

' होय. पण सुधीर या साऱ्यावर स्वप्नाची दाट छाया पडल्यासारखी वाटतेय रे. '

' स्वप्नच फार गोड असतं मेघा ? '

' पण त्याचें आयुष्य रात्रीपुरतें मर्यादीत असतें. '

' आपण त्या स्वप्नाला अमृत पाजू. चिरंजिव करूं ! '

आकाशांत काळे मेघ दाटून येत होतें. वारा किनाऱ्यावरून माडांना हालवित पळूं लागला. लोक भराभर उठले. घराकडे निघाले. मी मात्र प्रकाशांत न्हाऊन निघालें होतें. मला तो सुखाचा मांडलेला ठाव आवरता घेऊन उठायचें नव्हतें. आज पावसाची मला तमा वाटत नव्हती. वाटत होतें, पावसांत भिजावें, धन्य व्हावे. जसें कांहीं सुखांत भिजलें या कल्पनेनें. अखेरं पाऊस आला. सुधीर लगबगीनें उठला. छत्री त्यांच्याजवळच होती. एका छत्रीतून घरी निघालो तेव्हां एकत्र दोघांनीं चिमुकलें स्वतंत्र घरकूल उभारल्याचा आनंद झाला. रस्त्यावर धांवपळ उडाली होती. पण माझें तिकडे लक्ष नव्हतें. माझें विश्व छत्रीपूरतेंच मर्यादित झाले होतें. एका हातांत सुधीर छत्री सांवरत होता. दुसऱ्या हातानें तो मला निकट


*For Your Bright Future*

JOIN

## The Institute of Radio Technology

**( Jestharam Baug, Dadar Tram Junc., Bombay 14. )**

**Gives Intensive Course of High Standard in**

- *Radio Engineering*
- *Radio Servicing Govt. & City Guilds Examinations.*

*Extensive Practicals in Modern Well Equipped Laboratory.*

PRINTED CIRCUIT RADIOS
FOR HOME COSTRUCTION

SIMPLICITY OF CONSTRUCTION,

The use of latest innovations gives maximum simplicity of construction combined with fine quality perfor- . In particular, the PRINTED CIRCUIT greatly simplifies construction and completely eliminates the possibility of wiring errors.

STAR FEATURES

★ PRINTED CIRCUIT size 12 "x6"
★ 5 Valve superheat, All wave.
★ Automatic volume control.
★ Light weight and dignified appearance.
★ Inverse feed back for total quality.
★ Iron cored I. F. For High Sensitivity.

WRITE FOR DETAILS

ओढत होता. त्यांच्या स्पर्शांत सुख होतें. आश्वासन होतें. जरी तो मला नवखा होता तरी त्यांची दाट ओळख भासत होती. पहिल्या वहिल्या स्पर्श मृद्गंधासारखा भासत होता. मी मनानें त्याचें स्वामित्व पत्करलें. घरी जातांना मी संकोचत नव्हतें. एक वेगळ्याच मोकळेपणांत कांहींशीं लाजत, गोड विचार घोळवित मी सुधीरच्या पावलांबरोबर पावलें टाकीत होते. यांच पावलांबरोबर केवळ सात क्षेपात मी सुख जिंकणार होते. एका नव्या घरांत भाग्याचा वारसा घेऊन प्रवेश करणार होतें. सुधीर म्हणत होता त्यांचे घर मला नक्की आवडेल. फारच सुरेख आहे ते.

घर आलें तरी वाटलें सुधीरपासून दूर होऊंच नाहीं. मनानें नाहींतरी आम्ही एकमेकांची झालोच होतो. अखेर शरीर मनाचें गुलाम नाहीं का ?

त्या गुलामाला इतकें विधीनुरुप अर्पण करायचें म्हणजे काय ? हें गुलामाचें गुलाम होण्यासारखेंच आहे. मला साऱ्याच रूढी कल्पना, वागूणीका, निर्बंध खुळेपणाचें वाटूं लागलें.

दिवसेनदिवस मी अधिकाधिक सुधीरची होत होतें. आई-आबाचीं हरकत नव्हती. वर्षभर आम्ही खुपच भटकलो. एकमेकांच्या सहवासात मिळतील तेवढे क्षण जुळवीत वावरलों.

वर्ष सरलें. परिक्षा झाली. सुधीर गांवी गेला. प्रारंभी त्याची पत्रं आलीं. पुढें अनियमितपणें येत. अखेर बंद झाली. परिक्षेचा परिणाम जाहीर झाला अन् सुधीर नापास झाला. अण्णासाहेबाचें भले मोठें पत्र आबांना आलें. मुंबईच्या बातम्यानीं अण्णासाहेब चांगलेच चिडलेलें दिसत होतें. अनंत आरोपाचें पत्र आबांनी सहज दूर केलें. या वर्षी परत सुधीर राहयाला येणार नसल्यानें बुडालेल्या मिळकतीबद्दल हळहळ व्यक्त करूं लागलें.

सुधीर गेल्यानें मिळणारें पैसे बंद झाले हें पाहून आईहि अस्वस्थ झालेली दिसली तेव्हां मात्र तोल गेला. अखर सुधीर घरीं गुंतून रहावा म्हणूनच माझा उपयोग करण्यांत आला तर. माझ्या दुःखानें परिसिमा गांठली होती. त्यांत हा एक नवा आघात माझें जीवनसर्वस्व बुडालें तरी माझ्या मातापितरांना बुडालेल्या पैशाची काळजी वाटत होती. क्षणभर त्यांच्या काळजाच्या जागा चांचपून पाहण्याची अनिवार इच्छा झाली. पण माझें हात रिकामें नव्हते. ओघळणारें अश्रू अन् कोसळणारें जीवन दोहोच्या जबाबदारीखाली विचारें ते मेताकुटीला आले होते. माझ्या दुःखांत घर सहभागी झाले नाहीं. ना आईआबा. मी एकटीच रडलें. जीवनाला वैतागलें.

अखेरचा उपाय म्हणून मी सुधीरला पत्र लिहिलें. साऱ्या साऱ्या घटना तळमळीनें दर्शवून. पत्राची ओढीनें वाट पाहिली. प्राण थिजला पण पत्र आलें नाहीं. त्याच्याहि वाट्याला काळिज आले नव्हतें जणूं.

पुन्हां मी अध्यापनाच्या जीवनांत रमू लागलें. एक नीरस कर्तव्य पार पाडताना वाटे जगाला काळिजच नसावे. असले तर फत्तराचेंच केवळ ? आई कधीं मधीं लग्नाचा विषय काढते. आबा तो सवयींनुसार उडवून लावतात. अगदीं सिगारेटसच्या धुरासारखा ! वर्ष उलटलें. साऱ्या आठवणी मनाच्या खोल तळाशीं केव्हांच बुडवल्या. एखाद्या प्रसंगाचें चांदणें वा उन्ह प्रखर झाले म्हणजे अजूनहि मनाचा तळठाव मोकळा होतो. एका लहरीनें मन उलटेपालटे होतें. आठवणी इतस्ततः विखुरतात.

परवा सुधीर जिमखान्याच्या बाजूला दिसला. कुणातरी तरुणीशीं अवर्जून बोलतांना ! त्यांच्या मुद्रेवर याचना होती. अगाऊ आशा होती. त्यांचे येणे कळलें तेव्हांच खूणगांठ बांधली. पुन्हा यांचा चेहरा पाहयाचा नाहीं.

आज रविवार होता. कादंबरी अपूरी राहिली होती. पावसानें अगदीं उच्छाद आणला होता. सकाळपासून कामापुढें सवड झाली नाहीं. सारा दिवस काळोख संध्याकाळ फुलवित होता. त्या पावसांत बाहेर पडावेसें वाटेना. खिडकीचा सरकपडदा दूर सारून मी कादंबरी हातात घेतली अन् रस्त्यावरून सुधीर कुणाला छत्री घेऊन गुलमोहराखालून जाताना दिसला. तरुणी लाजत होती तरीहि त्याला बिलगत निघाली होती. क्षणभर माझा उपरेपणा दाटून आला. माझे एकाकीपण अधीक भेसूरपणें गळा काढूं लागलें. नव्या जगाच्या एकटे रंगाची छटा माझ्या पुढ्यात कोसळून पडत होती.

उद्वेगानें वाटलें. घरातल्या जुजबी कामांत गुंतले असते तर फार बरें झालें असतें. दृष्टिआड सृष्टी असली म्हणजे दुःखातहि कांहींसे सुख गवसतें. पण त्याहीपेक्षा भल्यानें, सुखाने राहयाचे असेल तर इथून दूरदूर निघून जावें. जिथें ओळख असणार नाहीं, होणार नाहीं अशा नवख्या भूमित. जिथें जग असून नसेल.

शाश्वत, मानवी मूल्यांची जोपासना करणारें अक्षर वाङमय पुरविणारें मराठी द्वैवार्षिक

उषःकाल

संपादकः-ना. शि. ठाकूर बी. ए. (टिळक)

पत्ताः-१४ डी. खोताची वाडी, गिरगांव, मुंबई ४

टे. नं. २७०३८

( पान ७२ वरून )

माणसाकडे तें पार्सल जाणार होते. पार्सलच्या दुसऱ्या बाजूस, जॉन डिसूझा नांवाच्या गोव्यांतील एका माणसाचा पत्ता होता. याचा अर्थ उघड होता. डिमेलो हें पार्सल कोल्हापूरहून गोव्याला पाठविणार होता. धुरंधरानीं पार्सल उघडलें. घोलवड संस्थानच्या राजकुमारीचें चोरीस गेलेले तें दागिने होते. सरदारनें तें विकत घेतले होते. पण पांच वर्षें सरदार स्वस्थ कां होता ? आजच त्यानें दागिनें बाहेर पाठविण्याची घाई कां करावी ?

धुरंधर स्वतःशींच हंसले. या प्रश्नाचें उत्तर त्यांना माहित होतं.

त्यानीं क्लिनरची गांठ घेतली. त्यानें सांगितलें कीं नेहमीप्रमाणें मशीद बंदरला गाडींत माल चढविला गेला. त्यानंतर गाडी कांहीं वेळ कुर्ला गॅरेजमध्यें पेट्रोल, पाण्यासाठीं थांबली होती. अर्थात् यांत नवीन असं कांहींच नव्हतं तो नेहमींचा रिवाज होता. गॅरेज सोडल्यानंतर, अपघात होईपर्यंत गाडी कुठेंच थांबली नव्हती.

इ. धुरंधरानीं पुन्हां जीपमध्यें उडी घेतली. सरदार आतां पलायनाची तयारी करीत होता.

आपल्या कचेरींत ते पोहोंचले त्यावेळीं रात्र झाली होती. त्यांच्या सहकाऱ्यानें आपला रिपोर्ट सादर केला. सर्वत्र शांत होतं. डिसूझा नेहमीप्रमाणें सहाला बाहेर पडला होता. रामरावानें दिलेल्या मोटारीचे नंबर ते न्याहाळीत होते. रात्रीचे नऊ वाजून गेले होते. इतक्यांत टेलीफोनची घंटी खणखणली.

" हॅलो, मी धुरंधर बोलत आहे. " ते म्हणाले.

" साहेब, डिसूझा गॅरेजमध्यें आला आहे. तो एकटाच आहे. कचेरीचा दरवाजा आंतून बंद करून त्याची कांहींतरी शोधाशोध चालू आहे. "

" ठीक आहे. काळजीपूर्वक नजर ठेव. मी कुमक पाठवितो. "

डिसूझा गॅरेजमध्यें रात्रीचा कधींच जात नसे. आजच त्यानें कां जावं ?

" रामराव " त्यानीं आपल्या मदतनीसाला हांक मारली.

" साहेब "

" रामराव, सशस्त्र पोलीस असलेल्या चार गाड्या कुर्ला गॅरेजकडे पाठवा; नि चारहि बाजूच्या रस्त्याची नाकेबंदी करा गाड्या कुणालाही न दिसतील याची खबरदारी घ्या. माझ्याकडून इशारा मिळतांच, गाड्या रस्त्यांत उभ्या करून रस्ता अडवून ठेवा. कामाला लागा. " धुरंधर भराभर हुकूम सोडित होते.

जवळच्या इमारतींत बसून धुरंधर डिसूझाच्या हालचाली निरखीत होतें. कांचेच्या तावदानामुळें त्याच्या साऱ्या हालचाली त्यांना स्पष्टपणें दिसत होत्या. हें कपाट उघड, तो खण उघड असें त्याचें काम चालूच होते.

घड्याळाचें कांटे फिरत होते. रात्रीचे दोन वाजून गेले होते. धुरंधर आपल्या जागीं बसून होते. डिसूझाची शोधाशोध आतां थांबली होती. कचेरीचा दरवाजा उघडून तो बाहेर आला. त्यानें आंतली बत्ती विझवली. गॅरेजमधील एक काळ्या रंगाची मोटार त्यानें बाहेर काढली. पुन्हां तो कचेरींत शिरला. नि बाहेर येऊन त्यानें मोटार सुरू केली.

पेट्रोलच्या पंपाला वळण देऊन त्यानें आपली गाडी पुना रोडकडे वळविली. नि त्याच वेळीं धुरंधरानीं खुणेची शिट्टी फुंकली. डिसूझाचा मार्ग अडविला गेला. त्यानें गाडी मागें घेतली नि धारावी रस्त्याकडे वळण्याचा प्रयत्न केला तोही रस्ता पोलिसांच्या मोटारीनें अडविला होता. त्यानें चटकन् गाडीबाहेर उडी घेतली. पण पळून जाणें अशक्य आहे ही गोष्ट त्याला समजून चुकली. त्याच्याभोंवतीं सशस्त्र पोलिसांचें कडें होते.

गाडीची झडती घेतली तेव्हां आतांपर्यंत बेपत्ता असलेले सारे जडजवाहीर त्यांत सांपडले. गॅरेजमध्यें गुप्त जागीं लपवून ठेवलेलें सारे जडजवाहिर गोळा करायला डिसूझाला पांच मास लागले होते.

सरदार गिरफदार झाला होता.

" डिसूझा हाच सरदार आहे ही गोष्ट तुम्हांला कशी समजली ? " इ धुरंधरांना त्यांच्या वरिष्ठानें विचारलें.

" कुर्ला गॅरेजची जागा पाहिल्यावर मला प्रथम संशय आला. सरदारबद्दल ज्या गोष्टी मी ऐकल्या होत्या त्या गोष्टींना पूरक अशी ही जागा होती. गॅरेज असल्यामुळें मालकाची परवानगी न घेतां, दर वळीं निराळी गाडी वापरण्याची सोय विनासाय झाली होती. धारावी सारखी वस्ती जवळ होती.त्यामुळें गुन्हेगार जगाशीं संबंध ठेवणं सुलभ होतं नि तिसरी गोष्ट म्हणजे पोलिसांच्या नकळत मालाची विल्हेवाट लावणें शक्य होतं. कुर्ला गॅरेजला भेट देण्याची लहर मला आली नसती तर सरदार सहीसलामत निसटला असता. डिसूझा म्हणजेच सरदार ही गोष्ट ठाण्याच्या अपघातामुळें स्पष्ट झाली होती. नगरपालिकेची नोटीस मिळाल्यापासूनच माल हलविण्याची योजना तो आंखीत होता. त्या गाडींत सांपडलेलं पार्सल हा पहिला हप्ता होता. शंकरचे पैसे देऊन त्यानें बाजीरावाला दूर केले. बाजीराव गेल्याशिवाय हालचाली करणें त्याला शक्य नव्हतं पण बाजीराव गेल्यावर त्याला आणखी एक शंका आली. उद्या बँकेनें असाच मनुष्य पाठविला तर ? म्हणून त्यानें पहिले पार्सल रवाना केले, नि त्याच रात्री ठिकठिकाणीं गुप्तपणें लपवून ठेवलेला माल जमा केला. पोलिसांचें आपल्यावर लक्ष आहे याची त्याला शेवटपर्यंत कल्पना नव्हती. ' धुरंधरानीं स्पष्टीकरण केलें.

' म्हणजे तुमच्या लहरीच्या हा विजय आहे असं म्हटलं पाहिजे ' वरिष्ठ हंसत म्हणाले.

' जवळजवळ तसंच ' धुरंधर त्यांना साथ देत म्हणाले.

—००—

## तोच कां मेला ?

**एका ध्येयनिष्ठ माणसानें कसल्यातरी कारणानें एकदां प्राणांतिक उपोषण सुरू केले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो त्या प्राणांतिक उपोषणांत खरोखरच मेला. या पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत 'प्राणांतिक' उपोषणें अनेकांनीं केलीं पण त्यामुळें दगावलें मात्र कोणी नाहीं. हा असा पहिलाच मृत्यु होता.**

**—विशेष चौकशीअंतीं असें कळलें कीं; उपोषण करण्यापूर्वी, मागाहून आश्वासन देण्यासाठीं एखाद्या बड्या धेंडाची तरतूद करून ठेवायला तो अजिबात विसरून गेला होता !**

# “ भवभूतीचें वाग्दर्शन ”

## ( उत्तररामचरिताचें रहस्य )

[ प्रा. डॉ. विनायक वामन करंबेळकर, नागपूर ]

### प्रास्ताविक

गेल्या मार्चमध्यें मुंबईस ‘उत्तर-रामचरिता’चा प्रयोग पाहण्याचा योग आला. आदल्या दिवशीं ‘शाकुन्तल’ पाहून मग दुसऱ्या दिवशीं ‘उत्तरचरित’ पाहिल्यामुळें या दोन नाटकांतील प्रयोगदृष्ट्या तुलनात्मक भेद लक्षांत आला तोच या लेखाला हेतुभूत आहे.

### शाकुन्तल आणि उत्तरचरित

शाकु. व उत्तर. हीं दोन्हीं नाटकें संस्कृत साहित्याची सर्वश्रेष्ठ ग्रंथरत्नें आहेत. दोहोंचे कर्ते त्रिभुवनविख्यात व प्रतिभाप्रकर्षशाली श्रेष्ठ महाकवि होते. दोन्ही त्या त्या कवीची परिपक्व प्रतिभाफलें आहेत. दोहोंबद्दल प्राचीन कालापासून लोकांच्या आदराचे शब्द प्रसिद्ध आहेत.– ‘तत्र रम्या शकुन्तला,’ ‘उत्तरे रामचरिते’ इ. परंतु जनतेच्या एकमुखी मान्यतेने दिलेला निकाल ‘उत्तरचरितांत भवभूति कालिदासाहून श्रेष्ठ आहे.’– आजहि मान्य करावा लागतो. ‘उत्तरचरिता’चा प्रयोग पाहिल्यावर त्यापुढें ‘शाकुन्तल’ फिके वाटलें हें मी प्रांजलपणें मान्य करतो.

कालिदासाप्रमाणें भवभूतीची नाटकें राजाश्रयाने लिहिलेलीं नव्हती. कुठल्याशा कालप्रियनाथाच्या यात्राप्रसंगीं त्यांचा प्रयोग होत असे, त्यावेळीं तितकीशी लोकप्रियताहि त्या कवीच्या वांटणीस आली नव्हती. प्रत्येक नाटकाच्या प्रस्तावनेंत त्यानें ‘आपल्याला रसिक वाचक व प्रेक्षक मिळाला नाहीं; लोक आपली निंदा करतात’ असें मोठ्या खेदाने लिहून ठेवलें आहे. शिवाय त्याला कालिदासाच्या मोठेपणाची जाणीव होती. म्हणून त्यानें आपल्या ‘उत्तरचरितांत’ थोडेबहुत ‘शाकुन्तला’चें अनुकरणहि केलेलें आहे. तशीच राजाची कथा, तसाच गर्भवती राणीचा त्याग, तसेंच लहानग्या शूर व निर्भय राजपुत्राचें नायकास आकर्षण, तसेंच राजपुत्राच्या मार्फत नायक-नायिकांचे मीलन—दोन्हीं नाटकांत आहेत. याशिवाय चित्रदर्शनासारखें प्रसंग, विरहिणी–वर्णनासारखी वर्णनें व अगदीं शब्द-वाक्यें देखील, भवभूतीनें कालिदासापासून घतलीं आहेत. इतकें ऋण आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या कविकुलगुरूपासून घेऊन सुद्धां नाट्यतंत्रांतील वैशिष्ट्यामुळें असो अथवा काव्यांतील करुणमाधुर्यामुळें असो किंवा भावनाप्रकर्षाच्या हातोटीमुळें असो अथवा नाटकांत सवत्र आढळणाऱ्या कोणत्या तरी गंभीर व हृदयाला हलवून सोडणाऱ्या विचारामुळें असो ‘उत्तरचरितांत’ असा कांहीं गुण आहे ज्यामुळें पूर्वीपासून सर्वच तज्ज्ञ व सहृदय वाचकांनीं या नाटकांत भवभूति कालिदासापेक्षां सरस असल्याची कबूली दिली आहे.

### नाटककाराची गंभीर प्रकृति

भवभूतीच्या ‘उत्तरचरितांत’ असा कोणता अतिशय आहे ज्यामुळें संस्कृत–नाट्य–सृष्टींत हें नाटक सर्वश्रेष्ठ ठरतें ? या कवीची नाटकें केवळ मनोरंजनासाठीं आहेत असें म्हणतां येणार नाहीं. कवि त्याच्या लिखाणावरून फारच गंभीर प्रकृतीचा वाटतो. तेव्हां तो आपल्या नाटकांतून कांहींतरी तत्त्वज्ञान प्रतिपादन केल्याशिवाय राहणार नाहीं. तेंच त्या नाटकाचें वैशिष्ट्य असेल. ‘उत्तरचरिता’ला आधार म्हणून जो रामकथेचा भाग घेतला आहे तो ‘रामायणाच्या’ उत्तरकांडांतील आहे पहिल्या ‘महावीरचरित’ नाटकांत रामाच्या राज्यभिषेकापर्यंत कथा आली आहे. उरलेला कथाभाग ‘उत्तरचरितांत’ येतो. हा रामकथेचा उत्तरार्ध तितका लोकप्रिय नाहीं; तो ज्या ‘उत्तरकांडांत’ येतो त्याबद्दल तज्ज्ञ संशोधकांना अनेक संशय आहेत; शिवाय प्रक्षेप, विसंगति वगैरे अनेक दोष त्यांत असल्याचें बोललें जाते. परंतु भवभूतीने नेमका तोच कथाभाग घेऊन व त्याची अभिनव ‘चित्रदर्शनाच्या’ रूपाने पूर्वकथेशी संगति जोडून त्याला “अभिनयैर्विन्यस्तरूप” बनविले व त्यांत असा कांही गुण उत्पन्न केला कि प्रथम अप्रसिद्ध असा रामकथेचा उत्तरभाग सर्वतोमुखीं बनवून टाकला ! काय संपूर्ण रामकथा नाट्यरूपाने मांडावयाची एवढाच त्यांत कवीचा अभिप्राय होता ! कीं आणखी कांहीं वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वज्ञान त्याला या नाटकाच्या आधारानें मांडावयाचे होते ?

### मीमांसक कवि

भवभूति सामान्य कवि नव्हता. तो पद-वाक्य-प्रमाणज्ञ होता. व्याकरण मीमांसा व न्यायशास्त्रांत तो पारंगत होता. प्रसिद्ध मीमांसक उम्बेक व भवभूति एकच होत असाहि एक प्रवाद आहे. असा हा मीमांसक कवि आपल्या नाटकाला जर एकाद्या दार्शनिक विचाराची बैठक देईल तर ती मीमांसा पद्धतीनच दिलेली असेल. मीमांसकांच्या मतें ग्रंथांत जो मध्यवर्ति विचार मांडावयाचा तो सात कसोट्यावर पारखून घेतां येतो. त्या म्हणजे —

**उपक्रमोपसंहारावभ्यासो ऽपूर्वता फलम् ।**
**अर्थवादोपपत्तीच लिङ्ग तात्पर्य - निर्णये ॥**

ग्रंथाचे तात्पर्य कोणत्या विचारांत आहे हें उपक्रम, उपसंहार इत्यादि सात मुद्यांवरून समजते; यांचा उपयोग केवळ मीमांसेच्या क्षेत्रांतच होतो असें नाहीं. कै. लोकमान्य टिळकांनीं त्यांच्या मदतीनें गीताध्यायांची संगति लावून दाखविली आहे. भवभूतीने जर एखादं विशिष्ट तत्त्वज्ञान ‘उत्तरचरितांत’ मांडलें असेल तर त्यालाहि या सात कसोट्यावर पारखून घेतां येईल.

### सात कसोट्या

कोणत्याहि ग्रंथाचे तात्पर्य काढावयाचे असतां **उपक्रम** व **उपसंहार** म्हणजे आरंभ व शेवट पाहिले पाहिजेत. ग्रंथकार आपल्या हेतुनिदर्शक वाक्याने ग्रंथारंभ करतो व तसाच त्याचा शेवट करतो. या दोन टोकांत नीट बसतो तोच त्या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय. तसेंच ग्रंथकाराच्या मनांत जी गोष्ट सिद्ध करावयाची असते तिची तो पुनरुक्ति करतो. याला **अभ्यास** म्हटलें आहे. **अपूर्वता** म्हणजे नवेपणा. तो असल्याशिवाय ग्रंथकार प्रायः ग्रंथ लिहीतच

नाहीं. त्यानंतर त्या मुद्याचें प्रतिपादन केल्यानें किंवा ग्रहण केल्यानें काय लाभ होतो हेंहि सांगावे लागतें तेच **फल.** आपला मुद्दा मांडतांना ग्रंथकार कांहीं युक्तिवाद मांडतो, कांहीं साधक-बाधक प्रमाणें सांगतो. याला **उपपत्ति** म्हणतात. अशी उपपत्ति देत असतां कांहीं प्रासंगिक वर्णनें येतात. त्यांना **अर्थवाद** असें नांव आहे. हीं प्रासंगिक वर्णनें कोठें स्पष्टीकरणार्थ तर कोठें गौरवार्थ असतात. या सात कसोट्या लावून उत्तररचरिताचा प्रतिपाद्य विषय पुढीलप्रमाणें आहे. ज्यामुळें उत्तररचरिताच्या द्वारें भवभूति कालिदासाहून सरस ठरला असावा.

### उपक्रम आणि उपसंहार

**भवभूतीनें ' उत्तररचरिताच्या ' नान्दी-श्लोकांत**

**" विन्देम देवतां वाचममृतामात्मनः कलाम् ।" ( १-१ )**

आत्म्याची अमर कला ' वाणी ' देवतेच्या प्रातीची इच्छा केली आहे व शेवटीं भरतवाक्यांत—

' शब्दब्रह्मविदः कवेः परिणतप्रज्ञस्य वाणीमिमाम् । " ( ७–२० ) त्या देवी वाणीची प्राप्ति झाली असें म्हटलें आहे. वस्तुतः पहिल्याच अंकांत येणाऱ्या **' यं ब्रह्माणमियं देवी वाग्वश्येवानुवर्तते'** ॥ ( १-२ ) या वाक्याचें नुसतें पुनरुच्चारण आहे. याप्रमाणें आदौच अन्तीं ' वाक् ' देवतेचा उल्लेख कवीनें केला आहे. म्हणजे उत्तररचरिताचा प्रतिपाद्य विषय ' वाणी ' संबंधीं आहे. पण नाटकाचें कथानक तर रामाच्या चरित्राशी संबद्ध आहे ! म्हणून कवीनें मोठ्या कौशल्यानें ' वाणी ' व ' सीता ' यांच्यांत अभेद दर्शविला आहे. भवभूतीनें उल्लेखिलेली ' आत्म्याची अमर कला–वाणी ' म्हणजे सीतादेवी हें साहित्यशास्त्राच्या नियमा-प्रमाणेंच आहे.

**[ रंग प्रसाद्य मधुरः श्लोकैः काव्यार्थसूचकैः ।**

साहि. द. ) स्त्री व वाणी यांचें साम्य कवीच्या मनांत आहेच—

**यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः ॥ (१-५)**

व सीता आणि वाणी यांचा अभेद कवीने मुद्दामच निर्माण केला आहे. –" विद्या वागिव या असूत भवतीम् " (४-५) कारण यांतच नाटकाचें बीज आहे. देवी सीतेची कथा सांगत असतां कवीनें ' वाणी ' विषयक तत्त्वज्ञान प्रतिपादन केलें आहे.

### पुनरुच्चारण

कवीनें आपली या नाटकांतील प्रतिपाद्य कल्पना वाग्विषयक आहे हें ' वाणी ' किंवा ' वाक ' शब्दाचा वारंवार उच्चार करून दर्शविलें आहे. ' उत्तररचरितांत ' जर कोणता शब्द वारंवार आढळणारा असेल तर तो हाच. याशिवाय ' वाणी ' चें महत्त्व दर्शविणारे अनेक उल्लेख आहेत. —

(१) पहिल्या अंकांत वसिष्ठ ऋषिकडून सीतेला " वीरप्रसवा भूयाः " असा आशीर्वाद अष्टावक्राच्या मुखांतून प्राप्त होताच, राम ऋषींच्या सिद्ध वाणीची प्रशंसा करतो. —

**लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते ।**
**ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥**

(१- १०)

(२) वाणीला दूषित करावें लागल या भयानें राम ' चित्रदर्शन ' प्रसंगीं ' मध्यमाम्बावृजान्त', ' राम–जामदग्न्य ' निर्देश अनुल्लेखानें सोडून देतो.

(३) राम सीतेच्या भावी अपत्यांना जृम्भकास्त्र देतो–

' सर्वथा त्वत्प्रसूतिमुपस्थास्यन्ति ' व त्या सिद्धवाणीप्रमाणें लवकुशांना ते अस्त्र प्राप्त होतें. तसेंच राम पृथ्वी भागीरथींनी सीतेचें रक्षण करावें असें म्हणतो व तें तसें घडतें. हें सिद्ध वाणीचे दृष्टान्त आहेत.

(४) सीतेबद्दल लोकनिन्दा आहे हें रामाला समजतें. तिचें वर्णन ' तीव्रसंवेगो वाग्वज्रः ' किंवा ' कश्मला किंवदन्ती ' असें केलें गेलें आहे.

(५) असेंच वाणीविषयक– वाल्मीकीला ' वागात्म ब्रह्म ' प्राप्त झाल्याची कथा, अरुन्धतीने केलेली वसिष्ठांच्या अविप्लुता वाणीची प्रशंसा, लवानें केलेली 'राक्षसी वाणीची निन्दा,' इ. अनेक उल्लेख एकामागून एक अंकांतून येतात.

### अपूर्वता-सूनृता व राक्षसी वाणी

भवभूतीनें ' उत्तररचरितांत ' मांडलेलें वाणी-विषयक तत्त्वज्ञान अपूर्व तर आहेच पण उपपत्ति-युक्तहि आहे. ही उपपत्ति तें तत्त्वज्ञान द्विविध स्वरूपांत मांडण्यांत आल्यामुळें येते. एका बाजूनें सूनृता वाणीचें मंगलमयत्व प्रतिपादन करून दुसऱ्या बाजूनें राक्षसी वाणीचें भयानकत्व कवीनें पटवून दिलें आहे. सूनृता वाणी अविप्लुता असते, पवित्र असते, सिद्ध असते, सर्व मंगलांचें माहेर असते. या वाणीच्या मंगल स्वरूपाचें प्रतिपादन अरुन्धतीच्या मुखानें करविण्यांत कवीनें औचित्य साधलें आहे. कारण जनक राजानें अरुन्धतीलाच ' सर्वश्रेष्ठ गुरु वसिष्ठ जिच्यामुळें स्वतःला पवित्र समजतात, जी त्रैलोक्यांत मंगल आहे अशा उषा देवते-प्रमाणें जगद्वन्द्य असलेल्या भगवतीला नमस्कार असो ' ( ४-१० ) मंगलमयी म्हणून गौरविलें होतें.

तो प्रसंग असा—

वाल्मीकीच्या आश्रमांत जनक, कौसल्या, अरुन्धती वगैरे वृद्ध मंडळी जमली असतां कौसल्येचें दुःख पाहून अरुन्धतीनें तिचें सान्त्वन केलें व म्हटलें **" आश्वासिहि राजपुत्रि ! बाष्पविश्रामोऽप्यन्तराळे कर्तव्य एव । अन्यच्च किं न स्मरसि यदवोच दृष्यशृंगाश्रमे युष्माकं गुरुस्तदुपजातमेव । किन्तु कल्याणोदर्कं भविष्यति । "** जरी सीतेबद्दल दुःखपूर्ण हकीकत घडली आहे तरी मधूनमधून त्याकरितां दुःख करणें थांबावयास हरकत नाहीं. कारण तुमच्या गुरुनी हें सर्व परिणामीं आनंदमय होईल असें म्हटलें आहे. यावर कौसल्या म्हणते-- " भअवदि अदिक्कन्तो मणोरहो । " भगवति ! ती आशा आतां नष्ट झाली आहे. अरुन्धतीला वसिष्ठांच्या वचनाबद्दल दाखविलेला हा अविश्वास सहन झाला नाहीं. तिनें आवेशानें विचारलें—

**' तत् किं मन्यसे राजपुत्रि ! मृषोद्यं तदिति ? न हीदं सुक्षत्रियेऽन्यथा मन्तव्यं भवितव्यमेव तेन ।**
**आविर्भूत-ज्योतिषां ब्राह्मणानां**
**ये व्याहारास्तेषु मा संशयोऽभूत् ।**
**भद्रा ह्येषां वाचि लक्ष्मी निषिक्ता**
**नैते वाचं विप्लुतां व्याहरन्ति ॥**

**(४-१८)**

( तर काय, वसिष्ठांचें वचन खोटें ठरेल असें तुला वाटतें ? नाहीं. ते जें म्हणाले तें अवश्य घडणारच. दिव्यदृष्टि प्राप्त झालेल्या ब्राह्मणांचें बोलणें खोटें ठरत नाहीं कारण त्यांत कल्याण वसत असतें. )

## गंधवेणी

सख्या माळीलीस तेव्हां मोगरीची गंधवेणी
जरी सुकली तरीही उरीं ठेवीन जपूनी
थरारतीं तिच्यामध्ये तुझीं स्पर्शवेडीं बोटें
कळी कळी दर्वळते तुझ्या उष्ण श्वासावाटें
अजून या वेणीमध्यें कुजबुजे नदीकांठ
शहारल्या लाटा तेव्हां शहारली चांदरात
वेणी माळीलीस आणि कर ठेवोनी कपोलीं
म्हणालास, "राणी माझी कशी गंधवती झाली!"

गंधवती झालें आणि डोळे मिटले तृप्तींत
जागीं झालें राया तुझ्या गोड सुगंधी मिठींत...
दिठीमिठीलाहि आलीं मोगऱ्याचीं गंधफुलें,
स्वप्नवेड्या चांदण्यांत माझें घर मीं बांधलें
जरी तूं न माझा आज तुझी स्मृति जागवीन
आणि माळुनिया वेणी तुझ्या नांवें मिरवीन

—दत्ता हलसगीकर.

या ठिकाणीं अरुन्धतीनें विवेचन करून 'सूनृता वाणीचें' तत्त्वज्ञान विशद केलें आहे. याच सूनृता वाणीमुळें रामाच्या शब्दांनें लवकुशांना जृम्भकास्त्र मिळाल व पृथ्वी-भागीरथींनी सीतेचें अरण्यांत रक्षण केलें म्हणजे नाटक सुखान्त होणार याचें बीजारोपण ही पहिल्याच अंकांत रामाकडून झालें आहे व वसिष्ठाच्या सूनृता वाणीने नाटक कल्याणोदर्क होणार अशी भविष्यवाणी सांगितली आहे. या सूनृता वाणीचें स्वरूप स्पष्ट करण्याचे कार्य मात्र लवानें केलें आहे. तो म्हणतो—ऋषि-मुनी जिची प्रशंसा करतात ती सूनृता वाणी जी—

**कामान्दुग्धे विप्रकर्षत्यलक्ष्मीं**
**कीर्तिं सूते दुष्कृतं या हिनस्ति ।**
**तां चाप्येतां मातरं मंगलानां**
**धेनुं धीराः सूनृतां वाच माहुः ॥ ५-३१**

या वाणीच्या गौरवार्थ 'वागात्म ब्रह्माचा' रामायण रूपाने अवतार झाला ही कथा **अर्थवाद** म्हणून आली आहे.

भवभूतीच्या वाग्विषयक तत्त्वज्ञानाची दुसरी बाजू 'राक्षसी वाणी' च्या कल्पनेनें सजविली आहे. सूनृता वाणीच्या विरूद्ध स्वभावाची जी वाणी ती राक्षसी वाणी. कवीने राक्षसी वाणीचें तत्व लवाच्या मुखानें वदविलें आहे. तो प्रसंग असा—

—वाल्मीकी-आश्रमांतील बटूंनीं घोडा कधीं पाहिला नव्हता. त्यांनीं रामचंद्राच्या अश्वमेधांत मोकळा सोडलेला घोडा पाहण्यासाठीं ओढून नेले. घोडा पाहतांच लवाने हा अश्वमेधांतील घोडा आहे हें ताबडतोब जाणलें. एवढ्यांत—

**अयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा ।**
**सप्तलोकैकवीरस्य दशकण्ठ-**
**कुलद्विषः ॥ (४-२७)**

अशी सैनिकांची घोषणा त्यानें ऐकली. त्यामुळें लवाची क्षात्रवृत्ति जागृत झाली. त्यानें युद्धाचें आव्हान स्वीकारून घोड्याचें हरण केलें. घोड्याचें रक्षण करण्यासाठीं लक्ष्मणाचा पुत्र चंद्रकेतु धांवून आला. युद्धास प्रारम्भ करण्यापूर्वी लव आणि चंद्रकेतु यांचा संवाद झाला. त्यांत चंद्रकेतूने विचारलें—"रामायणाच्या कथानायकाबद्दल आदर असून सुद्धां तूं त्याच्या पराक्रमाची घोषणा ऐकून कां रागावलास?" तेव्हां लव उत्तर देतो—'रामचंद्राच्या पराक्रमाबद्दल राग येण्याचा प्रश्न नाहीं. पण सर्व क्षत्रियांचा धिःकार करणारी ही घोषणा चीड आणणारी आहे. रामराजा स्वतः दान्त आहे अशी ख्याति आहे. तो स्वभावानें उद्धट नाहीं व त्याची प्रजाहि उद्धट नाहीं. मग त्याचे सैनिक अशी राक्षसीवाणी कां उच्चारतात?'—

**ऋषयो राक्षसीमाहुर्वाचमुन्मत्तदृप्तयोः ।**
**सा योनिः सर्व वैराणां**
**सा हि लोकस्य निर्ऋतिः ॥ (५-३०)**

उन्मत्त व दुष्ट लोकांच्या राक्षसी वाणीची ऋषिजन निंदा करतात. तिच्यापासून सर्व वैर जन्मास येते व तीच या जगाला शाप आहे.

### फल—सूनृता व राक्षसी वाणीचा संघर्ष.

संपूर्ण 'उत्तरचरित' म्हणजे सूनृता व राक्षसी वाणींच्या संघर्षाचें चित्रण आहे. सीतेची अग्निशुद्धि झाली तरी ती राक्षसाच्या घरीं राहिली म्हणून लोकनिन्दा होत होती. रामाने गुप्त हेराच्या मुखानें ही लोकनिन्दारूपी राक्षसी वाणी ऐकली व सीतेचा त्याग केला पण वसिष्ठ, अरुन्धती, वाल्मीकि, पृथ्वी, भागीरथी आदि ऋषि-देवतागणांच्या व स्वतः रामाच्या मंगल सूनृता वाणीने अरण्यांत सीतेचें रक्षण झाले; तिची दोन बालकें संस्कारसंपन्न झालीं व त्यांच्याच मार्फत राम व सीता यांचे मीलन झालें. राक्षसी वाणीवर सूनृता वाणीने विजय मिळविला. राक्षसी वाणीने घडलेल्या घोर परिणामांचे सूनृता वाणीच्या मंगल प्रभावाने परिमार्जन झालें.

### राक्षस गेले पण उरली राक्षसी वाणी

पहिल्या 'चित्रदर्शन' अंकांत राजा रामचंद्र राक्षसांचा निःपात करून सिंहासनावर बसला. या वेळीं ऋष्यशृंगाश्रमांत बारा वर्षें चालणारे सत्र सुरू झालें म्हणून घरांतील सर्व वडील मंडळी तिकडे गेली. सीतेचे दिवस पूर्ण भरले होते. राम तिचेंच मनोविनोदन करण्यासाठीं अन्तःपुरांत आला होता. पूर्व चरित्राची लक्ष्मणानें काढविलेलीं चित्रें पाहण्यांत राम व सीता मनाची करमणूक करीत होती. गंगेचें चित्र पाहून सीतेला अरण्यांत विहार करण्याची इच्छा झाली. "सीतेचे सर्व डोहाळे पुरवा" असा नुकताच रामाला मोठ्या मंडळीकडून निरोप आला होता. रामानें लक्ष्मणास सीतेला अरण्यांतून फिरवून आणण्यासाठीं रथ सज्ज करण्यास आज्ञा दिली.

६१ १०१६८

सीता मुखानें रामाच्या हातांचें उसें करून झोंपी गेली, आणि दुर्मुख हेरानें रामाच्या कानांत 'कर्मेला किंवदन्ती' सांगितली.

राक्षसांचा त्रास संपलेला होता. एक अल्प अवशेष उरला तो देखील संपविला म्हणजे झालें. हेंच जणूं सुचविण्यासाठीं लवण राक्षसाच्या छळानें पीडलेले ब्राह्मण दाराशीं उभे आहेत असें द्वारपालाकडून समजतांच राम—

"आः अद्यापि राक्षसत्रासः । तावदस्य दुरात्मनः कुम्भीनसी पुत्रस्योन्मूलनाय शत्रुघ्नं प्रेषयामि ।" असें म्हणून राक्षसांचा त्रास संपवितो. पण राक्षसी वाणीशी आतां नवे युद्ध सुरूं झालें होतें. राक्षस मारले पण राक्षसी वाणी मारावयाची उरली होती. 'महावीरचरित' पूर्ण झालें पण 'उत्तरचरित' पूर्ण व्हावयाचे होतें.

राक्षसांनी सीतेचें हरण केलें व रामाला विरहाच्या दुःखांत लोटले होते. पण राक्षस मारून तो विरह संपवितां आला. आतां लोकनिन्दारुपी राक्षसी वाणीने रामाकडून सीतेचा त्याग करविला व दुसऱ्यांदा रामाला विरहांत लोटून दिले. हा दुसरा विरह केवढा भयानक होता! हा संपविण्यास उपाय काय?

**सोढश्चिरं राक्षसमध्यवासः ।**
**त्यागो द्वितीयश्च सुदुःसहोऽस्याः। (७-४)**

राक्षसांनी घडविलेला सीताविरह बरा म्हणण्याची वेळ आली. प्रत्यक्ष सीतेने 'बहुमानितास्मि तं पूर्वविरहम् ।' असे कबूल केलें आहे. त्यांत मनोविनोदनाचे उपाय होते; शत्रूशी युद्ध करावयाचे असल्यामुळें रोमहर्षक प्रसंगांत मनाला विरंगुळा होता, व विशेष म्हणजे शत्रूचा निःपात केल्यावर तो विरह संपणारा होता. पण हा दुसरा विरह कधींच संपणार नाहीं ! सुग्रीवाशीं मैत्री करून, वानरांचा पराक्रम मदतीस घेऊन व जाम्बवानाची प्रज्ञा मार्ग-दर्शक बनवून पूर्वविरहाचा शेवट करतां आला. पण या दुसऱ्या विरहांत या गोष्टींचा उपयोग होणार नव्हता. त्यांत प्रत्यक्ष वायुसुताची सुद्धां गति होत नव्हती अथवा साक्षात् विश्वकर्म्याच्या पुत्राला, नलाला या विरहाच्या पलिकडे जाण्यासाठीं मार्ग बनवितां येण्यासारखा नव्हता. [३- ४४, ४५] असा हा विरह राक्षसी वाणीनें ओढवून आणला होता. यांत होरपळत होता फक्त राम. त्या राक्षसांच्या त्रासानें अग्निपरीक्षा झाली सीतेची पण या राक्षसी वाणीने रामाला अग्निदिव्य करावे लागत होते. 'छाया-सीता' अंकांत प्रत्यक्ष सीतेनेच रामाचें तें अग्निदिव्य पाहिलें होते. मग तिच्या मनांत रामाच्या प्रेमाविषयीं शंका राहण्याला अवसरच कोठें उरला?

या राक्षसी वाणीने ओढविलेल्या विरहाचा शेवट सूनृता वाणीच्या मंगल आशीर्वादानें घडून आला. सातव्या अंकांत 'गर्भांका'च्या द्वारें लोकनिन्देला उत्तर म्हणून पृथ्वी-भागीरथींनीं केलेलें सीतेचे संरक्षण दाखविले व निन्दा करणाऱ्या प्रजेची मान लज्जेने खाली झाली.

ज्या कवीला जन्मभर निन्दा सहन करावी लागली त्यानें लोकनिन्देला राक्षसीवाणी ठरविलें यांत केवढें औचित्य आहे ? याच त्याच्या वाणीविषयक तत्त्वज्ञानामुळें भवभूति 'उत्तररामचरिते' विशेष आहे अशी अभियुक्त जनांची उक्ति रूढ झाली असावी.

टेलिफोन : २७४१८

'विहार' [ रत्नागिरी ] च्या व्यवस्थेखालील

**श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस**

२१७, चर्नीरोड, मुंबई ४

**कोकिळेनें साद घातली कीं, आमराईत भेट !**

वासंतिक साज लेवून वसंत ऋतूंत
वाचकांच्या भेटीला येत आहे–

**' अ भि व्य क्ति '**

क था वि शे षां क

**जून १९६१**

'अभिव्यक्ति'चा यापुढील अंक जून १९६१ मध्यें नामांकित व नवोदित कथाकारांच्या कथांचा खजिना घेवून वाचकांच्या सेवेला हजर राहील.

**अधिक माहीतीसाठीं लिहा.**

: व्यवस्थापक 'अभिव्यक्ति'
अहमद सेलर बिल्डींग नं. ८, गोविंदजी केणी रोड, नायगांव, दादर, मुंबई १४

# कोकिळेनें साद घातली कीं आमराईत भेट !

वासंतिक साज लेवून वसंत ऋतूंत वाचकांच्या
भेटीला येत आहे—

# ' अभिव्यक्ति '

—★—

## कथा विशेषांक

★ जून १९६१ ★

'अभिव्यक्ति'चा या पुढील अंक १ जून १९६१ ला नामांकित व नवोदित कथाकारांच्या विविध कथांचा खजिना घेऊन वाचकांच्या सेवेला हजर राहील.

★

जाहिरातदारांनी, एजंटांनी आणि साहित्यिकांनीं त्वरा करावी

अधिक माहितीसाठीं –

व्यवस्थापक ' अभिव्यक्ति '
अहमद सेलर बिल्डींग नं. ८
गोविंदजी केणी रोड, नायगांव,
दादर, मुंबई १४
फोन : ६५४२२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५८१

# अभिव्यक्ति

१५ ऑगस्ट १९६१ * मूल्य ७५ न. पैसे


स्वातंत्र्य दिन विशेषांक
१९६१



या अंकात :—

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मंगेश तेंडुलकर, कवि संजीव, रत्नकांत पावसकर, शांतिलाल भंडारी इत्यादी

७५८१



# अभिव्यक्ति

## स्वातंत्र्य-दिन विशेषांक
## १५ ऑगस्ट ६१

— संपादक —
यशवंत पाध्ये

वर्ष २ रें | अंक २ रा

### या अंकाचें वैभव—

★ उंबरठ्यावर — संपादक
★ कर्मवीरांचे घर्मबिंदु — रत्नकान्त पावसकर
★ नाइटवर काम करणाऱ्या नटनटींची मुलाखत — सौ. कुमुदिनी रांगणेकर
★ विपरित — शांतिलाल भंडारी
★ अर्जुन–ऊलुपी — कवि संजिव
★ आकार नसलेली व्यथा — सदाशिव करंदीकर
★ परिवर्तन — दिनानाथ सावे
★ बोल घुमट — कृ. ज. दिवेकर
★ सोहागरात — सौ. ललितागौरी देशपांडे
★ मधुचंद्र — किसन रि. दुधेडिया
★ डायरींतील एक पान — अशोक चिटणीस
★ कवि संमेलन — मंगेश तेंडुलकर
★ पळपुट्या प्रोफेसरची प्रेमकथा — मनोहर जोशी
★ 'बालांचें विश्व' — संयोजिका कु. शैलजा कुलकर्णी
★ आर्टस् कॉलेजें सकाळीं कि दुपारीं ? — एक शिक्षक
★ रघुनाथ हडकर, दि. वि. नातू, भा. अ. पटवर्धन, योगेश्वर अभ्यंकर, मेबल, चिरपुटकर, सौ. शै. द. फडके इ. यांचा भावविलास.
★ या शिवाय विकास योजनेवरील माहितीपूर्ण लेख

★ या अंकांत प्रसिद्ध झालेल्या सर्वच साहित्याशीं संपादक सहमत असतातच असें नाहीं.

—: कार्यालय :—
अहमद सेलर बिल्डिंग नं. ८
गोविंदजी केणी रोड दादर, मुंबई १४.

★

—: दूर ध्वनि क्र. :—
६५४२२

★

मूल्य ७५ नये पैसे

★

—: मुखपृष्ठ :—
रंगसम्राट रघुवीर मुळगांवकर.

★

—: सहाय्यक :—
रत्नकान्त पावसकर

★

—: प्रकाशक व मुद्रक :—
यशवन्त हरी पाध्ये

★

—: मुद्रण स्थळ :—
हिंदमाता प्रिंटिंग प्रेस,
जेरबाई वाडीया रोड परेल, मुंबई १२

●

—: कव्हर छपाई :—
…नी प्रिंटरी, नायगांव क्रॉस रोड, मुंबई १४

●

—: प्रकाशन स्थळ :—
अहमद सेलर बिल्डिंग नं. ८
दादर, मुंबई १४

# उंबरठ्यावर

'अभिव्यक्ति' चा हा दुसरा पदन्यास आज आम्हीं वाचकांपुढें आविष्कृत करीत आहोंत. गेल्या वर्षी दीपावलीच्या मंगल समयीं 'अभिव्यक्ति' चा प्रथमांक आम्हीं वाचकांपुढें धरला. आमची ती साहित्यिक आणि कलात्मक 'अभिव्यक्ति' वाचकांच्या पंसतीस उतरली. सबंध संयुक्त महाराष्ट्रांत 'अभिव्यक्ति' चें तुफान स्वागत झालें. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतील रसिक वाचकांच्या प्रेमाखालीं आम्हीं अक्षरशः दबून गेलों. आमच्या मेजावर पडलेल्या शेकडों पत्रांतून आजहि आमचे 'बोलके वाचक' 'अभिव्यक्ति' चा गुणगौरव करीत आहेत. 'अभिव्यक्ति' वर नितांत प्रेम करणाऱ्या या सर्व सुहृदांबद्दल आम्हीं कृतज्ञ भाव व्यक्त करीत आहोंत.

'अभिव्यक्ति' चा द्वितीयांक गेल्या जूनमध्यें वाचकांना सुपूर्द करण्याची आमची इच्छा होती. तसें आम्हीं प्रथमांकांत घोपितहि केलें होतें. पण संकल्प आणि सिद्धी या दोघांत भिंती या उभ्या असायच्याच! आमच्याहि पुढें कांहीं अकाल्पित तांत्रिक अडचणी दत्त म्हणून उभ्या ठाकल्या व ऐन मे महिन्यांत, आकाश निरभ्र असतांनाहि आमच्या मनीषेवर पाणी पडलें! मनांत दांडगी इच्छा असूनहि 'अभिव्यक्ति' वासंतिक अंकाच्या रूपानें वाचकांच्या सेवेला हजर राहूं शकली नाहीं.

–आणि आज किंचित् उशीरानें स्वातंत्र्य–दिनाचा सुयोग साधून 'अभिव्यक्ति' वाचकांच्या सेवेला हजर झाली आहे. यंदाचे तिचें स्वरूप अगदीच निराळें ठेवण्यांत आले आहे. 'अभिव्यक्ति' तील वेगळेपणा वाचकांच्या लक्षांत सकृद्दर्शनीच येईल. चालू अंकापासून 'बालांचे विश्व' हें नवीन व वैशिष्ट्यपूर्ण सदर खास बालवाचकांसाठीं आम्हीं चालू केलें आहे. रसिक बालवाचकांना तें खचित आवडेल असा भरवसा आहे. या अंकांत आम्हीं नव्या दमाच्या होतकरू कलावंतांची बैठक भरविली आहे. मराठी शारदेच्या दरबारांतील हे उद्यांचे सन्माननीय मानकरी आहेत, असा 'अभिव्यक्ति' चा दृढविश्वास आहे.

...दीडशें वर्षें गुलामगिरीचा भोगवटा भोगणारा भारत दशकापूर्वीच स्वतंत्र झाला. नंतर स्वतंत्र भारतांत गेल्या वर्षी मराठी माणसांचें स्वराज्य 'संयुक्त महाराष्ट्राच्या' रूपानें अवतीर्ण झालें. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत भारत प्रगतीची वाटचाल करीत आहे आणि प्रगतिशील भारतांत महाराष्ट्राचें तान्हुलेंहि बाळसें धरूं लागलें आहे. पानपत ते पानशेतपर्यंत आजवर आलेलीं अनेक अरिष्टें या महाराष्ट्रानें पचविलीं. आतां तो भविष्यकाळांत सुसंपन्न होऊं दे. या महाराष्ट्राची बौद्धिक क्षेत्रांत यथाशक्ति सेवा करावी, या हेतुनें 'अभिव्यक्ति'चा हा प्रपंच मांडला आहे.

मराठी वाचकांना 'अभिव्यक्ति'ची ही सेवा रुचेल, अशी आशा आहे.

ज्यांच्या भावबळावर आम्ही 'अभिव्यक्ति' ची उभारणी केली त्या श्रीमती सोनूताई कव्वूर, सर्व साहित्यिक मंडळी, जाहिरातदार, रंगसम्राट रघुवीर मुळगांवकर, हितचिंतक, व हिंदमाता प्रिंटिंग प्रेसचे प्रोप्रायटर शां. का. टांककर व सर्व कामगार बंधू, रसिक वाचक, आमचे स्नेही श्री. विजय थोरात, वसंत कांदळकर, ग. का. रायकर, ना. शि. ठाकूर व 'बालांचे विश्व' च्या संयोजिका कु. शैलजा कुलकर्णी यांच्याशी आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोंत.

–संपादक


Best Compliments From

THE AUTOMOTIVE AND ALLIED INDUSTRIES PRIVATE LTD.

Factory

Lonavala

Head office :
Bombay
316 V. P Road

Branch office :
Madras
52 General Patters Rd.

# कर्मवीरांचे धर्मबिंदु...

—लेखक **रत्नकान्त पावसकर**

ही अमुची प्रियतम भारतभूमि आम्हाला स्वर्गाच्या साम्राज्याहूनहि अधिक मोलाची वाटते. येथील मातींत आम्हीं जन्म घेतला. येथील हवेंत आम्हीं श्वास घेतला. येथील अन्नावर आमचा देह पोसला आणि येथील पाण्यावर आमचा पिंड घडला.

इथें पोलादी मनगटाची, निधड्या छातीची आणि अंतःकरणांत ओतप्रोत मानवता असलेली माणसें जन्मत असतात.

ही यक्षकिन्नरांची भूमि आहे. संतांची आणि शूरांची भूमि आहे. साक्षात् देवच इथें मानवी देह धारण करून वावरत असतात. जेव्हां ही भूमि संकटांत सांपडते, तेव्हां तिचें संकट निवारण करण्यासाठीं स्वतः देवदूतच धांवत येतो. हा अखंड कालप्रवाह कुठेंतरी, कधींतरी क्षणभर थबकतो आणि मग एखादा देवमाणूस जन्माला येऊन या देशांत नवें युग निर्माण करतो. अशा अनेक देवमाणसांची नोंद या भूमीच्या इतिहासांत आहे.

या आमच्या नंदनवनानें—भारतानें—सुखदुःखाचे गोडकडू दोन्ही अनुभव आपल्या पदरीं बांधले आहेत. अनेक नराधमांनीं कांहीं काळ या पवित्र भूमिवर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. पण या भूमीचा गुण कांहीं आगळाच आहे. सैतानाचे साम्राज्य अस्ताला नेणाऱ्या शूर संतांची अखंड मालिका या देशाला लाभलेली आहे.

कालपरवांपर्यंत येथील आकाशांत दुर्दैवाचे ढग इतस्ततः पसरले होते. गेलीं बरींच वर्षें हा भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरींत खितपत पडला होता. इंग्रजांनीं या देशाचें सारें वैभव गिळंकृत करून त्याला निःसत्त्व करून सोडले होते.

पण भारतमातेच्या सुपुत्रांनीं आपल्या मातृभूमीच्या हातापायांतील गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले. भारतीय स्वातंत्र्यासाठीं अगणित ज्ञात व अज्ञात वीरांनीं आपल्या अश्रूंचें अर्घ्य दिलें आहे, रक्ताचा सडा शिंपला आहे. देशभक्तीनें प्रेरित झालेल्या वीरांच्या सर्वस्व-त्यागानें भारतमातेच्या हातापायांतील दास्यशृंखला खळाखळ तुटल्या. भारत स्वतंत्र झाला.

आतां भारत स्वातंत्र्याच्या हवेंत श्वास घेऊं लागला आहे. आतां त्याच्या हातापायांत बेड्या नाहींत अन् त्या कधींच नसतील. आतां तो कुणाचा गुलाम नाहीं. आतां त्याच्या प्रगतीच्या मार्गांत कोणीच भिंती उभारूं शकणार नाहीं. भारताच्या दृष्टि-समोरचें क्षितिज आतां विशाल झालें आहे. आतां अनेक क्षेत्रें त्याच्यापुढें खुलीं झालीं आहेत. नवभारतानें यापुढील आपली वाट जोमानें व जिद्दीनें आक्रमावयास हवी. साऱ्या जगांत आमचा भारत सर्व क्षेत्रांत आघाडीवर तळपायला हवा.

पण आजचा काळ मात्र निराळा आहे. भारत केवळ स्वतंत्र झाला आहे. अद्याप तो स्वावलंबी व समृद्ध व्हायचा आहे. बेकारी, दारिद्र्य, उपासमार, अज्ञान, व्याधि—अशा अनेक उपाधि भारताला अद्याप त्रस्त करीत आहेत. भारताच्या देहांत अजूनहि अनेक व्यंगें राहून गेलीं आहेत. तीं अचूक हेरली जावींत. त्यांच्यावर उपाय केले जावेत व संभाव्य रोगांवर प्रतिबंधक इलाज योजले जावेत. हें भारत—बालक निरोगी, बलशाली व्हावें.

भारताला स्वतंत्र करण्याकरितां आजवर अनेकांनीं अश्रूंचें अर्घ्य दिले होतें व रक्ताचें दान केलें होतें. तो स्वतंत्र भारत आतां संपन्न होण्याकरितां अनेक जण आपल्या घामाच्या धारा पेरीत आहेत. या कष्टकऱ्यांच्या श्रमाचें पीक जरूर भरघोस येईल, तें कसदार असेल. . . !

स्वातंत्र्य—प्राप्तीसाठीं जे झिजले, झुंजले, त्यांना तर आम्हीं अभिवादन करीत आहोंतच पण मिळवलेलें स्वातंत्र्य

सुसंपन्न बनवून तें चिरकाल टिकविण्यासाठीं जे कर्मवीर आज आपल्या हातांत बंदूक, लेखणी, तराजू, नांगर, झाडू वगैरे आयुधें घेऊन भारताच्या कोनाकोपऱ्यांत घर्मबिंदुंच्या राशि ओतीत आहेत, त्या आमच्या कोट्यवधि देशबंधूंच्या चरणकमलांवर आम्हीं कृतज्ञ भावानें आमचीं मस्तकें ठेवीत आहोंत !....

* * *


टेलिफोन २७४१८

'विहार' (रत्नागिरी) च्या व्यवस्थेखालीं

## 'श्रीकृष्ण बोर्डिंग हाउस'

२१७, चर्नी रोड, मुंबई ४

## D. AND B. MANE

Manufacturers of----
Wooden Boxes, Shookes and Crates and Contractors.

—: OFFICE :—

D. AND B. MANE
63 B. J. Deorukhakar Road
off. Keshar Baug, Naigaum,
Bombay 14.

*With Best Compliments From --*

## DADAJEE DHACKJEE & CO. PRIVATE LTD.

*Shree Pant Bhuvan, Sandhurst Bridge, Bombay No. 7*
*Telephones : 27021 ( 3 Lines )*

*Distributors of :*
*LAMBRETTA 150 CC. Scooters, 48 CC.- Scooterettes, and 175 C. C. 3-Wheeler Delivery Van 8 Rikshaw Chassis*

## GOPAL'S Decoration - Arts

19/21 Hamam Street, 1st Floor,
Room No. 14, Bombay 1.

For Painting of :-

Mills, Factories, Industrial Establishments, Palacial Bldgs., Cinema Theatre, a Residential Premises etc. at moderate rates.

Prop :- DINKAR D. ANAOKAR.

# 'नाइट'वर नाटक करणाऱ्या नटनटींच्या

# कल्पित नवलकथा

लेखिका सौ. कुमुदिनी रांगणेकर

जिथें फुलें वेंचलीं तिथें गोवऱ्या लावणें माणसाला नेहमींच फार अवघड वाटत असतें! मग नाट्य शिरोमणि मास्टर शंतनू ह्यानें सतत वीस वर्षें आपल्या आश्विनशेटच्या रसाळ भूमिकेनें रंगभूमि गाजविल्यावर भादव्याची शुष्क, फडतूस भूमिका करणें त्याला किती अपमानास्पद वाटलें असेल! पण उपाय काय?

पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठीं तोंडांतल्या विड्याच्या चोथ्याबरोबर हा अपमान गिळणें भाग पडलें मास्टर शंतनूला! आणि नाटकाचे सुप्रसिद्ध ठेकेदार श्रीयुत मानकामे ह्यांच्या 'ऑफर'पुढें त्यानें मुकाट मान वांकवली आणि भादव्याचें 'काम' पत्करलें!

मास्टर शंतनू अभिनयांत वाकबगार होता. त्यानें गाण्याचा सशास्त्र अभ्यास फारसा केला नसला तरी त्याला पल्लेदार, पहाडी आवाजाची दैवी देणगी लाभली होती. संशयकल्लोळ नाटकांतल्या पहिल्याच 'सुकांत चंद्रानना' ह्या लावणी ढंगाच्या पदाला त्याच्या गळ्यांतली फिरत अत्यंत पोषक ठरे! ह्या पदाला तो हमखास 'वन्स मोअर' मिळवी आणि क्षणांत सबंध नाटकाचें यश तो कनवटीला लावी.

—आज मास्टर शंतनू साहजिकच भारी जड पाउलांनीं आपल्या लाडक्या कुरणांत—थियेटरांत—आला होता. जिथें नायकाचा रुबाब मारला तिथें नोकराचें रुपडें धारण करायचें!— पण-तेवढ्यांत त्याला पडद्यामागल्या त्या 'मासळी बाजारां'त एक जुन्या ओळखीचा चेहरा दिसला!

ओऽहोऽ!—बेबी कमलाच ती!—आपल्या जोडीनें पुरीं बारा, चौदा वर्षें रेवतीची सरस आणि सुरस भूमिका वठविणारी गुणी नटी!— आं?—पण तिची ही केशवेषभूषा—म्हणजे? आज बेबी कमला—अं—कमलादेवी, नाहीं का हल्लीं?—मग कमलादेवी रेवतीचें काम नाहीं करणार? मग—मग—कोणती भूमिका करणार ती?—रो—रो— रोहिणीची? अरेरे!— नायिके-ऐवजीं मोलकरीण!— आणि—मास्टर शंतनूला दुःखहि झालें, सुखहि झालें!

बेबी कमला खरंच गुणी नटी होती!— आश्विनशेठ आणि रेवती ह्या जोडीप्रमाणें त्यांची धैर्यधर—भामिनीची जोडीहि लोकप्रिय झाली होती. माफक गाणें, मार्मिक अभिनय आणि मादक नखरा! त्यामुळें भामिनीपेक्षांहि तिनें साकार केलेली रेवती प्रेक्षकांना मनपसंत वाटे!— पण कामदेवीनें काळाचीं पाऊलें ओळखलीं आणि प्रेक्षकांनीं हुर्यो करण्यापूर्वीं सुज्ञपणें आपली 'रेवती' आवरती घेतली!

वयाच्या सहाव्या वर्षी बेबी कमलानें रंगभूमीवर पदार्पण केलें होतें. त्याकाळीं एका गाजलेल्या नाटक कंपनींत बेबी कमलाचे वडील चारुदत्ताची धीरोदात्त भूमिका करीत असत. आणि बेबी कमला रोहसेन होत असे. मृच्छकटिक नाटकाच्या शेवटल्या अंकांत चांडाळ चारुदत्ताला सुळावर देण्यासाठीं नेत असतात, हा आधींच गंभीर व दुःखद प्रसंग—त्यांत, मुलाचा पोषाक घातलेली गोरी, गोमटी लाडकुली बेबी कमला आपल्या गोड आवाजांत 'हा तात, हा तात जासी कुठें रे। आलों पहा मीं मज येउं दे रे ॥' ह्या ओळी भैरवीच्या आर्त स्वरांत आळवीत रंगभूमीवर आली कीं, सहृदय प्रेक्षकांचे डोळे पाणावत

पुढें बेबी कमलानें तारुण्यांत पाऊल टाकलें. तिच्या सडसडीत तनुलतिकेला निसर्गानें मजेशीर वळसे, वेलांट्या दिल्या आणि तिला कंपनीच्या मॅनेजरनीं नायिकेची भूमिका दिली. तिची संशयकल्लोळांतली रेवतीची भूमिका हातखंडा होती. रोहसेनाच्या बालभूमिकेनें-ला निर्व्याज लडिवाळपणा थोड्या वेगळ्या ढंगानें ती आपल्या रेवतीमध्यें पेश करीत असे. विशेषतः पहिल्या अंकांतला तिचा लाडिक अभिनय आणि 'तो मस्त मुरका प्रेक्षकांना फारच पसंत पडे!—

—आणि आज ती 'रोहिणी' होणार होती!—मास्टर शंतनू भादव्या होणार आहे हें कळतांच कमलादेवीलासुद्धां दुःखांत सुख वाटलें होतें. ठेकेदारानें जाणूनबुजून नाइटवर काम करणाऱ्या नटनटींची आंवळ्या. भोंपळ्यांची मोट एकत्र बांधली होती. त्यामुळें तालमी वगैरे घेण्याचा प्रश्नच नव्हता! त्यांतून ही जुनी कलंदर नटनटीची जोडी! दोघांनाहि सबंध नाटक तोंडपाठ! त्या कारणानें आतां प्रथमच त्यांची गांठ पडली. प्रथम जरा अवघडत पण नंतर दोघेंहि मनमोकळें हंसली, बोलली

नाटक सुरू झाल्यावर तर त्या दोघांना एकमेकांकडे बोलण्यासारखें-खूपच आढळलें. आजच्या नाटकांतली आश्विनशेट व रेवती ही जोडी त्या जुन्या जोडीनें 'कंडम' केली पार! तें योग्यच होतें म्हणा! आश्विनशेटचा आवाज पार बसला असल्यानें त्याचें एकहि गाणें रंगलें नाहीं आणि रेवती उत्तम गायिका होती, पण अभिनयाच्या नांवानें शून्य! त्यामुळें मास्टर शंतनू व 'बेबी' कमला ह्या दोघांप्रमाणें प्रेक्षकहि बसल्या जागीं चुळबुळत होते.

कसें तरी शेवटल्या अंकापर्यंत नाटक ओढत आणलें होतें. शेवटच्या अंकाच्या आरंभीं फाल्गुनरावांच्या घराचा सीन होता. डाव्या विंगमधून भादव्यानें—मास्टर शंतनूनें—प्रवेश

केला. आपल्या अभिनय निपुण शैलिनुसार बोलत बोलतच प्रवेश केला.

भादव्या–कालपासून एका घटकेचा विसावा नाहीं! इकडे धांव तिकडे धांव. ही चिठ्ठी दे, तो निरोप कळीव, खरं सांग, खोटें बोलतोस, हा गोंधळ चालला आहे सारखा! पुष्कळ धनी पाहिले, परंतु ही तऱ्हा अजब आहे! हं, आलं वाटतं कुणी?–

भादव्यानें शेवटलें वाक्य बोलतांना डावीकडे पाहिलें. कृत्तिकाबाईचा जामानिमा झाला नव्हता अजून. त्यामुळें ती तिथें हजर नव्हती. मात्र त्या उजव्या विंगेत 'बेबी' कमला तिथल्या उंच आरशासमोर उभी राहून कपाळावर आलेल्या चुकार कुरळ्या बटा प्रयत्नपूर्वक कानाच्या मागें सारीत होती.

आणि क्षणांत जणूं ठिणगी पडली! एक विचित्र चमत्कार घडला!–मास्टर शंतनू पटकन् दहा, बारा वर्षें मागें गेला. तो नेहमीं-प्रमाणें आश्विनशेटच होता जणूं! आणि नाटकाच्या पहिल्या अंकांतली त्याची 'एंट्री' होती ती!

खटका दाबल्यागत मास्टर शंतनू सुळकन् पहिल्या अंकांत शिरला. आणि आपल्या 'स्वगतां' तील शेवटल्या चार, पांच वाक्यांचा 'क्यू' त्यानेंच अलगद पकडला आणि आपल्या त्या विशिष्ट, रसिक, रसाळ पद्धतीनें तो बोलूं लागला.

हा "रुमझुम! रुमझुम! हा मंजुळ आवाज कसला बरं? अथवा प्रश्न कशाला? तिच्याच पैंजणांचा! अहाहा! साधीं चाल-ण्याचीं पावलंसुद्धां कशीं तालांत पडतात! रुमझुम–रुमुझुम! ओहो! यावं, यावं, तृषितचातक मेघमाले, यावं!–"

आणि आपल्या पहाडी, ढंगदार आवाजांत मास्टर शंतनूनें 'सुकांत चंद्रानना' ही अवीट गोडीची चीज गायला सुरुवात केली. पेटीवाला, तबलजी, सारंगीवाला व्यवस्थित साथ करूं लागल. प्रेक्षकांनीं खाडकन् टाळी दिली!

सुस्तावलेले रसिक लगेच सांवरून बसले! मास्टर शंतनूनें त्यांच्या कानांना झक्क मेजवानी दिली!– तीन तासांपूर्वी हेंच पद आश्विनशेटनें नुसतें 'दळुबाई' पद्धतीनें दळले होतें! प्रेक्षक तृप्त झाले!–

पद संपलं! पण पुढं काय?– 'भादव्या' ची भूमिका मिस्किलपणें यशस्वी करणाऱ्या ह्या नटानें आतांची आश्विनशेटची भूमिका पुढें चालू करावी असें प्रेक्षकांना मनापासून वाटत होतें. पण–आंबट तोंडाची ती ठोकळेबाज रेवती नको बुवा! ह्या रंगेल आश्विनशेठला तशीच रसेली रेवती हवी!–

आणि दुसरा चमत्कार घडला! मास्टर शंतनूचा संसर्ग 'बेबी' कमलाला बाधला. अन् त्याचें पद संपतांच तिनें, त्या जुन्या रेवतीनें 'एंट्री' केली. आश्विनशेटच्या अंगावर जसे भादव्याचे कपडे होते–कोचदार पगडीऐवजीं मळकी टोपी, शेखानीऐवजीं फाटकें जाकीट आणि पायघोळ, तलम धोतराऐवजीं टांचकें, जाडेंभरडें धोतर–त्याचप्रमाणें ह्या रेवतीच्या अंगावर 'जरी' नायलॉनऐवजीं सोलापुरी बांड होता. झगझगणारे दागिने अभावानेंच तळपत होते. पायांत पैंजण नव्हते आणि तरीहि 'बेबी' कमलानें एवढ्या विलक्षण डौलांत पदन्यास करीत प्रवेश केला आणि मानेला लाडिक झटका देत रेवतीचीं वाक्यें उच्चारलीं कीं हवें असलेलें मिळाल्याच्या आनंदांत प्रेक्षकांनीं टाळी दिली. आणि ह्या अभिनव नायक–नायिकेंचें खटकेबाज संभाषण मजेंत सुरुं झालें मघां ह्या संभाषणांत कांहींच गंमत वाटली नव्हती. आणि आतां और मजा आला! कसं सगळं अळंग चालूं झालं!–

रेवती–खाशी, खाशी! तान तर खूप ठेवून दिली! इतके दिवस हा गाण्याचा गुण चोरून ठेवला होता म्हणायचा?

आश्विन–या संगीत देवतेपुढें लाजेनं लपून बसला होता, तो तसाच प्रसंग आल्याशिवाय बाहेर कसा निघायचा?

रेवती–मग आज प्रसंग आला वाटतं?

आश्विन–हो, असं या प्रफुल्ल मुखकमला-वरून वाटतं.

सर्व प्रकारचे गंजिफ्राक्स व आधुनिक
फॅशनेबल तयार कपड्यांचे व्यापारी
'शमा गारमेंटस्'
८ बी, शेव्हे मार्केट परेल, भोईवाडा
प्रो. आर. एस. गोड

मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट
'राधाकृष्ण निवास' दादर बंबखान्याजवळ
दादर, मुंबई १४
येथें विमा योजनेचीं औषधें मिळतात

call on 65422
padhye & moghe
interior & building designers
ahmed sailor 8/53
dadar, bombay 14.

रेवती–मनांत मांडे खायला नको कोण म्हणणार ?

आश्विन–पण प्रत्यक्ष मिळाल्यावर मनांत कोण खाणार ?

रेवती–वाहवा ! अगदीं प्रासाला प्रास जुळवून भाषण चाललं आहे ! आपण ही कवीची दिक्षा घेतली तरी केव्हांपासून ?

आश्विन–या सद्‌गुणलावण्याच्या जाळ्यांत गुंतलों, तेव्हांपासून !

रेवती-कवितेला विषय तरी कोणता असा ?

आश्विन–कोणता म्हणजे ? तूं, तुझं तारूण्य, तुझं रूप, तुझे गुण, तुझं हंसणं, बोलणं, चालणं, सर्व तूं !

रेवती–तें जाऊं द्या मेलं. पुरुषांना तारीफच फार करायला पाहिजे. पण मला आज आपण आपली तसबीर द्यायची कबूल केली होती ना ? का, लोणकढी दिली ?

आश्विन–अग, अस्सल सोडून नक्कल कशाला ! म्हणून नाहीं दिली !

रेवती–चला, बोलूं नका माझ्याशीं !–

इथें रेवतीनें असा झक्क मुरका मारला कीं, प्रेक्षक मिनिटभर टाळ्या देत होते. मॅनेजर चूकभूल होऊन हा प्रणयरम्य प्रसंग विंगमधून पहात होता. त्याचेंहि जणुं भान हरपलें होतें ! पण आतां टाळ्यांच्या कडकडाटासरशीं त्याला वस्तुस्थितीची जाणीव झाली. काय करावें तें न सुचून त्यानें पडदा पाडायला लावला ! आणि ‘ आतां लगेच पडदा उघडून शेवटला अंक सुरळीत सादर होईल ’ अशी माइकवर कांपऱ्या आवाजांत घोषणा केली. पण प्रेक्षक ती ऐकतील तर ! आतां पाहिलेल्या ‘ नाटका ’ मुळें आपले पैसे निःसंशय वसूल झाले अशा भावनेने ते सगळे पटापट उठूनच गेले !–

आतां ऐका दुसरी नवलकथा !–

गद्य नाटकांतल्या नायकाच्या भूमिका ‘एवन्’ करणारा नट रावजी गावडे. वयाची साठी उलटेपर्यंत आपलें आसन संभाळून होता. झुंझारराव, कीचक, रामशास्त्री आणि प्रतापराव हे त्याचे चार हुकमी एक्के !

रावजी गावड्याची आवाजाची झेप, शब्दाची फेक आणि स्वराचा चढउतार अजब होता ! पण वयपरत्वें त्याच्या ह्या गुणांना ओहोटी लागली. त्याची अस्खलित वाणी बोलतांना अडखळूं लागली, दांत लडबडूं लागले, स्मरणशक्ति दगा देऊं लागली. कलेच्या किमयेवर काळानें मात केली !–रावजी गावडे नाइलाजानें रंगभूमीवरून निवृत्त झाला !

आणि–पुऱ्या दोन वर्षांनंतर एक ठेकेदार त्याच्या घरीं चालून आला. रावजीचें अत्यंत लाडकें ‘ त्राटिका ’ नाटक लावीत असल्याची गोड बातमी त्यानें दिली. आणि त्यांत काम करण्याची रावजीला गळ घातली !– गळ !– वसंत ऋतूंत पंचमांत कूंजन करण्याची कोकिळेला गळ का घालावी लागते ?– रावजी गावड्यानें आनंदानें होकार दिला. पण–अरेरे !– ठेकेदारानें त्याला त्याच्या हक्काच्या, गाजलेल्या प्रतापरावाच्या भूमिकेऐवजीं पिल्याची भूमिका देऊं केली !–

हं ऽ !– हातीं चाबूक घेतलेल्या प्रतापरावाऐवजीं धन्यापुढें हात जोडणाऱ्या लाचार पिल्याचें हलकें काम करायचें ! कुठें ती प्रतापरावाची उमदी, न्यारी शान ! आणि कुठें पिल्याचें फडतूस ध्यान !– पण–दोन वर्षांची बेकरी बापड्या रावजीला भेडसावूं लागली. त्यानें निमूट पिल्याच्या भूमिकेचा ‘विसार’ स्वीकारला.

अस्सल तें अस्सल ! ‘ त्राटिका ’ नाटकाचा प्रयोग यथातथाच झाला ! प्रतापरावाची भूमिका करणारा पार्टी अगदींच नवशिका आणि मिळमिळीत असल्यामुळें त्राटिकेच्या जहांबाजपणाला आळा घालण्याचे त्याचे प्रयोग हास्यापद भासले ! मात्र रावजीनें पिल्याचें ‘ सोंग ’ मोठें मस्त वठवलें. दुसऱ्या दिवशीं वृत्तपत्रांत त्याची बारेमाप स्तुति झाली !

‘ पिलाजीबुवांनीं प्रतापरावाला खाऊन टाकलें ! ’

‘ नोकरानें धन्याला दाखविलेला हिसका ! ’– वगैरे शीर्षकें झळकूं लागलीं ! रावजीचा दुखावलेला अहंकार जरा गोंजारला गेला. ठेकेदाराला एवढेंसें भांडवलसुद्धां रग्गड वाटलें ! त्यानें पुनः दुसरा प्रयोग लावला.

पण काय ? ऐन वेळीं ‘प्रतापराव’ बारगळले ! तो नवशिका नट मुळीं उभा रहायलाच तयार होईना ! आतां आली का पंचाईत ? तासाभरांत नाटक सुरू होणार !–

ठेकेदाराला पटकन् एक झक्क युक्ति सुचली. त्यानें रावजीला ‘ प्रतापराव ’ होण्याची आगळी


दिवाडकर लॉजिंग अॅन्ड बोर्डींग हाऊस

माथेरान

[ १ आक्टोबर पासून १५ जून पर्यन्त ]

* शाकाहारी व मांसाहारी जेवण.

* सुव्यवस्था व माफक दर.

* रेल्वे स्टेशनसमोर

अधिक माहितीसाठीः– प्रो. वाय्. एस्. दिवाडकर अॅन्ड सन्स
( केटरर्स अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर्स )

कर्जत, नेरळ, आणि माथेरान (म. रेल्वे)



खात्रीलायक स्टेनलेसच्या भांड्यासाठीं

हिंद विजय स्टोअर्स

प्रार्थना समाज नाका
गिरगांव, मुंबई ४

गळ घातली. तो स्वतः पिल्या होणार होता ! रावजीला प्रतापरावाची भूमिका मुखोद्गत होती ! ठेकेदारानें प्रॉप्टिंगवर मारून नेण्याचा बेत केला आणि पहिल्याच अंकांतील दुसऱ्या प्रवेशांत त्या उभयतांच्या संभाषणाच्या वेळीं सारा गोंधळच झाला !—ठेकेदारानें स्वतः-साठीं दोन विंगेंत दोन आणि ड्रॉपच्या मागें एक असे तीन प्रॉम्प्टर उभे केले होते. पण त्याची आणखीच धांदल उडाली ! दोन दिवसांपूर्वींचा झक 'पिलाजीबुवा' प्रेक्षकांच्या स्मरणांत ताजा असल्यामुळें ते ह्या 'पिला'ची टर उडवूं लागले.

इथें रावजीलाहि हा विचका असह्य झाला ! त्यानें पुनः त्या प्रवेशाला सुरूवात केली.

पिल्या, गाढवा, पुढें कोठें चाललास ? हु, पहातोस काय ? मार थाप. " हीं आपल्या पहिल्याच संवादांतली शेवटलीं वाक्यें रावजीनें दोन वर्षांपूर्वींच्या प्रतापरावाच्या रुबाबांत उच्चारलीं. आणि झटकन् प्रेक्षकांना पाठमोर होत, दोन दिवसांपूर्वींच्या पिलाजीबुवाच्या कांहींशा मिश्किल आवाजांत त्यानें पिल्याचा पुढील संवाद बोलून टाकला.

" थाप मारूं व्हय ? कोणती थाप जी—तोंडाची का हाताची ? आन् कोणाला मारूं ? कोन हाय हत ? आपनासनी कोनी शियात्रिया दिल्याती व्हय ? "

आणि पटकन् प्रेक्षकांकडे पुढा करीत प्रतापराव खेंकसले, " गावढाच्या लेका— "

पुनः चुटकीसरशीं प्रेक्षकांकडे पाठ आणि पिल्याचा लाचार आवाज—

" हां धनीसाब ! त्ये न्हवं बगा. मला होवं तर गाढाव म्हना "

प्रेक्षकांनीं, ही दुहेरी भूमिका एकसमयावच्छेदें-करून वठविण्याची कल्पना उचलून धरली. ठेकेदाराला बिचाऱ्याला इष्टापत्तीच वाटली ती !—प्रेक्षकांप्रमाणें त्यानेंहि रावजीची ही 'गारुडवाणी' —व्हेंट्रिलॉकिझम्— मान्य केली.

चौथ्या अंकांतल्या त्राटिका व पिलाजी ह्या दोघांच्या विनोदी प्रवेशांत रावजीनें बहारच केली. सरळ पिल्याचा मेकप् करून तो हजर झाला. आणि 'गरम-थंड' वगैरे आपल्या मजेशीर शब्दांनीं व सुयोग्य हावभावांनीं प्रेक्ष-कांना हंसवून, रिझवून, त्राटिका मारायला धांवतांच स्वारी आंत पळाली. आणि दोनच मिनिटांनीं प्रतापरावाच्या वेषांत व टेचांत राणोजीरावासह त्यानें अशा झोंकांत एंट्री केली कीं प्रेक्षकांनीं सारें थियेटर डोक्यावर घेतलें.

अशा रीतीनें 'बेड-कम्-सोफा' धर्तीची प्रतापराव-कम्-पिल्या ही दुहेरी भूमिका रावजीनें त्या रात्रीं केली आणि फड जिंकला !

जाणूनबुजून काल्पित नवलकथा ! त्यांत कांहीं अधिक, उणें झालें असल्यास रसिक वाचकांनीं 'चूकभूल द्यावी घ्यावी' ! सुज्ञास अधिक सांगणें न लगे !

वि. सू.:—ह्या लेखांतील कल्पना व पात्रें संपूर्ण काल्पनिक आहेत. सबब ही 'टोपी' आपल्या डोक्याला 'फिट्ट' होते अशी व्यर्थ हांकाटी कोणीहि नटनटीनें करूं नये !

★★★

## घ र टें—........

पंख फुटले जाणिवेला
विश्व माझे विस्तारले
क्षितिजाचे स्वप्न निळे
नयनांत साकारले !
सोडूनीया घरट्याचे
विश्व छोटे उबदार
अफाट त्या जगतात
झेप घेतली निर्भर !
जेव्हां पाहिलें सभोती
फिटे पारणें डोळ्यांचे
प्रश्न पडे कसे करुं
पान साऱ्या सौंदर्याचे ?
आनंदाच्या सागरांत
वहावले माझे मन
कसे दिसावें तयाला
कृष्ण दुःखाचे पाषाण ?
लपे गुलाबाच्या खालीं
छुपे सैन्य कंटकांचे
रहस्य अन् उकलले
प्रकाशाचें अंधारचि
दुज्या क्षणीं दिसे मला
भीषण ती वास्तवता
जगताच्या रुपड्याची
जाणवली व्यापकता !
आली जेव्हां अनुभूती
रंगीबेरंगी ( ! ) विश्वाची
ओढ लागली मनाला
उबदार घरट्याची ! !

—मेबल—

# विपरित

लेखक
शांतिलाल भंडारी

...आणि सरस्वतीच्या आयुष्यांत एक विचित्र दिवस उगवला. त्या दिवशीं पहाटे कोंवडा आरवला नव्हता, तर दूरवर कुठेंतरी घुवडाच्या घुत्काराचे भेसूर सूर थरथरत होते.

गुलाबाच्या कळीहून नाजुक व सुंदर असलेल्या आपल्या मुलीशी— स्नेहलशी —सरस्वती त्या दिवशीं फटकून वागली. स्नेहलला तिनें कुशींत घेतलें नाहीं, कुरवाळलें नाहीं, तिचा भांग पाडला नाहीं. तिची सुरेख वेणी घातली नाहीं, तिच्या कानांत डूल घातले नाहींत, शाळेंत जाणाऱ्या स्नेहलला तिनें प्रेमाचा निरोप दिला नाहीं.

—बस, त्या एकाच दिवशीं ती आपल्या स्नेहलशी अशी विचित्र वागली. त्यानंतर तसें वागण्याचा प्रसंग तिच्यावर कधींच आला नाहीं तो कसा—?

...शब्दाशब्दांतून कारूण्यानें ओसंडणारी ही कथा वाचकांच्या पापण्या भिजविल्याखेरीज रहाणार नाहीं !...

स्नेहलच्या डोळ्यांत टिपं गोळा झालीं ! ती लवकर उठायला अधीर झाली होती आणि तिची आई तिला दडपून झोंपवत होती ! हवेंत गारठा होता आणि पहाटेची वेळ साखरझोंपेची होती ! बाहेर काळोख होता आणि वातावरणांत कमालीची शांतता होती ! पलीकडच्या झोंपडींतला कोंबडासुद्धां अजून आरवला नव्हता, गोठ्यांतल्या बैलांच्या गळ्यांतल्या घाटींचासुद्धां आवाज कानावर येत नव्हता ! सरस्वतीला वाटत होतं, अजून रात्र संपली नाहीं. आणि स्नेहलला वाटत होतं, पहाट कधींच झाली. आतां थोड्या वेळांत चांगलं फटफटीत होऊन उजाडेल. सरस्वतीनं आपलं अंग उबदार रजईत गुंडाळून घेतलं होतं आणि स्नेहलनं अंगावरचं पांघरूण भिरकावून दिलं होतं. सरस्वती थंडीनं काकडली होती, तर स्नेहलला गारठ्याची दिक्कत वाटत नव्हती ! सरस्वतीला गादीवर चूपचाप पडून रहावंसं वाटत होतं तर स्नेहल अंथरुणांत एकसारखी चुळबूळ करीत होती !

अजून नांदगांवचा दूधवाला आला नव्हता. तांबडं फुटायच्या आधीं तो नेहमीं येतो. गवळी आला कीं सरस्वती जागी होते. दूध पातेल्यांत ओतून घेते. आणि पातेलें कपाटांत ठेऊन ती झाडलोट करत. झाडलोट झाल्यावर बंबाला जाळ घालायचा. प्रातर्विधी उरकायचा न मुलांना उठवायचं. आज जी इतक्या लवकर जागी झाली ती स्नेहल एरव्ही सरस्वतीनं पांचपंचवीस हांका मारूनहि उठत नसे. स्नेहलच्या पाठीवरचा सुनील मात्र आईच्या एकदोन हांकेंतच जागा होई आणि अंथरुणांत चटकन् उठून बसे. आज तो कसा डाराडूर झोंपला होता ! सरस्वतीनं स्नेहलच्या पाठींत चारदोन रट्टे घातले, पांचसातदां तिला दटावलं तरी यांतलं कांहींच चिमण्या सुनीलच्या गांवीं नव्हतं !

सरस्वतीला रात्रीं झोंपायला थोडा उशीरच झाला होता ! म्हणून तिला लवकर उठावंसं वाटत नव्हतं. आणि रोजच्यापेक्षां लवकर उठायला ती तयारच नव्हती स्नेहलला मात्र उठायची फारच गडबड झाली होती पोरटीनं आपली झोप मोडली म्हणून आईला राग आला. पोरीच्या पाठींत रव्यामागून रट्टे बसले. स्नेहलच्या डोळ्यांत टिपं गोळा झालीं !

आईनं मारूनमुटकून झोंपवण्याचा प्रयत्न केल्यामुळं स्नेहलला हुंदके गिळून गप्प पडावं लागलं. तिला आईचा खूप खूप राग आला. तिला गवळ्याचाहि खूप राग आला. नेमका आजच त्यानं कसा उशीर केला ! शेजारच्या परड्यांतला कोंबडाहि अजून आरवूं नये !.. बैलहि झोपलेत जणूं !... आज सारेच कसे आळसलेत ! स्नेहलला समजेना आणि चैनहि पडेना. तिला गप्प पडवेना आणि झोंपवेना ... तिला वाटलं, न कां उठेना आई. आपण उठूं पण आपण उठून काय काय करणार ? -आज आपली वेणी आई घालणार ! नव्हे, आपण तिला वेणी घालायला सांगायचं... आई दोन वेण्या कशा छान घालते ! आज नवी कोरी रिबन काढायची .. निळी नाहींतर लाल आई कशी दोन फुलं छान बांधील रिबनचीं ! .. स्नेहल उठायला आसुरली होती पण उठूं शकत नव्हती !...

अखरा, गवळी आला. त्यानं दूध अशी आरोळी ठोकून दाराची कडी वाजवली. सरस्वती उठली. स्नेहलला किती किती बरं वाटलं !-तीहि आनंदून उठली व उड्या मारीत बाहेर आली. आईनं दारं उघडण्यापूर्वींच तिनं दाराची कडी काढली व बाहेर पाहिलं ! तिला वाटलं, आज रोजच्यापेक्षां उशीर झाला खास उठायला ! म्हणूनच गाल फुगवून ती आईला म्हणाली ‘ बघ, उशीर झाला कीं नाहीं ! ’

सरस्वतीनं वेडावून म्हटलं, ‘ उशीर झाला म्हणे !...रोजच्या वेळेलाच उठलों आपण. कांहो गवळी दादा, रोजच्या वेळेलाच आलांत ना तुम्हीं ?– ’ असं विचारून सरस्वतीनं गवळ्याच्या हातांतली चरवी घेतली. गवळ्यानं हुंकार धरला. स्नेहलला वाईट वाटलं, गवळी खस्याळ तो केव्हांहि मोठ्याच माणसाची बाजू घेणार ! मुलांची बाजू घेतो कोण ! –तिनं त्यावर फार विचार केला नाहीं व हुज्जतपण घातली नाहीं.

तिला एवढा वेळ होता कुठं ! सकाळचे सारे विधी तिला कसे सुटटी-सरशी संपवायचे होते. कोंबडा आरवतो कीं नाहीं, बैलांच्या गळ्यांतल्या घाटी वाजतात कीं नाहींत इकडं कश्शाकडच स्नेहलचं लक्ष नव्हतं. आतां दिवस उगवायचा रहाणार होता थोडाच ! तिला मात्र शाळेंत लवकर जायचं होतं...अगदीं लवकर...चांगलं नटून थटून...

आज श्रावण शुद्ध पंचमी... नागपंचमी... आज स्नेहलच्या शाळेंत पाटीपूजन... नंतर प्रदर्शन... रांगोळीचं प्रदर्शन, खेळण्यांचं प्रदर्शन, शिवणकामाचं-भरतकामाचं प्रदर्शन, कलाकुसरीचं प्रदर्शन !... स्नेहल रांगोळी घालणार होती. नऊ दहा वर्षांचं वय तिचं. पण एवढ्या लहान वयांत रांगोळीच्या कैक तऱ्हा तिला अवगत होत्या. कोयरी, कासव, बारव, मंडप, गालिचा, कार्ल्यांचा वेल... एक ना दोन प्रकार. स्नेहल आज कासव काढणार होती ! रांगोळी प्रदर्शनांत बक्षिस पटकावण्याचं स्वप्न ती रात्रभर पहात होती ! ... शिवाय खेळण्याच्या प्रदर्शनांत ती आपली लाकडी बाहुली ठेवणार होती !... नाचणारी, मुरकणारी, मान डोलवणारी... नाचतां नाचतां ती फेर छान धरते !... प्रदर्शन पहाणारा कुणीहि या बाहुलीच्या पुढें रेंगाळला पाहिजे ! नाचणाऱ्या बाहुलीची केवढी गम्मत वाटेल बघणाराला !... स्नेहलच्या मनाची अधीरता क्षणाक्षणाला वाढत होती !... तिचं सारं सारं लक्ष शाळेकडं लागलं होतं ! मुली बाहुली केव्हां बघतात आणि आपलं कौतुक केव्हां होतं असंच तिला झालं होतं. इतर मुलींच्या खेळण्यापेक्षां आपलं खेळणं. . तिचे वडील फिरतीच्या नोकरीवर असतात. कुठल्याशा शहरांत त्यांना ही बाहुली आवडली. पंचवीस रुपये किंमतीची ती बाहुली त्यांनीं लाडक्या स्नेहलसाठीं पसंत केली आणि एवढी किंमत देऊन आणली !... आपल्या बाहुली इतकं महाग खेळणं कुणाचंच असायचं नाहीं. जो तो बाहुलीकडेच बघत राहील ! ..इतरांपेक्षां वेगळं असावं असंच कुणालाहि वाटतं. जें इतरांजवळ नाहीं तें आपल्याजवळ असावं व त्या आगळेपणाचं जगानं कौतुक करावं असंच कैकांना वाटतं ! चिमणी स्नेहल अशा कैकांतलीच एक होती ! कल्पनेच्या तरंगावर नाचत होती ! ती गमतीदार [illegible] आनंदत होती !

सरस्वतीनं पाणी तापवलं, स्नेहलनं स्नान केलं. सरस्वती चुली पुढल्या कामाला लागली आणि ' आई, वेणी घाल ' असं म्हणत स्नेहल सरस्वतीच्या पुढ्यांत येऊन उभी राहिली. अलीकडे अलीकडे स्नेहल स्वतःच्या हातांनीं वेणी घालूं लागली होती. अर्थातच आज ती सरस्वतीला वेणी घाल असं म्हणाली हें सरस्वतीला आवडलं नाहीं. एक तर तिनें आज सरस्वतीची झोपमोड केली होती. त्यांत ही भर पडली. ह्यासरशी सरस्वती जवळ जवळ चवताळूनच म्हणाली–' घाल नाहींतर कांहीं वाटेल तें कर जा. मी नाहीं घालणार वेणी ! '

' आई, मला नीट विंचरता येत नाहीं. माझा किनई. भांगच सरळ पडत नाहीं. .तुझं वळण चांगलं असतं. आणखी किनई आई, तू रिबन किती छान बांधतेस ..रिबिनचीं फुलं कशी छान बांधतां येतात तुला. .मला किनई कांहीं जमत नाहीं त्यांतलं— '

' जमत नाहीं तर सोड झिपऱ्या मोकळ्या–'

' पण आई–, ती दीनवाणी म्हणाली–' आज पाटीपूजन आहे. आजच्या दिवस घाल माझी वेणी . दोन वेण्या.. घाल ना आई दोन वेण्या... आणूं मी कंगवा ?... आणूं तेलाची बाटली ? .. आणूं नवी रिबन...'

' कांहीं कांहीं आणूं नकोस. काय वाटेल तें झालं तरी मी वेण्या घालणार नाहीं तुझ्या. आतां तूं काय कुक्कुबाळ आहेस ! चांगली तिसरींत आहेस कीं तूं घोडे !–' सरस्वतीनं एकदम झाडून टाकलं. तसा स्नेहलचा विरस झाला. तिचा चेहरा खरकन उतरला ! स्नेहलनं तोंड वेडंवाकडं केलं. गाल फुगवले. डोळ्यांत ढग गोळा झाले. तिला वाटलं आईच्या गळीं पडावं पण त्यापूर्वीच सरस्वतीनं तिच्याकडे संतापानं पाहून म्हटलं–' ऐकूं आलं ना... चल चालायला लाग माझ्या पुढून.' स्नेहलनं तोंड वळवलं ! तिचा चेहरा कसा रडकुंडीला आला हें सरस्वतीला समजायला मार्गच नव्हता ! नव्हे, तो समजून घेण्याच्या मनस्थितींत कुठं होती सरस्वती ! ती एकेक कामं हातावेगळीं करण्याच्या मागं लागली होती ! सुनील उठल्यावर सगळं घर डोक्यावर घेत असतो याची तिला धास्ती वाटत होती म्हणूनच कीं काय ती एकेक काम उरकण्याच्या पाठीं लागलेली होती. अर्थात त्या कामाच्या ढिगांत नव्या कामाची भर पडूं नये असेंच सरस्वतीला वाटत होतें आणि यासाठींच तिनें स्नेहलला स्वयंपाकघरांतून घालवून दिलें !

स्नेहलनं स्वतःची वेणीफणी केली. ती आपल्या केशभूषेवर नाराजच होती. केसांतला भांग सरळ नाहीं, केसांना वळण नाहीं, वेणीचे पेड आवळ नाहींत आणि रिबनची गुंफणहि मनासारखी नाहीं हें तिला कळत होतं पण मनांतल्या मनांत नाराज नी नाखूष रहाण्यापलीकडे ती कांहींच करूं शकत नव्हती !

स्नेहल पुन्हां स्वयंपाकघरांत गेली. सरस्वती चहा गाळित असतांनाच स्नेहल तिला म्हणाली– ' आई, मला मोत्यांच्या बांगड्या दे. आणाक किनइ आइ, मला माझं डूलहि दे ! '

आज स्नेहलची प्रत्येक मागणी धुडकावून लावण्याचा सरस्वतीनें निर्धारच केला होता जणूं ! स्नेहलच्या मोत्यांच्या बांगड्या...तिचे डूल'... सरस्वतीनं बांगड्या आणि डूल कुठं ठेवले होते हें तिचं तिलाच आठवत नव्हतं आणि स्मरणशक्तीला थोडासुद्धां ताण ती देऊं इच्छित नव्हती. सरस्वतीनं थोडा जरी विचार केला असता तर बांगड्या आणि डूल कुठं ठेवले हें तिला आठवलं असतं ! निदान दहापांच मिनीटं तिनं त्या वस्तू शोधल्या असत्या तरी त्या तिच्या हाताला लागल्या असत्या. पण छोटया स्नेहलच्या विचित्र

आम्ही कोकण लाइनवर रोखीनें व काटकसरीनें योग्य
कमिशनवर व्यापार चालू केला आहे तरी आजच
–: ऑर्डर पाठवून खात्री करा :–
*** शिवराम भगवंत ***
**स्टॅण्डर्ड बिल्डींग नं. १, डॉ. डिसोझा स्ट्रीट,**
**मुंबई नं. ३**

हट्टासाठीं तिला जिवाचा आटापिटा करायचा नव्हता. चहाची गाळणी झाडीत सरस्वती म्हणाली— 'कशाला ग हव्यात बांगड्या'?— डूल तरी कशाला हवेत? कांहीं मिळायचं नाहीं; यांतलं दूध पी आणि शाळेंत जा पाहूं. पाटीपूजनाचं सामान तुझ्या पाटीवर ठेवलं आहे काढून. हळदकुंकू गूळ खोबरें. उदबत्ती, पानंफुलं नि पैसा!— आतां कांहीं एक मागूं नकोस न उगीच माझ्यामागं दुरदुर लावूं नकोस!'

आज आई इतकी कशी बिथरली हें स्नेहलला समजत नव्हतं. ती अगदीं रडकुंडीला आली होती! अंतःकरणांत उमाळे दाटून येत होते. मनाचा कोंडमारा होत होता. मुद्रा मलूल झाली होती. ती हंबरडा फोडून रडायच्या बेतांत आली होती. पण जीव तोडून रडत कुणाच्या गळीं ती पडणार होती!— आईच्या गळीं पडून सांत्वन होण्याऐवजीं दोनचार फटके मिळण्याचीच शक्यता अधिक होती. वडील घरीं असते तर मात्र ती 'बाबा' म्हणून त्याच्या छातीला जाऊन बिलगली असती आणि तिचे बाबा असते तर आईपुढं जाऊन तोंड वेडावण्याची तिच्यावर पाळीहि आली नसती! तिनं उमाळे आंतल्या आंत दाबले व बैठकीच्या खोलींत येऊन ती बांगड्यांचा नि डुलांचा तपास करूं लागली! हें डबडें पहा, तें खोकें पहा; ही बरणी पहा, ती बाटली पहा! तिनं शोध शोध शोधलं पण तिला हवं तें तिच्या हातीं आलं नाहीं. शेवटीं नाराजीनं ती स्वयंपाकघरांत आली! सरस्वती तिथं नव्हती! स्नेहलचं दूध रोजच्या पात्रांत ओतून ठेवलं होतं व त्यावर ताटली झांकली होती! स्नेहलनं आईची वाट पाहिली नाहीं.

कुठं गेली होती आई?—छोटा सुनील अद्याप जागा झाला नव्हता. सरस्वतीनं अद्याप त्याला उठवलंच नव्हतं. मग गेली कुठं आई?- कुठं बाहेर गेली कां आई?... बाहेर जायला तिला फुरसत मिळते आणि आपल्याला हव्या असलेल्या बांगड्या आणि डूल द्यायला तिला सवड होत नाहीं याचं अपरिमित दुःख स्नेहलच्या हळव्या मनाला झाल्या-वाचून रहात नाहीं तिला आईचा थोडा रागहि येतो!—म्हणूनच आई स्वयंपाकघरांत नव्हती म्हणून तिनं आईची वाटहि पाहिली नाहीं. तिनं दुधाचं पात्र ओठांना लावलं व शाळेंत जायच्या ओढीनं पात्रांतलं कोमट दूध घटाघट पिऊन टाकलं! आतां ती शाळेंत जायला निघाली!

जाण्यापूर्वी आईला भेटून जावं असं तिला वाटलं. रोज शाळेंत जातांना ती आईचा निरोप घेऊन जाते! आई कुठंहि असली तरी तिला भेटून जाण्याचा तिचा नियम 'आई मी जातें' असं सांगण्याचा तिचा सराव! पण आतां आई घरांत नव्हती. मग कुणाचा निरोप घ्यायचा? आणि सरस्वती घरांत असती तरी स्नेहलनं तिला जाण्यापूर्वी विचारलं असतं कीं नसतं न कळे! ती थोडीफार धुश्शांतच होती!— आजचा दिवसच कांहीं बरोबर उजाडला नव्हता. अंथरुणांतून उठल्या-पासून तों आतापर्यंत... तिला आईनंच लवकर उठूं दिलं नाहीं. सरस्वतीनं तिची वेणी घातली नाहीं. सरस्वतीनं तिला मोत्यांच्या बांगड्या दिल्या नाहींत. तिच्या आईनच तिला डूल दिले नाहींत. नटायची स्नेहलला केवढी हौस होती! पण आज तिच्या मनासारखं कांहींच घडत नव्हतं. आणि जें जें घडत होतं तें सारं तिच्या मनाविरुद्ध, तिच्या इच्छेविरुद्ध!... मग आईचा निरोप कशासाठीं घ्यायचा?

स्नेहलनं पूजेची पाटी दोन्ही तळहातावर अलगद उचलून घेतली. पुन्हां तिला कांहींसं आठवलं. अरे हो!— बाहुली घ्यायला विसरली कीं ती! नाचणारी, मुरडणारी बाहुली!... अगदीं मुद्याची गोष्ट विसरून चालली होती ती शाळेंत! अर्थातच तिची तिला गम्मत वाटली आणि कींवहि आली. आज आपलं लक्ष ठिकाणावर असूं नये याचं तिला नवल वाटलं. तिनं हातांतली पाटी खालीं जमिनीवरच ठेवली व बैठकीच्या खोलींत जाऊन कपाटाकडे पाहिलं. स्नेहलची बाहुली कपाटावरच होती. तिला हायसं वाटलं. पण हीच बाहुली जर आईनं कुलुपाच्या कपाटांत ठेवली असती तर मात्र मोठी पंचाईत होती! बाहुली मागण्यासाठीं पुन्हां आईकडं जावं लागलं असतं व तोंड वेडंवाकडं करून आईपुढं याचना करावी लागली असती. आईनं ती दिलीच नसती. पण बाहुलीसाठीं भीक मागण्याचा प्रसंग स्नेहलवर आला नव्हता हें किती बरं झालं होतं! तिच्या मनांतली दुःखाची किल्मिश दूर झाली. मुद्रेवर प्रसन्नतेची प्रभा फांकली. स्नेहलनें बाहुली काखोटीस मारली व जमिनीवर ठेवलेली पाटी पुन्हां अलगत उचलून ती चालूं लागली! ती उंबरठ्याबाहेर पडली! पण तिच्यानें पुढें पाऊल उचलेना! आईला भेटून जाण्याची इच्छा अनावर झाली. शाळेंत जातांना ती आईला रोज सांगते — 'आईला विचारल्याशिवाय तिचं पाऊल घराबाहेर पडतच नसे! म्हणूनच आतां तिला अगदीं चुकल्या चुकल्यासारखें वाटूं लागलें. तिचे पाय जागचे जागींच थबकले. मनांतला राग निथळला. तिची लाडकी बाहुली तिच्या हातांत आल्यामुळें तिच्या जिवांत थोडासा जीव आला होता. आतां आईला विचारून जायला कसलीच हरकत नव्हती! --स्नेहल पुन्हां घरांत आली. ती थेट परसदारापर्यंत गेली पण सरस्वती कुठेंच नव्हती!

कुठं गेली आई?—स्नेहलनं सरस्वतीला न्हाणीघरांतहि पाहिलं. 'आई, आई' म्हणून तिनं पांचपंचवीस हांकाहि मारल्या पण तिला उत्तर नाहीं! कुठं बाहेर कां गेली आहे?— शेजारीं पाजारीं कां गेली आई?— आणि स्नेहल तीरासारखी शेजारच्या घराकडे धांवली. स्नेहल आपट्यांच्या घरांत घुसली. तिची आई आपट्यांच्या काकूंबरोबर कांहीं तरी बोलत होती. स्नेहल तिच्याजवळ आली व म्हणाली— 'आई, मी जातें!' सरस्वतीचं तिच्याकडे लक्ष गेलं नसावं. ती आपट्यांच्या काकूंबरोबर बोलतच राहिली आणि स्नेहल—

तिनं पुन्हां सांगितलं, 'आई मी जातें!'

असं दोनदां झालं, चारदां झालं, आठदां झालं. आपट्यांच्या काकूंचं स्नेहलकडे लक्ष गेलं. तशा त्या हंसून म्हणाल्या—'सरस्वतीबाई, बघा बाई तुमची पोर!... कशी विचारते आहे— आई मी जातें

(पान १६ पहा)

सर्व प्रकारची विम्याची व नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटची कामें केली जातात.
अधिक माहितीसाठीं
रा. ना. ठाकूरदेसाई
७/२९ अहमद सेलर बिल्डिंग नायगांव, दादर, मुंबई १४.

# अर्जुन उलुपी

कवि : **संजीव**, सोलापूर

( धर्मराज आणि द्रौपदीला एकांतांत अर्जुनानें पाहिलें आणि नारदानें घालून दिलेल्या दंडकाप्रमाणें त्याला बारा वर्षे वनवासास जावें लागलें—या वनवासाच्या प्रदीर्घ काळांत अर्जुनानें देशोदेशीचा प्रवास केला. एका गंगा किनारीं तो स्नानसंध्येसाठीं उतरला त्यावेळीं त्यानें एक जलसुंदरी ( नागकन्यका ) पाहिली; तीहि त्याच्यावर मोहीत झाली ही शृंगार कथा-महाभारतांत आहे.


**अर्जुन**— गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
आभाळाला निळ्या जळाचा जणूं लागला लळा ॥
बहरला कौमुदिचा कीं मळा ॥
ढगाढगांचे मोर पांढरे फिकट पिसारा निळा ॥
जळाचे वाळ करिति छळ छळा ॥
वाऱ्याचे भुरभुर ते जावळ, करतळांत खुळखुळा ॥
मुखांतुन सुमगंधाच्या चुळा ॥
तरुवेलिस आली हरितपणाची कळा ॥
करितात फुलें हीं धन्य फुलांच्या कुळा ॥
कोशांत खुले विस तंतूचा झिरमिळा ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
पिंगा घालित फिरतो भुंगा प्रणयगीत कोकिळा ॥
गातसे गंधर्वाचा गळा ॥
मदन रतीच्या रसरंगानें भिजल्या इथल्या शिळा ॥
उकलला वेल वेणिंतिल पिळा ॥
हिरवा पिवळा कुठे जांभळा रंग कुठें पोवळा ॥
इंद्र धनु कुलिचा गोतावळा ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
आलों मी या गंगातीरीं असा अभावितपणें ॥
बोलके दिसले मज चांदणें ॥
एक पाहिली नागकन्यका रूपस जळ सुंदरी ॥
आयना चंचळ जळ मंदिरीं ॥
पापणींतल्या पुष्पवृष्टिनें केलें स्वागत तिनें ॥
मेंदिची हातीं अभिवादनें ॥
तें प्रसन्न पहिलें दर्शन एकांतिक ॥
वाटते असावी पूर्वीचिच ओळख ॥
किती रूप सघन तें वदन मदन मोहक ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
मत्त मोगरी शुभ्र पांढरी तसें विरळ पातळ ॥
दाविते तन्वांगाचा तळ ॥
कचपाशांचे व्याळ लोंबती स्कंधावर व्याकुळ ॥
नितंबीं उन्मुख संगम स्थळ ॥
डौलदार त्या दोन सोंगट्या सारीपट कंचुकी ॥
वारुळें मातीच्या मंचकी ॥
शिरिं शिरपेंचावर माणि मौक्तिक शिंपले ॥
चपलेनें त्यावर तेज काय शिंपिलें ? ॥
जणुं नभांत तारे तारक अनुकंपले ! ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चद्राची चित्कला ॥
अरुणोदय नव-तिलक कपाळीं अधरिं अस्त रक्तिमा ॥
मिळाल्या प्राचि आणि पश्चिमा ॥
नव बिल्व दळासम बहिर्गोल पापणी ॥
त्या मधे शिवाची वलयांकित मांडणी ॥
चांदण्यांत जडला नील मणी कोंदणी ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
दिवस मुखावर रात्र कचांवर एका ठायीं असा ॥
उमटला चंद्रार्कांचा ठसा ॥
शृंगाराचा वेद तारिला तूं तर पाण्यावर ॥
आणि मी नव्हतों भानावर ॥

तूं सांग कोण ग उर्वशी, रति, अप्सरा ? ॥
उडविला सर्वांचा तूं तुरा ॥

**उलुपी**— मी नागकन्यका उलुपी बोले रमा ॥
तूं पंडुकुलाला सार्थ पार्थ उत्तमा ॥
आपुली म्हणुन घ्या पदरीं पुरुपोत्तमा ॥
गौरकाय वरतनू पुरंध्री जळांत दिसली मला ॥
जशी रे चंद्राची चित्कला ॥
राजबिंड मन्मथा सारखा तीरीं मी पाहिला ॥
जसा कीं सूर्य कार्तिकांतला ॥
डौल्दार छातिच्या कडा जणुं नाग उभारी फडा ॥
वनीचा वनराजा हा सडा ॥
नयनकडांतुन कोमलनिर्मल प्राजक्ताचा सडा ॥
मिशीवर कोरदार आकडा ॥
अंगकांतिवर पुरुषार्थाचा वाजतसे चौवडा ॥
दंड तव उदंड वर चौकडा ॥
स्कंधास सुशोभित कार्मुक तें गांडिव ॥
तूं कुंति सतीचा दुसरा नृप पांडव ॥
करतळीं मळापरि ज्याला रणतांडव ॥
राजबिंड मन्मथासारखा तीरीं मी पाहिला ॥
जसा कीं सूर्य कार्तिकांतला ॥
सिंहकटीसमकमान कंबर पीतांबर नेसला ॥
त्यावरी शेला किती शोभला ॥
त्रिभुवन विक्रम पराक्रमाचा पुतळा मोहक असा ॥
पातला गंगेवर या कसा ? ॥
व्रतस्थ भाविक पांथस्था परि स्नान नि संध्या करी ॥
सोडितो अर्घ्य आपुल्या करीं ॥
त्या करांत आतां स्वीकारावें मला ॥
त्या स्पर्श सिंधुनें शांतवि कामानला ॥
हा बहार सारा करपुन वव चालला ॥
राजबिंड मन्मथा सारखा तीरीं मी पाहिला ॥
जसा कीं सूर्य कार्तिकांतला ॥

**अर्जुन**— तीर्थाटन मी करीत चाललों व्रतस्थ मम अंतर ॥
नको हा टाकु मोह—मंतर ॥
द्रौपदि माझी असतां भार्या आर्ये तुज कां वरूं ? ॥
कशाला पातक असले करूं ? ॥

**उलुपी**— हें नच पातक, देहदान मम माझी राजीखुषी ॥
सतीवर कितिक लोभती ऋषी ॥
जाळें सत्यवतीवर भुलला पाराशर ॥
ती योजन गंधा अजून अजरामर ॥
तूं गृहस्थाश्रमीं सर्व सौख्य सागर ॥
जळांत बुडली अर्जुन उलुपीजुळें प्रेम पाकळी ॥
मिळालीं हृदयें गंगाजळी ॥




भारत सरकारकडून 'रजिस्टर्ड' केलेलें

**पांढरे डाग** सन १९३६ पासून प्रसिद्ध व हजारोंनी अनुभवलेले गुणकारी औषध किं. ५ रु. पो. ख. १। रु. माहितीपत्रकें मोफत मागवा.

**अशक्तता** सव प्रकारची अशक्तता जाऊन उत्साह वाटतो व बलशक्ति वाढून ताकत येते औषध किं ५ रु. पो. ख. १। रु.

**दमा, श्वास** रोगांवर गुणकारी औषध किं. ५ रुपये.

वैद्य के. आर. वोरकर (अभि) आयुर्वेद भवन,
मु. पो. ता. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

( पान १३ वरून )

म्हणून !... जणूं काय दूरच्या गांवालाच निघाली आहे. काय ग पोरी, कुठं निघालीस तूं ! नवऱ्याच्या घरीं नांदायला कीं इंग्लंड अमेरिकेला !...

स्नेहल लाजली. आणि सरस्वती... तिला आपल्यांच्या काकूंच्या बोलण्यानं शरमल्यासारखं झालं. आपली पोरटीच कशी वेड्यासारखी विचारते रोज आपल्याला शाळेंत जातांना !...आई, मी जातें !...शाळेंत जातांना का विचारायचं असतं, तिचं हें विचारणं आपल्याला मोठं विचित्र वाटतं मग शेजाऱ्यापाजाऱ्यांना वाटेलच वाटेल !...आई, मी जातें !...आणि ही जाते कुठं तर शाळेंत ! गांवाला कां जाते ही? कां नांदायला निघालेली असते ! इंग्लंड अमेरिकेला तर निघालेली नसते ही !...मग तिनं असा निरोप कशासाठीं घ्यावा ?–आणि इथं लोकांच्या दारांत येऊन... सरस्वतीला अधिकच शरम वाटली ! तिचा राग अनावर झाला व तिनं स्नेहलच्या पाठींत जोराचा दणका घालून म्हटलं, ' कशाला उलथलीस इथं ?...आई, मी जातें एवढंच सांगायला नाहीं ! कुठं मुलुखावर तर निघाली नाहींस ना ! '

आणि स्नेहलच्या डोळ्यांतून आसवांच्या माळा घरंगळूं लागल्या. बऱ्याच वेळेपासून दाबून ठेवलेले उमाळे ओंठावारे बाहेर पडूं लागले. ती जोरजोरानें स्फुंदूं लागली. तसा सरस्वतीचा राग अनावर झाला. आतां तिचें लक्ष स्नेहलच्या काखेंतल्या बाहुलीकडे वळलें. सरस्वतीनें रागारागानें तिच्या काखेंतली बाहुली हिसकावून घेतली व म्हटलें ' ही बाहुली घेऊन चालली होतीस वाटतं शाळेंत...'

' प्रदर्शनांत ठेवायची आहे मला ती...' हुंदके देतच स्नेहलनं सांगितलं.

' तर तर–' सरस्वतीनं स्नेहलचा गालगुच्चा घेत म्हटलं– ' प्रदर्शनांत ठेवते बाहुली ! म्हणजे चांगलंच भलं व्हायला बाहुलीचं ! पंचवीस रुपये देऊन आणली आहे बाहुली तीं कांहीं प्रदर्शनांत ठेऊन तिचं वाटोळं करण्यासाठीं नव्हे !.. चल चालायला लाग...'

' मला बाहुली हवी – स्नेहल निर्धारानं रडत रडतच म्हणाली.

पुन्हां तिच्या पाठींत एक रट्टा बसला. रडण्याचा जोर वाढला. फटक्यावर फटके बसूं लागले. हुंदक्यावर हुंदके येऊं लागले. सरस्वतीनं स्नेहलला आपल्यांच्या घराबाहेर मारतच काढलं व तिच्या रडण्याचा कढ ओसरण्याची वाट न बघतांच तिला वाटेला लावलं. स्नेहल मागें वळून बघत होती आणि सरस्वती तिला एकसारखी दटावत होती ! स्नेहलच्या मनाविरुद्ध सर्व घडत होतं आणि सरस्वती मन मानेल तशी स्नेहलला घालवून लावीत होती ! स्नेहलच्या डोळ्यांतून आसवं ओघळीत होतीं आणि पाटीवर पडून तिच्यावरचीं चित्रं धुवून जात होतीं!... काल रात्रींपासून स्नेहलनं कल्पनेनं रंगवलेली किती तरी चित्रं अशीच धुवून गेली होतीं ! प्रदर्शनांत ठेवायची बाहुली... दोन वेण्या... निळ्या निळ्या रिबनची टपोरीं फुलं... मोत्यांच्या बांगड्या... डूल... सगळींचं चित्र पुसून टाकलीं होतीं आणि स्नेहलच्या डोळ्यांना अंधारी येत होती ! आपल्या डोळ्यापुढून काय काय सरकत आहे हें तिला समजत नव्हतं. ती अतीशय कष्टी झाली होती. ती अतीशय नाराज झाली होती. तिचीं सारीं स्वप्नं फिसकटलीं होतीं. तिचीं सारीं स्वप्नं तुटून विस्कटलीं होतीं ! – आणि...

आणि सरस्वतीला याची यत्किंचितहि खंत नव्हती. स्नेहलला वाटेला लाऊन ती घरांत आली. सुनील जागा झाला होता. ती त्याच्या दुधाच्या तजविजीला लागली आणि थोड्याच वेळात कुणी तरी येऊन तिला सांगितलं !...

स्नेहल मोटारखालीं सांपडून जागच्या जागीं खलास झाली. आईचं काळीज हललं. ती बातमी ऐकतांच सरस्वतीचं हृदय फाटलं !... काय झालं नि काय नाहीं झालं हें क्षणभर तिला उमजलं नाहीं !... स्नेहल मोटारखालीं सापडली आणि जागच्या जागीं खलास झाली !... काय झालं पोरीचं !... काळानं डाव साधला !... असला कसला दिवस उजाडला आज !... आणि मला मेलीला कुठुन दुर्बुद्धी झाली पोरीशीं अगदीं फटकून वागण्याची !... स्नेहलला मोत्यांच्या बांगड्या हव्या होत्या !... स्नेहलला डूल हवे होते !... मोत्यांच्या बांगड्या... कपाटांतल्या हिरव्या बाटलींत ठेवलेल्या बांगड्या... आणि नथीच्या डबींत ठेवलेले डूल... सरस्वतीनं कपाटांतल्या बांगड्या काढल्या... डूल काढले व ती धांवत सुटली. रस्त्यांतच ती ठेंचकळली. दारांतच तिच्या पायानं स्नेहलची बाहुली ठोकरली गेली... ही ती बाहुली... पंचवीस रुपयांची ही बाहुली आपण तिच्या हातून हिसकावून घेतली.

आई, मी जातें !...त्या निष्पाप पोरीनं आपण निरोप घेतला... अखेरचा निरोप घेतला !...आणि सरस्वतीच्या डोळ्यांतून अश्रु घळघळूं लागले. हातांतली बाहुली जागचे जागीं ठेऊन ती घराबाहेर पडली तिला सुनीलचा विसर पडला. स्वतःचा विसर पडला ती रस्त्यानें धांवूं लागली. स्नेहल गेली त्या दिशेनें धावूं लागली.

मंडईच्या चौकांत गर्दी जमली होती. धांवत रडत येणाऱ्या सरस्वतीला पाहून लोक म्हणाले– ' बाजूला सरा. पोरीची आई आली ! लोकांनी सरस्वतीला वाट करून दिली. स्नेहल पडली होती तिथ सरस्वती आली. रक्ताच्या थारोळ्यांत पडलेल्या स्नेहलला पाहून सरस्वीचं अंतःकरण जास्तच फाटलं, वासरासाठीं गाईनं हंबरडा फोडला ! सरस्वती दुःखाकूल झाली. ती छाती बडवून घेऊं लागली. तें दृश्य पहाणारांचे डोळे भरून आले !

स्नेहलच्या छातीवरून मोटारचं चाक गेलं होतं ! मनांतल्या अपुऱ्या इच्छा पुऱ्या पुऱ्या चिरडल्या गेल्या होत्या. तिचे केस विस्कटले होते... तिचे दोन्ही मोकळे हात दोन बाजूस पसरले होते...

स्नेहलच्या गालाला गाल लावून सरस्वती आक्रोश करूं लागली—

' पोरी, काय झालं हें ?...तूं मला विचारून आलीस पण मी तुला प्रेमानं निरोप दिला नाहीं. मला चांडाळणीला आज कुठून अवदसा सुचली ? ... काय झालं हें पोरी ? '

सरस्वती तिच्या केंसांत बोटें अडकवून म्हणाली – ' पोरी, तुझी वेणीदेखील घातली नाहीं मी ? तुझ्या केंसावरून शेवटचा मायेचा हातहि फिरवला नाहीं मी ? ... स्नेहल– स्नेहल... स्नेहल... स्नेहा... स्नेहा पोरी...' आणि सरस्वतीनं तिच्या कानावरून हात फिरविला !

' पोरी तुझे कान मोकळे... डूल घातल्यावर किती छान दिसतेस तूं माझ्या बेटी ? ... स्नेहल, तुझे डूल आणलेत मी पोरी... घाल पाहूं हे कानांत ! तुझ्या आईला पाहूं दे...'

सरस्वतीनें तिच्या कानांत घातले आणि तिचे हुंदके जास्तच दाटून आले. तिनें स्नेहलचे दोन्ही हात उचलले व छातीशीं घट्ट आवळून धरले. त्या मोकळ्या हातांत तिनें मोत्यांच्या बांगड्या चढवल्या ? ... आणि सरस्वतीचं लक्ष तिच्या पाटीकडे गेलें. तिच्या फुटून ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या होत्या ! ...

सरस्वतीच्या हृदयाच्याहि अशाच ठिकऱ्या झाल्या होत्या आणि तिच्या डोळ्यांवाटे स्नेहलला आसवांची तिलांजलि दिली जात होती !

★ ★ ★

# आकार नसलेली व्यथा......

लेखक : सदाशिव करंदीकर

**प्रिय श्री,**

**सुटलेला बाण जसा कधींच परतत नाहीं, तद्वत आपल्या दोघांच्या जीवनांतील ते प्रीतीचे क्षण आतां पुनः कधींच फुलायचे नाहींत.**

**...श्री, आज मी एका भयंकर समस्येच्या कड्यावर उभी आहे. माझ्या आयुष्याच्या फलकावरील तुझी मूर्ति मी पुसूं शकत नाहीं. माझ्या जीवनांत प्रवेश करूं पहाणाऱ्या कुणा तिऱ्हाईतासाठीं मी माझें हृन्मंदिर उघडूं शकत नाहीं. आणि स्पष्ट नकार दिल्यास बाबांचें प्रेत पहाण्याचें नशिबीं येईल, या नुसत्या कल्पनेनेंच मी गलितमात्र झालें आहे.**

**मी काय करूं श्री ? मी काय करूं ?...**

प्रिय श्री,

मध्यरात्र उलटून गेल्ये. एक विलक्षण गारवा हवेंत दरवळतोय नि काळनाची लेखणी करून हृदयांतल्या लाल शाईनं मी तुला पत्र लिहायला बसल्ये...

– मी तुला पत्र लिहायला बसल्ये नि काय लिहू नि काय नको असं होऊन गेलाय... या पूर्वी तुला पत्र लिहायला बसायचे तेव्हां अगांतूक पाहुण्यांसारख्या कल्पना नूसत्या गर्दी करायच्या मनांत... पण आजचं असं कां झालंय ? हृदयांतली धडधड सारखी वाढत्ये कां ? हातापायाला कंप का सुटलाय ? डोळ्याभोवती अंधार पसरल्यासारखं कां बरं वाटतय ?

श्री, हे पत्र वाचल्यावर तुझ्या मनाची काय स्थिती होईल याची कल्पनाच करवत नाहीं रे...

–वाटतय कशाला झाली आपली गांठभेट ? तूं भेटलास नसतास, माझ्या जीवनांत आलाच नसतास तर...? पण होणाऱ्या गोष्टी होऊन चुकल्येत...त्या ‘ चूकत ’– नाहींत...हेंच खरं...

वाटतं–माझ्यासारखी एक अबोल–लाजाळू पोरगी तुझ्या भितकी कशी जवळ आली– कॉलेजांत माझ्या भेटीसाठीं प्रयत्न करणाऱ्या– कित्येकाना मी वाटेला लावलं पण तुझ्या जाळ्यांत आपण होऊनच कशी बरं सांपडले ?

तुझी माझी पहिली भेट अगदीं काव्यात्मक झाली म्हणेनास ! कॉलेजच्या वाचनालयांत आपण पुस्तकें बदलायला आलो होतो...मी बाजूलाच उभी होते.

कोठलं पुस्तक म्हणता ? लायब्रियन विचारत होती...

माझ्याकडे तिरका दृष्टीक्षेप करून तूं सांगितलस... “ वुई आर नॉट अलोन... ” अन् भेदरलेल्या अवस्थेंत तुझं पुस्तक घेऊन मी जाऊ लागले...तशी ग्रंथपालानें––

माझी चूक नजरेंत आणताच मी माघारी आले... आणि म्हणाले एसक्युज हं...

–हंसत हंसत– पण खवचटपणानें तूं म्हणालास–

–जाऊ द्या हो... “टू अर इज ह्युमन”... मला तो खवचटपणा आवडला. विनोदही आवडला... अन तूहि आवडलास...

परत जातांना तूं म्हणालास– कमल फडक्यांचं भाषांतर वाचा त्यावरलं... खरंच छान आहे...

पुढं आपली ओळख अशीच वाढली– दोघांच्या लायब्ररींत यायच्या जायच्या वेळा नि वार चुकून बरोबर येऊ लागले... तुझ्या नोटस पाहिल्या तेव्हां तुझ्या– बुद्धीमत्तेची, चिकाटीची जाणीव झाली...

तुझ्या माझ्या सहवासाच्या साऱ्या सुखद् स्मृती मनाभोवती पिंगा घालतायत... अनंत आठवणींच्या मुंग्यांनी मनाच्या वारुळाभोवती गर्दी केल्ये...

–श्री, मराठी वाङ्मय मंडळानं सादर केलेल्या त्या नाटकांत तूं आणि मी जोडीनं कामं केली. त्या दिवशीं नाटकांत नायिका म्हणून तुझा हात हातांत घेतानांच मनाशीं ठरवून टाकलं कीं हे हात हातांतून घालवायचे नाहींत म्हणून .. श्री, बेहद्द सुंदर झालं आपलं काम... खुद्द प्रिन्सिपॉलनीही आपलं अभिनंदन केलं...

श्री, तुझ्या धीरगंभीर चेहऱ्यावर, बुद्धिमत्तेला साजेशा काळ्याभोर बोलक्या डोळ्यांवर तुझ्या आत्मविश्वासावर मी भाळले हें खरं.. पण श्री... तूं श्री असुनही ‘ग’ची बाधा तुला कधींच झाली नाहीं... कस्तुरीच्या बाबतींत हरणानं बेफिकीर असावं तसा एक बेछूटपणा– बेबंदपणा तुझ्या व्यक्तिमत्त्वांत वावरतो नां तोच मला अधिक विलोभनीय वाटला श्री...

तूं लेखक आहेस हे सुद्धां मला किती उशीरा कळलं ! कॉलेजच्या कॅंटीनमध्यें आपण बसलो होतो... तोच श्रीधर देशमुखांची तार... म्हणत पोष्टमन तिथे आला... श्री, तारेवर झडप घालूनच मी ती फोडली.

– ‘प्रतिभा’ मासिकानं लावलेल्या कथास्पर्धेत पहिल्या बक्षिसाचा मान तुला मिळाला होता..

मी तुझ्यावर रागावले... अजूनपर्यंत माझ्यापासून ही गोष्ट लपवून ठेवल्याबद्दल तुझ्याबद्दल अविश्वासाचा ठराव पसार केला... माझ्यावर तुझं प्रेम नाहीं असंही म्हणाले... माझ्या रडवेल्या चेहऱ्याकडे बघत तूं म्हणालास...

“ तुम्हां बायकांच्या तोंडांत तीळही ठरत नाहीं... मी ही गोष्ट तुला सांगितलीच असती तर साऱ्या कॉलेजभर डंका पिटला असतास तूं... अन् मग कॉलेजच्या वाङ्मय मंडळाच्या जबाबदारीचं घोंगडं गळ्यांत पडलं असतं शालन – ” त्याची बाट काय !

– " ते शोंगडं म्हणजे काय तुझे हात वाटले होय सहज गळयांत टाकून घ्यायला ? " – श्री, त्या वेळी मी लाजले – अवाक झाले आणि फक्त इतकच म्हणाले-इश्य..

श्री, आपल्या आयुष्याच्या गाठी बसणार याची जाणीव होताक्षणींच आपण भिन्न जातींतले आहोत याची जाणीव तूं मला करून दिली... पुढल्या साऱ्या–अपेक्षित आणि संभाव्य धोक्यांच्या लाल खुणा माझ्या नजरेत भरवल्यास पण श्री, तरीहि तुझ्यापासून मला दूर जाणे जमलेच नाहीं रे. तूं मला सावरण्याचा प्रयत्न केलास पण मी सावरू शकले नाहीं...आणि तसं म्हणशील तर या स्थितींत अजुनपर्यंत कुणालाच सावरता आलेले नाहीं. कृष्णाच्या सुरानें मोहित झालेल्या राधेला सावरतां आलं नाहीं. मजनूवर आसक्त झालेल्या लैलाला सावरता आलेलं नाहीं...अन् श्री-मत्स्यगंधेला पाहिल्यावर शंतनू तरी कुठें सावरू शकला होता स्व:ला ?

–आणि तुझ्या माझ्या जातींतला भिन्नपणा मला कधींच जाणवला नव्हता... जाती म्हणजे आपल्या संस्कृतीच्या कल्पनेवर चढलेली बुरशीची जळमटं आहेत श्री... पण-आपल्या-कडच्या वडिलधाऱ्या मंडळींना ते अजुनहि पटत नाहीं हीच आपणा तरुण प्रेमिकांची शोकान्तिका आहे श्री चांगला आणि वाईट–सुष्ट आणि दुष्ट निंद्य आणिं वंद्य हीच जातीची गमक असावित असं मला वाटतं. श्री, कर्णानीं नव्हतं का त्या– अश्वत्थाम्याला खड-सावून सांगितलन् कीं—

–दवायत्तं कुले जन्म– मदायत्तं तुं पौरुषम !

श्री, तुझा आवडत्या कवीचा तो काव्यसंग्रह टेबलावर पडलाय त्यांतल्या तुझ्या न् माझ्या दोघांच्या आवडत्या ओळी मनांत रुंगी घालतायत

तुझी माझी राजधानी, सुखशांतीचे नगर...

तुझा प्रखर प्रकाश, माझी चंद्राची नजर ..

–तुला आठवताय तो गॅदरींगचा प्रसंग ?

शेवटच्या दिवशी फिशपाँडसचा कार्यक्रम चालला होता. सारं सभागृह गच्च भरलं होतं... 'आहेर' दिले जात होते.. खिलाडूपणानें घेतले जात होते ..

–तोच तुला–मला एकदम स्टेजवर बोलावण्यांत आलं.. आणि आपण–स्टेजकडे येत असतानांच त्या किनऱ्या आवाजाच्या सुधा नाडकर्णीनें–"सोडऽरे श्रीधरा शाळूच्या पदरा– " या ओळी माईक वरून म्हटल्यानें तशी–पुंडलिक वरऽदा हाऽरि विठ्ठलचा एकच गजर कितीतरी वेळ दूमदूमत होता...

श्री, आपल्या प्रेमकथेचा हा पूर्वरंग पूर्वेच्या रंगीत दिशेसारखाच–गोड होता, भूरळ घाल-णारा होता– पण आतां उत्तर रंगाकडे वळतांना मात्र ' उत्तरक्रियेचे ' अभद्र विचारच मनांत घेतायत्. श्री...गेल्या महिन्यांतच आई एका-एकी आम्हाला सोडून गेली, हे तुला माहित आहे. श्री...आपलं प्रेम तिला माहित होतं . आणि माझ्यावरही तिचा जीव होता...तिच्या आठवणीन तूं एखाद्या लहान पोरासारखा रडलास...

श्री, वडिल आपल्या लग्नाला मान्यता देणार नाहींत याची आईलाहि कल्पना होती...पण तिनं-आपले विचार त्यांच्या गळी उतरले असत.. रे...

–पण श्री, एकाएकी आईला जो अर्धांगाचा झटका आला त्यांतून ती उठलीच नाहीं... आणि आपल्या लग्नासाठीं बाबांकडून हक्कानें आणि हट्टानें अनुमती मागणारे ते लाघवी आर्जव त्या बंद वाचेंतच विरघळून गेले... अन् मग अखेरपर्यंत–तिच्याडोळयांतून–अश्रुच्या गंगायमुना लेवढयांच काय त्या झरत राहिल्या. अर्धामुर्धा संसार बाबांच्या–स्वाधीन करून अर्ध्या डावांतूनच आई उठून गेली...

श्री, तुझ्या माझ्या संसाराची स्वप्नें डोळया-पुढं चितारत असतानांच बसलेला– हा दैवाचा क्रूर तडाखा भीषण होता.. श्री... आत्ताच कुठे तू जागा मिळविली होतीस... तडी 'जागा' निश्चित होती...

–श्री, पण आई गेली अन् आपल्या विवा-हाच्या मार्गांत अडचणींच– कांटेरी जाळ निर्माण झालं..

श्री, आई गेली आणि बाबांची तब्येत अर्ध्यानं ढासळली रे... अलिकडे तर ते भ्रमिष्टासारखेच वागूं लागले आहेत... धाकट्या दोन बहिणी... 'देवा तुझे किती सुंदर आकाश ' हे धडे घोकणारा लहानगा अरुण... अन् नुकताच अकरावींत गेलेला सोळा वर्षांचा माधव... श्री, अलीकडे या साऱ्यांची चिमणीएवढीं झालेलीं तोंडे पाहिली कीं आतडं तीळ तीळ तुटतं... देवावरचा सारा विश्वास... सारी श्रद्धा नाहीशीं होत आहे असं वाटतं रे...

कशी कोण जाणे पण आपल्या प्रेमसंबंधाची कुणकुण मध्यंतरीच बाबांच्या कानावर गेल्या-पासुन सर ते हाय खाल्यासारखेच वागत असतात...

–श्री मागे त्यानीं माझं टिपण एका ठिकाणी टाकलं होते...अन् आश्चर्य असं कीं मुलगा मला पसंत पाहून गेला...पसंतीचा निरोपही लगेच आला आणि बाबानां त्यानीं ठरवाठरवी-साठीं म्हणून बोलावलें आहे..

श्री मी पुन्हा एकदा धीर केला.. आणि सारा निश्चय एकवटून बाबानां सारी परिस्थिती समजावून सांगितली... पण श्री, त्या तपश्चर्येला गोड फळ आलं नाहीं.. बाबानी आपल्या लग्नाला कडाडून विरोध केला. आई गेल्यापासूनचा नशिबावरचा सारा राग–विषाद, दुःख जणूं त्यानी माझ्यावर ओकून टाकलं... कुलटा जन्माला आलीस... तोंडाला काळं फासलंस... आईला मारून टाकलंस—आणि हे थेर पहायला मला म्हाताऱ्याला जीवंत ठेवलंत अशी जहरी शब्दानीं माझ्यावर' निखारे टाकले त्यानी. . .

श्री. . अन् अखेरीस सारा राग बाहेर पडल्यावर गादींत तोंड खूपसून एखाद्या लहान पोरासारखे बाबा रडायला लागले...या लग्नाला तयार नसशील तर माझे प्रेत चौपाटीला लागलेलं दिसेल असं म्हणाले... श्री, जमदग्निसारखाच तापट आहे त्यांचा स्वभाव.. बोललेला शब्द अजूनपर्यंत त्यानीं कधींच बदलला नाहीं...

श्री, आज आई असती तर बाबांच्या डोळ्यांतील चंद्रकिरणांनीं विझवली असता... कांहींतरी तोड निघाली असती. मार्ग सापडला असता.. प्रश्न सुटले असते...निरगांठ उकलली असती...

श्री, बाबांचं मन मोडून तुझ्याशीं विवाहबद्ध झाले तर बाबा जीवाचं बरं–वाईट केल्याशिवाय रहाणार नाहींत... आणि श्री, तुझ्यावाचून–तुझ्याशी प्रतारणा करून कुणाही माणसाला वर म्हणून मान्यता देणे माझ्याच्यानं शक्य होणार नाहीं. .

एका समस्येच्या कड्यावर मी उभी आहे. . मन चलबिचल झालंय. . . एक अथांग खोल दरी पसरली आहे. . . विषण्ण काळोखानं

( पान २० वर पहा )

# परिवर्तन

समोर अभिनन्दनपर तारांचा ढीग पडला आहे; स्तुतिपर पत्रें रोज येत आहेत; मन आनंदानें बेहोष झालें आहे. मिळालेल्या यशानें माझ्या शरीरांतला कणानकण फुलून निघाला आहे. माझीं सारीं स्वप्नें साकार झालीं आहेत. बालपणापासून मी ज्या आशा आकांक्षा उराशीं बाळगून ठेवल्या होत्या त्या कल्पनेबाहेर यशस्वी झाल्या आहेत. माझ्या ध्येयवादी कल्पनांना मूर्त स्वरूप आलं आहे. आई वडिल नसलेल्या एकेकाळच्या अपंग पोराचें हें वैभव. समाज डोळे फाडफाडून माझ्याकडे पाहात आहे. हें कसं झालं ? वळचणीचं पाणी आढ्याला गेलं कसं म्हणून समाजांतले माझे विघ्नसंतोषी आश्चर्याच्या खोल सागरांत डुबक्या खात आहेत.

माझें नशीब असें एकदम कसें उदयाला आलें, दैवानें मला अचानक कसा हात दिला. कोणत्या देवीचा वरदहस्त माझ्यावर असावा याचा ते राहूनराहून विचार करीत आहेत. हा नरेन्द्र खरोखरच नराचा इन्द्र कसा झाला याचें निर्जीव बाहुलीचें बाळ किंवा सुकलेल्या खोडाला कोंब फुटावेत इतकें आश्चर्य त्यांना वाटत आहे.

पण थांब ! मायलेकरांची ताटातूट करणाऱ्या निष्ठूर समाजा, थांब ! तुला मी जास्त वेळ दोग्ध्यांत ठेवित नाहीं. कोणतेहि पिशाच्च मला वश झालेलें नाहीं. कोणतीच जादू माझ्याकडे नाहीं. वा कोणतीहि देवी माझ्या नवसाला पावलेली नाहीं. मग हें झालें कसें ? परिस्थितीशीं झगडून मी आज यशस्वी झालों आहे. पण ही अचाट शक्ति मला कोणी दिली ? परिस्थितीशीं टक्कर देण्याचं सामर्थ्य मला कुणी दिलं ? परिस्थितीवर अन् संकटावर मात करण्याचं आणखीन् त्यागाचं बळ मला कुणी दिलं ? माझ्या ध्येय मंदिराच्या शिखरावर जो मी उभा आहे,

: लेखक :

दिनानाथ सावे

माझ्या यशाची प्रभा जी दाहीदिशांना फाकली आहे या सर्वाला कारणीभूत माझी आई ! स्वैर सुटलेल्या मन मानेल तसं वागणाऱ्या या माणसाला ताळ्यावर आणणारी, माझ्यासाठीं रक्ताचें पाणी करणारी माझी आई ! ती जर माझ्या जीवनांत आली नसती तर मी आज रस्त्यावर भटकणाऱ्या भिकाऱ्याच्या स्थितींतअसतों

मी पांच वर्षांचा असतांनाच माझी जन्मदात्री आई मला सोडून गेली. दिवसभर हुदडून रात्रीं ज्या मातेच्या उबदार कुशींत झोपी जावं ती माझी आई मला दुरावली. हिऱ्यामाणकांनीं शृंगारलेला पाळणा सोडून ज्या आईच्या मांडीवर बालक विसावतं ती मायेची मूर्ति अवेळीं भंगून गेली. कळी उमलायच्या आंतच वेल तुटली गेली. निष्ठुर काळाला त्या उमलत्या कळीची दया आली नाहीं. वाडींतल्या लहानग्या संवगड्यांबरोबर मी खेळूं लागलों कीं अधूनमधून आमची बाचाबाची होई. मग ते म्हणत—"बघ हं मस्ती करशील तर माझ्या आईला सांगेन."

मग मी पण तितक्यांच जोरानें म्हणें—

"मग मी पण माझ्या आईला..."

पण शेवटले शब्द माझ्या ओठावर विरत. कारण माझी आई जी देवाघरीं गेली होती ती अजून परत आली नव्हती. कधीं येणार तें मला माहित नव्हतें. घरीं गेल्यावर मी बाबांना विचारी—

"बाबा, आई कधीं हो पलत येईल !"

"नरूऽऽ" म्हणून बाबा मला उचलून छातीशी कवटाळीत आणि उत्तर देत ते फक्त अश्रूनीं. पण मी गप्प बसत नसे.

"बाबा, आईला बोलवा ना हो, बंद्या माझा बद्दैल देत नाहीं. मी आईला सांगनाल आहे!"

यावर बाबा गप्प बसत. धोतराच्या सोग्यानं डोळे पुशीत ते विषण्णतेनें दूरवर पहात.

मी मातृसुखाला पारखा होऊं नये म्हणून, केवळ माझ्याकरितां बाबांनीं दुसरं लग्न केलं. मला आई आली. सावत्र का होईना पण ती माझी-आई होती. मला आनंद झाला. आई नाहीं म्हणून मला हिणवणाऱ्या माझ्या संवगड्याना मी आतां म्हणे—"मला आई आहे; ती मला खाऊ देते; जोजविते; माझे मुके घेते. तुम्हीं मारलंत तर मी माझ्या आईला सांगेन; अशा प्रकारें आई आल्याच्या आनंदांत मी हुरळुन गेलो. आई ! या शब्दानच माझं मन मोहरून गेलें.

पण माझा आनंद फार वेळ टिकला नाहीं. मला आई आली आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं माझ्या गालावर कडाकड बोटें मोडण्यास सुरुवात केली. कधीं कधीं ते अेकमेकांना म्हणत—

"सोन्यासारखा मुलगा आहे. पण हातांत सांपडला आहे सावत्र आईच्या. मुलाचं दुर्दैव दुसरें काय ? असे उद्गार माझ्या कानांवर नेहमींच पडत. कधीं कधीं ते मला विचारीत—

" पोटभर जेवायला मिळतं कारे ? कुठून मिळणार ? किती केलें तरी सावत्र आईच ती !

मी कुठें लग्नवन्हाडाला गेलों, समारंभाला गेलों तर घरांतल्या बाया माझ्याकडे पाहून आपापसांत कुजबुजत—

" लक्ष्मीचा काय हा मुलगा– वाळलं ग पोर. गेली बिचारी टाकून. आई वेगळा जीव, सावत्र आईच्या हातांत. मग वाळेल नाहीं तर काय ?"

मला या लोकांचा मनस्वी राग येई. मला वाटे माझी सावत्र आई तशी कांहीं सावत्र नाहीं. मला न्हाऊं माखू घालते, हवं नको बघते. माझे लाड पुरवते, रात्रीं मला कुशींत घेऊन झोपते, प्रेमानें थोपटते. मग तिला हे लोक वाईट कां म्हणतात ? तिच्यांत काय कमी आहे ? जन्मदात्या आईनें यापेक्षां अधिक काय केलं असतं ? पण बालमनाला एखादी गोष्ट परत परत सांगितली कीं त्यावर अनुकूल परिणाम होतो.

माझंहि तसंच झालं. जगाच्या बोलण्यांवरून मी माझं मत तिच्याविषयीं वाईट बनविलं. मी तिच्याशीं बोलेनासा झालो. ती फार फार वाईट आहे अशी मनाची समजूत करून घेण्यांतच मी धन्यता मानूं लागलो. ती जे जे कांहीं माझ्याकरितां करी त्यांतून वाईट काढून तिला दोष देण्यांतच मी समाधान मानूं लागलो. सावत्र आई म्हणजे पूर्वजन्मींची कुणीतरी वैरीण आपल्याला छळायला येते अशा प्रकारचें विष माझ्या मनांत कालवलं गेलं आणि तेंच पुढें वाढूं लागलं. माझ्या आईला दूर सारून ही कुणीतरी माझा सूड घेण्याकरितां आलेली आहे. असं मला वाटूं लागलं या माझ्या घुमसल्या मनावर आघात करणारी घटनाहि लवकरच घडली.

बाबा आजारी पडले. आणि अरेरे ! त्या आजारांतून ते उठलेच नाहींत. मी पोरका झालों.

**पांढरे डाग**

सन १९३५ पासून हजारों लोकांनी अनुभवलेलें गुणकारी औषध, किंमत ६ रुपये, माहिती मागवा मोफत पाठवूं.

नकली वैद्यांपासून सावध असावें

वैद्य:— **बी. आर. बोरकर,**

आयुर्वेद भवन (अभि) मु. पो. मंगरुळपीर.

जि. अकोला (विदर्भ)

लोक आतां माझ्याकडे अधिकच अनुकंपेनं पाहूं लागले. " आतां मात्र पोराचे पुरे हाल आहेत. अहो, आईबापाविना कोवळं पोर !" असे करुणास्पद उद्गार ते काढूं लागले. लोक असे बोलूं लागले कीं मला माझ्या सावत्र आईचा राग येई. बाबासुद्धां हिच्या त्रासामुळेंच गेले असावेत असें मला पुढें पुढें वाटूं लागलें. मी तिच्याशीं फटकून वागूं लागलों. तिच्या हातून खाऊ घेईनासा झालो. तिनें वाढून दिलेलं जेवण मी जेवत नसें.

सर्व कांहीं माझ्या हातानं घेई. तिनं कांहीं फराळचं दिलं तर मी म्हणे, " तुझ्या हातून नको. तूं फार वाईट आहेस. मी माझ्या हातानें घेईन. " मग ती हिरमुसली होऊन निघून जाई. रात्रीं मला ती निजवायला आली कीं मी तिचा हात झिडकारून देई. भल्या सकाळीं ती मला उठवायला आली कीं मी तिला नाहीं नाहीं तें बोलें. कधीं कधीं माझा तोल सुटे.

" माझी आई तूंच हिरावून नेलीस, बाबांना सुद्धां तूंच घालविलास. आणि आतां माझ्या मागें लागली आहेस ! "

असं कांहीं मी बोललो कीं त्या माऊलीला अनंत यातना होत. डोळ्यांतून आंसवे झिरपूं लागत. मग सुडाचें समाधान माझ्या मुखावर विलसे.

तो प्रसंग मला अजूनहि आठवतो. अगदीं काल घडल्यासारखा. त्या दिवशीं मामा आले होते. सावत्र आईचा भाऊ म्हणून मी त्याच्याकडे फारसा आपुलकीनें पाहात नसे,आणि त्याचे येणें जाणेहि फारसें आमच्याकडे नसे. संध्याकाळचीं जेवणें झालीं होतीं. शेजारच्या विनूबरोबर सिनेमाला जायचा माझा बेत होता. मी आईकडे गेलो. आईनं ताट वाढून घेतलं होतं. मी कुर्ऱ्यांतच म्हणालो, " मला सिनेमाला जायचें आहे. पैसे हवेत. "

" नरु, असं काय बरं करतोस, तुझी परीक्षा आली आहे ना ?"

" परीक्षा आली असली म्हणून काय झालं, विनू जातोय कीं ! पैसे द्यायचे नाहींत म्हणून परीक्षेचं सांगतेस. "

यावर समजावणी स्वरांत ती म्हणाली, ' अरे विनूसारखं तुझं आहे का ! अभ्यास केला नाहींस तर स्कॉलरशीप जाईल ना तुझी '

माझं तोंड आंबट झालं. रागानं मस्तक फिरूं लागलं. माझा हिरमोड झाला होता. मी म्हटलं, " पैसे द्यायला तूं माझी आई आहेस ? आज माझी आई असती तर तिनें माझा असा हिरमोड केला नसता. माझ्या आईला तूंच घालवलंस, बाबांना..."नरु !"

तिच्या डोळ्यांतून आसवांची सर ओघळली. आवंढा गिळला आणि तिनं पुढ्यांतलं ताट दूर सारलं. माझ्या शब्दांनीं तिला ब्रह्मांड आठवलं. " हं सगळं सोंग आहे. असं म्हणून मी बिछान्यांत डोकें खुपसून स्फुंदून स्फुंदून रडूं लागलो.

माजघरांत आई आणि मामा बोलत बसली होती. मी कान देऊन ऐकत होतो.

" त्याला तुजविषयीं यत्किंचितहि प्रेम वाटत नाहीं तर तूं तरी हा अट्टाहास कां करतेस ! तो तुझें मानेल असं वाटतं कां तुला ! एक शब्द देखील ऐकायला तयार नाहीं तुझा ! तूं आतां हा नाद सोडून दे. लोक देखील म्हणतात– " नसेल कोणी त्याचं तर त्याची आत्या समर्थ आहे. त्याचा सांभाळ करायला. आतां तुझं इथं कोणी नाहीं. झाला इतका पोरखेळ बस्स झाला. तूं आतां घरीं चल कशी ! "

( पान १८ वरून )

भरलेली. . . आंत न पडता त्या दरीवरून उडी मारून समोरच्या कड्यावर जायला हवाय . . श्री, या आकार नसलेल्या विचित्र व्यथेनें मी भेदरून–बावरून गोंधळून गेल्ये . . . वाचलेली सारी पुस्तकं सोर ग्रंथ आज हतबल ठरल्येत. सारं ज्ञान लुळपांगळं पडलाय . . . आणि ' जगावे कीं मरावे 'सारख्या हॅम्लटच्या दुःखानं मी जळते आहे . . . सारखी जळते आहे . . .

श्री तुला विसरणं शक्य नाहीं . . . त्या मुलाला होकार देणं शक्य नाहीं . . . आणि बाबानीं बरं वाईट करून घेणं ? छे . . . कांहींच समजेनासं सुचेनासं झालंय . . . कशी फोडायची ही विचित्र कोंडी ?-श्री डोळ्यापुढे अंधार दाटलाय . . . मनापुढे–अंधार साठलाय . . . अंधार . . . अंधार . . .

श्री,...मला मार्ग दाखव...दिवा दाखव... सोबत कर रे...

सर्वस्वी तुझीच

**शालन**

**ता. क.**

पोटॅशियम् सायनाईड खालेल्या त्या मंगला नाईकची उगीचच आठवण होत्ये... श्री... लवकरच भेटून जा.

**शालन्**

* * *

"दादा"—आई कळवळून बोलत होती. "स्त्री हृदयाची जर तुला कल्पना असती तर तू असा बोलला नसतास. ज्या दिवशीं मंगलाक्षता पडतात आणि स्त्रिचा विवाह होतो त्या दिवसापासून 'सासर' हें अेकच घर तिला असते. सासरीं तिचा पुनर्जन्म होतो. आपल्या हक्काच्या घरीं नवा जन्मानं ती वावरूं लागते. सासर हेंच तिचं सर्वस्व! तेंच तिचं वैभव! माहेरी हत्ती झुलत असले तरी सासरच्या मीठ भाकरीचा महिमा आगळाच असतो. तिथं तिचा हक्क असतो. माहेरी मात्र तिची काडी-इतकीहि सत्ता नसते." यावर दादा म्हणाला—

"पण इथं तुला सासर तरी कुठें आहे! तो मुलगा आहे तो तुला एका शब्दानें देखील विचारीत नाहीं. त्याला तुजविषयीं तिळमात्र प्रेम नाहीं. इथं राहून उगाच जीवाचं रान करण्यांत काय अर्थ आहे?"

"दादा, आज माझं इथं कुणी नसलं तरी मी एका मुलाची आई आहे हें तूं विसरतोस. आई व्हायला साता जन्मींचं पुण्य पदरीं असावं लागतें. तुम्हां पुरुषांच्या आशाआकांक्षा कधीं पुऱ्या होत नसतात. झाल्या तरीं अधिकांची हांव तुम्हांला असते. पण आम्हां स्त्रियांच्या आशाआकांक्षा—मनोरथ मातृत्वांतच पूर्णत्वास पोहोंचतात. स्त्रीचं मोल पत्नी म्हणून नाहीं तर माता म्हणून आहे. आज एका मुलाची आई व्हायचं भाग्य मला लाभलं आहे. दादा, मूल नाहीं म्हणून नवससायास करणाऱ्या, आल्यागेल्याला दान करणाऱ्या स्त्रिया मी पाहिल्या आहेत. मूल नाहीं म्हणून नशीबाला दोष देत त्या आपलं जीवन कसंबसं कंठीत असतात. मी त्यांच्यापेक्षां सुखी आहे. आज मी आई आहे. स्त्रीच्या जन्माचें सार्थक आई होण्यांतच आहे. वैधव्य हा स्त्रीच्या जन्माचें सार्थक आई होण्यांतच आहे. वैधव्य हा स्त्रीला शाप असेल तर मातृत्व हें तिला वरदान आहे. आज एका मुलाचें कल्याण करण्याचं सोडून देऊन मी तुझ्या घरीं येऊं? त्याला मजविषयीं प्रेम वाटत नसेलहि. पण तो अज्ञान आहे. त्यानं अजून मला आई म्हणून साद घातली नाहीं पण अेक दिवस असा येईल कीं त्या दिवशीं माझं प्रेम त्याला कळेलच कळेल. आणि अंतःकरण कळवळून तो मला आईऽऽ म्हणून साद घालील. आणि मी सुखानं डोळे मिटीन.. खडकावरल्या बी वर जरी पाणी पडलं तरी तें ताबडतोब रुजतं. माझ्या मायेच्या पाण्यानं या रोपट्याला फुलें येतीलच येतील. त्याला मजविषयीं प्रेम वाटेलच. त्यानं मला किती जरी झिडकारलं, माझं मन दुखविण्याचा प्रयत्न केला तरी मी त्याला अवाक्षरानेंहि दुखविणार नाहीं कारण तो अज्ञानी आहे. त्याला कळत असतं तर त्यानं माझ्या मातृप्रेमाचा अव्हेर केला नसता. माझ्या भावना दुखविल्या नसत्या. पण म्हणून मी त्याला एकाकी सोडून जाणार नाहीं.

ज्यांच्याबरोबर मीं सात पावलें चालले त्यांच्या वंशाचा दिवा मी माझ्या जीवाची पांखर घालून जपेन. त्यांच्या घरांतला हा नंदादीप अखंड तेवत रहावा म्हणून डोळ्यांत तेल घालून राखण करीन. मी जर दुर्लक्ष केलं तर मायेच्या अभावी ही उमलती कळी करपून जाईल."

आईच्या या शब्दांनीं मामा गप्प बसला होता. काय बोलणार बिचारा! त्या माऊलीच्या बोलफुलांनीं माझं अंतःकरण फाटून गेलें. माझ्या वागणुकीची मालच लाज वाटूं लागली. आईच्या अंतःकरणाचा ठाव मला लागला. पण माझा अहंकार गेला नव्हता. माझा स्वभाव कायम होता. अंतःकरणांतल्या प्रेमाची ओळख पटूनहि मी वर तसें दाखवूं शकलो नाहीं. माझं मन कधीतरी बदलेल म्हणून आईनं अश्रू ढाळीत वाट पाहिली असेल.

आई! तुला मी आई कसं म्हणूं? उभ्या आयुष्यांत मी तुला 'आई' म्हणून प्रेमानें कधींच साद घातली नाहीं. तुझ्या मायेला प्रतिसाद दिली नाहीं. ज्या हांकेकरीतां तुझा जीव आसुसला होता, तहानला होता, कळवळला होता, ती हांक मी तुला देऊं शकलो नाहीं. तूं माझ्याकरतां कष्टाचे डोंगर उपसलेस पण मी ते कवडीमोल मानले. माझ्याकरितां तुझा जीव तिळतिळ तुटून असतांना मी तुला पाषाण हृदयीं ठरविलें. मी खूप खूप शिकावं, मोठं व्हावं, चांगल्या मार्गाला लागावं म्हणून तू आपलं शरीर चंदनासारखे झिजवलंस, परिस्थितीचा प्रखर ताप तूं सहन केलास पण मला सावली दिलीस. त्या सावलीचं मोल मी ओळखलं नाहीं. उलट माझ्या हृदयभेदी शब्दघातांनीं तुला कित्येक वेळां ब्रह्मांड आठवावयास लावलं. तूं माझ्याकरीतां तुझ्या अंतःकरणांतल अमृताचे कुंभ रिते केलेस पण मी ते तुच्छ मानले. नेत्रांची निरांजनें लावून हृदयाच्या फुलोऱ्यांत तूं माझी जपणूक केलीस. पण मी तुला झिडकारलं, तूं मला जीवन दिलंस. पण मी तुला अखेर तापच दिला. जन्मदात्या आईपेक्षांहि तूं मला जास्त जपलंस. मी कधीं आजोळी गेलो असेन तर तो दिवस तुला सुनासुना गेला असेल. ज्या दिवशीं मी जेवलो नसेन त्या दिवशीं माझ्याकरतां तूं उपाशीं पोटीं अश्रू ढाळले असशील. पण आई! मी निष्ठूर झालों.

आई! आज तूं हवी होतीस! खडकावरल्या बींला आपल्या रक्ताचं पाणी करून शिपलेल्या या रोपट्याची फुलें पाहायला तूं हवी होतीस.

माझा गौरव, माझं यश, माझं वैभव, माझं अभिनंदन यांत माझं कांहींच नाहीं. हें सर्व तुझं आहे. तुझ्या कष्टाचं तें फळ आहे.

आज हें सर्व पाहायला तूं हवी होतीस. अंतःकरण कळवळून हृदय पिळवटून मी तुला साद घातली असती. आईऽऽ! तुझ्या पायावर डोकें ठेवलं असतं. माझ्या अश्रुनीं तुझे पाय धुवून निघाले असते. आणि तुझा आशीर्वाद घेतला असता. तुझ्या अेकाच आशीर्वादानें मी पावन झालों असतों.

०—०

छानदार व टिकाऊ वासाचें
"लव्हेंडर ब्रिलियंटाईन"
शांत व मोहक वासाचें परफ्युम
नाईट चार्म
गोरस प्रॉडक्टस
सोल डिस्ट्रिब्युटर्स— गोरस निकेतन, दादर, मुंबई १४.

# बोल घुमट

लेखक
कृ. ज. दिवेकर

सगळ्यांचंच गणित कच्चं आहे. लोकांचा हिशोब असा कीं, या जगांत दहा आश्चर्ये आहेत. पण वस्तुस्थिति तशी नाहीं! डोळे उघडे ठेवून व डोकें ठिकाणावर ठेवून जगाचा कानोसा घेणाऱ्याला ठिकठिकाणीं एकाहून एक विलक्षण आश्चर्यें आढळतील.

तुम्हाला 'गोल–घुमट' ठाऊक असेल. त्याला आम्ही 'बोल घुमट' म्हणतो. ध्वनि–प्रतिध्वनींच्या भुताटकीनें व्यापलेला तो महाल आहे.

भुताटकीवर तुमचा विश्वास असो नसो, पण ही कथा मात्र तुमच्या डोळ्यांसमोर एक नवेंच जग निर्माण करील.

खूप दूर अंतरावर एक वितभर उंचीची पुसट धूसर आकृति दृष्टीस पडतांच मोटारीचा वेग मी आणखी वाढवला व माझ्या शेजारी डोळे मिटून पेंगणाऱ्या बोडस महाशयानां हालवून जागे करीत त्यांच्या कानांत मोठ्यांदा ओरडून सांगितलें, "इंजिनिअरसाहेब, अहो इंजिनिअर साहेब. उठा उठा. या रामप्रहरी झोपताय काय? ते समोर पाहीलत कां क्राय दिसतंय ते?"

"काय हो?" माझ्या गलक्यामुळें खडबडून जागे होत बोडस मजकूर तक्रारीच्या सुरांत पुटपुटले, "काय झालं काय?"

"दुसरं काय होणार?" मी हसून उत्तर दिलें, "आपण जागे झाला आहांत!"

"बर मग?" लांब तणावून दिलेले पाय आंखडते करीत व मांडीवरील छोटा टुवाल तोंडावरून फिरवित बोडसांनी झोप मोड केल्याबद्दल कुरकुर केली. "जरा निवांतपणी डोळे मिटून पडून राहीलो, तर तुम्हीं मला जागं केलंत–"

"कुसुरीची क्षमा हुजूर! बंदा शिक्षेस पात्र आहे!"

"ठीक तर, मग द्या ते 'व्हिल' माझ्या हातांत. मला गाडीहि चालवूं देत नाहीं तुम्ही......नाहीं हें कांहीं ठीक नव्हे. कां केलंत जागं मला सांगा–"

'तुम्हांला गोल घुमट बघायचाच ना बोडस!

"अर्थात्"

"तर मग तोच दाखविण्यासाठीं तुम्हांला जाग आणली मी–"

"Impossible" हातवारे करीत बोडस प्रतिपादूं लागले, "अहो विजापूर आहे अजून कित्येक मैल दूर." मग एकदम रस्त्याच्याकडेला उभ्या केलेल्या पाटीकडे माझे लक्ष वेधून ते म्हणाले, "वाचलीत ती पाटी? 'BIJAPUR–18 miles!' दुर्बिणींतून पाहिलात तरी दिसेल कां येथून गोलघुमट?"

उत्तर न देतां मी हंसलो. डावा हात लांबवून बोडसांच्या बाजूची खिडकीची कांच फिरवून मी वर नेली. थंडगार हवेची एक झुळुळ पटकन् आंत शिरल्यामुळें बोडसांचे अंग शहारले. त्या खिडकीबाहेर हात काढून दूरवर अंगुलीनिर्देश करीत मी म्हणालो, "तो पहा–"

"ओहो! खरंच की देशमुख What Wonder! इतक्या दुरूनहि अगदीं स्पष्ट रेखीव दिसतोय बोलघुमट! Nice!"

त्या निर्जन, निर्वाहन रस्त्यावरून ताशी पंचेचाळीस मैल वेगानें मी मोटार सोडतांच गोलघुमटाची दुरून दिसणारी ती अस्पष्ट आकृति आधीकाधीक मोठी होऊं लागल्याचा आम्हांला भास होऊं लागला. क्षणोक्षणीं भव्योदात्त होत जाणाऱ्या त्या ऐतिहासिक वस्तूकडे बघतां बघतां बोडसांमधील 'स्थापत्य. शास्त्रज्ञ' चटकन् जागा झाला. मोठ्या तन्मयतेनें बाहेरच्या देखाव्याकडे ते टक लावून बसले. सुंदर कलाकृतिंचा सच्चेपणानें आस्वाद घ्यायलासुद्धां हाडाच्या कलावंताची जरुरी असते हेंच खरें.

लहान मोठी वळणे घेत जाणारी ती कच्ची पण साफसुभरी सडक लांबचलांब पसरलेली समोर दिसत होती. सोलापूरहून पहाटे सहाच्या सुमाराला आम्हीं जेव्हां बाहेर पडलो तेव्हां वातावरणांत सर्वत्र अंधार भरून राहीलेला होता. 'मोरारका गार्डन' मागे टाकून आम्हीं गांवाबाहेर आलो तरी देखील रस्त्याच्या दोन्हीं अंगाकडील कपाशीची व ज्वारीची शेते अंधाराची पासोडी पांघरून निद्रासुखाचा आस्वाद घेत स्वस्थ पहुडली होती. पण मग हलकेंहलकें दिशा फटफटूं लागल्या. अंधाराचा अस्त होऊन प्रकाशाचे सामाज्य सर्वत्र पसरूं लागले. स्वच्छंदी पांखरे शेतांशेतांच्या परीसरांतून मिश्र खात शीळ घालीत उडूं हिंडू लागलीं. क्वचित कोठून कोकीळ पक्षाची 'कुहू ऽ' कानावर येऊन अंतःकरणाचा ठाव घेत होती. शेतांत तरारून वाढलेल्या पिकांतून हुंदाडणाऱ्या वाऱ्याच्या थंडगार झुळका भूपाळ्या गात सृष्टीला हांका मारमारून जाग आणीत होत्या. निद्रेच्या कक्षेतून जागृतीच्या प्रांतांत पाऊल टाकणाऱ्या निसर्गाच्या लीला तन्मयतेनें बघतां बघतां कुणाचेंहि देहभान हरपले असतें. माझ्या शेजारी बसलेले बोडस इंजिनिअर मात्र बाहेरचे हे निसर्गचित्र न बघतांसुद्धां 'देहभान' हरपून जे निद्रावश होऊन गेले ते मी त्यांना दुरून गोलघुमटाची आकृति दाखवीपर्यंत मुळींच जागे झाले नव्हते.

भीमा नदीवरील नवा लांबलचक पूल दृष्टीक्षेपांत येतांच बोडसांनीं इषारा करून मला गाडी थांबवण्यास सांगितलें. रस्त्याच्या डाव्या बाजूस एकीकडे मी गाडी उभी केली. बोडसांनीं माझा हात पकडून

मला खाली उतरवले व माझ्या खांद्यावर हात टाकून ते म्हणाले, "देशमुख, या पुलाचे बांधकाम फारच प्रेक्षणीय आहे चला मी तुम्हांला दाखवतो–"

पुलाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत बोडससाहेबांच्या समवेत मी फेरफटका मारला. त्या भव्य पुलाच्या बांधकामांतील जी वैशिष्टे व बारकावे बोडस इंजिनिअरानीं मला विशद करून सांगितली ती ऐकून पुलापेक्षां मला बोडसांच्या स्मरणशक्तिबद्दल फार आदर वाटला. विजापूर सोलापूरच्या मध्यावरील भीमा नदीच्या या पुलाबद्दलची इतकी समग्र आंकडेवार माहिती बोडसांच्या स्मरणसारीणींत बिनचूक नोंदलेली आढळल्यामुळें मी थक्क होऊन गेलो. तसें पाहतां बोडसांचा या बांधकामाशी दुरूनहि संबंध आला नव्हता. तथापि, ज्याचा जो विषय त्याला त्याचे सम्यक ज्ञान असते ते असे.

आणखी पाऊण तासाचे आंत आम्हीं विजापूरच्या हद्दींत प्रवेश केला. शहराचे ऐतिहासिक महत्व मान्य करूनसुद्धा या शहरांत व शहरवासीयांत जिवंतपणाच्या अभाव दृष्टीस पडतो. नजिकच्या आसास स्मशानभूमीवर पोहचवून परत आलेल्या माणसाप्रमाणेंच येथील रहीवाशांच्या हालचाली मरगळलेल्या होत्या. बाकी हेहि खरेच कीं, जे शहर एकेकाळीं वैभवाच्या शिखरावर होते त्याची शान आता धुळीस मिळाल्यानंतर त्याला अवकळा येणें सहज शक्य होतें गावांतून गाडी चालवतांना मी बोडस मजकुरांना विचारलें, "इंजिनिअरसाहेब, मोटार आधीं गोलघुमटाकडे नेऊं की येथील अन्य इतिहासप्रसिद्ध स्मारकांकडे–"

"बाकीच्या वास्तुंना आधी भेटी देऊं, म्हणजे गोलघुमट नीट निवांतपणें पहाता येईल."

बोडसांची सुचना मान्य करून मी मोटार जुम्मा मशीदीसमोर उभी केली. मशीदींतील जुन्या भव्य कमानींचे बांधकाम पाहून बोडसांचा ऊर भरून आला. 'वा! खूब अच्छा' असे स्वगतोद्गार काढीत त्यानीं त्या इस्लामी प्रार्थनालयाचा कानान् कोपरा बारकाईने न्याहाळला. नंतर मी त्यांना आसर महाल, गगन महाल, आनंद महाल, मेहता महाल, आयना महाल, चंपा महाल इत्यादि ऐतिहासीक स्मृति-चिन्हे दाखवली. प्रत्येक ठिकाण बघतांना बोडस पुन्हां पुन्हां त्या जीर्ण बांधकामाची परोपरीनें प्रशंसा करीत होते. त्या त्या ठिकाणापासून त्यांचे पाऊल माघारी वळण्यास तयार होत नव्हते. आनंद महालाच्या भिंतीचा चुना खरवडून काढून त्याचे जेव्हां ते निरीक्षण करूं लागले तेव्हां तेथील रखवालदारहि या 'वेड्या' माणसाकडे 'आ' वासून बघत बसला.

चंदा बावडी पाहिल्यावर बोडससाहेबांना मी ताज बावडीवर घेऊन गेलो. एकाद्या विस्तिर्ण चौकोनी तलावाप्रमाणें पसरलेली दगडी बांधणीची ती विहीर बघतांच बोडसांचे बाहू स्फुरण पावूं लागले. अंगातील कोट काढून त्यानीं कठड्यावर ठेवला व शर्ट काढतां काढतां ते मला म्हणाले, "देशमुख, हा जलाशय पाहून मला रहावत नाहीं. चार हात मारावे म्हणतों" त्यांना आवरावे कसे याचा मी विचार करतो आहे, तेवढ्यांत विहिरीच्या भिंतीजवळ धुनी पेटवून चिलीम फुंकत बसलेल्या एका बैराग्याने बोडसांना हटकले, "हां साब! अिसमे कुदना नहीं. खाली बरसातके दिनोमें बावडीमे कुदनेकी इजाजत है! समज गये?

इतक्या सिधेपणानें इंजिनिअरसाहेबानीं त्या फाटक्या फकिराचे ऐकले असते तरच नवल! अंगांतील शर्ट काढून त्यानीं तो माझ्या खांद्यावर भिरकावला व विहिरीच्या पायरीजवळ जात ते म्हणाले, "असं सोन्यासारखं पाणी बघीतल्यावर आपल्याला नाहीं स्वस्थ बसवणार देशमुख. पोहण्याची बंदी करणारी तेथें पाटी अडकवल्ये खरी परंतु कोण येतय इथं बघायला?"

"कोई क्यो नही?" तो म्हातारा सत्पुरुष बोडसांना आवरीत त्यांची समजूत घालूं लागला, "कोई भी नही देख सकेगा, ऐसा क्या बता रहे हो आप बाबूजी? सर्वसाक्षी खुदा क्या अंधा है? आपको नहीं मालूम होगा कीं कितने आदमीलोग इस ताज बावडीका भक्ष बनचुके है! तालाब जैसे इस भव्य कुअेंके पानीका अंत अभी तक नही लगा हुवा है! पिछले बरस यहाँ कितने पंप बिठाकर बावडीको खुरवी करनेके व्यर्थ प्रयत्न हुवे! मगर आखीर हार खानी पडी! प्रभूके दयाका अंत नही लग सकता, उसी तरह इस ताज बावडीके पानी का भी!"

नाईलाजाने बोडस महाशयाना माघार घ्यावी लागली. कोट अंगात चढविल्यावर ते परत काठाशी आले व तेथील दगड उचलून त्यानीं ते विहिरीच्या पलीकडच्या टोकाला फेकण्याचा खटाटोप करून पाहिला परंतु बोडसांसारख्या दणकर माणसाने फेकलेले दगड विहीरीच्या दुसऱ्या टोकास तर सोडाच परंतु धड मध्यावरहि पोहचूं शकत नव्हते. त्याही प्रयत्नांत त्यांना अखेर हार खावी लागल्यावर ते मुकाट्याने गाडींत जाऊन बसले. त्यानंतर जलमंदिर. मक्का मशीद, जोड घुमट, मोती घुमट, उपली बुरूज इत्यादि ख्यात ठिकाणे दाखविल्यावर मी बोडसांना इब्राहिम रोझाचे दर्शन घडविले. त्या वास्तुच्या दगडी भिंतीवर संपूर्ण कुराण खोदलेले पाहून बोडस चाट पडले. उर्दू अरेबिक भाषेचा गंध


परळ व दादर भागांत
A 1 to Z
R.D.SAVANT & CO.
CLOTH MERCHANTS



सर्व प्रकारचे उत्कृष्ट कापड,
इंडस्ट्रीयल साड्या, ब्लॉऊज
पिसेस, लहानामोठ्यांचे तयार
कपडे व होजियरी वगैरे मालाचे
एकमेव विक्रेते.

—: विशेष सूचना :—
मद्रास व बिन्नी मीलचे
कापड येथें मिळेल.

आर.डी.सावंत आणि कं.
कापडाचे व्यापारी
हिन्दमाता सिनेमा नजीक, व्हिन्सेंट रोड, दादर १४.

नसतांना देखील त्यानीं पाषाणांत कोरून काढलेल्या कुराणाच्या पंक्ति वाचण्याचा खटाटोप करून पाहीला. नंतर त्याना मी मुलुख मैदान तोफ बघावयास घेऊन गेलो. पंचधातूनीं घडविलेल्या त्या अजस्त्र तोफाच्या अक्राळविक्राळ तोंडाकडे बोडस 'आ' वासून अजंग्याने बघत राहिले. त्यांना महाश्चर्य याचे वाटत होते, कीं ही प्रचंड तोफ ओतली कशी व या अनंत उंचीवर आणून ठेवली कशी! "देशमुख, जगांत एकंदर सात आश्चर्ये आहेत म्हणतात, ते साफ खोटें आहे." तोफेच्या चमकदार मिश्र धातूंचे बारकाईने निरीक्षण करीत बोडस सांगू लागले. "शोधच घ्यावयाचा जर म्हटलं तर या पृथ्वीतलावर साताऐवजीं सतराशें आश्चर्यें खचित सांपडल्यावाचून रहाणार नाहींत."

बोडसांचे म्हणणे खरे होते. कारण हीच ठिकाणें काय, पण प्रत्यक्ष विजापूरच्या गोलघुमटाला देखील जागतिक सप्ताश्चर्यांत स्थान देण्यांत आलेले नाहीं! –यालाच हवं तर एक आश्चर्य म्हणायला हरकत नाहीं! ते कांहींहि असले तरी गोलघुमटाच्या सीमारेषेवर खड्या असलेल्या उत्तुंग प्रवेशदारांतून आमची मोटारगाडी जेव्हां आंत शिरली तेव्हां गोल घुमटाच्या दिव्य, भव्य स्वरूपाचे दर्शन होतांच आमची मनें धन्यतेने भरून आलीं. सर्वच सुंदर वास्तुंचे दुरून होणारे दर्शन अधिक विहंगम असते, याची प्रत्ययकारी साक्ष गोल घुमटापुढें काढण्यासारखी आहे. चावी फिरवून मी मोटारीचे दार बंद केले व मोडकांच्या मागोमाग खाली उतरलो.

विलक्षण तन्मयतेने बोडस विजापुरांतील त्या सर्वश्रेष्ठ कलाकृतिकडे बघत उभे होते. त्यांचा हात पकडून त्यांना आंत घेऊन जातांना मला थोडे प्रयासच पडले. आम्हीं पायऱ्या चढूं लागतो तोंच दरवाजापाशीं टेबलखुर्ची मांडून बसलेल्या मौलवींनी आपल्या मऊ मुलायम आवाजांत आदरपूर्वक आम्हांस 'जूते उतारनेकीं' सूचना दिली. ही सूचना आम्हांस नविन नव्हती कारण विजापुरांतील इतिहासकालीन शेष वास्तूना या आधी आम्हीं भेटी दिल्या होत्या तेव्हां बहुतेक ठिकाणीं अनवाणी जाण्यास आम्हांस भाग पाडले होते. धार्मिक भावनेपायीं म्हणून नव्हे परंतु जागतिक किर्तिच्या या जिवंत स्मारका बद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठीं जोडे काढून जाणेच योग्य नव्हते काय? मौलवीची सूचना म्हणूनच आम्ही 'झट' मानली व पादत्राणें काढून मोटारीच्या मागील भागांत भिरकावून दिल्यावर आम्हीं झपाझप पायऱ्या चढूं लागलो.

गोलघुमटाच्या बरोबर मध्यावर दोन कबरी होत्या. त्यांच्याभोवती चक्कर मारून आम्हीं इमारतीच्या भरभक्कम भिंतीचे नीट निरिक्षण केले. तसे करतांना आमचे लक्ष सहजच वर गेले. मध्यंतरी कोठेहि आधार नसलेला प्रचंड घुमट आमच्या डोक्यावर पसरलेला होता व त्याच्या वर्तुलाकृती अंगानें जी विख्यात 'व्हिस्परींग गॅलरी' बांधण्यांत आली होती तीहि नजरेस पडत होती. त्या गच्चीच्या कडेकडेने कितीतरी लोक तेथें उभे होते व सारखा गलका करीत होते. त्या गलक्याचा आम्हांस कितीहि त्रास झाला तरी त्या विशाल हृदयी घुमटाला त्या आरडाओरडीचा कंटाळा नव्हता. उलट एकदाच नव्हे तर अनेकदां तो घुमट त्या गलक्याचे खणाणत्या सूरांत नादनिनाद निर्माण करून स्वागत करीत होता. इमारतीच्या कोपऱ्याकडल्या एका नागमोडी बोळकंडीवजा दगडी जिन्यावरून आम्हीं वर जावूं लागलो. "बापरे! किती उंच उंच चढायचे आहे देव जाणे" बोडस पुटपुटले.

"देव नाहीं, अल्ला जाणे म्हणा" मी हंसलो, "ही इस्लामी इमारत आहे, विसरूं नका." बोडस तेवढ्यांत त्या दगडी जिन्याच्या कडेला बोडसांचे डोकें आपटलें. त्याबरोबर कळवळल्यासारखे करून ते नाटकी आवाजांत म्हणाले, "ओ परवरदिगार, तुमारे दयाका अंत कब लेगा? अै उपरवाले, हमे उपरकी मंझिलपर जाना है, उपरी अस्मानमे नही!"

खुदाने आमची प्रार्थना ऐकली वाटतं. इमारतीच्या मजल्यामजल्यावर बाजूला छोट्या वर्तुलाकृती जागेंत बाकडी 'फिट' केलेली आम्हांला दिसली. एकदोन ठिकाणीं क्षण दोन क्षण थबकून 'न संपणारा' जिना चढून आम्हीं एकदाचें त्या अपूर्व अशा 'बोलक्या गच्चींत' येऊन तर पोहचलो. पण आमच्याआधीं तेथें कितीतरी मंडळी आधींच येऊन दाखल झाली होती. व परोपरीचे आवाज काढून त्यांनीं तेथें एकच गोंधळ घातला होता

"बोडससाहेब," मी हांक मारली पण काय आश्चर्य! 'बोडससाहेब, बोडससाहेब, बोडससाहेब,–" अशा हाकावर हाक अनेक ललकाऱ्या जागोजागीं उमटल्या. दचकून बोडस आपले जागचे जागीच खिळून उभें राहीले. "हे काय हो देशमुख?" अशी त्यांनीं मला पृच्छा करतांच 'हे काय हो देशमुख?' च्या अनेक आरोळ्या तेथें घुमल्या व समुद्राच्या लाटा जशा हळूहळू किनाऱ्यापासून दूर दूर जाव्यात तद्वत ते ध्वनी हलले हलके अस्त पावले. बोडसानीं सहज टाळी वाजविली नि त्या नादाचे मोजून नऊ प्रतिध्वनीं कानीं पडले. "आहे ना भुताटकीचा येथला प्रकार, बोडस?" मी प्रश्न केला. पण त्या प्रश्नांचेहि कित्येक पुनध्वनी तेथें निनादले. बोडस हसले. त्यांबरोबर तेथें हास्याचा एकच खळखळाट झाला. "नाहीं देशमुख, यांत भुताटकीची कांहींच किमया नाहीं. स्थापत्यशास्त्रांतील ही जादू आहे."




"तर मग दाखवा या नादलहरींचं कोडे उलगडवून" मी इंजिनिअर महाशयांना आव्हान दिले.

"कोंडलेल्या हवेचा हा खेळ आहे. चौथऱ्यापासून १९८ फूट उंच हा घुमट उभारला आहे. घुमटाचा आंतला व्यास १२४॥ फूट असल्यामुळें येथें उमटणारा प्रत्येक शब्द या भव्य घुमटाच्या कोंडींत अडकवून बाह्य वातावरणांत जाण्यासाठीं गोलाकार घुमूं लागतो. प्रतिध्वनींचे जन्मरहस्य याच शास्त्रीय उत्पत्तींत दडलेले आहे"

बोडसांच्या या खुलाशामुळे माझे तर सोडाच परंतु त्यांचे स्वतःचेहि मुळीच समाधान झाले नाहीं. तितक्यांत आमच्या बाजूला भिंतीजवळ उभ्या असलेल्या गृहस्थाकडे आमचे लक्ष गेले. बोलक्या गच्चीच्या दुसऱ्या टोकाच्या भिंतीला कान लावून त्या सद्‌गृहस्थांची धर्मपत्नी उभी होती. दोघांचे भाषण फक्त परस्परांनाच काय ते ऐकूं येते अशी त्यांची कल्पना झालेली असावी. बाजूला उभ्या असलेल्या आमच्याहि कानावर त्यांची मोठ्या आवाजांतील 'कुजबुज' सहजी पडत आहे. याचे ज्ञान नसल्यामुळें तीं उभयता रंगांत येऊन काय वाटेल ते बोलत बडबडत होती. अर्थात तीं दोघे काय बोलली हे सांगण्यासारखे नाहींच म्हणा!

खूप वेळ आम्हीं त्या 'व्हिस्परिंग गॅलरी'चे निरिक्षण केले. पोराहून पोर बनून बोडस इंजिनिअर तर किती तऱ्हेतऱ्हेचे आवाज कसे चित्कार काढीत होते! चार शिव्यादेखील हांसडून त्यांनीं पाहिल्या त्याचा ताहश परिणाम म्हणजे त्याच शिव्यांनीं उलटून नऊ ते अकरा वेळा बोडसांवर प्रतिहल्ला केला. गच्चीच्या एका टोकाकडील भिंतीवर मनगटावरील घड्याळ मी टेकवतांच बोडसांना घड्याळाची टिक्‌टिक्‌हि १२४॥ फूट अंतरावर पलीकडच्या भिंतीवर डोकूं आली. बोडसांनी आपले घड्याळ भिंतीवर लावल्यावर त्याची टिक्‌टिक् माझ्या मात्र कानीं आली नाहीं. "बोडस, तुमचे घड्याळ बंद तर नाही" मी विचारले. "नाहीं, नाहीं, नाहीं" अशी नऊ वेळा नकारघंटा लागलीच माझ्या कानाशी वाजली.

"जाऊ या" म्हणून मी बोडसांना सुचविले तशी बोडसांची चर्या उतरली. खरेच, त्या अद्‌भूत जागेवरून त्यांचा पाय निघेना. 'देशमुख या प्रतिध्वनींची चिकित्सा थोड्यावेळापूर्वी मी केली खरी परंतु त्याने माझेहि समाधान झालेले नाहीं. सारखं वाटतयं यांत कांहीं तरी गोम असावी, गूढ गुपीत असावे. तुमचं मत काय आहे?"

"मला तर येथें भुताटकीचा संशय येतो आहे." माझे मत मी सांगून टाकले.

"अशक्य!" बोडस ताडकन् उत्तरले, "भूत पिशाच्च हा एक मनाचा खेळ आहे. शिवाय भुतांची कल्पना अंधाराशीं, कातरवेळेशी संलग्न आहे. या जागी पुरेसा प्रकाश आहे. आपल्या खेरीज इतर शेकडो माणसें हजर आहेत. झालंच तर आत्ता कांहीं रात्रीचाहि समय नाहीं. काय आहे कांहीं कळत नाहीं. एकादं शास्त्रीय कारणहि खचित असूं शकेल. या प्रकाराचा अन्वय लावणारं माझ्या मात्र अजून ते ध्यानांत येत नाहीं."

नंतर बोडसांनीं त्या गच्चीचे अधिक काळजीपूर्वक निरीक्षण केले. कठडा चाचपून, निरखून पाहिला. पायाखालची दगडी जमीनहि दहा ठिकाणीं ठोकून तपासली. पण पण त्यांचा सर्वच खटाटोप व्यर्थ ठरला. 'जाने दो' असे पुटपुटत सुस्कारा सोडून ते जिना उतरूं लागले.

पुन्हां एकदा गोल घुमटाची शान आम्हीं दुरून नीट डोळ्यांत सांठविली. त्या इमारतीखालचे तळघरहि आम्हीं बघून आलो. मेणबत्तीच्या उजेडांत एका फाटक्या अंगाच्या दाढीवाल्या माणसानें त्या तळघरांतून आम्हांला हिंडवून आणले. खऱ्या कबरी वर नसून येथेंच आहेत, हे त्याने प्रत्यक्ष आम्हांला दाखविले. बाहेर आल्यावर आठ आणे बोडसांनीं त्या वाटाड्याच्या हातावर ठेवले. खुष होऊन तो पुन्हां तळघराच्या भयाण अंधारांत गुप्त झाला.

गोल घुमटापासून थोडे अंतर सोडले की पलीकडच्या बाजूने साऊदर्न रेल्वेची मिटर गेज लाईन गेलेली दृष्टीस पडते. ही रेल्वेलाईन ओलांडली कीं जवळच डाक जिनिंग फॅक्टरी आहे. या फॅक्टरीचे मॅनेजर बोडसांच्या परिचयाचे होते. सोलापूरहून निघतानां आम्हीं मोटारींत आमच्याबरोबर दोन मोठे फराळाचे डबेहि भरून आणले होते. जवळजवळ साडे बाराचा सुमार होत आल्यामुळें आम्हांला कडाडून भूका लागल्या होत्या. परंतु जवळपास पिण्याच्या पाण्याची चांगली सोय नसल्यामुळें बोडस मला म्हणाले, "देशमुख, तुम्हीं असें करा, येथेंच मोटारींत पडून रहा. मी त्या फॅक्टरींत जाऊन मॅनेजर भेटतात कां, ते पाहून येतो. त्या फॅक्टरीच्या आवारांत एक सुरेखशी बाग आहे तेथें आपल्या फराळाची उत्तम व्यवस्था आपणास करून घेता येईल."

"पण तुम्ही लवकर या बोडस. केवळ शंभर अंक मोजेस्तोवर मी तुमची वाट पाहीन. न हून फराळाचे डबे माझ्या ताब्यात आहेत ध्यानांत धरा," मी इषारा दिला.

"हा आत्तां येतो" म्हणत बोडस त्या रेल्वे लाईनीच्या दिशेनें झपाझप चालूं लागले. मी तेथेंच रेंगाळत उगीच इकडे तिकडे हिंडत राहीलो. मोटारीच्या तुरुंगांत बंदिस्त होऊन बसून रहाण्यापेक्षां मी तेथेंच


आकर्षक व हरतऱ्हेच्या फोटोसाठीं

समर्थ फोटो स्टुडिओ
केशवबाग
व्हिन्सेंट रोड, दादर मुं. १४

मेट्रो फोटो स्टुडिओ
नायगांव क्रॉस रोड
दादर (G. I. P.) मुंबई



Telegram- MACHAVA

कोंकण ट्रेडिंग कंपनी

कमिशन एजंट

७ ए, सैयद मुकरी स्ट्रीट, काथाबाजार मुंबई ९.

त्याच एका तरुतली चक्क लोळण घेतली. पडल्या पडल्या समोर उभ्या असलेल्या गोलघुमटाकडे मंत्रमुग्ध होऊन मी एकटक दृष्टी लावली.

पंधरा मिनिटे झाली. वीस मिनिटे झाली. अर्धा तास, एक तास उलटून गेला पण बोडसांचा पत्ता नाहीं. उपाशीपोटी पडल्या. पडल्या त्यांची वाट पहातांना मी कंटाळून गेलो. पाय आणखी लांबवून व हातांची उशी करून मी डोळे मिटून घेतलें. आज सकाळीं ऐन पहाटेसच मी बोडसांबरोबर प्रवासाला निघालो होतो. त्यामुळें निद्रेलाहि बराचसा हरताळ पडला होता. मखमलीसदृष हिरव्याचार मऊ गवती गालीचावर मी हातपाय पसरतांच धांवत येऊन झोपेने मला घेरलें...

आणि त्याचवेळीं माझ्यासमोर एक वृद्ध फकीर येऊन उभा राहीला. पाण्यावरील फेसासारखी शुभ्र दाढी त्याच्या पायघोळ अंगरख्यावर छातीपर्यंत रुळत होती. त्यानें अंगावर चढविलेला झब्बा प्रमाणाबाहेर लांब होता व म्हणून त्याचे पाय माझ्या मुळींच दृष्टीस पडत नव्हते. अंगाने तो फकीर अत्यंत कृष असूनसुद्धां त्याच्या तरतरीत सरळ नांकावरून व तेजस्वी विशाल नेत्रांवरून त्याच्या बुद्धिची व कर्तृत्वाची झेप सहज अजमावता येत होती. माझ्यापासून विशिष्ट अंतरावर उभा राहून फकीरानें आपली दाढी कुरवाळीत मला प्रश्न केला, " देखा भाई तुमने ये बोलघुमत ! "

" बोलघुमट ? " मी आश्चर्यानें विचारले, " याला बोलघुमटहि म्हणतात वाटतं ? "

" म्हणतात कुणी कुणी. " तो वृद्ध फकीर हंसला. त्याचे मराठी शब्दोच्चार अगदीं स्वच्छ व सफाईदार येत होतें. " बोल घुमट हेच याचें नांव अधिक यथार्थ आहे. प्रत्येक घुमट गोलाकार असतोच. पण हा तुमच्यासमोर खडा असलेला घुमट नुसता गोल नाहीं, बोलकासुद्धां आहे— "

" आहे खराच ! पण मौतवीजी, त्यांतून असे अनेक प्रतिध्वनी कसे काय निघतात बुवा ? भूताटकीचा तर नाहीं नां हा प्रकार ? "

माझ्या शेवटच्या वाक्यानें तो वृद्ध चमकला. दचकून दोन पावले मागे सरला. अर्थात त्याच्या पायाचे नखदेखील माझ्या नजरेस पडत नसल्यामुळें जणू तो हवेंतून तरंगतच मागें हटल्याचा मला भास झाला.

" तुझे म्हणणे खरे आहे. पण नवलाची गोष्ट ही आहे, कीं तूं हे जाणलेस कसे ? मत्स हे सांग, तूं मला ओळखलेस मला कोण आहे तो ? "

" नाहीं— "

" हा बोल घुमट ज्याने बांधला त्या अदिलशहाचा मी मुलगा-शाहजादा दुसरा अली— "

त्याचे बोलणे माझ्या मुळींच ध्यानांत येईना. विचारानें जड झालेले डोके मी हातानें गच्च दाबून धरलें हे काय गौडबंगाल आहे ते उकलून घेण्यासाठीं जीवाचा धडा करून मी माझी शंका त्या फकीरासमोर व्यक्त केली " आपण राजपुत्र कसे असूं शकतां ? आपण आहांत फकीर, मौलवी, बैरागी ! "

## घेणाऱ्यानें घेवूं नये....

कधीं कुणी लांच दिली
घेणाऱ्यानें घेवूं नये........
कधीं कुणी रमणीनें
अथवा मारला तिरका डोळा
पाहणाऱ्यानें पाहूं नये........
कधीं कुणी स्तुति केली
हुरळुनी मुळीं जावूं नये........
कधीं कुणीं चहा दिला
चुकून कधीं तो पिऊं नये........
कारण———
लांच घेणारा मिळेल कधीं
कुणास नाहीं त्याची खात्री
तिरका डोळा तसाच कधीं
पाडेल तोंडघशीं नाहीं शाश्वती
तोंडा पुरतीच असते स्तुति
मागून केली जाते निंदा
एकदां घेतला चहा
द्यावा लागतो हजार वेळां
देणाऱ्यानें दिलें तरी
घेणाऱ्यानें घेवूं नये

**रघुनाथ हडकर,**
**एम्. ए.**

संमेलनांत आणि उत्सवांत विद्यार्थ्यांना
करण्यालायक
स्त्री पात्र विरहित
❀ संगीत नाटक ❀
**—: समाज सेवक :—**
लेखकः— श्री. ना. पेठे, बी. ए. पालघर
लौकरच प्रसिद्ध होईल
—: किंमत रु. १–५० :—
आजच नांवें नोंदवून ठेवा
हिंदमाता प्रकाशन, मुंबई १२.

" खरं आहे " फकीर हंसला. त्याच्या जबड्यांत दांत नसल्याचे आत्ता माझ्या लक्षांत आले. " बैराग्याच्या वेषांतले अदिलशहाच्या राजपुत्राचे पिशाच्च आत्तां तुझ्या समोर उभे आहे! बघ मला कुठें आहेत पाय ? "

त्या बैराग्यानें आपला पायघोळ झब्बा थोडा वर उचलून धरला बापरे! ते खरेच भूत होते !

तक्षणीच माझ्या घशाला कोरड पडली. भुताखेतांच्या अनंत कथा–दंतकथा मी ऐकल्या होत्या. माझ्यावर त्यांचा कधी पडताळा घेण्याचा प्रसंग येईल, अशी मला स्वप्नांत सुद्धां शंका आली नव्हती. स्वतःला कसेबसे सांवरून मी त्या फकीराचे भाषण लक्षपूर्वक ऐकूं लागलो.

" भिऊ नकोस. मला घाबरण्याचे कांहींएक कारण नाहीं. तुम्हीं माणसें पिशाच्यांना उगीच्च भीता. तुम्हांला स्पर्श करण्याची आम्हांला अनुज्ञा नाहीं. भुतानें झपाटले, अशाप्रकारचा जो समज प्रसृत झालेला आहे तो धादांत असत्य आहे. आम्हांला बघून तुम्हीं भयंकर घाबरता. हिंव भरून थरथर कापूं लागता. व झपाटल्याचा दोष मात्र आमच्या माथीं मारतां! पूर्व जन्मांत प्रत्येक पिशाच्च हे माणूसच असते. त्याच्या इच्छा आकांक्षा अतृप्त राहील्या, मृत्युआधी जीव गुंतून राहीला तरच त्याला भूतयोनींत खितपत पडावे लागते – "

" आपलीहि कसली तरी आकांक्षा अपूरी राहिली होती ? " मध्येच मी प्रश्न केला.

" अलबत! माझ्या वडिलांनीं हा गोलघुमट बांधल्यावर मीही दुसरे एक प्रचंड बांधकाम हातीं घेतले होते. माझी जिद्द होती, कीं या गोलघुमटाला मान खाली घालावयास लावणारा उत्तुंग अलौकिक घुमट मी उठवून दाखवीन. असा घुमट कीं ज्याची छाया सायंकाळच्या वेळीं गोलघुमटावर पडूं शकेल. येथून थोड्या अंतरावर बारा कमानी म्हणून जी उध्वस्थ वास्तू उभी आहे तोच माझा अपूरा प्रयत्न एका रात्रींत माझ्या कर्तबगार कारागिरांनीं त्या बारा भव्य कमानी उभ्या केल्या होत्या. शहेनशहा अदिलशहाला, माझ्या पिताजींना माझे हे कृत्य आवडले नाहीं. संतापानें त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. "मेरे बेटेने मेरा अपमान किया है ! जिसका बदला खूनसेहि लिया जायगा", अशी प्रतिज्ञा करून त्यानी माझ्यावर मारेकरी घालून मला या दुनियापार घालवून दिले. माझं स्वप्न सदासाठी अपूरं राहिलं! मातींत मिळालं !!"

फकिराचे डोळे अश्रूंनीं डबडबून गेले. गदगदून गेलेल्या आवाजांत तो पुढें सांगू लागला, " तुला हें खरं वाटतं, बाप आपल्या मुलाच्या महत्त्वाकांक्षेच्या आड येऊन त्याच्या रक्तानें त्याचा बदला घेईल ? तसें झाले खरें ! परंतु ज्या क्षणीं मारेकऱ्याची समशेर माझ्या मानेवर पडली त्याचक्षणीं माझ्या घशांतून जो चित्कार बाहेर पडला तो तडक बोल घुमटांत जाऊन बसला. गोलघुमट पहिले होता तसाच आज आहे परंतु पूर्वी तो मूका होता. माझ्या अमानुष मृत्युच्यावेळीं माझ्या हृदयांतला अखेरचा हुंकार जेव्हां त्या घुमटांत जाऊन राहीला तेव्हांपासून हा घुमट बोलूं लागला. अकरा वेळा मूळ शब्दांचे प्रतिध्वनी तो काढूं लागला. "

फकिराचें बोलणें ऐकतां ऐकतां माझेहि मन भरून आलें. कंपित कंपित स्वरांत मी विचारले, " आपलाहि वास अदृष्यरूपानें याच बोलघुमटांत असतो ना ? "

" नहीं बेटा ! मी तर माझ्या अपूऱ्या स्वप्नांतच रहात असतो– त्या पडक्या बारा कमानींत ! माझ्या मृत्यूच्या वेळची अखेरची चित्कार बोलघुमटांत रहावी पण माझा मात्र, पिशाच्च रुपानें कां होईना पण तेथें प्रवेश होऊं नये अशी ईश्वरी योजना आहे– पण जाऊं दे, तुला ते समजायचे नाहीं ! "

इतके बोलून तो फकीर वळला, माझ्या मनांतील आणखी एक शंका मला त्याला विचारायची होती म्हणून घाईघाईनें मी म्हटले, " पण मला हे सांगा, बोलघुमटाची ही कथा तुम्हीं मलाच केवळ सांगितली कीं यापूर्वी आणखी कुणाला ?

फकीरानें मागे वळून पाहिले. " तुझ्या आधीं आणखी कांहीं थोड्या जणांना ही कथा मी ऐकविली आहे. केवळ शुद्ध अंतःकरणाच्या सत्प्रवृत्त माणसांनाच मी हे बोलघुमटाचे रहस्य सांगत असतो. "

त्याचे म्हणणें माझ्या लक्षांत येण्यापूर्वीच फकिराची स्वारी हळूहळू दूरदूर जाऊं लागली. खुरडत, खुरडत जमिनीला स्पर्श न करतां, पहातां पहाता तो फकीर त्या बारा कमानींच्या दिशेनें अदृश्य झाला.

कोणी तरी माझ्या हाताला धरून उठविले म्हणून चमकुन मी पाहिले. बोडससाहेबच होते ते. त्या हिरवळीवर मला बसते करून ते म्हणाले, " काय देशमुख, एक झोप पुरी केलेली दिसत्ये तुम्हीं ? "

" झोपतोयू कुठला ? तुम्हीं गेल्यापासून जागा तर आहे. आत्ताच थोड्या वेळापूर्वी एका पिशाच्याशी मुलाखत झाली. बोलघुमटांतील बोलांचे रहस्य कळले मला... "

बोडस आपले माझ्या तोंडाकडे बघत राहिले. पण मग मी त्यांना ते गेल्यापासून घडलेला समग्र प्रकार इत्यंभूत ऐकविला व अखेर समारोपादाखल विचारले, " आता आलें नां लक्षांत इंजिनिअरसाहेब घुमटामधील त्या प्रतिध्वनींचे रहस्य ? "

बोडस चेष्टेनें हंसू लागले. " काय बनवताय राव ? तुम्हांला भूत दिसले नाहीं कां ? वा ! बात तर बेमालुम मारता तुम्हीं देशमुख – "

बात ? छे, मी जे घडले तेंच तर त्यांना सांगितले होते. मी खोटे काय म्हणून बोलेन ?

" थाप नाहीं तर काय ? असे भर दुपारचे पिशाच्च दिसायला लागलं तर बघायलाच नको ! त्यांतून भूत कुणाचे, तर हजारो वर्षांपूर्वीच्या राजपुत्राचे ! बरं ते तुमच्या भेटीस कां आलें, तर तुम्हीं शुद्ध मनाचे, सत्प्रवृत्त गृहस्थ म्हणून ! Good Joke ! "

त्यांच्या बोलण्यानें मी अस्वस्थ झालो. गंभीर स्वरांत म्हणालो, " मी वाईट मनुष्य आहे, असे तर नाहीं नां सुचवित तुम्हीं बोडस ! "

Don't misunderstand me, "

बोडसांनीं आपल्या बोलण्याचा खुलासा केला, " गैरसमज करून घेऊं नका. मला म्हणायचंय इतकचं कीं, तुम्हीं भूत दिसलं म्हणतां हा निव्वळ तुमच्या मनाचा खेळ आहे. तुम्हांला येथें पडल्या पडल्या डुलकी लागली होती व कसले तरी एक स्वप्न पडले होतें. कळलं नां ? अहो भूतबित सब झुट बात है ! "

मी कांहींच बोललो नाहीं. बोडसांचें म्हणणे अर्थातच मला पटले नाहीं. ते गेल्यापासून मला झोपेनें घेरलें होते खरें, परंतु मला खरोखरी झोप लागली नव्हती. जागेपणीं मी प्रत्यक्ष पिशाच्च पाहीलें ते खरेच होते. पण बोडसांसारख्या नास्तिक वृत्तीच्या गृहस्थांना हे पटवून देण्यांत

तरी कोणचा फायदा ? मी मुकाट्यानें जागेवरून उठलो. लोहमार्गापलीकडील जिनिंग फॅक्टरींत जाऊन आम्हीं फराळ आटोपला. थोडी विश्रांती घेतली व सोलापूरला परत निघालो.

तेवढ्यांत बोडसांनीं मला कोपरखळी देऊन म्हटले, "देशमुख आपली येथील एक गोष्ट पाहून यायची राहिली. यायचं कां जाऊन आपण तेथें ?"

"कुठं ?"

"बारा कमानींत ! तेवढं एक ठिकाण पहायचं राहीलं आपण योजल्याप्रमाणें. येऊया जाऊन ?"

मी नकारार्थी मान हालवतांच ते पुढे म्हणाले, "देशमुख, इतका आळस आतां करूं नका चला हो—"

त्या बारा कमानीं दुरून दृष्टीस पडतांच मी रस्त्याच्या कडेला मोटार उभी करून बोडसांना म्हटले, "बोडससाहेब तुम्हीं या पाहून त्या कमानी. मी येथेंच तुमची वाट बघत थांबतो—"

मलाहि बरोबर चलण्याचा त्यानीं आग्रह केला पण मी तो मानला नाहीं. मग ते एकटेच निघाले झपाझप पायऱ्या चढून ते उत्साहाने त्या कमानींत शिरून नाहींसे झाले. त्यांची वाट बघत मी तसाच गाडींत बसून राहिलो.

परंतु मला अधिक वेळ वाट बघत बसावे लागले नाहीं. घामाघुम होऊन थोड्यांच वेळांत बोडस महाराज जीव घेऊन धावत पळत येतांना माझ्या दृष्टीस पडले. धापा टाकीत ते मोटारींत येऊन बसतांच मी त्यांच्या पाठीवर थोपटीत त्यांना आश्चर्यानें विचारले, "काय हो, झाले काय बोडससाहेब ?"

बराच वेळ तर बोडसांच्या तोंडून शब्दहि फुटेना. मागे वळून मी पाठीमागील बैठकीवरील 'वॉटर बॅग' उचलली व त्याना चार घोट थंड पाणी प्यावयास दिले. त्यामुळे थोडी हुशारी येऊन दम घेतल्यावर ते कांपऱ्या आवाजांत सांगू लागले.

"मी त्या बारा कमानींत गेलो देशमुख पण तेथें मला ते दिसले—"

"काय ते ?" मी विचारले.

"कांहीं विचारू नका." बोडसांच्या कपाळावर घामाच्या रेषा उभ्या राहिल्या. "मी तेथें एक आश्चर्य पाहिले. नाहीं तरी या आश्चर्यांच्या जगांत मी आलोच आहे, आतां आणखी काय काय पहायला मिळणार आहे कोण जाणे ! अरे देवा ?"

"तुम्हांला भूत तर नाहीं ना दिसले बोडस ?"

"तेच ते ! भूतच दिसले पण देशमुख, तुम्ही कसे ओळखलेत ?"

"असेच ! पण मला सांगा ते भूत कसे होते ?"

बोडसांनीं एक आवंढा गिळला. व रुमालाने घाम टिपीत ते म्हणाले, "तेथें मी एक फकीर पाहीला. जख्ख म्हातारा. पांढरी शुभ्र दाढी. उंच सरळ नाक. भेदक नेत्र. आणि देशमुख, आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या फकीराला पाय नव्हते–!"

"काय इंजिनिअरसाहेब बाता मारता ? तिथं काय अंधार आहे थोडाच ? नि महाराज, भूत बित सब झूट बात है। सारे कल्पनेचे खेळ"

पण बोडसांनी मला पुढे बोलू दिले नाहीं. तावातावानीं ते प्रतिपादूं लागले. नाहीं नाहीं देशमुख ते भूतच होतं मी या माझ्या डोळ्यांनी पाहिलं"

मी मिष्कीलपणे हंसलो व बोडसांच्या पाठीवर थोपटत म्हणालो, "जाने दो भाई बात ! तुमारे उपर हमारा बिलकुल भरोसा नही है।"

* * *

## छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यारोहणाच्या समारंभाचें कल्पना चित्र

## "य शो गी त"

भरून उरला नाद अंबरी—
जय महाराष्ट्र, अमर शिवाजी ॥ धृ. ॥
यश ललकारी शिंग फुंकिते,—
शौर्याचा चौघडा नाद ये,
शुभमंगल सुस्वर सनईचे—
मिसळत जन सागरी ॥ १ ॥ जय.
गो ब्राह्मण प्रतिपालक जय, ही—
ग्वाही फिरली कणखर हृदयीं,
माय माऊली, माय भवानी—
रोमांचित शिवनेरी ॥ २ ॥ जय.
समर्थ नयनी अश्रू चमकले,
महाराष्ट्राचे भाग्य शोभले,
जय घोषाचे निनाद उठले,—
शेष तोल सावरी ॥ ३ ॥ जय.
मेळवुनी मावळे मराठी,
अभेद्य, अवघड किल्ले जिंकी,
फडकवी वरी ध्वज त्यागाचा—
अरिला देऊनी तुरी ॥ ४ ॥ जय.
प्रवळ शत्रुशी गनिमी कावा,
शक्ति युक्तिने गड जिंकावा,
नेकींच्या नेमुनी नरवरा—
सावध ध्येय उरी ॥ ५ ॥ जय.
स्वरूप सुंदरि सुन यवनाची,
सन्मानुनी धाडिली मागुती,
विवेक, संयम, अलौकीक तो,—
पवित्र तम भूवरी ॥ ६ ॥ जय.
छत्रपतीचे मानस द्रवले,
बाजी प्रभू, तानाजी कुठले ?
वीर धुरंधर, स्वर्गीतुनही—
पाहु देत पर्वणी ॥ ७ ॥ जय.

दि. वि. नातू [ शीव ]

# सो हा ग-रा त

**जगाला भुरळ पडते ती बाह्य भपक्याची. माणसाच्या अंतःकरणाची कदर कुणालाच नसते!**
**कृष्णेला तशी सारी अनुकुलता होती. तिला प्रखर बुद्धिमत्तेची देणगी मिळाली होती. अनेक कला तिच्या आश्रयाला येऊन राहिल्या होत्या. लक्ष्मी तिच्या घरीं पाणी भरीत होती.**
**उणीव होती ती फक्त सौंदर्याची!**
**अमावास्येची कृष्णरात्र तिच्या देहावर फुलली होती—!**
**आणि म्हणूनच तिची सोहागरात कलंकीत झाली!....**

आज कॉलेज उघडल्याचा पहिला दिवस! वरच्या वर्गांचे विद्यार्थी सराईतपणें आंत शिरत होते तर प्रथम वर्षाचे विद्यार्थी सशाप्रमाणें आंग चोरून वावरत होते. कृष्णा ही मेजर नायडूंची मुलगी. आपली मोटार तिनें आवाराबाहेरच थांबवली. सुरेख बाग, त्यांतील रंगीबेरंगी फुलें आणि नयनमनोहर कारंजे! आंत जाण्याचें विसरून कृष्णा आपली एकटक तें दृश्य पहातच राहिली. कारंजामागें बालमदनाची संगमरवरी मूर्ती होती. इतकें सुरेख शिल्प कृष्णानें तरी आजवर कुठें पाहिलें नव्हते. आजवर पहिल्यांदाच ती कॉलेजमध्यें येत होती. सहज नांवाच्या पाटीकडे तिचें लक्ष गेलें आणि साखरभात खातांना तोंडांत अवचित मातीचा खडा चघळावा तसें तिला झालें. '**रंभाराणी कॉलेज**" विद्यादान करणाऱ्या, संस्थेला ह्या चेटकिणीचें नांव! त्यापेक्षा एखाद्या नटीचें नांव दिलें असतें तरी पुण्य लागलें असतें. उत्कृष्ट अभिनय ही एक उच्च प्रकारची कला आहे. मोहाचे सारे निसरडे कडे तोल न जातां ओलांडणें हीसुद्धां एक प्रकारची खडतर तपस्या आहे. अशा एखाद्या मुक्त तपस्विनीकडे देणगीदाखल हात पसरला असता, तरी साधनशुचिता पाळल्याचें श्रेय संस्थेच्या चालकांना मिळालें असतें. पण ही रंभाराणी! राम राम—हरे राम! धोंडूशेटची ही पांचवी बायको. संतानप्राप्तीसाठी हा थेरडा एकामागून एक बायका करत राहिला. म्हातारा चिवट होता. वयाची सत्तरी ओलांडली तरी एक दिवस पट्ट्याचें डोकेंसुद्धां दुखलें नाहीं. त्याच्या साऱ्या बायका पतिव्रता होत्या. मात्र ह्या रंभाराणीनें त्यांना इंगा दाखवला. आपल्या फॅमिली डॉक्टरकरवीं म्हाताऱ्याला विषप्रयोग करवून तिनें ठार मारलें. आणि ही बयाबाई तें पाप पचवण्यासाठीं भराभर सर्वांना देणग्या वांटत सुटली. रंभाराणी कॉलेज हा त्या पापानें बरबटलेल्या पैशांच्या कचाट्यांत सांपडलेला पहिला बळी! प्रवेशद्वाराच्या फलकावरच त्या अगतिक पापाचा कबुलीजबाब कॉलेजच्या

: लेखक :

**सौ. ललिता हरी देशपांडे**, एम्. ए.

नांवानें फडकत होता. ह्या चेटकिणीपेक्षां अधिक देणगी देऊन आधीं कॉलेजचें नांव बदलून टाकावयाचें असा निश्चय कृष्णानें त्याच क्षणाला केला. आपली सारी कमाई खर्ची पडली तरी चालेल पण ह्याच कॉलेजमध्यें शिकून वृद्धापकाळीं हें दळभद्री नांव बदलण्याचें पुण्य पदरांत पाडावयाचें असें कृष्णानें ठरवलें.

तोंच बालमदनाची मूर्तीच देहधारी व तरुण बनली असावी असें वाटण्याइतका एक देखणा तरुण तिच्या दृष्टिपथांत आला. कृष्णा रसिक होती. सर्व सुंदर वस्तू तिला ईश्वररूप वाटत असत. ब्रम्हदेवाची ही अचाट सृजनकुशलता ती आदरानें निरखून पाहूं लागली. त्यांत लालसा नव्हती. पण हें समजण्याची कुवत त्या प्रतिमदनाच्या अंगीं हवी ना! तो गालांतल्या गालांत हसला. कृष्णाही अभावितपणें हंसली. त्याला काय वाटलें कुणास ठाऊक! आपल्या सोबत्याला खांद्यावर हात मारून तो उद्गारला— "ए गोविंद—तूं सायन्सचा पदवीधर होणार आहेस ना? मग आधीं एक शोध लाव बुवा! स्किनकलर फेसपॉवडरचें मिश्रण ठरवून तीं प्रचारांत आण. म्हणजे आज सकाळीं उठून बागुलबोवा नव्हे बाई दिसली तसें पुन्हां घडणार नाहीं. काळ्या बायांसाठीं खास पॉवडर शोधून काढ रे" लेडीज् रूममध्यें बेसिन आहे ना? आधीं तोंड धुवावें! पुढें तो किती बडबडला राम जाणें! पण कृष्णा फणकाऱ्यानें लेडीज्रूममध्ये निघून आली. तिला रडूं आवरेना. ती हमसाहमसी रडूं लागली. तोंड धुवून टाकण्याचें काम तिच्या अश्रूंनींच पार पाडलें.

इतक्या देखण्या मनुष्याचें हृदय इतकें क्षुद्र असावें ह्याबद्दल तिला विषाद वाटला.

असेच दिवस गेले. कृष्णा सर्व क्षेत्रांत आघाडीवर होती. एक रूप वजा केल्यास ईश्वरानें सर्व कला तिला मुक्त हस्तानें बहाल केल्या होत्या. ती उत्कृष्ट कविता करीत असे. आवाजहि सुरेल असल्यामुळें ती स्वतःच आपल्या कविता म्हणत असे. त्या प्रतिमदनाचें

नांव प्रभाकर बर्वे असें होतें. त्याला आपल्या बेताल बडबडण्याचा आतां पश्चाताप होऊं लागला. त्यानें आपणहून तिची ओळख करून घेतली. ह्यांत खरोखरीच गुणग्राहकता होती कीं एक बडे प्रस्थ आहे त्या ओळखीच्या आधारावर कांहीं स्वार्थ साधावा अशी गुप्त मनीषा होती हें कळण्यास मार्ग नाहीं.

त्यांची ओळख वाढत गेली. मेजरसाहेबांची कृष्णा ही एकुलती एक मुलगी. त्यांची पत्नी दृष्ट लागण्याइतकी सुरेख होती. ते स्वतःही पार्शी लोकांसारखे गोरेपान होते. त्यांना उतारवयांत हें कन्यारत्न लाभलें. त्यासंबंधीं आख्यायिका अशी सांगतात कीं कृष्णाबाई नांवाची एक बालविधवा स्वैंपाकिण त्यांच्याकडे बरीच वर्षें काम करत होती. ती बंब पेटवतांना चुकून पदर पेटला जाऊन भाजली गेली आणि त्यांतच तिचा अंत झाला. त्यानंतर मेजरसाहेबांच्या पत्नी वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी गरोदर राहिल्या.

त्या बाळंत झाल्या तेव्हां नर्स घाबरून ओरडली. मूल काळें निळें पडलें आहे व तें मृत आहे अशी तिची समजूत झाली. इतकें काळें मूल तिनें जन्मांत पाहिलें नव्हतें.

अशी ही कृष्णा ! ह्या संपन्न दांपत्याला मुल व्हावें म्हणून स्वैंपाकिणीनें बलिदान केलें अशी सर्वत्र समजून आहे. थेट त्या स्वैंपाकिणीचें रूप घेऊन ती जन्माला आली. कुशाग्र बुद्धिमत्ता मात्र पिढीजात होती. ती सवाईनेंच उमलली.

मेजरसाहेबांना प्रभाकर बर्वे जांवई म्हणून पसंत होता. त्या दृष्टीनेंच ते त्यांच्याकडे पहात होते. कुणाचाही संसार आदर्श बनवण्याइतकी आपली कन्या समर्थ आहे ह्याची त्यांना खात्री होती.

प्रभाकर बर्वे हा एका गरीब भिक्षुकाचा मुलगा. वार लावून तो मॅट्रीक पास झाला. आतां स्कॉलर्शिपवर त्याचें शिक्षण चाललें होतें. मेजरसाहेबांना असाच जावई हवा होता. रूपाचें वैगुण्य बाजूला सारून कृष्णेवर प्रेम करण्याचें सौजन्य फक्त गरीब मुलांतच आढळेल असा त्यांचा विश्वास होता. पहिल्या दिवसाचे त्याचे प्रलाप कृष्णेनें अर्थातच पित्याच्या कानावर घातले नव्हते.

–दिवस चालले होते. प्रभाकर बर्वे डॉक्टरीची परिक्षा उत्तम प्रकारें पास झाला. कृष्णाही मेडिकल कॉलेजमध्येंच होती. अजून दोन वर्षांनीं ती एम्. बी., बी. एस्. होणार होती. तोंवर प्रभाकर बर्वेना परदेशगमनाची संधि देऊन अधिक ज्ञान पदरीं पाडण्याचा मोका द्यावा असा मेजरसाहेबांचा मनोदय होता. जांवई होण्याची अट त्यांनीं स्पष्टपणें घातली नाहीं. कोणत्याहि शर्ती न लादतां त्यांनीं प्रभाकरला इंग्लडमध्यें पाठवलें. वाटल्यास येतांना गौरकाय अर्धांगी आणण्यासही तो मोकळा होता. कृष्णेच्या रूपाची मदत असल्यामुळें संयम आपसूकच साधला जात होता. त्याचा स्नेह मर्यादित होता. ऐन तारुण्यांतच प्रभाकर विरक्त बनला होता. आणि एखाद्या वृद्ध साहित्यिका प्रमाणें कृष्णेच्या सहवासांत शुद्ध बौद्धिक आनंद लुटत होता. त्याच्या तरुण मित्रमंडळींत तो. कार्तिकस्वामी ह्या नांवानें ओळखला जात होता. वैवाहिक जीवनाची सुखस्वप्नें त्यानें कधींच पाहिलीं नाहींत. आपल्यापुढें नियतीनें ठेवलेलें ताट त्याला दिसत होतें. तो हाडाचा सज्जन होता. मेजरसाहेबांची मदत स्वीकारून त्यांची कन्या नाकारण्याचा बेडरपणा त्यांच्या अंगीं नव्हता. सर्व कांहीं ठरल्याप्रमाणें गृहित धरून एखाद्या आज्ञाधारक पुत्राप्रमाणें तो मेजरसाहेब व त्यांची पत्नी ह्यांना मान देत होता. कृष्णेशीं सौजन्यानें वागत होता. प्रेमाचा उमाळा येणें शक्य नसले तरी, शक्य तों कोमलपणें वागण्याची तो खबरदारी घेई.

—आणि मग एकदांचा तो दिवस उजाडला. कृष्णा नायडू विधिपूर्वक सौ. बर्वे बनल्या. डॉक्टर बर्वे परदेशगमन करून आल्यावर त्यांनीं भावी सासऱ्याच्या मदतीनें दवाखाना घातला. एक मोटार त्यांना मेजरसाहेबांनी घेऊन दिली. वेळपावेतों कृष्णाही डॉक्टरीण बनली होती. दोघांनीं मिळून भव्य शुश्रूषागृह थाटलें. ऑपरेशन टेबलावरचा पेशंट ज्या मनःस्थितींत असतो, त्याच मनःस्थितींत डॉक्टर बर्वेनीं कृष्णेला गृहिणी बनवलें. अजूनही 'कामिनी' ह्या दृष्टीनें ते कृष्णेकडे पाहूं शकत नव्हते. पैशांनीं माणूस विकत घेतां येतो काय ? आणि बौद्धिक भूक भागवण्याच्या गोष्टी खास म्हाताऱ्या नवऱ्यांनीं तरुण सुशिक्षित बायका उपटण्यासाठींच करावयाच्या असतात ! खरा लागलेला असतो म्हातारचळ ! आणि वर 'गोंडस नांव बौद्धिक भूक भागवण्याचें !

सोहाग रात ही मदनतुल्य प्रभाकरला फांशीच्या शिक्षेसारखी वाटत होती. औषधाचा प्याला हातीं घ्यावा त्याप्रमाणें प्रभाकरनें कृष्णेचा हात निर्जीवपणें एकांतांत हातीं घेतला. कृष्णेनें तो झिडकारला. ती खंबचटपणें म्हणाली, "डॉक्टरसाहेब ! अजून स्किनकलर फेसपॉवडरचा शोध तुमच्या त्या गोविंदरावांनीं लावला नाहीं ना ? मग काळया रंगाची प्रजोत्पत्ति करण्याचें पाप शिरावर कां घेतां ? माझ्या मुलीला उद्यां असें कुणीं रडवावें ही कल्पनाच मला सहन होत नाहीं. तेव्हां महाशय–फक्त गोऱ्या रंगाचींच मुलें जन्माला घालण्याचा शोध लागेपर्यंत—तुमची आमची गांठभेट फक्त शुश्रूषागृहांत–रोग्याची सेवा करतांनाच एकत्र जेवूया–फिरूंया–पण तुमचें शय्यागृह मात्र माडीवर—चौथ्या मजल्यावर ! मी इथें खालीं आहे. अपरात्रीं फोन आल्यास मी बेल वाजवीन आपण खालीं या. जोडीनें रोग्याला मदत करण्याचें पवित्र कर्तव्य पार पाडूंया"

* * *


गृहिणींच्या आनंदांत भर घालण्यासाठीं

[ खात्रीलायक सोन्या–चांदीच्या दागिन्यासाठीं ]

**भास्कर लक्ष्मण नार्वेकर**

१८४ ठाकुरद्वार रोड, मुंबई २

नवीन फॅशनमध्यें सोन्या–चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील अगर ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्रीसाईबाबांची सोनें–चांदीची लॅकेटस् व फोटो मिळतील.

१३५९

लेखक
किसन रि. दुधेडिया

# मधुचंद्र

**त्या चंदेरी रात्रीं आकाशाच्या सुरईतील चांदण्याचें मद्य वसुधा आकंठ प्राशन करीत होती. आपल्या सखीसह मी त्या रात्रीं जलप्रवाहाच्या शेजारीं धुंदपणें प्रणय प्राशन करीत होतो. मला कशाचंच भान नव्हतं आणि अशा समयीं कशाचं भान मुळीं असूंच नये ! कामिनीच्या मिठींतील रात्रीनं उमर खय्यामाला पार गाफील केलं !........**

रजनीच्या गोंडस हातांची लांबसडक बोटें हातात धरून ढगांच्या पांढऱ्या-शुभ्र पायघड्यावरून प्रवास करणारा पूर्णाकारी चंद्रमा किंचित् थबकल्याचा भास झाला. शरद ऋतुची चांदणी रात. आपल्या खळखळ आवाजाची एकतारी वाजवत जाणाऱ्या प्रवाहांत चांदण्याची अखंड बरसात होत होती. चांदणे कसले ते चंद्राच्या सुरईतून सांडलेले बेहोष करणारें फेसाळ मद्यच ते...एखाद्या पटाईत मद्यप्याप्रमाणें सर्व आसमंत चांदण्याचें पान करीत होते. प्रवाहांत मिसळून वाहत होते ते मद्य व त्याची नशा चढली होती आम्हां कांठावर बसलेल्या दोघांना...

उगमापासून ते संगमापर्यंत एकेकट्यानें प्रवास करणारे दोन प्रवाह थोड्यावेळापूर्वींच एक झाले होते. खूप दिवसांनीं भेटलेल्या सख्या बहिणींनी एकमेकांना कडकडून प्रेमानें ओथंब-लेली मिठी मारावी त्याप्रमाणें दोन्हीं प्रवाह समोरासमोर येवून कडकडून भेटले होते. दोन प्रवाह एक झाले होते; त्या ठिकाणीं थोडे पाणी उंचबळे. त्या ठिकाणीं दोन्ही प्रवाहांनी खूपच हितगुज केले असले पाहिजे. आतां येथून पुढचा सगळा प्रवास बरोबरीनें करायचा. चंद्राच्या चरवींतून खाली सांडलेली शुभ्र चांदण्याची धार आणि रात्रीचा काळाकुट्ट अंधार दोन्ही बरोबरीनें प्यायचा. कांठच्या झाडांचा हळूवार, प्रेमानं ओथंबलेला उबदार स्पर्श दोघांनीही एकाचवेळीं अनुभवायचा. घाटाशेजारील देवळांतील घंटेचा होणारा मंजूळ घंटानाद एकावेळी ऐकायचा. किंवा एखाद्या तरुणीच्या घागर भरतांना होणाऱ्या पुसट स्पर्शानं दोघांच्याही अंगावर एकाच वेळीं रोमांच उठायचे...

तिनें घागर टेकवतांच अलगद् बुड्बुड्ड आवाज करून घागरीवरून वहायचे आणि ती घागर कटिवर घेतांच त्यावरून एकाचवेळीं ओघळायचे. व त्या रमणीच्या देहाचे जवळून... अगदीं जवळून दोघांनी एकाचवेळीं दर्शन घ्यायचे. गुडघाभर पाण्यांत येणाऱ्या एखाद्या तन्वंगीची ओचेपदर सावरताना होणारी गोड धांदल बघून दोघांनीं एकाचवेळीं टाळ्या पिटायच्या आणि जातां जातां तिच्या नितळ पोटऱ्यांना दोघांनीं एकाच वेळीं लगटून जायचं. अशा कितितरी गोष्टी दोघांनीं ठरविल्या असतील...अशाच तऱ्हेनें वेगवेगळीं अनुभव-लेली कितीतरी सुखस्वप्नें ते आतां एकत्रपणें उपभोगणार होते.

आणि त्या प्रवाहाच्या कांठावर बसलेले आम्हीं दोघे वेडे झालो होतो. आसपासच्या उन्मादक वातावरणाने भारावलो होतो. हलकं हलकं होत वर जाणाऱ्या पराप्रमाणें आमची मने केव्हांच तरंगत होती त्या वातावरणाच्या पोकळींत. चंद्राच्या चांदण्याची बरसात दिसत नसली तरी आम्ही चिंबचिंब झालो होतो. आणि समोरच्या प्रवाहांत जितक्या सहजपणें चांदणें एकरूप झालें होते तितक्याच सहजपणें 'सरोज' माझ्या जीवन प्रवाहाशी एकरूप झाली होती आणि आता येथून पुढचा जीवनमार्ग ह्या दोन्हीं प्रवाहा प्रमाणेंच आम्हीं एकत्र पायाखाली घालणार होतो. जणुं एक-मेकांना भेटण्यासाठीच आमचे जीवन प्रवाह उगम पावले होते.

कालचा आमचा लग्नाचा दिवस. आमचा संगम होता तो...अक्षरशः प्रीतिसंगम. ढगांच्या दुलईवरून चालतांना आकाशांतील चंद्राच्या तळव्याला अन् मनाला ज्या सुखसंवेदना होत असतील त्याच...अगदी तशाच सुखसंवेदना काल सरोजच्या गोंडस अन् रेशीम सुतासारख्या मृदु सुत हातांत हात देऊन सप्तपदी करतांना होत होत्या. मनाच्या पाखरानं केव्हांच आकाशांत उडडाण केलं होतं त्या अनंत पोकळींत स्वैरपणें विहार करतांना त्याला फक्त सरोज दिसत होती...सरोज...फक्त सरोजच.

हिरव्या चुड्यानें भरगच भरलेला, गोरापान, मेंदीनें रंगलेला हात भटजीच्या सांगण्यावरून हातांत देतांना लाजेनें दुसरीकडे पाहत होती परंतु डोळ्यांचे कोपरे दुमडून नजर ओसंडून वाहत होती ती माझ्याच दिशेनें अन् खट्याळ... लबाड आणि फसवे डोळे मूकपणें, मिस्किलपणें विचारांत होते.

" आव तर खूप आणलांत... जसा कांहीं पहिल्यांदाच हात धरतां आहात "

माझ्याही चतुर डोळ्यांनीं परस्परच... उत्तर दिलें. " तूं ही अश्शी लबाड हं... जशी कांहीं आजच पहिल्यांदा हातांत हात देतेस "

लग्नापूर्वी अक्षरशः सात स्वर्ग पायाखाली घातलेले आम्हीं दोघे, पण सप्तपदी चालतांना पाय अडखळत होते. हलकेच सरोजचा हात दाबला... कुणाच्या लक्षांत आलं नाहीं म्हणून ठीक ..

कालचा सबंध दिवस लग्नाच्या गडबडींत गेला. लग्न झाल्या बरोबर बरीचशीं मंडळी परतली होती. मोजकीच मंडळी होती घरांत... आणि मधुचंद्रासाठीं ठिकाण कुठलं निवडावं यावर चर्चा चालली होती. मधुचंद्र...दोन जीवांच्या मंगल मीलनाचा गोड अर्थ असणारा चार अक्षरी शब्द. मधानं थबथबलेले आणि चंद्राप्रमाणेच असणारे ते क्षण पाऱ्याप्रमाणेच हातांतून अलगद् निसटणारे ...धरं पाहतां सुटणारे अन् अगद बनणारे ते क्षण...दोन्हीं अंतःकरणांना एकमेकाची ओळख होण्याची ती वेळ...झालेली ओळख अधिक दृढ होण्याची ती वेळ.

हक्कानं मागायचं आणि खुशीनं द्यायचं संयमाचे बांध तटातट तुटण्याची ती वेळ. उसळत्या सागराला कवेंत घेऊन त्याच्यांतील रत्नभांडारांच्या राशी शोधायची ती वेळ. उसळत्या लाटांना...तांडव करणाऱ्या जलराशीला बाहुपाशाच्या विळख्यांत सामावून घ्यायचं. धुंदफुंद व्हायचं...जगांत असून जगाला विसरायचं, आणि आत्मसमर्पणाच्या धुंदफुंद होणाऱ्या आनंदांत ' डुबून जायच. पक्षाप्रमाणें चोचींत चोंच घालून भावी आयुष्याची सुखस्वप्नें रंगवायचीं. पृथ्वीवर असून भावी जीवनाच्या इंद्रधनुष्याचें ओळीनें दिसणारे सप्तरंग बघून घट्ट मिठी अधिक घट्ट करायची. आवळ होणाऱ्या मिठीच्या बंधांत गुदमरून जायचं. केवढा थोर अर्थ आहे ह्या मधुचंद्रांत

त्यामुळेंच सगळ्यांनीं सुचविलेल्या स्थळांना आम्ही मुरड घातली अन् माझी मधुचंद्राची कल्पना सरोजच्या कानांत सांगितली अन् सांगता सांगताच तिच्या गोऱ्यापान आणि हळदीमुळें खुललेल्या गालावर रक्तिमा चढला.

ज्या ठिकाणीं आमच्या प्रीतिच बीज रोवलं गेलं, ज्या ठिकाणीं ते वाढलं, ज्या ठिकाणीं चंद्राच्या कोरीला साक्ष ठेवून आम्हीं आमचं अंतःकरण उघडं केलं त्याच ठिकाणीं त्याच कांठावर मधुचंद्र साजरा करायची कल्पना सरोजला इतकी आवडली, इतकी आवडली, की त्या आनंदाच्या भरांत तिचे गुलाबी ओठ ओले कां झाले हे तिला कळलंसुद्धां नाहीं...

सरोज पाण्यांत पाय टाकून बसली होती. पाणी पोटऱ्यांशी लगट करत होतं. सगळं

# ' जमुनातिरी ' ( बिचारी )

**डॉ. सरोजीनी नायडू यांची**

**( इंग्रजी कविता " Village Song " चे भाषांतर )**

जलभरणा जरि एक बालिका जमुनेवरि आली
नावकन्याचे गान ऐकुनी मंत्रमुग्ध झाली
नदीपासूनी मार्गगृहाप्रति लांबनि एकाकी
निर्जन अन् ओसाड तशांतचि सांज त्यांस झांकी
लेवुनि छायेची आभरणे संध्या अवतरली
भानावरि येताचि बालिका मनीच घाबरली
कुचकुचणें तें करकोच्यांचे कानी तिज आलें
घुबडाचा धुत्कार ऐकुनी चित्त खिन्न झालें
भेदरल्या हृदयीच उमटले विचार मनीं नाना
कशास मेली गुंग जाहले नावकन्यांचे गाना
नसे चांदणे मार्ग दावण्या काळोखी मी कशी जाऊ
सर्पदंश होईल मला कीं वाटे मनीं बाऊ
पिशाच्य बाधा होईल का मज अशा भयानक काळीं
रामा ! रामा ! ये धावोनि, ना तरि मरते यावेळीं
म्हणेल दादा, कुठें गुंतली मिष्किलतेने आईला
थट्टा मस्करी करील, परि नच भुलले छोट्याताईला
असेल आई करित रुदन, मार्गप्रतिक्षा करुनी जी
प्रार्थित प्रभुशीं रक्षण करण्या सज्ज सदाचि जी
सुरक्षितेनें आणा कन्या, देवा पांडुरंगा
वदता, वदता वाहत असतील नेत्री यमुना गंगा
खोल किती तें पाणी वाहे, जमुनेचे त्वेषाने
कृष्ण वलय संध्येचे जमति अनंत वेगाने
जसा नभीं त्या जमुनी पक्षी करिती काळोख
संध्येचाहि कृष्ण साज तो पसरे काळोख
काय अवस्था होईल माझी जरि वादळ होई
संरक्षण मी कशी करु जरि विद्युतपत् होई
रामा ! रामा ! जरि ना देसी शक्ति मम पाया
दूर जावया सत्वर तरी मी मरेन रे वाया

**भा. अ. पटवर्धन**

शांत... अगदी शांत होतं. चंद्राच्या प्रकाशांत सुद्धां त्वचेची नितळता स्पष्ट दिसत होती. नव्या पातळाचा विशिष्ट वास मोगऱ्याच्या उन्मादक वासांत मिसळून वातावरण उत्तेजित करत होता. कपाळावर रुळणारी केसाची हळूवार बट... मंद वाटणाऱ्या वाऱ्याबरोबर हेलकावे खाणाऱ्या वेलीप्रमाणें हालत होती...

सरोज बोलत नव्हती... घुम्यासारखी जलांत पाय टाकून बसली होती. किती जगावेगळा आमचा मधुचंद्र होता नाहीं ? शृंगारलेला पलंग नाहीं. फुलांची पखरण नाहीं, सेंटसचा मादक वास नाहीं;

परंतु त्याहीपेक्षां कितीतरी पट गोड तऱ्हेनें आमचा मधुचंद्र होणार होता. शृंगारलेला पलंग नसला म्हणून काय झालं, चांदण्यांतही चमकणारी मदुसूत रेती होती. खालीं नसली तरी आजुबाजूला फुलें आपल्या पाकळ्या टवकारून आमच्या संवादानें दाही दिशा फुलणार होत्या आणि ती कुजबूज ऐकून त्या चांदण्यालाही नशा येणार होती. चोरून पाहणाऱ्या व्यक्ति नसल्या म्हणून काय झालं... आसपासचे वृक्ष, लतावेली उत्कंटित होऊन पाहत नसतील कां ?...सेंटसूचा मादक वास हवाच कशाला ? सेंटसूची कुपी समोर असतांना.

सरोजची भावसमाधी मोडण्याची इच्छा असूनही धीर होत नव्हता...ती कसला विचार करत असावी. आठवणींची प्रभावळ तिच्याशी मनांत उभी असेल का ? हो असलीच पाहिजे. त्या शिवाय का अंतर्मुख होऊन ती स्तब्ध बसली आहे. स्मृतिंच्या लाटांवर स्वार होऊन हेलकावते आहे...शेवटी तीच म्हणाली,

" मकरन्द "

" काय ! " मीं जरा अंग घुसळींत म्हणालो.

" रागावलास ! " माझ्या स्वरावरून तिनें तर्क केला असावा.

" छे ! आतां रागावण्याची हक्काची सनद आम्हीं कालच तुमच्याकडे सुपुर्द केली नाहीं कां ! "

" इश्श ! " आणि तिच्या गालावर लज्जेचें गुलाब फुललें. चांदण्यांत सुद्धां त्याची लाली नजरेतून सुटूं शकली नाहीं.

" इतका वेळ स्तब्ध कां बसली होतीस ! "

" सांगू "

" हं "

" बघा हं चिडवणार नाहीना ? "

" नाही "

" हसणार नाहीं ना ? "

" नाही "

" थट्टा करणार नाही ना ? "

" नाही ! नाही ! ! नाही ! ! ! "

" मी विचार करत होते "

" कसला "

" परवाचा चंद्र, आकाश, हा खळाळून वाहणारा प्रवाह, समोरचा वृक्ष– हे सगळं तेच आहे कीं बदललय "

" असं का वाटतय तुला "

कुणास ठाऊक... पण प्रत्येक वस्तू वेगळी भासतेय. "

मला बरोबर पटलं. थोडयाच वेळापूर्वी माझ्या मनांत नाहीका तेच विचार आले होते. सगळं तेच असून थोडं वेगळ भासत होतं. त्याच वस्तूवर कुणीतरी थोड्या निराळेपणाचा शिडकाव केला होता...

नदीकाठचं थोडं वाकलेलं झाड आम्हीं दररोज पाहत होतो. कधीकधी त्याच्या बुंध्याला पाठ लावूनही बसलो होतो. तेथून कितीतरी गोष्टी आम्हीं पाहिल्या होत्या. पण मला आपलं मघाशी वाटलं कीं, ते झाड अधिकच वांकलं आहे. थेट पाण्यापर्यंत आणि वाहत्या पाण्याला चुंबता चुंबता पाण्याखालील मुळ्यांनी ढोसून सांगत आहे.

" ते बघ ते समोर जोडपं बसलं आहेना... ते समोरचं, अगदी खेटून बसलं आहे ते ... हं तेच ते. लग्नापुर्वी नेहमीच ह्या ठिकाणी येत असे. दोघांच्या प्रीतिचा वृक्ष फोफावला तो त्याच ठिकाणी तिच्या जीवनाचं मुखपृष्ठ येथेंच रंगविलं गेलं आहे. दोघांनी येथेच मने उघडी केली. आणाशपथा येथेंच घेतल्या. तिच्या गालावरचा रंग पालटला... ओलावला तो येथेंच अन् आज लग्नानंतर मधुचंद्र साजरा करायला ती दोघें आली ती त्याच ठिकाणी "

हे सर्व मला जणूं ऐकूं येत होतं. मी सरोजला जागं केलं तिच्या भावनिद्रेतून अन् म्हटलं

" सरोज "

" हं "

" तुला तो समोरचा चांदण्यांत निथळणारा वृक्ष दिसतोयना "

" हो "

" तो पाण्याला काय सांगतोय "

" मला वेडीला काय कळतय "

" खूप कळतय, सांग ना "

" सांगू "

" हो "

" तो वृक्ष पाण्याला म्हणतोयं; ' मी आज इतकी वर्षे तुझ्याजवळ राहून तुझ्यावर माझ्या प्रेमाचा वर्षाव केला. तिन्ही ऋतुंत तुझ्यावर वेड्यासारखं प्रेमच केलं, डोक्यावर उन्हं झेलून तुला शीतलता दिली. कधीकधी फुलं गाळून तुला सुगंधित केलं; तेव्हां आपले ओठ खाली पाण्याजवळ वांकवून ते पाण्याला फक्त येवढंच सांगू इच्छित की,...

" सांग सांग "

हाताच्या ढगांत मुखचंद्रमा लपवीत ती म्हणाली.

" नको,...समजुन घे "

आणि त्याच वेळीं मी सरोजला जवळ ओढली. खूप जवळ. इतकी जवळ कीं निशिगंधाच्या फुलांप्रमाणें तिच्या केसांचा वास माझ्या नाकांत शिरला. शिंपल्यांत पडणाऱ्या स्वातीच्या टपोऱ्या थेंबाचा मोती बनतो म्हणतात, पण बाहुपाशांत पडणाऱ्या देहाची हिरकणी बनते हे कुठे जगाला माहित आहे.


## सर्व तऱ्हेची फाऊंटनपेनें

सुलभ लेखन

टिकाऊ व माफक दरांत

निर्माते

मे. इंडो फॉरेन फाऊंटन पेन इंडस्ट्रीज, कोप्री कॉलनी, ठाणा

मला केव्हाचं समजलं होतं परंतु तिच्या तोंडून ते वदवायचं होतं म्हणून मी तिला " सांगना '...म्हणून हट्ट धरला.

परंतु ती बोलुं कशी शकेल. तिचे तोंड बंद होते. आणि हळुवारपणे ओठावर ओठ टेकवून तिचे एक हळूवार चुंबन घेतले. नंतर दीर्घ. .खूप दीर्घ. ती जगाला विसरली... आसमतं विसरली अन् हलकेच माझ्या बाहुपाशाचा विळखा अधिक घट्ट झाला. माझ्या छातीवर तिनें आपलें मस्तक टेकवले. भुरुभुरु उडणाऱ्या केसाच्या बटा माझ्या तोंडावर उडत होत्या अन् सुखवित होत्या. मोरपिस हळूवारपणे चेहऱ्यावरून फिरवतांना ज्या गोड संवेदना होतात त्याचा पुनः प्रत्यय येत होता.

सरोज दिसतही होती मस्त. गोरापान रंग उमलत्या फुलांची कोमलता... अन् नाजूकपणा असलेले ते बोलके ओठ... कमळाच्या पानावरील दंवबिंदुप्रमाणें ओठावरील हास्य अलगद टिपावें असं सारखं सारखं वाटत होतं, हिरवी साडी अन् ठिक बसणारा हिरवा चोल्का... कपाळावर स्वैरपणें रुळणाऱ्या केसांच्या बटा, त्यांची कपाळावर सुंदर महिरप बनली होती. दुमडलेल्या वेण्यांना उगाचच बद्ध करण्याचा प्रयत्न करणारी ती गुलाबी रिबीन. गालाच्या गुलाबीपणापेक्षां फिक्की वाटत होती. चांदण्याचे मोती तिच्या अंगावरून ओघळत होते आणि सरोज... शांत अगदी शांत होती.

" अे बोलना... " मी म्हणालो

" काय बोलू... "

" मग असं मुक्यामुक्यानेच कुठपर्यंत ? "

ती चक्क लाजली. वाळूचे कण हातांत घेऊन ती रेतीशी चाळा करूं लागली. रेतीवर ती आता पहुडली होती. सुखैनेव. फुलानें सुशोभित केलेल्या शय्येवर बिनदिक्कत झोपावं तसं. घरतीची शय्या, चांदण्याची शाल शेजारी पाण्याचं संगीत, अविरत संगीत खरोखर अपूर्व असा आमचा मधुचंद्र होता नाही !

रेतीवर पालथं पडून हाताचे कोपरे रेतीवर टेकवुन तळव्याचा तोंडाला आधार देत सरोज म्हणाली.

" मकरन्द "

" काय ? "

" तुला आठवतो का ? "

" काय "

" आपल्या पहिल्या भेटीचा प्रसंग "

" न आठवायला काय झालं ? "

माझ्याहि मनाला नेमका हाच प्रश्न तिला विचारावासा वाटला होता. दोन तारा जुळल्या की सारखे बोल निघावेत त्याप्रमाणं आमचे झाले होते. आमच्या दोन्हीं मनांच्या तारांची कंपनसंख्या अगदी सारखी होती. एक तार कंप पावली की दुसरीनें आपोआपं सुर उमटावा...अस्सं अगदी अस्सं झालं होतं आमच्या मनाचं.

पहिल्या भेटीच्या प्रसंगाचे मधाळ क्षण माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले. चार वर्षापूर्वीची ती संध्याकाळ—अनेक रंगाचे खेळ खेळून दमलेला सूर्य बुडी मारण्याच्या बेतात होता. जातां जातां वसुंधरेशी हात मिळवणी करतहोता.वसुंधराही लाजेने चूरचूर झाली होती. आपण नुकतेच कॉलेजला आलो होतो. एकलेपणाची आग बुडविण्यासाठी आपण ही रम्य शांत आणि निवांत जागा शोधली होती. ह्या ठिकाणी येऊन वाहत्या पाण्याबरोबर आपण गप्पा करायचे. मनाची घरची ओढ त्या पाण्याच्या ओढीप्रमाणेच होती...परंतु राहळ कर्तव्य होतं... असाच आपला नेहमीचा क्रम चालू होता' संध्याकाळचे निरनिराळे रंग बघत बसायचे. आकाशांत उडणाऱ्या पक्षांची कवायत बघायची. सुळकन पृष्ठभागावरून पाण्यांत झेप घेणाऱ्या इवल्या इवल्या मासोळींचे खेळ बघायचे... जीवासाठी झगडणारें इतर जीव बघायचे. मनांत अनावर झालेल्या भावनांना कागदावर वाट करून द्यावची. सुंदर सुंदर कल्पनांचा साज लेवून त्यावेळी आपली प्रतिभा फुलत होती...

एके दिवशीं अचानक आपली नजर जरा दूर असलेल्या खडकांकडे गेली. वाहत्यापाण्याच्या धारेंत पाय सोडून कुणी एक तरुणी बसली होती. बोटांच्या चिमटींत पातळ धरले होते. बांधेसुद अवयवांची. आपल्याला दुरुनही कल्पना आली. कांही वेळानंतर ती उठली अन आपल्या जवळून निघून गेली. जवळून जाताच नजरेंच भरली किती मोहक दिसत होतीं ती. सौंदर्याचा शिगोशिग भरलेला प्यालाच जणूं. ओठाला लावावा अन क्षणांत रिता करावा. चालही किती मोहक होती. चालण्यांत हंसीचा डौल होता. संथपणे आत्मविश्वासानें पाऊल टाकणाऱ्या त्या तरुणीनें आपल्याला खूप वेळ विचाराच्या भोवऱ्यांत ढकलले होते. कोण असावी ?

दुसऱ्या, तिसऱ्या चौथ्या लागोपाठ तीन-चार दिवस ती तेथे दिसायची. गांवापासून बऱ्याच दूर असलेल्या त्या ठिकाणी अगदी शांत असायचं. पाण्याचा आवाज आणि क्वचित जाणाऱ्या जनावरांच्या गळ्यांतील पावलांच्या ठेक्यावर पडणारा घंटानाद सोडला तर आवाजाला त्या ठिकाणीं प्रतिबंध होता. सारखं वाटायचं तिन यावं. आपल्याशी तिच्या ओठाच्या मधांतुन घोळलेले शब्द ऐकावेत. डोळे भरून आपण एकटक तिच्या मुखाकडे पहावे...

पांचव्या दिवशी जातांना ती किंचित हसली. हसली कसली तरी माझ्यावर आकाशांतून कुणीतरी फुलांचा वर्षाव केल्याचा भास झाला मला फुलांच्या ताटव्या जवळून मंदमंद सुगंधित वारा यावा तसं वाटल मला अन् त्या हास्यालाही गोड हास्यानें प्रत्युत्तर दिले. त्या दिवशी ती खूपच सुंदर भासली मला.

निळ्या साडीला निळ्या पोलक्याचा मॅचिंग होता. दोन वेण्यांचे पेड वक्षस्थळावर रुळत होते. नकळत त्यांचा हेवा वाटला मला कुणालाही वाटला असता... चालतांना हेलकावे खाणारी छोटीशी पर्स, अन् मान वळवतांच त्याच वेगानें हेलकावे खाणारीं कानांतील कर्णफुले... त्या दिवशी सबंध रात्रभर ती

Fresh, Tasty and Delicious Dishes
Together With Courtesy and
Cleanliness Makes

UDIPI LUNCH
HOME

**Vincent Road, Dadar**

EVERYONE'S FAVOURITE
EATING PLACE
Under the Management of—

**R. N. NAYAK**

अनामिका, उमलत्या फुलावर पिंगा घालणाऱ्या भ्रमराप्रमाणें स्वप्नांत माझ्या भोवती नाचत होती नुसती...

दुसऱ्या दिवशीं उठताच ठरविलें की आज तिची ओळख करून घ्यायचीच. रुबाबदार कपडे केले अन् नेहमीच्या जागी जावून बसलो.

तिच्या वेळेला ती आली. कालच्या साडींत बदल झाला होता. कालच्या पोलक्यांत बदल झाला होता. केसांची रचनाही थोडी बदलली होती. बदलली नव्हती फक्त ती... नेहमीप्रमाणें संथपणें वाळूंत पाय रुतवित ती आली होती. परंतु दूर न बसतां आज जवळ बसली होती......पाण्यांत पाय टाकून, केसांचे पेड पुढें घेऊन, बोटांच्या चिमटीत घोळ धरून अन् अंगठ्याने पाण्यांत पाणी उडवीत बसली होती.——

मला राहवले गेलें नाहीं. मी एकदम विचारलें.....

" आपण रोजच येता नाहीं ह्या ठिकाणीं ?

" आपण बघता आहातच की " तिच्या उत्तरांत आपल्याला न कळत बेपर्वाईची जाणीव होते. तिच्या एकट्या येण्यामुळें धीटाईचे कौतुक करावेसे वाटते.

अन् ती एकदम हसते. गोड हसते. अलगद झाड हलवताच झाडावरील फुलांनी खाली पडावे अन् झाडाखालीं उभे असणाऱ्या व्यक्तिला जसे वाटेल तसे त्यावेळीं मला वाटते.

" तसं नाहीं...पण आपल्याला सृष्टि-सौंदर्याची फारच आवड दिसते "

" कां फक्त कविंनाच सृष्टिसौंदर्याची आवड असावी असा नियम नाहीं ना ?"

म्हणजे मी कविता करतो हे ह्या मुग्धेला कसे कळले होते ? की कागदावर लिहीत असतांना दुरून पाहिले होते. मला न कळत अभिमान वाटला...

" कुणी सांगितलें मी कवि आहे म्हणून..."

" सांगायला कशाला हवं...एकटक एखाद्या सुंदर वस्तुकडे बघून...मनांत उगवलेला प्रतिभेचा कोंब हळूच मनाच्या बाहेर येतो...तो काय दुसऱ्यांना दिसत नाही ?"

किती छान बोलत होती ती. वाटलं हीनें असच आयुष्यभर बोलावं आणि आपण... आपण असंच फक्त कानांच्या ओंजळींत सांठतात ते मधाळ बोलणं.

" आपणहि कवि दिसता ? "

" कशावरून " ती चमकली...

मी धीटाईनें म्हणालो...

" स्वप्नाळू डोळे...... गांवानुकुल अन् पाण्याच्या प्रवाहांशी एकरुप झालेली नजर काय सुचवते ! "

तीनें खाली पाहिले अन् मुग्धपणे माझ्या तर्काला संमति दर्शविली.

" आपल नांव ? "

" सरोज गंधे, अन् आपलं ? "

" मकरन्द भावे "

" छान झालं. ओळख झाली "

मलाही तेच म्हणायचं होतं. परंतु सरोजनें म्हणून टाकलं होत...

" उद्यां येतांना तुमच्या कविता आणाल ? "

तीने विचारले होते. अन् प्रवाहाबरोबर वाहत जाणाऱ्या पाचोळ्याप्रमाणें तोल न सावरून मी ते कबुल केलं...

रात्री खूप वेळ जागुन विखुरलेल्या कविता एका चांगल्या वहींत लिहिल्या. अन् शेवटची कविता सरोजवरच केली. तिच्या टपोऱ्या भावस्पर्शी डोळ्यांवर...

नेत्री तुझ्या आज
नाचतात भाव
निळ्या लाटेवरी
हेलकावे नाव......

सरोजला कविता खूप खूप आवडल्याचे तिनें आवर्जुन सांगितलें. मी म्हणालो,

" एक माणुस खुपच धुर्त आहे हं "

" काय झालं ?"

दुसऱ्याच्या कविता वाचल्या. स्वतःच्या न आणता...

आणि दुसऱ्या दिवशीं सरोजने तिची वही आणली. वही नव्हती ती. तिच्या काव्यफुलांची फुलदाणी होती ती. कुशलपणें त्या फुलदाणींत तिनें फुलें भरली होती. मी कविता वाचतांना सारखी माझ्या तोंडाकडे बघायची...बदलत जाणारे भाव अचूक टिपायची, डोळ्यांच्या कोपऱ्यांत ठेवून द्यायची अन् शेवटी अधीरतेनें विचारले.

" आवडल्या ?"

" खूपच " मी म्हणालो अन् असीम आनंदानें तिचा चेहरा उजळला.

सरोजपण कॉलेजला आली होती. पण वेगळ्या कॉलेजला होती. दिवसभरांत केलेल्या कविता आणून दाखवायची...

असे बरेच दिवस गेले. परिचय वाढत गेला. नदीकांठी झालेली ओळख आतां हॉटेलमध्येंही दृढ होऊं लागली. सहवास वाढला आणि दोघामध्यें स्नेहाची जाळी विणली गेली.

एक दिवस ह्याच नदीकांठावर चंद्राला साक्ष ठेवून आपण सरोजला 'मनांतले' विचारले. अन् मुकसंमतीनें तिने दुसरीकडे मान वळविली. वळवलेली मान पुन्हां वळवून त्या पसंतीवर शिक्का मोर्तब केला होता.

पहिल्याभेटीपासून तें आतापर्यंतचा सगळा दृश्यपट डोळ्यांपुढून सरकला. सरोजही त्याच भावविश्वांत गेली असावी.

" सरोज, " मी म्हणालो

" इकडे बघना "

" काय "

" समोरचा चंद्र बघना "

" बघतेच आहे "

" त्याचा मधुचंद्र कुठे झाला असेल ग ? "

" सांगू "

" हं "

" ढगाआड " अन् तिनें खालीं तोंड लपवले.

अलगद् शेजारी लवंडून मी लपवलेले तोंड वर केले अन् सरोजच्या ओठांवर ओठं टेकवले. नंतर बाहुपाशांत ओढली.

अधिक पुढचे बघायला नको म्हणून पेटलेल्या चंद्रानें शेजारच्या तारकेचा हात धरला अन् पाहता पाहता ढगाआड अदृश्य झाली दोघं...

* * *

**प्रयत्न**

**'आपल्यांची'**
**त्रिंगी....**
**बघली**
**तर**
**बघली**
**नाहींतर**
**फुकट**
**'रदबदली'!**

# — डायरींतील एक पान —

—अशोक सी. चिटणीस, बी. ए.

आज लवकर उठलो. अगदीं भल्या पहांटे. पहांटेला पहाण्यासाठीं तिनं आपल्याआधीं उठण्याऐवजीं आपण तिच्या आधीं उठण्यांत गंमत असते. Pleasure असतं...काल झोंपतानाच ठरवलं होतं कीं उद्यां लवकर उठायचं. आणि आज तसा उठलोहि...अंधारांतच आंघोळ केली. बाहेर पडलो...धुकं गार गार असतं. कवितेसारखं दिसतं...बाळच्या घराजवळ एक रातराणी आहे. ती अजून झोपली होती. रात्रींच्या आठवणींना कुरवाळत, दंवाला जोपासत आणि प्रकाशाला विवरत. मनांत आलं तिच्या हनवटीला हलवून म्हणावं, 'अग उठ, आज ३१ डिसेंबर. तुला ठाऊक नाहीं ? वर्षाचा सरता दिवस आज...' पण नाहीं जागवली. कदाचित् तिनं म्हटलं असतं, 'वेड्या, आज कठला वर्षाचा सरता दिवस ? माझं नवं वर्ष चैत्रानं सुरू होतं... ' आणि मग शेजारच्या निंबानं तिला अधिकच कुशींत घेतली असती... त्या कोंपऱ्यावरच्या अंब्याला काय वाटलं असेल ? त्याला हात लावावासा वाटतो मला. पण हात न लावतांच त्याचा खरखरीत स्पर्श मला हलवतो...तळ्यावर गेलो. तें बेटं नुकतं उठत होतं. जांभया देत होतं. मी म्हटलं आपण एकट्यानंच भोगायचा आज दिवस. अजून ह्या तळ्याची अंघुळहि झाली नाहीं...

उद्यां नवीन वर्ष उजाडेल. त्याचं स्वागतहि होईल. येणाऱ्याचं स्वागत करण्यांत खिलाडूपणा असेल पण जाणाऱ्याला निरोप देण्यांत वेदनेचं वरदान आहे... बरं झालं, त्या वीर प्रसवेनं वरदान विश्वासाठीं मागून घेतलं ! मला नेहमीं वाटतं, कुंती ही कवयित्री असली पाहिजे... ताई मला सूर्यवंशीं म्हणते. सूर्याशीं माझं जे नातं आहे तें उशीरा उठण्यामुळें नसून कुंतीमुळें आहे. तिच्या भावनाळू मनाशीं माझं रक्ताचं नातं आहे...सरत्या वर्षाला साजरं करतांना अश्रूंना कसा विसरूं ?... इसवीसनाच्या कवयित्रींतील आणखी एक पाऊल उद्यां पुढें पडेल... पायांच्या कैचींत सांपडणारी आपण माणसं ! शिंप्यांच्या कातरींतील कापड शिंप्याच्या मनाप्रमाणें आकारतं. इथं आपणच आपल्यास आकार द्यायला हवा. देतां येईल कां ? कां फक्त धुमसत राह्यचं ?...

दुपार छान गेली. थोडीशी झोंप घेतली. शनिवार असून दांडी मारली ऑफिसला... अभ्यास नाहीं करवला. नको वाटतो. नको वाटते परीक्षा. तीन तासांची ती कसरत जमणार नाहीं मला... ही पळवाट आहे कां असमर्थ कर्तृत्वाची ? असेलहि !... नको वाटला आजतरी अभ्यास हें खरं... कां नको ? करायला हवा !... समजतें मला. करायला हवा– इतरांसाठीं पु. ल. देशपांड्यांच्या आचार्यागत झालंय. प्रवाहात पडलोय. पलिकडच्या कांठाला प्रेत लागलं तरी चालेल पण अलिकडे नको यायला. काठ्यांनीं लोक ढोसतील आंत. आतां फेनपुष्पाची सोबतच होणार... कवितेकडे धावणारं मन आवरायला हवंय. फार दांडगट आहे तें. जिवावर येत त्याला म्हणतांना, 'अरे चल, उठ. किती वेडं व्हावं बरं माणसानं ?...' तसं फार गुणी आहे. उठतं जड मनानं. पण मीं तरी काय करूं ?...

रात्रींचे साडेअकरा वाजून गेलेत. सारेजण झोंपले आहेत. सारं शांत आहे. भिंतीवरचं घड्याळ तेवढं जागं आहे. त्याचे हात जाणाऱ्या दिवसाला कडकडून भेटतील थोड्याच वेळांत. त्याचा आक्रोश कुणाला कळेल ? तो लंबक फिरतोय... टक् टक् टक् टक्... वेदनेला लय असते कां ? आणि नाद ? कोण सांगेल ? सारे झोंपेंत आहेत. छोटी जयू झोंपेंत हसते आहे. नानांच्या घोरण्यानं सूर पकडलाय. आईचा दमा अद्याप विसांवल्यागत आहे... सारं सारं शांत आहे. शब्द संपत आलेत. आतां फक्त पाणावल्या डोळ्यांनीं बोलायचं... रुमाल काढून ठेवायला हवा. गाडी सुटल्यावर हलवायला. अंधारांत डोळे टिपायला... टक् टक् टक् टक्...

★★★

## नजरेचें रे होतां मीलन

नजरेचें रे होतां मीलन
सुटलें कोडें, अडलें भाषण ॥ धृ. ॥

शब्द लाजुनी मनांत लपले
अधरावरती भाव उमटले
तुला समजलें, मला उमजलें
आणि थांबलें रे संभाषण— १

नजरेची रे अद्भुत् किमया
त्यांत गवसली जीवन माया
तुजसाठीं मी झुरते राया
हार गुंफिला, मनात लाजुनी— २

जीवन कोडें माझें सुटलें
तुझें नि माझे जुळले
जीवनांतले श्रेय गवसले
दोन जिवांचें मंगल मीलन —३

—योगेश्वर अभ्यंकर

# कवि संमेलन

—: लेखक :—

**मंगेश तेंडुलकर**

**कोणत्याहि कविसंमेलनांतील कवी म्हणजे भावना प्रधान, अंतःकरण संभाळणारे, नितान्त हळुवार मनाचे आणि सिगरेटच्या धूम्रवलयांवर तरंगणारे, हलके-फुलके, नाजुक असतात. या कविसंमेलनाचं दृश्य स्वरुपहि असंच होतं—**

खरं म्हणजे कोणत्याहि कविसंमेलनाला मी स्वखुषीनें जात नाहीं. आमचा दोस्त—भट्या—तो फापलत नेतो मला. तेच ते चेहरे, त्याच त्या साड्या नि त्याच त्या वेण्या पाहून कालांतरानें कंटाळा येतो तसंच कांहीसं कविसम्मेलनाच्या बाबतीत होतं. तेच ते कवि, त्याच त्या कविता नि त्याच त्या वाहवा! तिरश्या नजरेचे बाण, भुंवयाचें धनुष्य, गालांवरले गुबगुबीत गुलाब, ओठांवरली रसरसीत डाळिंबं, वेण्यांच्या जहरी नागिणी यांत नाविन्य उरत नाही. दम राहत नाही. परवां मात्र भट्या मला घेवून गेला होता तें कविसंमेलन याहून वेगळ्या प्रकारचं होतं. त्यांत वीर, भक्ति, शृंगार, करुण हे असले रस नव्हते. अगदी निगरगट्ट रस होता. काय गंमतीदार नि भलभलतं ऐकायला मिळालं तेव्हां!

बाकी कोणतंहि कविसंमेलन म्हटलं कीं त्यांतले कवि म्हणजे भावना प्रधान, अंतःकरण सांभाळणारे, नितान्त हळुवार मनाचे आणि सिगरेटच्या धूम्रवलयांवर तरंगणारे, हलके फुलके, नाजुक असे असतात. या कविसंम्मेलनांतल्या कवींचं दृश्य स्वरूपहि— असंच होतं. प्रथम तर मलाहि कल्पना नव्हती कीं मी कांही वेगळं ऐकणार आहे. वेळ जावा म्हणून बसल्या बसल्या खुर्चीचा एक वर आलेला खिळा हातानें काढण्याचा प्रयत्न करत बसलों होतों. आजूबाजूला मोठा रसिकवर्ग जमला होता. कांही सुंदर रसिका तर खिडकींतहि बसल्या होत्या; इतकी गर्दी दाटली. सर्व कविजन नीटनेटके बसल्यावर अध्यक्ष महाराज उठले. रसिक शांत झाले. खुर्चीच्या खिळ्याशीं चाललेली झटापट मी तात्पुरती थांबवली. प्रास्ताविक भाषणानंतर आम्हां रसिकांचं सहकार्य त्यांनी मागितलं. आम्हीं तें देवून टाकलं; कारण नाहीतरी स्वस्थ बसायलाच आलों होतों आम्ही. कांही काळ मनोभावें चर्पटपंजरी करून अध्यक्षांनीं उपस्थित कवींना विनंति केली, कीं तुम्ही जी कविता म्हणून दाखवाल त्याआधीं ती कविता कां करावीशी वाटली तें सांगाल तर सारा कार्यक्रम रोचक असा होईल. (या ठिकाणीं चुकीच्या श्रवणामुळें विनोद वाटून एक रसिक सायकलीला पंप मारल्याप्रमाणें हसूं लागला. अध्यक्षांनी त्याला गप्प केलं.) पुन्हां एकदां रसिकवर्गानें शांतता राखणं हें किती महत्वाचं आहे हें एका सभेच्या संदर्भांत सांगतांना त्यांनी एक काव्य केलं म्हणाले—
" कुठलीशी होती— उऽऊ " (ही घसासफाई)

" —कुठलीशी होती सभा—
तिथें भरलेली.
वादग्रस्त तो विषय—
—अन् रंग अती येई
जाहली खणाखणि खूप—
—सभा आटपली.
अन् चुकल्या चुकल्यापरी—
—सर्वां जाणवलें;
अध्यक्ष नि वक्ता—
—बोलायाचे उरले!"

—तेव्हां असं आजच्या या मंगल कविसंमेलनाचें होऊं नये ही आमच्या चरणीं विनंति करून अध्यक्षमहाराज खालीं बसले.

नंबर एकचे कवि उठले. कमीतकमी पंधरा दिवसांत आंघोळ नसावी. नेहरूशर्ट, पायजमा हा एकूण वेष. त्या कपड्यांत कवी आहे नी पुन्हां अंतःकरण सामावलेलं आहे हें अशक्य वाटण्याइतकीं शिडशिडीत अंगकाठी. पिंजारलेले केस. विस्फारलेले डोळे, त्यांवर जाडजूड चष्मा (जो लावल्यावर एकाद्याला दिवसाउजेडी शनिमंगळ दिसावेत) आणि हनुवटीच्या खोऱ्यांतून शेव पाडल्यासारखी तुरळक नी लांबलचक दाढी. हे कवि अध्यक्षमहाराजां शेजारी येऊन उभे राहले. (त्याबरोबर शीख आणि बोकड यांच्या प्रसिद्ध गोष्टीप्रमाणें कांहीतरी घडणार असं वाटलं; पण अध्यक्ष त्या गोष्टींतल्या बोकडाहून खूपच सहनशील निघाले!) एक अर्धं मिनिट हाताची घडी करून स्तब्ध उभे राह्यले. मग तंद्री लागली. कविराज हळूंहळूं बोलूं लागले. आवाज साधारणपणें पंकज मलिक आणि काकाकुवा यांच्या आवाजाच्या समभाग मिश्रणासारखा होता. " मित्रहो, माझी कविता गंभीर आहे. सोसाट्याच्या वावटळींत आकाशांतला पक्षी जसा जागच्याजागीं थबकतो तसंच मनुष्याच्या आयुष्यांत होतं. भांबावतो, गोंधळतो तो. कांहीं सुचत नाही त्याला. माझी कविता अशाच परिस्थितींत केलेली आहे.

कवितेचं नांव : हॅत्तेचा! राग : मालवणी ठुंबरी (नाकांतली)

किर्तिकांची तर झाली लग्नें
आण्णा होतिल दो महिन्यांनी!

कितीक गेले ग्रामोद्धारा–
–'ब्रह्मचर्य हें जीवन'–गर्जुनि !
आड नि विहिरी हौद चाळण्या–
–भ्रष्टुनि झाले हुतात्मे किती.
कोणा सुचला मार्ग सौभ्यसा–
झुरुनी झुरुनी बनले हत्ती !
कोणी घेती बोरू हातीं–
'तत्वज्ञ' कुणी, कोणी 'कविवर',
मॅड होवुनि फिरती कोणी,
( ब्चावलेले झाले मास्तरं ! )
फॅसीझम् अन् कम्युनिझम्चे
कुणी बसले तोडित लचके;
रोगटलेले यांतलेच कुणी–
बुडवित फिरती नियतकालिकें !
बरोबरीचे, त्यांची ही स्थिती
मीच अेकटा हो कुंठितमति
प्रिया आमुची सर्वजणांची
कधींच मरुनी गेली वरती ! ! ''

टाळ्यांच्या कडकडाटांत हे अजब कवि आपल्या जागेवर जाऊन बसले. हें कांहींतरी नवीनच आहे म्हणून मीहि नव्या उत्साहानें अैकूं लागलों. प्रेम प्रकरणांतल्या प्रतिस्पर्ध्यांची ही दाणादाण उडाली पण हा बहाद्दर आहे तिथें मि आहे तरच आहे. शाबास ! मी पण टाळ्या वाजलल्या.

नंबर दोनच्या होत्या क–व–यि–त्रि. उगाचच वाटेल तिला सुंदर म्हणणं बरोबर नाहीं. त्या कांहीं सौंदर्याच्या भारतीय व्याख्येत बसत नव्हता. हिंगाच्या खड्याप्रमाणें चेहरा, नि पंचिंग मशिनसारखी जिवणी होती त्यांची. तशा कांहीं फार वाअीट नव्हत्या. पण पातेली उतरायच्या साणशीसारख्या उभ्या होत्या त्या. हातरूमालाला गांठी मारीत आणि सोडवीत बोलत होत्या. आवाज मात्र मंजुळ होता. " रसिकांच्या सेवेला मी आतांच रचलेली कविता सादर करीत आहे. कविता चावलेल्या मुंगीस उद्देशून आहे " ( रसिकांना उद्देशून नाहीं; कारण उघड आहे ! ) मी भत्याकडे पाह्यलं. मधांशींच मेलेल्या प्रेयशीची आठवण काढूल ढळढळा रडत होता कीं हंसत होता कुणास ठाऊक. मीहि त्याचा हृदयभंग केला नाहीं. दरम्यान त्या कवयित्री तरंगायला लागल्या—

" हे हाय हाय गे मुंगे–
–कां चावलीस मज वेगें ?–(१)
मज नव्हतें माहित कांहीं
आलीस माजिया चरणीं
मीं असतां तल्लीन कवनीं
चावलीस तूं कडकडुनि
मज कळती सारी सोंगें
कां चावतीस मज वेगें ?–(२)
अहिंसा परमोधर्म ।
देवाची मुंगी तूं ना ?
नच मारणार मी तुजला
त्या मेजा खालुन आतां
तूं इकडे येई मुंगे
कां चावलीस मज वेगें ?–(३)
हत्तीस मारिते मुंगी
सापाला खाते मुंगी
कोल्ह्यास डसते मुंगी
कवयित्रिस छळते मुंगी
कवयित्री कधीं नच चिडते
कां चावलीस मज वेगें ?–(४)
हें काव्य तुझ्यावर केलें
ये ये गे मुंगे ये ये
तुज आळवुनी मी रुसले
तुज बोलवुनी मी थकले
जा !–मर–जा मेल्ये तिकडे
कां चावलीस मज वेगें ?–(५) "

इतक्या प्रामाणिकपणानें आपला स्वभाव काव्यांत जगांतल्या कुठल्याच कवयित्रीनें व्यक्त केला नसेल. कविता भन्नाट होती असं एका रसिकाचं मत ऐकूं आलं. आणि ती कविता तशी होती यांतहि शंका नाहीं ! अशाच प्रकारची कविता खुर्चीच्या न उचकटणाऱ्या खिळयावर करतां येईल कीं काय याचा मी क्षणभर विचार केला. टाळयांच्या गजरांत याहि कवयित्री खालीं बसल्या.


SHREE GANESH TEXTILES

Mfg. of Handloom Sarees

205 Ganesh Peth,

Poona 2

तिसऱ्या नंबरचे कवि किंचित् कवि होते. तसा संशय मला आधींपासून होता. जमिनीवर साडेतीन फूट उंची. दीड वीत रुंदी– अशी बसकट मूर्ति होती ती. बसलेल्या अध्यक्ष-महाराजांचा माथा नि उभ्या असलेल्या कवींचा माथा एकाच लेव्हलवर होता. नमस्कार करून त्यांनीं चष्मा काढून ठेवला. काव्य हें किंचित् कां असावं लागतं याचं होमिओपाथिक कारण सांगितलं. ते म्हणाले "होमिओपाथींत डोसावारी औषधं देत नाहींत. अपाय होतो त्यानें. होमिओपाथी औषधाचा किंचित् भाग शर्करावगुंठित करून देते. अशा रीतीनें रोग्यांत झालेली सुधारणा अर्थात् कायम स्वरूपाची असते. तसंच किंचित् काव्याचं आहे. Spontenious overflow of Powerful Feeling मध्यें ब्रह्मपुत्रेला पूर आल्याप्रमाणें गांवच्या गांवं वाहून जातात. किंचित् काव्यांत आम्ही भावनेचा एक कण घेतो. त्याला शब्दावगुंठित करतो आणि हळुंच रसिकांच्या अंतःकरणांत सोडून देतो. अशा कणाकणानें झालेला भावनाविष्कार कायम स्वरूपाचा असतो. या किंचित् काव्याच्या होमिओपाथीला आम्ही काव्यमय भाषेत 'रोमिओपाथी' म्हणतो. आम्ही किंचित् कवि सगळे 'रोमिओपाथिक' आहोंत. असो. आज माझ्या रसिकांसाठीं मी एकदोन खास कविता आणल्या आहेत. किंचित्काव्य तयार करायला कारणहि किंचित् पुरतं. उदाहरणार्थ पहा– निव्वळ आकाशांतल्या विमानाकडे पाहून हे काव्य सुचलं–

आकाशांत विमान पाहून

कोणाला–
आश्चर्य वाटतं;
कारण
तें प्रचंड वेगानें जातं;
तर कुणाला–
नवल वाटतं;
कारण
तें हवेंत तरंगतं;
मला मात्र वाटतो–
जिव्हाळा;
कारण–
त्यात एक–
सुंदर 'एअर-होस्टेल' असते!"

"कुणाचं लक्ष कुठं असतं बघा!" – आमच्यामागले एक वृद्ध गृहस्थ पुटपुटले, त्यामुळें हास्याची स्थानिक लाट उसळली नि विरून गेली.

"आतां दुसरं काव्य पहा. मागल्या काव्यांत जिव्हाळा व्यक्त झाला आहे. या काव्यांत काय व्यक्त झालयं तें तुम्हींच पाहा. सोपे शब्द, सोपी वाक्यं ही आमची कला. ऐका—

नाजुकसा बांधा
डौलदार चालणें
लाजणें मुरकणें
अन् ओठांतुन हसणें,
वळुन पाहणें,
रुसणें चिडणें
-छे!–धुंद-धुंद सर्व, रसिका;
परि काय करावें–
–अहह!– _
मंगलसूत्रां!"

"–अरेच्या!" रसिकवर्गातून आलेला त्याच सुरांतला प्रतिध्वनी मागोमाग हास्याचा नि टाळ्यांचा एकत्र गजर ऐकूं ऐतांच किंचित कवींनी किंचित नमस्कार केला, किंचित् हास्य आणलं नि आपल्या खुर्चीजवळ जाऊन किंचित् बसले. हास्यलाटा विरून गेल्यावर सर्व रसिकांचे एका मिस्किलमूर्ति वृद्धकवीकडे लक्ष वेधलें. डोक्यावर काळी टोपी, पावशेरी मिशा, खांद्यावर चवाळीचा पंचा, नेहरूशर्ट आणि गुढग्यापर्यंत धोतर असं त्यांचं स्वरूप. शर्टाची वरली गुंडी लावत त्यांनी सुरुवात केली. " मंडळी, माझ्या कवितेचं नांव– 'नटीची वाङ्मयसेवा.' नुकतीच माझेकडे एक फिल्मी नटी आली होती. म्हणाली 'मास्तर, मला वाङ्मयीन करिअर डेव्हलप करायची आहे.' आतां बघा,- जिला बाराखड्या घड काढतां येत नाहींत तिची वाङ्मयीन करिअर डेव्हलप करायची म्हणजे केवढा वात आहे? 'प्रकरण माझ्या आवाक्याबाहेरचे आहे' असें नमूद करतांच मोठ्या फणकाऱ्यानें तणतणत कीं हो निघून गेली! मला मोठी गंमत वाटली. नि मी हें काव्य केलं. नीट श्रवण करा.

हंऽऽ [ हे सूर लावणं ]
तारुण्याच्या प्रवेशद्वारीं तळमळ प्रेमाची,

V. K. Automobiles
Automobiles Dealers & Repairers
Near S. P. College, Post Office,
Tilak Road, Poona 2.
Also
Agents For Jawa Motor-Cycles
Sholapur & Osmanabad
District.

तद्वत होतां प्रसिद्ध, उकळी वङ्मयसेवेची,
नैसर्गिक या दोन्ही गोष्टी पूर्ण बरें रसिका,
नटीस सुचली वाङ्मयसेवा खरोखरी एका!
'लिहिन लघुकथा लिहिन नाटकें आणिन छापुनियां,
नुसत्या? – छे छे! फोटोसह तर आकर्षक हंसऱ्या
करुनि प्रतिज्ञा धरूनी वेठिस 'तात्पुरत्या' पतिला
(कुणास ठाऊक होता कितवा?) थाट सर्व केला.
सौगंधें मधु दरवळणारी छानसान खोली
नंदनवनींहि नसेलसा एकान्त भोवतालीं.
सोयहि केली आल्हादक त्या सौम्य प्रकाशाची
लेखनसाहित्याची स्फूर्तीस्तव अन् मद्याची!
कांहीं डझन पुस्तकें मराठी, तशीच परदेशी
आसपास पसरून ठेविली उत्साहासाठीं
रिस्टवॉच सामोरें ठेवुन हांकलुनी पतिला
हातीं घेऊन पेन बैसल्या 'देवी' लिहिण्याला!
होतां मन अेकाग्र, प्रश्न तो काय लिहायचें?
पुस्तकांत मद्याच्या चषकीं उत्तर ना याचें!
तास जाहला कागद कोरा केव्हढी चिकाटी!
दोन तास, तिसराहि उलटला पेन तसें हातीं
आणि करुणा स्फूर्तिसेवेला घेअी ती धांव–
मुद्राभिनयी गुंग नटी ती ओठी जवळीं तांव.
उत्सुक झरणींतुनी उडाली अक्षरें नि कांहीं–
नटी प्रसवली वाङ्मय! रसिका, पाही रे पाही!
अहा! छान ती सही खालती वाङ्मय दिव्य वरी–
" मट त्वचेस्तव लक्स सोप वापरते नेमें मीं!!" –

रसिकांनी हॉल डोक्यावर घेतला. वृद्ध कवींनीं या सन्मानार्थ कोपरापासून नमस्कार केला आणि आपल्या जागेवर ते जाऊन स्वस्थ बसले. या कवींनीं बाकी खरी मजा आणली! आतां राहतां राहले अेक नवकवि. बुल्गानिन दाढी हा यांचा ट्रेडमार्ग या नवकवींच्याकडे पाहल्यावर वाटायला लागतं कीं मराठी भाषाच काय पण चांगले रेल्वेचे रूळसुद्धां वांकवतां येत असावेत यांना. आत्तांचीच गोष्ट पहा. हॉलमधें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं या नवकवींनीं टेबलावर जी बुक्की मारली, त्याची नोंद सांताक्रूझच्या वेधशाळेंत झाली आवाजामुळें दचकून आम्ही चूप झालों. नवकवी आढ्याच्या तुळईकडे पाहत बोलूं लागले. " जमलेल्या रसिकांना माझा नमस्कार असो मी एक नवकवी आहे. नवकाव्याला कारणच असत नाहीं. कारण तें कांहीं कारण मीमांसक अणुविज्ञान नव्हे. मनांत आलं एवढं–म्हटलं तर कारण–पुरेसं आहे. आमचं लक्ष काव्य आणि कारण यापेक्षां काव्यार्थाकडे जास्त असतं. माझ्या कवितेचं नांव "दुर्दैव" ऐका"

वैशाखांतिल धुंद पौर्णिमा
मडमड सुंदर नाजुक कोमल ..
गटागटा पेट्रोल पितो.. साळ्यांचा ट्रॅक्टर!
अप्सरेच्या पायांना बांधले मस्त कडव्याचे घुंगुरु
खंत करतो! – मरतो लेकाचा...करकोचा पिंपळाच्या ढोलींत.
टप्पू मारली त्याला!
कांद्यांची टोपली...दोडक्यांची पातेली
फुटाण्यांची घमेली...अन् देशपांड्यांची विमली...
पोत्यांत बांधून... ...फेकून दिली समुद्रांत!
आणि मग... टिटवीच्या कानांत
हळूंच जातो... सावणबार...
चहाड्या करतो... चेष्टा करतो... हंसतो... हंसत बसतो..."

असं बोलत बोलत कवी आपल्या खुर्चीकडे जाऊन खालीं बसले. क्षणभर काय झालं त्याचा आम्हांला पत्ता लागेना. अभावितपणें कांहीं रसिकांनीं टाळ्या दिल्या त्याची पिटपिट ऐकूं आली. हें नवकाव्य समजायला अवघड असतं असं ऐकलोय. त्या कविता करणारेहि असामान्य आणि समजणारेहि असामान्य. आमचा आपला सामान्य रसिकांचा बाजार! तरीपण देशपांड्यांच्या विमलीला पोत्यांत बांधून समुद्रांत फेकून दिली तेव्हां खूपच मौज वाटली आम्हांला (इतकं समजलं हेहि काय कमी आहे?)

शेवटीं अध्यक्षांचं समारोपाचं भाषण झालं. काव्य ही आपली परंपरा आहे. किंचित् काव्याला आपण कांहीं नवीन नाहीं. " दसरा उजाडला... मोरूचा बाप मोरूला म्हणाला..." ही एक प्रकारची किंचित् कविताच. ही परंपरा अशीच चालू ठेवली पाहिजे. नंतर प्रत्येक कवीचे गुणधर्म सांगून ते मोठ्या आवेशांत म्हणाले..." आपण सर्वांनी कविता जन्माला आणली पाहिजे. आपण सर्वांनी कविता जगवली पाहिजे आणि आपण सर्वांनी या कवितेंत मेलं पाहिजे उडी टाकून..." या ठिकाणीं फक्त कवींनी टाळ्या वाजवल्या. शेवटीं आभार प्रदर्शन होऊन सम्मेलन संपलं.

घरीं आलों तेव्हां ती काव्यमाता मुंगी माझ्या शर्टावर मला सांपडली. अेका काडेपेटींत मी तिचं यथायोग्य पालन केलं आहे. जेव्हां भल्या आणखी कुठल्यातरी कविसंमेलनाला मला फरपटत नेईल तेव्हां तिथं उपस्थित असलेल्या अेकाद्या कवयित्रीच्या वेणींत ती सोडून द्यायचा विचार आहे. न जाणों; ही मुंगी आणखीहि अेकाद्या 'भन्नाट' काव्याला जन्म देईल!

* * *

**Ebrahim Molekhan & Bros.**
**Buildings Contractors**
9th Cross Lane, House No. 10
Falkland Road, Bombay.
**For**
**Every Type of Building Constructions**
**With Centrings & Labours.**

0529

# पळपुट्या प्रोफेसरची ‘ प्रेमकथा ’

लेखक

**मनोहर ग. जोशी,**

एम्. ए.

**बा**ई !

बाई म्हटलें कीं बंड्या पाघळायचाच ! बाईच्या बाबतींत बंड्या सज्जन होता. बाईटाकडे दुर्लक्ष करून चांगल्याचे कौतुक करण्याची त्याची वृत्ती होती. मुलगी काळी असेल तर बंड्या म्हणायचा ‘ अरे कृष्णाचा वर्ण सावळाच नव्हता काय ? ’ जर मुलीच्या तोंडावर देवी असतील तर तो तें शुभलक्षण समजायचा आणि गांवांत गंगा आल्याच्या थाटांत म्हणायचा, ‘ पवित्र देवींचं मुखकमलावर आरूढ होणं कमलाची शोभाच नाहीं कां वाढवीत ? जर मुलीचे दांत पुढें आले असतील तर तो म्हणायचा, ‘ काय निसर्गाची देणगी आहे बघा या बाईला. केव्हांहि पहा, सदा हंसतमुख वाटते. ’ हाच बंड्या पंधरासोळा वर्षांचा असतांना ‘ बाई ’ या शब्दालासुद्धां घाबरत असे. ‘ बाबा ’ मधला “ बा ” आणि ‘ आई ’ मधली “ ई ” ज्या वस्तूंत एकत्र आली आहेत त्या वस्तूकडे नुसती नजर वर करून पहायची देखील त्याची छाती होत नसे. परंतु ओठांवर काळसर लाईन येऊं लागली आणि बंड्याच्या मनांत बाईविषयीं काळंबरं येऊं लागलं आणि लाईन शब्दाचा ‘ इन्नर मीनिंग ’ समजूं लागला. पण बंड्याच्या सुखोपभोगी जीवनाच्या बोगद्यावरच ईश्वरानें एक भला मोठा धोंडा ठेवला होता. हा धोंडा म्हणजे त्याचे आजोबा. पोलिसाच्या पवित्र नोकरींतून ते गतवर्षींच सेवानिवृत्त झाले होते. पण नोकरी सुटली तरी त्यांच्या संवयी सुटल्या नव्हत्या. पाळत ठेवण्याची त्यांची संवय त्यांनीं बंड्यावर भागवली] होती. म्हणूनच गॅलरींत बसून रस्त्यावरची पांखरें न्याहाळणाऱ्या बंड्याचा कान त्यांनीं अचूक पकडला. शेजारच्या सुमीकडे बघून त्यांनी जेव्हां खोकला आणला तेव्हां त्याच्या दोन कानशिलांची चार केली आणि जेव्हां त्यांनीं बंड्यांला जिन्यावर एका मुलीशी बोलतांना पाहिलें तेव्हां त्याला खोलीवर आणून तीन तास आपल्या मोडक्या बंदुकीसमोर उभे केलें होते ! बंड्यानें भगवान मारूतीला तीन पोरीं देण्याचा नवस केला होता. तरीपण हा टुणटुणीत म्हातारा मरण्याचे कोणतेच लक्षण दिसत नव्हतें.

बंडोपंत ज्या चाळींत रहात होते ती एक मजली जुनी चाळ होती. तिचा आकार घोड्याला मारावयाच्या नालीसारखा होता. त्यामुळें अनेक खोल्या समोरासमोर येत. बंड्याची खोली कॉर्नरला होती. खोली नंबर चाळीस आणि या खोलीच्या समोरच्या कॉर्नर रूमचा नंबर होता एक. एक आणि चाळीस नंबरच्या खोल्या एकमेकींना अंतर्बाह्य फार जवळून पहात असत. विधात्यानें एक मोठी गंमत केली होती. ज्यावेळीं त्यानें बंड्याला जन्माला घातलें त्याच वेळीं त्यानें दोन वर्षांनीं एक नंबरमध्यें बेबीचा पाळणा हलविला. ( अर्थात् विधाता ही गंमत अनेक समोरासमोरच्या खोल्यांत करीत असल्यानें कांहींना ही शिळी कढी वाटेल.) बेबी झबल्यांतून फ्रॉकमध्यें आली. नंतर फ्रॉकमधून परकर पोलक्यांत आली आणि यथावकाश तिंन साडी परिधान केली. आणि या गोलपातळाबरोबरच तिच्या म्हाताऱ्या आजींनीं तिला अनेक बंधनें गुरफटली. आई लहानपणीच गेल्यानें बेबीकडे आजीच मुखत्यार होती. आपल्या भरभरत्या मुठींत नातीनें रहावें म्हणून म्हातारी अटोकाट प्रयत्न करीत होती. म्हातारीच्या शिस्तीच्या उन्हाळ्यांत बेबीची वेल फुलणें जरा कठीणच होते. आजकाल रंगपंचमीसारखे खेळ मागें पडल्यानें थोडासा रंग उडवून जिजाबाई होणें बेबीला शक्य नव्हतें. बेबी आपल्या तुळशीला पाणी घालायचा प्रयोग करतांना हळूंच बंड्याच्या झाडांना पाणी घालीत होती आणि बंड्यादेखील आपल्या झाडांना पाणी घालतांना झारी हळूच एक नंबरच्या खोलीकडे वळवीत होता. यामुळें झालें काय, तर दोघांकडचीं झाडें चांगलींच फोंफावलीं. पण प्रेमाला पालवी फुटण्याचें लक्षण कांहीं दिसेना. आजोबांच्या करड्या नजरेला आणि आजीच्या लबाड घाऱ्या डोळ्यानां चुकवून प्रेम आपले डोळे कसे उघडणार ? पण एका संध्याकाळीं कथा नकाला वेग आणण्यासारखी घटना घडली.

याच चाळींतील वीस नंबरच्या खोलींत एक प्राध्यापक रहायला आला. वय पंचावन्न वर्षें. नुकताच पेन्शनींत गेलेला. पांच हजार रुपये पागडी भरून त्यानें ही जागा घेतली होती. नांव होतें प्रा. पंचायती. पंचायतींना आपल्या आजपर्यंतच्या ‘ त्याच त्या अन् त्याच त्या ’ आयुष्याचा वैताग झाला होता. सतत एकाच प्रकारचे डोस विद्यार्थ्यांना पाजून ते वैतागले होते. आपल्या जीवनांत नवरस आणण्याचा निश्चय करूनच त्यांनीं या चाळींत प्रवेश केला होता त्यांनीं आजपर्यंत बरेच वाचले होते. आणि वाचलेल्यावर लिहीलें होते परंतु आपलें स्वतःचें ‘ ओरिजिनल ’ असें कांहींच नव्हतें याचें त्यांना वाईट वाटत होते. त्यांचे कुटुंबदेखील सोशलवर्कसमध्यें इंटरेस्टेड होते· आणि त्यामुळें दिवसभर सोसायटींतच असे. प्रा. पंचायतींनीं प्रथम सहा महिनें

प्रतिभा कशी मिळवावी याचा दणक्यांत अभ्यास केला. लेखनाचें तंत्र मंत्र घोकून घोकून पाठ केले. नवोदित लेखकांप्रमाणें दाढी वाढविली, मूडि राहूं लागले, कृत्रिम हसूं लागले किंबहुना, नवीन लेखकानें करावेत ते सर्व थेर त्यांनीं केले. आणि ते मग लिहावयास बसले परंतु थोड्याच वेळांत त्यांना कळले कीं, लिहिलेल्यावर लिहिण्या- इतकें स्वतंत्र लिहिणें सोपें नाहीं. पण इतक्यांत त्यांना आठवले कीं, प्रतिभेसाठीं अनुभूति आवश्यक असते. मग प्रा. पंचायती सकाळीं सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत गांवभर फिरूं लागले तर कांहीं वेळां सूर्यास्ता पासून ते सूर्योदयापर्यंत घराबाहेर राहूं लागले. पण त्यांना कथेला विषय मिळाला नाहीं. गाडींत गेले, गाडीला अपघात नाहीं, जुहुला गेले तर प्रेम–लफडें नाहीं, झोंपड्यांत गेले तर गरिबी नाहीं, उलट एक रात्र हे अनुभूतिसाठीं वेश्यागारांत गेले असतां ते चाळींतील कांहीं टारगट पोरांनीं पाहिले आणि या प्रा. पंचायतींना जन्मभर अद्दल घडेल अशा तऱ्हेनें आवळ्याचा भोपळा करून ती हकीगत चाळींत सर्वांना ( मिसेस् पंचायती धरून ) सांगितली. आणि प्रोफेसरांनीं आपल्या विस्तीर्ण टक्कलावर हात मारून घेतला. परंतु दुसऱ्या दिवशीं सूर्योदयाच्या वेळीं बंड्या–बेबींना झाडांना पाणी घालतांना प्रा. पंचायतींनीं पाहिले आणि त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला.

त्याच दिवशीं त्यांनीं बंड्याला तो बाहेर पडत असतांना गांठले.

' आपलं नांव बंडोपंत बडबले कां ? ' पंचायती. ' हो कां ? ' बंड्याचा प्रश्न.

' नाहीं, म्हटलं काय मस्त अनुप्रास...' झटकन् पंचायतींनीं सांवरले व ते म्हणाले, ' कां कुठं बाहेर निघाला होतात वाटतं ? '

' छेः छेः उगाच आपलं जरा. पण आपलं कांहीं काम होतं कां ? ' बंड्यानें आपल्या शर्टच्या गुंड्या बंद करीत विचारले. आपल्या चाळींत आपल्याविषयीं आदरानें बोलणारी व्यक्ति बंड्याला प्रथमच भेटत होती. ' मग आपण फिरायला जाऊं या का ? ' प्रा. पंचायतींनीं मिळमिळितपणें विचारलें. आणि बंड्या चार पायऱ्या धडधड खालीं उतरला ज्या प्रश्नाची बंड्या बेबीकडून अपेक्षा करीत होता तो प्रश्न एका जख्खड म्हाताऱ्यानें विचारावा न ! बंड्या चांगलाच उखडला परंतु कॉलेजांत परीक्षा पास करायला पुढं मागं हा म्हातारा उपयोगी पडेल या दूरदर्शी विचारानें एक विनयाची नेभळट ॲक्शन करीत म्हणाला,

' हो जाऊं या की, '

हवा पाण्याच्या थोड्याशा गप्पा मारल्यावर प्रा. पंचायतींनी मुद्द्याला हात घातला. हातांतली वाकडी काठी बोटाप्रमाणें हलवीत ते म्हणाले,

' कांऽऽहीं राम राहिलेला नाहीं आजच्या तरुणांत. नाहीं कांहो बंडोपंत ? '

बंड्या नुसतं लोचट हंसला.

पंचायती पुढें म्हणाले, ' अहो, आमच्याकाळीं मिशीच्या आधीं पोरी येत आमच्याकडे आणि म्हशीप्रमाणें पोरी वळवत असूं आम्हीं. '

बंड्या कोरडा हंसला या इनोदावर. पण पंचायतींचा पुढचा प्रश्न ऐकून आणि त्यांची उभे राहण्याची ढब बघून बंड्या मटकन् खालीं बसला.

एक हात कमरेवर आणि दुसरा हात बंड्याच्या गळ्यावर ठेवून पंचायती विचारत होते– ' तुम्हीं का हो नाहीं प्रेम जमवीत बंडोपंत ? ' आणि त्यांचं पुढचं वाक्य ऐकून तर बंड्या ठार झाला

' आपल्या चाळींतली बेबी फार फंडा आहे नाहीं कां हो बंडोपंत ? '

प्रा. पंचायतींनीं उपरण्यांनीं हळूं हळूं वारा घातल्यामुळें बंड्या शुद्धीवर आला. त्याला वाटलें, कीं म्हाताऱ्याला नक्की म्हातारचळ लागला असावा. आतां येथें थांबण्यांत अर्थ नाहीं. तो उठला आणि जाऊं लागला. पंचायती त्याच्या मागून जाऊं लागले. त्याला समजावून सांगू लागले. परंतु तो घाईघाईनें जाऊं लागला. तेव्हां त्यांनीं त्याच्या कमरेला विळखा घातला. त्याला बसविले आणि आपली महत्त्वाकांक्षा कशी फोल होत आहे ते त्याला समजावून सांगितले आणि शेवटीं अत्यंत आर्जवून कळवळ्यानें ते म्हणाले; ' बंडोपंता ! तुम्हीं करा ना बेबीवर प्रेम. तुम्हीं असें न कराल तर माझ्या कथेला विषय कसा मिळेल ? माझी ध्येयपूर्ति कशी होईल ? आणि तुमचे तरी प्रेमवृक्ष कसे वाढतील ? '

बंड्यानें अजोबांची धोंड मध्यें असल्याचे सांगितले तेव्हां प्रा. पंचायतीनी बंड्याच्या कानांत एक नामी युक्ति सांगितली.

हल्ली बंड्या बेबींना रोज एकमेकांचा एक तास सहवास मिळूं लागला. ते दोघेहि सकाळीं आठ ते नऊ प्रा. पंचायती यांच्याकडे शिकवणीला जात असत. परंतु या एक तासापेक्षां देखील त्या दोघांना अधिक सहवास देण्याचा प्रयत्न प्रा. पंचायती करीत असत. बेबी स्नान करायला बाथरूममध्यें गेली असेल तर ते आपला नंबर विद्यार्थ्याला हौशीनें देत. त्या दोघांच्या अपॉइन्टमेन्टस् स्वतः ठरवून देत. त्या दोघांना बरोबर नाटक सिनेमाला जाण्याचा योगहि ते घडवून आणीत. परंतु आजी-अजोबांच्या महा-भितीनें या युगुलांची शरीरें जवळ आली तरी मनें मात्र भितीनें घरींच रहात आणि त्यांच्या मनाचे मीलन न झाल्यामुळें प्रा. पंचायतींचे कथानक पुरे होईना आणि एका रविवारी जर त्यांनीं एक नेटाचा प्रयत्न केला नसता तर हे कथानक कधींच पुरें झाले नसते.

एका रविवारी त्यांनीं बेबी बंड्याला शिकवणीला बसल्यावर मंगलाष्टकांचा अर्थ सांगण्याला सुरवात केली. दोन्ही विद्यार्थी अगदीं लक्षपूर्वक ऐकत होते. हळूंहळूं फेऱ्या मारतांना त्यांच्या नकळत प्रा. पंचायतींनीं दार व खिडकी बंद करून घेतली. पुन्हा मंगलाष्टकाचा अर्थ झाल्याबरोबर मात्र त्यांनीं कमाल केली. समोरच्या खुंटीला बांधलेलं उपरण्याचं दुसरं टोक त्यांनीं बेबी–बंड्याच्यामध्यें पकडलं आणि ते म्हणाले—

' शुभमंगलऽऽसावधान. '

—आणि त्याचवेळीं दारावर आणि खिडकीवर एकदम ठोठावल्याचा आवाज आला. बंड्यानें घाईघाईनें पुढें होऊन दार उघडले आणि पहातो तर–

हातांत मोडकी बंदूक घेऊन त्याचे आजोबा उभे होते. त्यांच्यामागें बेबीची घारी आजी लाटणं घेऊन उभी होती आणि त्यांच्यामागें अखिल चाळ विविध आयुध हातीं घेऊन उभी होती.

म्हाताऱ्या पंचायतीनी हे पाहिलं मात्र आणि खिडकींतून बाहेर पडून जोरानें धावायला सुरुवात केली आणि त्यांच्यामागून ही सर्व रूखवत धावत गेली.

आणि सर्व चाळ रिकामी झाल्यावर बंड्या-बेबी काम करीत होती हे प्रस्तुत लेखक सांगू इच्छित नाहीं. परंतु त्यानं ऐकलेल्या आणि वाचलेल्या दोन गोष्टी तो सांगणार आहे.

दुसऱ्या दिवशीं ' बेबी-आजी ' समोरच्या ' बंड्या-आजोबा'ना सांगत होती.

' बरं झालं आपण धीर धरला ते. पोरांना प्रेमाबरोबरच रहायला खोलीही मिळाली.

—आणि प्रस्तुत लेखकांनीं वाचलेली बातमी अशी.

प्रा. पंचायतींच्या संपूर्ण स्वतंत्र कथेला पांचशे रुपयांचे पारितोषिक. कथेचे नांव ' पळपुट्या प्रोफेसरची प्रेमकथा '

★ ★ ★

# KABBUR

for

For Cotton, Silk, Art Silk, Wool, Jute, Paper, Leather, Soap, Wax, Coir, Varnishes, Oil Plastics, Typewriter Ribbons, Carbon Papers, and Boot Polishes.

SIZING AND FINISHING PRODUCTS

# DYES

INTERMEDIATES
CHEMICALS
AND
PIGMENTS

★

## S. K. KABBUR PRIVATE LTD.

3, BASTION ROAD, BOMBAY 1.

Telegram 'DIAZO' BOMBAY

Telephone No. 261627

*Correspondents in England,*

## KABBUR & CO., LTD.

RADHA HOUSE
HIGHER ARDWICK, MANCHESTER 12

Telegram : "RADHA MANCHESTER"

# ‘बालांचे विश्व’

— संयोजिका —

कु. शैलजा कुलकर्णी

बाल-मित्रांनों,

**नमस्ते !**

हा ऑगस्ट महिना ! तुम्हां सर्वांचे चेहऱ्यावरून एक अमाप उत्साह ओसंडत आहे. सृष्टीदेवीहि हिरवे वस्त्र नेसून खदखदून हंसते आहे.

इतर सर्व महिन्यांत ‘ऑगस्ट’ महिना अत्यंत पवित्र मास समजला जातो. कारण या महिन्याची १५ तारीख सारा भारत वर्ष ‘स्वातंत्र्यदिन’ म्हणून साजरा करतो.

पृथ्वीच्या पाठीवर अनेक राष्ट्रें आहेत. भारतहि असंच एक राष्ट्र आहे.

या आपल्या देशावर निसर्गाचा वरदहस्त आहे.

या भारताच्या उत्तरेला हिमालय आहे. देशाच्या संरक्षणासाठीं निसर्गाने बनविलेली तटबंदीच !

भारतांत गंगा—यमुना नद्या वाहतात कीं ज्यांच्या कृपेमुळें भारत देश अधिक सुपिक बनला.

या भारताच्या भूमिंत नाना जातीची पिकं व वृक्ष भूमीतून डोकं वर काढतात.

निसर्गाप्रमाणंच या देशांतील माणसांमध्यें विविधता आढळते. नाना रंगाचे—वर्णाचे अन् धर्माचे लोक इथं रहातात.

उत्तरेच्या हिमालयापासून दक्षिणेच्या कन्याकुमारीपर्यंत भारतानं आपले हात पाय पसरले आहेत.

अशा या आपल्या भारताला पूर्वी ‘सुवर्ण—भूमि’ म्हणत. सुवर्णभूमि म्हणजे सोन्यासारखी किंवा सोनं पिकविणारी भूमि ! हा देश धनधान्यानं समृद्ध होता, हा देश बुद्धीमत्तेचं आगर होता. जगांत कदाचित् देव नसेल पण देवासारखी माणसं असतात याचं प्रत्यंतर या देशाकडे पाहिल्यावर येत असे.

पण कालांतरानं या भारताचं दैव फिरलं. येथील लोक या समृद्ध, संपन्न देशाला अधोगतीला नेऊ लागले.

भारतांतील लोक आळशी बनले. जीवनाचं ज्ञान मिळविण्यासाठीं तप आचरणाऱ्या ज्ञानेश्वरांची परंपरा तुटली. त्यागाची जागा स्वार्थाने घेतली. इथं जातीयता माजली. आर्थिक-सामाजिक अन् राजकीय विषमता माजली. याचा फायदा शेजारच्या दुष्ट राष्ट्रांनी घेतला. व्यापाराच्या निमित्ताने ब्रिटिशांनी येथें प्रवेश केला. लोकांच्या मतभेदांचा फायदा घेऊन एक दिवस त्यांनी व्यापाराचा तराजू भिरकावून राज्ययंत्रणा हाती घेतली.

एके काळी संपन्न ‘सुवर्णभूमि’ असलेला हा भारत आतां शृंखलांनी बांधला गेला. त्याच्या हातापायांत गुलामीच्या बेड्या पडल्या.

व्यक्ति असो वा राष्ट्र—त्याच्या नशिबी गुलामी आली कीं त्याचा भावी विकास खुंटतोच ! भारत असाच हतबल झाला.

पण तरीहि शेवटी भारताची भूमि आपल्या पूर्वकर्तृत्वाला जागली. भारतमातेच्या पोटीं सद्गुणी व शूर पुत्रांनी जन्म घेतला. आपल्या मायभूच्या हातांतील शृंखला तोडण्यास त्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. त्यांनी आपली वाणी अन् लेखणी प्रिय मातृभूला परकियांच्या दास्यांतून मुक्त होण्यासाठीं झिजवली.

दिडशें वर्षांनंतर पुनः भारतभूमि स्वतंत्र झाली. भारतमातेच्या शूर व सद्गुणी पुत्रांनी आपल्या आईच्या हातापायांतील बेड्या तोडल्या.

१५ ऑगस्ट १९४७ रोजीं आपला भारत स्वतंत्र झाला. अन् २६ जानेवारी १९५० पासून तो ‘प्रजासत्ताक’ बनला. प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही राज्य ! लोकशाही म्हणजे ‘लोकांनी—लोकांसाठीं चालविलेले लोकांचे राज्य.’ आतां या देशांतील प्रत्येक माणूस या देशाचा ‘सार्वभौम राजा’ आहे. आतां या देशांत आर्थिक—सामाजिक वा राजकीय क्षेत्रांत प्रत्येकाला समानता मिळाली.

बाल मित्रांनों, या देशाला स्वतंत्र करण्यासाठीं चांगले दिवस प्राप्त होण्यासाठीं अनेक वीरांनी आपल्या प्राणांचे अर्घ्य दिले अन् रक्ताचे पाट वाहविले. त्या सर्व ज्ञात—अज्ञात बांधवांना आपण कृतज्ञतापूर्वक ‘श्रद्धांजली’ देवूं या !

१५ ऑगस्टच्या या स्वातंत्र्यदिनी आपण या स्वराज्याचे सुराज्य बनविण्याची प्रतिज्ञा करूं या. ऐक्याने नांदून मातृभूमि ‘सुजलाम् सुफलाम्’ बनवूं या ! यासाठीं नुसते विचार करीत बसूं नका. विचारांना आचारांची जोड हवी. सद्विचारांनी सदाचाराचें रूप धारण केलं पाहिजे तरच प्रत्येक जण ‘यशवन्त’ होतो.

तर मग, आजचा आपला मंत्र

**‘जय हिन्द’** —कु. शैलजा

★ ★ ★

# आई आपली आहे

ले० प्रभाकर सावंत

सुधाकर नांवाचा ८।१० वर्षांचा मुलगा होता. त्याची आई घरांत अतिशय आजारी होती. सुधाकरच्या घरांत त्याचे वडील, आई व तो स्वतः अशी तिनच माणसे होती. वडील सकाळीं कामावर जात ते संध्याकाळी परत येत. त्यामुळें त्यांना आपल्या पत्नीच्या आजारपणाकडे लक्ष देण्यास अजिबात वेळ नसे. आतां राहिला एकटा सुधाकर. पण तो आपल्या आईकडे अजिबात लक्ष देत नसे. खाणे, पिणे आणि दिवसभर खेळणें ह्यांतच तो आपला सारा वेळ घालवी. आई आजारी असल्यामुळें तिला वारंवार पाणी, रस, चहा वगैरेची गरज भासे व ते देण्यासाठीं आईनें जरी त्याला हांक मारली तरी तो तिच्याकडे दुर्लक्ष करी.

आजहि असाच प्रसंग घडला. सुधाकर शेजारच्या गोट्याबरोबर लगोरीचा खेळ खेळत होता. खेळ अगदी रंगांत आला होता. त्याचवेळीं आईनें सुधाकरला कशाला तरी हांक मारली. पण सुधाकरने बाहेरूनच मी येत नाही जा, तुला जे काय हवंय ते हवं तर उठून घे, मला जायचंय शाळेंत ! असें उद्धट उत्तर दिलें व चटकन् घरांत येऊन पाटीदप्तर घेऊन बाहेर गेला. शाळा भरायला अद्याप खुप अवकाश होता. पण सुधाकरसारखी मुलें मात्र अगोदर तास दोन तास येऊन बसलीं होती. सुधाकरनें आपले पाटीदप्तर पडवीच्या एका कोपऱ्यांत टाकले आणि इतर मुलांबरोबर गोट्या खेळू लागला. घरांत बिचारी आई तडफडत होती. तिला आपल्या दुखण्यापेक्षां आपला मुलगा फुकट गेला की काय त्याचं पुढें कसं होणार या विवंचनेच्या वेदना असह्य होऊं लागल्या. व त्यांत तिला अतिषय तहान लागली होती. शेवटी ज्यावेळीं शेजारच्या राधाबाई तिला बघायला आल्या त्यावेळीं पाणी प्यावयास मिळाले. पोटांत पाणी गेले, पण अश्रुच्या रुपाने तेवढेच डोळ्यांतून निघून गेले. काय करणार बिचारी !

इकडे बऱ्याच वेळानें सुधाकरची शाळा भरली. शाळा सुरू होऊन एक तास झाला इतक्यांत वर्गातील एक अतिशय गरीब विद्यार्थी शंकर दबकत दबकत वर्गाच्या दरवाज्यावर येऊन उभा राहिला. त्याचं सर्व अंग घामानें भिजलं होतं. चेहरा उन्हांतून चालत आल्यामुळें लाल झाला होता. खूप चालल्यामुळें धांपहि लागली होती.

" मी वर्गांत येऊं का ? " त्यानें भितभित मास्तरांना विचारले.

" आज तुला उशीर कां झाला ? " मास्तरांनी रागानें विचारले.

" मास्तर, माझी आई फार आजारी आहे. तिचे औषध आणण्यासाठीं मला रोज सरकारी दवाखान्यांत जावे लागते. तिथे फार गर्दी होती आज ! म्हणून घरी यायला फार उशीर झाला. घरचे जेवण, आईची सेवासुश्रुषा या सर्व गोष्टी मलाच कराव्या लागतात. म्हणून मला आज उशीर झाला. —शंकरनें कसे तरी तोंडातून बाहेर शब्द फेकले. आणि अगदी काकुळ—तीला येऊन त्यानें मास्तरांकडे पाहिले. सर्व मुलांना वाटलें कीं मास्तर आतां कांहींतरी शिक्षा करणार. सर्वांनीं मास्तरांकडे पाहिले. परंतु त्याना वेगळेच दृश्य दिसले. मास्तरांचे डोळे पाणावले होते. त्यानीं पटकन् खुर्चीवरून उठून शंकरला वर्गांत हात धरून आणले. आणि सर्वांत पुढच्या बाकावर बसावयास सांगितले. व वर्गाकडे वळून म्हणाले मुलांनो, शंकरचा आदर्श तुम्हीं डोळ्यासमोर ठेवा. बरं आतां मला सांगा, कोणकोण विद्यार्थी आपल्या आईवडिलांची सेवा करतात ? हात वर करा पाहू ! " हात कोणीच वर केला नाहीं. सर्वांच्या माना खालीं होत्या. सुधाकरची मान जास्तच खाली गेली. मास्तरांनी जास्त कांहीं न विचारतां. ' यशवताची ' आई ' कविता शिकवायला सुरवात केली. शिकवितांना वर्गांत शांतता होती. सर्वांनीं शंकर-कडे पाहिले त्याचे डोळे अश्रूनीं भरले होते.

सुधाकरला ते सर्व दृश्य बघून आपल्या सकाळच्या कृत्याबद्दल फार पश्चाताप झाला. त्याला कधी एकदां घरी जातोय आणि आईची क्षमा मागतोय असं झाले.

शाळा सुटल्यावर सुधाकर धांवतच घरीं गेला. त्यानें आईची क्षमा मागितली. आणि तिच्या कुशींत शिरून खुपवेळ रडला. आपला मुलगा सुधारला हे पाहून आईचिहि प्रकृती दुसऱ्या दिवसापासून सुधारूं लागली.

बालवाचकांनो, आई वडील हे आपले परमदैवत आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून तुमचे कधीहि कल्याण होणार नाहीं !

★ ★ ★

# भारतीय संस्कृति

संः कु. **उषा धारवाडकर**

भारतीय संस्कृतीची परंपरा पाहिली तर त्यांत एक प्रकारचें तेज आहे हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. मग कोणी पौराणिक उदाहरणें घेऊं द्या, कोणी प्राचीन चित्रें रेखाटूं द्या अगर कोणी अगदीं अलिकडच्या शिवकालीन संस्कृतीची प्रशंसा करूं द्या. त्यांतील तेज जितकें पूजनीय आहे तितके साधक-बाधक विचार करतां येण्यासारखं आहे. पण आजचा समाज याचा विचार बरबर करतो आहे. चांगलें जे काय घडलें ते सर्व आपलें व ती एक अप्रतिम संस्कृति आहे. याची गाणीं व स्तुतिस्तवनें म्हणणें योग्यच होईल. पण अशी भारतीय संस्कृति केव्हां होती व आज कितपत आहे याचा कोणी केव्हां विचार केला आहे का ? जेव्हां जगाचा बहुतेक भाग रानटी अवस्थेमध्यें होता, त्यावेळीं भारतामध्यें चांगल्या गोष्टी घडल्या हे सर्वमान्य आहे. पण जसजसें इतर जग सुधारत गेलें तसतसा भारत देश सुधारला का ? नक्कीच नाहीं. भारत दिवसेदिवस मागें राहिलेला सर्वांनी पाहिला. याचें कारण काय हें पहाणें आवश्यक आहे. भारतीयांनीं आपली संस्कृति टिकवून धरण्याचा प्रयत्न केला असता तर आजची अवकळा प्राप्त झाली नसती. पण त्यांनीं तसें केलें नाहीं. याचा अर्थ मात्र असा होणार कीं लोकांना आपल्या संस्कृतीची माहितच नव्हती. उलट असें म्हणतां येईल कीं, आपल्या संस्कृतीची पुरेपूर कल्पना असूनसुद्धां लोकांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. कोणी स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला, कोणी विघ्नसंतोष मानून दुसऱ्यांना संकटांत लोटले तर इतरांनीं पोट भरण्यासाठीं लाचारी पत्करून भारतीय संस्कृतीची वाढ खुंटवली.

पण वाढ खुंटविणें म्हणजे त्या संस्कृतीचा संपूर्ण नाश करणें, असा अर्थ कोण घेऊं शकेल असें वाटत नाहीं किंवा तसें कोण म्हणणारहि नाहीं. कारण संस्कृतीचा नाश केव्हांहि होत नसतो; फक्त वाढच खुंटत असते. हें खुंटणे नष्ट करतां येतें. पण हें करावें कोणी हा प्रश्न आहे. पूर्वीच्या सुख कल्पनेंत दंग होऊन साधक कार्य न करतां, ऐदी बनून जर पोळ्या खाण्याचा प्रयत्न केला तर ? तर काय होईल हे नव्यानें सांगितले पाहिजे असें नाहीं. हेंच सर्व भारतांत ऐतिहासिक कालांत घडलें. ना ऐक्य, ना निःस्वार्थ आणि ना परमार्थ ! कांहींहि नाहीं. लोभ, स्वार्थ, हेवा मत्सर, वैरभाव व नाश या गोष्टी आपल्या जणूं पांचवीलाच पूजलेल्या. त्यांचा भरणा इतका होत गेला व आजहि होत आहे कीं, विचारवंतांना मोठी धास्ती वाटते आहे. या विघातक गोष्टींचा टाकण्याचा विचार सुरू झालेला आहे. ही दुफळीची ऐतिहासिक परंपरा नष्ट करून भारतीय संस्कृतीचा मार्ग निष्कंटक करण्याचा प्रयत्न संत विनोबासारखे थोर पुरुष करताहेत. आपला देश वाईट घटनांच्या चक्री वादळांत सांपडूं नये किंबहुना त्यापासून दूर रहावा याच भावना त्यांत भरलेल्या आहेत. विनोबांची सर्व तत्त्वें कदाचित् सर्वसाधारण माणसांना पटणार नाहींत. पण ज्यावेळीं त्यांचे एक साधें तत्त्व " माझें माझें म्हणण्यानें मनुष्य कैदी बनतो. " वाचतो आपण त्यावेळीं कोण म्हणणार नाहीं कीं हे अचूक आहे ?

यावरून बहुतेक भारतीय नागरिक असे कैदी बनलेले आहेत हें स्पष्ट होतें. गरीब—श्रीमंत लोकांपर्यंत याचा विषारी वारा फोफावत चाललेला दृष्टीस पडतो. त्याला शुद्ध करण्याचा मार्ग शोधणें इष्ट आहे.

या सर्व गोष्टी खऱ्या अर्थानें कोण जाणूं शकले नाहींत. अशिक्षित, अज्ञानी यांना एकवेळ माफ करतां येईल. कारण ते निरुपयोगीच ठरलेले आहेत. त्यांना ते एकवेळ क्षम्य होईल. पण सुशिक्षित व

स्वतःला सुसंस्कृत म्हणविणारे लोकहि तसे वागूं लागले तर त्यांना काय म्हणावें हेंच कळत नाहीं. एवढे मात्र खरें कीं, आपल्या शिक्षणाचा बुरखा घेऊन त्यांचे वावरणें सुरू झाल्यासारखें वाटतें. अशा लोकांना आपण करतों ते योग्य असावें असें वाटावें यांत नवल नाहीं. कारण परीक्षेपुरतें शिक्षण संपादून पुढें ते आपल्या अज्ञानाचेंच प्रदर्शन मांडत असतात आणि आपलें शिक्षण फार झालें यावरच खुष होतात. पण ती चूक आहे. ती कल्पना भ्रामक आहे. भ्रम हा घातक असतो. तद्वतच आजची आपली अवस्था घातक ठरण्याचीं उदाहरणें प्रत्यक्षरुपांत बोकाळत आहेत.

वरील विधानाची थोडी आणखी फोड करतांना असें म्हणावें लागेल. समाजांतील खालच्या दर्जाचे लोक नेहमीं वरच्या दर्जाच्या लोकांच्या पावलावर पाऊल टाकून शक्यतों चालत असतात. ( या ठिकाणीं वरचा व खालचा दर्जा हा बौद्धिक पातळीवरून घेतलेला आहे. ) मग समाज अशा बुद्धीवादी म्हटल्या जाणाऱ्या लोकांनीं जर चूक केली तर त्यांच्यावर अवलंबून रहाणाऱ्यांची तशीच किंवा त्याहीपेक्षां मोठी चूक होणार नाहीं ? आणि अशी चूक होत असतां मग घोड चूकहि होणार नाहीं ? हें सर्व खरें ठरलें तर याविषयींच पुढचा प्रश्न असा. सुशिक्षित जर असे तर मग या स्वराज्यांत राहिलें काय ? पण हा प्रश्न तितकासा महत्वाचा नाहीं. कारण सर्वच सुशिक्षित लोक असे वागत असतील असें म्हणता येणार नाहीं. ज्यांच्या परि-श्रमावर आजचा भारत अवलंबून आहे असे कितीतरी सुजाण आपल्याला सांपडतील. नाहीं असें नाहीं. पण असें जरी मान्य केलें तरी आज आपल्या समाजांत अशा तऱ्हेचा खेळ बहतांशी चालू असलेला दिसतो. भाषावर प्रांत रचनेच्या वेळीं निर्माण झालेली भारतीय वृत्ति अभ्यासल्यानंतर सहजपणें सर्व गोष्टीचें आकलन होतें. ऐतिहासिक काळांत घडलेल्या घटनांची ही पुनरावृत्ति अगर हें प्रलंतर मानावें लागेल. परंतु आज हें जें घडलें ते उद्यांहि घडावें ? ते उद्यां घडूं नये, तादृश वातावरण पुन्हां पसरूं नये हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हें आज सुजाण व सुशिक्षित लोकांनाच करतां येण्यासारखें आहे. आपल्या शिक्षणाचा असाच सुपरि-णाम दिसून आला तरच शिक्षणाचें महत्व प्रस्थापित होईल नाहींतर शिक्षण कुचकामी ठरेल.

लोकशाही म्हणजे आपलें, आपल्या-साठीं असलेलें व आपणच चालविलेलें राज्य. शाद्बिक दृष्ट्या हें सर्व ठीक आहे. पण अर्थ थोडा वेगळा आहे. फक्त सरकारची रचना लोकशाही पद्धतीनें झाली म्हणजे सर्व कांहीं मिळविलें असें होत नाहीं. लोकशाहीचे हक्क प्राप्त झाल्यानंतर त्यावर अवलंबून असणारें कर्तव्य नागरिकांवर येऊन पडतें. हक्का-शिवाय लोकशाही असूंच शकणार नाहीं. त्याचप्रमाणें कर्तव्याविना लोकशाही यशस्वी होऊं शकणार नाहीं, हें सर्वजण विसरतात. ही जी कमतरता भासते ती भरून काढण्याचें काम आजपासूनच सुरू करावें लागेल. याची जबाबदारी उद्यां आजच्या विद्यार्थ्यांवर येऊन पडणार आहे. याला उपयुक्त असें शिक्षण व त्याबरोबर स्वतः विचार करून स्वराज्याला हातभार लावण्याची सवय या दोन गोष्टी कोणा-लाहि विसरतां येणार नाहींत. कारण विद्यार्थ्यांकडूनच रचनात्मक कार्याची भर उद्यां घ्यावी लागणार आहे.

या दृष्टीनें पाहिलें तर आजच वैरभाव पूर्णपणें टाकतां येईल असें म्हणतां येणार नाहीं. असे भाव समाजांत असूं नयेत, असा कालौघ असतांहि खासगी जीवनांत


'गृहिणीं सुखी तर संसार सुखी'

सर्व तऱ्हेच्या आकर्षक, फॅशनेबल, सुबक साड्यांसाठीं, तऱ्हेतऱ्हेच्या कापडासाठीं—

**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**

**स्थापना १९१७**

१४८, प्रार्थना समाज नाका
गिरगांव, मुंबई ४

ते कांहीं काळ, कांहीं अंशीं असूं शकतील. पण सार्वजनिक जीवन याहीपेक्षां निराळें असावयास पाहिजे. त्यांत खेळीमेळीचें वातावरण निर्माण व्हायला पाहिजे. तर समाज सुखी होऊन राष्ट्र समृद्ध होईल. या दृष्टीकोनाची आज आवश्यकता आहे. असा दृष्टीकोन आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनीं आजपर्यंत दाखविलेला दिसला. पण हें एवढ्यावरच थांवतां उपयोगी नाहीं. त्याची साधना देशांतील सर्व विद्यार्थ्यांनीं आपल्या या व भावी जीवनांत जास्त प्रमाणांत केली पाहिजे तरच देश पुढें जाईल. नाहींतर लोकशाही निस्तेज बनून राहील व लोक दुःखीच रहातील.

सरकारी कायदे घ्या. दारूबंदीचा कायदा ! तो यशस्वी झाला की अयशस्वी झाला याकडे मी वळत नाहीं. अगर सरकारनें लोकांच्या पैशांचा दुरुपयोग केला यावरहि मी कांहीं लिहीत नाहीं. पण सरकारच्या या कायद्याला लोकांचें जें पाठबळ पाहिजे होतें तें मिळालें नाहीं. म्हणून वरील कांहीं गोष्टींचा भास आपल्याला होतो. वास्तविक सरकारनें कायदा लोकांच्या कल्याणासाठीं केला, आणि त्याच लोकांनीं त्या उपयुक्त कायद्याचा भंग केला हें लक्षण कशाचे द्योतक आहे हें कळत नाहीं. कीं लोकांना लोकशाहीचें महत्त्वच पटलेलें नाहीं कीं दुसरें काय झालेले आहे ? म्हणूनच मनांत विचारांचे काहूर माजतात व सुशिक्षित लोकांना असें म्हणावेंसें वाटतें कीं, लोकशाही संपूर्ण साकार व्हायला पाहिजे असेल तर अद्याप पुढें या आणि सुधारणा करा.

लांच म्हणजे मनोवृत्तींतील बिघाड. ती देणें व घेणें या दोन्हीं गोष्टी वाईट आहेत. ती देणारे व घेणारे बहुजन सुशिक्षित असतील. या लोकांनीं आपल्या शिक्षणाचा असा दुरुपयोग केला तसा होऊं देतां नये. युग पैशाचें आहे हें कबूल करतों. पण हें कोणी केलें ? तुम्हीं आम्हींच केलेलें आहे ! देव कांहीं या गोष्टी करण्यासाठीं अवतरला नाहीं ! त्याची जबाबदारी आपल्यावरच पडते. या सर्व गोष्टींची दक्षता घेणें ही पुढील कामगिरी आहे ती उचलली पाहिजे. लोकशाही व शिक्षण यांची सांगड घालून नवीन दृष्टीकोनानें समाज घडविला पाहिजे.

मग संस्कृति म्हणजे काय ? वर उल्लेख केलेल्या या व अशा अनेक रचनात्मक कार्यांचा योग्य असा विधायक मिलाफ. शिल्पकाराला ज्याप्रमाणें कलेची खरी दृष्टी असावी लागते व त्यांत नव्या व संघटक गोष्टी ज्याप्रमाणें ओताव्या लागतात तरच ती त्याची कला अवीट गोडी निर्माण करूं शकते त्याचप्रमाणें लोकशाहीची शिल्पकला साकार करून यशस्वी होण्यास उद्यां आजच्या विद्यार्थ्यांनाच कष्ट करावे लागणार आहेत. ती कामगिरी खऱ्या इर्षेनें, आत्मियतेनें व जागृत भावनेनें परिपूर्त असलेल्या प्रवृत्तीनें पूर्ण व्हायला पाहिजे. ही महान् कामगिरी एक दिलानें होणें जरूरीचें आहे. त्यासाठीं स्वतःच्या शिक्षणाचा योग्य वापर होणें आवश्यक ठरतें. भावनावशता, परावलंबन व अज्ञान यांचा त्याग व रचनात्मक दिर्घोद्योगाची निर्मिति करणें हे आपलें सर्वांचें मुख्य कर्तव्य आहे. म्हणूनच हा लेखनाचा एवढा उद्योग केला. त्याचें प्रत्यक्ष आचार–विचारांत ज्यावेळीं वास्तव्य दिसेल त्याचवेळीं खरा आनंद होईल.

[ एका जुन्या अंकांतून संकलित ]

* * *


**वामन हरी पेठे**

**मुख्य दुकान**
पेठे बिल्डिंग
गिरगांव रोड, ठाकुरद्वार नाका,
**मुंबई ४**

卐 卐 卐

**दादर शाखा**
६९, पोर्तुगीज चर्च स्ट्रीट
दादर, **मुंबई २८**

● ● ●

**हिरे * मोती * चांदी**

**खात्रीच्या सोन्याचे व चांदीचे सर्व प्रकारच्या वस्तूंचा भरपूर माल तयार असतो.**
**बाहेरगांवीं व्ही. पी. नें पाठविला जातो.**

## खेडेगांवांतील घरें

# तिसऱ्या योजनेंत ग्रामीण घरबांधणी कार्यक्रमाला अधिक चालना

खेडेगांवांत योग्य त्या सुखसोयी नसल्यामुळें ग्रामीण विभागाकडून शहरांकडे लोकसंख्येचा प्रवाह वाहत चालला आहे. हा प्रवाह थांबवावयाचा असेल तर खेडेगांवच्या विकासाकडे निश्चितपणें अधिक लक्ष द्यावें लागेल. छोटे उद्योगधंदे, दळणवळणाची व्यवस्था, ग्रामीण विभागामध्यें उपलब्ध करतां येत असतांनाच ग्रामीण विभागामध्यें घरबांधणीच्या योजना उभारूनच खेडेगांव अधिक सुंदर करण्याच्या दृष्टिनें लक्ष पुरविलें जात आहे.

आज आपल्या देशांतील अनेक खेड्यांतून राहण्याच्या घरांची टंचाई आहे व ज्या घरांतून भारतांतील बहुसंख्य असा घटक म्हणजे शेतकरी समाज रहात आहे. त्या घरांत अपूरी जागा, अस्वच्छता, कच्चीं घरें, कोंडटपणा यांचें राज्य आहे. बऱ्याच खेड्यांतून पूराचें पाणी, दाटवस्ती, दलदल यामुळें खेडुतांना बराच त्रास सहन करावा लागतो. व त्यामुळें त्यांच्या आरोग्यावरहि वाईट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. आज देशांतील पंचवार्षिक योजनेमुळें खेडेगांवांत राहण्याची स्थिती सर्व बाजूनें सुधारत असतां त्यांचीं रहाण्याचीं घरें मात्र अशा स्थितींत ठेऊन चालणार नाहीं. त्यांना साधें कां होईना पण भरपूर हवा व प्रकाश असणारें आरोग्यप्रद आणि आवश्य एवढ्या आकाराचें व मोरी संडास वगैरे सोयीचें घर असणें आवश्यक आहे. परंतु गरीब खेडुतांना आपल्या परिस्थितीमुळें अशीं नवीं घरें बांधणें शक्य होत नाहीं. म्हणून सरकारनें ग्रामीण विभागांतील घरबांधणी योजना हातीं केली आहे. व त्यासाठीं गांवें निवडून त्या योजनेची अंमलबजावणी करण्याचें सरकारनें योजिलें आहे.

### कर्जाची व्यवस्था

या योजनेखालीं घरें बांधण्यासाठीं खेडुतांना घरांच्या एकंदर किंमतीच्या $\frac{2}{3}$ भाग इतकी रकम कर्जास दिली जाते. मात्र असें कर्ज २,००० रुपयांहून अधिक दिलें जात नाहीं. सिमेंट, लोखंडी सळ्या यांच्या सारख्या महाग वस्तू न वापरतां गावांत तयार होणाऱ्या विटा, कौलें व बांबू यांचा उपयोग करावयाचा ठरविल्यास ३,००० रुपयांत एखादें छोटेसें टुमदार व गांवकऱ्यांच्या नेहमीच्या गरजेस पुरेसें असें घर सहज बांधतां येईल व त्यादृष्टीनें कर्जाची वरील मर्यादा ठरवलेली आहे. सध्यां उभ्या असलेल्या एखाद्या घरास हवेशीर व जास्त टिकाव करण्यासाठीं खिडक्या, दारे वगैरेंची अधिक सोय करण्यासाठींहि सरकारनें १००० रुपये पर्यन्त कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे. हें कर्ज घेणारा कर्जदार त्या गांवचा कायम रहिवाशी पाहिजे. त्याने ठराविक नमुन्यांत करार करून दिला पाहिजे. घेतलेलें कर्ज त्याने घरबांधकामास वापरलें पाहिजे. अशा अटी त्यानें पुऱ्या कराव्या लागतात. त्याशिवाय त्यानें घर सरकारकडून दिलेल्या पद्धतीनें बांधले पाहिजे, कांहीं स्थानिक परिस्थिती योग्य ते फेरफार करण्यास परवानगी दिली जाते. मागणी केलेल्या कर्जाच्या रकमेच्या किंमती इतकी आपली स्थावर मिळकत त्याला तारण म्हणून द्यावी लागते. अगर तितक्या रकमेचा जामीन द्यावा लागतो. कर्जाच्या रकमें तून बांधलें जाणारें घर कर्ज फिटेपर्यंत सरकारला तारण दिलें जातें आणि तें कर्ज फिटेपर्यंत विकतां येत नाहीं अगर कसलाहि बोजा त्यावर करतां येत नाहीं. कर्जावर अदमासे द. सा. द. शें. ५ रुपये प्रमाणे व्याज द्यावें लागतें. कर्जाची फेड १० वर्षांपर्यंत करावयाची अशी ही योजना आहे. अर्जाचा नमुना कलेक्टर व विकास योजना अधिकारी यांच्या कचेरींत मिळतो. हें कर्ज कमी उत्पन्नाच्या गरजू लोकांना प्राधान्येकरून देण्यांत येतें. याकामीं सरकारी तज्ञाकडून विनामूल्य तांत्रिक मदत व सल्ला दिला जातो.

### योजनेचें स्वरूप

या योजनेसाठीं महाराष्ट्र सरकारनें निर निराळ्या जिल्ह्यांत गांवें निवडण्याचा अधिकार जिल्ह्यांच्या कलेक्टरांना दिलेला आहे. हीं गांवें निवडतांना खालील गोष्टीना विशेष प्राधान्य दिलें जातें.

१) पुराच्या पाण्याखाली येणारीं गांवें.

२) दाट वस्ती असलेलीं गांवें.

३) मागासलेल्या भिल्ल, आदिवासी वगैरेंच्या वाड्या.

४) शेतीचें उत्पन्न वाढवणारीं गांवें.

महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व जिल्ह्यांतून अशी गांवें निवडली गेलीं आहेत. हीं गांवें निवडल्या नंतर त्या त्या गांवाची आर्थिक सामाजिक व तांत्रिक दृष्ट्या पहाणी केली जाते. त्या पहाणीच्या आधारें त्या गावचा एक आदर्श नकाशा तयार केला जातो. व त्याप्रमाणें त्या गांवचे प्लॅटस पाडले जातात. घर बांधण्यास सोईचें जावें म्हणून स्वस्त घराचे नकाशेही सरकारनें मार्गदर्शनासाठीं तयार केले आहेत. या सर्व कामास एकसूत्रीपणा यावा म्हणून सरकारनें महाराष्ट्र राज्यांत मुंबई येथें सरळ हाऊसिंग सेल नांवाचें ऑफिस उघडलें आहे. महाराष्ट्र राज्यांत १९५८ पासून ही योजना सुरु झाली आहे. २५ जिल्ह्यांतून २०३ खेडीं यासाठीं निवडण्यांत आलीं आहेत. आतांपर्यंत या कामासाठीं ३० लाख ३७६०० रुपये खर्च करण्यांत आले असून चालू आर्थिक सालीं आखणी ३० लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. सुमारें २४७ घराचे बांधकाम पूर्ण झालें असून १६७९ घराचे काम चालू आहे. चालू वर्षी आणखी अनेक घरांचे काम हातीं घेण्यांत येईल. कर्ज मंजुर करणें, तांत्रिक सल्ला देणें वगैरे अधिकार ज्या त्या गट विकास खंडाचे अधिकारी यांना दिले आहेत. ग्रामीण भागांतील दैनंदिन जीवन सुखावह व्हावें ह्या दिशेनेंच हीं पाऊलें टाकण्यांत येत आहेत. खेड्यांतील पाणी-पुरवठा, रस्ते, शाळाबांधणी ह्या बरोबरच घर बांधणी ह्या प्रश्नाला तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत विशेष स्थान आहे.

( भारत सरकारच्या प्रसिद्धी खात्यातर्फे )

स्थापना १९३६ ] * रौप्य महोत्सवी वर्ष * [ संस्थापक कै. महर्षी अण्णासाहेब चिरमुले

१९६१

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

## (सातारा)

मुख्य कचेरी

तार पत्ता युवर बँक ] चिरमुले निकेतन, सातारा [ फोन नंबर ६४

### शाखा विस्तार

मुंबई, फोर्ट, गिरगांव, दादर, डोंबिवली, पुणे, नाशिक, बार्शी, लोणंद, अकलूज, फलटण, कोल्हापूर, इचलकरंजी, हलकर्णी

=० भांडवल ०=

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत रु. | २०,००,००० | विक्रीस काढलेले रु. | १३,००,००० |
| खपलेलें रु. | १३,००,००० | वसूल झालेले- | ६,५०,००० |
| गंगाजळी व इतर निधी | ३,८०,००० | कार्यान्वित | २॥ कोटीचे वर |

ठेवींवरील व्याजाचे दर

* चालू ठेव द. सा. द. शे. ॥ टक्के ॥
* सेव्हिंग्ज बँक द. सा. द. शे. ३ टक्के.
* दीर्घमुदत ठेवी ४ ते ५ टक्के व्याजाने स्विकारल्या जातत.
* याशिवाय अल्प मुदत ठेवींच्या मोठ्या रकमा आकर्षक व्याजाने स्विकारल्या जातात.
* १९६० साल अखेर भागीदारांना ९ टक्के करपात्र डिव्हिडंड देण्यांत आले.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मराठी ७५८७
...दिन वापरावा
...परत करावा

# ‘ आर्टस् कॉलेज— सकाळीं कां दुपारीं ?’

— ले. एक शिक्षक —

मुंबई विद्यापीठानें, सकाळीं भरत असलेल्या आर्टस् कॉलेजांची वेळ बदलण्याचा निर्णय घेण्याच्या प्रयत्नांतून जो वाद सध्यां निर्माण झाला आहे, त्यांतून इतर अनेक प्रश्नांबरोबर एक फार महत्वाचा प्रश्न पुढें आलेला आहे. त्याकडे फारसें लक्ष वेधलें गेलेलें दिसत नाहीं. आर्टस् कोर्सला असलेलें शैक्षणिक महत्व, त्याच्या अनुषंगानें अनुसरण्यांत येणारी शिक्षण–पद्धति, व त्यासाठीं विद्यार्थ्यांकडून करून घ्यावयास लागणारा अभ्यास, या सर्वांशीं निगडिन असलेला असा तो प्रश्न आहे. त्याचा विचार येथें करण्याचें योजिलें आहे.

आर्टस् कोर्सबाबत कमीजास्त प्रमाणांत सर्वसाधारणपणें एक प्रकारची अनास्था दिसून येते. सकाळच्या वेळीं कॉलेज भरविल्यानें फारसें कांहीं बिघडत नाहीं असें वाटणाऱ्यांच्या मनांत, या कोर्ससाठीं विशेष अभ्यासाची जरूर नाहीं, व थोड्याफार जुजबी तयारीनिशीं विद्यार्थ्यांची सहज तयारी होऊं शकते अशी खात्री असते. याबाबतींतला निकष म्हणजे परिक्षेंतलें यश, हाच असतो. व सर्वसाधारणपणें असाच अनुभवहि येतो कीं विषयाची बिलकूल तयारी नसतांहि, विद्यार्थी परीक्षेंत सहज यश मिळवूं शकतो. कॉलेजमधील व्याख्यानें न ऐकतां, फार काय नेमलेलीं पाठ्य पुस्तकें न वाचतांहि केवळ ‘ गाईड्स् ’ च्या सहाय्यानें - विद्यार्थी पास होऊं शकतात ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारून कांहींच साध्य होण्यासारखें नाहीं व यामुळेंच, दुपारीं कॉलेज भरवून केवळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय तुम्ही करीत आहांत, असें कोणी म्हटल्यास फारसें वावगें ठरणार नाहीं. जोपर्यंत परिक्षेंतील यशाच्या निष्कर्षावरूनच शिक्षणपद्धतिचें मूल्यमापन केलें जात आहे, तोपर्यंत तरी कॉलेजांची वेळ बदलण्याच्या प्रयत्नाला कांहीं विशेष अर्थ येऊं शकेल असें वाटत नाहीं. याचें मुख्य कारण असें कीं या विषयांतील परीक्षांचेबाबतींत, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची पातळी कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत आल्याखेरीज त्याला यश मिळूं शकत नाहीं, अशी निश्चित व कठोर भूमिका घेणेहि दिवसदिवस अवघड होत आहे. एकीकडे ज्या परीक्षांवरून मूल्यमापन करावयाचें त्या परीक्षा, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचें योग्य दर्शन घडवूं शकत नाहींत व दुसरीकडे परिक्षा पास होण्यापलिकडेहि शिक्षणाचें कांहीं आणखी साध्य असूं शकते याचा विसर पडलेला आहे. यामुळेंच आर्टस् कोर्सबाबत बरीचशी चुकीची भूमिका घेतली जाण्याचा संभव निर्माण होतो असें वाटतें.

विज्ञानाच्या शाखेबाबत, ‘ कॉलेज सकाळीं तीनच तास करावे ’, अशी भूमिका कोणीहि घेत नाहीं. कारण त्या शाखेंत मिळणाऱ्या शिक्षणाबाबत, व त्याच्या महत्वाबाबत सर्वसाधारण एकमत असतें. वैद्यक, स्थापत्य या शाखांत कसून अभ्यास केल्याखेरीज पास होऊं शकणार नाहीं ही विद्यार्थ्यांची खात्री असते व त्याला विषयाचें विशिष्ट पातळीपर्यंत निश्चित असें ज्ञान झाल्याखेरीज, उत्तीर्ण करावयाचा नाहीं, हें परीक्षकाचेंहि ठरलेलें असतें. या दोन्ही गोष्टींमुळें, या शाखांबाबत हा प्रश्नच कोणी निर्माण करीत नाहीं, हें या वादांत लक्षांत घेण्यासारखें आहे.

वर वर्णन केलेल्या परिस्थितीची चिकित्सा केल्यास, त्यांतून पुढील गोष्टी नजरेस येतात.

१) आर्टस् कोर्सच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यास जुजबी तयारी पुरेशी होते. २) विद्यार्थ्याचें ज्ञान जरी पुरेसें नसले तरीहि त्याला नापास करणे आवश्यक नाहीं, कारण त्या ज्ञानाचा त्याच्या पुढील व्यवसायाशीं फारसा संबंध असत नाहीं. ३) शक्य तितक्या सुलभ मार्गानें एक पदवी पदरांत पाडून घेणे या पलिकडे या कोर्सच्या अभ्यासास कांहीं विशेष महत्व नाहीं.

आर्टस् कोर्सबाबत याप्रकारच्या समजुती प्रचलित आहेत येवढेंच नव्हे तर, शैक्षणिक प्रश्नांबद्दलच्या वादांतून त्यांचा गृहीत कृत्यें म्हणून वापर करण्याची प्रथाहि पडत चाललेली आहे. या समजुती जर खऱ्या असतील तर, वर म्हटल्याप्रमाणें कॉलेज सकाळीं ठेवल्यानें कांहीं बिघडत नाहीं, ही भूमिका जरूर मान्य करावी लागेल.

थोडेसें खोलवर जाऊन बघितल्यास असें दिसून येईल कीं उच्च क्षेत्रांतील नोकऱ्या व महाविद्यालयीन शिक्षणांतून मिळणाऱ्या पदव्या यांची एक चमत्कारिक सांगड घातल्यानें हे गैरसमज निर्माण होण्याची शक्यता जास्त वाढीला लागते. विज्ञानाच्या कांहीं शाखांत व आर्टस्कडे अर्थशास्त्रासारख्या एखाद्या शाखेंत, विद्यार्थ्याची पदवी, त्याला एका विशिष्ट व्यवसायांत नोकरी करण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक असूं शकेल. परंतु तत्वज्ञान, इतिहास, वाङ्मय यांसारख्या विषयांत पदवी मिळवून, सरकारी कचेऱ्यांतील नोकऱ्यांत बढती मिळविण्याची शक्यता निर्माण करणें हें अत्यंत हास्यास्पद होतें. परंतु सध्यां तरी तशी परिस्थिती आहे व त्यामुळें या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनांत त्या

मराठी
७५८७
... परत करावा

# ‘ आर्टस् कॉलेज— सकाळीं कां दुपारीं ?’

— ले. एक शिक्षक —

मुंबई विद्यापीठानें, सकाळीं भरत असलेल्या आर्टस् कॉलेजांची वेळ बदलण्याचा निर्णय घेण्याच्या प्रयत्नांतून जो वाद सध्यां निर्माण झाला आहे, त्यांतून इतर अनेक प्रश्नांबरोबर एक फार महत्वाचा प्रश्न पुढें आलेला आहे. त्याकडे फारसें लक्ष वेधलें गेलेलें दिसत नाहीं. आर्टस् कोर्सला असलेलें शैक्षणिक महत्व, त्याच्या अनुषंगानें अनुसरण्यांत येणारी शिक्षण-पद्धति, व त्यासाठीं विद्यार्थ्यांकडून करून घ्यावयास लागणारा अभ्यास, या सर्वांशीं निगडित असलेला असा तो प्रश्न आहे. त्याचा विचार येथें करण्याचें योजिलें आहे.

आर्टस् कोर्सबाबत कमीजास्त प्रमाणांत सर्वसाधारणपणें एक प्रकारची अनास्था दिसून येते. सकाळच्या वेळीं कॉलेज भरविल्यानें फारसें कांहीं बिघडत नाहीं असें वाटणाऱ्यांच्या मनांत, या कोर्ससाठीं विशेष अभ्यासाची जरूर नाहीं, व थोड्याफार जुजबी तयारीनिशीं विद्यार्थ्यांची सहज तयारी होऊं शकते अशी खात्री असते. याबाबतींतला निकष म्हणजे परिक्षेंतलें यश, हाच असतो. व सर्वसाधारणपणें असाच अनुभवहि येतो कीं विषयाची बिलकूल तयारी नसतांहि, विद्यार्थी परीक्षेंत सहज यश मिळवूं शकतो. कॉलेजमधील व्याख्यानें न ऐकतां, फार काय नेमलेलीं पाठ्य पुस्तकें न वाचतांहि केवळ ‘ गाईडस् ’ च्या सहाय्यानें - विद्यार्थी पास होऊं शकतात ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारून कांहींच साध्य होण्यासारखें नाहीं व यामुळेंच, दुपारीं कॉलेज भरवून केवळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय तुम्ही करीत आहांत, असें कोणी म्हटल्यास फारसें वावगें ठरणार नाहीं. जोपर्यंत परिक्षेंतील यशाच्या निष्कर्षावरूनच शिक्षणपद्धतिचें मूल्यमापन केलें जात आहे, तोपर्यंत तरी कॉलेजांची वेळ बदलण्याच्या प्रयत्नाला कांहीं विशेष अर्थ येऊं शकेल असें वाटत नाहीं. याचें मुख्य कारण असें कीं या विषयांतील परीक्षांचेबाबतींत, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची पातळी कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत आल्याखेरीज त्याला यश मिळूं शकत नाहीं, अशी निश्चित व कठोर भूमिका घेणेहि दिवसदिवस अवघड होत आहे. एकीकडे ज्या परीक्षांवरून मूल्यमापन करावयाचें त्या परीक्षा, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचें योग्य दर्शन घडवूं शकत नाहींत व दुसरीकडे परिक्षा पास होण्यापलिकडेहि शिक्षणाचें कांहीं आणखी साध्य असूं शकते याचा विसर पडलेला आहे. यामुळेंच आर्टस् कोर्सबाबत बरीचशी चुकीची भूमिका घेतली जाण्याचा संभव निर्माण होतो असें वाटतें.

विज्ञानाच्या शाखेबाबत, ‘ कॉलेज सकाळीं तीनच तास करावे ’, अशी भूमिका कोणीहि घेत नाहीं. कारण त्या शाखेंत मिळणाऱ्या शिक्षणाबाबत, व त्याच्या महत्वाबाबत सर्वसाधारण एकमत असतें. वैद्यक, स्थापत्य या शाखांत कसून अभ्यास केल्याखेरीज पास होऊं शकणार नाहीं ही विद्यार्थ्यांची खात्री असते व त्याला विषयाचें विशिष्ट पातळीपर्यंत निश्चित असें ज्ञान झाल्याखेरीज, उत्तीर्ण करावयाचा नाहीं, हें परीक्षकाचेंहि ठरलेलें असतें. या दोन्ही गोष्टींमुळें, या शाखांबाबत हा प्रश्नच कोणी निर्माण करीत नाहीं, हें या वादांत लक्षांत घेण्यासारखें आहे.

वर वर्णन केलेल्या परिस्थितीची चिकित्सा केल्यास, त्यांतून पुढील गोष्टी नजरेस येतात.

१) आर्टस् कोर्सच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यास जुजबी तयारी पुरेशी होते. २) विद्यार्थ्याचें ज्ञान जरी पुरेसें नसले तरीहि त्याला नापास करणे आवश्यक नाहीं, कारण त्या ज्ञानाचा त्याच्या पुढील व्यवसायाशीं फारसा संबंध असत नाहीं. ३) शक्य तितक्या सुलभ मार्गानें एक पदवी पदरांत पाडून घेणे या पलिकडे या कोर्सच्या अभ्यासास कांहीं विशेष महत्व नाहीं.

आर्टस् कोर्सबाबत याप्रकारच्या समजुती प्रचलित आहेत येवढेंच नव्हे तर, शैक्षणिक प्रश्नांबद्दलच्या वादांतून त्यांचा गृहीत कृत्यें म्हणून वापर करण्याची प्रथाहि पडत चाललेली आहे. या समजुती जर खऱ्या असतील तर, वर म्हटल्याप्रमाणें कॉलेज सकाळीं ठेवल्यानें कांहीं बिघडत नाहीं, ही भूमिका जरूर मान्य करावी लागेल.

थोडेसें खोलवर जाऊन बघितल्यास असें दिसून येईल कीं उच्च क्षेत्रांतील नोकऱ्या व महाविद्यालयीन शिक्षणांतून मिळणाऱ्या पदव्या यांची एक चमत्कारिक सांगड घातल्यानें हे गैरसमज निर्माण होण्याची शक्यता जास्त वाढीला लागते. विज्ञानाच्या कांहीं शाखांत व आर्टस्-कडे अर्थशास्त्रासारख्या एखाद्या शाखेंत, विद्यार्थ्याची पदवी, त्याला एका विशिष्ट व्यवसायांत नोकरी करण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक असूं शकेल. परंतु तत्त्वज्ञान, इतिहास, वाङ्मय यांसारख्या विषयांत पदवी मिळवून, सरकारी कचेऱ्यांतील नोकऱ्यांत बढती मिळविण्याची शक्यता निर्माण करणें हें अत्यंत हास्यास्पद होतें. परंतु सध्यां तरी तशी परिस्थिती आहे व त्यामुळें या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनांत त्या

विषयाबद्दल केवळ पदवी मिळवून बढती मिळविण्यासाठीं अभ्यास करावा लागणारा एक विषय, येवढीच भूमिका असते. व त्यांतूनच कशीबशी जुजबी तयारी करून पास होणे यापलिकडे विद्यार्थ्यांची उडी जाऊंच शकत नाहीं. जास्त तपशीलांत शिरण्याची त्याची तयारी नसते कारण पास झाल्यानंतर या विषयाशीं त्याचा दुरूनहि संबंध येणार नसतो अशा वृत्तीचे अनेक विद्यार्थी वर्गात आढळल्यास शिक्षकालाहि शिकविण्यांत रस उरत नाहीं, व एकूण विषयाबद्दलच्या या अनास्थेमुळें हिरमोड होऊन परीक्षकहि बेफिकिर बनून जास्तींत जास्त विद्यार्थ्यांना पास करावयाच्या मागें लागतो. अनेक शिक्षणतज्ज्ञनी याबाबतींत सुचविलेला उपाय अगत्यानें अमलांत आणला पाहिजे व तो म्हणजे, महाविद्यालयीन शिक्षणाची नोकरीसाठीं असलेली आवश्यकता दूर करणें.

शालान्त परिक्षेनंतर, निरनिराळ्या खात्यांच्या परिक्षा ( Departmental exams, ) पास होण्यावरच नोकरी मिळणें व बढती मिळणें अवलंबून ठेवल्यास, आर्टस् कोर्सकडे येणारी गर्दी कमी होईल व केवळ ज्ञानाची लालसा असणारे विद्यार्थीच तेथें प्रवेश घेतील आणि कॉलेजची वेळ सकाळीं कां दुपारीं हा प्रश्नच उरणार नाहीं.

थोडक्यांत, या वादाचें सर्व मूळ, ' आर्टस् कोर्स ' चें महत्व काय असू शकेल, व त्या कोर्सचें शिक्षण परिणामकारक करावयाचे झाल्यास कोणते उपाय योजावे लागतील, या प्रश्नात असलेलें आढळते. नोकरी धंदा मिळविण्याचें साधन या दृष्टीनें ' आर्टस ' चे शिक्षण बहुतांशी निरुपयोगी आहे. परंतु सकाळच्या कॉलेजांचे बाजूनें बोलणारा पक्ष या शिक्षणाचा विचार मुख्यतः याच दृष्टीकोनांतून करीत आहे. कॉलेजांची वेळ बदलून दुपारीं करावी असे ज्यांना वाटते. त्या शिक्षणतज्ज्ञांचा दृष्टिकोन विद्यार्थी खऱ्या अर्थानें ज्ञानी व्हावेत, त्यांची विचार करण्याची वृत्ति वाढीस लागावी, अशा तऱ्हेनें प्रयत्न व्हावेत असा आहे. जोपर्यंत या दोन्ही भूमिकांचा मेळ घालतां येत नाहीं तोपर्यंत या वादांत एकमत होणें शक्य नाहीं. व या भूमिका इतक्या विरोधी आहेत. कीं, त्यांचा मेळ घालणे जवळजवळ अशक्य आहे. वर सुचविल्याप्रमाणें, सरकारी धोरणांतच, पदवी व नोकरी यांची सांगड काढून टाकल्याचें दिसून आले, तरच हा वाद मिटू शकेल असें वाटते. तें घडले नाहीं, तर कॉलेजची वेळ दुपारी करूनहि, विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या मनांत असलेला हेतू कितपत सफळ होईल याबद्दल शंकाच वाटते. कारण वेळ बदलली तरी आर्टस् कोर्सबद्दलची वृत्ति जोपर्यंत बदलत नाहीं, तोपर्यंत फारशी फलनिष्पत्ति होणें शक्य वाटत नाहीं.

★★★


★ C. P. SHAH & SONS ★

Salvarsa ( Nagar Haveli )
**VAPI** Dist :- Surat.

Agents :- BURMAH - SHELL & BURSHANE

Dealers In Tyres, Tubes & Motor Accessories.

STOCKIST :- ASBESTOS CEMENT LTD.

Branches :-

Talasari, Sanjan, & Umbergaon.

स्वातंत्र्यवीरांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन !

विजय हेअर कटींग सलून

भिवंडीवाला बिल्डींग दादर मुं. १४.

मराठा हेअर कटींग सलून

न्यु जवेरी बिल्डिंग एलफिस्टन रोड मुंबई १२.

चालक गणपत आबाजी माने.

१ ते २ वर्षांत S. S. C. व्हा !

महाराष्ट्र क्लासेस

विठ्ठल वाडी, रानडे रोड, दादर, मुंबई २८

किमान शिक्षण मराठी ४ थी पास.

S. S. C. मार्च–आक्टोबर आणि सुरवातीपासून इंग्रजीचे स्पेशल वर्ग सुरू.

वर्गाच्या वेळा :- सकाळ संध्याकाळ ७ ते १०
दुपारीं ३ ते ६

अधिक माहीतीसाठीं भेटा:–
सकाळ–संध्याकाळ ७॥ ते १०.

## जलद वहातुकीमुळें माल ठराविक वेळीं खात्रीपूर्वक पोंचतो.

# मुंबई रेल्वेवरील आज सुरू असलेले महत्वाचे मार्ग

### सेंट्रल रेल्वे

| | वहातुकीस लागणारा अवधी |
|---|---|
| वाडी बंदर ते बँगलोर सिटी | ५ दिवस |
| ,, ,, शालीमार | ८ ,, |
| ,, ,, नागपूर | ३ ,, |
| ,, ,, साल्ट कटार्स | ७ ,, |
| ,, ,, अडोणी | ५ ,, |
| ,, ,, येरागुण्टल | ५ ,, |
| ,, ,, कोल्हापूर | ३ ,, |
| ,, ,, कानपूर | ६ ,, |
| ,, ,, विजयवाडा | ६ ,, |
| ,, ,, सिकंदराबाद | ३ ,, |
| ,, ,, हैदराबाद | ४ ,, |
| ,, ,, सोलापूर | २ ,, |
| ,, ,, अकोला | २ ,, |
| ,, ,, अमरावती | ३ ,, |
| ,, ,, जबलपूर | ४ ,, |
| ,, ,, सटाना | ५ ,, |
| ,, ,, भोपाळ | ४ ,, |
| ,, ,, ग्वालेर | ५ ,, |
| ,, ,, लखनौ | ७ ,, |
| ,, ,, अलाहाबाद | ७ ,, |
| ,, ,, वाराणशी | ८ ,, |
| ,, ,, पाटणा | ९ ,, |
| ,, ,, हांरा | १२ ,, |
| ,, ,, मुझफरपूर | १२ ,, |
| ,, ,, द्रूग | ५ ,, |
| ,, ,, गुलबर्गा | ४ ,, |
| ,, ,, पुणें | १ ,, |

| | वहातुकीस लागणारा अवधी |
|---|---|
| पुणें ते न्यू दिल्ली | ६ दिवस |
| ,, ,, शाशिमार | ७ ,, |
| सोलापूर ते साल्ट कटार्स | ५ ,, |
| लासलगांव ते न्यू दिल्ली | ६ ,, |
| ,, ,, शालिमार | ८ ,, |
| नागपूर ते न्यू दिल्ली | ६ ,, |
| ,, ,, साल्ट कटार्स | ७ ,, |
| ,, ,, वाडीबंदर | ४ ,, |
| सिकंदराबाद ते बंगलोर सिटी | ६ ,, |
| फरिदाबाद ते कर्नाटक ब्रिज | ६ ,, |
| धोलपूर ते वाडी बंदर | ६ ,, |

★

### वेस्टर्न रेल्वे

| | वहातुकीस लागणारा अवधी |
|---|---|
| कर्नाक ब्रीज ते न्यू-दिल्ली | ५ दिवस |
| ,, ,, ,, अहमदाबाद | ३ ,, |
| ,, ,, ,, इंदोर | ४ ,, |
| ,, ,, ,, सुरत | ३ ,, |
| ,, ,, ,, बेलानगंज | ६ ,, |
| ,, ,, ,, बडोदें | ३ ,, |
| ,, ,, ,, अमृतसर | ८ ,, |
| ,, ,, ,, लुधियाना | ८ ,, |
| ,, ,, ,, जालंदर सिटी | ८ ,, |
| ,, ,, ,, मोरादाबाद | ८ ,, |
| ,, ,, ,, रतनलाम | ३ ,, |

| | वहातुकीस लागणारा अवधी |
|---|---|
| न्यू-दिल्ली ते कर्नाक ब्रीज | ५ दिवस |
| बडोदें ,, ,, ,, | ३ ,, |
| रतलाम ,, ,, ,, | ३ ,, |
| अमृतसर ,, ,, ,, | ८ ,, |
| लुधियाना ,, ,, ,, | १० ,, |
| जालंदर सिटी ते,, ,, | ८ ,, |
| अहमदाबाद ,, ,, | ३ ,, |
| विजयवाडा ,, ,, | ६ ,, |
| (व्हाया उधवा, भुसावळ) | |
| न्यू-दिल्ली ते अहमदाबाद | ६ ,, |
| अहमदाबाद ते न्यू दिल्ली | ६ ,, |
| बेलागंज ,, कर्नाटक ब्रीज | ६ ,, |
| इंदोर ,, ,, ,, | ५ ,, |
| सुरत ,, ,, ,, | ३ ,, |
| कांडला ते जयपूर | ५ ,, |
| सुरेंद्रनगर ते जयपूर | ५ ,, |
| अजमिर ते जयपूर | २ ,, |
| असव्हां ते जयपूर | ६ ,, |
| राजकोट ते बिकानेर | ७ ,, |
| मोरारबाद ते कर्नाक ब्रीज | ८ ,, |
| जयपूर ते अजमिर | २ ,, |
| ,, ,, कांडला | ५ ,, |
| ,, ,, सुरेंद्रनगर | ५ ,, |
| ,, ,, असव्हां | ६ ,, |
| अहमदाबाद ते मुझफरपूर | १३ ,, |
| ,, ,, टिनसुकीया | २५ ,, |

★

## * सुरक्षित व जलद माल वहातुक रेल्वेनेंच होते *

**अधिक माहितीसाठीं भेटाः—**

(१) गुडस् सुपरिन्टेन्डेन्ट, वाडी बंदर (२) गुडस् सुपरिन्टेन्डेन्ट कर्नाक ब्रीज

# —: मध्य व पश्चिम रेल्वे :—

# ज न्म ठे प

**या जगताची रीत भयंकर !**
**येथील माणसं अशी कांहीं विचित्र वागतात कीं, भल्या भल्या-माणसालाहि कधीं कधीं कायदा हातांत घ्यावासा वाटतो.**
**कायदा हातांत घेणारा माणूस तुरूंगांत जातो.**
**आणि तुरूंगांत गेलेला माणूस मग तुरूंगाबाहेर जरी आला तरी त्याची खरी सुटका कधींच होत नाहीं कारण—**
**जग हीं बंदिशाळा ! !**

माधव तुरुंगाच्या बाहेर पडला. अठरा वर्षांनीं आज त्याची सुटका झाली. तो जन्मठेपेचा कैदी होता. माणसाच्या कायद्यांनीं निर्माण केलेली जन्मठेप भोगून नवीन कैदखान्यांत जात होता. मरेपर्यंत ही जन्मठेप तो आतां भोगणार होता. या जगांत उजळमाथ्यानें वागणारे लोक त्याला कैदी म्हणणार होते. सुटलेला कैदी, सरकारनें दोन वर्षं दया दाखवलेला कैदी अशा दृष्टीनें सारे त्यांच्याकडे बघणार होते त्याच्याकडे बोट दाखवून रस्त्यावरील मुलं त्याला म्हणणार होतीं हा पहा सुटलेला कैदी ! माधवाला वाटत होतं आयुष्य हाच एक मोठा कैदखाना आहे. तुरुंगांत कैक वर्षं घालवल्यानें तो गंभीर व विचारी झाला. दैवाच्या साखळीनें आपण एकमेकांशीं बांधले गेलेलो कैदी आहोंत असं त्याला वारंवार वाटत आलं. नियतीच्या साखळदंडानें बांधलेला माधव आज सुटला व परत मोठ्या कैदखान्यांत आला. साहित्य-ानें याला नांव दिल होतं जीवन ! कायद्यांनीं या कैद्यांना नागरिक बनवलं. नागरिकांचे अधिकार ! हक्क ! केवढी फसवी भाषा होती! माणसांनीं संरक्षणासाठीं कायदे केले. असं असून त्यांना न्याय मिळत नव्हता. माधवनें खून केला पण त्याची कैफियत लोकांनीं कोठें ऐकली होती.समाजावर या कैफियतीचा परिणाम कांहींच होणार नव्हता काय ? घटना ! समाज परिवर्तन! हक्क ! कायदा ! सारे फसवे प्रकार माणसांनीं निर्माण केले व स्वतःच कैदी झाले. नियती आपलं काम करत होती व माणसं गुन्हे करीत होती. एक कैदी दुसऱ्या कैद्याला शिक्षा देत होता. त्या गुन्हेगाराचे अश्रु पुसायला कायदा दुबळा ठरत होता. तूं गुन्हा कां केलास तुझें दुःख काय होतं याचा विचार कायदा करत नव्हता. कायदा करणारे करत नव्हते. आणि माधवसारखी माणसं याला बळी जात होती. जन्मभर कैदी हे त्यांच्या मागचें विशेषण सुटणार नव्हतं. लोक त्याचं मन ओढणार नव्हते

—: लेखक :—

**पद्माकर चितळे**

ज्या थोड्या लोकांनीं त्याच मन जाणलं त्यांपैकीं बरेच काळाच्या पडद्याआड गेले होते. नवीन पिढीला त्याचें दुःख कळणार नव्हतं. ती पिढी त्याला कैदी म्हणत होती. आणि हेच माधवच दुःख होत न्यायालयासमोर त्यानें कैफियत मांडली. सामाजिक मूल्याच्या दृष्टीनें त्याला काय किंमत होती. साऱ्या गुन्हेगारांच्या कैफियतीचं वाङ्मय तयार करायला हवं असं त्याला वाटत आलं ! कोर्टानें घटना पुरावे बघून त्याला जन्मठेप दिली आणि आतां ती अयुष्यभर चुकणार नव्हती. त्याच्या सांसारिक जीवनाची जी शोकांतिका झाली त्याचें पर्यवसान त्याला जन्मठेप मिळण्यांत झालं. त्यानें पत्नीचा खून केला. त्यानें तिला प्रेम दिलं. आयुष्यातील सारे क्षण तिच्यासाठीं वेचल. आणि तिला बूज ठेवतां आली नाहीं. प्रेमाच्या बदल्यांत तिनें त्याला दिली जन्मठेप ! तिच्याशीं केलेला विवाह हीच एक जन्मठेप ठरली होती. तो सुटला तरी ह्या जन्मठेपीचं दुःख त्याचा ससेमिरा सोडणार नव्हतं मरण हीच खरी त्याची मुक्ति होती. आज तो मुक्त झाला. माणसांच्या कायद्यांनीं त्याला सोडलं. अंधारलेल्या जगांतून तो बाहेर आला. एखाद्या मांजरानें अंधारांतून उजेडांत आल्यावर डोळ्यांची उघडझांप करावी तशीच उघडझांप त्यानें केली. एकोणीस वर्षांपूर्वीं ज्या जगाचा निरोप घेतला तें जग तो बघत होता. आणि तें कितीतरी बदललें होतं. जग महायुद्धाच्या खाईंतून बाहेर पडलं. स्वातंत्र्य मिळालं. देश दुभंगला. लोक क्षणभर माणूसकी विसरले. रक्ताचे पाट वाहिले. आणि आज देश प्रजासत्ताक झाला. घटनेने मानवी हक्कांची बूज खरंच राखली होती कां ? माधव बाहेर पडला तेव्हां पोलिसांचा बँड वाजत होता. हवेंत तोफा डागल्या जात होत्या. आणि मजा अशी एकोणीस वर्षं त्याचं बुजलेलं मन कोठल्यातरी उत्साहानें उगाच भारलं. बँडच्या सुराबरोबर त्याच्या मनाच्या संवेदना छेडल्या गेल्या, एकोणीस वर्षं त्यांच्या मनावर दडपण

पडलं. त्यावर गंज चढला. मनावर जाड पापुद्रे बसले. बँडचे सूर या साऱ्यांना छेदून गेले व त्याच्या अंतःकरणांत साद उठली.

त्याला वाटल कोणाला साद देऊं मी ! त्या साथीला प्रतिध्वनी आतां मिळणार नव्हता. जिच्याकडून मिळेल असं वाटलं ती छिनाल निघाली. प्रेमाच्या मोबदल्यांत त्याला जन्मठेप देऊन ती काळाच्या पडद्याआड गेली. वीस वर्षांपूर्वी त्यानें तिचा खून केला. आसुरी आनंद त्याला मिळाला. जीवनमूल्य, सांसरिक-मूल्य कायम ठेवण्यासाठीं त्यानें पत्नीचा खून केला. संसारावर पडलेला अमांगल्याचा पाश दूर करण्यासाठीं त्यानें तिला मुक्ति दिली. हेंच करण बरोबर आहे असं त्याच्या मनानें आर्जवून सांगितलं. मनाची साक्ष त्याला साद देत होती. व्यक्तिपेक्षां मूल्य श्रेष्ठ आहे ! प्रेमापेक्षां धर्म श्रेष्ठ आहे ! असा जाब मिळाल्यावर त्यानें संकल्पित कृत्य केलं होतं. पत्नीसाठीं तो कैदी झाला व आज मुक्त झाला. आतां त्यांच्यावर बंधन नव्हतं. निवारा नव्हता ! पाश नव्हते ! पंख फुटलेल्या पाखरानें आकाशाकडे बघावं तसं निळं आकाश त्याला उगाच साद घालत होतं. वातावरण पंचमहाभुतांत विलीन झालेला त्याच्या पत्नीचा आत्मा त्याला साद घालत होता काय ! मग तिची उत्कटतेनें आठवण यावी असं काय घडलं होतं ! कोठल्या घरट्यांत मी उबेला जाऊं असं त्याला कळवळून वाटलं. आतां कोठलेच पाश त्याला राहिले. नव्हते. तो तुरुंगांत असतांना त्याचे आई वडील निवर्तल. आईच्या मागून वडील बारा दिवसांनीं गेले. एकमेकाशिवाय जगूं ते जगूच शकत नव्हते. तुरुंगांत दोघांसाठीं त्यानें मूक अश्रू गाळले. आई भरल्या कुंकवानें गेली त्याला स्वतःहून पत्नीचं कुंकू पुसावं लागलं. असं असतांना तिची या क्षणी आठवण कां यावी ? तिच्यावर त्याचं आत्यंतिक प्रेम होतं. त्याच्या मोबदल्यांत त्याची जी परवड झाली त्याला अंत नव्हता. आज तो सुटला. सूर्योदयानें त्याचें स्वागत केलें. आणि याच सूर्योदयानें बरोबर वीस वर्षांपूर्वी त्यानें केलेला खून पाहिला होता. खिडकींतून असेच कोवळे किरण शिरले होते. खून केल्यावर त्या कलेवराचं चुंबन घेतांना या किरणांनीं त्याला पाहिलं होतं. व्यक्तिमात्राच्या भोंवतीं गुरफटलेले हे पाश किती आविनाशी आहेत असं त्याला राहून राहून वाटत आलं. वीस वर्षांपूर्वीची प्रत्येक घटना सजीव होऊन सांगत होती तूं खुनी आहेस. मुलं म्हणत होतीं हा पहा सुटलेला कैदी ! वीस वर्षांपूर्वींची घटना अद्याप ताजी होती... ... ...

सूर्योदयासमयीं त्यानें पत्नीचा खून केला. ती व्याभिचारी निघाली. तिला शासन करण्या-करितां मार्ग नव्हता. म्हणून कायदा त्यानें


रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?

आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं बौद्धिक मर्दुमकी गाजविण्याचें मनोरंजक रणक्षेत्र

शब्दरंजन स्पर्धा

★

रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

★

हातांत घेतला होता. माधव मध्यमवर्गीय कुटुंबांतून वर आला. घरखर्च भागत नाहीं म्हणून त्यानें पेईंग गेस्ट ठेवला आणि त्याची पत्नी त्यालाच वश झाली. खूप दिवस यावर त्यानें विचार केला. मनोज्ञानी पत्करली. मानभंग सोसला. असं असून चकार शब्द तो बोलला नव्हता. पत्नीचा व त्याच्या पेईंग गेस्टचा एकांत त्यानें पकडला हळूहळू तिच्या वागण्यांत त्याला बदल दिसूं लागला. तिला याची जाणीव त्यानें करून दिली. पण तिचं पाऊल वाकड पडल्याचं त्याला दिसून आलं. ती त्याच्या पुरती आहारी गेली. शेवटीं तिचा खून करायचा त्यानं ठरवलं. या विचारासरशीं तो दचकला. वास्तविक त्याच्या संसारांत विष कालवणाऱ्या जाराचा त्यानें खून करावयास हवा होता. सद्भावनेंतून त्यानें पेइंगगेस्ट ठेवला. आणि त्याच्या पत्नीला ही भावना ठेवतां आली नाहीं. ती मनोवृत्तीला बळी पडली. तिचं वाकडं पाऊल कोठला मार्ग स्वीकारणार याला अंत उरला नाहीं. यासाठीं तिलाच बळी द्यायचं त्यानं ठरवलं. पेइंगगेस्टला मारून तो सुटला तरी अनेक पेइंगगेस्ट तिनें निर्माण केलेले त्याला पाहायचे नव्हते. आणि बरोबर वीस वर्षांपूर्वी त्याच्या विचारांनीं आकार घेतला होता.........

सकाळीं तिच्या खोलींत प्रवेश केला तेव्हां ती शांत झोपल्याचं त्याला दिसून आलं. जवळच्या खिडकींतून सूर्याची किरणें आंत आली होती. तिनें श्वास टाकला कीं तिच्या नाकपुड्या हालत होत्या. उरोज वरखालीं होत होते आणि तेच स्पंदन बंद करायला तो निघाला होता. तो तिच्याजवळ गेला. त्यानें दोरी सरसावली. गळा दाबून तिचा प्राण घ्यायला तो निघाला. क्षणभर तिच्या लोभस चित्राकडे पाहून तो बावरला. धर्मेच । अर्थेच । कामेच । अस म्हणत विवाहासमयीं त्यानें तिचा हात हातांत घेतला व त्यालाच तिचा कंठ फोडायाची पाळी आली. अनेक विचार त्याच्या मनांत आले. त्याचं तिच्यावर प्रेम होतं. त्या मोहबत्तीसाठीं त्यानें तिची क्षमा मागितली. आणि एका क्षणांत दोरी आवळली. रात्रीच्या समयीं ढोलींतून चित्कार करत बाहेर पडणाऱ्या पक्षाप्रमाणें तिनें अस्फुट किंकाळी फोडली. आत्मा तिला सोडून गेला व राहिलं फक्त दुबळं शरीर ! त्याला वासनांना जिंकतां आलं नव्हतं. काय झालं याची त्याला जाणीव झाली. त्याला वाटलं आतां ही

खरोखर सुंदर झाली. स्वतःशी तो म्हणाला "प्रिये काय झालं याची तुला जाणीव आहे कां ? आतां तूं खरोखर सुंदर झालीस." ज्या शरीराला गेल्या वर्षांत तो शिवला नव्हता. त्या कलेवराच्या गालाचं त्याने चुंबन घेतलं तो गाल आतां विटाळलेला नव्हता. असं त्याच्या मनांत आलं. आणि मग तो धाय मोकलून रडला होता...





'उषःकाल' नियतकालिकाचा दिवाळी अंक म्हणजेच रसिक व सूज्ञ वाचकांना दिवाळीची एक वाङ्मयीन मेजवानीच!.... आगामी निवडणुकीच्या दुंदुभि झडूं लागल्या! उमेदवार हुश्शार!....परंतु भारताचा व भारतावरोबर आपल्या महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास मात्र या निवडणुकीच्या राजकारणापासून फार फार दूर आहे! त्या विकासाचे मार्ग दाखविणारे तेजस्वी विचारांचें साहित्य 'उषःकाल'च्या आगामी दिवाळी अंकांत वाचावयास मिळेल.

**आमचे लेखक :—**

★ **श्री. शंकरराव मोरे, राज्यपाल काकासाहेब गाडगीळ, प्रा. न. र. फाटक, पां. वा. गाडगीळ, वि. पां. दांडेकर, प्रा. मा. गो. दाभाडे, पीएच्. डी. वसन्तराव वरखेडकर** यांचे विचारप्रवर्तक लेख.

★ **सौ. वेणूताई चव्हाण, सौ. उषाताई डांगे, सौ. सुमतीबाई जोशी** यांच्या आमच्या प्रतिनिधींनी घेतलेल्या खास मुलाखती.

● **प्रा. अनंत काणेकर, वसंत शांताराम देसाई, रघुवीर सामंत, यशवंत हरी पाध्ये, रतनलाल डी. शहा, सौ. ललितागौरी देशपांडे, कवि राजस, राम केळकर, शांताराम पाटील, दामोदर नाईक वि. आ. बुवा इ.** च्या हृदयंगम ललित कथा.

अशा विविध साहित्यांनीं नटलेला व महाराष्ट्रांतील प्रेक्षणीय स्थळांच्या चित्रांनीं सुशोभित केलेला यंदाचा **'उषःकाल'** दिवाळी अंक अवश्य वाचा.

जाहिरातदारांनीं व एजंटांनीं त्वरा करावी.

लिहा— संपादक **ना. शि. ठाकूर,**
१४ डी. खोताचीवाडी, मुंबई ४.

आज त्या कृत्याची सांगता झाली. तो सुटला होता. त्याला ज्यांनीं सहानुभूति दाखवली ती पिढी आतां राहिली नव्हती. व नवीन पिढी त्याला कैदी म्हणत होती. त्याच्या हातांतील बेड्या सुटल्या. व दुसऱ्या अदृश्य बेड्या अडकल्या होत्या. त्याला वाटत होतं मला फासावर लटकवल असतं तर! कायद्यांनी तें पण केलं नव्हतं. फासांवर जाणं त्याला फार आवडलं असतं. मृत्यूनें त्याला अमर केलं असतं. खून केल्यावर त्यानें स्वतःच्या मृत्यूची वाट पाहिली. त्याच स्वागत तो करणार होता. मृत्यू हेंच त्याच्या कृत्याचं खरं प्रायश्चित होतं. रोज त्याला कालपुरुषाच दर्शन व्हायचं. त्याला वाटायचं कधी संपणार हा खटल्याचा सोहळा! मृत्यू सुंदर होऊन आलेला त्याला साद घालायचा. तो स्वतःशीं म्हणायचा तूं येणार असशील तर तिचं रुप घेऊन ये. कारण शेवटपर्यंत माझं तिच्यावर प्रेम होतं. माझा प्राण घ्यायचा तिलाच फक्त हक्क आहे. असं असून त्याला मिळाली जन्मठेप त्याच दुःख त्याला सोसावं लागणार होतं. त्याला हवी होती मुक्ति! आणि माणसांच्या कायद्यांनीं त्याला जन्मांतरीच दुःख दिलं. सावलीप्रमाणें ते त्याची पाठ सोडणार नव्हतं. असं असतांनां या संवेदनां कां येतात त्या॰ कळत नव्हतं......

पोलिसांचा बँड वाजत होता. ड्रमवरं टिपरी द्रुतगतीनं पडत होती. आणि त्याच्या संवेदना जाग्या होत होत्या. त्याला साद मिळत होती. तुरुंगातला माधव मेला होता. मधली वीस वर्षे लुप्त झाली होती. व आनंद घेणारा माधव नव्यानें जग पहात होता. जे दरघडी बदलत होतं. वीस वर्षांपूर्वींच जग बदललं होतं. तुरुंगाच्या बाहेर वडाची झाड होती बखळ होती आणि आज त्याला दिसत होतं मोठ मैदान! मुलं खेळत

---

Statement about ownership and other particulars about newspaper '**ABHIVYAKTI**' as required under Rule 8 of the Registration of Newspapers (Central) Rules, 1956.

## FORM NO. IV ( RULE NO. 8 )

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Place of Publication | ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Covindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 2 | Periodicity of its Publication | ... ... ... | Half-yearly. |
| 3 | Printer's Name | ... ... ... | **Yashwant Hari Padhye** |
| | Nationality | ... ... ... | Indian |
| | Address | ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 4 | Publisher's Name | ... ... ... | **Yeshwant Hari Padhye** |
| | Nationality | ... ... ... | Indian |
| | Addrees | ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |
| 5 | Editor's Name | ... ... ... | **Yeshwant Hari Padhye** |
| | Nationality | ... ... ... | Indian |
| | Address | ... ... ... | Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14 |
| 6 | Names and addresses of Individuals who own the newspaper and partners or share-holders holding more than one percent of the total capital. | ... ... ... | **Yashwant Hari Padhye**<br>Ahmed Sailor Bldg. No. 8<br>Govindji Kenni Rd.,<br>Dadar, Bombay 14. |

I, **Yeshwant Hari Padhey**, hereby declare that the particular given above are true to the best of my knowledge and belief.

**Y. H. Padhye.**
Signature of Publisher.

15 th August 1961.

होती. [illegible] झाली होती. नौका फिरत होती. काठांवर असलेल्या मारुतीच्या देवळाचं आवार मोठं झालं होतं. कोठल्याशा भाविकानें वाजवलेल्या घंटेचा आवाज आसमंतांत ऐकूं आला...म्हणजे जग बदलत होतं. समाजाची घडी बदलत होती. सरकार त्याच्या दुंदुभी वाजवत होतं. आणि माधवचं मन असाच आकार घेत होतं. त्याला एक घरकूल दिसत होतं. त्याचं लग्न झालं तेव्हां त्याची पत्नी जशी दिसली तशीच त्याच्या अंतःचक्षुसमोर उभी राहात होती. जें चित्र त्यानें उरी बाळगलं होतं. पांढरा ब्लाऊज पांढरं पातळ परिधान करणारी, काळेभोर मंगलसुत्र पदरावर काढणारी, तुळशीला पाणी, घालणारी मूर्ति त्याच्या डोळ्यापुढें उभी राहिली. जिच्या कोंवळ्या बांध्याला फक्त शिवाचाच स्पर्श झाला आणि या शिवाच्या दर्शनासाठीं तो जन्मठेपीचं दुःख आनंदानें भोगणारा होता.

***


बाराक्षार व होमिओपाथिक औषधें मिळण्याचें ठिकाण —

होमिओ लॅबोरेटरीज

१७८, न्यू चर्नी रोड, मुंबई ४.

विनामूल्य माहितीपत्रक मागवा



=: सेवा आणि सुरक्षितता :=

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा**

**शेडयुल्ड बँक**

मुख्य कचेरीः— **चिरमुले निकेतन,** सातारा शहर.

**प्रगतीचे आणखी टप्पे**

१) बँक आतां बॉम्बे बँकर्स क्लिअरींग हाऊसची डायरेक्ट मेंबर झाली आहे.
२) सातारा रोड येथें लवकरच नवीन शाखा उघडण्यांत येत आहे.
३) केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या आदेशानुसार सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि. ही बँक ह्या महिन्यांत सामावून घेतली जात आहे. त्यामुळें ठेवींमध्यें ½ कोटी व ६ शाखांची भर—

**एकूण शाखा २१ होतील.**

=: मुंबई व उपनगरांतील शाखा :=

**फोर्ट — मुंबई, गिरगांव, दादर, डोंबिवली —**

**एस्. एच्. जोशी** — जनरल मॅनेजर
**एस्. एच्. साठे** — चेअरमन
**एन्. जी. मोघे** — मॅनेजर, मुंबई (सेंट्रल शाखा)


## वसंत फुलला मनीं—

वसन्त फुलला वनी, रे भाऊ
वसन्त फुलला मनीं—
सहजची पुष्पवनीं या फिरता
सौख्यें तुजला पहात असता
गतगोष्टी त्या स्मरता स्मरता
हा जीव येई उन्मळूनी ॥ १ ॥

दैवें जरी तुज केलें करटूं
परि असशी तूं मम प्रिय भाऊ
सौख्यानें या जन्मीं नांदू
निश्चय राजवनीं ॥ २ ॥

आशेची नव—कुसुमें फुलती
वैभव—सुमनें पदरी असती
नच हर देवा आमुची सु-मति
राहो प्रेम मनीं ॥ ३ ॥

—सौ. कृष्णाताई चिरपुटकर

## हिंद माता प्रकाशन

### आमचीं प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) महारोगी महात्मा (फादर डेमियन) (चरित्र) दुसरी आवृत्ति | ० | १२ | ० |
| (२) रम्य संसार [कथासंग्रह] | २ | ८ | ० |
| (३) शोककारण आणि मराठी शोकांतिका | ७ | ० | ० |
| (४) सं. अजब कारस्थान (दुसरी आवृत्ति) (स्त्रीपात्र विरहित नाटक) | १ | ० | ० |
| (५) सम्राट यक्षमित्र अथवा जादूचें बेट (कादंबरी) | ३ | ० | ० |
| (६) सं. सावत्र आई (पुरुषपात्र विरहित नाटिका) | ० | १० | ० |
| (७) खुला संसार (सचित्र नाटक) | १ | ४ | ० |
| (८) जीवनांतील जोडीदार (चरित्र) | २ | ० | ० |
| (९) कामगार संघटनेचें तत्त्वज्ञान | २ | ८ | ० |
| (१०) वेंचलेले दाणे (सचित्र गोष्टी) | ० | ६ | ० |
| (११) मुलांचा एडिसन (सचित्र चरित्र) | २ | ० | ० |
| (१२) वंचना | २ | ० | ० |
| (१३) ध्येयवादी डॉक्टर (चरित्र) | २ | ० | ० |
| (१४) झुंजार वॉशिंग्टन (चरित्र) | २ | ० | ० |
| (१५) राष्ट्राची उभारणी | १ | ८ | ० |
| (१६) जादूची नगरी | ० | ६ | ० |
| (१७) संजीवनी (चरित्र) | २ | ० | ० |
| (१८) प्रा. ना. सी. फडके गुण-गौरव ग्रंथ | ४ | ० | ० |
| (१९) डॉन ब्रॅडमन (चरित्र) | २ | ० | ० |
| (२०) संगित सावळा तांडेल (नाटक) | १ | ८ | ० |
| (२१) संगित समाज सेवक (स्त्रीपात्र विरहित नाटक) | १ | ८ | ० |

### आमचीं आगामी प्रकाशनें

(१) तारा कीं सितारा (समुद्र जीवनावरील कादंबरी)

(२) इवल्याशा गोष्टी (सचित्र)

(३) बिल्व पत्र (कादंबरी)

वरील पुस्तकांसाठीं आजच मागणी करा.

**हिंद माता प्रकाशन**

७/३० पटेल टेरेस, मुंबई १२

होती. जवळच्या तलावावर बाग झाली होती. नौका फिरत होती. काठांवर असलेल्या मारुतीच्या देवळाचं आवार मोठं झालं होतं. कोठल्याशा भाविकानें वाजवलेल्या घंटेचा आवाज आसमंतांत ऐकूं आला...म्हणजे जग बदलत होतं. समाजाची घडी बदलत होती. सरकार त्याच्या दुंदुभी वाजवत होतं. आणि माधवचं मन असाच आकार घेत होतं. त्याला एक घरकूल दिसत होतं. त्याचं लग्न झालं तेव्हां त्याची पत्नी जशी दिसली तशीच त्याच्या अंतःचक्षुसमोर उभी राहात होती. जें चित्र त्यानें उरी बाळगलं होतं. पांढरा ब्लाऊज पांढरं पातळ परिधान करणारी, काळेभोर मंगलसुत्र पदरावर काढणारी, तुळशीला पाणी, घालणारी मूर्ति त्याच्या डोळ्यापुढें उभी राहिली. जिच्या कोंवळ्या बांध्याला फक्त शिवाचाच स्पर्श झाला आणि या शिवाच्या दर्शनासाठीं तो जन्मठेपीचं दुःख आनंदानें भोगणारा होता.

***


बाराक्षार व होमिओपॅथिक औषधें मिळण्याचें ठिकाण —

होमिओ लॅबोरेटरीज

१७८, न्यू चर्नी रोड, मुंबई ४.

विनामूल्य माहितीपत्रक मागवा



=: सेवा आणि सुरक्षितता :=

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा**

**शेडयुल्ड बँक**

मुख्य कचेरी:— **चिरमुले निकेतन,** सातारा शहर.

**प्रगतीचे आणखी टप्पे**

१) बँक आतां बॉम्बे बँकर्स क्लिअरींग हाऊसची डायरेक्ट मेंबर झाली आहे.
२) सातारा रोड येथें लवकरच नवीन शाखा उघडण्यांत येत आहे.
३) केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या आदेशानुसार सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि. ही बँक ह्या महिन्यांत सामावून घेतली जात आहे. त्यामुळें ठेवींमध्यें ३ कोटी व ६ शाखांची भर—

**एकूण शाखा २१ होतील.**

=: मुंबई व उपनगरांतील शाखा :=

**फोर्ट — मुंबई, गिरगांव, दादर, डोंबिवली —**

**एस्. एच्. जोशी** जनरल मॅनेजर — **एस्. एच्. साठे** चेअरमन — **एन्. जी. मोघे** मॅनेजर, मुंबई (सेंट्रल शाखा)


## वसंत फुलला मनीं—

वसन्त फुलला वनी, रे भाऊ
वसन्त फुलला मनीं—
सहजची पुष्पवनीं या फिरता
सौख्यें तुजला पहात असता
गतगोष्टी त्या स्मरता स्मरता
हा जीव येई उन्मळूनी ॥ १ ॥

दैवें जरी तुज केलें करडूं
परि असशी तूं मम प्रिय भाऊ
सौख्यानें या जन्मीं नांदू
निश्चय राजवनीं ॥ २ ॥

आशेची नव—कुसुमें फुलती
वैभव—सुमनें पदरी असती
नच हर देवा आमुची सु-मति
राहो प्रेम मनीं ॥ ३ ॥

—सौ. **कृष्णाताई चिरपुटकर**